Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी रियासत

मध्यविभाग : ४

गोविंद सखाराम सरदेसाई

८९५
२५

मूल्य तीन रुपये

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

28706

स्टाक प्रमाणीकरण १९८४-१९८५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ओ३म्
पुस्तक संख्या ४९४/२५
पञ्जिका संख्या २८७०५

पुस्तक पर सर्व प्रकार की निशानियां लगाना वर्जित है। कोई सज्जन पन्द्रह दिन से अधिक देर तक पुस्तक अपने पास नहीं रख सकते। अधिक देर तक रखने के लिये पुनः आज्ञा प्राप्त करनी चाहिये।

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

A HISTORY OF MODERN INDIA

MARATHA PERIOD

1761-1774.

G. S. SARDESAI, B. A., BARODA.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकाशक

ग. म. वीरकर, चालक गणेश महादेव आणि कंपनी,

६२१ गिरगांव रोड, मुंबई नं. ४.

मुद्रक

अनंत सखाराम गोखले, 'विजय' प्रेस, ५७० शनिवार, पुणें.

[सर्व हक्क लेखकानें स्वाधीन ठेविले आहेत.]

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी रियासत

मध्यविभाग–४

[सन १७६१ ते १७७४].

CHECKED 1973
Initial

लेखक

गोविंद सखाराम सरदेसाई, बी. ए.

बडोदें.

पुस्तक सं०
आगत सं०
तिथि०

प्रकाशक

गणेश महादेव आणि कंपनी, मुंबई.

शके १८४७] प्रथमावृत्ति [सन १९२५

किंमत तीन रुपये.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गो. स. सरदेसाई यांचीं पुस्तकें

१ मुसलमानी रियासत			आवृत्ति खलास
२ मराठी	"	पूर्वविभाग	" "
३ "	"	मध्यविभाग १ (१७०७ ते ४०) पहिले दोन पेशवे	रु. ३-०-०
४ "	"	मध्यविभाग २ (१७४०-६१) पे. नानासाहेब	रु. ३-०-०
५ "	"	मध्यविभाग ३ (१७५०-६१) पानिपत प्रकरण	रु. २-४-०
६ "	"	मध्यविभाग ४ (१७६२-७४) पे. माधवराव	रु. ३-०-०
७ ब्रिटिश	"	पूर्वार्ध नवीन आवृत्ति	रु. ३-८-०
८ शालोपयोगी भारतवर्ष			रु. १-०-०
९ बालोपयोगी महाराष्ट्राचा इतिहास, नवीन आ.			रु. ०-४-०
१० महाराष्ट्राच्या इ० सोप्या गोष्टी			रु. ०-६-०
११ इंग्लिश भाषेची गृहशिक्षा			रु. ०-८-०

गणेश महादेव आणि कंपनी,

६२१ गिरगांव रोड, मुंबई नं. ४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रस्तावना

१. **प्रस्तुत कालखंडाचें माहात्म्य.**—मराठ्यांच्या इतिहासांत शिवछत्रपतींच्या उद्योगानंतर दुसरा उज्ज्वल व स्फूर्तिदायक कालखंड म्हटला म्हणजे माधवराव पेशव्याचीं अकरा वर्षें होत. मराठ्यांस जितकें छेडावें, तितकें त्यांचें पाणी चढतें, जितकीं ज्यास्त संकटें यावीं, तितकें त्यांचें तेज ज्यास्त फैलावतें, आणि योग्य पुरस्कर्ता मिळतांच त्यांचा राष्ट्रोद्योग वृद्धि पावतो, असा या राष्ट्राचा स्वभावविशेष कित्येकांनीं वर्णिला आहे, तो माधवरावाचे वेळीं अनेक प्रसंगांत चांगला निदर्शनास आला. संभाजी, राजाराम, ताराबाई यांजवरील संकटकाळांतच मराठ्यांचें राष्ट्रतेज विशेष चमकलें. तशाच प्रकारें पानिपतच्या अरिष्टानंतर माधवरावाचें नेतृत्व लाभतांच, मराठ्यांनीं पुनरपि आपला जोम दुनियेस दाखविला. माधवराव दिवंगत झाल्यावर नारायरावाच्या निष्ठुर वधानें राष्ट्राचा पाय खालावत असतां, अनेक कल्पनातीत संकटांतून चार दोन वर्षांत त्यानें आपला जम पूर्ववत् बसवून परंपरागत कार्यक्रम चालू राखिला. अशीं हीं नानाविध स्थित्यंतरें भविष्यत्कालाचीं राष्ट्रीय आशाबंधनें असून, त्यांचा इतिहास शास्त्रीय पद्धतीनें व आत्मिक भावनेनें लिहिलेला राष्ट्रास पाहिजे आहे. या विषयांत आतां स्वावलंबनाचा मार्ग आपणांस माहीत झाला असून, अनेकांचा योग्य हातभार लागेल तर अल्प कालांतच त्यास परिपूर्णता येईल.

२. **विषयविभाग.**—या विषयांत मी उद्योग करूं लागल्यापासून आजपावेतों त्याचें स्वरूप उत्तरोत्तर पुष्कळसें बदलत गेलें. शिवकालीन भागांतील घडामोडींचें स्वरूप शाहूकालांत नाहीं, आणि शाहूकालांतील विषयांचें स्वरूप उत्तर पेशवाईंत नाहीं. प्रत्येक काळांतील घडामोडी, प्रश्न व प्रमेयें भिन्न स्वरूपाचीं दिसतात. प्रथम मीं शिवकालीन भाग प्रसिद्ध केला, तेव्हां त्यास 'मराठी रियासत—पूर्वार्ध' हें नांव दिलें. परंतु पुढें अभ्यास करूं लागल्यावर 'पूर्वार्ध' शब्दाची सार्थकता नष्ट झाली. म्हणून पुढें मध्यविभाग हें नवीन नांव कल्पून, त्याचे पानिपतपर्यंतचे तीन खंड प्रसिद्ध

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केले. समज होता कीं, तेथून पुढें उत्तरविभागास सुरुवात होईल. पण माधवरावाचा अभ्यास संपल्यावर असें ठाम मत बनलें, कीं उत्तर विभागाची सुरुवात पानिपतापासून होत नसून, त्या थोर पेशव्याच्या अंतकालापासून होते. माधवरावानें तर पानिपतावर अपुरा राहिलेला कार्यभाग पुरा केला. अर्थात् माधवरावाच्या उद्योगाचा समावेश मध्यविभागांतच करणें क्रमप्राप्त होऊन, त्यास मध्यविभाग ४ असें नांव दिलें आहे. एवंच मराठी रियासतीचे खालील भाग मीं स्वीकारिले आहेत:—

१ पूर्वविभाग—शिवछत्रपतीपासून सन १७०७ पावेतों;
२ मध्यविभाग—सन १७०७—१७७४त सवाईमाधवरावाचे जन्मापर्यंत:-
मध्यविभाग १—१७०७—१७४० पहिले दोन पेशवे;
मध्यविभाग २—१७४०—१७६१पे. नानासा०, दक्षिणचा कारभार;
मध्यविभाग ३—१७५०—१७६१ पे. नानासा०, पानिपतप्रकरण;
मध्यविभाग ४—सन १७६१— १७७४ पेशवा माधवराव वगैरे.
३ उत्तरविभाग—सन १७७४ पासून मराठशाहीच्या अखेरीपावेतों.

या उत्तरविभागाचे पोटभाग किती व कसे होतील तें आतांच सांगतां येत नाहीं. वरील सर्व भागांची व पोट भागांची मांडणी सुटसुटीत, आखीव व मनांत ठसण्याजोगी होण्यास अजून थोडा अवधि लागेल. अखेरपर्यंत मजल पोंचल्यावर, विषयाचें एकंदर अंतर्बाह्य स्वरूप लक्षांत घेऊन सर्व भाग वाचकांच्या सोयीचे व सुव्यवस्थित करून देण्याचा इरादा आहे.

३. संगति जुळविण्याच्या अडचणी.—सन १९२२ अखेर पानिपतपर्यंतचा भाग प्रसिद्ध करून मीं पुढील काम हातीं घेतलें, तेव्हां साहित्याच्या अव्यवस्थेमुळें प्रथमच मोठी अडचण उत्पन्न झाली. पेशवाईच्या आरंभकालीं एक एका प्रकरणाची संगति जुळविण्यास भरपूर पुरावा नसल्यामुळें चांचपडत जावें लागतें, त्याच्या उलट प्रकार पानिपतोत्तर कालांत भासूं लागतो. ह्या काळांतील ऐतिहासिक साहित्य उत्तरोत्तर इतकें विपुल व नानाविध होत जातें, कीं स्थल, व्यक्ति, काल व घडामोडी यांची स्पष्ट निश्चिति करण्यास फारच प्रयास पडतात. मला वाटतें सवाई माधवराव व त्यापुढील बाजीराव या दोन कारकीर्दींचे प्रसिद्ध झालेले कागद एकंदर मराठशाहीच्या निम्याहून जास्त असावेत; हा माझा तर्क अतिशयोक्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हे. एवढें साहित्य वाचून त्याचें पृथक्करण करणें, त्यांवरून मुख्य मुख्य घडामोडींचे टप्पे ठरविणें, आणि कार्यकारणभाव ध्यानांत घेऊन एक एका प्रकरणाची संगति जुळविणें, हीं कामें किती अवघड आहेत याची कल्पना काम करणारासच होऊं शकेल. जुनाट बाभळीचें एखादें गुंजट खोड कोणत्याही बाजूनें लांकूडतोड्याच्या कुऱ्हाडीस आंत शिरकूं देत नाहीं, तशीच कांहीं काळ माझी गत झाली. एका कुऱ्हाडीस जेव्हां असलें खोड दाद देत नाहीं, तेव्हां चार दोन असामी मदतीस घेऊन तो चहूंकडून मारा करितो, तेव्हां कोठें एखादा खका निघाला तर निघतो. ही खूणगांठ मनाशीं बांधून मीं मुद्दाम चार दोन साथीदार पैदा केले. सर्वांनीं एकत्र बसून सर्व साहित्य पुनः पुन्हा वाचून टिपणें केलीं; अनेक प्रकारें चर्चा करून मुख्य कालखंड व टप्पे निश्चित केले; स्थलांची, मितींची व व्यक्तीं-ची नोंध आणि संचाराच्या स्थलकालांचीं कोष्टकें बनविलीं. इतकें केवळ जमीन साफ करण्याचें प्राथमिक काम तयार झाल्यावर, मुख्य घडामोडींचा संदर्भ थोडा बहुत जुळून येऊं लागला. तो नजरेसमोर ठेवून त्या त्या बाबती-खालीं सर्व उपलब्ध साहित्य विभागून दिलें. प्रसंगोपात्त व्याख्यानांच्या व लेखांच्या द्वारें मीं आपलीं प्रमेयें जनतेपुढें मांडून अजमावून पाहिलीं. इतका पल्ला गांठल्यावर मग प्रत्यक्ष लेखनास विलंब लागला नाहीं. संबद्ध कागद कालक्रमानें व विषयानुरोधानें जुळवितांच ते एक एक प्रकरणाचा वृत्तान्त सपासप बोलूं लागतात; आणि एकदां या हकीकती वेड्या वांकड्या लिहून काढून त्या पुनः तपासून सुधारल्यावर, एकंदर रचना मनोहर व तरतरीत दिसूं लागते. असा हा उद्योग करण्यांत बुद्धीस जी कवाईत करावी लागते, तीच या विषयाच्या अभ्यासाचें हृद्गत असून, त्यामुळें पानिपतच्या दहा वर्षांचा खंड परीक्ष्य विद्यार्थ्यांच्या उच्च अभ्यासक्रमास जसा लायक आहे, तसाच त्यापुढील अकरा वर्षांचा माधवरावाचा हा काल-खंड सुद्धां विश्वविद्यालयांतील उच्च परीक्षांसाठीं निःसंशय नेमण्यासारखा आहे. त्यांत मराठीप्रमाणेंच पर्शियन, इंग्रजी वगैरे भाषांत भरपूर साहित्य असून अभ्यासकांच्या विचारशक्तीस त्यांत विपुल क्षेत्र मिळूं शकेल. सारांश, दोन वर्षांच्या माझ्या परिश्रमाचा हा परिपाक वाचकांपुढें मांडून स्वीकृत उद्योगाची मजल समापनबिंदूकडे जात आहे याबद्दल मनास आनंद वाटतो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पुस्तकांतील बहुतेक विवेचन मीं तत्कालीन लेखांतील उतारे देऊनच जुळविलें असून, अवतरणांची मात्र सर्वत्र रेलचेल दिसेल. अशा प्रत्येक विधानाचा आधार जेथल्या तेथें देण्याचें मनांत आणितों तर, त्या आधारांनींच सर्व ग्रंथ भरून गेला असता. सामान्य वाचकांस या आधारांची जरूरही नसते. मी अनेकवार सांगत आलों आहें कीं, आपला इतिहास अद्यापि बनावाचे स्वरूपांत आहे. एक तर सर्व कागद बाहेर आले आहेत असें नाहीं. प्रसिद्ध झालेले मराठी कागद केवळ एक बाजू दाखवितील. फारशी, इंग्रजी वगैरे भाषांतील साहित्य बाहेर येऊन प्रत्यंतर पुराव्यानें आपल्याकडील हकीकती तपासून पाहिल्याशिवाय त्या बिनचूक मानतां येणार नाहींत. अशा तपासणीच्या सोयीसाठीं दरएक कलमांतील विषयाचे आधार एकदमच त्या त्या कलमाचे शेवटीं दिले आहेत. या व्यवस्थेनें सामान्य वाचकांस अडथळा न होतां, विशिष्ट अभ्यासकांचीही चांगली सोय होईल.

४. **बहुमोल कागदांचे मासले.**—या आधारभूत कागदांत कांहीं कांहीं वर्णनें व पत्रें खरोखरच अप्रतिम आहेत. त्या वेळची भाषा साधी, अंतःकरणास भेदणारी, व परिस्थित्यनुसार सहजस्फूर्ति उत्पन्न करणारी, अशी दिसते. गोविंदहरीचीं पत्रें अत्यंत कळकळीचीं व उत्तेजक आहेत, त्यांचे मासले खरे ले. ४२७, ४३०, ४४१ वगैरे पाहवे. ले. ८५० च्या पत्रांत मृत्युंजयाच्या जपाची दक्षता पाहतां, माधवरावाच्या प्रकृतीसाठीं राष्ट्रास केवढी काळजी वाटत होती तें दिसून येतें. स्वतः माधवरावाचीं अनेक पत्रें ठिकठिकाणीं दिलीं आहेत, त्यांवरून त्याची उच्च भावना व्यक्त झाल्याशिवाय राहत नाहीं. ख. ले. ९९ (पृष्ठ ३७) व रा० खं. १३.८४ (पृष्ठ १०१) यांतील माधवरावाचे उद्गार राष्ट्रीय परिस्थितीची व संकटांची कल्पना करून देणारे, मुलांनीं तोंडपाठच करण्याजोगे आहेत. खरे ले. १८३१ चें पत्र वाचून मानाजी फाकड्याची मूर्ति डोळ्यांसमोर उभी राहील. चं. दप्तरांतील ले. १०८ चे पत्रांत अहल्याबाईनें आपल्या मुलांस केलेला उपदेश सर्वांनींच ध्यानांत बाळगण्याजोगा आहे. अशीं उदाहरणें देऊं लागल्यास पार येणार नाहीं. सर्वच वाङ्मय रसाळ व उद्बोधक आहे. राष्ट्रानें आत्मिक भावनेनें परामर्श घेतला तरच त्याचें चीज होईल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. अनेकांच्या साह्याची अपेक्षा.—छापलेल्या कागदांत पुष्कळसे अपुरे, त्रुटित, बिनतारखेचे, किंवा कोणीं कोणास लिहिले त्याचा निर्देश नसलेले, असे आहेत. परंतु ही अपूर्णता संदर्भानें किंवा अन्य कागदांच्या मदतीनें बहुतेक भरून काढिली असून, तिचाच मीं स्वीकार केला आहे. अर्थात् माझा निर्णय मूळग्रंथांत सांपडणार नाहीं. वास्तविक निश्चित झालेले हे सर्व तपशील अभ्यासकांचे सोयीसाठीं स्वतंत्र रीतीनेंच प्रसिद्ध व्हावयास पाहिजेत. तसेंच या साहित्यग्रंथांतील सर्व कागद वाचल्यावर, अनेक व्यक्तींचे, घराण्यांचे किंवा प्रकरणांचे पुष्कळसे उपयुक्त तपशील निदर्शनास येतात. सामाजिक, औद्योगिक, धार्मिक वगैरे संबंधाचीही पुष्कळशी उपयुक्त माहिती उपलब्ध होते. परंतु प्रथम राजकीय प्रकरणें सर्व संगतवार जुळविल्याखेरीज, या अवांतर बाबतींचें विवेचन मार्मिक व फलदायी होणें शक्य नाहीं, सबब तूर्त माझा मुख्य प्रयत्न राजकीय व्यवहारां-पुरताच आहे. इतर माहितीचें दिग्दर्शन शक्य तेथें प्रसंगानुसार केलें आहे. राष्ट्रीय इतिहासाचें संशोधन करण्याची स्फूर्ति नुकती कोठें उत्पन्न होत आहे, ती जसजशी फैलावत जाईल, तसतशी सामाजिक वगैरे बाबतींची माहिती, आणि अनेक व्यक्तींचे किंवा घराण्यांचे अप्रसिद्ध वृत्तान्त हळूहळू बाहेर येऊन आपल्या राष्ट्रीय इतिहासांत उपयुक्त भर पडेल. पानिपतावर गारद झालेली अखिल पिढी भरून काढण्यासाठीं माधवरावानें अकरा वर्षांच्या अल्पावधींत अनेक नवीन व्यक्ति व कुटुंबें राष्ट्रोद्योगांत तयार केलीं, त्यांचे उपलब्ध तपशील सर्व एकत्र करून, चरित्रें. हकीकती व वंशावळी शक्य तितक्या संगतवार जुळवून, स्वतंत्र प्रकरणांत संदर्भासह दिल्या आहेत. त्यामुळें हीं चरित्रें स्वतंत्र वाचण्यास सुद्धां मनोरंजक वाटतील. विद्यमान वंशजां-नीं त्यांत स्वतःच्या श्रमांची भर घालून राष्ट्रीय इतिहासांत आपल्या पूर्वजांचें स्मरण टिकाऊ केलें पाहिजे. काल, स्थल व व्यक्ती हे तीन प्रकार केवळ इतिहासाचा आत्मा म्हणून समजले जातात. ते शक्य तितके निश्चित करून या पुस्तकांत दाखल केल्यामुळें, पुष्कळ बाबतींचें आजपर्यंत चालत आलेलें संदिग्ध स्वरूप नाहींसें होऊन, त्या आतां व्यवस्थित व ठसकेदार दिसूं लागल्या आहेत. अजूनही त्यांत पुष्कळ भर पडणें जरूर आहे. वास्तविक हें सर्व काम एकट्याच्या शक्तिबाहेरचें आहे. त्यास अनेकांचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साह्य मिळून आपला सर्व इतिहास साधार व रेखीव असा तयार होऊन वाचकांस मिळेल अशी आशा आहे.

नुसता मराठींतच असा इतिहास तयार होऊन उपयोग नाहीं. परप्रांतीय संशोधनाची त्यांत भर पडणें जरूर असून, आपल्या संशोधनाचें रूपान्तर इंग्रजी भाषेंत प्रसिद्ध होईल, तेव्हांच त्याची सत्यता बाह्य जगास पटूं लागेल. एवंच अद्यापि पुष्कळांच्या उद्योगाची या विषयास अपेक्षा आहे. निकडीचीं कामें तटून राहिलीं आहेत. पूर्वजांनीं बरा वाईट राष्ट्रीय इतिहास बनवून ठेविला, त्याचें यथातथ्य स्वरूप जगाचे निदर्शनास आणण्यापुरत्या उद्योगाची तरी वाण पडूं नये.

६. **आभारोच्चार.**—आधारभूत साहित्याचा तपशीलवार निर्देश संक्षेपचिन्हांसह स्वतंत्रच केला आहे. रघुनाथराव, सखारामबापू वगैरे लांब नांवांची आवृत्ति पुष्कळ जागा अडवते, म्हणून दादा, बापू वगैरे ऱ्हस्व नांवें मुद्दाम स्वीकारिलीं आहेत. तसेंच इतिहासाच्या साच्यांत सर्वच व्यक्ती एका मापानें बसवावयाच्या असल्यामुळें, सामान्य ऐतिहासिक घाटणीस अनुसरून सर्वत्र एकवचनाचाच स्वीकार केला आहे, त्याजबद्दल कोणीं वैषम्य मानण्याचें कारण नाहीं. या कामांत कै० वासुदेवशास्त्री खरे यांच्याच प्रचंड उद्योगाचा उपयोग मला विशेष झाला असून, मराठी इतिहासावरील त्यांचे उपकार शब्दांनीं व्यक्त करणें अशक्य आहे. तसेंच माझे मित्र रा० दत्तोपंत आपटे यांच्या साह्याबद्दल त्यांचाही मी फार ऋणी आहें. ह्यांव्यतिरिक्त अनेक ग्रंथकारांचें. मित्रांचें, संशोधकांचें वगैरे एवढें मोठें साह्य मला झालें आहे कीं, त्याशिवाय हें काम सिद्धीस गेलें नसतें. म्हणून त्या सर्वांचे आभार मी समुच्चयानें एकदांच एकत्र मानितों.

मु. पो. खडकाळा, जि. पुणें.
ता. १० ऑगस्ट १९२५.

गो. स. सरदेसाई.

सूचना—नुकताच बडोद्याचे नोकरींतून निवृत्त होऊन मी लोनावळ्याजवळ कामशेत स्टेशन, पो० खडकाळें, येथें आपला पुस्तकसंग्रह घेऊन राहत आहें. पत्रव्यवहार करणें झाल्यास बडोद्यास न करितां वरील पत्यावर करावा, अशी सूचना आहे. **गो. स. स.**

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकेत-निर्देश.

पूर्वीच्या खंडांत दिलेले आधारग्रंथ याही भागास लागू पडतात. तथापि खालील पुस्तकें मुख्यतः ध्यानांत ठेविलीं पाहिजेत. संक्षेपचिन्ह कंसांत दिलें आहे.

१ **खरे-ऐ० ले० संग्रह** (ख० ले०) भाग १-५ पृष्ठांक व लेखांक चढते आहेत.

२ **भा० इ० सं० मंडळ,** इतिवृत्तें व संमेलनवृत्तें (इ. वृ., सं. वृत्त)

३ **चंद्रचूड दप्तर** (चं.) हा खंड सर्वस्वी याच काळाचा आहे.

४ **इतिहाससंग्रह,** पारसनीस.-ऐतिहासिक टिपणें (ऐ. टि.) ऐतिहासिक स्फुटलेख (ऐ० स्फु० ले०), पेशवे दप्तरांतील सनदा पत्रें (पे० द०), ऐ० स्थलें, ऐ० चरित्रें, ऐ० चर्चा, इत्यादि.

५ **भारतवर्षमासिक**—पारसनीस पु. १ व २; पत्रें यादी (प.या.) व श.

६ **राजवाडे खंड** (खं.); १. ३. ४. ६, १०-१४, २०, २१.

७ **काव्येतिहाससंग्रह** (का. सं. प. या.) व शकावलि; आणि बखरी नागपुरकर भोसले (ना. भो.) व त्यांचे कागद (ना. भो. का.), धाकटे रामराजेचरित्र (धा. रा. च.), होळकर कैफीयत (हो. क.); तसेंच पेशवे, दाभाडे, गायकवाड वगैरेंच्या बखरी (पे. ब.).

८ **तह व करारमदार** (त. क.) **सनदापत्रें** (स. प.), **कैफीयती व यादी** (कै. या.) मावजी व पारसनीसकृत.

९ **पेशव्यांच्या रोजनिशा**—माधवरावाचे २ भाग (मा. रो.), नानासाहेबाचे दोन भाग (ना. रो.), सवाईमाधवरावाचे ३ भाग (स. मा. रो.). हे रोजनिशांचे भाग तपासून विषयवार जुळविणें जरूर आहे.

10 Forrest's Maratha series.—Selections,
11 Seir Mutakherin, vols 1—3.
12 Persian Calendars vols 1—3.

Grant Duff, Wilke's Mysore, Brigg's Nizam इत्यादि.

शिवाय विविधज्ञानविस्तारांतील व इतरत्र प्रकाशित माहिती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्धिपत्र.

[अवतरणांच्या व विरामांच्या कांहीं चुका आहेत, त्या संदर्भानें दुरुस्त करतां येतील.]

पृष्ठ	ओळ	चूक	दुरुस्ती
२४	२६	दूरदेशी,	दुरंदेशी (=दूरदर्शी)
६५	१	गेला असावा,	गेला होता.
८७	६	लुटविला	लढविला.
१०८ ११४	५ २४	आबा पुरंदरे	अजाबा पुरंदरे.
१२९	१४	ता १७-८-६८	ता. ११-८-६३.
१३८		शेवटीं वाढविणें	भा. व. १ प. या. ले. ३१.
१६७	२ व ४	आबा	आपा.
१९९	१७	मल्हारजीच्या	महादजीच्या.
१९९	२०	कायम	कायल (=हैराण).
२११	४	सन १७७९	सन १७६९
२७०	८	चिंतो विठ्ठल	मोरोबा दादा
२९१	३	मा. रो. २·७७	मा. रो. २·७७७
३१८	६	दीदीशीं	सीदीशीं
३७८	१५	अदितिथे	अदितिभे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अनुक्रमणिका.

प्रकरण तेहतिसावें—भाऊबंदकी व कर्तबगारीची सिद्धता

विषय	पृष्ठ
१ माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें	१
२ निजामाची पुण्यावर चाल—	
(अ) मेदकची स्वारी	३
(आ) निजामानें उडविलेला प्रळय	५
(इ) दादाचा अप्रयोजक सल्ला	८
३ चुलतेपुतण्याचा बेबनाव, दादाचें पलायन ...	१२
४ घोडनदीची लढाई, माधवरावास कैद	२२
५ पटवर्धनांकडून मिरज काबीज	३२
६ प्रतिनिधि, जानोजी व निजाम यांची पेशव्यांवर चढाई ...	३६
७ महाराष्ट्रांत धुमाकूळ, पुण्याची लूट व पळ ...	४३
८ राक्षसभुवनावर निजामाचा संहार, विठ्ठल सुंदर ठार ...	५०
९ लढाईचें ऐतिहासिक महत्त्व, माधवरावाची कर्तबगारी ...	५९

प्रकरण चौतिसावें—कर्नाटकांत हैदर नायकाशीं युद्ध

१ हैदर नाइकाची पुंडाई व स्वारीचा उपक्रम... ...	६४
२ एक वर्षांतील अनेक जिकिरीचे संग्राम	६९
३ तिसरी स्वारी, शिरें व तुंगभद्रा दक्षिण प्रदेश काबीज ..	७६
४ चवथी स्वारी, कामगिरी अपूर्ण	८०
५ त्रिंबकराव पेठ्याची स्वारी व तह	८६

प्रकरण पस्तिसावें—दादाचें उद्वेगजनक आख्यान

१ संसारनिवृत्तीचें दादाचें ढोंग	९३
२ राज्याच्या वांटणीची मागणी	१०१
३ संग्रामाची तयारी; आनंदवल्लीस मिलाफ	१०४
४ अमृतरावाचें दत्तविधान, धोडपेची झोडप... ...	११०
५ शनिवारवाड्यांत कैद व दादाचे फितूर	११२
६ दादाची नेमणूक, परिचार व आनंदवल्लीचा वास ...	११६

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण छत्तिसावें—**दोन छत्रपतींच्या दोन दिशा**

१ प्रतिनिधींशीं पेशव्यांचा बेबनाव १२१
२ सातार्‍यास छत्रपतींच्या भानगडी १२८
३ कोल्हापुरकर जिजाबाई व माधवराव १३१
४ मराठीशाहीच्या घटनेंत कोल्हापुरची दुर्बलता ...१३८
५ पेशवाईतील साडेतीन शहाणे—सख्या, देवा, विठला ...१४३

प्रकरण सदतिसावें—**नागपुरकर भोसल्यांच्या फुटीचें निरसन**

१ स्वातंत्र्येच्छु जानोजीस नरम करण्याची आवश्यकता ...१४६
२ पहिली मोहीम, खोलापुरचा तह १५१
३ दुसरी मोहीम, जानोजीचा पाडाव १५४
४ कनकापुरचा तह १६०

प्रकरण अडतिसावें—**इतर महत्त्वाच्या बाबती**

१ बाबूजी नाइकाचा उपद्व्याप १६४
२ पुरंदर किल्ल्यावरील कोळ्यांचा दंगा १६६
३ तोतयांचा सुळसुळाट व पाडाव १७०
४ इंग्रजांची माधवरावास धास्ती १७७
५ मॉस्टिनची पेशव्यांकडे वकिली १८०
६ उदयेच्छु महादजी शिंदे १८३
७ मानाजी फांकडे १८७

प्रकरण ३९ वें—**उत्तर हिंद, पानिपतच्या कर्तव्याची पूर्तता**

१ पानिपतोत्तरची परिस्थिति १८९
२ इंग्रजांकडून मल्हारराव होळकराचा पराभव व मृत्यु ...१९५
३ मल्हाररावाची योग्यता व अहल्याबाई २००
४ गोहदचा वेढा, दादाचा अहल्याबाईवर राग ...२०३
५ राजकारणाची परिणति, जाठांचा पाडाव २०८
६ नजीबखानाशीं अनुसंधान व त्याचा मृत्यु २१२
७ बादशहाचें दिल्लीस प्रयाण... ... ...२१७
८ रोहिल्यांचा पाडाव व पानिपतचा सूड २२३

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण चाळिसावें—माधवरावाचा अंतकाल व योग्यता

१ माधवरावाचा व्याधि–राजयक्ष्मा २२८
२ कटोऱ्यास हवाफेर २३२
३ आजाराचे अखेरचे दिवस २३६
४ राज्याची निरवानिरव २३९
५ कौटुंबिक राहणी २४३
६ कामाचा उरक २४८
७ कडक शिस्त २५३
८ प्रमुख व्यक्ती २५८
९ राज्याचा वसूल २६१
१० शास्त्रीय ज्ञानाकडे दुर्लक्ष... ... ...२६३
११ तुलना २६५

प्रकरण एकेचाळिसावें—माधवरावाचे वेळचीं प्रमुख घराणीं

प्रस्ताव, ब्राह्मण–मराठे घराण्यांची तुलना २६९
१ रामचंद्र जाधव २७१
२ त्रिंबकराव दाभाडे व दमाजी गायकवाड ...२७३
३ धुळप–विजयदुर्गचे २७४
४ विसाजी कृष्ण बिनीवाले... ... ...२७६
५ पेशव्याचे खासगीवाले लिमये २७८
६ नारो आपाजी तुळशीबागवाले २८०
७ चिंतो विठ्ठल रायरीकर २८१
८ रामशास्त्री प्रभुणे २८३
९ सखारामबापू बोकील २८४
१० गंगाधर यशवंत चंद्रचूड... ... ...२८८
११ सखाराम हरि गुप्ते आंबेगांवकर २९०
१२ पटवर्धन गोपाळराव वगैरे २९४
१३, १४ वंशावळ–मुजुमदार व बोंधले पाटील ...३००
१५ गणेश व गोपाळ संभाजी खांडेकर ३०१

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१६ शिवाजी शंकर ओढेकर ३०३
१७, १८ रामचंद्र गणेश कानडे व मुधोळकर मालोजी घोरपडे...३०४
१९, २० गाजीउद्दीन व महंमद मुरादखान... ...३०६
२१ नागपुरकर भोसल्यांचे पदरची मंडळी ३०७
२२ ना. भो. सरदार विनायकराव प्रभु गुप्ते ३०८
२३, २४ रखमाजी गणेश व व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी...३०९
२५, २६, २७ रामाजी केशव तिखे, भवानी काळो, तुळजोराम ३०९
२८ बापूराव विश्वनाथ वैद्य वगैरे ... ... ,,

प्रकरण बेचाळिसावें—शनिवारवाड्यांत पेशव्याचा खून

१ नारायणरावाचें बाळपण व पेशवाईचीं वस्त्रें ...३१०
२ आठ महिन्यांतील ठळक उलाढाली ३१५
३ भोसलेबंधू, मुधोजी व साबाजी यांचा बेबनाव ...३२०
४ दादाच्या कैदेची सक्ति ३२३
५ कटाची उभारणी ३२८
६ शनिवारवाड्यांतील खुनांचा प्रळय ३३५
७ इतिश्री ३४०

प्रकरण त्रेचाळिसावें—बारभाईचें कारस्थान

१ वधोत्तर हालचालींचें दिग्दर्शन ३५०
२ निजामहैदरांवर दादाची स्वारी ३५५
३ गंगाबाईचा पुरंदरावर कारभार ३६०
४ उभय फौजांचें बलाबल ३६९
५ कासेगांवची लढाई ३७३
६ गंगाबाईची प्रसूति व पुत्रोत्सव ३७८

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठी रियासत

मध्यविभाग ४–पेशवा माधवराव

प्रकरण तेहतिसावें

भाऊबंदकी व कर्तबगारीची सिद्धता

[सन १७६१–१७६३]

१. माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें, (२०-७-१७६१).
२. निजामाची पुण्यावर चाल : (अ) मेदकची स्वारी १७६१, जानेवारी–जून. (आ) निजामानें उडविलेला प्रळय, १७६१ सप्टेंबर–डिसेंबर. (इ) दादानें केलेला अप्रयोजक सल्ला, (८-१-१७६२).
३. चुलते-पुतण्यांचा वेबनाव, दादाचें पलायन, १७६२.
४. घोडनदीची लढाई, माधवरावास कैद, (१२-११-१७६२).
५. पटवर्धनांकडून मिरज काबीज, (३ फेब्रुवारी १७६२).
६. प्रतिनिधि, जानोजी व निजाम यांची पेशव्यांवर चढाई.
७. महाराष्ट्रांत धुमाकूळ, पुण्याची लूट व पळ, (मे १७६३).
८. राक्षस-भुवनावर निजामाचा संहार, (१०-८-१७६३).
९. लढाईचें ऐतिहासिक महत्त्व, कर्तबगारीची सिद्धता.

१. माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें (२०-७-१७६१).—ता. २३-६-१७६१ रोजीं नानासाहेब मृत्यु पावल्यावर पुढील व्यवस्थेविषयीं बोलणीं चालू झालीं. त्यांत निरनिराळ्या अनेक मंडळींचा सल्ला घेण्यांत आला. नानासाहेबाचा मुलगा माधवराव १६-२-१७४५ रोजीं जन्मलेला, या वेळीं सोळा वर्षांचा असून कुटुंबांत रघुनाथराव दादा हाच एक वडील अनुभवी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरुष उरला होता. बायकांत वडील गोपिकाबाई, दादापेक्षां निदान दहा वर्षांनीं मोठी, करारी व मानी स्वभावाची होती. दादास स्वतःचें निश्चित मत बनविण्याचें सामर्थ्य नसून, दुसऱ्याचे तंत्रानें वागणारा होता. त्याच्या कर्तृत्वास जरी कोणी फारसा मान देत नसे, तरी प्रस्तुत प्रसंगीं वडील-कीच्या व अनुभवाच्या नात्यानें त्यास कारभारांत प्रमुखपण येणें साहजिक होतें. दादामुळें मराठी राज्याचें जें एकंदरींत नुकसान झालें, त्यावरून त्यास इतिहासांत 'कलिपुरुष' हें टोपण नांव मिळालें, तें किती यथायोग्य आहे हें उत्तरोत्तर दिसून येईल. नानासाहेबाच्या मृत्यूनंतर पहिल्या दुःखावेगांत सर्व प्रमुख मंडळीची थोडीबहुत एकवाक्यता होती. ता. ६-७-१७६१ चें वर्तमान. 'दरबारीं कारभारी सखारामपंत व बाबूराव फडणीस आहेत. उभयतांचें चित्त एक झालें आहे. नारो शंकर व महादजी शिंदे वगैरेंच्या मामलतींबद्दल वाटाघाटी चालू आहेत. दादा, गोपिकाबाई व दोघे कार-भारी यांचें एकचित्त जालें आहे. पुढें कसें चालेल पहावें. आबा व नाना पुरंदरे साताऱ्यास जाणार. खर्चासाठीं कर्जपट्टी करावी असा विचार चालू आहे. श्रीमंत सातारीं जाऊन सत्वरींच येणार. आल्यावर मग येथील कामें चालतील. पुढील दिवस फार अवघड दिसतात. नंतर माधवरावांस दादांनीं समागमें घेऊन जाऊन ताराऊ आईसाहेबांकडून आषाढ वद्य ३ (२०-७-६१) रोजीं वस्त्रें, शिक्के देवविले. बरोबर कारभारी नीळकंठ महादेव उर्फ आबा पुरंदरे व सखाराम बापू; पुरंदऱ्यास दिवाणगिरी व मुतालकीचीं वस्त्रें देण्यांत आलीं'. एतत्संबंधानें खर्च व दानधर्म झाला, त्याचा तपशील पाहिल्यास वस्त्रें घेण्याचा हा विधि कसा चाले तें कळून येतें.

'पुण्यास आल्यावर दादा राज्याचा कारभार करूं लागले. माधवरावांस आपले छायेंत ठेविलें; त्यांनीं कारभारांत बोलूं नये, अशा डौलानें वाड्यांत बंदोबस्तानें ठेविलें. परंतु रावसाहेब याप्रमाणें राहतील असें न घडे'. पानपतचें अरिष्ट व नानासाहेबाचा मृत्यु या दोन संकटांनीं राष्ट्रीय भावना या वेळीं पुष्कळच प्रदीप्त झाली होती. समान संकटांनीं अशी मानसिक भावना राष्ट्रांत उत्पन्न होत असते. सर्वांनीं एकचित्तानें वागून, पूर्वीच्या चुका दुरुस्त करून, तीन पिढ्यांचा राज्याचा उद्योग पूर्ण करावा, अशी उत्सुकता आंतबाहेर फैलावली होती. खुद्द पेशव्यांचे घरांत गोपिकाबाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वगैरे स्त्रिया व लहान मोठे कारभारी याच भावनेचे होते. ही भावना सिद्धीस नेण्यास दादा समर्थ नव्हता हें पहिलें मोठें वैगुण्य उपस्थित झालें. दादा चलचित्त होता. सर्वांचें म्हणणें ऐकून व सल्लागारांची लायकी ओळखून स्वतःचें ठाम मत बनविण्याची ताकद नसल्यामुळें, त्यास नेहमीं दुसऱ्याचे तंत्रानें चालावें लागे, तेणेंकरून हलक्या मंडळीच्या कार्व्यांत तो गुरफटून जाई. शिवाय आपण मोठे कर्तबगार अशी त्यास घमेंड होती, म्हणून सर्व कारभार आपल्याच हातीं ठेवावा, अशी शिकवण मतलबी लोक सांगत, व ती त्यास खरी वाटे. माधवराव लहान असल्यामुळें त्यास दाबांत ठेवून आपण कारभार करूं, अशी मनीषा त्यानें धारण केली. गोपिकाबाई व माधवराव यांजबरोबर वरकरणीं माधुर्य दाखवून, साताऱ्यास जाऊन वस्त्रें वगैरे त्यानें माधवरावाचे नांवानें आणिलीं. तरी पुण्यास आल्यावर प्रत्यक्ष व्यवहार उलगडतांना त्याचा कपटभाव बाहेर दिसूं लागला; आणि दोन चार महिन्यांतच कारभारी मंडळीची व त्याची तेढ उत्पन्न झाली. नानासाहेबाचें तेज लोकांच्या डोळ्यांसमोर अद्यापि खेळत असल्यानें, 'पेशवाईचीं वस्त्रें मलाच द्या', असा उघड हट्ट धरण्याची छाती दादास झाली नाहीं. एकूणएक कारभारी व सरदार यांचें लक्ष गोपिकाबाई व माधवराव यांजकडे असल्यामुळें, दादास दुटप्पी वर्तन ठेवावें लागे. भरसोडीमुळें दोन पक्ष उपस्थित होऊन, त्यांत राज्याचें मात्र नुकसान झालें.

२. निजामाची पुण्यावर चाल, (अ) मेदकची स्वारी (जानेवारी ते जून १७६१).—उदगीरच्या मोहिमेंत निजामाचा संहार उडवून पेशव्यांनीं त्याजकडून साठ लक्षांचा मुलूख मिळविला, परंतु तो प्रत्यक्ष ताब्यांत घेऊन त्याची व्यवस्था लावण्यास सदाशिवरावास फुरसत मिळाली नव्हती. उदगीरचें राहिलेलें काम मागें नानासाहेबानें बरेंचसें उरकलें. पेशव्यास मिळालेला मुलूख रायचूर दुआबांत कृष्णा-भीमांच्या दरम्यान असून, त्यास पंचमहाल अशी संज्ञा त्या वेळीं होती. हल्लीं हा मुलूख निजामाच्या गुलबर्गा जिल्ह्यांत मोडतो. या बाजूस त्या वेळीं अक्कलकोटकर शहाजी भोसले व बाबूजी नाईक बारामतीकर यांची पैरवी होती. त्यांचे हातून मुलखाचा कारभार व्यवस्थित

१. खं.१. २९२-२९४; का.सं.प.या. ४९२; ध. या.; खं. ६-४१७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐटेना व वसूल येईना, तेव्हां नानासाहेबानें नीळकंठ त्रिंबक पटवर्धन यास हुजूरचीं पथकें देऊन नवीन जिंकिलेल्या प्रदेशाच्या बंदोबस्तास पाठविलें. सदाशिवराव अंबे पडदुराहून पानपतचे मोहिमेस गेला, त्याच वेळीं नीळकंठ-रावानें निजामाचे पाठीवर जाऊन तिकडील अंमल बराच रगडून केला. निजामली, बसालतजंग व सलाबतजंग असे त्रिवर्ग एकत्र होऊन कल्बुर्ग्यास जाणार. फौज दहा-पंधरा हजार आहे. लबाडी करावयास चुकणार नाहींत. याजकरितां रघुनाथराव पंचवीसहजार फौज घेऊन गोदातीरीं बालाघाटपावेतों ज्येष्ठमासपर्यंत राहणार'. त्याजबरोबर रामचंद्र गणेश कानडे व पटवर्धन मंडळी होती. सदाशिवराव पानपताकडे जाऊं लागला. तेव्हां दक्षिणेकडच्या बंदोबस्तास खास जिव्हाळ्याची व जिवाची तमा न धरणारी मंडळी पाहिजे असें मनांत आणून, नानासाहेबानें पटवर्धन मंडळींस एकदम मोठ्या तैनाता देऊन वाढविलें. पटवर्धनांची कौटुंबिक जमियत मोठी असून शीलशौर्यादि गुणांनीं ते पेशव्यास व गोपिकाबाईस विशेष प्रिय झाले होते. 'सखाराम-बापू हुशारीनें वागतो तसे तुम्ही सुद्धां कारभारांत निपुण व्हा', असें नाना-साहेब गोपाळराव गोविंदास वारंवार सांगे. अर्थात् पटवर्धनांचा उत्कर्ष या वेळेपासून सखारामपंतास थोडाबहुत असह्य होऊं लागला; आणि सखारामा-मुळेंच दादाचीही पटवर्धनांवर गैरमर्जी होऊं लागली. सदाशिवराव पानपताकडे गेल्यावर पुण्यांत पेशव्याजवळ कारभार बहुतेक दादा करी; आणि सन १७६० च्या अखेरीस पेशवाही उत्तरेंत गेल्यावर पुण्यांतील व्यवहारांत दादाचेंच महत्त्व वाढलें. ह्याच्या अव्यवस्थित कारभाराबद्दल पटवर्धनांचे कागदांत भरपूर ताशेरे आहेत. सन १७६० त निजामानें कांहीं-एक गडबड केली नाहीं. पावसाळा संपल्यावर नानासाहेब उत्तरेंत गेला, तेव्हां निजामाशीं त्याचें सख्य असून, खुद्द त्यास आपल्या मदतीस आणण्या-साठीं पेशव्यानें दादास रवाना केलें. मात्र निजामाचा हा स्नेह वरकरणी होता. त्यानें मराठ्यांचा अंमल नवीन जिंकलेल्या मुलखांत बिलकूल बसूं दिला नाहीं. तशांत सन १७६० च्या नोव्हेंबरांत अक्कलकोटकर फत्तेसिंग भोसले वारल्यावर निजामावरचा दाब त्या बाजूस कमी झाला. सन १७६१ च्या जानेवारींत पानपतावर रणकंदन होत असतां, 'दादा नांदेडवरून हैदरा-बादच्या बाजूस आला. निजामली भेटीस येणार. हिंदुस्थानचे वर्तमानाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाट तो पाहूं लागला'. दादानें त्याशीं गांठ घालून कलह करण्याचा निश्चय केला. महिपतराव कवडे, राघो बापूजी, नीळकंठराव पटवर्धन वगैरे मराठे सरदार गुंटकळ येथें दादाजवळ होते. 'बळच धरलें तर तोफा लावून हल्ला करून तें स्थळ घेणार'. परंतु मराठ्यांची फौज अंगावर आलेली पाहून निजामाची त्यांजबरोबर लढण्याची छाती झाली नाहीं. 'निजाम औशाचे मुक्कामीं आहे. त्याचा रोख कळत नाहीं. बिघाड जालिया परिणाम कठीण आहे'. जानेवारींत व फेब्रुवारींत असें डळमळीत प्रकरण चालून, पुढें पानपतावरील विपरीत बातमी निजामास पोंचतांच त्यानें उचल घेतली. त्याचा सरदार लाला ब्रिजदास आळंद गुंजोटी वगैरे पेशव्यांचे महाल हस्तगत करून अक्कलकोटचे मुलखांत शिरला. तेव्हां दादानें आबाजी नाइकास फौज देऊन बंदोबस्तास पाठविलें. 'शिबंदीखालीं मामलेदार बुडाले. वसुलाच्या पैशाचें दर्शन नाहीं. निजामली फौज, गाडदी व मातबर तोफखाना घेऊन बेदरास आला आहे. श्रीमंतांचें उत्तरेकडील विसकळीत झालें, याकरितां राज्यांत धुंद झाली आहे'. पुढें पेशव्याची प्रकृति अतिशय बिघडल्याचें वर्तमान ऐकून नीळकंठराव पटवर्धनास निजामाचे शहावर ठेवून, उन्हाळ्यांत दादा पुण्यास आला. निजामावरील या स्वारीस 'मेदकची स्वारी' असें त्या वेळच्या हिशेबी ताळेबंदांत लिहिलेलें आहे. निजामाचा मेदक परगणा हैदराबादचे उत्तरेस सुमारें ४० मैलांवर आहे.

(आ) **निजामानें उडविलेला प्रळय** (सप्टेंबर–डिसेंबर १७६१).—पेशवाईची ही वेळ खरोखरीच मोठी आणिबाणीची होती. समस्त पटवर्धन मंडळींनीं या अडचणींत एकमेकांस व यजमानांस मोठा धीर देऊन राज्याची बाजू संभाळिली. नीळकंठराव पटवर्धनानें निजामास कांहींसें धाकांत ठेविलें. तरी सन १७६१ च्या जून महिन्यांत 'निजामानें नळदुर्गास येऊन पेशव्यांचें तें ठाणें घेऊन चव्हाणास दिलें. अक्कलकोट परगणा मारून ताराज केला. शहाजी भोसल्याची फार खराबी झाली'. जुलईंत सलाबतजंग व निजामली बेदरीं होते. धारुरास जाणार; जाधवराव रामचंद्रराव यास आपले डेऱ्यास आणून वस्त्रें दिलीं. आणखी दहा हजार फौज ठेवण्याविषयीं त्यांस हुकूम झाला आहे. 'श्रीमंत देवाज्ञा झाले. हें वर्तमान ऐकून नबाबास विनंति करून जाधवरावांनीं पेशव्यांचे १९ महाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जप्त केले. त्याचा मानसपुत्र श्रीपतराव व श्रीनिवासराव यांजबरोबर त्यानें फौज व तोफा रवाना केल्या. त्यांनीं नळदुर्ग हस्तगत केला. अक्कलकोट परगण्यांत चिठ्या केल्या आहेत. आणखी आठ पंधरा दिवस फौज न आली तर सोलापुर टिकतां मुष्कील आहे. ईश्वर करील तें प्रमाण'. त्यावर पटवर्धनांनीं कळविलें. 'तुम्ही धीर न सोडणें, बाबूजी नाईक पुण्याकडील फौज घेऊन दो चौ रोजीं सोलापुराकडे येणार. श्रीमंत श्रावण वद्य ५ स (२०-८-६१) डेरे दाखल होणार. अविंधानें लबाडी केली. त्याचें पारिपत्य शीघ्रच घडेल'. याप्रमाणें सर्वांनीं कंबरा बांधून मोठा हिय्या करून फौजा जमविल्या व निजामाचे पारिपत्याची तयारी केली. उदगीरचा पराजय निजामाचे पोटांत अतिशय डांचत होता. महाराष्ट्राच्या पूर्वेकडील हातचा गेलेला मोठा विस्तृत प्रदेश कोणत्याही उपायानें परत मिळवावा अशी त्यानें जोराची खटपट चालविली. पानपतावर मुख्य फौजा बुडाल्या व नानासाहेब दिवंगत झाले, येणेंकरून, त्यास मोठा हुरूप आला. एकटे पटवर्धन सरदार तेवढे शाबूत असल्यामुळें त्यांजवरच आतां पेशव्यांची मुख्य भिस्त होती. गेल्या दोन वर्षांत फौजेच्या खर्चामुळें पटवर्धनांस कर्ज फार झालें होतें, त्याच्या फेडीसाठीं कुंदगोळ वगैरे कित्येक परगणे व मिरजचा किल्ला पेशव्यानें पटवर्धनांस दिला. तेथें पेशव्याचा सासरा शिवाजी बल्लाळ जोशी अंमलदार होता, (म. वि. १, पृष्ठ ३१५), त्यानें आठ दहा महिनेपावेतों किल्ला पटवर्धनांचे हवालीं केला नाहीं. 'त्या गृहस्थानें ओढ धरून बदमामलीचा प्रकार दर्शविला. आप्त लोकांना पुढें कोणे स्थळीं ठेवूं नये असें श्रीमंतांचे अंतःकरणांत आलें'.

दसऱ्याचे मुहूर्तानें बाहेर पडून माधवराव व दादा निजामाच्या औरंगाबाद परगण्यांत शिरले. गोपाळराव पटवर्धन, बाबूजी नाईक, विसाजी कृष्ण, शहाजी भोसले, विठ्ठल शिवदेव, नारोशंकर, दमाजी गायकवाड, सिंदे, प्रतिनिधि वगैरे सरदार मिळून सत्तर हजार फौज जमली. जानोजी भोसले नागपुरकर येऊन सामील झाला. 'परंतु सरदारांस खाशांचा वचक नाहीं. दादासाहेबांस खातरेस आणीत नाहींत. माधवरावाचे दौलतीचा निवाडा येथेंच आहे. अदृष्टाचा मूल आहे'. कार्तिक शुद्ध १४ पासून पौष शुद्ध १३ पर्यंत दोन महिने म्हणजे ११-११-१७६१ ते ८-१-१७६२ पर्यंत निजाम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मराठ्यांची मोहीम चालली. मोगल सोलापुरच्या वाटेनें पेशव्यांचे अंगावर आला. त्याची गांठ पेशव्याशीं नगरचे बाजूस पडली. ता. ८ डिसेंबर रोजीं युद्धाची झोंबी सुरू झाली, ती धांवपळीनें सुमारें दोन आठवडे नगरपासून पुण्यापावेतों चालली. ता. १३ डिसेंबर रोजीं एक लढाई श्रीगोंद्याजवळ बरीच जोराची झाली. 'मोगल अगदीं हैराण व गार झाला. त्यास असा मार कधीं झाला नाहीं. त्याचें घोडें, माणूस ८०० पर्यंत ठार, खेरीज जखमी हजार दोन हजार. आमच्या फौजा भारी जमा झाल्या आहेत. श्रीमंतांचें प्रारब्ध उत्तम आहे'. मोगल पुण्याच्या रोखानें थेट उरळीपावेतों आला. त्याच्या पाठलागास दादानें गोपाळराव व विसाजी कृष्ण यांस पाठविलें.

या वेळीं राज्यकारभारांत गोपिकाबाई प्रमुखत्वानें वागत होती. तिनें दादास पत्रें पाठवून मोहिमेसंबंधीं सूचना केल्या, त्याचा विस्तृत जबाब २६-१०-१७६१ चा वाचण्यालायक आहे. 'निजामाचें पारिपत्य पुरतें करावें, तर सर्व भार ईश्वरावर आहे. यत्नास चुकत नाहीं. केवळ शिपाईगिरीच करीत नाहीं. हिकमतीनें लढाई करूं. नानासाहेब, भाऊसाहेब यांचे शागीर्द आहों. लागभाग पाहून करतों. उतावळी करीत नाहीं. माधवरावांस मर्यादेविषयीं शिकवीत जावें ऐशास, ते तीर्थरूपांचे पुत्र आहेत. शिकवावें लागत नाहीं. तथापि सांगत जाऊं. मोगलाची गांठ पंधरा दिवशीं पडेलसें दिसतें. सर्व मदार चिरंजीवांवर आहे. उतावळी करूं लागतील, त्या वेळेस आम्ही सांगूं तें ऐकावें लागेल. तेविशीं वडिलांनींही वारंवार लिहावें. वरकड कारभार आमचे आज्ञेप्रमाणें करीत आहेत. पेंच नाहीं. गनिमी तऱ्हेनें मोगलास झुंजवून दोन महिन्यांत तो दमेल. आमची फौजही जमा होईल. मग पौष-माघ मासीं थोरली लढाई होईल, असें योजिलें आहे. गडबडीमुळें चार किल्ले गेले तरी वडिलांनीं संकट मनांत आणूं नये. मोगलाचें पारपत्य झालें म्हणजे चार आभाळें उठलीं आहेत हीं विरतील. तथ्य मजकूर तरी होणें जाणें ईश्वराधीन. आमचे स्वाधीन काय आहे ! प्रपंच असत्य आहे. जें होणें तें होईल. येविशीं दुःख अथवा सुख मानूं नये. सर्वदा संतोष धरून असावें. प्रयत्न होईल तितका करीत आहों. फलदाता ईश्वर आहे. सर्वदा मनापासून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कृपादृष्टीनें इकडे पाहिल्यास, आमचा जयच आहे. वडिलांस सुचेल तें लिहीत जावें'. पुढें होणाऱ्या कौटुंबिक कलहाची छटा या पत्रांत उमटलेली दिसते. तसेंच 'प्रपंच असत्य आहे, होणें जाणें ईश्वराधीन', असले वेदान्ती उद्गार राज्यकारभार चालविणारास कधीं शोभत नाहींत. नानासाहेबाच्या लेखांत ते कोठेंही आढळत नाहींत. दादाच्या बोलण्यांत व लिहिण्यांत ते पदोपदीं येतात. हेंच त्याचें नामर्दपणाचें लक्षण होय.

मोगलानें या वेळीं बराच प्रळय उडविला होता. ठिकठिकाणची रयत व तमाम लोक भयभीत झाले. प्रवरासंगम व कायगांव टोकें या स्थलांचा त्यानें विध्वंस केला. मोठा अनर्थ केला. प्रत्यक्ष पेशव्यांसही पुण्याची गत काय होते अशी भीति पडली. 'पुरंदर, वज्रगड वगैरे किल्ल्यांची खबरदारी उत्तम प्रकारें करणें. जागां जागां फितुर होतात, चौकी पहारे फेरवणें, किल्ले सर्व सामानांनीं पुरे सजुंदे करणें'. अशा ताकिदी दादानें ठिकठिकाणीं पाठविल्या. 'रावप्रधान पेडगांवाहून मांडवगण कातराबादेस गेले. दादाही माहूरच्या रोखें गेले. निजाम दादांस खातरेस आणीत नाहीं. तमाम सरदारांचे फितवे खेळतात'. गंगाधर यशवंताची बायको अन्नपूर्णाबाई मोठी हुशार व दक्ष होती, ती लिहिते. 'मोगल सोनईस द्वितीयेस आला, आज निंबदेहरियास आला असेल. पुण्यास येतो. आम्ही जुन्नरास जातों. तुम्ही तेथें पत्रदर्शनीं स्वार होऊन येणें. कोणे गोष्टीची आशा न धरणें. चिरगुटपांघरून घेऊन जाणें. एकघडी दिरंग न करणें'.

(इ) **दादाचा अप्रयोजक सलूख** (८-१-१७६२).—मराठ्यांची एवढी मोठी फौज जमली असून प्रत्यक्ष पुण्याच्या बचावाची सुद्धां पेशव्यांस काळजी पडावी याचें कारण ध्यानांत आणणें जरूर आहे. पेशव्यांचे घरांत दुफळी होऊन कारभार बिघडला. 'दादासाहेबांचें अवशीस बोलणें एक आणि पहांटेस एक असें आहे. कोणाचे मनांत युद्ध करावेंसें नाहीं. सर्वांचें एकचित्त असल्यास पारिपत्य करणें अगाध नाहीं. परंतु बहुनायकी. फौज नाहीं असें नाहीं. जानोजी भोसले येऊन मिळाले. त्यांनींही युद्ध बरें केलें. चांभारगोंद्याच्या पेठा जाळून सर्व लुटलें. तेथून पुण्याचे रोखें निजाम उरळीपावेतों नित्यांनीं लढाया घेत आला. सलुखाचा पैगाम लागला आहे. मुरादखान दादासाहेबांच्या भेटीस आला आहे. उभयतां श्रीमंतांचें चित्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शुद्ध नाहीं, दरबार नासलें आहे. आपणांकडील प्रसंग विसकळीत पाहून तोफखान्यासह अत्याग्रहास प्रवर्तोन, गर्वारूढ होऊन, मोगलानें मातबर झुंजें केलीं. दौलताबाद, नगर, हिवरें, श्रीगोंदें व भुलेश्वर इतक्या ठिकाणीं मातवर युद्धें झालीं. गोपाळराव पटवर्धन व रास्ते यांनींही कामकाज चांगलें केलें. हरएक प्रसंगीं मोगलांस शिकस्तच दिली. चारापाणी वंद करून त्यास चोहोंकडून अजीज केलें. भुलेश्वराचे लढाईपासून त्याची हिंमत खचली. चंद्रसेनाचे पुत्र रामचंद्र जाधव यास सेनापतिपद द्यावेंसें करून बाबूजी नायकांनीं भेदें करून श्रीमंतांचे भेटीस घेऊन आले. निजामलीचा कनिष्ठ बंधु मीरमोगल यासही फोडून आणिलें. यामुळें मोगलाची हिंमत खता झाली. त्यास महर्गता फारच जाली. चोहोंकडून आपल्या फौजांनीं वेष्टिलें. विलक्षण प्राणांतिक प्रकार पाहून थेऊरच्या मुक्कामीं सल्याचा पैगाम केला. बाबूजी नाईक, गोपाळराव, जानोजी भोसले, रामचंद्र जाधव या सर्वांचा विचार, मोगल साफ बुडवावा. परंतु दादासाहेब भोळा सदाशिव, मोगलांवर कृपावंत झाले. हणमंतराव व आनंदराव निंबाळकर व मुरादखान या त्रिवर्गांस मोगलानें मध्यस्तीस घेतलें. उभयपक्षीं कोणास कांहीं न देतां स्नेह मात्र होऊन मोगलानें स्वस्थळास जावें ऐसा सलुख झाला. जाधवरावास मराठ्यांनीं स्वतंत्र मुलूख नवीन द्यावा व धाकटे नासिरजंग यास जहागीर द्यावी, परंतु त्यानें परत भावाकडे जावें, असा निश्चय झाला. श्रीमंत व सखारामपंत या उभयतांनीं आपल्या विचारें सलुख केला. याबद्दल बाबूजी नाईक श्रमी आहेत. ते व गोपाळराव, त्रिंबकराव पेठे व बाबूराव फडणीस व माधवराव यांचा विचार एक; परंतु दादा व बापू यांचा विचार दुसरा. याचा परिणाम पाहवा कसा होतो तो'. (२६-१-१७६२). 'निजामलीखानाशीं लढाई होत असतां जेर होऊन सलयाचा संदर्भ लाविला; मोगलअली व जाधव फुटोन आले, त्यांची चाळीस लक्षांची जहागीर निजाम याजपासून घेऊन सल्ला केला. बाबूजी नाईक महिपतराव कवड्यास लिहितो. 'जाधवराव आम्हांकडे आले त्यास, यांचा तालुका महाल आहे तेथील मोकासा व बाबती सरकारांतून मशारनिल्हेस द्यावयाचा करार झाला, तरी जाधवरावाचे तालुक्यास चौथाविशीं उपद्रव न करणें. मोगल अकलुजे पलीकडून पाटसावर येऊन पाटस जाळलें. तेथून भीमा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तीरें उरळीनांदूरनजीक लोणीकाळभोर येथें सहा मुक्काम करून पंत-प्रधानांचा त्याचा तहरह होऊन सल्ला झाला. मागती आले मार्गें माघारा चालला. तसनस जाला तो कोठवरी लिहावा! (ता. ८-१-१७६२) आबालवृद्धांस मोगल भारी भासोन प्रसंग विलक्षण वाटत होता. परंतु श्रीमंतांचे ताले शिकंदर, अकस्मात् नित्यांनीं फौजा जमा होत चालल्या. जानोजी भोसले येऊन भेटले. दोन चार युद्धप्रसंगीं त्यांनीं एकनिष्ठेनें चाकरीची शर्थ करून दाखविली. शेवटही उत्तम तऱ्हेनें घडोन आला'. दमाजी गायकवाडही पेशव्यांचे मदतीस होता. सिंदे होळकर मात्र नव्हते. अल्पावकाशांत मोठमोठ्या फौजा जमा होऊन सामदाम, दंड, भेद वगैरे युक्त्या करून दोन महिन्यांत मराठ्यांनीं निजामास जेर करून परत फिर-विलें. प्रत्यक्ष लढणें फारच थोडें झालें. क्षेत्रांस उपद्रव झाल्यामुळें मराठे सरदार फारच चिडले. मीरमोगल व रामचंद्र जाधव फुटून आल्यानें निजाम निष्प्रभ झाला; आणि तह करून परत गेला. नागपुरकर भोसले मराठ-मंडळाशीं फटकून वागणारा, प्रसंग विशेषीं निजामासच सामील होणारा, परंतु पेशव्याचें बोलावणें गेल्याबरोबर तो धावून आला. निजामास जेर करण्याचें मुख्य काम त्यानेंच केलें. याबद्दल मराठ-मंडळास मोठें कौतुक वाटून त्यांची एकीची भावना वृद्धिंगत झाली.

निजामानें परत गेल्यावर रामचंद्र जाधवाचा सूड घेण्यासाठीं त्याच्या जहागिरीचा सर्व मुलूख जाळून लुटून फस्त केला; ता. ७-७-१७६२ रोजीं सलाबतजंगास कैद करून शहाआलम बादशहाकडून आपल्या नांवचीं फरमानें आणून दक्षिणची सुभेदारी धारण केली; आणि संगमनेरचा यजुर्वेदी ब्राह्मण विठ्ठल सुंदर त्याचा साह्यकर्ता होता, त्यास 'राजा प्रतापवंत' असा किताब व आपली दिवाणगिरी दिली. पुढील सालीं ता. १९-९-१७६३ रोजीं म्हणजे राक्षसभुवनच्या लढाईनंतर निजामलीनें सलाबतजंगाचा शिरच्छेद केला. (सेयर मुताखरीन).

निजामाच्या या एका उदाहरणावरून पुढील कारभाराचें समग्र धोरण अजमावतां येतें. माधवरावानें चार दोन महिन्यांत आपलें जें तेज प्रगट केलें, त्यावरून सखाराम बापूची खात्री झाली, कीं हा पुरुष स्वतंत्र बाण्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वागणार, दुसऱ्याचे तंत्रानें वागणारा नव्हे. सबब त्याजपुढें आपलें महत्त्व कांहींच राहणार नाहीं. निजामास कायमचा बुडवून टाकावा, पुनः पुनः ही ब्याद पाठीवर नको; निजाम बुडाला म्हणजे दक्षिण निर्धास्त होऊन उत्तरेंतील कार्यभाग सुलभ होईल, असें सामान्यतः मराठमंडळास वाटत होतें. प्रत्यक्ष गोपिकाबाईचेंही तेंच सांगणें असून दादानें प्रथम तेंच उत्तर तिला लिहून पाठविलें होतें. परंतु माधवरावाचें तेज पाहून सखारामबापू वगैरे कित्येक कुत्सित मंडळींनीं दादास असें भासविलें कीं, 'निजामास साफ बुडवून माधवरावास निरंकुश करूं नये. प्रसंग विशेषीं आपणांस निजामाचा उपयोग घडेल'. हा कानमंत्र दादास पटला; आणि निजाम जेर झाला असतां मोठें युद्ध करून त्यास साफ बुडविण्याचा बेत सोडून, दादानें कशी तरी गुळमुळित समजूत करून, निजामास परत पाठविलें. सखाराम-पंत व दादा या दोन व्यक्तींखेरीज हा निकाल कोणासही पसंत पडला नाहीं. इतउत्तर पुतण्याचे विरुद्ध वागण्याचे प्रसंग आले असतां दादानें निजाम, हैदर, नागपुरकर भोसले इत्यादिकांचा उपयोग करून घेण्यास कमी केलें नाहीं. यावरून त्याचे अंतःकरणांतील हें किल्मिष साधार ठरतें. निजामाशीं लढतांना या वेळीं लोकांचे मनांत पानपताचें दुःख सलत होतें; आणि त्याचा सूड घेण्याची इच्छा लोकांत जबरदस्त होती. पन्नास वर्षें पावेतों राष्ट्राच्या तीन पिढ्यांनीं केलेला उद्योग अपुरा राहिला, तर तें लांछन सर्वांचे माथीं येणार होतें. संधि सोन्यासारखी आलेली होती. फौजा व लोक तयार होते. त्यांस योग्य कामास लावून राष्ट्रकार्य साधणारा लायक पुढारी पाहिजे होता. दादास हें पुढारीपण मिळवितां आलें असतें. परंतु मनुष्यस्वभाव ओळखून योग्य संधीचा फायदा घेण्याचें वकूब त्यास नव्हतें. माधवरावास वरचढ होऊं द्यावयाचें नाहीं ह्या क्षुद्र स्वार्थाचे पायीं, त्यानें सखाराम बापूच्या नादानें या वेळचा डाव बुडविला. संसारांत दुष्काळदां एक इसम सर्व कारभार कसा बुडवितो याचें हें एक उदाहरण आहे. राष्ट्रावर सामान्य अरिष्ट कोसळतें, तेव्हां त्याची एकी होते. संभाजीच्या वधानंतर जें अरिष्ट आलें त्यानें राष्ट्राची एकी होऊन मराठ्यांचें क्षात्रतेज कसास लागलें. त्यायोगें पुढील पन्नास वर्षांत देशभर राज्यविस्तार करण्याचें सामर्थ्य त्यांस आलें. तसाच कांहींसा प्रकार पानपतानें झाला, परंतु दादानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ह्या योग फुकट घालविला. तेणेंकरून माधवरावाचे उद्योगास अपरिमित अडथळा उत्पन्न झाला.

३. **चुलतेपुतण्यांचा बेबनाव, दादाचें पलायन** (फेब्रुवारी-ऑगस्ट १७६२).—निजामाच्या प्रकरणांतच मराठशाहींत दुहीची सुरुवात झाली, तिचा निरास मराठशाहीच्या अखेरपर्यंत झाला नाहीं. 'आज पंधरा दिवस सारे फौजेची लढाई श्रीमंत करणार. दिवस नेमितात. मग नाहीं म्हणून पत्र पाठवितात. फौजही फार जमली होती. परंतु कोणाचे मनांत युद्ध करावेंसें नाहीं'. अशा प्रकारची धुसफूस या वेळीं सुरू होऊन हळुहळू माधवराव व दादा यांचें उघड भांडण जुंपलें. बापूचे तंत्रानें चालून दादानें निजामाचा तह बिघडविला, असा बोभाटा सर्वतोमुखीं होऊन त्याचीच चर्चा कांहीं काळ चालली. माधवरावानेंही तहाचा बिघाड चुलत्यास स्पष्ट दाखवून दिला. बाजू अंगावर आली म्हणजे वैताग करणें एवढा एकच उपाय आडमार्गानें जाणारास असतो. ता. ६-१-१७६२ रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो, 'दादासाहेबांचे विचारें स्नानसंध्या करावी, एका कारभाऱ्यावर अखत्यार सांगावा, हा विचार, मेहेनत होत नाहीं, म्हणून मनःपूर्वक आहे. सखारामपंतानेंही अंग काढून घेतलें आहे. कारभार करीत नाहीं म्हणतात, पण अंतःकरणापासून नाहीं. सरे कोंकणस्थ एकीकडे होऊन फशीं पाडतील यास्तव अंगानिराळें टाकितात. आम्हीं प्रत्युतर केलें, कीं आपण वडील, आपण कारभारांतून अंग न काढावें, आम्ही ओझें घ्यावयाजोगे दोन तीन वर्षांनीं जाहलियानंतर जशी आज्ञा कराल त्याप्रमाणें वर्तन करूं. परंतु अद्याप ठराव जाहला नाहीं'. त्रिंबकराव मामा गोपिकाबाईस लिहितो. 'आम्ही कारभारी नव्हों. बहुता दिवसांचे सेवक.

---

१. **आधारः**—धा. रा. च; चं. १३८–१४०, १८७; ऐ. टि. २-१८ ले. ३; भा. व. १ प. या. ले. १–२; खं. १-२९८; खं. १०-२; खरे ले. १३,१४,२६,२९,३१,३२,३५,३६,३७,४१,४२,४३. खरे यांचे सर्व भागांत पृष्ठें व लेखांक चढते घेतल्यामुळें भागांचा निर्देश करण्याची जरूर नाहीं. वास्तविक या कारकीर्दीस व उत्तर पेशवाईस मुख्य आधार खरे यांच्या पुस्तकांचाच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्ते होते ते गेले. सरकारी, मातबर दौलत सांभाळणार, मायेचा आणि कर्ता पाहिजे. दादासाहेब सर्वांस वरिष्ठ. आज सात महिने त्यांच्या कर्तेपणाची स्थिति कळून आली. परचक्र आलें तें माधवरावांच्या प्रारब्धें करून पराभव पावलें. 'आमच्यानें कारभार होत नाहीं, तुम्ही करा, बाबूराव यास अखत्यारी देतों, करा म्हणतात'. परंतु कोणासही विश्वास पुरवत नाहीं. माधवराव थोर असते तरी चिंता नव्हती. त्यांचें वय लहान, दादांचें भय कोणास वाटत नाहीं. समुद्रवलयांकित पृथ्वीचें वडीलपण अनायासें आलें तें कोणास सोडवेल ? बाबूजी नाईक वगैरेंचें मत सखाराम कारभारी असला तर आपण चाकरी करीत नाहीं. तेव्हां दादा म्हणतात, तुमच्या चित्तास येईल तो कारभारी करा. बाबूराव फडणीस परमनिष्ठ, चौघांनीं त्याचें नांव घेतलें. परंतु दादांस संतोष नाहीं. दादांचा सालाचा खर्च ८० लाखांचा आहे. नानासाहेब गरीब नव्हते. म्हणून कळून तितकेंही चालवीत होते. नानासाहेबामागें पंधरा दिवसांत हरणें, पांखरें वगैरे सर्व तमाम दूर करून आपण संसार करणार असें दर्शविलें. आयत्या पिठावर पोट भरून दहा-वीस लाख कर्ज करून येत होते. नानासाहेब सखारामपंतास पुसत, 'कर्ज कां' ? तेव्हां सांगत, 'दादासाहेब धनी ते करतील तें प्रमाण. आम्ही काय करावें'. आतां दादा वडील, लोक काय म्हणतील म्हणून भिऊन राहल तर दौलत बुडते. दादा कर्ते असते आणि तुम्हांसी विरुद्धाचरण करते, तरी चिंता नव्हती. आतां परिच्छिन्न बाबूरायांस कारभारी करणें. चित्त कठोर करून सखारामास चार दिवस एकीकडे ठेवावा. माधवरावसाहेब व सखाराम यांचें चित्त शुद्ध नाहीं. तो एखादे प्रसंगीं दगा करील. सखारामासच कारभारी करणें असेल तर रावसाहेबांस आपणापाशीं न्यावें. डोळे झाकून आंधळे होऊन आडांत पडूं नये. लष्करांत आपापले बिऱ्हाडीं सर्व बसले आहेत'. चार चौघांनीं फाजिती केली, तेव्हां दादांनीं वैताग करून गोपिकाबाईस कळविलें, कीं 'कारभाराचा सर्व अखत्यार आम्हांकडील व सखारामपंताकडील चिरंजीवावर व बाबूराव फडणिसावर दिला आहे. आम्हांस सुचेल तें सांगूं. आम्ही भोळे, जें मनांत येतें तें बोलतों, त्यानें बिघडतें. असो. झालें तें झालें. पुढें बोलणार नाहीं. आम्हांस दौलत करावयाची हौस तिळमात्र राहिला नाहीं'. त्यावरून पुढील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ल्येत ठरला तो १४-१-१७६२ च्या पत्रांत आहे. 'सखारामबापू कारभार करीत होते त्यांजवर आरोप आणिला कीं, कारभार बंदोबस्त चांगला करीत नाहीं. याजकरितां बाबूराव फडणीस व त्रिंबकराव मामा यांनीं कारभार करावा ऐसें जाहलें. हल्लीं कारभार हेच करीत आहेत. फौज रवाना करितात. नारो शंकर व विठ्ठल शिवदेव उभयतां हिंदुस्थानांत पाठविणार; रास्ते, गोपाळराव गोविंद व विसाजी नारायण कर्नाटकांत रवाना करितात. रामचंद्र जाधव व बाबूजी नाईक यांस पंचमहालाकडे पाठविणार. श्री० नारायणरावांचा व्रतबंध माघमासीं करणार आहेत'. या संबंधांत निरनिराळ्या मंडळींचीं बोलणीं व प्रकरणें तपशीलवार देण्यांत हांशील नाहीं. जिज्ञासूंनीं अस्सल कागद प्रचंड आहेत तेच वाचले पाहिजेत.

या वेळीं पेशव्यास व सरदारांस कर्ज फार झालें होतें. संकटें आल्यामुळें उत्पन्नाची बाजू पाहण्यास कोणासच अवकाश नव्हता. बाबूराव फडणीस, त्रिंबकराव पेठे, बाबूजी नाईक वगैरे कारभारी माधवरावास म्हणूं लागले, कीं 'आम्हांस दादासाहेबांचे बोलण्याचा विश्वास येत नाहीं. जर त्यांजशीं आमचा विरोध प्राप्त झाला तर आम्ही तुम्हांस अंतर देणार नाहीं व दादास मिळणार नाहीं असा निश्चय शपथपूर्वक करून द्यावा. परंतु अशी शपथ केल्यानें घरांत नसते कलह वाढतील असें वाटून माधवराव ती शपथ करीना. शपथ घेतल्याशिवाय कारभारी कारभार करीनात. शपथ करून ती मोडली तर लटकें बोलणें पदरीं येऊन पत जाते, असे अनेक पेच माधवरावास होते. इकडे दादानें कारभार सोडिला नाहींच. ज्येष्ठमासीं पुण्यास सर्वांनीं परत आल्यावर एकत्र भेटून गोपिकाबाईच्या समक्ष वाटाघाट करून भानगडींचा निकाल करूं, असें दादानें बाईस ता. २१-२-१७६२ रोजीं लिहून पाठविलें. इकडे गोपिकाबाईनेंही रदबदली करून दादा व माधवराव या उभयतांनीं एक मतानें वागून कारभार त्रिंबकराव पेठ्यानें करावा, अशी तात्पुरती समजूत केली, आणि १७६२ च्या फेब्रुवारींत दादा व माधवराव कर्नाटकचे स्वारीस निघून गेले. हातचा कारभार गेल्यामुळें नीळकंठ महादेव व सखाराम बापू रुसून घरीं बसले. दादाचे बोलण्यांत बोलणें मुळींच नव्हतें. माधवराव मात्र पराकाष्ठा करून त्याजशीं जमवून घेत होता. तो लिहितो, 'दादासाहेबांचा विचार क्षणक्षणीं पृथक् आहे, याजकरितां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कसें होईल कळत नाहीं. एक्याही गोष्टीचा भरंवसा वाटत नाहीं. थोड्याच दिवसांत उभयतांचा पेंच वाढून माधवरावास त्रिंबकरावमामाबरोबर कर्नाटकांत पाठवून, दादा कृष्णेवरून चिकोडीच्या मुक्कामाहून परत पुण्यास गेला. ता. १९ मार्च रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो, 'समीप राहणार नानाप्रकारचें भासवितात. बाबूराव फडणिसाची प्रकृति एकप्रकारची, त्याचे विचारें दादासाहेबांनीं कारभार केला तर हेही मन घालून करतील. नाहीं तर सर्व सोडून घरीं बसतील. त्रिंबकरावाची रीत, शहाणपण, निखालसता, खावंदाचे कार्याकरितां जपणें, मेहेनत करणें, युक्तीस, मनुष्यास न चुकणें हें आमचे अनुभवास येऊन निशा पुरली व त्यांचीही पुरविली. त्यांचे सोबती बाबूराव फडणीस. त्यांचीही निशा पटून ते व हे मिळोन उमेदीनें काम करूं लागले तर चांगलेंच होईल. मल्हारबा होळकर देशीं आले. दादासाहेब त्यांस मिळोन पेंच पाडतील तर बाबूराव फडणिसामार्फत मल्हारबा विचार अगोदरपासून जपून ठीक करावा'.

या घरगुती भांडणांत तूर्त मुख्यतः चार व्यक्तींचा संबंध येतो, आणि त्या चौघांचे स्वभाव व वर्तनसरणी तत्कालीन लेखांत व्यक्त झालेली दिसते. पैकीं मुख्य व्यक्ती माधवराव व रघुनाथराव, आणि त्या दोघांस आपल्या तंत्रानें वागविणाऱ्या दुसऱ्या दोन गोपिकाबाई व सखारामबापू. माधवराव बुद्धिमान्, मानी व तेजस्वी होता. वय लहान असल्यामुळें मातुश्रींचें तंत्र सोडून स्वतःचे विचारानें चालण्याचें सामर्थ्य येण्यास त्यास अवधि लागला. गोपिकाबाई हुशार परंतु मनस्वी होती. नवऱ्यानें आपल्या हयातींत तिचा हट्ट कधीं चालूं दिला नाहीं; आणि राज्यकारभाराच्या बाबतींत तिला त्यानें कधीं विचारलेंही नाहीं. परंतु नवऱ्याचें नियंत्रण दूर होतांच माधवरावास पुढें करून राज्यकारभार स्वतः चालविण्याची इच्छा तिला उत्पन्न झाली. पण ही इच्छा तिला फार दिवस चालवितां आली नाहीं. वर्ष दोन वर्षांत माधवराव स्वतःचे विचारानें वागूं लागतांच, ती सन १७६४च्या फाल्गुनचे सुमारास नाशकास जाऊन राहिली, ती पुनः कधीं पुण्यास आली नाहीं. माधवरावानें तिचा अपमान मात्र कधीं केला नाहीं.

---

१. ख. ले. ४२८ व खं. १४,२१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चवथी व्यक्ति सखारामबापू बोकील. हा पुरंदर पट्टयांतील हिवरें येथील राहणारा. पुरंदरे व पेशवे यांचा आरंभापासून विशेष घरोबा असल्यामुळें पुरंदर पट्टयांतील शेंकडों व्यक्ति मराठशाहीच्या कारभारांत दाखल झाल्या. लहाणपणापासून अशा व्यक्ति मुद्दाम निवडून त्यांस निरनिराळ्या कामांत वाकबगारी देऊन तयार करणें नानासाहेब पेशव्याचें धोरणच होतें. सखारामबापूचा जन्म नानासाहेबाचे बरोबरचा, कदाचित् किंचित् अगोदरचा असावा. नानासाहेबानें त्यास आत्मीय समजून वाढविलें. राज्यकारभार, हिशेब, सरदारांच्या घालमेली, मोहिमा इत्यादि अनेक कामांत पुण्याच्या मुख्य कचेरींत बापूस अनुभव मिळाला. सन १७४६ त तो सदाशिवरावाबरोबर प्रथम कर्नाटकचे स्वारीस गेला. पण बहुधा त्यांचें पटलें नसावें. तेव्हां नानासाहेबानें त्यास रघुनाथरावाचे दिमतीस दिलें. उत्तर हिंदच्या सर्व मोहिमांत तो रघुनाथरावाबरोबर असून, आपल्या तंत्रानें दादास वागवी. नाना फडणीस बापूहून वीस एक वर्षांनीं तरी लहान, म्हणजे विश्वासरावाचे बरोबरीचा असून, तोही पुढें कारभारांत बापूसारखाच प्रवीण होत गेला. मात्र बापूचा ओढा दादाकडे, तसा नानाचा सदाशिवरावाकडे होता. पानपतावर सखारामास न नेतां सदाशिवरावानें नानाला नेलें, हें लक्षांत ठेवणें जरूर आहे. अर्थात् दादा व भाऊ यांच्या वर्तनांतील विरोध पुढें बापू व नाना यांच्यांतही उतरला; आणि तोच वीस वर्षेंपावेतों मराठशाहीच्या बोकांडीस बसला. नाना फडणिसाइतका सखारामबापू लेखणीच्या कामांत कुशल नव्हता. शिवाय तो आंतल्या गांठीचा, दीर्घसूत्री व खोल स्वभावाचा असल्यामुळें कोठेंही प्रत्यक्ष लेखांत न गुंतण्याची तो विशेष खबरदारी घेत असे. म्हणून नाना फडणिसासारखीं अघळपघळ लिहिलेलीं पत्रें बापूचीं नाहींत. थोडींबहुत आहेत, तीं तुटपुंजीं, संदिग्ध व अस्फुट अशीं असतात. शिवाय बापूचें अक्षरही चांगलें नसून त्यास लिहिण्याचा कंटाळा असावा. सदाशिवरावासारख्या तापट प्रकृतीच्या यजमानापुढें बापूचें कांहीं चालत नसे. त्याजबरोबर नाना फडणीस पानपतावर होता, व बापू मागें नानासाहेबाचे स्वारींत राहिला. राज्यकारभार म्हणजे अंतस्थ उलाढाली अशी बापूची समज असून, वेळ पडल्यास राष्ट्रकार्य बिघडवून सुद्धां उलाढालींनीं स्वार्थ साधण्यास तो कचरणारा नव्हता. दादास हातांशीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धरून मराठशाहीचा कारभार आपण चालवावा अशी त्यास हाव असल्यामुळें माधवराव व गोपिकाबाई या तापट वृत्तीच्या माणसांशीं बापूचें मुळींच पटण्याजोगें नव्हतें. पानपतच्या स्वारींत 'महालोमहालींच्या वसुलाचीं ऐवज भाऊसाहेब आपणाकडे मागून घेऊं लागले, तेव्हां सखारामबापू नानासाहेबांस बोलले, कीं भाऊसाहेबांनीं तिकडील वसूल घेतला तर त्यांचें बळ फार वाढेल. याजकरितां त्यांजकडे ऐवज न देण्याविषयीं मामलेदारांस ताकिदी कराव्या. त्यावरून श्रीमंतांनीं मामलेदारास तशा ताकिदी केल्या'. अव्यवस्थेमुळें पुष्कळ वर्षे वसूल येत नव्हता. तो भाऊसाहेब झाडून घेऊं लागला ही राज्याच्या हिताची गोष्ट असतां, बापूनें त्याचा विपर्यास कसा केला हें पाहिलें म्हणजे त्याच्या स्वभावाची कल्पना होते.

त्रिंबकराव पेठे व बाबूराव फडणीस यांस कारभार करण्याची बिलकूल हाव नव्हती. गोपिकाबाईच्या आग्रहास्तव ते हें ओझें अंगावर घेण्यास तयार झाले. त्रिंबकराव लिहितो, 'दौलतीचें सुख सर्वांनीं घेतलें. आतां कठिण काळीं सोडिली तर अन्न भक्षिल्याचें सार्थक करावें हेंच आम्हांस व आमचे लौकिकास उचित; स्वामिकार्यास यावत्सामर्थ्य अंतर करूं नये. ज्येष्ठ श्रीमंतांची प्रकृति जातीनें विपरीत नाहीं. क्षणिक स्वभाव संगतीचे दोषें-करून, त्यांचा भरंवसा नाहींच; जर करतां या काळानुरूप दौलत, सिद्ध-दशा टाकून साधनदशेनें करतील, मोठमोठे मनस्वी खर्च स्वतःचे देखील आपण होऊन सोडतील व सांगूं त्याप्रमाणें ऐकतील, तर मग या कारभारांत पडावें. आपण होऊन कदापि कारभार करूं नये. वर्ष सहा महिने निभावून कुचोद्यकर्ते फजित पावले म्हणजे उत्तम होईल. दादासाहेबांनीं शपथपूर्वक सर्व गोष्टी आम्हांजवळ कबूल केल्या आहेत. परंतु प्रकृति एक प्रकारची' (२२-३-१७६२). दादांसही त्रिंबकरावानें याच वेळीं कळविलें कीं, 'स्वामी सर्वज्ञ, स्वामीस स्मरण देणार कोण, ज्या काळीं जी गोष्ट उचित, सेवक लोकांचें स्वरूप पाहून, उत्साहभंग न होतां, ज्या गोष्टीनें स्वामिकार्यास उपयोगी पडून, स्वामींचे कृतेंत, ममतेंत, वचनांत अंतर न दिसे तें करावें. मी तर अज्ञानरूपेंच वर्तन ही निशा स्वामींस. सर्व प्रकारें बाबूराव यांस उमेदवार करून, त्यांचा निशा पाडोन, ते उपयोगी पडत तें जरूर करावें. मल्हारबा होळकर व बाबूराव यांस पहिलेंच एक करून,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांजकडून श्रीमंत रायांस व मजला आज्ञा पाठवून द्यावी'. ही कारभाराची वाटाघाट चालू असतां माधवराव व त्रिंबकराव कर्नाटकचे स्वारींत होते. स्वारीचे आरंभींच मिरजेचें ठाणें शिवाजी बल्लाळ जोशी, माधवरावाचा सासरा, हातचें सोडीना, तें माधवरावानें काढून पटवर्धनांस दिलें. लगेच पुढील सालीं तें पटवर्धनाकडून परत घेण्यासाठीं स्वारी करावी लागली तो प्रकार पुढें येईल. सन १७६२चे उन्हाळ्यांत माधवरावानें थोड्याच अवधींत मुलूखगिरी चांगली करून तो पर्जन्यसुरुवातीस पुण्यास आला, परंतु पूर्वी ठरलेला कारभाराचा जम मात्र पुण्यांत बसला नाहीं. दादाचे मार्फतीनें सखाराम-बापूचें महत्त्व कारभारांत राहून, त्याजपुढें त्रिंबकराव व बाबूराव यांचें कांहींच चालेना. हा प्रकार गोपिकाबाईस खपला नाहीं. 'माधवरावांची स्वारी पुण्यास आल्यावर वानवडीवर उभयतांच्या उत्तम प्रकारें स्वास्थ्यें-करून भेटी होऊन घरास आले. मल्हारबा वाफगांवीं होते तेही आले आहेत. सासवडची मंडळी पुण्यासच आहेत, ते ज्येष्ठास उपदेश करावयासी चुकत नाहींत. दादांचे डेरे बाहेर होऊन, जाणार म्हणतच आहेत. गोपिकाबाईनीं मोठी गोष्ट केली, कीं आजपावेतों त्यांस बाहेर जाऊं दिलें नाहीं. बाहेर जाते तर अनर्थास गोष्ट पडती. बाईचें मानस तिकडील कुटाचा उत्कर्ष नसावा. खलबतें नित्य परस्पर होतच आहेत', (१५-६-६२). ता. २७-६-१७६२ची हकीकत. 'नारायणरावांच्या मुंजीकरितां सासवडकर पंचायतन मिळालें. त्या दिवसापासून दादास बोध करून बाहेर काढावें, दुही करावी, हरएक प्रकारें गृहकलह लावावा, या अर्थें डेरे बाहेर दिले. आज उद्यां जावें म्हणत असतां मातुश्रींनीं चोली घातली कीं, तुम्ही कां जातां, कोणे गोष्टिसाठीं जातां! जातच असाल तर आपण कशास राहूं? आपणही येऊं', ऐसें बोलोन राहविलें. तों रावप्रधान व मामा गेले. बहुत प्रकारें विनंति केली. 'आपण वडील, आम्ही आज्ञाधारक, जैसी आज्ञा कराल तैसी वर्तणूक करूं'. म्हणून तहावरी आणिलें. मागती ती मंडळी सखारामपंत, आबा व नाना पुरंदरे, गंगोबा चंद्रचूड, विठ्ठल शिवदेव, बाबूजी नाईक वगैरे एकांतीं बसोन नाना कुतर्क व्यंगोक्ति शिकवून, जावयाचें करीत. मातुश्रींचे मनांत कीं नेट धरून मामा व बाबूराव यानींच कारभार करावा. हे दोघे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मातुश्रींस बोलले जे, 'तुम्ही म्हणतां तें प्रमाण, परंतु दादा उठोन गेले म्हणजे लौकिकांत विरुद्ध होईल, कीं कारभारी यांनीं दोन पक्ष करून घर फोडिलें'. तेव्हां मातुश्री व राव दादांकडे जाऊन बोललीं कीं, 'धनी तुम्ही, तुम्ही स्वतः कारभार करावा. तुम्हांस न पुरवे तेव्हां चिरंजीवास आज्ञा करावी. चिरंजीव आपले कारभारी हातीं धरून कार्यभाग चालवितील'. म्हणोन राहविले. दोनचार दिवस मळमळितच होतें. स्वतः दादासाहेब कारभार करितील, हा भरंवसा कळलाच आहे. त्याउपरी मागती तिकडील मंडळींनीं बोध केला कीं, 'हे सारे खेळ मामाचे आहेत. मामास दबा दिला म्हणजे ठिकाणीं राहतील. मातुश्री बायको. मुख्य मूल, बाबूराव मनापासून कारभार करीतच नाहींत. आपण सर्वांनीं बाहेर निघावें. जिकडे वडील तिकडे दौलत. म्हणून सर्व एकांतीं बसून ठराव करार केला. या उपरी मामा सहज दादासाहेबांकडे गेले असतां श्रीमंत एकाएकीं बोलले, कीं 'त्रिंबकराव ! तुम्हीं असावें कीं आपण असावें. असेंच जालें तर राहीन. नाहीं तर जातच आहें'. मामांनीं उत्तर केलें, 'बहुत उत्तम, मजमुळें गृहकलह तुटतो, तरी मजला संतोषेंकरून यात्रेस जाण्यास आज्ञा द्यावी'. त्यावर क्षणभर उगेच राहिले. मागती मामांनीं विनंति केली, दोन गोष्टी बोलणें आहेत. अभय होईल तर बोलेन. बोला म्हटल्यावर मामा म्हणाले, चिरंजीवांसमागमें मला कर्नाटकांत पाठविल्यावर, घडली तितकी शिकस्त करून तुमचा चिरंजीव तुम्हांपाशीं आणिला. परंतु जालें वर्तमान मुलूखगिरिचें मजला पुसिलें नाहीं. आतां निरोप देतां तर मजवर आरोप काय ? सरकारी कामाची नुकसानी काय केली ! यास्तव अन्याय ठरवून निरोप द्यावा. हिताची गोष्ट सांगत असतां, दुसऱ्याच्या शिकवणीनें बाहेर जाऊं म्हणतां ! वडील बंधु कैलासवासी जाले. त्यामागें तुम्ही वडील, मूल लहान हातीं धरून दौलतेस आळा घालून राज्य रक्षावें. आतां जाण्यांत घरफोड होते. तुम्हीं निराळे होऊन बंड करावें, अथवा मोगलाईत जावें, हा मजकूर कसा ? दौलत बुडवून अपेश माथीं घेतां ! वडील तुम्ही, तुम्ही दुही करणार हें उक्त कीं काय ? म्हणून बोलतांच देहावरी येऊन बोलले कीं, मी काय करूं. चौघेजण कुतर्क सांगोन निघावें म्हणतात. यामुळें बोललों. परंतु तुम्ही बोलतां हें खरें. तुम्ही कार्य-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्ते दौलत सांभाळाल. तुम्हांस जा बोलतों हें अंतर पडलें. याउपर मूल हातीं धरून तुम्ही दौलत करणें. मी मनापासून सांगतों, मी स्नानसंध्या करून राहीन. म्हणून बहुत समाधानानें मामास बोलले. यांनीं उत्तर केलें, 'एव्हां मूल लहान आहे. आणखी २।४ वर्षें शहाणे करून मग स्नानसंध्येस सुखरूप जावें'. तेव्हां बोलले, मुलाची तरी माझे ठायीं निष्ठा कोठें आहे? मामा लगेच माधवरावास घेऊन आले. रायांनीं विनंति केली कीं, 'आपण वडील, जे मजला आज्ञा कराल त्याप्रमाणें राहीन. वडिलांचे पायांशीं दुसरा विचार नाहीं'. नमस्कार घातला. तेव्हां दादा संतोषें करून बोलले, 'याउपरी माझी खात्री झाली. मामांनीं व तुम्हीं कारभार करावा. मजला सुचेल तें मी सांगेन. माझे शागीर्द[1] आहेत, तेवढ्यांचा मी कारभार करीन. आबा व नाना पुरंदरे व सखाराम यांचे सरंजामाची घालमेल करूं नये, चालवावें'. या उपरी रायांनीं विनंति केली, सर्व कारभार स्वामींचा, शागीर्द तेवढे तुमचे, वरकड कोणाचे! आज्ञेप्रमाणें सर्वांची निभावणी होईल. हे त्रिवर्ग यथास्थित वर्तले तर उत्तम, कुचेष्टा करूं लागले तर काय करावें?' तेव्हां दादा बोलले, 'कुचेष्टा केल्यावर त्यांचा मुलाजा काय? फजित पावतील. येविशीं माझा आग्रह नाहीं'. म्हणून बोलोन माधवराव व त्रिंबकराव यांस समागमें घेऊन दादा बाहेर सदरेस आले. तेथें मल्हारबा आले, त्यांस बोलले, 'माधवराव धनी, त्रिंबकराव कारभारी, सर्वांनीं यांच्या विचारें वर्तावें'. होळकर म्हणाले 'बहुत उत्तम'. गंगोबा म्हणाले, 'दोन फळ्या झाल्या त्याची गत काय?' दादासाहेब बोलले 'आतां वेड्यासारखें पुसतोस काय?' तेव्हां त्या पक्षींचे जितके तितक्यांचीं गात्रें विसकळित जालीं. बाबूराव, मामा व राव त्रिवर्गांनीं मातुश्रींस जाऊन सांगितलें. उत्तम झालें, म्हणून बोलली. बाबूजी नाईक मात्र वैतागून गांवास जातों म्हणून उठून गेले'. हा कागद (इचल०, ले. ६६) दादाच्या स्वभावाची परीक्षा करून देणारा आहे. सासवडकर मंडळींचीं उत्पन्नें जातील या भीतीनें बापूनें हा कलह वाढविला. परंतु अखेरीस सर्व बोलणें फोल ठरलें. दादा घरांतून रुसून

---

१. दादांजवळ चेले शागीर्द, वगैरेंचा परिवार सदैव मोठा बाळगलेला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. २२-८-१७६२ रोजीं निघून वडगांवास गेले. मागाहून सखाराम-पंतही गेले. त्यांची समजूत काढून परत आणण्याकरितां माधवराव, मल्हारराव, बाबूजी नाईक, बाबूराव फडणीस, गोपाळराव पटवर्धन, त्रिंबकराव मामा वगैरे मंडळी एकामागून एक गेली. त्यांच्या हातून वळेना. तेव्हां मागाहून स्वतः गोपिकाबाई गेली. सखारामबापूकरवीं बोध करविला. परंतु न ऐकतां निघोन कोरेगांवचे मार्गें नगराकडे गेले. मागाहून बापू त्यांस आणावयास म्हणून गेला तो परत आलाच नाहीं. तेव्हां गोपिकाबाईसह सर्व मंडळी पुण्यास परत आली, आणि उभयपक्षीं युद्धाची तयारी सुरू झाली.

'आपणांस पांच किल्ले व दहा लक्षांची जहागीर स्वदेशीं देणें' ऐसें दादासाहेब म्हणत होते. दिल्यास देशस्थांचें बंड वाढतें ऐसें समजोन गोष्टी क्ष्यगयीवरी घालाव्या. हा अर्थ दादांच्या चित्तांत कळला. त्यावरून भाद्रपद शुद्ध ३ स पुण्याहून निघून वडगांवांस अनुष्ठानाच्या समाप्तीच्या निमित्तानें गेले. दुसरे दिवशीं गोपिकाबाई समजाविशी करून आणावें म्हणून गेली. तेव्हां दादांनीं नानासाहेबांच्या पायांची आण केली कीं, पाषाणा-हून जाऊन येतों. म्हणून गेले. ते रात्र दिवस करून नगरच्या रोखें गेले. बापू, आबा पुरंदरे व महिपतराव चिटणीस बरोबर जात होते, त्यांस साफ सांगितलें जे, मजबरोबर न येणें. माझे मनास येईल तिकडे मी जातों. त्यावरून ते फिरोन आले. (३०-८-६२). ता. १४-९-६४चें पत्र. 'दादासाहेबांनीं योगाभ्यासास जावयाचा मजकूर ध्यानांत आणोन निघोन गेले. लोकांचे व आमचे मतें कांहीं कलहाकरितां गेले असावे. पारनेरापासून सर्वांस निरोप देऊन आपण एकाकी एका घोड्यानिशीं नर्मदातीरास जावयास गेले'.

इकडे मातुश्रीच्या सल्ल्यानें माधवरावानें चुलत्याशीं दोन हात करण्याची हिंमत बांधिली; होळकर व बाबूजी नाईक यांजकडून शपथा घेववून

१. पुण्याचे दक्षिणेस खडकवासल्याजवळ. येथें पेशव्यांचे व इतरांचे वाडे होते. येथेंच नाना फडणिसाची विहिर असून, तेथून नानाचे हौदांत नळ आणलेला होता.

२. गणेशखिंडीजवळ पाषाण गांव आहे.

पुस्तकालय गुरुकुल कांगड़ी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar.

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपले पक्षांत कायम केलें. दादांची बुद्धि शाश्वत हा भरंवसा नव्हताच. महिपतराव चिटणीस, आबा पुरंदरे वगैरे जाऊन दादास मिळाले. रामचंद्र जाधवही त्यांजकडे आला. यासंबंधानें गोपाळराव पटवर्धनास त्याचा बाप लिहितो. 'एक तत्त्वीं झालें हें चांगलें. दुही तुटली. हे दगा करणार होते. अनायासें अरिष्ट चुकलें. याउपरी नेट धरून काम करावें. शहरच्या वाड्यासभोंवतीं बंदोबस्त करावा. कार्यभागी यांनीं वाड्यांत बसून रात्रंदिवस नेट धरून तमाम राज्यभाराचा बंदोबस्त करावा. ते बाहेर गेले काय, आंत राहिले काय, कांहींच होणें नाहीं. सखाराम सर्व नाश करावया निर्माण झाला आहे. त्यास ठिकाणीं ठेवावयाची बुद्धि कोणासच झाली नाहीं. एक तेवढी गोष्ट केली असती तर इतके खेळ कशास होते! आतांही हरइलाज करून तेवढें कार्य केलें तरी बरें आहे. नाहीं तर तो सर्व दौलत लयास नेईल. दादासाहेबाची अंगेजणी, कर्तृत्व, साहसकर्म करतील न करतील, हें सर्व कळोनच गेलें आहे. परंतु परिणाम शुद्ध नाहीं. एक दोघां तत्पक्षीयांस युक्तीनें साधून जरबेंत आणिलें म्हणजे दबा बसेल. सखारामाच्या मतें शांति केवळ लयास न्यावी. उत्तर प्रांतची फौज दौलत लयास गेली. आणखी किती नाश होणार! शकुनि आहे. रात्रींचा शें दोनशें माणसांनीं उचलून किल्ल्यावर नेऊन घालावा. एखाद्या राजकारणास म्हणोन बाहेर कोस दोन कोस नेऊन तेथून उडवावा. ही सर्तूद करावया चुकों नये. बळ पडत चाललें तर सारेच मायेचे, नाहीं तर कोणाचा कोणी नव्हे. दादास आणावयास आनंदीबाई गेली, बरें झालें'. असा सक्तीचा बंदोबस्त सखारामबापूस कैदेंत ठेवण्याचा आरंभीं कठोर वाटला, परंतु परिणामीं तो हितकर झाला असता. आनंदीबाईसही, दादांचें करणें आवडलें नाहीं.

४. घोडनदीची लढाई, माधवरावास कैद (१२-११-१७६२).— दादा रुसून गेला त्या वेळेस निजामाचा अंमलदार महंमद मुरादखान औरंगाबादेस होता. त्यास निजामानें पेशव्यांचे घरांतील तंटा मिटविण्यास

१. ख. ले. २५, ४८, ५४, ५५, ५८, ६०, ६३, ६४, ६५, ६६, ६८–७३; इ. ६२, ६६; खं. १४.२१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठविलें. तो लगेच नाशकाकडे येऊं लागला असतां वाटेंत दादांची गांठ पडून त्यास साह्य करण्याचें मुरादखानानें वचन दिलें. (सेयर मुताखरीन). त्याबरोबर दुसरे कित्येक मराठे सरदार त्यांस सामील झाले, त्यांत विठ्ठल शिवदेव, निळकंठ महादेव पुरंदरे, जीवनराव खासगीवाले, बहिरो अनंत, सखाराम बापू ही मंडळी प्रमुख होती. इकडे माधवरावाची मुख्य भिस्त गोपाळराव पटवर्धनावरच होती. सन १७६२च्या पावसाळ्यांत दादा व सखारामबापू यांचे हातून कारभार काढून माधवरावाचे नांवानें आपण कारभार करण्याचा निश्चय गोपिकाबाईनें ठरविला, तेव्हां त्रिंबकरावमामा, बाबूराव फडणीस, बाबूजी नाईक, पिराजी निंबाळकर, नरसिंगराव धायगुडे, मल्हारराव होळकर, रायाजी पवार, रामचंद्र जाधव इतक्या मंडळींनीं तिला पाठबळ देण्याचें कबूल केलें. परंतु या सर्वांहून तिची भिस्त गोपाळराव पटवर्धनावर विशेष होती. दादा व सखारामबापू यांस आपण कधीं अनुकूल होणार नाहीं असें वचन गोपाळ-रावानें तिला दिलें होतें तें त्यानें शेवटपर्यंत पाळिलें. (खरे, पृष्ठ ४२० टीप). दिपवाळीपावेतों उभयपक्षीं लढण्याची सिद्धता झाली. गोपाळरावास श्रीमंतांनीं त्वरेनें चालून जाण्याची आज्ञा केली. परंतु बापानें त्यास वारंवार लिहून कळविलें कीं, ‘कार्तिकमासीं युद्धाची उतावळी न करावी. मार्गशीर्षमासीं तुमची फत्ते आहे. कार्तिक १५ स चंद्रग्रहण असून तुमचे राशीस चार दुष्ट ग्रह आहेत. मार्गशीर्ष १५ पावेतों उतावळी न करणें. पुढें जय आहे’. यावरून ज्योतिषाचें महत्त्व लोकांस किती वाटत होतें तें दिसतें. परंतु कार्तिक शुद्धांतच लढाई होऊन माधवराव पराभव पावला आणि चुलत्याचे स्वाधीन झाला. पुरंदरे, विठ्ठल शिवदेव, अंताजी माणकेश्वरचा पुत्र बहिरव, नारो शंकर, कृष्णराव पारसनीस, खंडोपंत पानसे, एकबोटे वगैरे देशस्थ मंडळी सखारामबापूनें दादाचे पक्षास वळविली. मध्यंतरीं उभय पक्षांत समेट करण्याचे अनेकांचे प्रयत्न चालूच होते. कृष्णराव पारसनीस, गंगाधरभट उपाध्ये व रामशास्त्री वगैरे मध्यस्थीस गेले. परंतु त्यापासून निष्पत्ति झाली नाहीं. दादानें २५ हजार फौज जमा केली. भोसले व निजाम त्याचे मदतीस येण्यास निघाले होते. या तयारीची बरोबर कल्पना पटवर्धन मंडळीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नव्हती. दादाजवळ पैसा नव्हता, तेव्हां आदल्या वर्षी निजामानें कायगांव टोकें लुटून पैसा मिळविला त्याच धर्तीवर आतां दादानें पैठण क्षेत्र लुटून पैसा उत्पन्न केला. 'दादासाहेबांची स्वारी पैठणास येऊन आम्हां उभयतांचे वराचें वर्तुलाकार केलें, सर्व मालियेत घरें सोडून घेऊन गेले'. या अनुचित कृत्यानें राष्ट्रांत त्याचा दुर्लौकिक वाढला. या दुहीच्या प्रसंगीं लुच्च्या मंडळींचें चांगलें फावलें. लोक नानाप्रकारच्या कंड्या पिकवूं लागले. साताऱ्यास छत्रपतींकडे दादांचीं कारस्थानें खेळूं लागलीं. बहिरो अनंतास फौज देऊन त्यानें साताऱ्यावर पाठविलें. इकडून माधवरावानें मोरोबा पटवर्धन, मानाजी फाकडे, शहाजी भापकर व गमाजी यमाजी यांचीं पथकें तिकडील बंदोबस्तास रवाना केलीं. गमाजी देशस्थ असून माधवरावाचे पक्षांत होता.

नगरच्या बाजूस राहून फौजेची जमवाजमव झाल्यावर दादा फौजेसह पुण्याच्या रोखानें चालून येतात, असें समजतांच, माधवरावही मातुश्री व कारभारी यांच्या सल्लयानें त्याजवर चालून गेला. 'दादाचें नगराहून कूच होऊन चारोळ्यास आले. आम्हांस त्यांस दहा कोसांची तफावत आहे' (५-११-६२). गोपाळराव पटवर्धन, पिराजी नाईक निंबाळकर, रास्ते आनंदराव, त्रिंबकराव पेठे, मल्हारराव होळकर हे मुख्यतः माधवरावाच्या बाजूस होते. उभय फौजांची गांठ घोडनदीवर पडली. निजामाचा सरदार मुरादखान दादासाहेबांचे मदतीस आला होता. ता. ७-११-१७६२ रोजीं प्रथम दादाच्या फौजेनें माधवरावावर हल्ला केला. तो त्यानें मोठ्या शर्तीनें परत फिरविला. प्राणहानि टाळण्याच्या इच्छेनें तिऱ्हाइतांमार्फत दोन चार दिवस समेटाचें बोलणें पुनः चालू झालें. त्यासंबंधानें दादा होळकरास लिहितो, 'चि. राव यांसी भेटीस आणावयाचा प्रकार तुम्हीं केला असतां मागती काय झालें न कळे. असो. होणार तें होऊन आलें. याउपर चिरंजीवांस घेऊन यावें. तुमच्या वडीलपणास शब्द न लागे तें करावें. त्या मंडळींत तुम्हांखेरीज दूरदेशी कोणी नाहीं. जर ही गोष्ट न होय तर ईश्वरसत्तेनें होणार तें होईल'. या मजकुरावरून होळकराचें अंतःकरण निखालसपणें माधवरावाकडे नसून मतलबावर असल्याचें दिसतें. परंतु तडजोड फलद्रूप न

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतां ता. १२ नोव्हेंबर रोजीं पुनरपि लढाई होऊन फौजेंत फितुरं झाल्यामुळें माधवराव पराभव पावून मागें हटला, आणि लढून नुकसान न व्हावें म्हणून आपण होऊन शरणागत करून चुलत्याचे स्वाधीन झाला. त्या वेळीं त्याच्या बाजूचे लोक पांगापांग होऊन पळून गेले. गोपाळराव मिरजेकडे व त्रिंबकराव वगैरे बारामतीस बाबूजी नायकाकडे गेले.

एक गृहस्थ लढाईच्या ठिकाणावरून लिहितो.[1] 'रविवारीं (ता. ७ नोव्हेंबर १७६२) फौजा येथें आल्या. दादासाहेब चढ्या घोड्यानिशीं घोडनदीपलीकडे माधवरावावर चालले. तों नदीस पाणी डोईइतकें. तेव्हां हे अलीकडे व ते पलीकडे उभे राहून तोफा, जेजाला व बाणांची लढाई लागली. दोनही बाजूंस दहा पांच लोक पडले. संध्याकाळ जाला, तेव्हां दादासाहेब मागें अर्ध कोस सरकोन राहिले. दुसरे दिवशीं झुंज करावें तों त्यांनीं (माधवरावांनीं) सल्ल्यावर घातलें. मल्हारजी होळकर, पिराजी नाईक व बाबूजी नाईक आले. आज कुयोग आहे म्हणून माधवरावही येणार ते राहिले. हे तहरह बोलून परत माधवरावा-कडे गेले. दादासाहेबाचा बेत भारी झुंज करावेंसा आहे. झुंज होतें तर हे त्यांस (माधवरावांस) आटपते असें नाहीं. परंतु ईश्वराची लीला कोणास कळते ? दादासाहेबांची फौज तीस हजारपर्यंत व त्यांची बारा हजार आहे. दादासाहेबांचा पैंडा भारी पडला. यांचें बल कमी पडलें. नदीस पाणी फार याजमुळें तरवारीचा उपाय राहिला. नदीनें उभयपक्षीं अबरू बचावली. आतां उभयपक्षीं सख्यत्व होणार आहे'.

पुण्याचे सावकार गडबडून पळूं लागले तेव्हां त्यांस ता. ५-१-१७६२ रोजीं दादानें आश्वासन दिलें, कीं 'तुम्हीं कोणे गोष्टीचा वसवसा न धरितां सुखरूप राहणें. शहर सरकारचें असे. चिरंजीव इकडे आले असतां तिकडे भय काय आहे ?' माधवराव लिहितो. 'दादा फौजेसह आमचे गोटावर चालोन आले. पलीकडे ते, अलीकडे आम्ही, मध्यें घोडनदी याप्रमाणें गांठ पडली. आम्हीं सारी फौज एकत्र करून गट केला.

१. अप्रकाशित त्रुटित पत्र, रा० कृष्णाजी वासुदेव पुरंदरे रा० चांवळी यांजकडून.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि तोफा व बाण यांचा मार दिल्हा. दोन तोफांनीं फार काम केलें. उत्तम प्रकारें मोडून दीड कोसांवर मुक्कामास गेले. दिवस मावळल्यावर आम्हीं तळावरच मुक्काम केला. त्यानंतरच कार्तिक वद्य ११ रोजीं दुसरी लढाई झाली. माधवरावाच्या फौजांनीं शिकस्त खादली. दादासाहेबाचे लोक इकडील फौजा लुटतात. आम्ही बहुत पड खाल्ली, परंतु दंगाच करावा हा त्यांचा मानस. त्रिंबकराव व बाबूराव यांनीं कारभार करावयाचा हा प्रकार त्यांनीं कबूल केला, तें सारें कृत्रिमसें नजरेस पडलें. तेव्हां सरदारांचे मतें सल्ला करूं नये. तेव्हां सर्वांची आशा सोडून आम्हीं त्यांचे हस्तगत व्हावें, याशिवाय दुसरा विचार नाहीं. तेव्हां घोडनदीवरून कूच करून आळेगांवनजीक आलों. तों मागून त्यांच्या फौजा आल्या. प्रहर दिवसापासून दिवस मावळत तों युद्ध जालें. शेवटीं उराशीं ऊर मीं केलें. उपर आमच्या फौजेंत फितूर, याजमुळें आमच्या फौजांनीं माघारें घेतलें. रात्र झाली. रातोरात भिमा उतरून अलीकडे आलों. तों फौजेस उपास. दुसरे दिवशीं भिमेवरून कूच केलें तों फौजेचा धीर सुटला. तेव्हां मामा वगैरे सर्वांच्या मतें सल्लाच करावा, दुसरा अर्थ नाहीं. तेव्हां भेटी जाल्या'. 'मुकाबला व्हावा तों पंतप्रधानांचें शरीरीं अस्वस्थ होतें. लढाई झाल्यावर दुतर्फा दौलत सरकारची खराब होते हा विचार करून पंत प्रधान जाऊन भेटले. उभयतां एक अंबारींत बसून डेऱ्यास दाखल झाले. दादांचे लोक तीन दिवस श्रीमंतांभोंवतीं पहाऱ्यास बसले. नंतर सखारामपंत व निळकंठराव पुरंदरे यांनीं श्रीमंतांचे देण्याचे यादीवर दादांनीं रुजू करीत जावें, असा तह होऊन डेऱ्यावरचे लोक उठविले'. दादाची सरशी झाल्याबरोबर चिंतो विठ्ठल रायरीकर याजकडे फडणिशीचें काम आलें. नीळकंठ आबा पुरंदरे यास तेरा लक्षांची सरदारी व पुरंदर किल्ला देण्यांत आला. सखाराम भगवंतास नऊ लक्षांचा सरंजाम व सिंहगड किल्ला, महिपतराव चिटणिसास तीन लक्षांचा सरंजाम लोहगड किल्ला आणि हजार राउतांची सरदारी मिळाली. दौलताबादचा किल्ला मुरादखानास दिला. दादा गोपिकाबाईस लिहितो, 'चिरंजीव लेकरूं, त्यांजविषयीं चित्तांत दुसरी गोष्ट नाहीं. सरदारांनीं व कारभारी यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झुंजावयाचा प्रकार करून चालले. गांठ पडोन झुंज जालें. परिणाम नाहीं हें समजोन चिरंजीव येऊन भेटले. आमचे चित्तांत दुसरा अर्थ नाहीं. होणार-नुरूप जालें. आम्ही जें करीत होतों तें दौलतेस अपाय न व्हावयाकरितां. कारभारी यांचे बुद्धीनें या थरास गोष्ट आली. ईश्वरसत्तेपुढें कोणाच्यानें-ही कांहीं होत नाहीं. ज्ञानी आहेत त्यांनीं संतोषच मानीत जावा'. माधवराव आईस लिहितो. 'दादासाहेबांनीं बहुतां प्रकारें समाधान केलें कीं दौलत सारी तुमची आहे. कारभाऱ्यांमुळें इतका प्रकार झाला. मन मानेल तसा सरंजाम सरदारांस व मोगलांस कबूल करणें प्राप्त जाला. निजामलीस स्नेहाच्या रीतीनें काढून माघारा लावितों. नंतर हिंदुस्थानांत व कर्नाटकांत फौजा रवाना करूं. तुम्हांखेरीज व मातुश्रीखेरीज मला दुसरा अर्थ नाहीं. या उपर दौलतीचे कारभाराचा भार आम्हांवर द्यावा, म्हणजे सर्व बंदोबस्त होईल. अशा कित्येक गोष्टी निखालसपणें डोळ्यांत पाणी आणून बहुत ममतेनें बोलले. त्यांचे मनांत विकल्प किमपि नाहीं. बोलणें चालणें पाहतां निखालसता फार आहे. आम्हांकडील लोकांचा पूर्ण द्वेष तीर्थस्वरूप करीत नाहींत. समाचार वारंवार घेतात. त्यांस समाधान पत्रें पाठवीत जावीं. गोपाळराव, बाबूराव, त्रिंबकराव यांनीं आतां प्रयत्न राहिला नाहीं असें सांगितलें, तेव्हां रास्ते यांस तीर्थरूपांकडे पाठवून भेट घेतली. इकडील प्रसंग विपरीत जाला म्हणोन वडिलीं उदास होऊं नये. काळ सदैव सारखा असतो असें नाहीं. आम्हींही काळावर दृष्टि ठेवून उत्तम दिसे तसा डौल धरला आहे'. वर सांगितल्याप्रमाणें चुलते पुतण्यांचीं दोन तीन झुंजें घोडनदीचे बाजूस आळेगांव, न्हावरें वगैरे ठिकाणीं झालीं, त्यांस 'घोडनदीचें युद्ध' असें सामान्य नांव दिलें आहे. माधव-रावाशीं लढण्यासाठीं दादानें मुरादखानामार्फत निजामास मदतीस बोलाविलें होतें. त्यांची भेट ता. १३-११-१७६३ रोजीं भीमेच्या कांठीं पारनेराजवळ झाली'. या भेटींत उदगिरवर कष्टानें मिळविलेला सर्व मुलूख व दौलताबादचा किल्ला दादानें निजामास परत दिला. मुरादखानाचे मार्फत हें प्रकरण उरकलें, आपली जरूर त्यांत राहिली नाहीं, याबद्दल विठ्ठल सुंदरास वैषम्य वाटून त्यानें निजामअलीच्या मार्फत जानोजी भोसल्याशीं नवीन कारस्थान रचिलें, आणि पेशव्यास काढून जानोजीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

छत्रपतीचे गादीवर सातान्यास नेऊन बसविण्याचा व्यूह पुढें सिद्ध केला. (सेयर मुताखरीन). 'श्रीमंताचा व यवनाचा स्नेह झाला. या उपरी दादा व माधवराव निजामास घेऊन सातान्यास राजा स्थापून गोपाळरायावर मिरजेस जाऊन तोफा फोजेनें जेर करून, हैदर नायकावर निजामाबरावर फौज देऊन पाठवावे, आपण माघारें मिरजेपाशीं असावें, होळकर व नारोशंकर यांची रवानगी हिंदुस्थानांत करावी, असा विचार आहे'. निजामासारख्या शत्रूशीं एवढी गट्टी करणाऱ्या दादाची तारीफ किती करावी! या वाटाघाटींत आतां माधवरावाचें अंग नव्हतेंच. केवळ कारभाऱ्यांनीं भर दिली म्हणून माधवराव चुलत्याशीं लढला असें नाहीं. 'दादासाहेब कोणते वेळेस काय करतील याचा भरंवसा कोणासही नाहीं व कोणच्याही लगामीं नाहींत. एकांतीं बोलणें झालें म्हणजे वांकडा भाव नाहीं; परंतु सांगणार आपल्यातर्फेनें लबाडी करावयास चुकत नाहींत'. गोपाळराव गोपिकाबाईस लिहितो'. 'रायांजवळ राहिल्यानें परिणाम नाहीं यास्तव निघून आलों. राव दादासाहेबाकडे गेले. पण त्यांचें चित्त शुद्ध नाहीं. दोनही डेऱ्यांस दोन हजार गाड्यांचा पाहरा आहे. रावांस कोणी भेटूं शकत नाहीं. आपणांकडीलही (म्हणजे गोपिकाबाईचा) बंदोबस्त करण्याच्या विचारांत आहेत. यास्तव पुरंदरचा बंदोबस्त करून वरच रहावें. खालीं एकंदर येऊं नये. सखाराम उभयतां धन्यास दिगंबर करणार'. याच संधीस पुण्याच्या ब्राह्मणांनीं दादांचा खालील पत्रानें निषेध केलेला आढळतो. 'सर्व अनुकूल असतां यवनास आणून आपण सर्व दौलत क्षयास नेली. पुण्यास मातुश्रीच्या वाड्यांत गाद्यांच्या चौक्या. तुम्हीं ईश्वर दयेनें सलामत असतां, हें अपूर्व झालें! तुमच्या कारभाऱ्यांनीं नाना प्रकारचे कुतर्क शिकवून तुम्हांस बाहेर नेलें. तीन पिढ्या दौलत मिळविली ती क्षयास नेली. एकनिष्ठ सेवक, सरदार कारकून यांस देशधडी केलें. खासगीकडील किल्ले सिंहगड व पुरंदर लोकांस दिल्हे. सखारामपंतानें तुमचें घर बुडविलें हें तुम्हांस कळत नाहीं. परिणामीं कळेल. चित्तपावनांचें नांव नाहींसें करावयाचा मनसबा सखारामानें सिद्धीस नेला. तुम्हीं भोळे त्याचे स्वाधीन झालेत'.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माधवरावाच्या हातून कारभार होणें शक्य नाहीं, आपणच सर्व व्यवस्था लावण्यास समर्थ आहों, अशी दादाची खात्री व धमक असून जर त्यानें पुतण्यास अडकवून ठेवून राष्ट्रोद्योग सुरळीत चालविला असता, तर त्यांत वावगें कांहीं नव्हतें. तसा क्रम त्यानें उघड स्वीकारला पाहिजे होता. परंतु येथवर जे त्याचे उद्गार ठिकठिकाणीं देण्यांत आले आहेत, त्यांवरून त्याच्या मनाचा खोडसाळपणा मात्र व्यक्त होतो. मराठमंडळ आपणांस अनुकूल नाहीं आणि माधवरावास वाजूस सारणें शक्य नाहीं, अशीच त्याची भावना स्पष्ट असल्यामुळें, माधवराव मूल, दुसऱ्याचे शिकवणीनें वागतो. संसार असत्य, आपण स्नानसंध्या करून राहणार, वगैरे नामर्दपणाचे शब्द त्याच्या तोंडीं वारंवार येतात, ते खरे नव्हते. घोडनदीचे लढाईनें दादाचा जम मुळींच बसला नाहीं. पुष्कळशी मंडळी रुसून गेली. पुरंदरे, सखाराम-पंत वगैरे मंडळीस खूष ठेवण्याकरितां अपरिमित खैराता वांटाव्या लागल्या. दुटप्पी सरदार मजा पहात बसले. निजामासारखे शत्रु आपला लाग साधूं लागले. नानासाहेब, भाऊसाहेब यांनीं कैक वर्षें केलेला उद्योग निष्फळ होऊन सर्वत्र बजबजपुरी माजली. तेव्हां हें काम आपल्या हातून आवरत नाहीं असें वाटून दादा पुनः रुसलेल्या मंडळीची समजूत करण्यासाठीं भावजयीचीं आर्जवें करूं लागला. तो लिहितो. 'वडिलीं पत्र पाठविलें तें पावोन परम समाधान झालें. खुलाशानें लिहिलें हा उत्तम पक्ष. मनांत बरी वाईट गोष्ट येत जाईल ती लिहीत जावी, तेणेंकरून चित्त प्रशस्त होईल. वडिलीं कां लिहिलें म्हणोन मला वाईट वाटत नाहीं. नाना, भाऊ यांचे जागां आपण आहेत. वडिलांस मनसुबाही कळतो. केवळ वरकडी वायकांप्रमाणें नव्हत. तत्राप वडिलांस माहितगारी असावी म्हणोन येथील कारभाराचा मजकूर पुरवणींत लिहिला आहे. वाचून दोनदां पाहवा; आणि पुढील तर्तूद कारभारी समजावयाची करावी. चिरंजीव शहाणे करावे; त्यांनीं दौलत करावी, आमचा नांवलौकिक पूर्वीं जाहलाच आहे, आतां मला फारशी आस्ता नाहीं, वडिलांचे आज्ञेप्रमाणें करावें हेंच मानस आहे'.

घोडनदीच्या युद्धांत माधवरावाचा पराजय होऊन तो चुलत्याच्या स्वाधीन झाला, तरी पंत प्रधान हुद्दा त्याचा कोणीं काढून घेतला नव्हता,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि प्रधानकीचीं वस्त्रें माधवरावाचीं काढून तीं दादास छत्रपतींच्या मार्फत मिळाल्याशिवाय, नुसत्या पराजयानें फारसें काम झालें नाहीं. तसा दादाचा उद्देश असेल, परंतु तो उघड व्यक्त करण्यास त्यास छाती झाली नाहीं. 'माधवराव लेकरूं, त्यांजकडे अपराध नाहीं, त्यांस शहाणे करून आपण मोकळे होणार', हीच भाषा त्यानें आंत बाहेर चालविली होती. नानासाहेबांचा मुलगा, अल्पावकाशांत त्याचें चमकणारें तेज व दादाचा नाकर्तेपणा, या कारणांनींही लोकमत माधवरावाचेच बाजूस होतें. कांहीं स्वार्थी इसम दादास भर देत, ती केवळ स्वतःच्या फायद्यापुरती होती. माधवराव राज्यकारभार बिघडवितो, म्हणून तो त्याजकडून काढून दादास द्यावा, असें उघड प्रतिपादन करणारा एकही इसम नव्हता. माधवरावानें वेळ पाहून पडतें घेतलें इतकेंच. कदाचित् आणखी थोडा निकरानें व तयारीनें तो लढता तर त्यास जय मिळाला नसता असें नाहीं; परंतु अशा आपसांतील लढाईनें फायदा कोणाचाच नसून बाहेर लौकिकांत वैगुण्य व नुकसान, सबब आपण होऊनच माधवराव समेटाच्या बुद्धीनें चुलत्यास जाऊन भेटला. दादाचे अंगीं निश्चय व शहाणपणा नाहीं; जो कोणी सांगेल तसे वागणार, मग आपणच नेहमीं त्यांसन्निध राहून त्यांचेच-कडून कारभार उरकावा, आणि आपल्या मनाप्रमाणें करून घ्यावें असा माधवरावाचा पोक्तपणाचा विचार होता. हरहंमेश कारभारांत अनेक प्रश्न उपस्थित व्हावयाचे, त्यांत केवळ स्वतःच्या मंडळीपलीकडे चुलते-पुतण्यांचा मतभेद होण्यास फारशी जागा नव्हती. तेव्हां दहांपैकीं एक काम बिघडलें तरी नऊ कामें आपण सुधारून घेऊं अशी धमक माधव-रावानें बाळगिली. लुच्चे लोक आपमतलबास्तव तुम्हांस कसे फसवितात, हें जवळ राहून तो चुलत्यास क्षणोक्षणीं दाखविणार होता. दोघे कांहीं दिवस एकत्र काम करीत राहिल्यानें एकाची लायकी व दुसऱ्याची नालायकी आपोआप लोकांच्या दृष्टीपुढें सिद्ध झाली. चुलत्यापुढें तो हार गेला असें झालेंच नाहीं. प्रधान मी आहें, ही त्याची जाणीव कायम होती. म्हणून शक्यतितकें पडतें घेऊन चुलत्यास परभारें नरम आणण्याचा त्याचा विचार होता. लोक आपणांस फसवितात आणि आपण फसतों, ही ददाची मनोभावना नेहमींच कायम असल्यामुळें, तो सर्वांशींच साशंक असे. परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशी, म्हणजे आपणांस लोक गिळतील ही भीति माधवरावास कधींच वाटली नाहीं. सखाराम बापू एवढा खोल व उरदव्यापी, पण त्याजकडूनच बहुधा माधवरावानें पुढें काम घेतलें. चुलत्याचे स्वाधीन झाल्यावर बाहेरून त्यांचीं आर्जवें करून माधवरावानें, तूर्त त्यांजकडूनच कारभार आपल्या मनाप्रमाणें चालविला. स्वतःची करामत व जबाबदारी तो विसरला नाहीं. कांहीं काल तो चुलत्याचे तंत्रानें चालला इतकेंच. चार दोन महिने दोघे एकत्र राहिल्यानंतर पुनः बिघाड सुरू झाला; तो पुढें सांगण्यांत येईल.

माधवराव चुलत्याचे स्वाधीन होतांच त्याचे साहाय्यकर्ते बाबूराव फडणीस, त्रिंबकराव पेठे, वगैरे गृहस्थ पळून बारामतीस आबाजी नाइकाकडे गेले. तेथें त्यांजवर फौज चालून आली तर झुंजण्याचाच त्यांनीं निश्चय केला. गोविंद शिवराम खासगीवाले व बाबूजी नाईक हे दादांजवळ लष्करांतच राहिले. तथापि, त्यांस शिवीगाळ करून दादांनीं घालवून दिलें. गोपाळराव पटवर्धन आपल्या पथकासह निघून मिरजेकडे आला. त्याचा चुलत बंधु मोरोबा हाही थोडीबहुत फौज जमवून साताऱ्याकडे आला. बंडाळीकरून दादांचे विरुद्ध उठावा करण्याचा त्यांचा विचार होता. मोरोबानें प्रतिनिधीचे मुतालिक गमाजी व यमाजी यांस सामील करून घेतलें, तेव्हां सातारा व मिरज या दोन ठिकाणीं नजर ठेवणें दादास जरूर पडलें. राज्यांत सर्वत्र अंदाधुंदी सुरू झाली. पटवर्धन व प्रतिनिधि यांचा पाडाव करण्यासाठीं दादानें निजामाची मदत विचारली. निजामाचा सरदार रामचंद्र जाधव व भाऊ मीर मोगल यांचा कल पटवर्धनांकडे होता. गोपाळराव पटवर्धन बंडाचा पुढाकार घेण्यास तयार नव्हता. परंतु लढण्याचे कामांत तोच प्रमुख असल्यामुळें दादास त्याचीच मोठी दहशत वाटत होती. इकडे गोविंदराव पटवर्धनानें मिरजेंत बंदोबस्त करून दादा चालून आल्यास किल्ला लढविण्याचा त्यानें निश्चय केला. त्याचीं या वेळचीं पत्रें मोठ्या धीराचीं आहेत. 'त्यांच्यानें कांहीं होणें नाहीं. बकवा मात्र ऐकाव्या. यद्यपि आले तरी वर्ष दीड वर्ष खात्रेस आणीत नाहीं. मिरजेचा किल्ला व आम्ही जिवंत आहों तों फिकीर न करावी. मोगल भारी. हेच मोगलांच्या संकटांत पडतात. ज्याचे पदरीं फौज त्याची पृथ्वी. श्रीमंतांनीं फौज रवाना केली तरी त्यांसी कोण भितो ! प्रतिनिधी, गमाजी यमाजी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रामचंद्र जाधव इत्यादिकांशीं पटवर्धनांनीं राजकारण चालविलें. 'रघुनाथराव, सखाराम बापू, आबा पुरंदरे, विठ्ठल शिवदेव व नारोशंकर असें पंचायतन कृतकर्मे झाले.' याच वेळीं रामचंद्र जाधवानें पंढरपूर येथें क्षेत्रास धरिष्ट केलें. 'मोगलापेक्षां अधिक जाहला'. नोव्हेंबर अखेर गोपाळराव मिरजेजवळ आला. अगदींच संकट आल्यास विशाळगडचे प्रतिनिधीस लिहून त्यानें तेथें राहण्यास आश्रय मागितला. चुलते पुतण्यांच्या या कलहांत पटवर्धनासारख्या सरदारांची त्रेधा कशी उडे हें गोविंद हरीच्या पत्रांवरून चांगलें दिसतें. नानासाहेब पेशव्याच्या तालमेंत फार दिवस मुरलेला गोविंद हरी मोठा धूर्त व हिम्मतवान दिसतो. कोणास काय जबाब लिहावा, कोणाचा काय कावा आहे, हें सर्व तो नीट जाणतो. वास्तविक फडणीस, पेठे, बापूजी व आबाजी नाईक, पटवर्धन वगैरे सर्वच मंडळी नानासाहेबाच्या राजकारणांत तरबेज झाली होती; अगहुशारी मात्र प्रत्येकाची भिन्न होती. गोविंदरावानें मिरज हुजविण्यांत दाखविलेली चतुराई व राजकारभारासंबंधानें त्यानें दर्शविलेले विचार उच्च प्रतीचे आहेत, ते त्याच्या पत्रांतच वाचले पाहिजेत.[1]

५. पटवर्धनांकडून मिरज काबीज (६ डिसें.–३ फेब्रु. १७६३).— नोव्हेंबर सन १७६२ अखेर निजामाला निरोप देऊन चुलते पुतणे सातारा मिरजेकडे चाळीस हजार फौज घेऊन निघाले. बरोबर दमाजी गायकवाड, नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, रामचंद्र गणेश, आबा पुरंदरे व सर्वाधिकारी सखारामबापू अशी मंडळी होती. ता. ६ डिसेंबरच्या सुमारास त्यांनीं आळेगांवचा तळ सोडिला. माधवरावाच्या पक्षांतील पेठे वगैरे मंडळी व गोपाळराव पुढें दंगा करतील, तर त्यांचा बंदोबस्त करण्याचा दादाचा विचार होता. सातार्‍यास छत्रपतिपाशीं कांहीं तरी विरुद्ध कारस्थानें चालू आहेत अशी त्यास बातमी लागली होती. यापूर्वींच ताराबाई

१. आधारः—का. सं. श; भा. व. श; का. सं. प. या. ले. ४९२; घा. रा. च; इ. ६९; चं. ५७, १४१, १४४; खं. १०. ६; मुं. प्र. पृष्ठ १५१; ऐ. टि. २. १८ ले. १; खरे, ले. ८७, ८९, ९०, ९१, १०१, १०२, १०४, १११, ११२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मरण पावल्यावर छत्रपतींची व्यवस्था बदलण्यांत आली होती. रामराजानें स्वतः कारभार करावा असें नानासाहेबाचे मनांत फार होतें. पण तें आईसाहेबांचे आग्रहानें सिद्धीस गेलें नाहीं. म्हणून माधवरावानें वस्त्रें मिळाल्यावर महाराजांस किल्ल्यावरून खालीं वाड्यांत आणवून कारभार करण्यास सांगितलें. पेशव्याचा मुतालिक व कारभारी, अमात्य, सचिव, चिटणीस, खासनीस वगैरेंकडून कारभार घ्यावा, सरदारांकडून ऐवज घेणें तो हुजूर घ्यावे, असें ठरविलें. तालुकदारांकडे वराता करून ऐवज आणून वाडा नीट करविला; महिपत त्रिंबक ऊर्फ बजाबा पुरंदरे यास मुतालिकी-वर नेमिलें. ही व्यवस्था सन १७६२ च्या आरंभीं अंमलांत आली. स्वामि-द्रोहामुळें राज्यावर व पेशव्यांवर संकटें आलीं अशी भावना नानासाहेबाचे मनांत उत्पन्न झाली होती, तिचें निरसन येणेंप्रमाणें तात्पुरतें करण्यांत आलें. चुलतेपुतण्यांचा बेबनाव नसता तर या व्यवस्थेचा इष्ट परिणाम दिसला असता. चार सहा महिने कारभार चालला, तों चुलत्याकडून माधवरावाचा पराभव होऊन त्याचे कांहीं सरदार पळाले. त्यांनीं प्रतिनिधी-मार्फत कारस्थान रचिलें. यमाजी शिवदेव व मुलगा गमाजी, भिराजी नाईक निंबाळकर इत्यादि मंडळी पूर्वीं पेशव्यांचे विरुद्ध असत, त्यांत आतां नाराज झालेला गोपाळराव पटवर्धन सामील झाला. गमाजी यमाजी व विठ्ठल सुंदर हे व्याही होते, त्यांचेमार्फत या मंडळींनीं निजामाशीं कार-स्थान चालविलें. ही मंडळी आपणास भारी होऊन पुण्यावर चालून येतील, तर त्यांस अटकाव करण्यासाठीं चुलते पुतणे साताऱ्यास गेले. तेथें नवे-जुने अंमलदार करून नवीन करार केले. दादाचा मुख्य साथीदार दमाजी गायकवाड होता, त्यास महाराजांकडून सेनाखासखेलचीं वस्त्रें देवविलीं; आणि गोविंदराव गायकवाडास त्याची मुतालकी दिली. भवानराव प्रति-निधि पाणीदार होता, त्यास दूर करून प्रतिनिधिपद दादांचा मुलगा भास्करराव नुकताच ता. २६-२-१७६२ रोजीं जन्मलेला होता, त्याचे नांवें छत्रपतीकडून करून घेतलें, आणि नारो शंकरास त्याची मुतालकी देवविली. यामुळें भवानराव व गमाजी यमाजी नाराज होऊन निजामास सामील झाले. याच वेळीं विठ्ठल शिवदेव यास न्यायाधिशी व सेनापति-पद दाभाड्याचें काढून तें रामचंद्र जाधव यास दिलें. कान्होजी मोहित्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरलष्करपद काढून तें खंडेराव दरेकर यास दिलें. रामराजाचे अंगीं थोडें तरी कर्तृत्व असतें तर या प्रसंगीं पेशव्यांस कायमचें काढून नवीन व्यवस्था करणें शक्य होतें. परंतु तसा योग आला नाहीं. माधवराव चुलत्याचे ताब्यांत होता, तेव्हां त्यासही वरील घालमेलींत स्वतःचा विचार दाखवितां आला नाहीं. साताराची व्यवस्था केल्यावर ता. १२ डिसेंबर रोजीं तेथून निघून, रस्त्यानें गोपाळराव पटवर्धनाचा माग काढीत दादा २२ डिसेंबरच्या सुमारास मिरजेजवळ आला. नुसत्या निरोपानें गोविंद हरि किल्ला हवालीं करीना, म्हणून ता. २९-१२ रोजीं किल्ल्यास मोर्चे लाविले. आंतील लोकांना ६५ वर्षांच्या या गोविंदपंतानें मोठा धीर देऊन पेशव्यांच्या मोठ्या फौजांस चांगलेंच दमविलें. हजारबाराशें लोकांनीं पन्नास हजार फौजेशीं चालविलेला हा सामना पाहून माधवरावासही लाज वाटली; आणि तो स्वतः रात्रीं मोर्च्यांत जाऊन बसूं लागला, तेव्हां कोठें या फौजेनें हालचाल केली आणि किल्ल्यांतील लोक शरण आले. विठ्ठल शिवदेव व नारो शंकर यांचे मार्फत तह ठरवून ता. ३-२-६३ रोजीं गोविंदपंतानें मिरज किल्ला खालीं करून दिला, आणि आपण मंगळवेढ्यास निघून गेला. पटवर्धनांनीं सावकारांचें कर्ज देणें होतें तें पेशव्यांनीं वारावें, व मिरजे-शिवाय बाकीचीं त्यांचीं सर्व ठाणीं त्यांजकडे राहावीं, असा करार झाला. वेढ्याचे प्रसंगीं पटवर्धन मंडळींनीं जे जे कावे व उद्योग केले ते येथें सांगण्यास अवकाश नाहीं. गोविंद हरीच्या भरपूर व मनोरंजक पत्रांतच ते वाचले पाहिजेत. मिरजेवर चढाव करण्यापूर्वींच आबा पुरंदऱ्यास दादानें गोपाळरावावर पाठविलें होतें. जमखिंडीजवळ आबानें गोपाळरावावर एकदम हल्ला करून त्याचें सर्व लष्कर लुटून घेतलें. त्याबरोबर गोपाळराव शेंपन्नास लोकांनिशीं पळून निजाम जवळच मंगळवेढ्याकडे होता त्यास जाऊन भेटला. गोपाळरावाचे या पराजयानें गोविंदपंत घाबरून किल्ला खालीं करून देईल अशी पेशव्यास आशा होती, ती सफल झाली नाहीं. निजामानें व विठ्ठल सुंदरानें गोपाळरावाचा बहुमान करून मिरजेचा वेढा उठविण्याकरितां कुमक पाठविण्याचें त्यास वचन दिलें. त्यावर तशीं पत्रेंही गोपाळरावानें बापास पाठविलीं. परंतु निजामाची मदत म्हणून आली नाहीं. त्यानें दबकावणीचे निरोप मात्र पेशव्यास पाठविले, आणि आपण निघून उलट रायचूर-दुआबा-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडे चालता झाला. तह पुरा करून मिरजेस नारो कोन्हेर एकबोटे यास किल्लेदार नेमून पेशवे ता. ३-२-६३ रोजीं कृष्णातीरीं येडूर मांजरी येथें गेले. मिरज काबीज झाली हें एक महत्कृत्य म्हणून चुलते पुतण्यांनीं गोपिकाबाईस कळविलें. शेवट गोड झाला असें दर्शवून पराभूत झालेला गोविंद हरि यजमानास नमस्कार करून गेल्यावर लिहितो. 'आमची लज्जा श्रीनें रक्षिली. चार खंडांत झुंजाचा लौकिक झाला. धन्यास यश आलें. दीड महिना लढाई दिवसें दिवस अधिकच याप्रमाणें चालली. श्रीमंतांची सारी फौज आश्चर्य करून राहिली. पुढें परिणाम श्री लावील'.

या वेळची माधवराव व गोपाळराव इत्यादिकांची भावना लक्षांत ठेवण्याजोगी आहे. पटवर्धनांचा ओढा सर्वस्वी गोपिकाबाईकडे असून तिच्याच प्रोत्साहनानें ते वागत होते. गोपिकाबाईचे पक्षाचे म्हणून त्यांस सदाशिवरावानें मुद्दाम पानपतावर नेलें नाहीं, असा त्या वेळीं समज होता. आळेगांवावर माधवरावास जय मिळता तर पुढील राजकारणास सर्वस्वी निराळें वळण लागलें असतें. छत्रपतिसुद्धां सर्वांचे बंदोबस्त यथायोग्य करून सर्वांकडून एकसूत्री राष्ट्रसेवा घेऊन, माधवरावानें राज्याची व्यवस्था कायमची बांधली असती याविषयीं संशय वाटत नाहीं. परंतु पराजय होऊन चुलत्याचे स्वाधीन झाल्यामुळें त्याचीं पांच सहा वर्षें फुकट गेलीं. गोपाळरावादि पटवर्धनांचा राग दादावर होता. गोपाळराव निजामाकडे गेला याचा अर्थ त्यानें राज्यद्रोह केला असा नाहीं. दादा व बापू कारभार बिघडवितात, त्यांस ठिकाणीं बसवून माधवरावाचे हातीं सर्व सूत्रें आणावीं, एवढाच गोपाळरावाचा उद्देश असून, त्या धोरणानें तो वागत होता. निजाम मात्र कोणीकडून तरी केवळ आपला लाग साधीत होता. आळेगांवावर निजामानें दादास मदत करण्याचें कबूल केलें, पण मिरजेच्या वेढ्यांत गोपाळरावाचे तर्फेनें दादावर चालून जाण्याचें वचनही त्यानें दिलें.

या वेळीं पटवर्धनांची मोठीच त्रेधा उडाली होती. गोविंद हरि खासगीवाल्यास आर्जवानें लिहितो. 'दादांनीं कृपा करून सेवा घ्यावी, निदान राज्याबाहेर घालविणें असलें तरी कर्जाची वाट करावी. म्हणून बहुत प्रकारें लिहिलें. गोपाळरावानें फारच करुणा दाखवून पत्र लिहिलें, तेव्हां 'कृष्णातीरीं राहवें, रामचंद्र गणेशास आज्ञा करितों, ते पत्र पाठ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वितील', म्हणोन पत्राची वाट पाहतात तों त्यांजवर फौज रवाना झाली. त्यांजवर छापा घातला, त्याच दिवशीं मोर्चेबंदी झाली. जन्मवरी अन्न भक्षिलें, आतां कोणाकडे जावें, जीव कसा वांचेल, म्हणोन चिंता करतों, तों घाला पडला. सर्वस्वापहार झाला. एक धोतर नेसावयास, समागमें मनुष्य नाहीं. प्राणांशीं संकट, सेवा केली तेंच पुण्य, तेणेंकरून पार होऊन सात राउतानिशीं गेले. निमकहरामी केली नाहीं. कोटी अपराध, परंतु स्वामींचे एकनिष्ठ सेवक आहों. जीव वांचविण्याकरितां कोठें आश्रय दिसेना, यवनाकडे जावें, तूर्त जीव वांचवावा, म्हणोन मनसबा करून गेले. स्वामींचें अनिष्ट करावें हा अर्थ नाहीं. नवाबाचें येणें न जालें; गमाजी बावा नवाबाकडे गेले, त्यांनीं जाऊन भोसले आणिले; व नवाबांनीं आपला मारीपणा जाणोन बिघाड केला'. गोपाळरावानें लष्करचें कहीकवाड मारलें नाहीं, गांव लुटले नाहींत, वाट मारिली नाहीं'. सारांश, गोपाळरावाचा प्रयत्न स्वसंरक्षणाचा होता. हा सर्व घोटाळा दादाचे धरसोडीचा होय. सखारामबापू दुटप्पी, तो गोपिकाबाईस लिहितो. 'दादासाहेबांचे मर्जीचा प्रकार कसा आहे तो आपल्या ध्यानांत आहेच. जेथवर संभाळायाचें तेथवर चुकत नाहीं. सर्व थोड्याबहुतानें मेळवून घेतलें. गोपाळरावांचा निर्णय होत असतां त्यांनीं ओढून फार धरिलें त्यास आमचा इलाज नाहीं'.[१]

६. प्रतिनिधि, जानोजी व निजाम यांची पेशव्यांवर चढाई, (एप्रिल १७६३).—मिरज हातीं पडतांच मुख्य फौजा कर्नाटकांत रवाना करण्याचा बेत ठरला होता. या दरम्यान प्रतिनिधि भोसले यांच्या कारस्थानास रंग येऊन गोपाळराव त्यांस मिळाल्याबरोबर निजामानें पेशव्याशीं बिघाड केला. भोसल्यानें तावडतोब येऊन मिळण्याविषयीं गोपाळरावानें त्यास पत्र लिहिलें, आणि त्यास आणावयास खुद्द गमाजीबावा गेला. ता. २५-३-१७६३ रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो, 'पहिलें बंड झालें तेव्हां दौलत गेली. पुढें गोपाळरावांनीं न करावयाची गोष्ट करून मोगल आम्हांवर घेऊन येतात. तसा भिऊन आणीक दौलत द्यावी,

१. आधार.—धा. रा. च; खरे ले. १४४, १५२, १६४, १६५, ३१०, ३११.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तर मोगलांची चाकरी करणें प्राप्त होईल. येथील सरदार, तीर्थरूप व आम्ही एकचित्त आहों. एक दोन सरदार उदास आहेत, त्यांचीही समाजावणी करितात. या उपर मोगलांस दबल्यानें परिणाम नाहीं. विठ्ठल शिवदेव, आबा पुरंदरे व बाबूजी नाईक वगैरे तीस हजार फौज घेऊन दक्षिण प्रांतें रवाना झाले. उभयतां खासे देशास जाणार. नारोशंकर व हुजुरात हिंदुस्थानांत रवाना होणार'. असा बेत झाला पण तो टिकला नाहीं. घरांतील भांडणाचे परिणाम किती अनिष्ट झाले याची जाणीव चुलते पुतण्यास फेब्रुवारीच्या आरंभीं उत्पन्न होऊन समान संकटानें सर्वांचे डोळे साफ उघडले. ता. ३-२-१७६३ रोजीं माधवरावानें मातुश्रीस लिहिलेलें खालील पत्र अप्रतिम राष्ट्रद्या पठन करण्याजोगें आहे.

'कारभारी यांचे पेचामुळें आमचे दौलतेच्या तणावा तुटत चालल्या. पहिल्यापासून राखलें असतें तर सर्वही आपापला कारभार करून लगामीं राहते, तें न झाल्यामुळें सर्व मुलूख बुडाला. पत-पातेज उडाली. लोक फितूर झाले. धन्याचें वजन राहिलें नाहीं. शत्रु बलवत्तर झाले. तथापि पैसा असता तरी सर्वही गोष्टी, इतकेही पेच सांभाळून, नीट होत्या. पैसा नाहीं तेव्हां फौज कशानें ठेवावी ? फौज नाहीं, दौलत कशी राहणार ? असें, बारीक बारीक पाहतां, सारें अवघडच आहे. प्रस्तुत दादासाहेब व आम्ही एक झालों, हीच गोष्ट एका करोडीची जाहली. त्यांची आमची एकवाक्यता जाहली.ममताही परस्परें पहिल्यापेक्षां अधिकोत्तर मिळाली.कारभारीही आमचे लगामीं उत्तम प्रकारें लागले. आमची दौलत पूर्वीप्रमाणें करावी, हेंच मानस अंतर्यामापासून त्यांचें आहे. या उपर त्यांचा दुसरा संकल्प नाहीं. जें करणें तें आपले व आमचे विचारें करावें. दौलतीस ज्या गोष्टीनें कल्याण तीच गोष्ट सर्व्यांनीं करावी. हीच बुद्धि आहे व प्रस्तुत याप्रमाणेंच चालत आहे. आतां गोष्टी जाहल्या आहेत, याच गोष्टी दृष्टीस असाव्या. येणेंकरून पार लागेल तो लागेल. नासलें, त्यास दुसरें झालें तरी अगदींच नासेल. यास्तव झालें तें उत्तम आहे. एक विचार असावा तो आहेच. परिणाम लावणार परमेश्वर व वडिलांचें पुण्य समर्थ आहे. बहुत काय लिहूं, हे विज्ञापना'. ता. १७-२-१७६३ रोजीं सखारामबापू बाईस लिहितो, 'इकडील वर्तमान, सांप्रत भोसल्यांचें आम्ही कांहीं वाईट न करितां,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोपाळराव व गमाजीबावा यांणीं उत्पात करून नेले व तेही गेले. असो, चिंता काय आहे! आपलें पुण्य आहे तरी सर्व उत्तमच होईल. सारांश बाकी, मोगलानें बिघडलें तेव्हां नानाप्रकारचे मुद्दे घालतो. भिंवरेपासून मुलूख द्यावा, किल्ले द्यावे, भोसल्यास मुलूख द्यावा, कारभार करणें तो आमच्या विद्यमानें करावा, असें म्हणतो. तेव्हां सर्वस्व घेतो असें यांत आहे. यास्तव सर्वांचे विचारें हेंच, कीं आपली गनिमीची रीत आहे ती करावी, जोंपावेतों होईल तें करावें. नच होईल तर शेवटीं किल्लेकोट आहेतच. जसें बनेल तसें करावें. पुढें ईश्वरानें नेमिलें असेल तसें होऊ; परंतु पन्नास हजार फौज फार आहे. सांप्रत सडे होऊन मल्हारबाकडे जावें. त्यांस मेळवून घेऊन मग जें करणें तें करावें. त्यांस आणावयास विठ्ठल शिवदेव गेले. औरंगाबादचे सुमारें घेऊन येतील'. स्वतः रघुनाथराव लढवय्या व गनिमी काव्याचा पुरस्कर्ता असा अभिमान धरीत असतां, त्यासही या प्रसंगीं नाक मुठींत घेऊन मल्हाररावास शरण जावें लागलें. होळकरानेंही प्रसंगीं ओढून धरल्यास नवल काय? धन्यानें हिंमत सोडली कीं नोकर आपआपले लाग साधूं लागतात. मल्हारराव व त्याचा कारभारी गंगोबा तात्या चंद्रचूड यांचे वर्तनोद्देश या प्रसंगानें चांगले कळून आले.

ते दोघे वाफगांवास होते. सखारामबापूनें तात्यास लिहिलें, 'आपणासीं दुसरा विचार नाहीं. प्रस्तुत शह अगदीं जवळ आला. यास्तव कोणेविशीं अनमान न करितां मोठ्या मजलीनें येऊन पोंचावें. आपण व सुभेदार आल्यानें सर्व यश येतें. त्वरेनें यावें. काडीपरी अनमान न करावा. मोठी समय आहे. दौलत रक्षावी. यांतच उत्तम आहे. मोगलांचें प्राबल्य जाल्यास परिणाम कसा हेंही आपल्यास कळतच आहे. श्रीमंतांस घेऊन यावें असा विचार केला होता, परंतु दाटी जाली, यास्तव बनलें नाहीं. सुभेदार कांहीं परके नाहींत. वडीलपणें येऊन संरक्षण करणें हेंच त्यांस योग्य आहे. हें पत्र लक्षापत्रांचे जागां मानावें'. यावर ता. २०-२-१७६३ रोजीं मल्हाररावानें जबाब पाठविला, कीं 'गंगाधरपंतास पत्र आलें त्यांतील सर्व अर्थ निवेदन झाला. श्रीमंतांचा यावयाचा भाव लिहिला कळों आला. त्यावरून गंगाधरपंत पाठविले आहेत ते सर्व विदित करतील. सर्व प्रकारें भरंवसा तुमचा आहे'. गंगाधरतात्यानें येऊन मल्हारबाकडील कलमें घातलीं तीः—

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'१—दहा लक्षांची जहागीर नेमून द्यावी; २—गंगाधरपंताचे गांव जप्त आहेत त्यांच्या सोडचिठ्या, किल्ले चांदवडचे इनामी गांवचीं ताकीदपत्रें, व फडनिसीची सनद हीं गंगाधरपंतास द्यावीं'. याप्रमाणें गंगाधरपंताच्या सोडचिठ्या ६-३-१७६३ रोजीं देण्यांत आल्या; आणि मल्हारबाचे भेटीस यजमानांनीं जाऊन जहागीर करार करून दिली, तेव्हां ता. १२ मार्चचे सुमारास तो फौजेसह येऊन पेशव्यांस मिळाला. या संबंधांत चं. दप्तरचे ५३, १४३, ५४ व ६० हे कागद लक्षांत ठेवण्याजोगे आहेत. प्रतिनिधि व गोपाळराव यांचे रुसव्याचें स्वरूप फेब्रुवारी व मार्च महिन्यांत उत्तरोत्तर भीषण होत गेलें. पेशव्यांचे कारभारास नांवें ठेवणारे असंतुष्ट लोक मराठशाहींत नेहमींच होते. त्यांस आतां विठ्ठल सुंदरानें हाताशीं धरिलें. भोसल्यांचा दिवाण देवाजीपंत चोरघोडे याचाही मिलाफ त्या वेळच्या या शहाणे मंडळींत होता. प्रत्येक असंतुष्ट इसमाचा हेतु जरी भिन्न होता, तरी चार दोन वजनदार सरदार तात्पुरते एकत्र झाल्याबरोबर ते पेशव्यांस भारी वाटूं लागले. पेशव्यांची सत्ता काढून घ्यावी, जानोजी भोसल्यास सातारचे गादीवर बसवावें, आणि अष्ट प्रधानांचीं पदें नवीन लायक इसमास देऊन मराठशाहीची सर्वच घटना नवीन करावी, असा बेत या मंडळीच्या चौलण्यांत तरी घाटत होता. परंतु पेशव्याचे ताब्यांतला पुष्कळसा मुलूख आपण उपटावा, ही मुळांत प्रत्येकाची भावना होती. भोसले व मोगल यांजमध्यें एक नवीन तह झाला, त्यास 'साठचाळिशीचा' तह म्हणतात. जितका मुलूख किंवा पैसा उभयतांकडून संपादन केला जाईल, त्याचा शेंकडा साठ हिस्सा निजामानें व चाळीस हिस्सा भोसल्यानें घेणें, अशी वांटणी व्हावी. याचप्रमाणें दुसरे सरदार कटांत सामील झाले होते, त्यांचीही अशीच संभावना कागदावर करण्यांत आली. ज्या कोणत्या आमिषानें मराठ्यांत फूट पाडून आपला जमाव भारी होईल, तें दाखविण्यास निजामानें कमी केलें नाहीं. येणेंकरून पुष्कळसे मराठे सरदार निजामाकडे गेले.

या उलाढालींच्या बातम्या पेशव्यास मिरजेवरच येत होत्या. लगेच माधवरावानें मोठ्या चतुराईनें सर्वांवर छाप बसवून घरांत एकी केली. अनुभवी कौटिल्य सखारामबापू यास युक्तीनें वळवून, त्यानें चुलत्याचें मनोधारण करून प्रसंगास तोंड देण्याची तयारी चालविली. या आणी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाणीच्या प्रसंगानें या वेळीं पक्षभेद व व्यक्तिभेद तात्पुरते मिटले. राष्ट्राचें स्वातंत्र्य व अब्रू टिकविण्याचा प्रयत्न अनेकांनीं सुरू केला. निजामाची फौज संख्येनें मोठी असून तोफखाना व पायदळ यांची तयारी जोरांत होती, त्यामुळें त्यांसमोर लढून निभाव लागणें कठीण असें दिसून आल्यावरून, त्यांजबरोबर गनिमी काव्यानें युद्धप्रसंग करावा, निजामाचे व भोसल्याचे राज्यांत शिरून धुमाकूळ उडवावा, असा विचार ठरवून पेशवे उभयतां मिरजेहून नगराकडे वळले. माधवराव ता. २१-२-१७६३ रोजीं मातुश्रीस लिहितो, 'येथील वर्तमान, जानोजी भोसले आदिकरून मोगलांस मिळाले. गमाजी बावांनीं मोगलांजवळ प्रतिज्ञा केली, कीं आपल्यास साताऱ्यास घेऊन जातों. एका प्रहरांत किल्ला व राजा हस्तगत करून देतों. या खेरीज वीस लाख रुपये मिळवून देतों. मग राजगृहींचीं पदें आपले चित्तास येईल त्याप्रमाणें वांटून द्यावीं. याप्रमाणें भाषण करून मोगलांस या रोखें घेऊन येतात. पुढें चोहों कोसांच्या अंतरानें वीस हजार फौजेनिशीं जानोजी भोसले, त्यांचे मागें दहा हजार फौजेनिशीं विठ्ठल सुंदरचा विनायकदास, त्या मागें ती चहूं कोशांवर निजामली, अशी तर्तूद करून येतात. त्यांची फौज तोफखाना भारी जागून, मोगलांस पायबंद द्यावा, त्याचे मुलखांत लढाई पाडावी, औरंगाबाद वगैरे मुलखाची जप्ती करावी, या उद्देशें नगरचे रोखें चालिलों. फौज पन्नास हजार पावेतों आहे. मल्हारबास बोलावूं पाठविलें, लवकरच येतील. सड्या फौजा चालून येतील तेव्हां झुंज करावें हा निश्चय आहे. जानोजी व मोगल यांचा साठ-चाळिशीचा तह झाला. कर्जही नबाबांनीं काढिलें तरी त्यापैकीं चाळीस भोसल्यास द्यावें. याप्रमाणें दारमदार झाला आहे'.

गोविंदपंत पटवर्धन मिरज सोडून मंगळवेढ्यास गेला, तेथें ता. २७ फेब्रुवारी १७६३ रोजीं गोपाळरावाची व त्याची भेट झाली. त्या दिवशीं निजाम पंढरपुरास होता. गमाजी सांगोल्यास असून पेशव्यांचें लष्कर सुप्यास होतें. तेथून पेशवे औरंगाबादेकडे निजामाचे मुलखांत शिरणार होते. ता. ७-३-६३ रोजीं ते औरंगाबादेस पोंचले. 'वऱ्हाडांत जाण्याचा रोख आहे. विघाडाचें वर्तमान आलें. रामचंद्र जाधव मागें रहिमतपुरावर होता, त्याच्या तोफा लांब मजलीमुळें चालत ना. मागें त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धामधूम बहुत मांडिली. गांवरोखे व खंडणी घेतली. रहिमतपुरापासून आठ हजार रुपये घेतले. फलटणास मुधोजी नाईकाजवळून दहा हजार घेतले, बरकड गांव पाहोन हजार दोन हजार घेतच आला. मल्हारवास आणावयास गेले आहेत. आनंदीबाईस त्रिंबकेश्वरास पोंचविलें. लष्करांत येणार नाहींत. गोपाळराव, तुम्ही जातीनें बहुत खबरदार असावें. सखाराम-बापू वगैरे येथून तेथून लबाडी करावयास चुकणार नाहींत. त्याचा अंतर्यामीं तुम्हांवर बहुत क्रोध आहे. रविवारीं प्रातःकाळीं तमाम फौजा औरंगाबाद घ्यावयास गेल्या. बाहेरील पुरे तमाम लुटले. शहरच्या कोटास चार तोफा लागू केल्या, परंतु त्यांणीं हल्ला मारून काढिली. आंतून वकील येऊन दोन लक्ष रुपये घ्यावे ऐसा करार जाहला. श्री० माधवराव दौलताबाद पाहून आले'. याप्रमाणें सर्वांस चुचकारून व हजार संकटांस तोंड देऊन माधवराव एक एक कारभार मुखत्यारीनें उलगडूं लागला.

प्रतिनिधिपदाच्या घालमेलीनें बंदुकीच्या दारूंत मूळ ठिणगी पडून जो हा भडका झाला, त्याचा आधार दादाचा अल्पवयी पुत्र भास्करराव मार्च १७६३ च्या सुमारास मरण पावला, त्यामुळें दादाचा सर्वच घाट कोसळला. 'लगेच गमाजी बाबानें सांगोलें, आटपाडी, म्हसवड वगैरे ठिकाणांतून नारोशंकराचा अंमल उठवून ठाणीं परत घेतलीं. प्रतिनिधीचे किल्लेही त्यानें परत घेतले. विघाडामुळें तमाम मुलूख गडबडला. श्रीमंत तरी लुटालुटी करीतच गेले, श्रीमंत युद्धाची गांठ पडों देत नाहींत. लष्करांत फितवा, मोगलांकडील वृत्त मातुश्रींचें पत्रीं लिहिलें आहे तें मातुश्री काकूबाईस म्हणजे पार्वतीबाईस वाचून दाखवावें. रामचंद्र जाधव यांनीं पूर्वीं (घोडनदीवरील) लढाईत चाकरीस चुकविलें. त्याजवर पंढरपुर लुटलें तो अन्याय माफ केला. मिरजेवर एकदां रुसले होते. सरंजाम देऊन समजावीस काढिली. कोपळ किल्ला देवविला. सेनापतीचीं वस्त्रें राजांकडून देवविलीं. सर्वही आडभीड चालवीत असतां फितव्यांत होतेच. मोगलांकडे सूत्रें चालविलींच होतीं. दगाही करावा हें फार दिवस मनांत होतें. मिरजेहून फौज पुढें आली तेव्हां आपण मागेंच राहिले. तमाम गांव लुटीत व खंडण्या घेत आले. एक दोन खूनही केले. इतकेंही असून औरंगाबादच्या मुक्कामीं अडले. समागमें येईनात. दादासाहेबांवर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मारेकरी घातले. बाहेर जातांना शेतखान्याजवळ गांठिलें. थोडासा दंगा-घर काकर निघाला. खैर जाली. हें कृत्य जाधवरावाशिवाय दुसऱ्याचें नव्हे. असे दुष्कर्मी, सोबतीस बाळगून समयीं दगा करावयास चुकणार नाहींत असें जाणून, धरून दौलताबादेस खासा रामचंद्रराव त्याचा धाकट दत्तक लेक श्रीपतराव असे पाठविले. बेड्या घालून ठेविलें. गोठही वेढला. त्याजकडील फौज बुणगें होतें तें गफलतीनें लुटलें गेलें. मल्हारबाची व आमची गांठ पडल्यावर मनसुबा होईल तो लिहून पाठवूं. मोगल फौजा पैठणचे सुमारें येऊन पोंचल्या असतील. (१२ मार्च १७६३)'. 'सखाराम-पंत मल्हारबाकडे गेले. त्यांची यांची चित्तशुद्धि नव्हती. मागाहून श्री० माधवरावही गेले. नवा सरंजाम दहा लक्षांचा देण्याचा करार ठरावांत आला आहे. मल्हारबाचे हातून भोसले वगैरेंचें समाधान करून मग नबाबाशीं प्रसंग करावा. कारभार बापूनींच करावा ऐसें मानस आहे. नबाबाकडे जितके सरदार गेले आहेत, त्यांचें तूर्त समाधान ज्याचे त्याचे चित्तानुरूप करून विठ्ठल सुंदर यांस फिकें पाडावें. मुरादखान याचींही पत्रें येतात कीं, सर्व प्रकारें माझा अभिमान असावा. मी सेवेस अंतर करणार नाहीं'. उभयपक्षांकडे कसकशीं कारस्थानें चालू होतीं हें यावरून दिसून येईल. मल्हाररावास पुष्कळांनीं भर घालून पेशव्यास मिळण्याबद्दल आग्रह केला. 'मोगलांचें प्राबल्य जाल्यास परिणाम कसा हेंही आपल्यास कळत आहे', असें सुचविलें. ता. २१-३-१७६३ रोजीं माधवराव लिहितो, 'मोगल आमचा पिच्छा करावयाकरितां चिखलठाण येथें आले. तूर्त त्यांसी गांठ घालीत नाहीं. त्यांस आम्हांस चाळीस पन्नास कोसांचें अंतर आहे. आम्ही मल्हारबासमागमें घेऊन मलकापुरापावेतों गेलों. येथें तीन मुक्काम झाले. येथील खंडणी पंचेचाळीस हजार जाहली. मोगल व जानोजी भोसले आज बाळापुरपर्यंत आले असतील. आम्ही औरंगाबाद उजवी टाकून धारूरचे रोखें जाऊं'. याचा अर्थ असा कीं, मार्चअखेर निजाम वऱ्हाडांत पेशव्यांचे पाठीवर गेला, तेव्हां हे परत वळून निजामाच्या राज-धानीवर चालले. ता. १-४-६३ रोजीं त्रिंबकराव पेठे गोविंदपंत पटवर्धनास लिहितो, 'मिरजेचे मुक्कामीं कालकृत प्रतिबंधामुळें भेट न जाहली. तूर्त उगेंच स्वस्थ आहों. ईश्वरें केल्या गोष्टीचा शेवट उसनें पारडें फेडिलें, तर जितके

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आम्ही समदुःखी, तितक्यांचे मनाचे समाधान होईल. श्रीमंत तर बालराजा, ज्येष्ठ तर निर्विकारी, भरंवसा शब्दाचा नाहीं. पुढें परिणाम लागणें कळत आहे. प्रस्तुत बहुतही योग आहे. कारभारी यांचे मतें यवनांशीं सख्य न करावें. महिना पंधरा दिवस यवनांशीं गांठ न घालावी. सदाशिव रामचंद्र पूर्वीच यवनांकडे गेले. दौड देऊन गांठ घालीत नाहींत. हर-लम्हेनें झुकांडया देत फिरावें; आणि वैशाख मास घालवावा, ऐशी मसलत आहे'. ऑगस्टपावेतों मोहीम झाली, त्यांतील पेशव्यांचे मुक्कामांचा तपशील प्रथम लक्षांत ठेविल्यास समजूत चांगली पडेल:—

ता. माहे	ठिकाण	ता. माहे	ठिकाण.	ता. माहे	ठिकाण.
१७-२	मिरज सोडिली.	१०-४	नळदुर्ग.	१५-७	नळदुर्ग.
२८-२	नेवासें.	२३-४	उदगीर.	१९-७	तांदुळवाडी.
७-३	औरंगाबाद	१०-५	मेदक.	२४-७	पानगांव(बार्शी)
१०-३	वेरूळजवळ.	१५-५	हैदराबाद.	३०-७	भूम.
२०-३	मलकापूर.	४-६	निजामकोंडा.	८-८	बिड.
३०-३	मुंगीस परत.	१७-६	चितापूर.	९-८	मादलमोही.
१-४	कडेवळित.	२३-६	कलबुर्गा.	१०-८	राक्षसभुवन लढाई

७. महाराष्ट्रांत धुमाकूळ, पुण्याची लूट व पळ (मे १७६३).— ता. २ एप्रिल रोजीं माधवराव करमाळ्याजवळून मातुश्रीस लिहितो. 'मोगल मजल दरमजल पिच्छा करीत येत आहेत. काल त्यांचा मुक्काम मुंगीवर होता. झुंजाचा दम बराच आहे. मराठेसुद्धां मोगल चाळीस हजार आहे. आपली फौज तीस पसतीस हजारपर्यंत आहे. त्यांनीं गांठ घातल्यास चांगली लढाई होईल. ते पुण्याकडे फौज पाठविणार म्हणून बातमी आली आहे. याजकरितां आपण सावध राहून किल्ल्यावर जाण्याचें करावें, म्हणजे शंभर संशय लोकांचे जातील. तेथें लोक अनेक संशय वडिलांस कळवितात, त्यास असा प्रकार किमपि नाहीं'. ता. ४ एप्रिलचें पत्र, 'ती० मातुश्रीबाई वडिलांचे सेवेशीं, अपत्यें रघुनाथाचे साष्टांग नमस्कार विनंति. मुक्काम परांडे

१. खरे ले. ९९, १५८, १७५, १८३-१८५, १९३, १९६, २०४ व पुढचे, २१६, २१७; चं. ५३, तह व करारमदार पृष्ठ २९२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथें वडिलांचे कृपेंकरून सुखरूप असों, विशेष. बहुत दिवस वडिलांकडून पत्र येत नाहीं येणेंकरून अपूर्व वाटतें. चिरंजीव माधवराव व नारायणराव यांजवर वडिलांची कृपा आहे तशी आम्हांवर नाहीं असें दिसतें. पूर्वी तर घडील हमेश कृपा करीत आले. अलीकडे पत्र येत नाहीं ह्यावरून विलक्षण वाटतें. आम्हीही बहुत दिवस वाट पाहिली, परंतु सविस्तर पत्र न आलें, यास्तव कृपा करून सर्वदा तोषवीत गेलें पाहिजे. इकडील वर्तमान तर जानोजी भोसले व आम्हाकडील चार निमकहराम मोगलांस मिळाले. येणेंकरून मोगलानें शेखी करून आम्हांवर निकर्षच आरंभिला. परंतु ईश्वर सानुकूल आहे. दोन महिन्यांनीं यांचें पुरतें पारिपत्य होईल. सांप्रत त्यांची कांहीं फौज पुणें, जुन्नर, सातारा, नाशिक, या प्रांतें येऊन जप्त्या करणार, यास्तव वडिलीं सावध असावें. आजकाल आपण किल्ल्यावर जावें. नाहीं तर दंगा झाल्यास सर्व दौलतेस अपाय आहे. हवेल्यांचे सुखासाठीं खालीं न राहवें. चार दिवस तसदी सोसावी. संकट पडेल तेव्हां आम्ही लिहितों तें आढळेल. यास्तव बहुत सावध असावें. निदानीं पार्वतीबाई, रमाबाई व सगुणाबाई वगैरे बायका व नारायणराव असे तरी सिंहगडावर पाठवावे. मी लिहितों यास्तव वडिलीं रागास न यावें. मी लेकरूं आहें. हा काल संकटाचा. ग्रहण व षड्ग्रही आली आहे; आणीकही दोन चार योग क्रूरच आहेत, यास्तव पुण्याचे भरंवशावर राहूं नये. दगा झाला तर फजितीस तोड नाहीं. गोपाळ गोविंद वगैरे कोणी मोगलांचे लष्करांतून लिहतील त्याजवर जाऊं नये. ते लबाड आहेत. आम्हांस सुचतें तें लिहिलें. आपण वडील आहेत. विचारास येईल तें करावें'. परंतु किल्ल्यावर गेल्यास तेथें हे आपणांस कैद करून ठेवितील अशा समजुतीनें बाईनें बरेच दिवस पुणें सोडिलें नाहीं. रघुनाथरावाचे बोलण्यांत बोलणें नाहीं, आणि कारभारी सखारामबापू दीर्घद्वेषी, सबब त्यांचा भरंवसा बाईनें कधीं धरिला नाहीं. आरंभीं तरी माधवरावापेक्षां तिलाच त्यांचे कावे जास्त कळत, हें पुढील हकीकतीवरून उघड आहे. लबाडीची खात्री झाल्याशिवाय एखाद्याविषयीं आपला ग्रह माधवराव वाईट बनवीत नसे. पुण्याचे बंदोबस्तास नारो आप्पाजी तुळशीबागवाले हा हुशार कारभारी गोपिकाबाईशीं निष्ठा धरणारा होता, त्याला सुद्धां माधवरावानें मातुश्रीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विनंति करून नारायणरावासह सिंहगडावर जाण्यास विलंब न करावा, असें लिहिलें. बाईचा खासगी कारकून रामचंद्र नारायण गोरे यासही त्यानें तेंच लिहिलें. तेव्हां ती ता. २२-४-१७६३ रोजीं नारायणरावाचे लग्नासाठीं सिंहगडावर गेली. 'कोणत्या स्थलीं जाऊन विश्राम पावावा ऐसें स्थल नाहीं. जिकडे तिकडे धामधूम. श्रीमंतांचे फौजेस हंमेशा धावणीचा परिपाठ. नबाबाची फौज दुप्पट, नामी नामी सरदार, पण धावणीचा दंडक नाहीं, म्हणून थकले'. अशा रीतीनें या वेळीं सर्व देशांत मोठी खळबळ उडून गेली होती. कोणाचा पायपोस कोणाचे पायांस नव्हता. निजामाचे हातून मराठ्यांचा पाठलाग होईना व ते तर हैदराबादेवर चालून गेले, तेव्हां त्याचा बचपा काढण्यासाठीं विठ्ठल सुंदर व त्याचे नवीन स्नेही यांनीं पेशव्यांचे पुण्यावर चाल केली, त्याबरोबर लढणारे व न लढणारे या सर्वांचीं मनें महाराष्ट्रांत अत्यंत चिंताक्रांत झालीं. आपण कोणत्या पक्षाच्या तर्फेनें वागावें, याची जाणिवच पुष्कळांना राहिली नाहीं. सर्व ठिकाणच्या बातम्या काढण्याविषयीं लोक आतुर झाले. याची साक्ष पटवर्धनांचे पत्रव्यवहारावरून पटते. नानालऱ्हेच्या बातम्यांचीं व गडबडींचीं पत्रें पटवर्धन दप्तरांतील पाहतां त्या वेळच्या धामधुमीची कल्पना करितां येते. सर्व पटवर्धन मंडळी दोन दगडींवर हात ठेवून होती. मनांतून ओढा गोपाळरावाचा सुद्धां पेशव्याकडेच होता. परंतु सर्व व्यवस्था नीट लावून घेतल्याशिवाय पुनः पेशव्यांचे बाजूस येणें, त्यांच्या जिवावर आलें. बाबूराव फडणीस वगैरे असेच कोणी तरी येऊन आपली समजूत काढतील अशी वाट पाहून ते होते. पेशव्यांचे विरुद्ध मुख्य खटपट प्रतिनिधीची होती. जानोजी भोसल्यास श्रीनिवास गंगाधर ऊर्फ भवानराव यानें ता. ११-४-१७६३ रोजीं करार लिहून दिला त्यांतील मतलब. ऐ.टि.१-३२ 'श्री छत्रपतीला रा० पंतप्रधानांनीं तेरा वर्षें अमर्याद होऊन सेवेची रीत टाकून नजरबंद ठेविलें. श्रीकृपेनें फलादेशही त्यांस जाहला. त्यावरी रघुनाथपंतांनीं गमाजीबावांस क्रिया शपथ देऊन स्वामींस किल्ल्याखालीं उतरविलें, आणि पहिल्या योगाप्रमाणें वर्तणूक करूं लागले. किंबहुना विशेष केलें व पदाच्याही घालमेली केल्या. याबद्दल छत्रपतींनीं आम्हांस आज्ञा केली कीं, तुम्ही गमाजीबावास पाठवून नबाबास फिरविणें. तुम्हांसही सामील होऊन येण्याची आज्ञा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली. तुम्हीं पंचवीस हजार फौजेनिशीं येतांच नबाबही मागें फिरले. याउपर राज्यास अनिष्ट चिंतिणार यांचें पारपत्य यथास्थित करून कृपेस सत्पात्र झालां. पुढें राज्य स्वस्थ चालावें, याकरितां तुम्हांस सरंजाम द्यावयाचा करार केला'. या करारांत आठ कलमें आहेत. त्यांत पूर्वीच्या व नवीन सरंजामाचा उल्लेख असून सिंहगड, पुरंदर, लोहगड व परळी हे किल्ले द्यावे असा ठराव जाहला. 'येणेंप्रमाणें करार करून तुम्हांस महत्कार्यास आणिलें. तुम्हींही आलां. तुम्ही आम्हांसी अणुमात्र वंचना न करावी. उभयतांनीं एकविचारें राहवें. वंचना करील तो रघूजीबाबांच्या वंशींचा नव्हे'. असा हा करार झाला खरा. परंतु कागदावरील आणाशपथांनीं राज्यांचे व्यवहार तडीस जाते तर राज्य करणें किती तरी सुलभ झालें असतें. आंतबाहेरचीं हजारों तंत्रें सांभाळून भिन्न प्रकृतींच्या व्यक्तींना एका सूत्रांत वागविण्याची धमक व चतुराई अंगीं पाहिजे. तशी धमक प्रतिनिधि, जानोजी भोसले किंवा छत्रपति यांचे अंगीं नव्हती, म्हणून वरचा घाट सर्व बिनसला हें पुढें व्यक्त होईलच.

ता. ९ एप्रिल रोजीं माधवराव लिहितो, 'नबाब मुंगीच्या तळाकरून माघारे गेले. नाशिक पुण्याकडे जाणार; तमाम मुलखाची जप्ती करणार. सातान्यास जाऊन राजा काढावयाचा, असें वर्तमान आहे. गमाजींनीं जाऊन ठीक केलें आहे, आम्ही भागानगर प्रांतीं जात आहों. खंडणी व घासदाणा घेतों. गोपाळराव पटवर्धन नबाबाचे तर्फेनें पुण्याकडे गेला. सखारामपंताचा मनोदय कीं पुणें एक वेळ भस्म करावें, म्हणजे कोंकणस्थ लोकांचा थारा मोडेल. ते बोलले होते कीं विठ्ठल सुंदराची शागिर्दी करीन. परंतु आपले मनोरथ सिद्धीस नेईन'. गोविंदपंत पटवर्धन आणखी लिहितो, कीं, 'श्रीमंतांस कांहीं समजत नाहीं. देशास यावें, गड किल्ल्यांचे आसरे धरून मोगलांचें कहीकवाड मारावें, झुंज करावें, मोगल देशांत शिरूं देऊं नये, गोळ्यांचा मारा चुकवून जवळ मुक्काम करावा, श्रीमंतांचें धर्मराज्य रक्षण करावें, हें श्रेयस्कर. युक्तीनें राजेबहादरांस बोध करून पाहावें. हें कर्म थोरले गेले त्यांचे. नबाबाच्या धमकाच. सातान्यापावेतों जाणें होणार नाहीं. खर्चाखालीं येतील, फसतील'. वास्तविक गोपाळरावास निजामानें कांहीं एक मदत केली नाहीं. 'नबाबाचे माणूस म्हणून अंगीकार मात्र केला,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण नाहीं दौलत दिली अगर खर्चास दिलें. साहित्यही केलें नाहीं. तो आपल्या मनसब्यानें वर्ततो. दुसऱ्याचे खातरेस येत नाहीं'. ता. २६ एप्रिल रोजीं पेशव्यांचा मुक्काम यादगिरीवर होता. 'बाबूजी नाईक व बाळूराव हरि शिरढोण प्रांतें आले आहेत. होळकर व नारो शंकर हे एकीकडे पाठविले आहेत. तीन दळांनीं मुल्ख मोडितात. लुटण्यांत ताल राहिला कांहीं एक राहिला नाहीं. मोंगलानेंही तीन भाग केले. विनायकदासास नाशकाकडे रवाना केलें. स्वतः नवाब नगरावरच राहिला आहे. जानोजी भोसले व गमाजी फौजेसह पुण्याकडे गेले. विनायकदास नाशिकत्र्यंबक-कडून लुटीत पुणें प्रांतीं आला. जुन्नर वगैरे तमाम उरकलें. चिंचवडच्या देवांनीं पंधरा हजार खंडणी दिली. यवनांचें पत्र पुण्याचे कारभारी यांस आलें होतें, कीं खंडणी दिली तर पुणें राहील, नाहीं तर जाळून टाकूं. त्यावर गोपिकाबाईनें उत्तर पाठविलें कीं, 'तुमचे वैरी तिकडेच गेले आहेत. त्यांकडे काय असेल तें पाहून घेणें, आम्हांस खंडणी द्यावयास गांठ पडत नाहीं. पुण्याचें काय करणार तें सुखरूप करणें'. याप्रमाणें उत्तरें गेलीं. आतां पुणें ठिकाणीं लागतें एक दोन दिवसांवर आलें आहे. पुण्यापासून तोरण्या-पर्यंत रयत पळाली. बोरघाटाकडेही तसेंच. लोहगड, विसापूर यांखालील रयत लुटून नेली. यवनानें पृथ्वीप्रलय मांडला आहे'. यापूर्वींच २२ एप्रिल रोजीं नारायणरावाचें लग्न सिंहगडास त्रिंबकरावमामानें लाविलें, त्या-साठीं मातुश्री व माणसें गेलीं तीं गडावरच राहिलीं. यवनाचें लष्कर घोडनदीवर १ मे रोजीं आलें. साताऱ्याच्या रोखें जाणार. जुन्नरप्रांत मारिला, विनायकदास यांनीं कांहीं बाकी ठेविली नाहीं. ता. ५ मे रोजीं पेशव्यानें भागानगराहून त्या बाजूस लूट केल्याचें मातुश्रीस लिहिलें. गोविंद हरि लिहितो, 'दादासाहेबांची क्षणभंगुर बुद्धि. बोलण्याचा विश्वास काय? सखाराम बोलतो तें होतें. त्यांचे स्वाधीन काय? वडील श्रीमंत विदेही. अर्भक अज्ञान. मातुल (रास्ते) मूर्ख. मातुश्री त्यांचे स्वाधीन. सर्वांनीं राज्य क्षयास नेलें. आतां रत्नाकर आळवीत बसलीं (म्हणजे रडत बसलीं). नारो शंकर जेजुरीस आले'.

प्रत्यक्ष पुण्यावर येऊन बेतली तेव्हां गोपाळरावाकडे पुष्कळांच्या शिफारसी जाऊं लागल्या. गोविंद शिवराम खासगीवाले, नारो आपाजी, दिनकर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महादेव इत्यादि मंडळींनीं निजामास खंडणी देण्याचा निश्चय करून शहरचा बचाव करण्याविषयीं गोपाळरावास लिहिलें. 'पुण्या अलीकडील दहा पांच गांवचीं घरें वांचलीं होतीं तीं काल जळालीं. आज पुण्यांत उपद्रव झाला. तोफखान्यांत माणसें जाऊन खणून सांपडेल तें घेऊन गेले. रुपये कबूल करून शेवटीं गांवची अब्रू राहिली नाहीं. पर्वतीच्या सर्व मूर्ति फोडल्या. जुन्नर, पुणें, लोहगड, सिंहगड, पुरंदर, राजमाची इतक्यांवर सेनासमुद्र लोटला. महिना अवग्र लुटतात, जाळतात. आतां तरी उठोन जाण्याविषयीं लिहावें. सिंहगडची, माची सरकारचा जामदारखाना, भोसल्याकडील रघूजी करांड्यानें लुटून नेला. माणूस बेजाव मारिलें. चार हजारांचा लोट एकदांच आला. पुण्यांत लूट होतच आहे. एक देव लहान मोठा राहिला नाहीं. सरकारचा वाडा मात्र बचावला. धर्मशाळा सर्व जाळल्या. भोंवत्या फौजा उतरून लुटून फस्त केलें. जाळणें, पोळणें तों सीमाच नाहीं. आपण गोपाळरावाचा भरंवसा मानून लिहिलें, म्हणून आम्ही ढिलाईनें राहिलों. सर्वनाश झाला. तुमचा तरी उपाय काय ? लोहगडचे माचीस पुण्याचे लोक वित्तविषय घेऊन राहिले होते; त्यांस देखील लुटोन फस्त केलें. नाना फडणीस वगैरे एक वस्त्रानिशीं गडावर गेले. विठ्ठल सुंदर तोफांसहित सासवडच्या रोखें येऊन राहिले आहेत. पुरंदरपासून शिरवळपर्यंत गमाजींनीं लुटून सतत्रऋषीस गेले. गोरगरिबें फार बुडालीं. गोपाळरावानें आपली शिकस्त केली, पण उपयोग झाला नाहीं. औंशाकडे विठ्ठल सुंदराचे गांव होते ते पेशव्यांनीं जाळिले, म्हणून सखारामबापूचें गांव सासवडनजीकचें विठ्ठल सुंदरानें जाळिलें. हिवरें येथील वाडे व घरें जाळून अग्नि संतुष्ट केला. मोगलांचे मनांत नीरथडी व भिवरेच्या मध्यें आठ पंधरा दिवस करमावें असें आहे. गमाजीबावांनीं शिरवळ रोहिडयापावेतों मुलूख लुटला. पुण्यांत श्रीमंतांच्या हवेलीखेरीज बाकी कांहीं राहिलें नाहीं. देशांत घोर अनर्थ झाला. कित्येक स्त्रियांच्या इज्जती घेतल्या. अतिशय गलबल झाली आहे'. ता. ८ मे रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो. 'बेदराकडून भागानगर सुम्यांत आला. पांच सात लक्ष रुपये मिळाले, आणिकही महिना पंधरा रोजांत दहावीस लक्ष मिळतील. रामचंद्र गणेश, बाबूराव हरि डावे उजवे बाजूस खंडण्या घेत आहेत. याप्रमाणें मोगलांचा प्रांत बेचिराख केला. केदारजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व महादजी शिंदे यांस वऱ्हाडांत व नागपुरावर येण्याविषयीं पत्रें गेलीं तेही येतील. श्रीकृपेनें यवनांचें पारिपत्य यथास्थित होईल'. पुण्याचे कारभारी नारो आप्पाजी वगैरे जाऊन विठ्ठल सुंदरास भेटले. गोपाळरावानें मध्यस्थी करून तह बसवून दिला. पुढें पावसाळा नजीक आल्यानें नगरापासून साताऱ्या-पावेतों मोगल छावण्या करून राहिला तर पुढें भक्षावयास काय, ही पंचाईत लोकांस उत्पन्न झाली. 'सखारामाचे मतें सर्व श्रीमंतांचें राज्य लयास न्यावें, दौलत बुडवावी, तदनुसार तो करितो. धणी सावध होईनात त्यास उपाय काय? साताऱ्याकडे जाऊन कर्तव्य काय? किल्ला दादांकडे, रामाजीबाबांच्या हातीं कांहीं नाहीं'. रा० स्वामीस किल्ल्यावर नेऊन ठेवणें, आणि तुम्हीं निघोन पुण्यास येणें, अशी ताकीद ता. ३-५-१७६३ रोजीं माधवरावानें महिपतराव पुरंदऱ्यास पाठविली. म्हणजे छत्रपतींस नुकतेच खालीं आणून स्वतंत्रता देण्यांत आली होती, पण आतां हा बंडावा झाल्या-बरोबर त्यांस पुनः किल्ल्यावर नेऊन पेशव्यानें बंदोबस्तांत ठेविलें.

ता. २९ मे रोजीं सखारामपंतानें स्वारींतून गोपिकाबाईस लिहिलें, 'उभयतां श्रीमंत भागानगर प्रांतीं आहेत. मोगलानें तिकडे विध्वंस केला. यास्तव यांनींही त्याप्रमाणेंच अंमलांत आणिलें. यंदांचा कलह झाला असा प्रकार झाला नव्हता. जें होणार तें कदापि सुटत नाहीं. येथें मल्हारबा आदि लहान मोठे एकदील आहेत. दसालतजंग यास सामील करावयाचा विचार आहे. एक वेळ मोगलांचे दांत भग्न करावे असें सर्वांस वाटत आहे. त्याही मध्यें ईश्वरी सत्ता. आमचेविषयीं बहुतांनीं आपल्या चित्तांत संशय आणिले होते, ऐशास आम्हीं एकनिष्ठेनें सेवा केली. अलीकडे हा प्रकार झाला. या उपरी जे गोष्टींत उचित, दौलतेस उपयोगी, तेच वर्तणूक करीत आहों'. असेंच ५ जून रोजीं रघुनाथराव लिहितो. 'भागानगराहून दरकूच कृष्णातीरास आलों. याउपर येथून निजामलीवर चालोन गांठ घालतों. यवनानें पुण्यास उपद्रव केला हें ऐकून बहुत क्रोध वाटला आहे. तो उपद्रव करणार नाहीं असें वाटून आम्ही भागानगर न जाळिलें. त्यानें देवळें जाळिलीं हें ऐकून विषाद वाटला. आतां परमेश्वराचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्मरण करून लढाई उत्तम करितों'. निजाम फौजेसह घोडनदीवर येऊन उतरला होता, तो २५ मे रोजीं निघून भिवरथडीनें आपले राज्यांत गेला.[१]

८. राक्षसभुवनावर निजामाचा संहार, विठ्ठल सुंदर ठार (ता. १०-८-१७६३).—ज्या निजामाशीं गळ्यांत गळा घालून दादानें चार महिन्यांपूर्वीं सख्य केलें, त्याला नाहींसा करण्याचा विलक्षण आवेश आतां त्याच्या ठिकाणीं संचरला होता. तो गोपिकाबाईस लिहितो, 'यवनाशीं सख्य करावयासीं लिहिलें, तरी हे गोष्ट कदापि व्हावयाची नाहीं. दबून सल्ला केला तरी तो वरसास बोकांडीं बसेल. यास्तव लवाडी फिरोन न करी असें शासन केलें पाहिजे. नाचण्यावऱ्यांची भाकर खाऊं, पण मोगलांस दमास आणूं. घराची व पुण्याची आशा सोडावी. आम्हांस कांहीं दौलत न लगे. या मुलासाठीं इतकें करितों. ईश्वरदयेनें चिरंजीवाची फत्तेच होईल. मला जें शहाणपण, मेहेनत, शिपाइगिरी आहे तितकें खर्च करितों. तजविजीनें व मनसुब्यानें प्रयत्नास चुकत नाहीं. करणार ईश्वर आहे'. महाराष्ट्राचा व खुद्द पुण्याचा बचाव करण्याचें सोडून दादानें शत्रुप्रदेशांत धुमाकूळ उडविला, हें ठीक दिसत नाहीं. परंतु माधवरावास या वेळीं स्वतःचा आग्रह चालवितां आला नाहीं. गनिमी काव्याचे अग्रगण्य दादा, होळकर, बापू वगैरेंनीं या वेळीं युद्धोपक्रम ठरविला; त्यांत माधवरावाचें अंग नव्हतें. इतउत्तर मोहिमा ठरविण्यांत सुद्धां माधवरावानें स्वतःचें बुद्धिकौशल्य कसें चालविलें, हें पुढें दिसून येईल.

---

१. **आधार**—चं. १४५, ७७; का. सं. प. या. १७८, १७९, १८१; खरे ले. २२०, २२४, २२५, २२६, २२९, २५१, २५५, २६१, २६२, २६९, २८८ व टीप, २९३, २९७. पुण्याची जाळपोळ शके १६८५ ज्येष्ठ शुद्ध ११स झाली (भा. व. श. पृष्ठ ४७), त्या दिवशीं ता. २३ मे आहे. शके १६८५ त अधिक मास आषाढ असून मोडकांचे जंत्रींत अधिक ज्येष्ठ चुकीनें दाखल झाला आहे. याच जंत्रीवरून रा० खरे वगैरेंनीं कागदांच्या तारखा ठरविल्यामुळें ज्येष्ठ व आषाढ या दोन मासच्या तारखांत चुका झाल्या आहेत. रा० खरे यांच्या दुसऱ्या भागांतील पहिल्या ३० कागदांच्या तारखा दुरुस्त केल्याशिवाय संदर्भ जुळणार नाहीं. त्यांनाही ही अडचण भासत होती. पहा, पृष्ठ ४९३ व ४९६ टीप.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निजाम महाराष्ट्रांतून परत फिरून बेदरास छावणी करावी कीं औरंगाबादेस, या विचारांत होता. मोगलांशीं युद्ध करण्याची वेळ अजून आली नाहीं, असें होळकर, गायकवाड, सखारामबापू वगैरेंनीं रघुनाथरावास परोपरी सांगितलें, पण क्रोध संचार झालेल्या दादास तें बिलकूल आवडलें नाहीं. तो म्हणाला, 'सर्वांचीं ज्ञानें, हिंमत, मर्दानपणा, मजला ठाऊक आहेत. पानपतावर भाऊस टाकून आलेत. अशी निर्भर्त्सना दमाजीची व अजापालकाची (होळकराची) केली. तेव्हां तमाम सरदार उठोन गेले. सखारामबापूसही बहुत गालिप्रदानें केलीं. 'तूं द्रव्यवान् सबळ, मला पळावयाची मसलत देत आलास, सरदारही त्वां अनुकूळ करून घेतले. माझा निश्चय परिच्छिन्न झुंजावें, मरावें अथवा जय मिळवावा. अपेश घेऊन वांचणें नाहीं. कारभारी यांस मुरदाड केलें. सरदार खट्टे झाले. शागीर्द देव्याशीं बसोन खलबत केलें तेव्हां त्यानेंही परिच्छिन्न झुंजावें हेच हिंमत दिली. शेवटीं कारभारी यांनीं ह्या शागीर्दाचें आर्जव करून त्याजकडून मनसबा फिरविला. त्यानें यजमानास ताळ्यावर आणिलें'.

माधवराव इतरांचें हृद्गत ओळखून योग्यायोग्य पाहून दादांचें मन आळवून आपली छाप धिमेपणानें सर्वांवर बसवीत होता. वास्तविक राज्यकारभाराचें उत्कृष्ट शिक्षण माधवरावास मिळालें तें या एका वर्षांतलें आहे. सन १७६२ च्या ऑगस्टांत रघुनाथराव रुसून गेला, त्यापुढील ६३ च्या ऑगस्टांत राक्षसभुवनावर निजामाचा पाडाव झाला, या अवधींत आप्त, शत्रु, मित्र, आपले व परपक्षाचे कारभारी, भिन्न व्यक्ति व भिन्न प्रसंग यशापयशाचे, जाळपोळीचे वगैरे, इतके कांहीं त्याच्या निदर्शनास आले, कीं राज्य कसें हांकावें याची जणूं उत्कृष्ट शिकवणच त्यास या वेळीं प्राप्त झाली. युद्धकलेच्या नानाविध अंगांचें सप्रयोग शिक्षणही याच वर्षांत त्यास प्राप्त झालें. भिन्न स्वभावाच्या व्यक्तींना हाताखालीं नांदवून त्यांजकडून काम घेणें, ही मुख्य गोष्ट माधवराव अनुभवानें शिकला; आणि लोकांचाही विश्वास त्याजवर बसल्यानें ते त्याच्या आज्ञा उठविण्यास तयार झाले. रघुनाथरावाचा लढण्याचा आवेश त्यानें मोडून काढिला नाहीं. मात्र तो सिद्धीस जाण्यास मोगलांकडे मिळालेले सरदार परत आणणें जरूर होतें. तें काम त्यानें आतां सुरू केलें. मोगलांशीं तहाच्या वाटाघाटी चालल्या होत्या,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पण त्याचा पाडाव झाल्याशिवाय तहास जोर नाहीं, हें ओळखून माधवरावानेंही लढण्याचा निश्चय केला. वास्तविक भर पावसाळ्यांत मराठ्यांनीं लढण्याचें काम क्वचितच केलेलें आहे. दादाचा विचार तर एकदम जाऊन मध्येंच मोगलांशीं गांठ घालण्याचा होता. पण सर्व गोष्टी सिद्ध होईपर्यंत माधवरावानें शत्रूंस तोंड दिलें नाहीं; आणि कांहीं एक वार्ता नसतां श्रावण शुद्ध १ च्या दिवशीं अचानक शत्रूस गांठून त्याचा फन्ना उडविला. माधवरावाचें कर्तृत्व सिद्ध होण्याच्या या दृष्टीनें आतां पुढील प्रसंग ध्यानांत आणावयाचे असून, या वर्षांतील एकंदर बनावांचें इतकें विस्तृत वर्णन देण्याचें प्रयोजनही तेंच आहे.

गोविंद हरि आवेशाच्या भरांत सखारामबापूवर एकसारखा उगाच चरफडतो. 'देशस्थ व कोंकणस्थ' हा तंटाही गोविंद हरीच्या त्या लिहिण्यांतच प्रखर दिसतो. वस्तुतः दोनही बाजूंस दोनही जातींचे ब्राह्मण होते. आतां पुढें पावसाळा, फौजेची सिद्धता नाहीं, एव्हांशीं लढाईचा प्रसंग आणूं नये, असें गोविंद हरी सर्वांस शिकवीत होता. निदान गोपाळरावाची मनधरणी करून व त्याच्या सर्व अटी भागवून आपल्या पक्षांत त्यास परत आणल्याशिवाय, पेशव्यांनीं मोगलांशीं गांठ घालूं नये, अशी गोविंद हरीची इच्छा होती. पण अशा रीतीनें गोपाळरावास फाजील महत्त्व दिल्यास पुढें त्याचेच तंत्रानें आपणांस वागावें लागेल, ही कारभारांतील गोम माधवरावानें ओळखून, गोपाळराव, भोसले वगैरेंस नुसतें तडजोडीच्या नादीं लावून निजामापासून अलग केलें; आणि पुढें त्याचा पराभव झाल्यावर गोपाळरावादि मंडळीस खुबीनें शरण येण्यास भाग पाडिलें. गोपाळरावास मिळवून घेतल्याशिवाय लढाई करूं नये, असा गोपिकाबाईचाही आग्रह होता. परंतु त्याचीं जितकीं आर्जवें करावीं तितका त्याचा बाप ओढून धरूं लागला. अद्यापि सखारामबापूच सर्वांस फसवितो असें पटवर्धनांचे मनानें घेतलें होतें. परंतु सखारामासही खेळविणारा धनी तयार होत आहे, याची जाणीव त्यांस नव्हती. इकडे गोपाळरावानें आंतून पेशव्यांशीं पत्रव्यवहार सुरू केल्यामुळें निजामाला वाटलें हा फितूर आहे. मिळून गोपाळरावाची तूर्त दोहींकडे पत गेली. घोडनदीच्या युद्धानंतर चुलतेपुतण्यांस सर्व इसम रुजूं झाले, तरी गोपाळराव फुटून राहिल्यामुळें पटवर्धनांची पांच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पंचवीस लाखांची नुकसानी झाली. मिरज वगैरे स्थळें हातचीं जाऊन कुटुंब देशोधडीस लागलें, आणि मोगलांचा आश्रय केल्याबद्दल गोपिकाबाईचा त्याजवर रोष झाला. धन्याचें राज्य व राजधानी यांचा विध्वंस करण्याकरितां गोपाळराव मोगलांस घेऊन येतो, असा तिचा समज झालेला पाहून गोपाळरावानें सर्व खुलाशाचें पत्र गोपिकाबाईस लिहिलें. नारायणरावाचें लग्न ठरलेलें असून तें पुण्यास करावें असा बाईचा विचार होता, परंतु गोपाळरावानें बाईस सूचना पाठविली, कीं मोगल पुण्यावर येतो, तेथें तुम्ही राहिल्यास तो कदाचित् तुम्हांस कैद करील, तर एकदम निघून सर्वांनीं किल्ल्यावर जावें. बाईचा समज कीं लग्न उरकेपर्यंत गोपाळरावानें मोगलांस पुण्यावर येऊं देऊं नये. मोगल गोपाळरावाच्याच सल्ल्यानें वागतो ही बाईची समजूत खोटी होती. प्रस्तुतच्या धामधुमीचा दोष आपल्याकडे बिलकूल नाहीं वगैरे मजकूर गोपाळरावानें तिला लिहून कळविला. 'आजपावेतों कायावाचामनें आपल्या राज्याचें अकल्याण इच्छिलें नाहीं. आमचे गुणाचे ग्राहक असते तर मोगलाईत देखील यावयाचें प्रयोजन नव्हतें. आम्ही तुम्हांकरितां सर्वस्वास बुडालों, हें चित्तांत किमपि न आणितां आमचेठायीं दोषारोप ठेविले, यामुळं अतोभ्रष्ट ततोभ्रष्ट कालमहिमाच तसा, त्यास आपला काय इलाज'! शहाणपणाची परीक्षा कठिण प्रसंगांतच होते.

ता. १६ जून रोजीं माधवराव लिहितो. 'आम्ही मोगलांशीं सख्य तों करीतच नाहीं. मोगल गंगेअलीकडे असला तर झुंजच होईल. शहरास गेला तर छावणीचा डौल पडेल. मोगल नगरच्या आग्नेयीस बीडजवळ धारुरास आला म्हणून वर्तमान आहे. गोपाळरावाशीं गोविंद शिवरामाच्या मार्फतीनें राजकारण केलें आहे. पहिला सरंजाम आहे तो करार करावा. आम्हांबरोबर मोगलांशीं झुंजू लागले म्हणजे मिरजही देऊं'. जुलई ३ रोजीं बसालतजंगाची व पेशव्याची भेट कलबुर्गा येथें झाली. भावांस सोडून त्यानें पेशव्यास मिळण्याचा ठराव केला. जानोजी भोसल्यास तीस लक्षांचा मुलूख व असीरगड किल्ला देण्याचा करार करून ता. १६-७ रोजीं पेशव्यानें आपला वकील रामाजी बल्लाळ गुणे समजुतीस पाठविला. चुलतेपुतण्यांच्या भांडणाचा फायदा घेऊन निजामाचा विठ्ठल सुंदर व जानोजी भोसल्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिवाकरपंत चोरघोडे यांनीं प्रथम मतलबापुरता सखारामबापूस वळवून, पुढें पेशव्यांसच सर्वथैव उखडून काढण्याचा कठिण प्रसंग आणिला; आणि गमाजी, यमाजी, प्रतिनिधि, गोपाळराव, निजाम, भोसले हे सर्व एक होऊन महाराष्ट्राची दुर्दशा करूं लागले. याप्रमाणें सर्वच डाव अंगावर आलेला पाहून सखारामबापूची त्रेधा उडाली. पैशाच्या लोभानें शत्रुपक्षाशीं विरुद्ध कारस्थानें करून हा राष्ट्रद्रोह करितो, अशी दादाची सुद्धां खात्री होऊन त्यानें त्याची खूपच निर्भर्त्सना केली. तेव्हां मग बापू गयांवयां करून बिघडलेल्या डावाचें निरसन करूं लागला. याप्रमाणें सर्वांचा उद्योग एकदिलानें जून महिनाभर चालतांच, डाव पुनः निजामाचे अंगावर उलटला. छावणीसाठीं महाराष्ट्रांत राहण्याची त्यास छाती झाली नाहीं; आणि स्वतःच्या मुलखांतही पेशव्यांच्या फौजा अंगावर असल्यामुळें, सामना केल्याशिवाय परिणाम नाहीं हें त्याच्या लक्षांत आलें. पेशवे लढाई करीत नाहींत किंवा सल्लूखही करीत नाहींत, याची उमज निजामास पडेना. जुलई महिन्यांत दोघेही बलवान् शत्रु दहावीस कोशांच्या अंतरानें दोन मदोन्मत्त हत्तींप्रमाणें एकमेकांशीं टक्कर देण्याच्या विचारांत होते. पुण्याकडून निजाम छावणीसाठीं बेदर गांठावें म्हणून भीमाकांठानें कूच करून औसाधारूरपर्यंत गेल्यावर, पेशवे आपणास अडविणार असें पाहून, तो परत औरंगाबादेकडे चालूं लागला. त्याचा तोफखाना जालीम असल्यामुळें एकदम त्याजशीं गांठ घालणें पेशव्यांस जड वाटलें. गोदावरीवर येतांच तिचा अपरंपार पूर पाहून निजाम चपापला; आणि मराठ्यांचे तोंडावर मागें तोफखाना ठेवून आपण इकडे होड्या जमवून हलके हलके शहागडजवळ नदी उतरण्याच्या उद्योगास तो लागला. प्रथम बचावापुरत्या थोड्या तोफा, स्वतः आपण, जनानखाना, बुणगे वगैरे थोडथोडे पलीकडे गेले; आणि मुख्य फौज विठ्ठल सुंदरच्या हाताखालीं अलीकडच्या कांठावर राक्षसभुवननजीक थोंडराई येथें राहिली. तेथून सुमारें पंधरा मैल पूर्वेस मांदलमोही येथें पेशव्यांचा मुक्काम असतां, निजामाच्या पांगलेल्या फौजेची इत्थंभूत बातमी आषाढ वद्य अमावास्येस पेशव्यांस मिळाली, त्याबरोबर ही सोन्यासारखी संधि साधण्याच्या इराद्यानें, त्यांनीं विश्रांति न घेतां रातोरात निघून विठ्ठल सुंदरास, मागून वर्तुलाकृति मराठे व समोर भरलेली नदी,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अशा अडचणींत, बेसावध व अचानक गांठलें. एक दिवस अवकाश विठ्ठल सुंदरास मिळाला असता तर तो बचावून पलीकडे गेला असता.

सखारामबापूनें आपलें बुद्धिकौशल्य निजामास हलका करण्याकडे चालू करून, देवाजीपंतास कळूं न देतां, प्रथम जानोजी भोसल्यास त्याचे पुरोहिताचे द्वारें संधान लावून फोडिलें. गुप्त बोलाचाली होऊन जुलई महिन्यांत उभय पक्षांचें थोड्या अंतरानें कूच होत असतां हा घाट रचला गेला. अर्थात् एवढें कारस्थान न फिसकटविलें तर मग आपली अक्कल ती काय, असें देवाजीपंतास वाटून त्यानें पुनः जानोजीस भ्रमांत पाडिलें. जानोजीस त्यानें असा बोध केला कीं, 'निजामास घेऊन खानदेशांत छावणीस जावें. आजपर्यंत पेशव्यांनीं राज्यकारभार केला, आतां त्यांस निर्दाळून आपणच दौलत करावी. त्यांचे घरांत सर्व प्रकारें बखेडा. द्रव्य नाहीं. लोकांचे दंगे. आतां ते लयास जावया फार दिवस लागत नाहींत. याउपर प्रस्तुत तुम्हीं पेशव्यांकडे जावयाचें न करणें. इतकेंही होऊन गेलां तर रामचंद्र जाधवाप्रमाणें तुम्हांस अडकवून ठेवितील. मातबर ओझें ईश्वर देतो तें घेणें'. या उपदेशाचा परिणाम इतकाच झाला कीं, पंधरा दिवस लढाई लांबली. यजमान भोळसर मिळाले म्हणून साडेतीन शहाण्यांची अक्कल चालली. देवाजीपंताचा घाट पेशव्यांनीं मोडून काढून भोसल्यास अलग केल्याबरोबर त्यांनीं निजामाच्या फौजेस राक्षसभुवनावर गांठलें. मात्र निजामाचा पाडाव होईपर्यंत जानोजी प्रत्यक्ष पेशव्यांचे भेटीस आला नाहीं. हे सर्व व्यूह प्रतिव्यूह ना. भो. का. ३५ वगैरे तत्कालीन कागदांत उत्तम प्रकारें व्यक्त होतात. खरे ले. ३२० साडेतीन शहाण्यांच्या कसबाची साक्ष देतो.

'मोगलांशीं झुंजावें, हा श्रीमंतांचा निश्चय आहे. यश देता ईश्वर आहे. तमाम सरदारांस बोलावून मनधरणी करितात'. (ता. ९ जुलई) रोजीं पेशवा नलदुर्ग येथून मातुश्रीस लिहितो, 'लढाईविषयीं तीर्थरूपांचा आग्रह बहुत होता. परंतु मल्हारबा आदिकरून येऊन विनंति केली, कीं 'प्रस्तुत घोड्यांत जीव नाहीं. महागाईमुळें माणसेंही खराबींत आलीं. या दिवसांत लढाई करूं नये'. याप्रमाणें गोष्ट ठरून उदईक कूच होऊन तुळजापुरचे रोखें येऊं. मोगल येथून दहा कोस औशाअलीकडे आहे. लढाई करावी हें पहिलें होतें तेव्हां न झालें. प्रस्तुत पैशाचाही पेंच व दाणाही अगदीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. भोसल्याकडील रामाजी बल्लाळ करार मदार होऊन गेले'. पुनः ता. ३०-७ रोजीं तो लिहितो. 'पिराजी नाईक निंबाळकर मोगलांची रजा घेऊन आले. सुभेदारांमार्फत त्यांच्या आमच्या भेटी झाल्या. चार दिवस घरास जाऊन सरंजामसुद्धां येण्याचा मनोदय आहे. गोपाळराव, मोरो बाबूराव व नरसिंगराव धायगुडे मोगलांकडून उठून मंगळवेढ्यास पोंचले. त्यांस आणावयास गोविंद शिवराम जातील. सदाशिव रामचंद्राचा प्रकार यावें असाच आहे. भोसल्यांची यादी करार होऊन गेली, पण यावयाचा अनमान आहे. दोनही डगरींवर हात आहे. प्रस्तुत नगरच्या समीप येऊन मोगलांच्या कर्तव्याप्रमाणें करावें लागेल'. त्यानंतर ५ ऑगस्टचें पत्र. 'नगराकडे जाण्याचा प्रकार राहून बीडच्या सुमारें आलों. कारण हेंच कीं बीडची खंडणी घ्यावी, आणि मोगल शहागडाजवळ गंगा उतरणार, आम्ही या सुमारें आल्यावर तो गंगा उतरतो कीं आम्हांकडे येतो पाहवें. गंगेस पाणी बहुत, यास्तव तो नांवांवरून उतरत आहे. त्या संधीमध्यें गांठावें हाही प्रकार आहे. त्याची फौज बहुतच हलकी झाली. भोसले आहेत त्यांचाही इतबार त्यास येत नाहीं. महादजी सिंदे उज्जनीवर आले. त्यांनीं लिहिलें कीं, आज्ञेप्रमाणें येऊन वऱ्हाडचें पुरतें पारिपत्य करितों. नारो शंकर गोपाळरावास आणण्यासाठीं गेला होता, तो त्यास घेऊन श्रीमंतांचे भेटीस मंगळवेढ्याहून निघाला, त्याच दिवशीं श्रावण शुद्ध १ म्हणजे ता. १० ऑगस्ट रोजीं राक्षसभुवनची लढाई झाली. लढाईचे आदले दिवशीं माधवराव माजलगांव म्हणजे मादलमोहीचे घांटावरून लिहितो, 'मोगलांचा मुक्काम राक्षसभुवनावरी आहे. थोडा तोफखाना वगैरे गंगापार उतरला. त्याच वेळीं भोसले, प्रतिनिधि वगैरे सरदार निजामास सोडून पूर्वेस १०।१२ कोसांवर जाऊन अलग राहिले. गंगापार झाल्यावर त्यांची आपणांस गरज नाहीं असें निजामासही वाटलें असावें. त्यास आम्हांस आठ कोसांची तफावत आहे. जानोजी भोसले येथील अनुसंधानानें मोगलांचा निरोप घेऊन गंगेच्या अलीकडील तीरानें ता. ९ रोजीं बारा चौदा कोस खालीं गेले. उदईक प्रातःकाळीं कूच होऊन आम्ही मोगलांचे मोहल्यावर जाणार. महाराव जानोजी निंबाळकर यांस आषाढ वद्य १२ शनिवारीं (ता. ६-८-१७६३) देवाज्ञा झाली. स्त्री सती गेली. पुत्र दाजी यांस वरें वाटत नव्हतें, तेही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बीड येथें देवाज्ञा पावले. गंगेस पाणी फार आहे. त्यांची आमची गांठ दोन चार दिवसांत होईल. बसालतजंगास राजकारण राखून निरोप दिला. गोपाळरावानें आपलें समाधान झाल्याचें पत्र गोपिकाबाईस लिहिलें कीं, अविंधांचे लष्करांतून श्रीमंतांनीं कृपा करून बोलाविलें. उपरांतिक नारो शंकरास आम्हांकडे पाठविलें. श्रीमंतांचीं कृपेचीं उत्तरें आलीं. त्यावरून आज (१० ऑगस्ट) स्वार होऊन श्रीमंतांकडे गेलों. सदैव कृपापत्रीं सांभाळित असावें'. याप्रमाणें गोपाळराव श्रीमंतांचे भेटीस जाणार होता त्याच दिवशीं श्रावण शुद्ध १ ता. १०-८-१७६३ रोजीं मराठ्यांनीं राक्षस-भुवनावर निजामाचे फौजेस अकल्पित गांठून तिचा फन्ना उडविला.[1] या लढाईच्या वर्णनाचे अनेक कागद आहेत आणि प्रत्यक्ष माधवरावाचीं पत्रेंही मुबलक आहेत. त्या सर्वांतून वेंचे घेऊन खालील हकीकत देण्यांत येत आहे. लढाई संपल्याबरोबरचें माधवरावाचें पत्रः—

'श्रावण शुद्ध १ बुधवार दोन प्रहर दिवस, मुक्काम धोंडराई, परगणे बीड येथें सुखरूप. मोगलांची बातमी राखून सर्व सरदार फुटलेले पाहून आजच प्रातःकाळीं मुकाबल्यास फौज तयार करून गेलों. निजाम गंगापार होते. वरकड कुल सरदार अलीकडे होते. त्यांचें आमचें झुंज झालें. फार निकडीचें हत्यार झालें. त्यांचा मोड झाला, आमची फत्ते जाहली. विठ्ठल

---

१. राक्षसभुवन, धोंडराई किंवा तांदुळजा यांपैकीं कोणत्या तरी नांवानें ही लढाई ओळखितात. ही सर्व मोहीम व विशेषतः लढाईचें ठिकाण लष्करी दृष्टीनें भूगोलावर बारकाईनें ध्यानांत आणणें जरूर आहे. धारूरच्या नैर्ऋत्येस बीड. बीडच्या उत्तरेस सिंधफणा नदी उतरल्यावर उत्तरेस गेवराई व पूर्वेस माजलगांव. त्यास लागून पुढें गोदावरी नदी पूर्ववाहिनी आहे. गेवराई, धोंडराई, तांदुळजा व राक्षसभुवन हे गांव जवळ जवळ असून, मुख्य लढाई धोंडराई येथें झाली. त्याच्यासमोर गोदावरीचा उतार पलीकडे शहागडावर जाण्याचा आहे. पत्रांतील मादलमोही हेंच हल्लींचें माजलगांव, राक्षसभुवनचे पूर्वेस १५ मैल. शहागडचे पश्चिमेस नदीपलीकडे पैठण बारा कोस. शहागडावरून औरंगाबाद ४० मैल उत्तरेस. शहागडास कृष्णराव वकील यांचें प्राचीन ऐतिहासिक घराणें हल्लीं नांदत आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुंदर यांचें डोचकें कापून आणिलें. त्यांचे पुतणे विनायकदास व खंदारचा राजा गोपाळसिंग ठार झाले. मुरादखान वगैरे सोळा सरदार पाडाव सांपडले. गंगेनें नवाबाची मोठी कुमक केली. चार सहा घटका लढाई मातबर झाली. त्यांची निम्मी फौज सातआठ हजार व चारपांच हजार गाडदी इतकी अलीकडे होती. मोठें यश आलें. निजामली दहशत पावून गंगा उतरूं लागला, हें वर्तमान जानोजीनें दादास कळविलें आणि सांगितलें, जलदी येऊन पोंचावें. त्याप्रमाणें हल्ला होतांच एकटा नवाब पलीकडे होता तो कायम राहून तोफांची व बाणांची मारगिरी करील असें वाटत होतें; परंतु लढाईचें वर्तमान कळतांच जनानखाना पुढें पाठवून आपण अर्धरात्रीं बुणगे व डेरे टाकून औरंगाबादेस गेला. पंधरा हत्ती व पंचवीस तोफा व गोळे दारू डेरे दांडे राहिले ते व घोडीं, उंट, बैल वगैरे लूट बहुत आली. पूर्वी तीन लढाया झाल्या; परंतु अशा प्रकारची जरब कधींच बसली नव्हती. विठ्ठलपंतासारखा हतवारी मर्द मोगलांस मिळणें नाहीं. इस्मायलखान, शहाजी सुपेकर व सदाशिव रामचंद्र शत्रुपक्षास मिळालेले वांचून गेले. पांचसात हजार माणूस रणास आलें'. पेशव्यांकडील ठार व जखमी झाले त्यांची यादी व त्यांचा परामर्ष हे तपशील मा. रो. १-३४३ येथें आहेत. हरएक संकटांतून निजामअलीस तारणारा त्याचा कर्तृत्ववान् पाठीराखा विठ्ठल सुंदर लढाईत मेल्यानें निजामलीची बाजू सर्वथैव खचली. पुनः पेशव्यांशीं झगडण्याचें सामर्थ्य त्यास खड्र्याचे लढाईपावेतों आलें नाहीं. 'त्यावरून कारस्थानें लढावीं अशीं ब्राह्मणांनींच', असा समज पेशवाईत बळकट असून तो साडेतीन शहाण्यांच्या चरित्रांत दृग्गोचर होतो.

भोसले वगैरे सरदारांस होळकराचे विद्यमानें अलग करून पेशव्यानें लढाई केली. बाबूराव हरि, सखाराम हरि, महिपतराव चिटणीस यांनीं शिपाइगिरी बहुत केली. त्यांस जखमा लागल्या, त्यावरून वाढविलें. बहुतेक लढणें पेशव्याच्या हुजरातीनें केलें. आबा पुरंदरे, माधवराव पानसे, विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, बाबूजी नाईक वगैरे बरेचसे ब्राह्मण सरदार, तसेंच होळकर, दमाजी व महादजी गायकवाड, महादजी शितोळे वगैरे अनेक मराठे सरदार, यांनीं एकजुटीनें चांगलें काम केलें. महादजी निंबाळकर वगैरे कित्येक मराठ्यांचे सरदार ठार झाले. हरिपंत भिडे याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हात तुटला. लढाई होत असतां एकदम आभाळ भरून येऊन पर्जन्य पडला. फौजेंत अंधार झाला. विठ्ठल सुंदराचें शिर कापून आणिलेलें भाल्यावर घेऊन मिरविण्यांत आलें. सर्वत्र आनंदीआनंद जाला. अशा रीतीनें निजामाचा सूड घेतल्याबद्दल महाराष्ट्रास केवढी धन्यता वाटली असेल आणि तरुण पेशव्याच्या कर्तृत्वाची केवढी साक्ष त्या वेळीं लोकांस पटली असेल याची कल्पनाच केली पाहिजे.

९. **लढाईचें ऐतिहासिक महत्त्व, माधवरावाची कर्तबगारी.**—युद्धाची भरंवसेलायक हकीकत मुख्य वर दिली आहे. याशिवाय दप्तरवजा पुष्कळ वर्तमानें व आख्यायिका आहेत. त्यांतील खराखोटा प्रकार निवडणें शक्य नाहीं. दोन दिवस लढाई चालली असें ग्रँड डफ लिहितो तें खरें नाहीं. अमावास्येच्या सायंकाळीं निजामाच्या पांगलेल्या स्थितीची बिनचूक बातमी येतांच, उत्तररात्रीस मादलमोहीवरून कूच करून आठ कोस जमीन चालून येऊन धोंडराई येथें मराठ्यांनीं विठ्ठल सुंदररावर एकदम झडप घातली. सकाळीं प्रहरभर युद्ध होऊन दोनप्रहरींच माधवरावानें मातुश्रीस पत्र लिहिलें, यावरून चार दोन तासांत निकाल लागला हें सिद्ध आहे. रघुनाथरावाचा हत्ती विठ्ठल सुंदर घेऊन चालला असतां माधवरावानें कैदेंतून बाहेर जाऊन चुलत्यास सोडविलें ही आख्यायिका खरी नसावी. मात्र महादजी शितोळ्यानें विठ्ठल सुंदराची अंबारी मारून आणिल्याबद्दल त्यास मांजरी गांव इनाम देण्यांत आला हें खरें आहे.

लढाईनंतर लगेच मोगलांचे पाठोपाठ जाऊन त्यांचें पूर्ण पारिपत्य करण्याचा विचार होता, परंतु मोगलानें नांवा सर्व फोडून बुडवून टाकिल्या, आणि गंगेस पूर अपरंपार, म्हणून पाठलाग होऊं शकला नाहीं. 'आमच्या फौजांस पगार पोंचला नाहीं. घरेंदारें लुटलीं, जाळलीं. पावसाळ्यांत लोकांची घरोघर निघून जाण्याची नेहमींचीच संवय. मोठ्या शिकस्तीनें हा वेळपावेतों राहविले. फौजा नदीपलीकडे एकवार गेल्यावर पुढें युद्ध किती दिवस लांबेल कोणी सांगावें ! याकरितां बहुतेक लोक देशीं निघून गेले. नाहीं तर पेशव्यानें निजामास साफच बुडविला असता'. लढाईनंतर वीस दिवसपर्यंत पेशव्याचा मुक्काम पैठणच्या समोर राक्षसभुवनजवळच होता. या दरम्यान तहाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलाचाली सुरू झाली. नदीचें पाणी उतरल्यावर ता. १-९-१७६३ रोजीं गंगापार होऊन पेशव्याच्या फौजा औरंगाबादच्या शहास गेल्या. त्या वेळीं विठ्ठल शिवदेवानें औरंगाबादेसमोर निजामाशीं निकराचा सामना केला. निजामाचा हत्ती फिरवून आणण्याचे प्रयत्नांत विठ्ठल शिवदेवाचे दोन हजार लोक मारले गेले. निजामाचेही पांच हजार लोक पडून तो स्वतः जीव बचावून शहरांत पोंचला. या पाठलागांत इतर सरदार एकदिलानें सामील झाले नाहींतसें दिसतें. पुनः कदाचित् दादाबापूंचे डाव आड आले असावे.

लढाईचे पूर्वीच सखारामबापू भोसल्यास आणण्यासाठीं गेला होता. त्यानें भोसल्यास आणून ता. १३ ऑगस्ट रोजीं पेशव्यांकडे भेटविलें. नंतर उभयतांचें एकदिल होऊन तंटा मिटला. गोपाळराव पटवर्धनही ता. २० ऑगस्ट रोजीं पेशव्यास भेटून समाधान पावून पुढील उद्योगांत सामील झाला. त्याच्या हातून जो काय अपराध घडला असेल, त्याची सातसवाई भरपाई इतउत्तर जिवापाड राष्ट्रकार्य करून त्यानें धन्यास पोंचविली. पुढील आठ वर्षांत तो माधवरावाचा केवळ उजवा हात बनला.

तहाची बोली लागली त्यासंबंधानें ता.२-९-१७६३ रोजीं पेशवा लिहितो, 'मुरादखान आले आहेत. आमच्या मतलबाप्रमाणें करीत असल्यास उत्तमच आहे. नाहीं तर बिघाड आहेच. उदईक कूच करून शहरावर जाऊं. भोसलेही काल कूच करून अघाडीवर तीन कोस उतरले. नबाब आज-उद्यां बाहेर निघतील. आब गेला आहे. सलूख करावयास चाहतात. सत्वरच त्यांशीं गांठ घालूं'. पेशव्याचे तर्फेनें होळकराचा दिवाण गंगाधर यशवंत चंद्रचूड बाटाघाटींत असून, तो थोडेंबहुत मोगलांचें हित पाहत होता. कारस्थानें लढविण्यांत साडेतीन शहाण्यांहून तो कांहीं कमी नव्हता. म्हणून एव्हांपासूनच तो माधवरावाचे मनांतून उतरला. धारूर, खंदार, अंतूर, नलदुर्ग व औसा हे पांच किल्ले व पंचाऐशीं लक्षांचा मुलूख पेशव्यांस निजामानें द्यावा अशी मागणी होती. 'इकडील व तिकडील कारभारी रंग भरवून, विवेक करूं देत नाहींत'. पुष्कळ भवति न भवति होऊन शेवटीं उदगिरच्या ठरावाप्रमाणें साठ लक्षांचा मुलूख व त्याशिवाय नवीन बावीस लक्षांचा, मिळून ब्यायशीं लक्षांवर तह कायम झाला. नवीन किल्ले वगैरे पेशव्यांस कांहीं मिळाले नाहींत. फक्त नलदुर्ग पेशव्यांनीं वाटेल तसा घ्यावा असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ठरून ता. २५-९-१७६३ रोजीं तह कायम झाला. मुलखापैकीं बावीस लक्षांची जहागीर खुद्द माधवरावानें स्वतःची म्हणून ठेवून बाकीचा निरनिराळ्या सरदारांकडे वांटण्यांत आला. पेशव्याच्या वाटणींत औरंगाबाद व त्यासभोंवारचे महाल यांचा समावेश होता. म्हणजे पर्यायानें पेशव्यांचा मुलूख पुणें, नगर, पैठण, औरंगाबादवरून वऱ्हाड नागपूरपर्यंत सलंग होऊन, त्यामुळेंच पुढें भोसले व पेशवे यांचा तंटा उपस्थित झाला. पेशवे व निजाम यांनीं एकमेकांच्या शत्रूंवरील मोहिमांत एकमेकांस साह्य करावें असाही वरील तहांत करार होता. त्याप्रमाणें पुढें हैदरावरील मोहिमांत निजाम पेशव्याचे मदतीस आला; आणि भोसल्यांशीं निजामाचें वांकडें आलें, तेव्हां पेशव्यानें निजामास साह्य करून भोसल्यास नरम केलें हे प्रकार पुढें दिसून येतील. निजाम पेशव्यांचा हा पैठणचा तह बत्तीस वर्षें म्हणजे खड्यांचे लढाईपावेतों चालला. ही माधवरावाची कर्तबगारी.

आश्विन पूर्णिमेपावेतों पेशव्याचा मुक्काम पैठणचे बाजूस गंगेपलीकडे होता. दसऱ्याचे सुमारास महादजी सिंदे येऊन भेटले. टोकें येथें भेट झाली. सिंद्याजवळ फौज चांगली तयार असल्यामुळें माधवरावास जोर आला, राज्याचे खर्च भागण्यासाठीं सर्व सरदारांपासून चौथाई जहागिरी सरकारांत घेण्याचा पेशव्यानें ठराव केला; आणि तो लागलाच अंमलांत आणिला. मल्हारराव होळकरानें याविषयीं अतोनात आढेवेढे घेतले; पण शेवटीं त्यासही कबूल करणें भाग पडलें. 'पेशवे गंगेवरून कूच करून मजल दरमजल पुण्यास येतात. होळकर निरोप घेऊन गेले, महादजी सिंदेही लवकरच श्रीगोंद्यास जातील. नारो शंकर, मुरादखान वगैरे गेले. दशलक्षांची जहागीर परत देऊन नबाबाचें समाधान रक्षावें, असें दादांचें मत होतें, पण ती गोष्ट सध्यां राहिली. नबाब आपले जनानखान्यांत आहेत. सलाबतजंगास मारून निश्चित बसले. तमाम लोकांस श्रीमंतांनीं निरोप दिले'. महादजी शिंद्याचा विशेष परिचय व परीक्षा याच प्रसंगीं पेशव्यानें केली. उभयतांचा स्नेह चांगला जडला.

राक्षसभुवनची लढाई माधवरावाच्या स्वतंत्र कर्तबगारीचा आरंभ होय. सन १८६२ च्या नोव्हेंबरांतील घोडनदीवरील युद्धापासून पुढील नऊ महिन्यांत अनेक प्रचंड उलाढाली झाल्या. छत्रपति, नागपुरकर भोसले,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रतिनिधि वगैरे सत्ताधीश उघडपणें पेशव्यांस काढून टाकण्याचा उद्योग करूं लागले. पटवर्धनांची मिरज घेतल्यामुळें, त्या जिव्हाळ्याच्या घराण्याशीं पेशव्यांचा बेबनाव झाला. निजामानें या संधीचा फायदा घेऊन तीन पिढ्यांचा पेशव्यांचा उद्योग धुऊन काढण्याचा योग आणिला. भरंवसा ठेवण्याजोगा एकही पराक्रमी सहाय्यक पेशव्यांकडे राहिला नाहीं. घरांत दुफळी, कारभारी मंडळींत कलह, असे भयंकर पेंच आंत बाहेर या आठनऊ महिन्यांत इतके कांहीं उपस्थित झाले, कीं यांतून निभाव लागणें जवळ जवळ अशक्यच होतें. या सर्व अडचणी नाहींशा करून या अल्पवयी पेशव्यानें चुलत्याचे अटकेंत असतांच ज्या कांहीं योजना केल्या, त्या पाहून आश्चर्य वाटल्याशिवाय राहत नाहीं. राज्याचें तारूं भलतीकडे वहकूं न देतां, माधवरावानें तें स्वतःच्या हिंमतीवर दुसऱ्या कोणास समजूं न देतां, विशिष्ट दिशेनें चालवून राक्षसभुवनावर सुकाणाचा पूर्ण कबजा धारण केला. प्रथम निजामाशीं लढण्याकरितां, स्थळ व वेळ हीं आपल्या सोयीचीं ठरविलीं. मे महिन्यापासून निजामाशीं गांठ घालण्याची रघुनाथरावाची घाई चालली होती, परंतु तसें न करितां भर पावसाळ्यांत गोदावरी भरून चालली असतां, निजामाची फौज पांगलेली पाहून अचानक आठ कोसांवरून एकदम त्याजवर अडचणीच्या जागीं हल्ला चढविला. ज्योतिषांची सल्लाही त्याच काळास त्यानें जुळवून आणिली. दुसरी गोष्ट म्हणजे शक्य तितकी रुष्ट मंडळी दूर ठेवून केवळ स्वतःच्या हिंमतीवर तो लढला. नागपुरकर भोसले, प्रतिनिधि, गोपाळराव पटवर्धन वगैरे मंडळींस निजामापासून अलग मात्र केलें, परंतु पुढें ते शिरजोर होतील म्हणून त्यांच्या प्रत्यक्ष मदतीची अपेक्षा त्यानें ठेविली नाहीं. या मोहिमेंत स्वतःचा प्रदेश शत्रूकडून जाळून घेतला हें गैर होय, पण त्याजबद्दल माधवराव जबाबदार नाहीं. ती चूक चुलत्याची किंवा मल्हारराव होळकराची होती. शत्रूचा प्रदेशही त्यांनीं तसाच जाळिला. परंतु तेवढ्यानें स्वतःच्या नुकसानीचें समर्थन होत नाहीं. मात्र शत्रूशीं कशा प्रकारें लढावें याची जी चर्चा चार दोन महिने चालली, त्यावरून नानाप्रकारच्या उलटसुलट डावपेंचांची वाटाघाट अहोरात्र होऊन, त्यांत माधवरावास विलक्षण तऱ्हेचें लष्करी शिक्षण व अनुभव मिळाला. दुसरी एक अप्रत्यक्ष जोड माधवरावानें या नऊ महिन्यांत अप्रत्यक्षपणें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संपादन केली, तीच त्याच्या पुढील यशस्वी कारभाराची मुख्य खूण आहे. आपल्या कर्तबगारीवर व वचनावर सर्व मंडळींच्या ठिकाणीं त्यानें जबरदस्त विश्वास उत्पन्न केला. रघुनाथरावावर असा विश्वास कोणाचाही नव्हता. तो केव्हां आपला बेत बदलील किंवा दिलेलें वचन मोडील याचा कोणास विश्वास नसे, म्हणून सर्व कारभारी व नोकर सदैव बेदील असत. परंतु माधवरावानें आपली छाप अशी कांहीं ताबडतोब बसविली कीं, ह्याचें वचन अढळ, हा सर्वांचें ऐकेल, पण मनाचें करील, कोणाची भीडमुर्वत धरणार नाहीं. यास आपपर नाहीं, अशी लोकांची खात्री झाली. याचाच उपयोग इतउत्तर माधवरावास फार झाला. सारांश, माधवरावाच्या राज्यकारभाराचा खरा आरंभ या राक्षसभुवनापासून आहे. इतउत्तर तो स्वतंत्रपणें वागूं लागला आणि प्रत्यक्ष चुलत्यानेंही त्याचें कर्तृत्व कबूल केलें. त्याचे अंगीं न्याय, निष्पक्षपात, करडा अंमल वगैरे अनेक गुण असल्याचें आपण सामान्यतः जाणतों. परंतु सेनानायकत्व त्याचे ठिकाणीं अगदीं बाजीरावाच्या तोडीचें किंबहुना वरचढ होतें, हें सहसा कोणास ठाऊक नाहीं. परंतु कागदपत्रांच्या व प्रत्यक्ष करामतीच्या पुराव्यानें ही गोष्ट निःसंशय सिद्ध आहे. इतउत्तराच्या मोहिमांत इतर कारभाराप्रमाणें युद्धकलेंतही माधवरावापुढें दुसरे कोणाची मात्रा चालली नाहीं. हैदरअली, मुरारराव घोरपडे वगैरे कसलेल्या सेनानायकांवर माधवरावानें ताण केली, हें पुढें दिसून येईल. प्रत्यक्ष चुलत्यानेंही त्याबद्दल गोपिकाबाईस खालीलप्रमाणें पत्र लिहिलें. 'ती० मातुश्रीबाईस यांस रघुनाथाचे नमस्कार विनंति विशेष. चिरंजीव रायांनीं यंदा मेहनतींत व शिपाइगिरींत कमी केली नाहीं. आम्हांपेक्षां अधिक जाहले. इतके दिवस त्यांनीं लढाई देखली नव्हती. (ही) पहिली लढाई पाहिली. ह्यांत सर्व प्रकारें तर्तूद अधिक केली. यांचा पुढें कर्तेपणाचा भरंवसा आम्हांस आला. सांप्रत कारभार चिरंजीवच करितात. आमचे मर्जीप्रमाणें वर्ततात. तिलमात्र वांकडे चालत नाहींत. आम्हीही यथाज्ञानें सुचतें तें त्यांस सांगतों. तेच कारभार करितात. माझें शरीर बहुत अशक्त झालें. मेहनतीस कामाचें नाहीं. निजामलीचा मनसबा शेवटास गेल्यावरी कोठें तीर्थी बसून कांहीं ईश्वर भजन करावें इतकेंच मानस आहे. परमेश्वर इच्छा पूर्ण करणार समर्थ आहे. अरतां निजामलीस मारणें सहज आहे, परंतु लोकांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ऐवज पावला नाहीं, यामुळें लोक मन घालीत नाहींत. तथापि जोर करून ईश्वरस्मरण करून काम हरकसें शेवटास नेतच आहों. (१४ ऑगस्ट १७६३)'. 'दादांचें मानस नऊ लाखांची जहागीर व चार किल्ले घेऊन मातुश्रींच्या विद्यमानें बेकिलाक करून निरोप घेऊन स्नान संध्या करावयास त्र्यंबकास जावें, अग्निहोत्र घ्यावें हा मनोदय आहे'. म्हणजे माधवरावाचें तेज प्रगट झाल्याबरोबर दादास वैषम्य वाटूं लागलें, आणि पुढें गृहकलहाच्या नाटकाचा नवीन अंक सुरू झाला. [१]

प्रकरण चौतिसावें

कर्नाटकांत हैदरनायकाशीं युद्ध

[सन १७६४–१७७२]

१. हैदराची पुंडाई व स्वारीचा उपक्रम, (सन १७६०-६३).
२. एक वर्षांतील अनेक जिकरीचे संग्राम, (सन १७६५-६५).
२. तिसरी स्वारी, शिरें व तुंगभद्रादक्षिणतीर काबीज, (सन १७६६-१७६७).
४. चवथी स्वारी, कामगिरी अपूर्ण, (सन १७६९-७०).
५. त्रिंबकराव पेठ्याची स्वारी व तह (सन १७७०-७२).

१. हैदरनाईकाची पुंडाई व स्वारीचा उपक्रम (सन१७६०-६३).— माधवराव पेशव्याचें चित्त उत्तरेपेक्षां दक्षिणच्या कार्यभागाकडे जास्त होतें. सन १७६०-६१त तो बापाबरोबर एकदांच पानपतचे प्रसंगीं

१. आधार–धा. रा. च; ऐ. टि. २·१८, ३·२९; इ. ७०; मा. रो. १: २४३; खं. १०·९, १०, ११; का. सं. प. या. ३३, ४९२ (पृष्ठ ५०९); ना भो. का. ३५; खरे ले. २४९, २८४, ३०८, ३१८, ३२०, ३२१, ३२३, ३२५, ३३२-३६५, ३६७, ३७२, ३७३, ३९४. कच्चा तपशील यांत भरपूर आहे. का. सं. प. या. बिंचुरकर बखर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नर्मदेपलीकडे ग्वाल्हेरपर्यंत गेला असावा. त्यानंतर उत्तर हिंदुस्थानांत एकदांही प्रयाण त्यानें केलें नाहीं. पैशाची प्राप्ति विशेषतः कर्नाटकांतून होत असे, ही गोष्ट बापाचे कारभारापासून माधवरावाचे मनावर ठसलेली असावी. शिवाय गोपिकाबाईचा ओढा पटवर्धन व रास्ते वगैरे ब्राह्मण सरदारांकडे असल्यामुळें, त्यांच्या बोलण्याचें दडपणही माधवरावाचे मनावर विशेष असेल. रघुनाथरावाचा मनोभाव मात्र उत्तरेकडे होता, तसा कर्नाटकांत नव्हता. बापानें केलेला उद्योग हैदरानें उखडून काढिलेला पाहून, प्रथम तोच दुरुस्त करून, काय करामत असेल ती चुलत्यापासून चार हात दूर राहून स्वतंत्रतेनें प्रगट करावी, आणि मग दुसरे कामास हात घालावा, असेंही माधवरावाचें अनुमान व्यक्त होतें. पानिपतावरील संहार डोळ्यांपुढें असल्यामुळें उत्तरेस जाण्यास त्याचें अंतःकरण कचरत असून, त्वरित यश मिळविण्याचें क्षेत्र कर्नाटक होय, असेंही त्यास वाटलें असल्याचा संभव आहे. कसेंही असलें तरी कर्नाटकाचे उद्योगांतच माधवरावास आपली कर्तबगारी राष्ट्राच्या निदर्शनास आणितां आली. यावरून असेंही वाटूं लागतें कीं, कर्नाटकचा कार्यभाग पटवर्धनादि आत्मिक सरदारांकडे सोंपून स्वतः माधवराव उत्तरहिंदुस्थानांत जाता, तर तिकडील सरदारांस राज्याचे मुख्य उद्योगास लावून तो हिंदुस्थानचा भावी इतिहास पुष्कळ अंशीं बदलूं शकला असता. सिंदे, होळकर, नागपुरकर भोसले, खेर वगैरे पराक्रमी सरदार उत्तरेंत अलग अलग वावरत होते. त्यांचें नियंत्रण करण्यास माधवरावाची तिकडे फार जरूर होती. परंतु चुलत्यास ठिकाणीं बसवून स्वतःचें कर्तृत्व सिद्ध करीपर्यंत म्हणजे सन १७६८ अखेरपावेतों माधवरावानें उत्तरेकडे लक्ष न देतां दक्षिणचाच कारभार बहुतेक पुरा केला. सन १७६९त भोसल्यावरची स्वारी झाल्यावर माधवरावास उत्तरेंत जाण्याची चांगली संधि होती; परंतु तीही न स्वीकारितां तो पुनः कर्नाटकांतच गेला असतां लवकरच त्याची प्रकृति कायमची बिघडली.¹

---

१. या प्रकरणास मुख्य व भरपूर आधार रा० खरे यांचे ऐ. ले. सं. भाग १-४ यांचा आहे. त्यांत अस्सल पत्रांशिवाय विवेचनें व अनेक उपयुक्त टीपा आहेत, त्यांचा उपयोग विशिष्ट अभ्यासकांस चांगला होईल. या पुस्तकांत हें प्रकरण संक्षेपानेंच घेतलें आहे.

म. रि...५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माधवरावाच्या कर्नाटकांत एकंदर पांच स्वाऱ्या झाल्या, त्यांपैकीं पहिल्या चारांत तो स्वतः हजर असून, पांचवी त्रिंबकराव पेठ्यानें चालविली. या स्वाऱ्या खालीं लिहिल्याप्रमाणें:—

१ जानेवारी–जून १७६२, विशेष महत्त्वाची नाहीं. धारवाडपासून तुंगभद्रेपावेतों खंडण्या घेऊन पेशवा परत आला.

२ जानेवारी १७६४–जून १७६५, तुंगभद्रेपर्यंत प्रदेश काबीज. सावनूर, धारवाड, रट्टेहळ्ळी, हावेरी, अनवडी येथील प्रचंड संग्राम. अनंतपुरचा तह होऊन परत.

३ नोव्हेंबर १७६६–जून १७६७, तुंगभद्रा दक्षिणतीर,–शिरें, होसकोटें, बाळापुर, वगैरे जुनीं स्वराज्याचीं स्थळें काबीज.

४ नोव्हेंबर १७६९–जून १७७०, नारायणराव व रमाबाई बरोबर स्वारींत. तुंगभद्रा दक्षिणतीर,–भैरवदुर्ग व निजगल येथील निकराचे प्रसंग. पटवर्धनांचें अप्रतिम शौर्य. मुरारराव घोरपड्याचा बचाव.

५ जून १७७०–जून १७७२. त्रिंबकराव पेठ्याची कर्तबगारी; गोपाळराव पटवर्धनाचा मृत्यु; गुर्रमकोंडा, कोलार, मोतीतलाव येथील भयंकर लढाया; श्रीरंगपट्टणचा कायम तह.

पानिपतापूर्वींच कर्नाटकांतील कार्यभाग नानासाहेबानें बहुतेक पुरा करीत आणिला होता. दत्ताजी शिंद्याच्या मृत्यूनें उत्तरेंत मराठ्यांची त्रेधा उडाली, तेव्हां कर्नाटकांतील फौजांस परत आणणें नानासाहेबास भाग पडलें. पुढें पानिपतचें अरिष्ट कोसळतांच मराठ्यांच्या शत्रूंनीं सगळीकडेच उचल घेतली. त्याच संधीस हैदरअलीचा उदय होऊन तो एक नवीन शत्रु मराठ्यांस उत्पन्न झाला. या हैदराचें पूर्वचरित्र व करामत यांचें विस्तृत वर्णन रा० खरे यांनीं दिलेलें मार्मिक असल्यामुळें त्याचा संदर्भ वाचकांस देऊन पुढील वृत्तान्तच येथें सांगणें योग्य आहे. इकडे पानिपतावर मराठ्यांचा संहार व तिकडे हैदराचा उदय हे दोन प्रकार मराठ्यांच्या उद्योगासंबंधानें केवळ योगायोगाचे समजले पाहिजेत. कृष्णेच्या दक्षिणेकडील मराठ्यांचा सर्व अंमल हैदरानें उडवून देण्याची पाळी आणिली होती. निजामाचा भाऊ सलाबतजंग व अदवानीचा नबाब ह्यांस सामील करून घेऊन हैदरानें सन १७६१ च्या जून महिन्यांत शिरें, होसकोटें, बाळापुर वगैरे मराठ्यांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अस्सल स्वराज्याचे प्रांत काबीज केले; आणि तिकडे बंदोबस्तास असलेला 'मुराररराव घोरपडे याजवर चाल केली, तेव्हां घोरपड्याचा मुलूख हैदरनायकाच्या स्वाधीन झाला. पुढें त्याचें पारिपत्य करणार कोणी दिसत नाहीं. कडपेकर व कर्नोळकर यांस धन्यता वाटत आहे. त्या प्रांतीं हैदरास पुसणार कोणी नाहीं त्यामुळें बळावत चालला'. (ता. १० ऑगस्ट १७६१). त्यानें शिऱ्याची नबाबगिरी स्वतःकडे घेतली; आणि रायदुर्ग, हरपनहळ्ळी व चित्रदुर्ग येथील मराठ्यांच्या मांडलिकांस जिंकिलें. पुढें चित्रदुर्गकराच्या मदतीनें सन १७६३ च्या आरंभीं हैदरानें म्हैसूरच्या पश्चिम घाटांत बिदनुरावर स्वारी केली आणि तें राज्य जिंकिलें, त्यामुळे हैदराचा अतिशय उत्कर्ष झाला. बिदनुरास हैदरनगर हें नांव देऊन त्यानें तेथें एक टांकसाळ स्थापन केली, आणि हैदरी व बहादुरी असे होन पाडण्यास सुरुवात केली. बिदनूरचे राज्यांत होनावर बंदर आहे. तेथें गोदी बांधून हैदरानें आरमार तयार करण्यास हुकूम दिला. बिदनूरच्या वायव्येस सोंधें संस्थान आहे, तेंही सन १७६३ च्या डिसेंबरांत त्यानें काबीज केलें. हैदराच्या या एकंदर उद्योगानें पेशव्यांचें दरसाल निदान पन्नास लाख उत्पन्न कमी झालें. कावेरीपासून तुंगभद्रेपर्यंतचें दक्षिण कर्नाटक जिंकून पुढें तुंगभद्रेपासून कृष्णेपर्यंत उत्तर कर्नाटकसुद्धां हा जिंकणार, याचा प्रतिकार पेशव्यांचे हातून होणें शक्य नाहीं, पेशव्यांचा अंमल उठला, अशीच बहुतेक अटकळ सर्वांची झाली.

हैदराचे हे उपद्व्याप पुण्यास पेशव्यास कळत नव्हते असें नाहीं. सन १७६२च्या पहिल्या चार सहा महिन्यांत पेशवा व त्रिंबकराव पेठे यांनीं कर्नाटकांत येऊन धारवाडपासून हरपनहळ्ळीपर्यंत खंडण्या वसूल केल्या. 'मुलूखगिरी थोडक्यांतच बरी केली, परंतु पावसाळा समीप आल्यामुळें व पुण्याकडील पेंच ऐकून स्वारीचें काम अपुरें टाकून त्यास परत यावें लागलें'. पुढें सन १७६३तील राक्षसभुवनच्या प्रसंगापावेतों प्रत्यक्ष पुण्याच्या बचावासाठीं पेशव्यास बाहेरच्या सर्व प्रकरणांकडे कानाडोळाच करावा लागला. सन १७६३च्या अखेरीस पुण्यास माधवरावाचा जम बसतांच पहिलें महत्त्वाचें काम त्यानें कर्नाटकाचेंच हातीं घेतलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इकडे शिऱ्याचे नबाबाचा जांवई मीरफैजुल्ला म्हणून होता, त्यास हैदरानें आपले नोकरींत घेतलें, आणि सन १७६३च्या एप्रिलांत उत्तरेकडे पेशव्यांचे मुलखावर जोरानें चाल केली. प्रथम मीरफैजुल्ला याजबरोबर फौज देऊन त्यास त्यानें सावनूर जिंकण्यास पाठविलें; आणि स्वतः आपण त्याचे मदतीसाठीं सिद्ध होऊन राहिला. सावनूरचा नबाब पेशव्यांचा मांडलिक होता. हैदराची फौज चालून येतांच त्याची तारांबळ उडाली; 'पर्जन्यकाळीं निर्भय जाणून हैदरानें चाल केली. मोठी दहशत पडली. सावनूर घेतलें म्हणजे कृष्णेपावेतों बाकी राहत नाहीं', (ता. १६-७-१७६३). पुढें ऑगस्टांत हैदरानें सावनूर काबीज केलें. जवळच पटवर्धनांचें ठाणें बंकापुर होतें तेंही त्यानें ता. १०-१०-१७६३ रोजीं घेतलें. हुबळी, मिश्रीकोट वगैरे ठिकाणेंही हैदरानें अल्पावकाशांत घेतलीं. 'मीरफैजुल्ला धारवाडास फौज घेऊन आला आहे, कृष्णेपर्यंत स्वराज्य करावें असी हैदरअलीची कस्त आहे. आजपर्यंत पराजय म्हणून कोठेंच झाला नाहीं'. पटवर्धनांचा सरदार मेघश्यामराव त्या बाजूस बंदोबस्तास होता, त्याचा मीरफैजुल्लानें पाडाव केला आणि त्यास पकडून हैदराकडे पाठविलें. ऑक्टोबरांत मीरफैजुल्लानें धारवाड काबीज केलें. 'दोन महिने धारवाड झुंजलें. कुमक न झाली, येणेंकरून जवळ जवळ कृष्णेपर्यंत हैदराचा शह पोंचला'. इकडे घाटाखालील कारवार जिल्हाही त्याचे हातीं लागल्यामुळें गोव्याचे पोर्तुगीझ, वाडीचे सावंत व विजयदुर्गचा पेशव्यांचा सुभेदार यांसही जबरदस्त धास्ती पडली. हे उपद्व्याप समजण्यासाठीं हैदराच्या योग्यतेचें वर्णन रा० खरे यांनीं दिलेलें ध्यानांत ठेविलें पाहिजे. (ऐ. ले. सं. पृष्ठ ७०३–०६).

हैदराचे हे उत्पात माधवरावाच्या दृष्टीआड बिलकूल झाले नाहींत. राक्षसभुवनावर जय मिळवून निजामाची व्यवस्था लावल्याबरोबर, माधवरावानें एक एक प्रकरणाचा उलगडा करून कर्नाटकाचें काम अंगावर घेतलें. स्वतः बाहेर जाण्यापूर्वी पुण्याचा कारभार त्यानें पक्का केला. दादानें फडणिसी चिंतो विठ्ठल यांस दिली होती, ती काढून भाद्रपद वद्य १३ गुरुवार शके १६८५ (ता. ५-१०-१७६३) रोजीं मोरोबादादा व नाना फडणीस यांस दिली. या वेळेपासून पुण्याच्या कारभारावर नाना व स्वारींत माधवरावाचे बरोबर मोरोबा असे कारभार करूं लागले. नारायणराव, रमाबाई,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पार्वतीबाई, वगैरे कुटुंबांतील मंडळींचा परामर्ष, वसुलाची जमा व स्वारींत साहित्याचा पुरवठा, हीं मुख्य कामें नाना फडणीस पुण्यास राहून करी. सन १७६३चे दसऱ्याचे मुहूर्तानें बाहेर पडून माधवराव स्वारीस निघाला. तरी फौजेची व इतर जमवाजमव होण्यास पुष्कळच विलंब लागला. रस्त्यांत प्रथमच कोल्हापुरच्या जिजाबाईचें प्रकरण त्यास मिटवावें लागलें. स्वारींत सुद्धां अशा अनेक भानगडी माधवराव कशा निकालांत आणीत होता, याची कल्पना अस्सल कागद वाचल्याशिवाय येणार नाहीं. स्वारींत कारभारी सखारामबापू यास माधवरावानें मुद्दाम बरोबर घेतलें होतें. सतरा वर्षांपूर्वीं सन १७४७त सदाशिवरावभाऊची स्वारी कर्नाटकांत प्रथम झाली, तेव्हां हाच बरोबर असून त्यास तिकडील व्यवहारांची व व्यक्तींची माहिती चांगली होती. तिचा उपयोग माधवरावानें करून घेतला. जातांना माधवराव ठिकठिकाणीं जरब बसवीत गेला. रस्त्यानें सर्व पुंडावे मोडून सरदार फौजा जमवून खर्चाची व वसुलाची तजवीज करीत चालला. प्रथम जत, विजापुरकडील प्रदेशांत व्यवस्था लावून तो बेळगांवाकडे मनोळीस आला. तेथें मोर्चे लावून चार दिवसांत कृष्णाबाई सिंदे इच्याकडून मनोळी हस्तगत करून त्यानें तें ठिकाण कोल्हापुरच्या जिजाबाईस दिलें. इतकें होण्यास १७६४ चा चैत्रमास आला. चाळीस हजार फौज जमली. पुढील बेत माधवरावानें मातुश्रीस लिहून पाठविले.

२. एक वर्षांतील अनेक जिकिरीचे संग्राम, (एप्रिल १-१७६४—मार्च १७६५).—पुण्याहून निघण्यापूर्वींच माधवरावानें वसई विजयदुर्गाहून, मातबर सरदार रुद्राजी धुळप यास आरमार व पायदळ घेऊन जलमार्गें होनावरास बिदनूरचे शहास पाठविलें होतें. रुद्राजीनें फार चांगलें काम केलें. 'होनावर शहर मारून ठाणीं घेतलीं. आणिकही फौज जलमार्गें येणार', (नोव्हेंबर १७६३). माधवरावाची तडफ व उरक त्यानें मातुश्रीस लिहिलेल्या दरएक पत्रांत व्यक्त होतात. धारवाड, ठाणें हैदराचे कबजांत होतें, तें

१. **आधार**—खरे ले. ४०, ६३–६८, ३१६, ३४३, ३५२, ३९३, ३९४, ४०८, ४११, ४१५, ४१६ आणि पृष्ठें ६५५–७०७ व हैदराची योग्यता, ७०३–७०६; इ. ७२; खंड १४. ५०, ४४, ३१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मागें तसेंच ठेवून माधवराव पुढें हुबळी काबीज करून सावनुरास गेला. ता. ११-४-१७६४ रोजीं तो लिहितो. 'हुबळीहून कूच करून सावनुरास आलों. नबाब भेटीस आले. दुसरे दिवशीं आम्ही त्यांचे घरीं गेलों. नबाबांनीं मेजवानी केली. मुराररावही लवकरच येतात'. मराठ्यांशीं पुढें कसें लढावयाचें त्याचा बेत ठरवून हैदरानें मीर फैजुल्लास हजार फौजेसह तुंगभद्रेच्या आसपास टेहेळणीवर ठेवून आपण स्वतः अनवडी येथें दाट जंगलाच्या आश्रयानें छावणी देऊन राहिला. ह्या झगड्याचें केंद्र सावनूर होतें,[१] व सावनूरचा नबाब मुसलमान असून तो मराठ्यांस सामील झाला, याबद्दल हैदरास अत्यंत त्वेष वाटून, 'तुझें संरक्षण मराठे कसें करितात पाहूं', अशा ईर्षेनें हैदरानें आपली फौज, आजूबाजूस जंगलें, नद्या, टेकड्या वगैरेंच्या आश्रयानें व्यवस्थित ठेविली. पावसाळा नजीक आल्यानें महिना पंधरा दिवस पावेतों लढाईस तोंड न देतां, मराठे परत गेल्यावर सावनूरकराचा सूड घ्यावयाचा हैदराचा पक्का निश्चय होता. हें ओळखून पेशव्यानेंही तशीच ईर्षा धारण केली. 'कर्नाटक प्रांत आपला आहे, वडिलांनीं जिंकलेला आहे, त्याचें संरक्षण करण्यास आपण समर्थ आहों, पानिपतामुळें किंवा कौटुंबिक भांडणामुळें आपलें सामर्थ्य यत्किंचित् कमी झालेलें नाहीं', हें हैदराचे निदर्शनास आणून कार्यभाग संपल्याशिवाय परत जावयाचें नाहीं असाच निश्चय पेशव्यानेंही केला, आणि सावनूरकरास पाठीशीं घालून त्याचा बचाव माधवरावानें उत्कृष्ट केला, हें सांगणें

---

१. सावनूर हत्तीमत्तूर स्टेशनच्या जवळ पश्चिमेस. धारवाडवरून हरिहरपर्यंत आगगाडीचा रस्ता आहे. त्या दरम्यान या स्वारींतील बहुतेक स्थळें आहेत. सावनूरजवळच बंकापुरच्या नैर्ऋत्येस होनगळ. करजगी स्टेशन हत्तिमत्तूरच्या पुढचें. रट्टेहळ्ळी राणिबेन्नूर स्टेशनच्या दक्षिणेस, कुमुद्वती नदीचे कांठीं जडें व अनवडी म्हैसूर राज्याचे उत्तर टोंकांत होनगळच्या दक्षिणेस आहेत. धर्मा, वरदा, वाला हीं तेथील नद्यांचीं नांवें. या स्वारींत मराठ्यांच्या हालचाली तुंगभद्रेच्या दक्षिणेस गेल्या नाहींत. सर्व संग्राम हरिहरच्या उत्तरेस व रेल्वेच्या पश्चिमेस झाले. शिरहट्टी हें ठिकाण भटकळ बंदरच्या थेट पूर्वेस सह्याद्रीचे माथ्यावर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नकोच. गनिमी काव्याच्या युद्धांत तोफा वापरून एकमेकांस हैराण करण्याच्या पद्धतींचें आविष्करण ह्या स्वारींत फारच चांगलें झालें. भूगोलिक परिस्थितीची उत्कृष्ट माहिती मिळवून त्याचा फायदा हैदरानें तर चांगलाच करून घेतला.

माधवरावाबरोबर विठ्ठल शिवदेव, नारोशंकर, नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळ, रास्ते, विसाजी कृष्ण बिनीवाले, रामचंद्र गणेश कानडे, इचलकरंजीकर घोरपडे, महिपतराव कवडे, शहाजी भापकर, अक्कलकोटचे शहाजी भोसले वगैरे अनेक अनुभवलेले सरदार होते. तरी त्याची मुख्य भिस्त पटवर्धनांवर व त्यांतही विशेषतः गोपाळरावावर होती. पेशव्यांच्या जिव्हाळ्याचा इसम हा एकच होता. गोपाळरावास असें प्रोत्साहन मिळाल्यामुळें त्यानेंही जिवाची पर्वा न करितां स्वाऱ्यांत उत्कृष्ट कामगिरी केली. त्याचेंच अनुकरण इतर सरदारांनींही केलें; आणि युद्धाचे डावपेंच बरोबर ओळखून सर्वांस योग्यतेप्रमाणें कामास लाविल्यामुळें, माधवरावाचें युद्धकौशल्य सिद्ध झालें. सावनूरच्या संरक्षणाची जबाबदारी त्यानें गोपाळरावावरच टाकिली होती. या मोहिमेंत लहान मोठ्या चकमकी पुष्कळ होऊन मराठ्यांनीं आपलीं सर्व ठाणीं परत घेतलीं. तरी त्यांतले त्यांत १७६४च्या मे महिन्यांत रट्टेहळ्ळीची लढाई, सप्टेंबर, आक्टोबरांत धारवाडचा वेढा, व पुढें डिसेंबरांत अनवडीची लढाई, असे तीन प्रकार युद्धाच्या दृष्टीनें विशेष स्मरणीय आहेत. ता. ४ मे रोजीं 'हैदरनाईक रट्टेहळ्ळीस बातेऱ्या बांधून लढत होता, त्यास आपल्या तोफा समीप लावून मार दिला. त्याचें लष्कर बहुत घाबरें झालें. तोफांची दहशत बसून तो कूच करून मासूरवारीपलीकडे गेला. आमची जरब त्याजवर बरीच होत चालली आहे. त्याची उमेद कृष्णेवर लढाईस यावें अशी होती, प्रस्तुत बाहेर निघण्याचा प्रकार राहिला. त्यानें दगा करून विठ्ठल शिवदेव, बिनीवाले, पुरंदरे व सखारामपंत यांच्याशीं गांठ घातली. तरी ते संभाळून आले. नाहीं तर बहुत नाश होता; लढाईनंतर हैदरअली मायनहळ्ळीस निघून गेला. आपल्याच गोळ्यांनीं त्याचीं माणसें जायां झालीं. त्यानें दहशत खाल्ली. त्या दिवसापासून त्यास आमच्या फौजेचा अजमास कळला. त्यानंतर अरण्याखेरीज राहिला नाहीं. चार दिवस झाडीचे आश्रयानें राहवें पुढें हे सहजच परत जातील, हें त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानस आहे'. यामुळें पेशव्यासही कर्नाटकांतच छावणी करणें प्राप्त झालें. 'छावणी धारवाडनजीक होईल. पैक्याचा पेंच मोठा. महागाई फार आहे', (२४-५-६४). सावनुरापासून दहा कोसांवर पटवर्धनांचीं पथकें आणि त्यांजपासून दहा कोसांवर श्रीमंत, अशी छावणी झाली. छावणीस राहिले ही मोठी मसलत श्रीमंतांनीं केली. या मनसुब्यानें दौलतीचा पाया आहे. माधवरावास या वेळीं अनेक अडचणी व विवंचना होत्या, त्यांचें निवारण तो धिम्मेपणें करीत होता. त्याच्या कर्तबगारीची छाप सर्वांवर व्यवस्थित बसली. 'स्वामी पुण्यवान प्रतापी आहेत. सर्वही स्वामीचे पादाक्रान्त आहेत. स्वतेज प्रकाशेंकरून शत्रूचें निर्दाळण शीघ्रकाळेंच होईल'. बंकापुरचा हैदराचा सरदार लालामिया बाहेर चालून आला, त्याचा जून महिन्यांत पटवर्धनांनीं खरपूस समाचार घेतला. ही इभ्रत भारी बसली. अनेक यातना सोसून पटवर्धनांनीं किती निष्ठेनें कामगिरी केली, हें त्यांच्या कागदांवरून दिसून येतें.

पावसाळ्यांतही हैदर स्वस्थ बसला नाहीं. एका बाजूनें तहाचा देखावा चालू ठेवून, दुसरीकडून गोपाळराव पटवर्धनास फसवून सावनूर काबीज करण्याचा त्याचा यत्न सारखा चालू होता. परंतु गोपाळरावही शेरास सव्वाशेर भेटला. त्यानें अडचणीचा प्रसंग ओळखून जुलईत माधवरावास ताबडतोब मदतीस बोलाविलें. माधवराव त्यास लिहितो, 'कसा समय येतो न कळे, यास्तव लांब लांब मजली करून येतों. तुम्हीं वरचेवर बातमी पाठवीत जावें. विठ्ठल शिवदेव व आनंदराव रास्तेही येतील'. पटवर्धनाची फौज दररोज सकाळीं बंकापुरचे रानांत ओढ्यावर जात असे, त्याची खबर राखून हैदरानें त्यांजवर छापा घालून, सर्वांस कापून काढण्याची तजवीज केली. पण त्याची गुप्त बातमी आगाऊच पटवर्धनांस लागल्यामुळें हैदराची मसलत सर्वथैव फसली. तेव्हां पटवर्धनांवर हैदराचा अतिशय राग झाला. तो त्या दिवशीं कोणाशीं बोलला नाहीं. रात्रौ भोजनही केलें नाहीं. ता. १-८-१७६४ रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो. 'हैदर प्रस्तुत हनगळास आहे. त्याचे लोक बहुत पळतात. त्यांचा धर सुटला आहे. सलूख झाला तर करावा हा भाव दिसतो'. त्याच सुमारास दादानें नाशकास बराच उच्छेद मांडिला, तेव्हां त्यास कांहीं उद्योग देऊन गुंतविण्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां कारभारी व गोपिकाबाई यांनीं त्यास स्वारींत बोलवून घेण्याविषयीं माधवरावास सूचना पाठविली, त्यावरून माधवरावानें त्यास आपणांकडे स्वारींत बोलाविलें. त्या वेळीं दादानें निजामाकडील आपल्या वकिलास लिहिलेलीं पत्रें पाहिलीं, म्हणजे त्यांवरून दादाचा पोकळ दिमाख मात्र व्यक्त होतो. इकडे सप्टेंबरांत वरदा नदीच्या कांठीं हावेरी ठाणें मराठ्यांचें होतें तेथील लोकांवर एके दिवशीं पहाटेस मीरफैजुल्लानें हल्ला केला, आणि मोठी धांदल उडवून दिली. तथापि रास्ते, घोरपडे, शहाजी भोसले, विंचूरकर वगैरेंनीं त्यास माघारा पिटून लाविलें. या स्मरणीय प्रसंगाचें वर्णन अस्सलच वाचण्याजोगें आहे. या वेळीं पेशव्यानें धारवाडास मोर्चे लाविले होते; आणि विठ्ठल शिवदेव वगैरे सरदार सावनूरचे बाजूस राहून हैदराची कुमक धारवाडाकडे येऊं नये, अशी अडवणूक करीत होते. ह्यासाठीं उभयतांची वरील निकराची झटापट हावेरीस झाली. त्या लढाईंत दिसून आलेली सत्तर वर्षांच्या वृद्ध विठ्ठल शिवदेवाची तडफ व कामगिरी तरुणांसही लाजविणारी आहे. हा शूर सरदार यापुढें लवकरच ता. २० ऑगस्ट १७६७ रोजीं मरण पावला. त्यास घड्याळ बाळगण्याबद्दल सरकारांतून नेमणूक ता. २९-६-१७५२ रोजीं दिलेली होती. (ना. रो. २-१९४).

सावनूरच्या दक्षिणेस हैदरास गुंतवून ठेवून पाठिमागचा बहुतेक प्रदेश पेशव्यानें पावसाळ्यांत हस्तगत केला. तिकडे हैदराचें मुख्य ठाणें धारवाड असून तेथें मीरफैजुल्लाचा भाऊ फाजलअलीखान मोठ्या शिकस्तीनें टिकाव धरून होता. भाद्रपद वद्य १ चे सुमारास किल्ल्यास वेढा घालण्यांत आला. तो दोन महिने चालून कार्तिक शुद्ध १२ ता. ६ नोव्हेंबर रोजीं किल्ला हस्तगत झाला. 'किल्ला मातबर, दुहेरी कोट, दोन खंदक, आंत दारू व गोळी नाहींशी झाली, त्यामुळें हयास आले आणि सलुखावर घातलें. अबरूनें पार करून देणें, म्हणून गोपाळराव पटवर्धनास आणून त्याच्या मार्फत किल्ला खालीं करविला. हत्यार व वस्तभाव सुद्धां बाहेर काढून दिले. नारो त्रिंबक एकबोटे यानें या कामीं विशेष पराक्रम केल्यावरून त्यास श्रीमंतांनीं पालखी दिली. 'श्रीमंत दैववान, हैदराचे चित्तांत कुमक करण्याचें पुष्कळ होतें, पण विठ्ठलपंत सावनुरांत व गोपाळराव व रास्ते छबिन्यास असल्यामुळें, त्यास पुढें यावयाचें अवसान आलें नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या उपरी तुंगभद्रेपलीकडे जाण्याचें, पण नदीस उतार नाहीं, (ता. ८ नोव्हेंबर १७६४). धारवाड घेऊन हनगळास आले; आणि तेथून लगेच अनवडीच्या छावणीवर माधवरावानें ता. १-१२-१७६४ रोजीं निकराची मारगिरी केली. सरदारांनीं व लोकांनीं बेजरबा घोडीं चालवून झाडींत शिरून गाड्यांचे बुरूज फोडून हजार बाराशें कापून काढिले. पांच सातशें धरून आणिले. चहूंकडून सारे उठले. पांच सातशें तोफा होत्या त्याही आणिल्या. मोठी फत्ते श्रीकृपेनें झाली. थोडेंसें मैदान असतें तर खासा हैदरदेखील धरला असता. झाडीनें त्यास वांचविलें. आमचे फौजेंत २५।४० माणूस व ७५ घोडें पडलें असेल. मुरारराव घोरपड्यांनीं मोठी मर्दुमकी केली. खुद्द श्रीमंतांनीं हुजरात बोलावून घोड्यावर बसून फौज सुद्धां नीट चालून घेतलें'. यास अनवडीची लढाई म्हणतात. माधवरावानें हें वर्तमान अभिमानानें निजामास लिहून कळविलें. या वेळेपासून माधवरावाच्या कर्तृत्वाचा व पराक्रमाचा हैदरावर असा कांहीं दरारा बसला कीं, कितीही सैन्य समागमें असलें तरी स्वतः माधवराव हजर असेल त्या प्रसंगांत झुंजण्याचें धाडस हैदरानें कधीं केलें नाहीं; आणि वीस पंचवीस कोसांच्या टापूंत तो कधीं फिरकला नाहीं. अनवडी येथील हैदराच्या छावणीवर लगेच पुढें माधवरावानें हल्ला चढविला असता, तर त्यांचा निभाव लागावयाजोगा नव्हता, म्हणून त्यांस कोंडून उपासमार करण्याचा त्यानें उद्योग चालविला. बिदनुराकडून त्यास धान्याचा पुरवठा होत असे तो बंद करण्यांत आला; आणि झाडें तोडून सर्व वाटांवर आडवीं तिडवीं लावून दिलीं, तेणेंकरून हैदराचें लष्कर हैराण झालें. तेव्हां तो छावणी उठवून बिदनुराकडे चालला. रस्त्यांत पुनः मराठ्यांनीं त्यास गांठून कित्येक हजार गाडदी व लोक कापून काढिले. पुष्कळ सामान मराठ्यांच्या हस्तगत झालें. थोड्या लोकांनिशीं बचावून हैदर जानेवारींत बेदनुरास पोंचला.

इकडे दादास समजावून आणण्यासाठीं चिंतो अनंत देवस्थळे गेला होता तो, दादा व नारायणराव यांसह येऊन पावला. हरपनहळ्ळीनजीक माधवरावाच्या व त्यांच्या भेटी ता. २७-१-१७६५ रोजीं झाल्या. पुढें फेब्रुवारींत बिदनुरावर चालून जाण्याचा विचार ठरला. या पूर्वींच तहाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलणें करणेसाठीं हैदराचे वकील आले होते. त्यांजबरोबर वाटाघाट सुरू झाली. सर्वांचे मतें एकवार हैदराचें पूर्ण पारिपत्य करावें; पूर्वी नानासाहेबांनीं जिंकिलेला शिऱ्यांचा सुभा व बिदनूर प्रांत हस्तगत करावा, असें होतें. वडिलांचे उद्योग पुत्रानें अविच्छिन्न चालविण्यांत माधवरावास अभिमान वाटणें साहजिक आहे. परंतु आतां दादा मध्यें आल्यामुळें त्याचे कलानें चालणें माधवरावास भाग पडलें. दादानें थोडाबहुत तहाचा विघाड केलाच. थोडी देवघेव करून त्यानें प्रकरण मिटविलें. आग्रह करावा तर वडिलांची मर्जी जाते, असें प्रधानपंतानें समजून तह केला; आणि ता. ३०-३-१७६५ रोजीं तह ठरून कर्नाटकाची ही स्वारी आटोपली. हें वर्तमान माधवरावानें रामशास्त्री यांस लिहून पाठविलें. 'हैदरनायकाचें पारिपत्य करावें या अर्थें स्वारी बिदनूर प्रांतीं अनंतपुरास आली. तें ठाणें घेतल्यानंतर त्याशीं गांठ घालावी, इतक्यांत त्यांनीं वकील पाठवून बहुत आर्जव केलें. तीस लक्ष रुपये, बंकापुर वगैरे तुंगभद्रेच्या उत्तरेकडील सर्व ठाणीं व मुलूख, आणि मुरारराव घोरपडे व सावनूरचे नबाब यांचे तालुके देऊन तह करून घेतला. मेघश्यामराव पटवर्धन शत्रूचे हातांत होता, त्यास सोडवून आणिलें. यास अनंतपुरचा तह म्हणतात. ठरल्याप्रमाणें बंकापुरचें ठाणें हस्तगत झालें. 'मुराररावं घोरपडे यांनीं सावनुरास रहावें; सावनूरकरांनीं व मुराररावांनीं एक विचारें चालावें', असा बंदोबस्त करण्यांत आला. कर्नाटकाचे कामावर गोपाळरावास ठेवून पेशवा परत आला. तिकडे त्याचा वचक सर्व ठिकाणीं पूर्ववत् बसला. हीच या स्वारीची निष्पत्ति आहे. कार्तिकस्वामी व हंपी येथील देवदर्शनें करून पंचमहालांतून खंडण्या गोळा करीत, ज्येष्ठअखेर दादा व माधवराव पुण्यास दाखल झाले.'[१] या स्वारींत निजामाचें व पेशव्यांचें संगनमत असून

१ आधार—का. सं. प. या. १४३; कै. व. या. पृष्ठ १३०; इ.७५; खं. १४. ९, १३, ३९, ४०, ५५, ७०, ७५, ७६, ७७, ८०; खं. १२. ६७; खरे ले. ४२०, ४२२, ४२७, ४३०, ४३४, ४६५, ४७६, ४७७, ४८६, ४८७, ४८८, ४९१, ५०९, ५१०, ५११, ५३६, ५४९, ५५४, ५५६, ५५९, ५६४, ५६५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिऱ्यांचे प्रकरणीं बसालतजंगावर निजामानें स्वारी केली, त्यांत माधवरावानें निजामाचे मदतीस बाबूराव हरी यास फौज देऊन पाठविलें होतें.

३. तिसरी स्वारी, शिरें व तुंगभद्रादक्षिणप्रदेश काबीज, (नोव्हेंबर १७६६-जून १७६७).—या पुढची माधवराव पेशव्याची कर्नाटकची स्वारी सन १७६६च्या नोव्हेंबरपासून सन १७६७च्या जूनपावेतों झाली. ह्या स्वारीचीं कारणें, व तत्कालीन प्रकरणांतील अनेक पक्षांच्या भानगडी यांची समजूतवार माहिती खरे यांचे खंडांत दिलेली अवश्य पाहण्याजोगी आहे. मराठे, निजाम, हैदर व इंग्रज असे चार पक्ष या वेळीं एकमेकांवर चढाई करण्यांत गुंतले असून ते नानाप्रकारच्या जुटी बनवून आपआपला मतलब साधण्याच्या खटपटींत होते.

ता. २४-११-१७६६ रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो, 'नवाबाचा व इंग्रजांचा सलूख जाहला. नबाबांनीं त्यांस प्रांत इजाऱ्यानें दिल्हे व कांहीं चाकरींत दिल्हे, त्याची चाकरी थोडी बहुत फिरंगी व गाडदी यांनिसीं करावी, याप्रमाणें निश्चयांत येऊन सलूख ठरला. नबाबाचे मतें तूर्त चार रुपये मिळाले, पुढें पाहतच आहोंत. फिरंगी यांचें मत कीं आपण ठाणीं व मुलूक मिळविला, पुढें बनेल तसें करूं. परस्परें याप्रमाणें समजण्यांत आलें आहे. परंतु नबाब नाइलाज होऊन सलुखास कबूल जाहले. फिरंगी जबरदस्त, त्यासी पुरे पडूं देणार नाहींत, यास्तव सलूख जाहला. इजाऱ्याचे महालचे आठ लक्ष रुपये ठरविले. बाकी महाल फिरंगी यास चाकरीबद्दल दिल्हे असें ठरलें आहे'. ह्या खटपटीचा वृत्तान्त ऐतिहासिकदृष्ट्या महत्त्वाचा असला, तरी तो येथें देण्यास सवड नाहीं. त्यांतल्या त्यांत माधवरावानें मराठ्यांचा जम गेल्या दोन तीन वर्षांत चांगला बसविला असल्यानें, त्याची दहशत इंग्रज व हैदर यांस वाटून ते त्याचा पाडाव करण्यास टपून बसले होते. परंतु हे दोघेही एकाच क्षेत्रांत वावरत असल्यानें एकमेकांचे जबरदस्त प्रतिपक्षी बनले हें जाणून, माधवरावानें दुसऱ्या कोणाच्या मदतीची अपेक्षा न ठेवितां केवळ स्वतःच्या हिंमतीवर भरंवसा ठेवून आपला उद्योग सुरू केला; आणि तुंगभद्रेच्या दक्षिणेकडील स्वराज्याचा प्रदेश गेल्या स्वारींत जिंकला गेला नव्हता, तो कार्यभाग पुरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्यासाठीं दसरा झाल्यावर त्यानें कर्नाटकाच्या स्वारीची सिद्धता केली. ह्या वेळीं दादा उत्तरेच्या स्वारींत गोहदकडे असून त्याजबरोबर सिंदे, होळकर, नारोशंकर व विठ्ठल शिवदेव तिकडेच होते. उत्तरेंत दादाची धडगत नाहीं अशीं पत्रें आलीं, परंतु आपण त्यांचे मदतीस जाण्यापासून लभ्यांश कांहीं नाहीं, उलट भांडणेंच वाढतील आणि इकडे निजाम, इंग्रज व हैदर यांचीं कारस्थानें घाटत होतीं, तेव्हां स्वतःचे हिंमतीनें तडीस नेतां येईल एवढाच कार्यभाग माधवरावानें हातीं घेतला.

सन १७६५ त मोठी मोहीम झाली नसल्यानें पेशव्यानें फौजेऐवजीं जहागिरदारांकडून रोख रकमा वसूल करून मोठी बचत केली, त्याचा उपयोग त्यानें आतां या सालीं केला. आपण चालून येतों हें हैदरास आगाऊच कळावें, म्हणून गोपाळराव पटवर्धन यास त्यानें मिरजेहून पुढें चांगल्या तयारीनिशीं रवाना केलें; आणि आपण थेऊर, सिद्धटेक, मोरेश्वर, करकुंभ व जेजुरी या पंचयात्रा केल्यावर, फौजांस मिळवून दक्षिणेस प्रयाण केलें. या वेळची त्याची शिस्त व तडफ अप्रतिम होती. पुण्याचा कारभार नाना फडणिसाकडे त्यानें सोंपविला, आणि तें काम मागच्याप्रमाणें ह्याही खेपेस नानानें चांगलें बजावलें. पेशव्यांच्या फौजा जाऊं लागल्या म्हणजे निरनिराळे सरदार शेंपन्नास कोसांच्या पट्ट्यांतून खंडण्या वसूल करीत जात. खुद्द पेशवा विजापुरावरून निजामाच्या हद्दीनें रायचूर मुद्गलवरून गेला. गोपाळराव पटवर्धन बेळगांवाच्या बाजूनें कित्तूरची खंडणी घेऊन पुढें गेला. मोरोबा पटवर्धन पेशव्याजवळ राहून सर्व घडामोडी गोपाळरावास लिहून कळवी. त्याचींच पत्रें ह्या स्वारीची मुबलक माहिती देणारीं आहेत. माधवरावानें सुरापुरच्या संस्थानिकाकडून खंडणी वसूल केली. प्रथम पुढें जाऊन खंडण्या ठरविण्याचें काम गोपाळराव पटवर्धन करी; आणि पेशवे व सखारामबापू स्वतः त्यासंबंधानें, रकमेचा, माफीचा अगर जाळपोळ, लूट वगैरे करण्याचा निकाल ठरवून हुकूम देत, तसा पुढें अंमल होई. असें करण्यांत फडणीस, चिटणीस, पोतनीस, मुजुमदार, हरिपंत फडके, सखाराम बापू इत्यादिकांस कारकुनी ऐवज म्हणून संस्थानिकांनीं अगर लोकांनीं समजुतीसाठीं नेहमीं रोख द्यावा लागे. देवदुर्गच्या मुक्कामीं सर्व फौजेची गणति माधवरावानें मोठ्या सक्तीनें कशी घेतली, त्याचें वर्णन अन्यत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिहिलें आहे. तशीच आपल्या कामाची तपशीलवार हकीकत त्यानें मातुश्रीस कळविली तीही पाहण्यालायक आहे.

हैदरानें पेशव्याच्या स्वारीचीं वर्तमानें ऐकून समोरासमोर न लढतां अन्नपाण्यावांचून मराठ्यांस हैराण करण्याचा उद्योग आरंभिला. तळीं फोडून कोरडीं केलीं; विहिरीं, तळीं व ओढ्यांतलें पाणी विषारी पदार्थ घालून नासून टाकिलें; आणि वाटेवरचीं गांवें व शहरें उठवून सर्व प्रदेश उजाड करून ठेविला. परंतु पेशव्यानें आपली सर्व तजवीज अन्य मार्गांनीं व्यवस्थित लाविली असल्यामुळें मराठ्यांस हैदराच्या कृतीपासून उपसर्ग झाला नाहीं. इकडे हैदरानें आपले वकील पेशव्याकडे पाठवून सल्ल्याचा उपक्रमही चालविलाच होता. 'जानवरीचे आरंभीं रायचूरजवळ मुक्काम असतां हैदराचा करीमखान वकील भेटीस आला. त्यास पेशव्यानें कळविलें कीं आमचा मुलूख घेतला आहे, तो व मुराररावाचा मुलूख व संस्थान सोंधे ऐसीं सोडावीं; शिवाय पाउण कोट रुपये खंडणी द्यावी'. हा मनुष्य उगाच थापा देऊन कालहरण करीत होता. 'लबाड समजून त्यास गोपाळरावानें निरोप दिला, हें ऐकून श्रीमंत संतोषी झाले; उगाच नादीं लावून ठेवावें, असा इतर सरदारांचा क्रम तो कामाचा नाहीं'. मुराररव घोरपडे यानें पेशव्याशीं अत्यंत निष्ठा ठेवून आपला भाव कळविला तो असा. 'राजश्री पंतप्रधान इंगितज्ञ आहेत. प्रसंगानुरूप सर्व विचार त्यांच्या ध्यानांत आहेत. आमचा विचार त्यांच्या बाहेर नाहीं. याउपर सत्वरींच स्वार होऊन लिहिल्याप्रमाणें येऊन सामील होतों'. जानेवारी-अखेर तुंगभद्रा पार होऊन पेशवा शिऱ्याचे बाजूस चालला. बल्लारी, रायदुर्ग, अनागोंदी, हरपनहळ्ळी, चित्रदुर्ग, कंचनगुड्ड वगैरे झाडून सारीं ठिकाणें हस्तगत करून व तेथील अधिकाऱ्यांपासून खंडण्या वसूल करून त्यानें आपला अंमल कायम केला. 'श्रीमंत शिऱ्यांस मोर्चेबंदीस गेले. समागमें कृष्णमृतिका (दारू) कमी, ती बल्लारीहून आणविली. काल रविवारीं मोर्चे लावण्याचा मुहूर्त पाहिला. हैदरखानाकडील वकिलाचा जाबसाल आहे तोच आहे. शिरें सोडून देण्याचा करार झाला. खंडणी एकवीस लक्ष देऊं म्हणतो. यावरून श्रीमंतांस विषाद वाटून निरोप दिला'. शिऱ्यांचा किल्ला लगेच खालीं झाला. तेथचा नबाब करीमखान सरकारांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चाकर झाला. त्याजकडे दहा बारा ठाणीं आहेत, तीं श्रीमंतांस दिलीं. 'शिऱ्यांत सामान भारी असून स्थळ इतक्या लौकर हस्तगत झालें ही गोष्ट बहुत उत्तम. श्रीमंतांचें प्राक्तन विचित्र आहे. हैदरखान पेंचांत आला आहे. श्रीमंतांचा मनोदय त्याजवर श्रीरंगपट्टण येथें जाण्याचा आहे. हैदराचा मेहुणा मीर रेजा शिऱ्यांत होता, त्यास दोन हजारांनिशीं श्रीमंतांनीं चाकरीस ठेवून गुर्रमकोंड्याची जहागीर दिली. मीरफैजुल्लावर इंग्रजांनीं छापा घालून दोन हजार फौज बुडविली. शिऱ्यांहून सव्वा कोसावर मुक्काम असतां पंत प्रधान मोर्चांतून सडे आले. ता. १९ फेब्रुवारीस गोधूलिलग्नीं सुमुहूर्तें, सेनापति मुराराव घोरपडे यांची भेट झाली. फार समाधान वाटलें', असें घोरपडे लिहितो. तहाची वाटाघाट गोपाळरावाचे मार्फत एकसारखी चाललीच होती. हैदराचा वकील गोपाळरावाजवळ राहून बोलणें करी आणि तें बोलणें मोरोबा पटवर्धन पेशव्यास कळवून परत जाबसाल पाठवी.

मीररेजा नोकरीस आला म्हणून सांगितलें त्याचें व मुराराव घोरपडे याचें वांकडें होतें. दोघेही पेशव्याबरोबर मदगिरीजवळ असतां, घोरपड्याचे लोकांनीं मीररेजावर एकदम हल्ला करून त्याचा गोठ सर्वस्वीं लुटून फस्त केला. त्याबद्दल माधवरावानें अपराध्यांस अत्यंत कडक शासनें करून अशी कांहीं दहशत सर्वत्र बसविली, कीं प्रत्यक्ष मुराराव घोरपडेसुद्धां पेशव्यास चळचळां कापूं लागला. यासंबंधाचे कागद सर्व वाचण्यालायक आहेत. ता. ४ मार्च रोजीं मदगिरी हस्तगत केल्याचें वर्तमान माधवरावानें मातुश्रीस कळविलें. 'किल्ला घेतला, लूट फार झाली. पहाडी किल्ला फार बिलंदर, एका दिवसांत असा यावासा नव्हता, वडिलांचे आशीर्वादें व ईश्वर इच्छेनें मात्र आला. बिदनूरची राणी व राजे किल्ल्यांत होते ते सांपडले, काम झालें'.

पुढें चिक्कबाळापुर, चनेरायदुर्ग वगैरे ठिकाणें घेऊन मार्च महिन्यांत पेशव्याची स्वारी जवळ जवळ येऊं लागली, तेव्हां भय उत्पन्न होऊन हैदर तहाची जिकीर करूं लागला. आपाजीराम व करीमखान हे दोघे त्याचे बाजूनें तहाचें बोलणें करीत होते. 'श्रीमंत सदय आहेत. आज सारा प्रांत घेऊं म्हटल्यास अगाध नाहीं. परंतु छावणीस राहवें लागेल. प्रांत खराब होऊन शिबंदीस खर्च पदरचा द्यावा लागेल. दौलतवंतास कोणे गोष्टीनें सौख्य नाहीं, अशी विनंति श्रीमंतांस करावी', म्हणून हैदराचे प्रयत्न गोपाळ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रावाचे मार्फत चालले होते. मध्यंतरीं मडकशिरें, लक्ष्मेश्वर, थोरलें व धाकटें बाळापुर, नंदीगड, कोलार वगैरे ठिकाणें हळूहळू कावीज झालीं. माधवरावाची चलती पाहून निजामअली पूर्वीच्या करारास स्मरून या वेळीं कर्नाटकचे कामगिरींत मदतीस आला. मात्र फार उशिरां आला. तो येण्याच्या पूर्वींच माधवरावानें सर्व कामगिरी फत्ते केली. आपण एकंदर काय कामगिरी केली त्याचा आढावा पेशव्यानें ता. १४-४-१७६७ रोजीं नानाफडणिसास लिहून पंचवीस लाख रुपये खर्चास मागितले. पुढें कोलार वगैरे ठिकाणें घेऊन पेशव्याची फौज बंगलोर व श्रीरंगपट्टणावर येऊं लागली, तेव्हां नानासाहेबाच्या वेळचा सर्व प्रदेश पेशव्यास देण्याच्या करारानें हैदरानें तह करून त्याची समजूत काढली. माधवराव रामशास्त्र्यास ता. ७-५-१७६७ रोजीं लिहितो. 'इकडील वर्तमान पहिले एक दोन पत्रीं लिहिलेंच आहे. अलीकडे हैदरखानाचा तेहतीस लक्षांवर करार झाला. मोगलांचे चौदा लाख घेतले. चिकबाळापुर व कोल्हार हीं ठाणीं त्यास दिलीं. मदगिरी व चेनरायदुर्ग घेतलें. बाळापुर व होसकोटें हीं ठाणीं व किल्ले सरकारांत ठेविले'. प्रत्यक्ष हैदर किती नरम झाला हें माधवरावाच्या पत्रावरून दिसतें. तसेंच मुरारराव घोरपडेही 'आपणावर सर्वभार आहे, उचित तें करणें', अशा रीतीनें पेशव्यास आर्जवून पाहिजे तें करण्यास कबूल झाला. यावरून माधवरावानें केवढा कार्यभाग या वेळीं उरकला, तें समजून येतें. पेशवा परत निघाला, तो ज्येष्ठाच्या आरंभीं पुण्यास येऊन पोंचला.

४. चवथी स्वारी, कामगिरी अपूर्ण[१] (नोव्हें. १७६९—जून १७७०).— हैदरअलीखान मोठा उपद्व्यापी होता. पेशव्याशीं तह केल्यावर त्यानें निजामास मिळवून इंग्रजांशीं युद्ध केलें. हें युद्ध सन १७६७ ते ६९

---

१ आधारः—चं. १२१, १२२, १२३, १२५, १२६; खं. १४. १३ व ९; का. सं. प. या. १७७ (२२-११-१७६६); इ. ८५, ८६; चं. ११८; भा. व. प. या. १·६; ख. ले. ५०९, ५१०, ५११, ५३६, ५४९, ५५४, ५५५, ५५९, ६५८, ६७३, ६७७, ६८०, ६८२, ६८३, ६८९, ६९०; ६९२—६९७, ७०१, ७१८, ७२१, ७२३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पावेतों थोडेंबहुत चाललें. सन १७६७ च्या ऑगस्ट सेप्टेंबरांत इंग्रजांनीं निजाम-हैदरांचा पराभव केला, त्याचा सूड त्यानें सन १७६९ च्या आरंभीं घेतला. त्या वेळीं एकदम मद्रासेवर चाल करून त्यानें इंग्रजांची दाणादाण उडविली. त्याबरोबर इंग्रजांनीं ३-४-१७६९ रोजीं त्याच्याशीं तह करून युद्धांतून आपला हात काढून घेतला. दरम्यान मराठ्यांच्याही आगळिकी त्यानें वाटेल तशा केल्या. सन १७६७–६८ हीं दोन सालें माधवरावाचीं प्रथम चुलत्यावर व मागाहून नागपुरकर भोसल्यावर स्वारी करण्यांत खर्च झालीं त्यामुळें त्यास दोन वर्षें कर्नाटकाकडे लक्ष देण्यास फुरसत झाली नाहीं. सन १७६९ च्या उन्हाळ्यांत भोसल्यावरची मोहीम संपतांच त्यानें पटवर्धन व रास्ते यांस परभारेंच कर्नाटकांत चैत्र अखेरीस रवाना केलें, आणि स्वतः सन १७६९ च्या अखेरीस तिसऱ्यांदां कर्नाटकांत जाऊन सन १७७० च्या जूनांत पुण्यास परत आला. या वेळीं बायको रमाबाई व बंधु नारायणराव हे पेशव्याबरोबर स्वारींत होते. आरंभापासून आतांपावेतों या दरएक स्वारींत माधवरावाच्या यशाची पायरी चढती होती. या तिसऱ्या स्वारींत अपयश कोठें आलेंच नाहीं. जिकडे तिकडे जयश्री हात जोडून उभी असे, असें त्या वेळच्या कागदांत वर्णन आहे. स्वारीचीं कारणें हैदराकडून कशीं उपस्थित झालीं, तें त्या वेळचे कागद वाचून ठरविलें पाहिजे. खरे यांचें विवेचन नेहमींप्रमाणें मार्मिक व परिपूर्ण आहे (पृष्ठ १७३१--१४०५).

मराठशाहीचा कारभार करितांना माधवरावाचा मुख्य हेतु मराठमंडळास एकत्र संघटित करण्याचा होता. अक्कलकोटकर व नागपुरकर भोसले वगैरे लहान थोर सरदार मंडळी त्यानें राज्याचे कामास लाविली. मुराररराव घोरपडे हा एकच सरदार कर्नाटकांतील या दूरच्या भागीं आज तीस वर्षें अनेक शत्रूंच्या कचाटयांतून आपला निभाव कसाबसा करीत होता. पूर्वींचा त्याचा कल स्वतंत्र वृत्तीकडे असतांही, माधवरावानें मोठ्या युक्तीनें मागील स्वाऱ्यांचे प्रसंगीं त्यास वश करून मराठशाहीच्या उद्योगांत सामील करून घेतलें. पुढें सन १७६९ त इंग्रजांशीं हैदराचें युद्ध सुरू झालें, त्यांत मुराररावानें इंग्रजांस साह्य केलें, याचा हैदरास अत्यंत संताप आला; आणि इंग्रजांशीं सल्ला केल्याबरोबर हैदरानें मुराररावाचा नानाप्रकारचा उच्छेद आरंभिला, व त्याजवर छापा घालून त्यास सर्वस्वी नागवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडिलें. 'मुरारराव घोरपडे सर्व मुलूख गमावून हतशेष राहिले. त्यांचें तेजच गेलें. गुत्ती मात्र एक राहिली. तिकडे हैदर जाता तर तेही जाती. येणेंप्रमाणें घोरपडे बुडाले असें आहे. कर्नाटकांत हैदरनायक पातशाहा झाला आहे. सर्वांवर त्याची इभ्रत बसली'. हा प्रकार सेप्टेंबर १७६९ त घडल्यावर घोरपडे हैदरास भेटून आपला बचाव करण्याच्या विचारास लागला. याशिवाय तिकडून सर्व ठिकाणीं पेशव्याचे मुलखावर हैदरानें बेधडक स्वाऱ्या करून खंडण्याही घेतल्या. मराठ्यांचे वकील आपाजी रघुनाथ व रामाजी बल्लाळ गुणे यांस त्यानें आपल्या दरबारांतून घालवून दिलें. 'दुर्बुद्ध धरिली, तयारी करितो. कृष्णातीरापर्यंत येणार. महिमाजी सिंदे यास लुटलें. अशा बातम्या येतात. त्यांत खरेपणा काय आहे', तो लिहून पाठविण्याविषयीं व बंदोबस्तास जाण्याविषयीं पेशव्यानें गोपाळरावास जुलई सन १७६९ तच लिहिलें. तसेंच त्रिंबकरावासही विशिष्ट ताकिदी पेशव्यानें दिल्या. हैदराचें दुसरें शस्त्र म्हणजे सावनूरचे नवाबाचा उच्छेद करणें. हा नवाब सर्वथा मराठ्यांस सामील झालेला असल्यामुळें त्याजवर हैदरानें चढाई करतांच, मराठी फौजांस त्याचे संरक्षणार्थ धावून यावें लागे. हैदराचा मेहुणा मीररेजाही उलट खाऊन पेशव्यास सोडून हैदरास जाऊन मिळाला. तेव्हां त्याची जहागीर गुर्रमकोंडा जप्त करण्यासाठीं महिमाजी सिंदे गेला असतां, त्याचा मीररेजानें पराभव करून त्यास घालवून दिलें, आणि चित्रदुर्ग, हरपनहळ्ळी वगैरे संस्थानिकांपासून हैदरानें जबरदस्तीनें खंडण्या घेतल्या. तेव्हां दुसरीकडच्या अनेक व्यवधानें असतांही माधवरावानें आरंभींच गोपाळराव पटवर्धनास एकदम पुढें कर्नाटकांत रवाना केलें. तिकडे मुराररावानें हैदराची भेट घेतली. मेजवानी, वस्त्रें वगैरे गौरव करून हैदरानें त्यास निरोप दिला. 'नाइलाज झाल्यामुळें आपण जाऊन खानाची भेट घेतली. आमचा हेतु आपल्याविरुद्ध बिलकूल नाहीं', असें मुराररावानें मुद्दाम पेशव्यास कळविलें. नोव्हेंबरचे आरंभीं हैदर आपली मुख्य छावणी जडें अनवडीस ठेवून, नंतर सड्या फौजेनें हरिहरास तळ देऊन, सावनूरचे रोखें पुढें आला; आणि नबाबास दरडावून समोर मुक्काम करून राहिला. इतक्यांत गोपाळराव पटवर्धन इकडून त्याचे मुकाबल्यास जलदी करून गेला. हैदराचे सरदार फोडण्याचें कामही पटवर्धन मंडळींनीं चालविलेंच होतें. मागोमाग माधव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रावही उतावळीनें येत असल्याची बातमी आल्यानें, हैदर थोडासा घाबरला. 'पोक्त मनसबा करून एकदांचा त्याचा रेच मोडावा', असें माधवरावानें ठरविलें. सन १७६९च्या डिसेंबर ६ रोजीं पेशव्याचा मुक्काम पंढरपुरास होता. साबाजी भोसले व गोविंदराव गायकवाड हे बरोबर होते. पूर्वेच्या बाजूनें अथवानीकोपळकडून पेशव्याची स्वारी कर्नाटकांत उतरली. गुप्त वेषानें लोकांनीं जाऊन शत्रूकडील बातम्या काढून आणिलेल्या पेशव्यास परिपूर्ण मिळाल्या. हैदरखान झाडींत शिरून बसला होता, त्याच्या तोंडावर गोपाळरावास ठेवून पेशवा पुढें श्रीरंगपट्टण प्रांतीं आला. मुलूख मारावा, ठाणीं घ्यावीं, असा क्रम चालवून, ता. २३ जानेवारी १७७० रोजीं माधवराव लिहितो. 'हैदरखान बिदनूरचे झाडींत सावनूरचे रोखावर आहे. महंमद अलीखान व इंग्रज यांच्यांशीं राजकारण बाळगिलें आहे. पट्टणांत नंदराज दळवी फितवा करून आमचेकडे मिळाले'. बेंगरूळचा भैरव किल्ला होता तो ११-२-१७७० रोजीं हल्ला करून पेशव्यानें घेतला. तेथील ब्राह्मणांचा छळ हैदरानें अतोनात केला होता. रात्रौ ब्राह्मणांस श्रीमंतांनीं आणून भोजनास घालून एक एक वस्त्र दिलें. ब्राह्मणांवर हैदराचा मोठा कटाक्ष होता. एका बाजूनें गोपाळराव व दुसऱ्या बाजूनें पेशवा हैदरास हळूहळू नरम करीत आले. मुरारराव घोरपड्याची पुष्कळ चलबिचल झाली होती. पेशव्यास सामील व्हावें तर पुढें नेहमीं प्रसंग हैदराशीं, परंतु हैदरास उघड मिळण्याची तर छाती नाहीं. अशा अडचणींत पेशवा चालून येतांच मुरारराव फेब्रुवारींत येऊन पेशव्यास सामील झाला. भिन्न प्रकृतीच्या स्वतःच्या अनेक सरदारांस खूष ठेवून त्यांजकडून कामें घेणें माधवरावास किती दुर्घट होतें, याची साक्ष या स्वारींत पदोपदीं मिळते. माघ वद्य ३० च्या दिवशीं हैदरानें पहाटे येऊन गोपाळरावाचे छावणीवर छापा घातला, परंतु गोपाळरावानें सावधगिरी ठेवून फारसें नुकसान होऊं दिलें नाहीं. या बिकट प्रसंगीं पटवर्धन मंडळींनीं विलक्षण शौर्य व चिकाटी प्रकट केली. या छाप्यांत माधवराव कृष्ण पटवर्धनास गोळी लागली, तेणेंकरून तो पुढें लवकरच मरण पावला. आपा बळवंत मेहेंदळे व सखाराम हरि गुप्ते ह्यांस पेशव्यानें मीररेजावर पाठविलें होतें. ती कामगिरी त्यांनीं फार चांगली बजाविली. त्यांजवर मीररेजानें १६ मार्च रोजीं मदगिरीचे आसपास एकदम छापा घातला; परंतु

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यास मराठ्यांनीं निकरानें लढून घालवून दिलें. या स्वारींतही निजामाची फौज रेंगाळत रेंगाळत मार्चअखेर येऊन पेशव्यास सामील झाली. एकंदरींत पेशव्याकडून या वेळींही हैदराचा उच्छेद व्हावा तसा निकरानें झाला नाहीं. लहान लहान ठाणीं मराठ्यांनीं पुष्कळ घेतलीं, त्यांचा परिणाम विशेष दिसेना. 'वारुळांत साप आणि वर मारावें तसी गत त्यांची. झाडींत छपोन बसला आहे, त्यास अद्यापि उपसर्ग नाहीं. महाकृत्रिमी, त्याचा विश्वास नाहीं. त्याचा वकील श्रीमंतापाशीं आहेच. झाडींत राहून आपले हुन्नर दाखवितो. त्याचा रेच एक वेळ मोडला पाहिजे. दिवस डोईवर आले, परंतु श्रीमंतांच्या तेजप्रतापापुढें या मशकाची कथा काय? श्रीमंत थोर प्राक्तनाचे, तपोबल विचित्र. त्या पुण्यप्रतापें केला मनसबा सिद्धीस जाईल. प्रजा, लोक, देव, ब्राह्मण सर्वही अभीष्ट चिंतितात. शत्रु पादाक्रांत होऊन शरण येतो. द्रव्यही देईल. न देई तरी पुढें सर्वस्वास मुकला असें जाणावें. श्री कल्याण करील'. ही त्या वेळची मराठी फौजेची भावना होती.

बंगलोर घेण्यास पुरेशी फौज नसल्यामुळें माधवरावानें कोलारकडे मोर्चा वळविला. वाटेंत देवरायदुर्ग वगैरे मातबर ठाणीं साबाजी भोसले व मुरारराव घोरपडे वगैरेंनीं एप्रिलांत काबीज केलीं. पुढें कोलारची गढी पाडून तेथील किल्लेदार वगैरे ३०।३२ माणूस हत्तीखालीं घालून मारिले. त्यांनीं श्रीव्यंकटेशाची यात्रा लुटून मार्गस्थ लोकही मारिले होते. एप्रिलअखेरीस निजगल किल्ला घेतांना स्वतः पेशवे हल्ल्यांत नारायणरावासह पुढें असतां, नारायणरावाचे उजवे हातास गोळी चाटून गेली. जखम लवकरच बरी झाली. मुकुंद श्रीपत विळेकर प्रधान शिऱ्याचे बंदोबस्तास होता, त्यास तेथून काढून पेशव्यानें महिमाजी सिंदे यास नेमिलें; आणि त्याच्या मदतीस महंमद इसफ गाडदी व सखाराम हरीचे हाताखालीं बळवंतराव परभू यांस दिलें. या वेळीं हैदर श्रीरंगपट्टणच्या पुढें मैदानांत आला होता, त्यास दोहोंकडून दोन फौजांनीं अचानक गांठावा, म्हणून पेशव्यानें गोपाळरावास तावडतोब बोलाविलें, परंतु हा रंग पाहून हैदर लगेच श्रीरंगपट्टणांत निघून गेला.

ह्या स्वारींत बहुतेक लढणें तुंगभद्रेच्या दक्षिणेस झालें. मराठ्यांनीं हैदराच्या राज्यापैकीं एक कोट उत्पन्नाचा मुलूख लुटून फस्त केला. कित्येक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रांत ओसाड पाडिले. किल्ले आणि शहरें कांहीं काबीज केलीं; व कांहीं खणून काढिलीं. हैदराची लाखों रयत नागवली. लाखों लोक प्राणास मुकले. तथापि तो मराठ्यांस खंडणी देण्यास कबूल होईना. तो म्हणाला, नुकसानी व्हावयाची ती झाली, आतां खंडणी कां म्हणून द्यावी? अर्थात् मनाप्रमाणें काम होईपर्यंत स्वारीचें काम पुढें चालविणें पेशव्यास भाग पडलें. आपण इकडेच छावणी करावी असें ठरवून नारायणराव व रमाबाई यांस त्यानें परत पाठविण्याचें ठरविलें, पण पुनः सर्व सरदार जमवून त्यानें त्यांचा सल्ला घेतला, आणि कोणा तरी सरदाराच्या हाताखालीं फौजा छावणीस ठेवून आपण तूर्त परत जाऊन पुनः दसऱ्यानंतर स्वारीस यावें, कदाचित् पुण्यास दादाचा फितूर असेल; कदाचित् त्याची हैदरासही फूस असेल, असें वाटून त्रिंबकराव पेठे यास स्वारीचा मुख्य कारभार सोंपवून, त्याचे हाताखालीं गोपाळराव पटवर्धन, गायकवाड व सखाराम हरि वगैरे सरदारांस देऊन, पेशवा मे महिन्यांत परत येण्यास निघाला. त्या प्रसंगीं साबाजी भोसले, नारो शंकर वगैरे कित्येक सरदार त्याजबरोबर परत आले. वैशाख वद्य ३० सूर्यग्रहणीं कृष्णाकांठीं घटप्रभेच्या निवृत्तिसंगमीं मुक्काम होऊन, तो जून महिन्यांत पुण्यास दाखल झाला. मागें गोपाळरावास अत्यंत दगदग पडली. त्याचें व त्रिंबकरावाचें पटलें नाहीं. मामाची मर्जी रक्षून राहवें, असें गोपाळरावास त्याचा बाप वारंवार लिहीत असे. या स्वारींत तुंगभद्रेच्या अलीकडे हैदराचा उपद्रव विशेष झालाच नाहीं. वास्तविक पेशवा परत गेल्यानें मोहीम संपली नाहीं. ती आणखी पुढें दोन वर्षें त्रिंबकरावानें तशीच चालविली. सन १७७२ च्या पावसाळ्यांत माधवरावाची प्रकृति विशेष बिघडल्याचें ऐकून त्रिंबकराव पुण्यास गेला. मिळून सन १७७० व १७७१ हे दोन पावसाळे फौजेस कर्नाटकांत आणखी काढावे लागले; आणि हैदरानेंही त्यांच्याशीं चिकाटीचेंच झुंज केलें. 'यंदा छावणी बहुत कठिण पडली. महागाई फार, पर्जन्य फार, सर्व निभाव श्रीमंतांचे पुण्यें करून होईल तसा होईल', असें त्रिंबकराव लिहितो. तहाचें बोलणें हैदराचा वकील आपाजीराम याचेमार्फत चाललें होतें. 'हैदरखान सरळपणानें वागत नाहीं बर त्याचें पारिपत्य पूर्ण केल्याशिवाय राहवयाचें नाहीं. हैदरखानाची प्रकृत अविवेकी, घडीची गोष्ट, घडीस फेर, दरसाल होईल तितका त्याचा मुलूख

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सोडवीत जावा. मसलतीस दिवसगत लागली तरी काय चिंता आहे ? चहूं महिन्यांचे ठिकाणीं आठ महिने लागतील; आठांचे ठिकाणीं दीड वर्ष लागेल; परंतु शत्रूचें पारिपत्य केल्याविना चैन पडणार नाहीं'. अशी पेशव्यानें त्रिंबकरावास निक्षून ताकीद दिली. ती पुढें दोन वर्षांनीं परिपूर्ण करून मराठी फौजा परत आल्या.

५. **त्रिंबकराव पेठ्याची स्वारी व तह,** (जून १७७०-१७७२ जून).— पेशवा स्वतः या शेवटच्या स्वारींत हजर नसला तरी त्रिंबकरावाच्या दोन वर्षांच्या कारभारांत रणशौर्याचे, धाडसाचे व आणीबाणीचे प्रसंग कांहीं कमी झाले असें नाहीं. नुसती ही एकच मोहीम मराठ्यांची घेतली, तरी ती कोणत्याही राष्ट्रीय इतिहासांत प्रशंसनीयच ठरेल, आणि सर्व मराठ्यांच्या अंगीं राज्य करण्याचें राष्ट्रीय कसब त्या वेळीं अनुभवानें किती भिनलें होतें, हेंही त्यावरून उत्कृष्ट निदर्शनास येईल. ह्या स्वारींत पटवर्धन घराण्यांतील पुरुषांचा पराक्रम व स्वार्थत्याग अवर्णनीय दिसून आला. पेशवा परत गेल्याबरोबर १७७० च्या जुनांत गोपाळराव पटवर्धनानें चिक्क-बाळापुराजवळ हैदराच्या फौजेशीं गांठ घालून 'तीनशें जिवें मारिले, पांच-सहाशें जखमी केले; हत्यारें तोफा पाडाव झाल्या. चारशेंपावेतों घोडे सांपडले. दातीं गवत धरलें त्यास तोडलें नाहीं. श्रीमंतांच्या पुण्येंकरून यश आलें'. इकडे हैदर धारवाडकडे मोहीम करणार होता, परंतु मराठ्यांच्या फौजा ठिकठिकाणीं असल्यामुळें त्यास दक्षिणेस येण्याची छातीच झाली नाहीं. त्रिंबकरावानें पावसाळ्यांत विश्रांति म्हणून घेतली नाहीं. बंगलोरच्या ईशान्येस पन्नास साठ मैलांवर गुर्रमकोंडा प्रांत मीररेजा यास जाहगीर असून, तो इसम घटकेंत मराठ्यांस तर घटकेंत त्यांच्या विरुद्ध

१. आधार—खरे ले. ८०४, ८०६, ८२०, ८२७, ८३३, ८३४, ८३८, ८५२, ८५४, ८६४, ८७०, ८७३, ८८०, ८८६, ८८८, ८९०, ८९५, ८९८, ८९९, ९०१, ९०२, ९०३, ९०९, ९१६, ९१९, ९३०, ९३१, ९४६, ९४७, ९५१, ९५८, ९७३, १०३५; टीप पृष्ठ ६८१ व १४५१—मीरफैजुल्लाची पहा. इ. ले. ९९; का. सं. प. या. ९४ (१७-७-१७६९).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धाभून दंगा करी. सबब त्यासच जेर करण्याकरितां मामानें स्वतः गुर्रम-कोंड्यावर चाल केली, आणि गोपाळराव व सखाराम हरि यांस बंगलोर-नजीक हैदरावर नजर राखण्यासाठीं ठेवून दिलें. तेव्हां मीररेजानें पुण्यास पेशव्याकडे पत्र लिहून शरण आल्याचें दाखविलें. हें हैदरास समजतांच त्यानें मीररेजास पकडून कैदेंत ठेविलें. इकडे मीररेजाचा भाचा सैदू मिया यानें गुर्रमकोंड्यांत बंदोबस्त करून किल्ला लुटविला. प्रथम मदनपल्ली घेऊन त्रिंबकरावानें जुलईत गुर्रमकोंड्यास वेढा घातला. त्याचे मदतीस मुरारराव घोरपडे व दुसरे अनेक सरदार होते. 'जागा हस्तगत करावी तरीच सर्वांचा कर्तेपणाचा ठसा व पंतप्रधान यांचा नक्षा, हा राजश्री मामांचा आशय होता. अडीच महिने चिकाटीचें युद्ध झाल्यावर कार्तिक शुद्ध १ (ता. १९-१०-१७७०) रोजीं गुर्रमकोंड्यावर मराठयांचें निशाण चढलें. त्याच सुमारास गोपाळराव पटवर्धनानें कोल्हार प्रांत सर्व काबीज करून हैदराचा सरदार चंद्रोजी जाधव व बाळाजी भीवराव सरकारांत पाडाव आणिले'. मध्यंतरीं बंगलोरजवळ सखाराम हरीच्या फौजेनें हैदरा-च्या एका टोळीचा पाडाव करून सभोंवारचा मुलूख उद्ध्वस्त करून सोडिला. कर्नाटकच्या उद्योगाकडे खुद्द पेशव्याचेंही लक्ष सारखें लागून राहिलें होतें. त्यानें पुण्यास तोफा ओतण्याचा कारखाना जारीनें सुरू केला. गारदी व युरोपियन गोलंदाज चाकरीस ठेविले, आणि बिदनूर-च्या झाडींत हैदराचा परामर्ष घेण्यासाठीं रानतोडे लोकांच्या जमाती मुद्दाम नोकरीस ठेविल्या. वाडीकर सांवत व त्रिंबक सूर्याजी यांनीं इकडून सोंध्यावर स्वारी केली, आणि मराठी आरमारानें मलबार किनाऱ्यावरील होनावर व दुसरीं कित्येक बंदरें काबीज केलीं. अशी चहूं बाजूंनीं पेशव्यानें एकच हूल हैदरावर उठविली; आणि स्वतः पावसाळ्यानंतर पेशवा कर्नाटकांत जाण्यासाठीं कृष्णेपावेतों गेला. परंतु प्रकृति बिघडल्यामुळें त्यास सन १७७१ च्या आरंभीं पुण्यास परत येणें भाग पडलें.

त्रिंबकराव मामा वृद्ध, अनुभवी व राज्यहिताविषयीं अत्यंत दक्ष होता. हिंमतही त्याची अलोट होती. परंतु त्याचा स्वभाव तुसडा असल्यामुळें लोक त्याजवर नाराज असत. गोड बोलून सर्वांवर छाप बसविण्याची कला त्यास नव्हती. 'गुर्रमकोंडा सर केल्यापासून लवकरच गर्व होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मनुष्य तृणप्राय समजतात. हावभरी झाले आहेत. कोणी भाणूस खातरेंत येत नाहीं', असें त्याजबद्दल वर्णन आहे. परंतु माधवरावाचें मत त्याजविषयीं चांगलें होतें. 'मामांनीं फार सांभाळिलें. त्यांच्या एक दोन गोष्टी फार चांगल्या आहेत. पुढेंही काम त्यांवरच आहे', असें माधवराव लिहितो. 'श्रीमंतांच्या मनांत मळमळीत सल्ला करावयाचा नाहीं. पुरतें पारिपत्य करावें. आणखी दहा हजार फौज पाठविली'. अशी तजवीज होत आहे, तों गोपाळ-रावाची तब्यत सर्वथैव बिघडली. त्यास त्याचा बाप लिहितो. 'आशीर्वाद उपरी. स्वदस्तुरें, कोने पिछानेदेखील मजकूर लिहिला तो अक्षरशः वाचून पाहिला. त्यांत स्वशरीरविषयीं केवळ अवसान सोडून लिहिलें त्यावरून अपूर्व वाटलें. ऐशास कोणी हरामजादेपणें घरीं राहिला असा अर्थ नाहीं. चिरंजीव वामनावरी शब्द ठेवावयास जागाच नाहीं. चिरंजीव पंढरीनाथ म्हणाल तर लष्करच्या प्रकरणीं तो तिलमात्र खबरदार नाहीं. घोड्याचा स्वारही नव्हे. तथापि पाठवावाच तर येथील गत काय? आम्ही आहों नाहीं सारखे. व्याधिस्त. एका महिन्यांत चार वेळ दुखणें येतें! सदैव श्वास आहे. एक मुखेंकरून खबरदार आहों, जाबसाल मात्र करावयास. बाकी कर्तृत्वाचा प्रकार नाहीं. बाकी आहेत ते दिवस कागदीं घालवितों! वेडा बागडा लेकरूं एक चिरंजीव गंगाधर तुम्हांजवळ भलतसा आहे. आम्हीं साठ वर्षें चाकरी केली. अलीकडे दहा बारा वर्षें वाताचे व्यथेमुळें घरीं राहिलों. प्रस्तुत सर्व भार सरदारीचा व संसाराचा तुम्हांवरी. तुम्ही पंढरपुरास गेलां तरी आम्हीच तेथें येऊं. या कारभाराविणें आम्हांस कांहीं गरज नाहीं! सर्वांस घाबरें करून लिहिलें यावरून अपूर्व वाटलें. तें पत्र आम्हीं कोणास दाखविलें नाहीं. तुम्ही श्रीकृपेनें १०-११ महिन्यांत देशास येतच आहां. तंवपर्यंत आम्ही स्वस्तिक्षेम असलों तर भेटीचा योग घडेल. तेव्हां सांगणें ते बुद्धिनीति सांगूं. प्रस्तुत तेथें चिरंजीव मंडळी आहे. त्यांची मनोधारणा सर्वांची रक्षून सर्वां लोकांची मर्जी रक्षून संतोषें काल घालविणें. ज्यावरी भार पडला, त्यानें सोसावें, पार पाडावें हा आशीर्वाद'. गेल्या दोन वर्षांत गोपाळरावास अतिशय ताण बसून शरीर फार क्षीण झालें. त्यांत जलोदराची व्यथा होऊन कनकगिरी येथें असतां, आतां आपण वाचत नाहीं, असें त्यास वाटूं लागलें. त्यानें पत्र लिहून बंधु वामनराव यास फौजेंत बोलाविलें,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि आपण परत मिरजेस निघून गेला. घरीं पोंचल्यावर तिसरे दिवशीं ता. १७-१-१७७१ रोजीं मरण पावला. 'त्रिंबकराव गोपाळरावा-करितां फार श्रमी झाले. आम्हा सर्व ब्राह्मणांमध्यें केवळ मुगुटमणि होते. महत्त्व कायम राहून गेले. मुरारराव घोरपडेही फार श्रमी झाले'. या वेळीं मुरारराव स्वतः वायूचा उपद्रव होऊन गुडघे धरल्यानें उठूं बसूं शकत नव्हता. गोपाळराव शरीरानें सडपातळ व मध्यम उंचीचा मनुष्य होता. त्याचा स्वभाव आनंदी व उत्साही असे. हाताखालच्या लोकांचें मनो-धारण करण्यांत तो दक्ष असे, व आप्तेष्टांविषयीं ममताळू परंतु मानी, शूर व तलख होता. त्याच्याइतकी कर्नाटकप्रकरणाची माहिती मराठी राज्यांत मुरारराव घोरपड्याखेरीज दुसऱ्या कोणासही नव्हती. तिकडील सर्व संस्थानिकांवर त्याचें वजन व दरारा भारी होता. हैदरही त्यास अतोनात मानीत असे. अलीकडे कोणच्याही मोठ्या मसलतींत त्याचा सल्ला घेतल्याशिवाय माधवराव कांहीं करीत नसे. मरणसमयीं गोपाळ-रावाचें वय पन्नासाच्या आंत बाहेर असावें. त्याच्या मृत्यूची पेशव्यास बातमी समजली, तेव्हां त्यांनीं चार दिवस चौघडे व दरबार मना केले. गोपाळरावाचा भाऊ वामनराव हाही शूर व कल्पक होता, परंतु त्यास दम्याची व्यथा असल्यामुळें श्रम सहन होत नसत. तरी गोपाळरावाचे पश्चात् त्यानें कांहीं वर्षें राष्ट्राची कामगिरी चांगली बजाविली.

दक्षिणेंतून गेलेल्या फौजा त्रिंबकरावास भिळण्यापूर्वींच त्यांजबरोबर गांठ घालण्याचा हैदरानें प्रयत्न केला, तो न साधतां फौजा सन १७७१ चे फाल्गुनाचे आरंभीं तुमकूर येथें एकत्र होऊन, हैदराचें मुख्य ठिकाण बेदनूर तें काबीज करण्याच्या उद्देशानें शिमोग्याकडे चालल्या. वाटेंतील किल्ले व ठिकाणें त्यांनीं काबीज केलीं हें पाहून, आपली छावणी हालवून हैदर मराठ्यांशीं झुंजण्याकरितां श्रीरंगपट्टणचे बाजूस येऊं लागला. तेव्हां त्याची माहिती काढण्यासाठीं सखाराम हरीनें तीनशें लोकांनिशीं थेट हैदराचे छावणींत जाऊन सर्व गोट लुटून बातमी काढून जे अद्भुत पराक्रम केले, त्यांवरून त्याच्या धाडसाचा लौकिक पुढें अजरामर झाला. ता. ८ मार्च रोजीं श्रीरंगपट्टणचे आश्रयास हैदर जात असतां, वाटेंत मराठ्यांनीं त्यास एका-एकीं गांठून त्याजबरोबर अहोरात्र मोठी तुंबळ लढाई केली, त्यास मोती-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तलावाची लढाई म्हणतात. 'मराठ्यांनीं थेट हैदराच्या तोफांवर चालून जाऊन त्या बंद पाडिल्या. तेव्हां तोफा सोडून आराव्यांत शिरतांच त्याचा मोड झाला. तोफा, हत्ती, वगैरे सलतनत लुटली गेली. पंचवीस हजार माणूस, गाडदी बारा हजार व पन्नास तोफा येणेंप्रमाणें एक घटकेंत सत्यानाश झाला. मात्र या लढाईंत नीळकंठराव त्रिंबक पटवर्धन व त्याचे दुसरे आठ इसम गोळी लागून ठार पडले. अनुचित गोष्ट झाली. नीळकंठराव मोठें रत्न होतें. त्रिंबकरावमामा फारच श्रमी झाले. हैदरनायकाचें झुंज असें कधीं झालें नाहीं. पंचवीस हजार गाड्यांची एक शिलग होई तेव्हां गगन गर्जत असे. नीळकंठराव, परशुराम भाऊ, वामनराव बाबा, या तिघांनीं व लहानापासून थोरापर्यंत सर्वांनीं मोठी शर्थ केली. नीळकंठरावामुळें हर्षभंग झाला. श्रीमंत थोर पुण्यवंत त्यांस ईश्वरें यश दिलें'. हैदरखान पळून श्रीरंगपट्टणचे आश्रयास गेला, तेव्हां खुद्द पट्टणावर हल्ला करण्याचें ठरवून चैत्र शुद्ध १स तेथें मराठी फौजा दाखल झाल्या. हें फार मजबूद ठिकाण, आंत दारुगोळा व सामान भरपूर, तें सहसा लवकर कबजांत येण्याचा संभवच नव्हता. एकदां हैदरानें बाहेर येऊन मराठ्यांवर चढाई केली. पण फिरून मराठ्यांनीं त्यास पिटून किल्ल्यांत घालविलें. पट्टण, बेंगरूळ व बिदनूर हीं तीन ठिकाणें हैदराचे कलिजे. बेंगरूळजवळ चारादाणा नाहीं. पट्टण तों सर्व प्रकारें बिकट, यास्तव बिदनुरावर जावें; बिदनूर जरी झाडीनें अवघड, तरी आवईनें घेतां येण्याजोगें आहे. सबब बिदनुरास जावें; पट्टणास न गुंतावें, असें पेशव्यानें त्रिंबकरावास लिहून पाठविलें. सव्वा महिना मोर्चे होते. पांच सात रोज सल्ल्याचें बोलणें हैदरानें लाविलें होतें. 'पंचेचाळीस लक्ष रुपये तीन सालांची खंडणी देतों. एका घोड्यानिशीं आम्ही व टिपुमिया पट्टणांत आलों. झाडून दौलत बुडाली. आपल्या जवळ पैका द्यावयास ताकद नाहीं. वीस लक्षांचा गुर्रमकोंडा तुम्हीं घेतला; निजगल तालुका सर्व तुम्हीं खराब केला. असें असतां पंचेचाळीसांहून जास्त पैसा कसा मिळेल? सालमजकुरीं खंडणी माफ करावी', असें साखरपणाचें बोलणें हैदर बोलत होता. खंडणी चढवावी, असें त्याचें मानस नाहीं, असें जाणून अक्षयतृतीयेचे मुहूर्तें पट्टणांतून कूच करून मराठी लष्करें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोतीतलावाचे मुक्कामीं आलीं, आणि पुढें पावसाळ्यांत इतर सर्व ठाणीं घेण्याच्या उद्योगास लागले. मध्यंतरीं शिरें येथें महिमाजी सिंदे बंदोबस्तास होता. त्यानें एक हजार लोक घेऊन बाहेरच्या एका ठाण्यावर हल्ला केला असतां, हैदराच्या लोकांनीं त्याचा पाडाव केला, आणि त्यास पकडून नेलें. सन १७७१ च्या पावसाळ्यांतही लढणें चालूच होतें. उभयतां एकमेकांचा पिच्छा सारखा पुरवीतच राहिले. त्रिंबकराव घांटाखालचा मुलूख जिंकण्यास गेला असतां, एक मोठी लढाई होऊन हैदराचे फौजेचा पराभव झाला. त्या वेळीं सर्व सामान व जखमी लोक तसेच टाकून पळून जाण्याचा बेत हैदराचे सरदारानें केला. तेव्हां ते जखमी लोक सर्व रडूं ओरडूं लागले असतां, त्या सर्वांची मारेकऱ्यांकरवीं, साफ कत्तल करवून मराठयांस चाहूल लागू न देतां रात्रीच्या अंधारांतून आपण पळून गेला. अशीं अंगावर शहारे येणारीं किती तरी कृत्यें या प्रकरणांत झालेलीं आहेत. पुढें त्रिंबकरावानें इंग्रज, महंमदअली, तंजावरचा राजा, कुर्गचा राजा वगैरेंस सामील करून हैदराची कायम वाट लावण्याचा जम बसविला; आणि पावसाळ्यानंतर पुनः जोरानें मोहीम सुरू केली. तहाची वाटाघाट तर सारखी चालूच होती. अर्काट, कडाप्पा, कोइमतूर एवढ्या टापूंतला सर्व प्रदेश मराठयांनीं उद्ध्वस्त करून टाकिला. याप्रमाणें आश्विनपासून फाल्गुनपर्यंत हैदराची सर्वत्र दुर्दशा झाली. इतकें होऊनही हैदर तहास कबूल होत नव्हता. याचें कारण पेशवा क्षयाचे व्याधीनें आजारी असल्याची व तो फार दिवस जगणार नाहीं, अशी मराठ्यांकडील इत्थंभूत बातमी हैदरास लगोलग मिळत होती. त्यांत दादाचाही त्याजकडे पेश होताच. पेशवा मरण पावला, कीं मराठयांचा जोर खलास झाला असेंच हैदरानें ताडिलें. त्याचे सर्व वकील आपाजीराम वगैरे दक्षिणी ब्राह्मणच होते. त्याच्या फौजेंत सुद्धां ब्राह्मण व मराठे सरदार व लोक पुष्कळ होते. म्हणजे या वेळीं सुद्धां माधवराव पेशव्यासारख्या राष्ट्रासाठीं झगडणाऱ्या पुरुषाच्या अमदानींतही अनेक मराठे लोक शत्रुपक्षास सामील होते; आणि शत्रूकडून वेतनें व बक्षिसें घेऊन स्वराष्ट्रघात करीत होते. म्हणजे औरंगजेबानें दक्षिणेंत मराठयांशीं युद्ध चालविलें, त्या वेळचा प्रकार व हल्लींचा हा हैदराचे वेळचा प्रकार अगदीं सारखा होता. इतकेंच नव्हे तर मुंबईस सुद्धां इंग्रज वगैरे जे प्रति-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्पर्धी कारस्थानें करीत होते, त्यांस मुख्य प्रोत्साहन ब्राह्मण वगैरे सर्व जातींकडून मिळत होतें. नारायणरावाचे खुनानंतर जो झगडा दादा व बारभाई यांचा झाला त्यांतही हाच प्रकार ठळक दिसतो. म्हणजे मराठ्यांच्या अंगीं राष्ट्रीय भावनेचा एवढा अभाव होता. 'त्रिंबकराव सर्वथा मुरारराव घोरपडे याच्या अनुमतें चालणार. त्यांचे विचारांत सलूख व श्रीमंतांचें कल्याण व्हावें हें किती आहे आपण जाणतांच'! असे अंतस्थ भाव सरदारांचे असत. अर्थात् ऐन भरभराटीच्या काळीं उत्कृष्ट राष्ट्राभिमान मराठ्यांचे ठिकाणीं कधींच व्यक्त झाला नाहीं. तरी त्रिंबकरावाचा विचार सन १७७२ च्या पावसाळ्यांत कर्नाटकांतच छावणीस राहवें असा होता. पटवर्धन तर वाताहात होऊन इतके बेजार झाले कीं, 'आम्ही साफ छावणीस राहणार नाहीं. सरदारी न राहिली तरी उत्तम. प्राक्तनीं असेल तसें होईल', असें कोन्हेर. त्र्यंबकनें मामास कळविलें. परंतु हैदरही जेरीस आलाच होता. बहुतेक राज्य गेलें. बंगलोर, श्रीरंगपट्टण व बेदनूर एवढींच ठिकाणें राहिलीं. तींही हातचीं जाणार. त्रिंबकराव त्याच्यावर अतिशय चिडून गेला होता. बिदनूरचा फडशा उडविण्याच्या व सर्व मुलूख बेचिराख करण्याचा त्याचा निश्चय झाला होता. सर्व तयारी करून स्वारी करणार इतक्यांत पुण्यास पेशव्याची प्रकृति विशेष बिघडल्यानें मामास सलुखाविषयीं निकडीचीं पत्रें गेलीं. 'नंदीगड, चिक्कबाळापुर देखील घेऊन पन्नास लक्ष रुपयांची निशा करून घेणें. छावणीस न राहणें', असें पेशव्याचें लिहून आलें. अशा रीतीनें उभयपक्षीं सलुखाची निकड उत्पन्न होऊन तह ठरला. या तहानें शिवाजीच्या मरणसमयीं कर्नाटकांत जितकें म्हणून स्वराज्य होतें तितकें, म्हणजे मुख्यतः शहाजीच्या जहागिरीचा मुलूख शिरें, होसकोटें, थोरलें बाळापुर वगैरे मराठ्यांकडे कायम झालें. बेंगरूळ परगणा न मिळतां त्याचे बदल्यांत मदगिरी मिळाला. वीस लक्षांचा गुर्रमकोंडा त्यांजकडे आलाच होता. येणेंप्रमाणें त्रिंबकराव पेठ्यानें दोन वर्षें आपली शिकस्त करून माधवरावाचे संकल्प पूर्ण करून मरणसमयीं त्याचें मन निश्चिंत केलें. एकंदरींत एवढा हा आठ वर्षांचा कर्नाटकांतील उद्योग मराठ्यांचे कीर्तीस भूषण आणणारा असून, पुढें सवाई माधवरावाचे कारकीर्दींत तो बहुतेक सिद्धीस गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यावरून इंग्रज मध्यें आले नसते तर हिंदुस्थानांत सार्वभौम सत्ता मराठ्यांची झाली असती, हें उघड दिसतें'.[1]

प्रकरण पस्तिसावें

दादाचें उद्वेगजनक आख्यान

[सन १७६३–१७७२]

१. संसारनिवृत्तीचें दादाचें ढोंग, (सन १७६४–६५).
२. राज्याच्या वांटणीची मागणी.
३. संग्रामाची तयारी, आनंदवल्लीस मिलाफ, (दिपवाळी १७६७).
४. अमृतरावाचें दत्तविधान, धोडपेची झोडप, (१०-६-१७६८).
५. शनिवारवाड्यांतील कैद व फितूर, (१७६८–७२).
६. दादाची नेमणूक, परिवार, आनंदवल्लीचा वास.

१. **संसारनिवृत्तीचें दादाचें ढोंग,** (सन १७६४–१७६५).— माधवरावानें सन १७६३ च्या अखेरीस कर्नाटकाची मोहीम ठरविली आणि दादास प्रथम बरोबर घेतलें. ता. १-१-१७६४ रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो, 'दादांनीं कर्नाटकांत यावें म्हणून बहुत आग्रह केला.

---

१. **आधार**:—का. सं. प. या. ११८, खं. १०. ६६, ६७, ६९, ७०, ७४; खरे ले. ९८०, १०३९, १०४५, १०६८, १०६९, १०७४, १०७५, १०८०, १०८७, १०८८, १०९३, १०९७, ११०२, ११०३, ११२४, ११३६, ११६६, ११६७, ११७१, ११७४.

२. रघुनाथराव हा लांब शब्द वारंवार येतो, म्हणून त्याचा प्रचारांतला संक्षेप 'दादा' हाच सर्वत्र स्वीकारिला आहे. या प्रकरणांत येणाऱ्या मजकुराचे तमाम आधार प्रथमच पुढें एकत्र दाखविण्यांत येत आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परंतु त्यांचे चित्तास न येऊन त्रिंबकास जावें असें ठरलें. तेथें कारभार करावा असा प्रकार नाहीं. स्वस्थ जाऊन बसावें. या अर्थे जाणार. बरोबर गोविंद शिवराम लिमये खासगीवाले, व त्रिंबकराव मामा पेठे जातात. आबा पुरंदरे, नारो शंकर वगैरेही सत्वरच जातील'. पैकीं पहिले दोघे माधवरावाचे पक्षांतले दादांवर दडपण म्हणून दिलेले होते. दादास ते जवळ असलेले आवडत नसल्यामुळें त्यांची फारच त्रेधा उडत असे. माधवरावानें मात्र अशी खबरदारी ठेविली कीं, हरहंमेश चुलत्यास पत्रें पाठवावीं, प्रकृति विचारावी; मोठमोठ्या घडामोडी लिहून कळवाव्या, महत्त्वाच्या प्रकरणीं सल्ला विचारावी. वास्तविक निजाम, भोसले, सिंदे इत्यादिकांचीं प्रकरणें व पुण्यांतील कांहीं कारभार दादाकडूनच चालले. ता. २५-१-६४ रोजीं माधवराव निजामकडील आपल्या वकिलास लिहितो. 'निजामअलीखानाकडील बातमी तीर्थरूपांकडे लिहीतच असाल, इकडेही बातमी कळली पाहिजे. मजकरितां बारीकमोठें वर्तमान वरचेवर लिहीत जाणें'. माधवरावाच्या या कलामुळें दादाच्या पक्षांतील मंडळी सुद्धां पेशव्यास सामील झाली. नारो शंकर फेब्रुवारींत लिहितो, 'दादांची आज्ञा घेऊन दरमजल रावसाहेबांचे स्वारींत चाकरीस येऊन विजापुरचे मुकामीं हजर झालों. बहुत कृपा करितात'. सखारामबापूस कारभार सांगून माधवरावानें आपल्याबरोबर स्वारींत घेतलें होतें. (ता. १६-३-२४)'.[१] रोजीं माधवराव गोपिका-

---

१. इ० ७८, ९२, ९५, ९६; चं. द. १; मा. रो. १. ८४, ८५, ८७, १०७, ११२, ११६, ११८, १४५; ऐ. स्फु. ले. ३. २२; मा. च. श. पृष्ठ ५५-५६; Forrest P. 159; खं. १०, ३९–४१, ४७–४९; खं. १२. ६५, ७३ (ता. ६·७·१७६४); खं. १३. ८४; खं. १४. ४, ६, १०, ३५, ४९, ५६, ६४, ६५, ६९; खरे ले. ३९६, ४०५, ४२८, ४२९, ४३२, ४३३, ४४३, ४९२, ५१३, ५३१, ५५२, ५७४, ५७८, ५८०, ६१८, ६३३, ७१५, ७२०, ७२६, ७२७, ७२८, ७६३, ७६४, ७७०, ७७२, ८०२, ८०८ व खरे पृष्ठ ८८०, १२३४, १२४७. अप्रकाशित पत्रें; का. सं. प. या. २४० व १४२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाईचा कारकून रामचंद्र नारायण गोरे यास लिहितो, 'दादा प्रस्तुत कोठें आहेत? मर्जी कशी आहे? बोलण्यांत काय भाव आहे? इकडील वर्तमानें तिकडे काय येतात? तिकडे काय प्रकार पुरंदरे वगैरे घाटीत आहेत? मातुश्रीचे व दादांचे बोलण्याचा प्रकार काय झाला, तें लिहिणें'. यावरून फाल्गुनपावेतों दादा व मातुश्री पुण्यांतच होतीं, नाशकास गेलीं नव्हतीं, असें दिसतें. दादासाहेब व गोपिकाबाई बहुधा चैत्रांत थोड्या बहुत अंतरानें नाशकास गेलीं. ता. ४-५-१७६४ रोजीं त्रिंबकराव पेठे नाशकाहून लिहितो. 'श्रीमंतांनीं किल्ले त्रिंबकची पेठ पसंत करून नवें घर बांधिलें. दुसरें घर मौजे चांवडस लहानसा गांव नाशकावरता दोन कोस आहे तेथें बांधिलें. जवळच कोसावर जलालपुर म्हणून आमचा गांव आहे, तेथें मातुश्री येऊन राहिली. श्रीमंतांचा संतोष राखण्याकरितां गंगापुरास तीही आली. आठ पंधरा दिवशीं श्रीमंतही तेथें जाऊन भेटतात. आम्ही दोहों चोहों दिवशीं श्रीमंतांचे दर्शनास जातों. दादाचा कुल अखत्यार चिंतो विठ्ठलावर आहे. मातबर कारभारी आबा पुरंदरे. होळकर मंडळी सर्व कल रक्षण्याकरितां येऊन राहिले. सारें कूट एकच आहे. सर्व मायेंत शिरोन दौलत बुडेल तर बुडो, परंतु आपले स्वार्थाचा अर्थ करतात. श्रीमंतांचा प्रकार क्षणभंगुर. गोविंद शिवराम व आम्ही जितकें बोलणें रावसाहेबांचे तर्फेचें तितकें बोलत असतों. परंतु उशेपायगतीं सारी तीच मंडळी विपरीत भासवितात. अग्निहोत्र घेणार होते. कुंडें घालून संकल्प करण्यापर्यंत आल्यावर, हे किरकिर आम्हांस पुरवणार नाहीं, असें म्हणून कुंडें गंगेंत टाकिलीं, पालख्या, घोडीं पाठवून भट जमा कले होते, त्यांस निरोप दिला. चिंतो विठ्ठल त्यांचा कारभारी मनस्वी, दौलत बुडविण्यांतच जमा आहे. याउपर ईश्वर रक्षिल तर न कळे. मातुश्री संतोषेंकरून आहे. विशेष उद्योग भाव कांहीं नाहीं'. दादास सांभाळावें कसें, हाच सर्वांत मोठा पेंच होता. तो पेंच माधवरावानें मातुश्रीचे हवालीं केला. तेवढ्याच साठीं ती नाशकास गेली. रुसून वगैरे गेली नाहीं हें उघड होतें. दादाहून गोपिकाबाई निदान दहा वर्षांनीं मोठी होती, हें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

चुलत्या पुतण्यांची तेढ उत्पन्न होण्यास सन १७६४ च्या उन्हाळ्यांत एक आकस्मिक कारण झालें. 'किल्ले पुरंदर श्रीमंतांनीं सरकारांत घेतला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यामुळें नीलकंठ महादेव दादासाहेबांपासून रुसवा करून नाशकाहून पुण्यास आले. त्यावरून पुण्यांतील लोकांनीं आवई खाली. फारच गडबड झाली'. हा किल्ला दादांनीं पुरंदऱ्यास दिलेला असून तो त्यानें परत घेतल्यामुळें पुरंदरे नाखूष होऊन परत आला. तो कदाचित् बंड करील म्हणून पुण्याचे लोक घाबरले. तसेंच पुरंदरावरील कोळ्यांस काढून लाविल्यामुळें त्यांनीं दंगा केला. ह्या कोळ्यांस चिथविण्याचें काम स्वारींतून माधवरावानें केलें, अशी समजूत दादांची झाली. ती दुरुस्त करण्यास माधवरावास किती तरी प्रयास पडले. 'श्रीमंत स्नानसंध्येकरितां नाशकास येऊन बसले, परंतु स्वस्थचित्त राहणार राहूं देत नाहींत. श्रीमंतांची दौलत लयास जाण्याचा प्रकार कर्ते करितात. पुरंदरामुळें तर फारच विपरीत विकल्प दर्शवितात; आणि मनस्वी भाषण करितात. कोणे रंगास जाईल पहावें. ईश्वरें परिणाम कसा नेमला आहे कळत नाहीं'. माधवरावानें स्वारींतून लिहिलें, 'पुरंदरचा प्रकार आम्हांकडून नाहीं. तीर्थरूपांस आमचा संशय येईल यास्तव त्यांस शपथपूर्वक पत्र लिहून पाठविलें आहे'. पुरंदरचें प्रकरण १७६५ च्या सेप्टेंबरपावेतों पुरलें. माधवराव सन १७६४ च्या पावसाळ्यांत कर्नाटकांतच छावणीस राहिला. ता. ३०-६-१७६४ रोजीं माधवराव चुलत्यास लिहितो, 'सरदार डोईजड व पत कोठेंच राहिली नाहीं. चाकरीकरितां नेट धरून बोलल्यास वडिलांस विपरीत प्रदर्शन करून तत्काळच घरांत पेंच पाडून, राहिली हेही दौलत बुडवावयास सिद्धच आहेत. सर्व पेंचांत आले. दौलतीचा बंदोबस्त करणार वडील समर्थ आहेत. आम्ही आज्ञेप्रमाणें वर्तावें, सेवा करावी, यांतच इहपरलोक आहे. दौलतेचा बंदोबस्त केला म्हणजे यांतच सर्व स्नानसंध्येचें फल आहे. मर्यादा सोडून लिहिलें म्हणून वाईट न मानिलें पाहिजे'.

कारभार कोणीं करावा याबद्दल धुसपूस चालून १७६४ च्या आरंभीं पेशवा कर्नाटकांत गेला, तेव्हां पुण्यास नाना फडणिसानें कारभार करावा व दादांनीं नाशकास स्वस्थ बसावें असें ठरलें होतें. 'राजश्री नाना फडणीस यांसी पुण्याहून दादांनीं आपणासन्निध नाशकास बोलावून नेलें. पुण्यांत कारभार करणें तो एकजागीं आपणच नाशकास पाहवा, या अर्थें नानास पुण्याहून नेलें, असा उल्लेख १४-८-१७६४ च्या पत्रांतला आहे. सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कारभार एकमुखी असावा. आपसांत कलह असले तरी ते बाहेर दिसूं नयेत, असें माधवरावाचें धोरण असून, त्यानें आपल्याबरोबर मोरोबा फडणीस व सखाराम बापू यांस स्वारींत नेलें, आणि पुण्यांत नाना फडणीस यास ठेविलें. दादा स्वस्थ बसेना. तो ढवळाढवळ करूं लागला. तें बंद करण्यासाठीं तोड निघाली कीं, नानानेंच नाशकास दादाजवळ राहून कारभार करावा. पण या गोष्टीस नाना कबूल नव्हता. नाशकास जाण्यापूर्वी त्यानें आपले विचार ता. २५-७-१७६४ रोजीं गोविंद शिवरामास लिहून कळविले. 'श्रीमंतीं चित्ताचे उत्साहें करून आम्हींही त्र्यंबकेश्वरीं यावें या आशयें लिहिलें होतें, त्याचें उत्तर पाठविलें तें पावलें असेलच. लौकिकांत उत्तम दिसावें. आपलेही चित्तांत उमेद येऊन स्वामिसेवा योग्यतेप्रमाणें घडावी, असा मजकूर जाबसालांत निखालस आढळत असला तर तसेंच लिहावें. एकनिष्ठतेस अंतर पडूं देणार नाहीं. परंतु आणखी आम्हांपेक्षां अधिक विश्वासु, त्यांचेंच प्रमाण, आमचे बोलण्यास संदेह, असा प्रकार असल्यास आपलेही चित्तास प्रशस्त युक्ति मनसबा सांगावयास होत नाहीं. जर आमची परीक्षाच पाहणें असेल, तर सहा महिने वर्षभर आमचे वचनीं विश्वास ठेवून श्रीमंतांचेच लगामीं सर्व राहून, दौलतेस उपयोगी अशी मसलत सुचेल ती सांगूं, आणि मर्जीप्रमाणेंच वर्तणूक करूं. नाहीं तर मळमळीत दोहींकडेही उपयोगीं पडत नाहीं. तर ह्या गोष्टी खोलून जपून एकांतीं बोलून उत्तर पाठवावें. त्र्यंबकेश्वरीं यावें असें तुमचे विचारें असल्यास येऊं. दिवसेंदिवस ममतावृद्धि होय तोच प्रकार मनसब्याचे विचारें पाहतां उपयोगी. फार लाभ इच्छावयास कालही नाहीं'. यानंतर नाना फडणीस थोडे दिवस दादाकडे गेला; पण तेथें जम न बसून लगेच परत आलेला दिसतो. दादाही निघून पुढें कर्नाटकांत गेला. नाना फडणीस त्याच्याशीं किती खुबीनें व्यवहार करीत होता, हें गोपाळराव बर्व्यांचे दुसऱ्या एका भानगडीवरून दिसून येईल. तो प्रकार असा.

दादांचा मेहुणा गोपाळराव गणेश बर्वे कोणाचाच हुकूम न ऐकतां मनमाने तसें वर्तन करी. बऱ्हाणपुरचा सुभेदार नारो कृष्ण दादाच्या आश्रयानें माधवरावास हिशेब देईना. असें वर्तन माधवराव थोडेंच सहन करणार! तो लिहितो. 'हुकूम न मानतां जाबसाल केले. त्यावर खिजमतगाराबरोबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar
गुरुकुल कांगड़ी

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पत्र सादर केलें. त्यांशींही मनस्वी भाषण केलें. तदोत्तरही पत्रें माणसें पाठविलीं. त्यांस शहरांत घेतलें नाहीं. बेदिलीच्या व अमर्यादेच्या गोष्टी सांगितल्या. माणसें फिरोन आलीं. गोपाळराव गणेशांनीं बदमामलीची गोष्ट सांगितली. त्याचप्रमाणें नारो कृष्णासही उमेद आली. एवंच हा मार्ग पडतो. यांत खावंदगिरीचा बोज काय? यास्तव अशा गोष्टीस पारिपत्य असावेंच. काम थोडें म्हणून कानाडोळा करावा तर लौकिकांत वाईट. खावंदगिरीस उचित तेंच झालें पाहिजे. म्हणोन मल्हारराव पानशे यांस फौजेसह पाठवून कैद करून आणिलें. कैद वडिलांची; अमर्यादा नसावी. सेवक लोकीं मर्यादेनें वर्तावें हे शिक्षा. आज्ञा वडिलांचीच आहे. नाहीं तर असा प्रकार नारो कृष्ण याजवर व्हावा असें नाहीं'. (का. सं. प. या. १४२, ता. ४-६-१७६६ व १४० ता. २५-६-१७६६). अशा रीतीनें अनेक इसम दादाचा आश्रय करून स्वतःच्या फायद्यासाठीं बंडखोरी करीत, त्यामुळें चुलते-पुतण्यांत वारंवार तेढ उत्पन्न होई.

दादाचा संपूर्ण इतबार चिंतो विठ्ठलावर होता. उभयतांचे विचार व कारस्थानें कशीं चालत त्याचे अनेक कागद मोठे मजेदार आहेत. सन १७६४ च्या पावसाळ्यांत माधवराव कर्नाटकांत छावणीस असतां दादा मागें नाशकाकडे राहून नानातऱ्हेचे उपद्व्याप करीत होता. ऑगस्टांत तो चिंतो विठ्ठलास लिहितो, 'भोसले, मोगल, हैदर, जाधव चार एके जागां झाले. इतक्यांशीं साद बांधणें दुरापास्त आहे. खजानपुर आहों (म्हणजे आमच्या जवळ पैसा किती आहे) तें कळतच आहे. सालमजकुरीं आमचे वर्षप्रवेशकाळीं लग्नीं गुरुशुक्र दोनही सहावे पडले आहेत, ते चैन पडूं देणार नाहींत. अब्रू वांचतां संकटच दिसतें. परंतु एक ईश्वर कृष्ण आहे तर कांहीं भीत नाहीं, गुरुशुक्रही अनुकूळ होतील. हा दैवी विचार झाला. परंतु मानवी विचार कसा करावा त्याची योजना लांब विचारानें करावी. तोडीवर तोडी बोलाव्या. हे गुरुशुक्र ब्राह्मणशत्रूचा व दैत्यशत्रूचा दोघांचाही उत्कर्ष करावयास चुकणार नाहींत. ईश्वर संतोषें करील तें करो. आमचा तर निश्चय, कीं प्राण गेला तरी दुसऱ्याची याचना न करावी. प्रसंगास आली म्हणून ही गोष्ट तुम्हांस खोलून लिहिली. ईश्वर आमचे अंतर्यामीं आहे. तुम्हीं चहूंकडे तर्तुदी कराव्या. मल्हाररावांस पत्रें लिहावीं. महादजी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सिंदे चाकर रुसून गेला आहे त्यास चार पत्रें युक्तीनें गळ घालून लिहावीं. तुम्ही व आबाजी महादेव, चिंतो अनंत देवस्थळे, त्रिंबक विनायक, असे चवघे बसोन वादप्रतिवाद करून सिद्धांत लिहून पाठविणें. चहूंकडे पत्रांचे पूर चालविणें. पत्रामागें पत्र व बातम्या चालविणें. केवळ हेंच तपश्चर्या समजोन याच उद्योगांत राहणें. गाई, ब्राह्मण, देव यांचें रक्षण करणें हेंच तप. हाच जप. यांत जें पुण्य लागेल तें चार माळा ओढल्यानें लागणार नाहीं. दिवसास निजत न जाणें. रात्रौ दीड दोन प्रहर कारभार करणें'. या पत्रावरून विचारांच्या व अवसानाच्या लहरी दादाचे अंतःकरणांत कशा उठत, त्याच्या जिव्हाळ्याचीं माणसें कोण होतीं, इत्यादि अनेक गोष्टींचा खुलासा होतो. मात्र वरच्या उपक्रमापासून कांहीं एक निष्पत्ति झाली नाहीं. यांत सांगितलेला आबाजी महादेव सोवनी हा दादाचा कट्टा अभिमानी, पुढें नारायणरावाचे खुनांत प्रमुखपण घेणारा, आणि म्हणूनच नानाफडणिसाकडून अत्यंत कठोर शिक्षा पावलेला असा होता.

दादाचे विकल्प वाढतच होते ते स्वस्थ राहत ना, तेव्हां पुनरपि त्यास आग्रह करून माधवरावानें आपणाकडे स्वारींत बोलाविलें. 'श्रीमंतांस तयार करून भाद्रपदमासीं त्यांस घेऊन आपणाकडे येतों', असें गोविंद शिवराम लिहितो. श्रावणांत दादानें निजामाकडील वकिलास पत्रें लिहून पुढील उद्योगाची भर दिली. पण त्याचें चित्त अत्यंत उदास होतें. 'प्रकृति फार क्षीण झाली. अडीच प्रहरपर्यंत पोथी वाचणें, नंतर थोरले पगांतीस होईल तें अन्न जेवावें, सदैव रात्रंदिवस ईश्वरभजन करावें'. असा वैताग न करण्याबद्दल माधवरावानेंही त्यास परोपरी लिहिलें. 'अलीकडे वडिलपणाची आज्ञा विस्तारयुक्त येत नाहीं, तेणेंकरून मजपासून कांहीं आज्ञेशिवाय वर्तणूक झाली असेल असा संदेह वाटतो'. (९-१०-१७६४) पुढें एकदांचा डिसेंबरांत दादा कर्नाटकांत जाण्यास फौज जमवीत निघाला. नाशकाहून पैठणाकडे गेला, 'तेथून दक्षिण प्रांतें जातात. बराबर तोफा ८० पावेतों आहेत. फौज भारी, भोसले गायकवाड येणार'. जानेवारींत त्याचा मुक्काम पंढरपुराजवळ असून बरोबर नारायणरावही होता. गोविंद शिवराम त्याजवर जावत्यास होता. आबा पुरंदरे जवळ राहून बरे वाईट कारभार शिकवीतच असे. 'प्रवास अगदीं थंड चालला. रस्त्यांत फलटण व इतर मुलखांत लूट करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांनीं पैका उकळिला. पटवर्धन व इतर जे कोणी दादाचे विरोधी होते, त्या सर्वांचे प्रांत त्यानें लुटले व वेचिराख केले. सांपडेल त्यास हाणमार करून सत्यानाश केला. यवनापेक्षां निष्ठुरता धरली. केळीचे बाग तलवारीनें तोडले, उसाचे फडांचीही बाकी राहूं दिली नाहीं'. माधवराव पानसे यांचा मुलगा व भाऊ महिपतराव तोफखान्यावर होते. तोफाही भरपूर होत्या; त्यांचा उपयोग दादानें स्वतःचाच प्रदेश लुटण्यांत केला. दादाची राज्य करण्याची कल्पना ही अशी होती. 'श्रीमंत माधवरावाचें पुण्य समर्थ' एवढेंच काय तो भरंवसा रयतेस वाटत होता. अशा रीतीनें दादा जात असतां, त्याचे मनांत किल्मिष उत्पन्न होऊन, त्यानें पुढील कामाच्या कांहीं अटी पुतण्यास कळविण्यासाठीं गोविंद शिवरामास त्याजकडे पाठविलें. तो पेशव्याशीं कांहीं मजकूर बोलून दादास आणावयास परत आला. पेशव्यानें सर्व पर्याय मान्य केले, आणि जानेवारी अखेर उभयतांचा मिलाफ [illegible] प्रांतांत झाला. ता. ८-२-१७६५ रोजीं दादानें भावजयीस लिहिलें, 'चिरंजीव बहुत शहाणे झाले आहेत. कारभार आमचे मर्जीप्रमाणें करितात. श्रीमंतानें उभय तीर्थरूपांपेक्षां अधिक करीत आहेत'. असें लिहिणारा दादा जरा दूर झाला म्हणजे दुसऱ्यांचे तंत्रानें कसा वागूं लागतो, तें पाहून आश्चर्य वाटतें. कर्नाटकांत चुलतेपुतणे भेटल्यावर ता. ३०-३-१७६५ रोजीं हैदरशीं तह झाला. मात्र तहानें जितका फायदा पेशव्याचे पदरांत पडला पाहिजे होता, तितका दादाच्या येण्यामुळें पडला नाहीं. तदनंतर गोपाळराव पटवर्धनास स्वारीत ठेवून, दादा व माधवराव सन १७६५त बरसातीचे आरंभीं पुण्यास परत आले.

अष्टप्रधान व सरदार यांची व्यवस्था बदलून नवीन योजना करण्याचा विचार दादाचे मनांत येई, पण त्यांत खऱ्या सुधारणेऐवजीं स्वतःचा मतलबच विशेष असल्यामुळें, पदांच्या घालमेलींपासून असंतोष व नुकसान उत्पन्न झालें. प्रतिनिधि, सेनापति, सचिव, सेनासाहेबसुभा, सेनाखासखेल, इत्यादि पदांच्या घालमेली केवळ स्वार्थासाठीं करण्यांत आल्यामुळें. पेशव्यां-संबंधीं दुष्टावा मात्र लोकांत वाढला. शिंदे होळकरांचे सरंजाम [illegible] तेव्हां निकालांत आणिले नाहींत. प्रथमच महादजीला शिंद्याचे सरदारीवर दाखल केलें असतें, तर उत्तर हिंदुस्थानाचा बंदोबस्त त्यानें लगोलग केला असता. यासंबंधानें गोविंद हरीनें आपल्या पत्रांत वारंवार खरमरीत टीका

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केली आहे ती वायफळ नव्हे. नारो शंकराचा वैताग, शिंदे-होळकरांचे रुसवे, धुळप, बाबूजी नाईक, पुरंदरे यांचीं प्रकरणें, पुरंदरचे कोळ्यांचा दंगा, वगैरे अनेक गोष्टी दादाच्या धरसोडीमुळें पेशव्यास त्रासदायक झाल्या. त्यांचें शक्य तितकें निरसन माधवरावानें सवडीनुसार केलें. दादास आवर-शक्ति बिलकूल नव्हती. घरांत भांडणें, आपणच आपली प्रजा लुटणें, व बाहेरच्या शत्रूंचा त्रास, यामुळें राष्ट्राचा हळूहळू अधःपात झाला. श्रीमंत माधवरावाचें पुण्य एवढेंच काय तें त्राण लोकांस राहिलें.[1]

२. **राज्याच्या वांटणीची मागणी.**—पुण्यास आल्याबरोबर पुनः उभयतांचा कलह जुंपला. प्रतिनिधि, होळकर, सिंदे इत्यादि मंडळीचे सरंजामासंबंधानें दादाचा अंतस्थ मतलब स्वतःचा पक्ष वेगळा बनविण्याचा दिसून येतांच, धुमसत असलेला कलह तीव्र झाला. पुण्यास येऊन आठ दिवस होतांच श्रीमंतांनीं बोली घातली कीं, 'निम्मे राज्य वांटून द्यावें. माधवरावानें उत्तर केलें. राज्य कोणाचें, आम्ही वांटणार कोण ? आमच्यानें वांटवत नाहीं. सर्व तुमचेंच आहे. आम्ही चार बारगीर तसे तुम्हांजवळ राहूं. सर्वच तुम्हीं करणें. असे जाबसाल होऊन तमाम परगणेकरी आले, त्यांचा हिशेब कोणी पाहत नाहीं. आज पांच रोज शिक्के होत नाहींत. कारभारही नाहीं. शिबगण शंभर मंडळी आहे. उगेच जाऊन नाना प्रकारें सांगतात. राज्याचा ताल गेला. सर्व लोक दिलगिर. पुनरपि पुण्याची गत काय होईल न कळे'. मूळ राज्य शिवछत्रपतीनें स्थापिलें. त्याचीं धोरणें काय व आजपावेतों पेशव्यांनीं त्या राज्यासाठीं कसकसे कष्ट केले ते कांहीं मनांत न आणितां, दादा पुतण्यापाशीं राज्याचा हिस्सा मागूं लागला यास काय म्हणावें ? माधवरावानें आपल्याकडून परोपरीनें चुलत्याची समजूत घालण्याचा प्रयत्न केला. चिंतो विठ्ठल यास खालील कळकळीचें पत्र आषाढ शुद्ध १ चे सुमारास लिहिलेलें आढळतें. 'ही दौलत मोठी. या दौलतेस सर्व लहान मोठयांनीं अनुकूल असून जेणें-करून दौलत नीट होय तेंच सर्वांनीं करावें. तें एकीकडे राहून दौलत दोहीं जागा करावी हेंच तीर्थस्वरूपांचें मानस. त्यास आम्हांस कांहीं करणें

१. खरे ले. ३८९, ३९८, ५३०, ५३३, ७२७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. कारण कीं, ही दौलत पहिल्यापासून एकांनींच करावी, वरकडांचा भार करणारावर असावा. याप्रमाणें चालत आलें असतां, आतां वडिलांचें मानस कीं आम्हास गुजराथ द्यावी, आणि सर्व किल्ल्यांचा बंदोबस्त आम्हीच करूं म्हणतात, त्यास आम्हांस कांहीं करणें नाहीं. कांकीं, अशानें ही दौलत चालणार नाहीं, व दोहों जागा दौलतीचे वांटे केल्यानें लौकिकही वाईट, यास्तव सर्व वडिलांनींच करावें. आम्ही स्वस्थ भलते जागां राहूं. आपल्या आपल्यांत भांडून दौलत बुडविली हा लौकिक कशास पाहिजे? सर्व त्यांनींच करावें हें फार चांगलें. आम्ही स्वस्थ राहूं. वडिलांनीं नीट केल्यावर आम्हांस सांगतील तेव्हां आम्ही जवळच आहों. हेंच प्रस्तुतकाळीं बरें. तुम्हांस लिहावयाचें कारण इतकेंच कीं, सर्व लोक म्हणतात, ही दौलत थोर, तीर्थस्वरूप दादासाहेब चिंतोबाचे हातीं, तेव्हां चिंतोबांनीं वडिलांस समजून सांगावें, आणि या गोष्टीचा बंदोबस्त पाडावा. हें एकीकडेच राहून, नव्या गोष्टी नित्य निघतात हें काय? तेव्हां या गोष्टीचा शब्द तुम्हांवर लोक आणितात. तुम्ही तर वडिलांस आपल्या तर्फेनें सांगतच असाल. परंतु वडिलांचा इतबार तुम्हांवर, तेव्हां शब्द तुम्हावर आणितात. तुम्ही तर नीट करतां, परंतु लौकिक बाहेर कसा आहे हा तिऱ्हाइतास पुसावा. ही चिठ्ठी वाचून फाडून टाकणें. दुसऱ्यांस एकंदर कळूं न देणें. दुसऱ्यास कळवाल तर शपथ असे. हेंच बोलणें रुबरू बोलावेसें होतें; परंतु वर्तमान ऐकिलें कीं, तुम्हांस बरें वाटत नाहीं, यास्तव चिठ्ठी लिहिली असे'. (१९-६-१७६५).

या पत्रांत माधवरावाची मनोभावना दिसून येते. दादाचा आत्मिक चिंतो विठ्ठल असून त्याच्याच नादानें तो वागतो हें माधवरावास ठाऊक असतांही, 'तुम्ही तर वडिलांस योग्य तेंच सांगत असाल, राज्याची वांटणी करण्याची भलतीच सल्ला तुमचेकडून त्यांस मिळणें शक्य नाहीं', असें चिंतोपंतास गौरवून खुबीनें त्याचे पदरीं अन्याय माधवरावानें बांधिला आहे. चिठ्ठी फाडून टाकण्यास सांगितलें असतां ती शाबूद राहिली, यावरून चिंतोपंताचा कपटभाव व्यक्त होतो. महिना पंधरा दिवस वाटाघाट चालून, राज्याची वांटणी करण्याची खुळी कल्पना माधवरावानें मोडून काढिली, आणि दादाचे मनांत स्वतंत्रपणें हिंदुस्थानचे स्वारीस जाण्याचें होतें, तें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यानें कबूल केलें. सप्टेंबरांत दादा गंगातीरास जाण्यासाठीं डेरे दाखल झाले. 'उभयतां श्रीमंत बहुत संतोषें एकविचारें आहेत. तिळमात्र दुजाभाव नाहीं'. त्यानंतर एकच महिन्यांत दादा विथरले. 'त्यांस बरें वाटत नाहीं. कारभार काडीइतका जातीनें होत नाहीं. पूर्वींचीच व्यथा आहे. दुसरी कटिशूळाची, त्यानें फारच जेर आहेत'. उभयतां श्रीमंत कार्तिक शुद्ध ४ स (१८-१०-६५) डेरे दाखल होऊन खानदेशांतून वऱ्हाडांतून भोसल्यावर चालून गेले; आणि जानेवारींत भोसल्याशीं तह करून दादा उत्तर हिंदुस्थानचे स्वारीस गेला; आणि माधवरराव निजामाकडून नवीन घेतलेल्या पंचमहालांतून खंडणी घेऊन १७६६च्या बरसातीस पुण्यास आला. दादाबरोबर मुधोजी भोसले, विठ्ठल शिवदेव, नारो शंकर, गायकवाड वगैरे सरदार गेले. होळकर पहिलेच तिकडे होते. सखारामबापू व महिपत-राव चिटणिस यांस दादाबरोबर न पाठवितां, माधवरावानें आपल्याबरोबर कर्नाटकांत नेलें. 'पातशाहीचा बंदोबस्त करावा जलद येऊन पोंचावें, म्हणून पातशहाचा रुक्का आला व मल्हारजीचीं पत्रें राजकारणाचीं वारंवार येतात, याजकरितां उत्तरप्रांतें जाण्याची बहुत त्वरा आहे. एक दिवस महिन्याचे जागां आहे', असें लिहून व एवढें अवडंबर माजवून दादा सन १७६६च्या जानेवारींत हिंदुस्थानांत गेला. तिकडे मार खाऊन व अब्रू गमावून, दीड वर्षानें म्हणजे १७६७च्या जुलईअखेर आनंदवल्लीस परत आला. नारोशंकर याजकडे सिंद्यांची दिवाणगिरी होती, ती त्यानें काढली तेव्हां तो नाराज होऊन लिहितो, 'दादांसमागमें आलिया नफा झाला तो लिहितां पुरवत नाहीं. येथून एकदां इजत वांचून घरास आलियावरी अतःपर कोणाची सेवा करणें उचित नाहीं. कृष्णातीरीं स्नानसंध्या करून राहीन. आयुष्याचे दिवस शेवटास न्यावे इतकेंच'. माधवरावानें १७६६च्या बरसातीस कर्नाटकांतून येऊन पुण्यास रगडून कारभार चालविला. सखाराम-बापूकडून कच्चा कारभार न घेतां त्यास जवळ ठेवून केवळ जरूर त्या प्रसंगीं सल्ला मसलत पेशवा विचारीत असे. यामुळें बापूही रंजीस व रुष्ट होता. सालमजकुरीं (१७६६) स्वारीस न जातां घरीं राहवें म्हणत होते; परंतु यंदां यावें, पुढें घरीं राहवयास निरोप देऊं, असा करार करून पेशव्यानें त्यास राहवून घेतलें. हिंदुस्थानांतील विघाड सुधारण्यासाठीं स्वतः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माधवराव तिकडे जाणार होता. गोपाळराव पटवर्धनासही तिकडे पाठविण्याचा विचार चालला; परंतु दादाचे कारभारांत आपण हात घालणें बरें नाहीं असें ठरवून, माधवराव सन १७६६ चे अखेरीस पुनः कर्नाटकांत गेला, तो १७६७ च्या बरसातीस दादाची चलबिचल ऐकून हैदराशीं कसाबसा तह करून पुण्यास परत आला, तेव्हां पुनः उभयतांच्या गांठी पुण्यास सन १७६७च्या पावसाळ्यांत पडल्या.

३. **संग्रामाच्या तयारी; आनंदवल्लीस मिळाफ,** (सन १७६७ची दिपवाळी).—जाठाकडून मार बसल्यामुळें कातावून अहल्याबाईकडून पैसा उकळण्याचा प्रयत्न केल्यानें दादा सर्वांसच अप्रिय झाला. भावजयीस लिहिलेल्या त्याच्याच पत्रांत ही नालायकी दिसते. 'पुढें गुजराथ प्रांतें जाऊन, गायकवाडास जरब देऊन, कांहीं महाल व ऐवज घेऊन अखेरसालीं वडिलांचे दर्शनास यावें असा मानस आहे. या सालीं मातबर कार्य होऊन आलें नाहीं, यामुळें पत्र पाठविण्यांत अंतर पडलें. किरकोळ कार्य झाल्याचा मजकूर काय? यास्तव पाठविलें नव्हतें'. भावजय व माधवराव यांचा कारभार दादास अयोग्य वाटत होता, तर योग्य कारणें देऊन त्यांचा अन्याय त्यांचे पदरांत घालणें त्याचें काम होतें; पण तसें त्यानें एकदांही केलें नाहीं. त्याचीं सर्वच पत्रें दिखाऊ प्रेमाचीं आहेत. त्याजबरोबर स्वारींत गेलेले सरदार होळकर, गायकवाड, नारो शंकर वगैरे नाराज होऊन परत आले. महादजी सिंद्यावर तर त्याचा रोषच होता. महादजीनें मात्र ती गोष्ट मनास न आणितां जवळ राहून स्वारींत दादाचा बराचसा बचाव केला. मल्हारराव जिवंत असेपर्यंत चुलत्यापुतण्यांचा कलह विकोपास गेला नाहीं. 'सुभेदारांचा काल झाल्यावर उभयतांचे मनओळखीस प्रारंभ झाला'. हें हो. कै. पृष्ठ ३९ वरील वाक्य सहेतुक आहे. होळकराचे पश्चात् माधवराव चुलत्याशीं सोक्षमोक्ष करण्याचे विचारास लागला. दादा परत आल्यावर, आपल्या अपयशाचें कारण माधवराव होय, माधवरावानें आपणास फौजेचा व पैशाचा पुरवठा केला नाहीं, या मुद्यावर पुन्हा उभयतांचा कलह जुंपला. 'चिरंजीवांनीं पागा व फौज न पाठविली यानें शिवंदी अंगावर पडली. मनसबाही कांहीं झाला नाहीं. पुढें होणें जाणें ईश्वराधीन आहे'. याप्रमाणें पूर्वीची नरमाई सोडून दादा त्रागा करून विशेषच वर्दळीस आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उभयतांच्या चित्तांत विकल्प येत चालला. कलहाचा प्रसंग लवकरच आला. आषाढांतच बहुधा कटास प्रारंभ झाला. लोकांचा भोग उभा राहिला. दादा आनंदवल्लीस ८।१५ दिवस राहून बाहेर पडला, आणि फौजेची जमवाजमव करूं लागला. पुनः आनंदीबाईचे आग्रहावरून राज्याची अर्धी वांटणी त्यानें पेशव्याकडे मागितली. तेव्हां दादाची गांठ घेऊन समजूत काढावी असें पेशव्याचे मनांत होतें. भेट जुळविण्यासाठीं त्यानें सखारामबापूस हुकूम केला, परंतु या नाजूक कामांत पडल्यानें दोघांचाही आपल्यावर रोष होईल हें जाणून, सखारामबापूनें आनंदवल्लीस जाण्याचें नाकारिलें; तेव्हां गोविंद शिवराम यास तडजोडीसाठीं पेशव्यानें पाठविलें, आणि सखारामबापूकडील कारभार काढून तो मोरोबा फडणिसास दिला. गोविंद शिवरामानें दादाची खात्री करून नगरच्या सुमारें भेट व्हावी असें ठरविलें. पेशव्यानें गोपाळराव पटवर्धनास फौज सिद्ध करून आपल्या मदतीस बोलाविलें. उभय पक्षीं लढण्याची सिद्धता जोरानें झाली. चुलते पुतण्यांच्या या भांडणांत सरदारांची त्रेधा कशी उडत असे याचें उत्कृष्ट उदाहरण नारो शंकराचे पत्रांत पाहण्यास सांपडेल. 'श्रीमंतांजवळ शागिर्दांचें राज्य. त्यांजकडून दोन चार बोलावणीं आलीं. इकडे रावसाहेबांकडूनही बोलावणें आलें. दादांनीं कागदांचा सर लाविला आहे कीं, किल्ले माफ केले, आणिक जहागिरी देईन. तुम्हीं कोणाकडे न जाणें. ऐसेंही करितां गेलांच तर सर्वस्व फस्त करून तुमचें वाईट करीन. बोलण्यांत शाश्वति नाहीं, मनांत दगाबाजी, यामुळें रावसाहेबांचे पायांशीं एकनिष्ठपणें चालवयाचा मानस असे'. ता. १० ऑगस्ट १७६७ चें वर्तमान. 'दादासाहेब नाशकाहून साताऱ्यास जाणार. प्रतिनिधीचीं वस्त्रें पुनः घ्यावीं असें बाजारी वर्तमान आहे. यांची त्यांची कटकट होईलसें दिसतें. साताऱ्यावर तीनशें गाडदी व शागीर्द गेले. नगरासही एक शिष्य गेला. ता. २६-८-१७६७ रोजीं पेशवा स्वारीस निघाला. दादास धास्ती वाटेल, सबब मोठी फौज मागें ठेवून आपण थोड्या लोकांनिशीं जाऊन भेटावें असा पेशव्यानें प्रथम विचार केला.

निरनिराळ्या सरदारांस आपल्या बाजूस आणण्याचे प्रयत्न उभय पक्षांनीं कसून केले. विठ्ठल शिवदेव विंचूरकर २०-८-१७६७ रोजीं मृत्यु पावला, त्याच्या मुलास दादानें आपल्या बाजूस वळविलें. नारो शंकराचें पत्र वर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दिलेंच आहे. तो अत्यंत धरसोडीचा मनुष्य, निव्वळ दादांचा पक्का चेला होय. माधवरावाचे बाजूस येण्याचें कबूल केल्याबरही तो आयत्या वेळीं दादाकडे गेला. माधवरावाची सर्व भिस्त पटवर्धनांवर होती; आणि ते सर्व एकजुटीनें त्यास मिळाले. परंतु फौजा जमवून उगाच खर्चाखालीं कां यावें, अशी भावना उभयपक्षीं असल्यानें, गंगापार सडे जाऊन पेशव्यानें पन्नास लोकांनिशीं जाऊन चुलत्याची भेट घ्यावी, असें सखारामबापूचे मध्यस्थीनें सेप्टेंबरचे आरंभीं ठरलें. परंतु माधवरावास पटवर्धनांची अशी सल्ला पडली कीं, 'फार फौज समागमें असल्यास त्यांस संशय वाटेल त्याअर्थी थोडक्यांनिशीं जाऊन भेट घ्यावी. परंतु कोल्ह्याचे शिकारीस गेलें तरी वाघाचे शिकारीचें सामान घ्यावें, अशी पुरातन लौकिक बोली आहे. आधीं तों भेटीचा प्रकार आपण होऊन करूं नये. मातबर जमावानिशीं चाल केल्या उपरी त्यांचा दम आपोआप कळतो. एक भेटतील किंवा झुंजतील; किल्यावर जातील किंवा देशांतर करतील. भेटले तर सांगावें, तुम्ही वडील सुखरूप स्नानसंध्या, दानधर्म, ब्राह्मणभोजनें करून सत्क्षेत्रीं वास करावा. पुण्यांत राहणार, तर पांच लक्षांची जहागीर नेमून द्यावी. बरोबर कोठेंही पांच हत्ती, २०० पागा असावे. न भेटतां झुंजले तर झुंजावें. पळोन किल्ल्यावर गेले तर खालीं फौज ठेवावी. परंतु माया दाखवून भेटूं म्हणतात ही गोष्ट नीतीची नव्हे. मनसबा करणें तो दृढीकरण करून करावा, परंतु बुद्धीशीं वैर करून सडे भेटीस जावें हें गैर आहे. त्यांचा छोटेखानी कारभार, विश्वास धरूं नये'. यावरून माधवराव आपली तयारी मजबूद करून सेप्टेंबरांत भीमापार होऊन राहुरीस गेला. तेथें गोविंद शिवराम व चिंतो अनंत दादांकडून येऊन भेटले. तेव्हां त्यांचा एकंदर रागरंग समजला. त्यांच्याशीं व्यवहार करितांना सावधपणा व थोडा निष्ठुरपणाच धरणें योग्य, असें ठरवून, मागें ठेविलेली फौज तावडतोब बोलावून बरोबर घेतली; आणि राहुरीहून वायव्येस नासिकच्या रोखें चाल केली. पेशव्याची फौज दहा बारा हजार व दादांची पांच सहा हजार होती. उभयतांच्या भेटी गोदावरीच्या कांठीं नासिकच्या पूर्वेस १०।१२ मैलांवर कुरडगांव येथें होऊन दोघेही बरोबर आनंदवल्लीस गेले. या वेळीं पेशव्याचा भाव करडा, कायमचा सोक्षमोक्ष करण्याचा होता. त्यानें दादास स्पष्ट विचारलें, कीं तुमच्या मनांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दौलतीचा कारभार करणें असेल तर तसें करा, नसेल तर जहागीर दिली आहे ती घेऊन स्वस्थ बसा. दोहोंतून एक पत्करलेंच पाहिजे; नेहमीं लबाड लोकांच्या नादीं लागून राज्याची वांटणी मागतां, बखेडे करितां, सरदारांच्या घालमेली करितां, तें इतःपर चालणार नाहीं. बोला कोणतें पत्करतां तें ! वडीलपणाचा आदर व भीडभाड बाजूस ठेवून, या वेळीं पुतण्यानें निक्षून विचारलेला प्रश्न ऐकून दादानें ओळखिलें कीं, अतांचा रंग निराळा आहे. टाळाटाळ करून चालणार नाहीं. पुतण्या निकरावर आला आहे. त्याच्या पाठीशीं फौज आहे. हें सर्व मनांत आणून दादानें उत्तर केलें, कीं 'तुम्ही पेशवे, तुमच्या कारभारांत पडण्याचें आम्हांस प्रयोजन नाहीं; आम्हांस स्वारीसंबंधीं कर्ज पंचवीस लाख झालें आहे तें तुम्ही वारा, म्हणजे आम्ही स्नानसंध्या करून स्वस्थ बसूं'. कर्ज वारण्याची जबाबदारी मोठीच, परंतु कायमचा निकाल करण्याकरितां पेशव्यानें तीही पत्करिली, आणि दिपवाळीपर्यंत सावकारांची फेड करतों, असा करार केला. परंतु सातारा, शिवनेर, नगर व अशीरगड हे चार मजबूद व महत्त्वाचे किल्ले दादाच्या ताब्यांत होते. शेवटचे तीन किल्ले पुनः परत मिळवावे, अशी निजामाची उत्कंठा होती. ते परत देऊन निजामाची मदत पाहिजे तेव्हां मिळविण्याची संधि दादास होती. हे पेंच बंद पाडण्यासाठीं चारही किल्ले पेशव्यानें निकड लावून दादाकडून आपल्या ताब्यांत घेण्याच्या सोडचिठ्या लिहून घेतल्या. छत्रपतीचा ताबा दादाकडे होता, तेव्हां त्याजला जरब देऊन त्याजकडून पेशवाईचीं वस्त्रें घेणें किंवा प्रतिनिधि वगैरेंचीं पदें आपल्या मुलास किंवा आप्तेष्टांस देणें, ह्या भानगडी चालत, त्या आतां बंद पडल्या. ह्याच संधीस दादाचें कांहीं कारस्थान साताऱ्याकडे चाललें होतें. मोगलांकडील तीन किल्ले लगेच माधवरावानें आपल्या कबजांत घेतले. साताऱ्यावर निशाण चढवायास दादामुळें दिरंग लागला, तेव्हां माधवराव रागानें आनंदवल्लीहून गंगापुरास आला. त्याचा राग शमविण्याचा प्रयत्न दादानें पुष्कळ केला. परंतु सातारा स्वाधीन केल्याचें वर्तमान आलें तेव्हांच पेशव्याचा राग शांत झाला. ता. ३-१०-१७६७ म्हणजे दसऱ्यापासून दिवाळीचे दरम्यान वरील सर्व प्रकरण पार पडून, तुकोजी होळकर इंदुराहून भेटीस आला होता त्यास बरोबर घेऊन, पेशवा दिवाळीनंतर पुण्यास आला. 'थोरल्या श्रीमंतांनीं पोक्त अक्कल केली, त्यावरून बहुत लोक संतोषी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाले. घरांतील कलह तुटला, उत्तम गोष्ट झाली. यजमानांनीं कर्ज वारावयाचा विचार केला, हेही भारी व पोक्त मनसुब्याची गोष्ट. श्रीमंत एकरूप असले म्हणजे सर्व गोष्टींनीं उत्तम आहे. नगर नारो बाबाजीकडे दिलें. शिवनेर उधो विरेश्वर याजकडे सांगितलें. सोलापुर बाबूजी नायकाकडून काढून गोविंद शिवरामास दिलें, व आबा पुरंदरे यास सातान्यास ठेवून त्याचे हाताखालीं विसाजी आप्पाजी आठवले यास नेमिलें. इतर बहिमी किल्लेदारांचे जामीन घेतले'. याप्रमाणें एक एक प्रकरणें आपल्या मर्जीप्रमाणें विल्हेस लावून पेशव्यानें दादाचा पक्ष मोडला. सखारामबापूस त्यानें आपल्याजवळच ठेविलें होतें. यासंबंधानें रा० राजवाडे म्हणतात, 'दादांनीं १७६७ त राज्याच्या वांटणीचा प्रश्न काढला, तेव्हां रावसाहेब फौजबंद असून त्यांच्या शहाणपणाची व शौर्याची कीर्ति सर्वत्र पसरली होती. त्यांची दूरदृष्टि, आटोकाट शहाणपण, त्यांची आवरशक्ति व त्यांची कदर ही अशी कांहीं विलक्षण होती कीं, रावसाहेबांची छाप 'तेथें कांहीं चाड नाहीं वयाची', या न्यायानें सर्वत्र बसली. रावसाहेबांचें ठासून बोलणें व करारी स्वभाव पाहिल्याबरोबर दादा शरमले, व आपलें २५ लक्ष कर्ज वारलें म्हणजे आपण स्नानसंध्या करून स्वस्थ बसूं, असें त्यांनीं आपल्या क्षणैक-भंगुर वृत्तीनें रावसाहेबांस वचन दिलें'. (खं. १३ प्रस्तावना).

अर्थात् हें सर्व दादांस आवडलें नाहींच. आपण वेडेपणा केला असें वाटून पुनः पेशव्याशीं लढण्याचा उद्योग त्यानें आरंभिला. त्या कामीं भोसले, निजाम व इंग्रज यांच्याशीं त्यानें कारस्थानें चालवून मदतीची याचना केली. सालमजकुरीं सर्व राजकारणें ठीक करून पुढें मनसबा करावा असें त्याचें मानस परिच्छिन्न होतें. मुदतींत कर्ज फिटलें नाहीं, तर तेंच निमित्त करून कलह करण्याचा त्याचा उद्देश होता. परंतु यंदां फौजा चाकरीस न ठेवितां, सरदारांनीं सरंजामांचें उत्पन्न सरकारांत भरावें, असें माधवरावानें ठरवून, सर्व सरदारांवर कर्जपट्टी घालून, पैशाची भर करून, दादाचें कर्ज मोठ्या जिकरीनें वारिलें. तरी दादांचा रोख पाहून या सालीं हिंदुस्थान किंवा कर्नाटक प्रांतींच्या मोहिमा त्यानें बंद ठेविल्या; व सिंदे होळकरांस दक्षिणेंतच राहवून घेतलें. सुरतेपासून विजयदुर्गपर्यंत समुद्रकांठचे किल्ले सर्व स्वतः जाऊन तपासावे, असाही त्याचा बेत झाला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोपाळराव पटवर्धनास त्यानें लांबीच्या पल्ल्यावर पाठविलें नाहीं. मात्र रायचूरपर्यंत जाऊन गोपाळरावानें रगडून खंडण्या जमा करून आणिल्या. 'तुम्हांसारखे सरदार मोहिमेस गेल्यावर सरकारकिफायत व सेवाही उत्तम प्रकारें होऊन येते'. असें त्यास माधवरावानें लिहिलें.

ता. १-१-१७६८ रोजीं दादाचा वकील गोपाळ चक्रदेव यानें पुण्यास इंग्रज वकील आले होते त्यांची भेट घेऊन त्यांस कळविलें, कीं 'सध्यां जरी चुलत्यापुतण्यांचा कलह बाहेरून मिटल्यासारखा आहे, तरी ही तडजोड फार दिवस टिकणार नाहीं. आपल्या हातांतले सर्व किल्ले माधवरावानें काढून घेतले; आणि आपणांस राज्यांत कांहींच हिस्सा तो देत नाहीं, याबद्दल दादांस अत्यंत चीड आली आहे. केलेल्या करारांत माधवरावाकडून कोठें उणें पडतें एवढ्या निमित्ताचीच ते वाट पाहत आहेत. निमित्त सांपडतांच ते एकदम केवढा दंगा उसळून देतात पहा. तुम्हां इंग्रजांशीं कायम दोस्तीचा करार करून तुमची मदत संपादण्याची त्यांस फार उत्कंठा आहे. तुमचा वकील मि० ब्रोम त्यांचे भेटीस गेलाच आहे. त्याच्याशीं ते हें सर्व ठरवितीलच'. मि० ब्रोम यास दादानें भेटून कळविलें, कीं 'आमचें मनांत पुतण्याबद्दल भारी त्वेष उत्पन्न झाला आहे. सालमजकुरीं त्याजवर चालून जाण्यास अवधि राहिला नाहीं. पण पावसाळ्यानंतर आम्ही चढाई करणार. त्या वेळीं आपण तोफा, दारुगोळा व फौजा वगैरे मदत देऊन मला अवश्य मदत केली पाहिजे'. त्यावर वकिलानें विचारलें. 'अशा मदतीबद्दल खर्चाबाहेर तुम्हीं आम्हांस आणखी जास्त बक्षीस काय देणार? दारुगोळा आम्ही विक्रीस ठेवीत नाहीं; व फौजही नुसता खर्च घेऊन आम्हीं बाहेर कोणास देत नाहीं'. दादानें विचारिलें, 'तुम्हांस मजकडून काय बक्षीस पाहिजे?' त्यावर वकील म्हणाला, 'मी आपल्या वरिष्ठांस विचारल्याशिवाय या बाबतींत कांहींच सांगूं शकत नाहीं. पण तुम्हींच कांहीं तरी विशिष्ट सूचना कराल तर मुंबईचे अधिकारी तिचा योग्य विचार करून जबाब देतील'. या जबाबावरून दादाचे मनाची तारांबळ उडाली, आणि त्यास निश्चयानें कांहींच बोलतां येईना. इंग्रजांस घरांत आणिल्यानें मराठशाही बुडेल, अशी शंका मनांत येऊन त्याचा चित्तविक्षेप झाला असावा. नारायणरावाचे खुनानंतर पुढें हा प्रकार खरा झालाच.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

४. अमृतरावाचें दत्तविधान, धोडपेची झोडप (१०-६-१७६८).— सन १७६८ च्या आरंभापासून उभय पक्षीं साशंकता वाढत गेली. चिंतो विठ्ठल व गंगोबा तात्या हे दादास मनापासून साह्य करूं लागले. दमाजी गायकवाडानें आपला मुलगा गोविंदराव याजबरोबर कांहीं फौज देऊन दादाचे मदतीस पाठविलें. जानोजी भोसल्यानेंही बरीच धामधूम दादाचे तर्फें मांडिली. तमाम गंगथडी लुटीत, जाळीत व मन मानेल तशा खंडण्या घेत, तो तुळजापुरापावेतों आला. दादास इंग्रजांची मदत मिळण्याचाही संभव होता. त्यास मुलगा नव्हता म्हणून सन १७६८ च्या वैशाखांत भुसकुटे उपनांवाचा, साडेतीन वर्षें वयाचा, एक ब्राह्मण मुलगा दत्तक घेऊन त्याचें नांव अमृतराव ठेविलें. आनंदीबाईनें या कृत्याचा निषेध केलेला दिसत नाहीं, तिची या कृत्यास संमतिच दिसते. यावरून स्वतः पेशवाई मिळविण्याचा दादाचा संकल्प उघड झाला. हें वर्तमान येतांच, आतां उपेक्षा करण्याची वेळ गेली असें पाहून, माधवरावानेंही लढण्याचाच निश्चय ठरविला. दारणा नदी गोदावरीस सांगवीच्यापुढें मिळते, तेथें दादाची फौज जमली होती. चिरंजीव दत्तक घेतला त्याचा व्रतबंध वैशाख वद्य १० स करणार होते तो राहिला. दत्तक घेतल्याची साखर व वस्त्रें माधवरावाकडे आलीं तीं त्यानें माघारीं लाविलीं. कृष्णराव काळे आनंदवल्लीस सलूख करावयास गेला. ता. २२ मे रोजीं माधवरावानें पुण्याहून कूच केलें. सखारामपंत बरोबर गेला नाहीं, मोरोबा दादा गेला. 'तुळजापुरावरून नगरच्या रोखें नाशकास जाणार. दादा दारुणा संगमीं आहेत. आनंदीबाई व नूतन पुत्र त्रिंबकावर पाठवून आपण सडे आहेत. पुणेंही गडबडलें आहे'. ता. ७-६-१७६८ चें वर्तमान. 'दादाचा मुक्काम चांदवडा अलीकडे पांच कोसांवर आहे. फौज सात आठ हजार व तोफा २५।३० आहेत. पेशव्याजवळ वीस हजार फौज जमा झाली. आणखी रोज येतच आहेत. तोफा १५ आहेत. दोघां श्रीमंतांची मर्जी, कीं झुंजावें, जो विजयी होईल त्यानें दौलत खावी. कायगांव टोक्याचे दीक्षित घाबरून गेले, त्यांस पेशव्यानें ता. २-६-६८ रोजीं कळविलें, 'आपण उभयपक्षीं मान्य. कोणीकडूनही उपसर्ग लागणार नाहीं. युद्धप्रसंग संभव आहे, ईश्वरइच्छा प्रमाण'. 'ता. १० जून १७६८ ज्येष्ठ वद्य ११ रोजीं श्रीमंतांची फौज धोडपेखालीं तयार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होऊन उभी होती. तों गोपाळरावाची फौज पुढें आली. दादांची गाऊ पडोन फौज मोडोन पळोन गेली. अठरा वीस हत्ती व तमाम तोफखाना पाडाव करून घेतला. पांचसातशें उंट, चार पांचशें घोडीं, डेरे दांडे कुल लुटून घेतले. दादा किल्ल्याचे आश्रयास गेले. चिंतो विठ्ठल जखम होऊन पाडाव झाला. त्याचा भाऊ मोरो विठ्ठल ठार झाला'.

'उभयतांमध्यें विरुद्ध वाढून राव फौजसुद्धां टोंक्यावर गेले. कोपरगांवावरून दादा पुढें, पाठीवर रावसाहेब, असें होत होत घोडपेच्या रोखें गेले. उभयतांची गांठ ज्येष्ठ वद्य ११ शुक्रवार ता. १० रोजीं पडून दोन प्रहरीं युद्ध झालें, त्यास रानवटची लढाई म्हणतात. युद्धापूर्वींच दादा घोडपेवर गेले. केदारजी सिंदे, चिंतो विठ्ठल व बंधु यांनीं युद्ध केलें. लूट माफ केली होती, म्हणून रावसाहेबांचे फौजेनें नेट धरला. सारें लष्कर व बुणगे लुटून फस्त केले. दुसरे दिवशीं यांचें बल जास्त पाहून दादा घोडपेवरून उतरून रावसाहेबांस भेटले. लोकांस लूट फार सांपडली. उभयतां सुखरूप आहेत. पुण्यास लवकर येतात. दादांनीं आपली सर्व दौलत किल्लेकोट मुलूख पैका टक्का सर्व सुतळीचा तोडासुद्धां रावसाहेबांस दिला. गंगोबा तात्या फितव्याच्या पेंचामुळें पळोन गेले. तुकोजी होळकर, महादजी सिंदे वगैरे सर्व पेशव्यांचे लक्षांत आहेत. श्रीमंत सर्व सरदार व मुत्सद्दी सुखरूप राहिले. ईश्वरें मोठी खैर केली. सखारामबापू स्नानसंध्या करीत घरीं बसले. आज्ञा होऊन बोलावलें तर जातात. रावसाहेबाचें पुण्य समर्थ आहे'.

ता. १८-६-१७६८ रोजीं माधवराव बाळकृष्ण दीक्षितास लिहितो, 'आम्ही घोडपेखालीं गेलों. तीर्थरूप वर होते. रविवारीं (१२-३-६८) खालीं आले. भेटी होऊन पुण्यास जात असों. वरकड अदर्शी जमा जाले होते, त्यांची वाताहत जाली. हें पुण्य स्वामींचें असे. आपण स्वस्थ असावें'. आपसांतील युद्धामुळें लोक बेदील होऊं नयेत, म्हणून माधवराव या पत्रांत दीलदिलासा देत आहे. दुसऱ्या एका पत्रांत खालील मजकूर आहे. 'दादा व माधवराव घोडप येथें आले, दादा जमियेत सुद्धां आले व इकडून पुण्याहून रावसाहेब जमावसुद्धां गेले, सरदार गोपाळराव, नारोशंकर व रास्ते व महादजी सिंदे, खेरीज खाजगीचे लोक मिळून फौज वीस हजार होती. झुंजाचा दिवस ज्येष्ठ वद्य ३. पूर्वप्रहरीं लढाईचा निकाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काढून मग दादा धोडप किल्यावर गेले. वडिलांच्या मनांत ममता उपजोन खालते भेटीस आले. केदारजी शिंद्यास सोडविला. सारांश, ज्येष्ठ वद्य ५ स उभयतांच्या भेटी होऊन चिंतो विठ्ठल धरला जाऊन त्यास जखम लागली. त्याचा भाऊ मोरो विठ्ठल बिल्हे लागला. गंगोबा तात्यास नगरचे किल्यावर बंदोबस्तांत ठेवून ज्येष्ठ वद्य ८ स पुण्यास दाखल झाले. घटका रात्रीस खासा आपण दादाचे उजवे बाजूस एका अंबारींत बसून अवघ्या मुत्सद्यांसह आनंदमयें घरास पोंचले. तोफांचे बार झाले. नळे चंद्रज्योती, गणतीआगळ्या झाल्या. पर्वतीपासून चार घटका गुजरोन सुमुहूर्तें सहावे घटकेस दाखल झाले. रावसाहेबांची फत्ते झाली'. रा० राजवाडे म्हणतात, दादानें संस्थानद्रोह केला, त्याबद्दल त्याचें करावें तसें शासन न करितां कीड तशीच राहूं दिली. या किडीच्या आश्रयानें अनेक सरदारांना राज्याचे विरुद्ध वागण्यास अवसर मिळाला. ही कीड नाहींशी केली असती तर सरदारांची फुटीची भावना जमीनदोस्त करतां आली असती'. (खं. १० प्रस्तावना). दादास एकदम स्वर्ग दाखविला पाहिजे होता असें यांत ध्वनित आहे. हा मुसलमानी प्रघात मराठ्यांनीं कधींच स्वीकारिला नाहीं. रघुनाथरावाच्या राज्यद्रोहाचीं फळें सर्व राष्ट्रास कायमचीं भोंवलीं, हें उत्तरोत्तर निदर्शनास येईल.

५. शनिवारवाड्यांत कैद व दादाचे फितूर (सन १७६८-७२).— आजपर्यंतचे सर्व अपराध पोटांत घालून अप्रतिम नरमाईनें वागविलें असतांही, दादानें आपली जन्मखोड सोडिली नाहीं, तेव्हां शेवटीं निकरावर येऊन युद्धांत झोडपून कठोरपणानें पेशव्यानें चुलत्याचा बंदोबस्त केला. ठाणीं सर्व आपल्या हस्तगत होईपर्यंत रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांस पेशव्यानें नाशिकच्या बाजूस ठेवून दिलें. गंगाधर यशवंतास नगर येथें बेडी घालून ठेविलें. त्याचा वडील मुलगा यशवंत गंगाधर ऊर्फ दादाजी हा हुशार व व्यवहारचतुर होता. शिवाय संस्कृत विद्येंत चांगला व्युत्पन्नही होता. माधवराव व दादा यांचा तंटा सुरू झाला, तेव्हां 'हें तुमचें करणें चुकत आहे, दादांचा पक्ष खोटा असून माधवरावच विजयी होणार', असें दादाजीनें बापास स्पष्ट बजाविलें होतें. तरी सखारामबापूचे मसलतीनें गंगाधर हा दादास मिळाला. त्यावरून माधवरावानें सर्वस्व अपहार करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बंदींत ठेविलें. पुढें सन १७७२ त सिद्धटेकचे मुक्कामीं पेशव्याची स्वारी आली, त्या वेळीं तीस लाख रुपये दंड घेऊन गंगोबातात्याची व मुलामाणसांची मुक्तता केली. त्या वेळची गंगाधरतात्याची मागणी व त्यावर माधवरावाचे खडखडीत जबाब (पे. द. १०८) वाचण्यालायक आहेत. ता. ७-७-१७६८ रोजीं हिंगणे लिहितो. 'गंगाधर यशवंताचा खंड तीस लक्ष ठरला. जवळ द्रव्य निघाल्यास दुप्पट देऊं अशी शपथ घेऊन मुक्तता केली. पुण्यास राहणार. (दादाचा दुसरा साथीदार) सदाशिव रामचंद्र गोपाळराव पटवर्धनाचे मार्फत येऊन भेटला. बरकडांचे दंड ठरत आहेत. आपणांस सुटका नाहीं. सक्ती बहुत आहे. दिल्लीस पत्रें (हिंगण्यांचे बाबतींत) क्रुद्धतेचीं जातात. संशय निघत नाहींत'. (खं. ६-५७०). यावरून पुरुषोत्तम महादेव हिंगणेही दादास सामील झाल्यामुळें माधवरावाचे रोषास पात्र झाला होता असें दिसतें.

दादास पुण्यास आणून शनिवारचे वाड्यांत सक्त बंदोबस्तांत ठेविलें. त्याजवर देखरेखीस नाना फडणीस होता. यापुढें दादाच्या हालचाली बंद झाल्या, तरी फितुरीचे चाळे मधून मधून चालूच होते. सन १७६९ च्या मार्चांत 'फाल्गुन वद्य ११ रोजीं वाड्यांत फितूर झाला. देवडीचे लोक फितुरले. दादा बाहेर निघून जात तों बातमी नानास कळली. साठ असामी चतुर्भूज केले. दादा निश्चक्रें करितात. तीन उपोषणें झालीं. भोजन करण्याकरितां नानांनीं फार आग्रह केला, शिवीगाळ झाली. कोणी गोष्टी बोलत नाहीं. मग कधीं जेवतात न कळे'.

गोपिकाबाईस ही बातमी कळल्यावर तिनें त्याविषयीं नाना फडणिसास लिहिलें. 'दादाची शरीरप्रकृति कशी आहे, मौन धरलें आहे म्हणून ऐकिलें. स्नानसंध्या किती करितात, तें तपासिलें लिहिणें म्हणून आज्ञा'. 'त्यास मौन कांहीं धरलें नाहीं. फार करून स्नानसंध्याच करीत असतात. शरिरास कांहीं उपद्रव झाल्यामुळें रक्त काढविलें होतें. शरीरप्रकृति बरी आहे'. (ता. ५ मार्च १७६९). माधवराव स्वारींत असतां, त्यास हीं वर्तमानें पुण्यांतून नाना फडणीस पोंचवीत असे.

ता. ४-८-१७६९ रोजीं मोरोबा पटवर्धन लिहितो, 'दादा तसेच उपास करितात. आज दहा दिवस झाले. परवां जीव घाबरा झाला होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तोड कोणे गोष्टीची निघत नाहीं. बाबूजी नायकास पत्रें पाठवून रावसाहेबां-नीं आणविलें, त्यानेंही बहुतप्रकारें सांगितलें, परंतु मान्य केलें नाहीं. एखादे दिवशीं साखरपाणी व एखादे दिवशीं खारीक खातात. आज दोन दिवस फारच घोळ पडला आहे. मुलास घेतलें त्यास पुण्यास आणवावें, नाहीं तर त्यास दोन लक्षांची जहागीर व एक किल्ला द्यावा, आपणांस पांच लक्ष रुपये द्यावे, अशी मागणी केली. रावसाहेबांनीं उत्तर केलें, पूर्वीं आपणास जहागीर होती, त्या वेळच्या कागदपत्रांचे दाखले आहेत त्याअन्वयें दान-धर्मास ऐवज देऊं. आम्ही कर्जदार आहों. ऐवज कोठून द्यावा?' दादा म्हणतात, 'आतां आम्ही कैदेंत आहों, तुमच्या कर्जवामाशीं व दौलतेच्या ओढीतोडीशीं आम्हास गरज काय? नाहीं तर आम्ही उपवास करतां करतांच मरों'. श्रीमंतांनीं साफ उत्तर केलें, 'मुलास आणावयास किंवा त्यास जहागीर द्यावयास अनुकूल नाहीं. दुसऱ्या गोत्राचा मूल, त्याचें बोलूं नये. पुढें दोन लक्ष दानधर्मास द्यावे व मुलास आणून वडगांवास ठेवावें, असें ठरोन गुंता उरकला'.

राक्षसभुवनचे लढाईत माधवरावाची योग्यता व्यक्त झाल्याबरोबर, दादास पेशवाईच्या कारभारांत हात घालण्याचें प्रयोजन उरलें नाहीं. माधवरावाचे पुढें आपला प्रकाश पडत नाहीं हें तर सिद्धच झालें, तेव्हां स्वतःचे कल्याणा-ची व राज्याचे हिताची गोष्ट म्हणजे माधवरावास मनापासून साह्य देऊन त्यानें संगनमतानें निरनिराळीं कामें उरकलीं पाहिजे होतीं. तशा साह्याची जोड माधवरावास मिळती, तर झालें याहून दसपट कार्य झालें असतें. निदान दादा बाह्यतः बोलत होता त्याप्रमाणें खरोखरच सर्व प्रकारें संसारां-तून निवृत्त होऊन ईशचिंतन करीत राहता, तरी सुद्धां पुष्कळसें हित त्याचे हातून झालें असतें. परंतु निष्प्रभ होऊन स्वस्थ बसणारा तो नव्हता. शिवाय सखारामबापू, चिंतो विठ्ठल, आबा पुरंदरे वगैरे कित्येक त्याचे पक्षपाती होते ते वेळीं अवेळीं त्यास स्वतःचें मतलबासाठीं माधवरावाचे विरुद्ध भर देत; कित्येक प्रसंगीं हे कारभारी व जवळची शागीर्द वगैरे मंडळी त्याची अवास्तव स्तुति करून उगाच त्यास खूष ठेविण्यासाठीं चढवीत. तें खरें वाटून, तो एकदम कांहीं तरी उपद्व्याप करूं लागे. या बाबतींत त्याची बायको आनंदीबाई त्यास किती भर देत असेल तें सांगवत नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कित्येक महत्त्वाचीं प्रकरणें तिला माहीत असतील, पण तिनेंच तीं उपस्थित केल्याचें दिसत नाहीं. राज्याचा अर्धा वांटा मागणें, अमृतरावास दत्तक घेणें, नारायणरावास कैद करणें, वगैरे बाबतींत तिच्याविरुद्ध स्पष्ट पुरावा आढळत नाहीं व आढळणें शक्य नाहीं. सामान्य समज व कित्येक बखरकारांचे उल्लेख तिच्याविरुद्ध आहेत. पण प्राच्य परंपरेंत वाढलेली नवऱ्याची बायको कितीही शहाणी असली; तरी नवऱ्यास गोड वाटणाऱ्याच गोष्टी तिला बोलाव्या व कराव्या लागणार, आणि कारभारी वगैरे अनेक लोकांनीं भर देऊन दादास चढविलें असतां, प्रत्यक्ष त्याच्या बायकोनें विरुद्ध अभिप्राय व्यक्त करणें शक्य नाहीं. शिवाय बायकांच्या सल्ल्यानें पुरुष बिघडतात असा जो सामान्य समज आहे, तो त्या वेळींही जोरांत असून, स्वतः दादा चांगले, पण बायको वगैरे जवळची मंडळी त्यांस बिघडवितात, असाही बोभाटा त्या वेळीं सर्वत्र होता; आणि तोच अद्यापि लोकप्रवादांत दिसून येतो. आनंदीबाई धूर्त होती. दादाच्या हलकट उलाढालींत आरंभीं तिचें अंग नव्हतें; आणि मोठ्या प्रकरणांतही आपण बाजूस राहून परभारें कारभार उरकण्याची ती दक्षता ठेवी. लौकिक सभ्याचार वगैरे बाबतींत ती मोठी दक्ष असे. सर्व नातेवाईकांस पत्रें, पोषाख, भेटी वगैरे पाठवून ती परामर्ष घेत असे. नवऱ्याच्या खुळेपणामुळें तीस अत्यंत वाईट वाटे. नारायणरावाच्या खुनानंतर प्रकरण विकोपास गेलें; त्यामुळें आनंदीबाईसही खटपटींत शिरणें भाग पडलें.

राक्षसभुवनानंतर स्नानसंध्या करून नाशकास राहण्याचें दादांनीं ठरविलें, त्या वेळीं त्याचे खर्चास पांच लाख रुपये सालाचे द्यावे अशी व्यवस्था ठरविलेली होती. तीच या वेळीं पुढें चालविण्यांत आली. दादा बंदोबस्तांत राहण्यांतच राज्याचें कल्याण आहे अशी पेशव्याची खात्री होती. ता. १९-३-१७७२ रोजीं दादाचा करार ठरला कीं, पांच लाख रुपये खर्चास द्यावे; घोडीं उंटें वगैरे इतमाम ठेवावयास दहा पंधरा हजारांचे गांव द्यावे; दादांनीं अनुष्ठान करूं नये, कोणाशीं पत्रव्यवहार करूं नये; त्यांनीं किंवा त्यांचे कारभारी सखारामपंत, चिंतो विठ्ठल, वगैरेंनीं राजकारण करूं नये; शागीर्द, खिजमतगार, भट, कारभारी, वगैरे माधवराव नेमून देतील तेच त्यांनीं ठेवावे; कोणीं लबाडी केल्यास त्यास काढून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लावावें; अमृतरावास पुण्यास आणूं नये; त्याचे लग्नास दहा हजार रुपये पेशव्यानें द्यावे; गडबड झाल्यास नेमून दिलेल्या ठिकाणीं राहवें; वर्षांतून एकदां कृष्णास्नानास जावें. असा करार ठरला, आणि पुण्यास आल्यावर सखारामबापूस कारभार देऊन, पेशव्यानें दादाचे हालचालींवर गुप्त नजर ठेवून, बाह्यतः त्यास मुक्त केलें. उभय पक्षीं चांगलें सौरस्य झाल्याचा देखावा दिसला. त्यानंतर पेशव्याच्या आरोग्यासाठीं दादा अनुष्ठान करूं लागले. औषधही तेच देऊं लागले. मात्र कारभाराशीं त्यांचा कांहीं संबंध नव्हता. ते स्नानसंध्या करून बसून असत.

६. **दादाची नेमणूक, परिवार व आनंदवल्लीचा वास.**—दादाचे खर्चास ५६३००० चे महाल सन १७६४ त तोडून दिलेले चालले होते, त्यांत १० हजार सन १७७१ त वाढविले, तरी रकम खर्चास पुरत नसे. दादाचा लवाजमा व आश्रितवर्ग फार मोठा होता; आणि परिस्थिति पाहून खर्च करण्याची त्याची मुळींच मर्जी नव्हती. उदाहरणार्थ, यांच्या आश्रितवर्गात त्रिमंगलाचार्य, चतुर्भुजदेव, खंडो दीक्षित नरगुंदकर, आपाशास्त्री, कुटुंबाशास्त्री हे पांच विद्वान् पंडित, गवई, हरिदास वगैरे अनेक होते, आणि नाटकशाळांचा तांडा तर अमर्याद होता. १ मैना, २ उमेदा, ३ यमुनी (हेमंतीची आई) ४ लाडू (वसंतीची आई) ५ केसरी (चंदनीची आई) ६ रत्ना (रूपकुमरीची आई) ७ स्वरूपा (चंद्रसेनीची आई) ८ शामा (नैनेची आई). अशीं त्या नाटकशाळांचीं नांवें दिलेलीं आढळतात. रोजनिशींत हमेत, वसंत, चपला, चंद्रसेना, अशीं आणखी निराळीं नांवें असून, या पोरींपैकीं कुणास चार, कुणास तीन व कुणास दोन रुपये पगार बांधलेला होता, असें सन १७८० त नमूद आहे. (स. मा. रो. १·१५७) ह्यांपैकीं कित्येकांच्या मुलींची नांवें तेवढींच कां दिलेलीं आहेत तें समजत नाहीं. मुलींबरोबर मुलगेही झाले असतील. पण या मुलींनींही पुढें आयांचाच धंदा चालवावा असा समज दादाचा असेल. दादाचे पश्चात् ह्या नाटकशाळांचा परामर्ष आनंदीबाईनें चांगला घेतला हें तिला भूषणावह आहे. आनंदीबाई शिवाय आणखी कनिष्ठ स्त्री मथुराबाई नांवाची दादाची होती, ती ता. ५-६-१७८० रोजीं देवी येऊन बारली. सुरतेस असतां दादानें एका नागराची मुलगी पळविली. त्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तिच्या आईबापांनीं जीव दिला. म्हणून इंग्रजांनीं दादाचा तीव्र निषेध करून त्यास वाड्याच्या बाहेर जाण्याची बंदी केली.

सन १७७५ चे आरंभीं तो पळून संकटावस्थेंत सुरतेस गेला, तेव्हांसुद्धां नाटकशाळा ८ व ४५ खिजमतगार त्याचेबरोबर होते (खं. १०-१५७). यावरून दादांच्या राहणीची व अविचारीपणाची कल्पना होईल. सन १७६४-६५त आनंदवल्लीस राहत असतां कर्ज फार झालें, तें वारण्यासाठीं सन १७६८ सालीं त्यास २५ लाख रुपये कर्ज देण्यांत आलें. तरी त्याचे खर्चास आळा बसला नाहीं. पुढें १७७२ च्या मार्चांत राजकारण, फितूर, अनुष्ठान वगैरे करणार नाहीं असें साफ लिहून घेऊन, माधवरावानें सर्वांच्या आग्रहास्तव दादास मुक्त केलें, आणि कारभार सखारामबापूस सांगितला. सखारामबापू हुशार होता, आणि त्यास जवळ बाळगून माधवराव त्याचे हुशारीचा उपयोग करून घेई, पण कारभार मोरोबादादा फडणिसाकडून घेत असे. बापू त्यामुळें नाराज असे; आणि तो नाराज म्हणून दादाही नाराज, तेव्हां वरप्रमाणें सखारामबापूस कारभार सांगून दादाची समजूत माधवरावानें केली. परंतु कबुलात लिहून दिल्याप्रमाणें तो वागला नाहीं. माधवरावाचा अंतकाल समीप आहे असें पाहून, दसऱ्याचे दिवशीं बाहेर पडून त्यानें पुनः बंडावा चालू केला. त्यास लगोलग पकडून परत आणण्यांत आलें, म्हणून बरें; नाहीं तर ऐन अंतकालीं हा कौटुंबिक कलह पुनः ज़ोरांत उद्भवल्यानें पेशव्यास मरणही शांतचित्तें आलें नसतें.

दादाचा स्वभाव व योग्यता माधवरावाइतकी दुसऱ्या कोणीं ओळखिली नाहीं. तरी मनांत रोष न ठेवितां त्याची तजवीज माधवरावानें शक्य तितकी उदार मनानें ठेविली, हें येथपावेतोंच्या हकिकतीवरून दिसून येईल. दुसऱ्या एखाद्यानें तर त्यास देहान्त शिक्षाच केली असती; निदान तुळाजी आंग्र्याप्रमाणें एखाद्या दूरच्या किल्ल्यावर कठोर बंदोबस्तांत ठेविलें असतें. पण कुटुंबांत असा कठोरपणा धारण केल्यानें फायद्यापेक्षां नुकसानच होतें हें ताडून, दादास माधवरावानें शनिवारच्या वाड्यांत सर्व सुखांत ठेविलें. स्नानसंध्या करून बोलल्याप्रमाणें वागता तर त्यास झाला तोही त्रास झाला नसता. कैद नांवाची होती. फक्त कारस्थानें करावयाचीं नाहींत, एवढाच बंदोबस्त होता. तीर्थास वगैरे जाण्यास प्रतिबंध नव्हता. बायकामुलें जवळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतीं. अमृतरावाचें लग्न दादांनीं टोक्यास सन १७७१ च्या वैशाखांत मोठ्या थाटानें केलें. खर्च माधवरावानें दिला. मुलाचें वय त्या वेळीं सात असावें.

दादाची जबरदस्त हाव पेशवाईपद आपणास असावें अशी होती. या त्याच्या महत्त्वाकांक्षेस लागणारी पात्रता तर त्याचे अंगीं नव्हतीच, परंतु तत्कालीन मराठशाहींतील तमाम लोकमत, समस्त ब्राह्मण-मराठेसुद्धां, दादाच्या विरुद्ध होतें. आबाजी महादेव (ब्राह्मण), सदाशिव रामचंद्र (सारस्वत), सखाराम हरि (प्रभु), आणि मानाजी फाकडे (मराठे) हे चारच इसम दादास कधीं अंतर न देतां त्यास चिकटून राहिले. हजारों संकटें व उलाढाली झाल्या, परंतु दादानें आपली पेशवाईची हाव अखेर-पर्यंत सोडली नाहीं. संकटांस किंवा विपत्तींस न जुमानतां आपल्या हेतूचा पिच्छा पुरविण्याचा अद्वितीय गुण त्याचे ठिकाणीं दिसतो. त्या गुणाचा उपयोग सत्कार्याकडे झाला असता, तर त्याच्या कर्तबगारीस मोल नव्हतें. पुढच्या क्षणीं आपली अवस्था काय होणार, याची क्षिति न बाळगितां, वाटेल त्या अडचणींतून निसटून शत्रूंच्या हातावर तुरी देण्याची अजब शक्ति या पुरुषाचे ठिकाणीं अपरिमित होती. इतिहासांत अशा व्यक्ती दुर्मीळच दिसतात. इतकें स्वभाववैचित्र्य निर्माण करण्यांत विधात्याच्या चातुर्याची कमाल वाटूं लागते. म्हणूनच उत्तरमराठशाहीचा इतिहास बनविण्याचें मुख्य श्रेय विचारवंत या एका व्यक्तीस देतात तें खोटें नाहीं. शिवछत्रपतींनीं मराठशाहीच्या प्राणप्रतिष्ठेचा इतिहास बनविला, तसा त्याच्या इतिश्रीचा इतिहास रघुनाथराव दादा व त्याचे चिरंजीव रावबाजी यांनीं बनविला. पानिपतापूर्वी उत्तरचा कारभार बिघडविण्यास दादा कसा कारण झाला, त्याचें वर्णन पूर्वी आलें आहे. पानिपतोत्तर मराठ्यांचा इतिहास वर्णन करावयाचा म्हणजे त्यांत रघुनाथराव व त्याचे चिरंजीव बाजीराव यांनीं केलेल्या करामती वळगल्यास बाकी फारच थोडें शिल्लक राहील. माधव-रावाच्या कारभारांत तीन चतुर्थांश भाग तरी या एकट्या त्याच्या चुलत्यानें व्यापला आहे. माधवरावाचे पश्चात् तर पुढील बहुतेक इतिहास या दोघां पितापुत्रांनीं बनविला आहे. रघुनाथराव ही व्यक्ति निर्माण झाली नसती तर माधवरावाचे कर्तबगारीस पूर्ण अवकाश मिळून बहुधा इंग्रजांसही कायमपणें दूर राहवें लागतें. पाश्चात्य शस्त्रास्त्रें, तोफखाना, पश्चिम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किनाऱ्याचा बंदोबस्त, इत्यादि बाबती सुधारण्याकडे माधवरावाचें लक्ष फारच वेधलें होतें. त्या थोर पुरुषाचा नऊदशांश व्याप केवळ या चुलत्यानें उपस्थित केला; तोच परचक्र निवारण्याकडे खर्च होता तर अखिल हिंदुस्थानचा बंदोबस्त यथायोग्य होऊन हिंदुपदपातशाही चिरकालीन झाली असती, असें वाटूं लागतें. सारांश, राघोबा व त्याची हीन आवृत्ति रावबाजी यांनींच सर्व उत्तरमराठशाही व्यापिलेली आहे. आणि उपलब्ध ऐतिहासिक साहित्यांत मुख्य अंश केवळ या दोन कलिपुरुषांचा किंवा त्यांच्या संबंधाचा आहे, हें पाहून राष्ट्रीय दृष्टीनें अत्यंत उद्वेग मनांत उत्पन्न होतो.

दादाच्या वास्तव्यासाठीं आनंदीवल्लीची स्थापना झाली. याचें मूळनांव चांवडस असून तें नासिकच्या पश्चिमेस तीन मैल आहे. तेथून आणखी ३ मैल पश्चिमेस गंगापुर. चांवडस येथें ता. १५-८-१७६४ रोजीं आनंदीबाईस पुत्र झाला त्याचे स्मरणार्थ गांवाचें नांव आनंदवल्ली असें ठेवण्यांत आलें. सन १७६४ च्या फाल्गुनांत दादा व गोपिकाबाई नाशकास राहण्यास गेलीं. दादा आनंदवल्लीस व गोपिकाबाई गंगापुरास राहूं लागलीं. दोनही कारभारावर केसो गोविंद याची नेमणूक असून त्याला कांहीं नियम ठरवून दिले होते. दादाचे खर्चास ५६३००० चे महाल तोडून दिलेले असून त्याची वहिवाट चिंतो विठ्ठल यास सांगितलेली होती. घोडप येथें लढाई होऊन दादा अटकेंत पडले, तेव्हां त्यांचे खर्चास तोडून दिलेले महाल परत घेण्यांत आले; आणि आनंदवल्लीचें ठाणें कायमचें त्यांचे माणसांचे ताब्यांत देण्यांत आलें. आनंदवल्लीचा वाडा मजबूद तटबंदीचा होता. या ठिकाणीं दादाचें राहणें १७६८ नंतर फारसें झालेंच नाहीं. नारायणरावाचा खून होई-पावेतों दादा बहुधा पुण्यासच शनिवारवाड्यांत होता. त्यानंतर पेशवाईशीं मिळून युद्ध सुरू झालें, त्यांत तो बहुधा फिरतीवरच असे. सन १७८२ त सालबाईच्या तहानें त्यास पुनः अटक करून गोदातीरीं कोपरगांवास ठेवण्यांत आलें. तेथेंच तो ता. ११-१२-१७८३ रोजीं मृत्यु पावला. त्यानंतर आनंदीबाई कोपरगांवाहून मुलांमाणसांसह आनंदवल्लीस राहण्यास आली. तेथें ती १२-३-१७९४ रोजीं मरण पावली. तिला कोपरगांवाहून हालवूं नये असा देखरेख करणारांनीं नानाफडणिसास सल्ला दिला होता.

रमाबाईहून आनंदीबाई तीन चार वर्षांनीं मोठी व माधवरावाहून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुमारें तीन वर्षांनीं लहान. आनंदीबाई दादाची दुसरी बायको. तिचें लग्न रमाबाईचे मागून दोन वर्षांनीं १७-१२-१७५५ रोजीं झालें. त्या वेळीं ती आठ वर्षांची असावी. तिला मुलें झालीं त्यांची यादीः—

१ भास्करराव—जन्म २६-२-१७६२—पुढील मार्चांत देवीनें मृत्यु.

२ दुसरा मुलगा—जन्म १५-८-१७६४ आनंदवल्ली येथें. बाप हातावर झेलीत असतां खालीं पडून मृत्यु.

३ दुर्गाबाई—जन्म ११-११-१७६५, लग्न ७-२-१७७३ पांडुरंगराव बारामतीकर याजबरोबर.

४ अमृतराव (भुसकुटे)—दत्तक १९-४-१७६८, मृत्यु सन १८२३.

५ कन्या—जन्म १०-१०-१७६९—अल्पकालांत मृत्यु.

६ बाजीराव—जन्म. ७-१-१७७५, मृत्यु १४-१-१८५१ ब्रह्मावर्त.

७ चिमाजी आप्पा—जन्म. ३०-३-१७८४, मृत्यु ९-६-१८३०.

माधवरावाचे वेळेस आनंदीबाई बरीच अप्रबुद्ध असून कारस्थानांत पडत नव्हती. अमृतरावाचे दत्तविधानास तिची अनुकूलता किती असावी तें सांगतां येत नाहीं. तिच्यावर नजर ठेवणें, किंवा तिचा बंदोबस्त करणें यासंबंधीं माधवरावाचा किंवा अन्य कोणाचा उच्चार अगर उद्योग बिलकूल आढळत नाहीं. हजारों इसमांच्या उलाढाली जाणणाऱ्या माधवरावाचा आनंदीबाईबद्दल बरा किंवा वाईट एकही उद्गार आढळत नाहीं, यावरून माधवरावाचे वेळीं तिचें वर्तन गैर नसावें व ती स्वतः त्याच्या करड्या स्वभावाला अत्यंत भिऊन असावी असें दिसतें. बायकांच्या खटपटींसंबंधानें दप्तरांत कागदी पुरावा कोणत्याही प्रकारचा न ठेवण्याबद्दलही कदाचित् खबरदारी घेतलेली असेल. सन १७६९ च्या फेब्रुवारींत भोसले पुण्यावर चालून येण्याची भूमका उठली, तेव्हां आनंदीबाईस पुरंदरावर जाण्यास सांगितलें असतां, गरोदरपणामुळें ती गेली नाहीं. माधवरावाचे पश्चात् नारायणरावाचा खून व पुढें आपसांत युद्ध झालें त्यांत आनंदीबाईचें अंग किती होतें याचा विचार पुढें त्या प्रकरणांत येईल[१].

---

१ आधार.—पे. द. पृष्ठ १०८, १३४-१३६; का. सं. प. या. ले. ४९६ पृष्ठ ५४१; ऐ. टि. १·८; म. द. बा. पत्रें १-८; खं. १० प्रस्तावना.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण छत्तिसावें

दोन छत्रपतींच्या दोन दिशा

[सन १७६३–१७७२]

१. प्रतिनिधीशीं पेशव्यांचा बेबनाव.
२. साताऱ्यास छत्रपतींच्या भानगडी.
३. करवीरकर जिजाबाई व माधवराव.
४. मराठशाहीच्या घटनेंत कोल्हापुरची दुर्दशा.
५. पेशवाईतील साडेतीन शहाणे.

१. प्रतिनिधीशीं पेशव्यांचा बेबनाव (सन १७६२–१७७७).—सन १७५४ त जगजविन परशुराम ऊर्फ दादोबा प्रतिनिधि वारल्यावर, भवानराव ऊर्फ श्रीनिवास गंगाधर त्या पदावर दाखल झाला. याला पूर्वीपासून पेशव्यांचा पाठिंबा होता. शाहूच्या पश्चात् सर्व कारभार पुण्यास चालू लागल्यावर अष्टप्रधानांचें माहात्म्य संपलें. प्रतिनिधीलाही साताऱ्यास छत्रपतिजवळ कांहीं काम राहिलें नाहीं, व पेशव्यांची ताबेदारी त्यास नको असल्यामुळें, राज्याचे व्यवहारांत ते भाग घेईनातसे झाले. मोठमोठे सरंजाम त्यांजकडे असतां फौजा ठेवून ते पेशव्यांच्या मोहिमांत सामील होत नसत. इतकेंच नव्हे, तर संधि येतांच पेशव्यांचे विरुद्ध कांहीं तरी बंडाळी करण्यास ते चुकत नसत. त्यांस एकदम दुखविण्याचें धाडस पेशव्यांस नव्हतें. परंतु सवड सांपडेल तितका त्यांचा ताठा मोडण्यास पेशवे कमी करीत नसत. सचिव व प्रतिनिधि एवढेच काय ते अष्टप्रधानांपैकीं या वेळीं थोडे बहुत चळवळ करणारे होते. साताऱ्यास जाऊन पेशवाईचीं अगर अन्य वस्त्रें द्यावयाचीं तीं प्रतिनिधीचे हातून द्यावयाचीं असा परिपाठ होता. अर्थात् वस्त्रें घेण्यासाठीं छत्रपति व प्रतिनिधि या दोन व्यक्तींना आपल्या लगामीं ठेवणें पेशव्यांस भाग होतें. भवानरावास पेशव्यांनीं पुण्यास राहण्यास बोलाविलें, तें त्यानें कबूल केलें नाहीं, यामुळें दादास राग येऊन त्यानें सन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७६२त सर्व कारभार हातांत आला तेव्हां सखारामबापूचे सल्ल्यानें ता. १३ डिसेंबर रोजीं साताऱ्यास भवानरावाचें प्रतिनिधि पद काढून तें आपला अल्पवयी मुलगा भास्करराव याचे नांवें केलें, आणि नारो शंकरास त्याचा मुतालिक नेमिलें. परंतु तीन महिने झाले नाहींत तोंच दादाचा हा मुलगा देवी येऊन मरण पावला. तेव्हां नारो शंकरासच दादानें प्रतिनिधिपदावर कायम केलें. ता. १३ फेब्रुवारी १७६३ चे कागदांत व इतरत्र नारो पंडित प्रतिनिधि असें नांव आहे तें नारो शंकराचें होय. नारो शंकर दादाचे पक्षांतला असून,त्याचीच साथ करणारा वजनदार लढवय्या होता, म्हणून अप्रत्यक्षपणें अष्टप्रधानांस आपल्या हताखालीं कामास लावण्याची ही एक युक्ति होती. परंतु अल्पवयी मुलास पद दिल्यानें दादाचा स्वार्थ मात्र दिसून आला. प्रतिनिधि व त्यांचे मुतालिक यमाजी शिवदेव या दोघांचीं पुरातन पदें गेल्यामुळें ते पेशव्यांवर अत्यंत रुष्ट झाले. भवानराव किन्हईस देवीजवळ जाऊन अनुष्ठान करूं लागला. त्यास सदाशिव ऊर्फ गमाजी यमाजी जाऊन भेटला. निजामाचा दिवाण विठ्ठल सुंदर व गमाजी हे व्याही होते. गमाजी व भवानराव लगेच जाऊन निजामास भेटले, आणि त्यास पेशव्यांवर स्वारी करण्याची त्यांनीं भर दिली. निजामानें या कामांत भोसल्यांची मदत पाहिजे असें सांगितल्यावरून भवानराव व गमाजी जानोजी भोसल्यास जाऊन भेटले. जानोजीचा कारभारी देवाजीपंत त्यांस अनुकूल झाला. जानोजी व भवानराव यांनीं शपथक्रियापूर्वक ता. ११-४-१७६३ रोजीं एक करार केला. छत्रपति व पेशवे या दोघांसहीं काढून जानोजी भोसल्यास साताऱ्यास छत्रपतीचे गादीवर बसवावयाचें असा त्यांचा घाट होता. माधवरावास मुखत्यारी असती तर त्यानें हा घोटाळा होऊं दिला नसता. परंतु घोडनदीचे युद्धांत दादास प्रमुखपणा आल्यावर त्यानें प्रतिनिधीस पदभ्रष्ट केलें व मिरजेहून पटवर्धनांस काढिलें. त्यामुळें गोपाळराव पटवर्धनही निजामाकडे जाऊन वरील कारस्थानांत सामील झाला.

या कारस्थानाचें निरसन पेशव्यानें करून रुसून गेलेल्या मंडळींस परत आणून निजामास राक्षसभुवनावर चेपलें; आणि मग फुटून गेलेल्या मंडळींची समजूत काढिली. भवानराव व त्याचा मुतालिक गमाजी निजामास मिळाले होते ते भोसल्याबरोबरच परत पेशव्यांकडे आले, तेव्हां भवानरावास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुनरपि प्रतिनिधिपद देण्याचा ठराव ता. २१-९-१७६३ रोजीं माधवरावानें केला, आणि पुढील दसऱ्यास त्यास वस्त्रें दिलीं. या वेळीं स्वतः-ची फौज ठेवून पेशव्यांचे स्वारींत आपण हजर राहणार नाहीं, पण फौजेच्या खर्चाबद्दल दरसाल पाऊण लाख रुपये सरकारांत रोख भरूं, अशी कबुली भवानरावानें दिली. याप्रमाणें भवानरावानें पेशव्यांशीं मिटतें घेतलें तरी गमाजीनें मात्र तसें केलें नाहीं. त्यानें दंगाच चालविला. तेव्हां पेशव्यांनीं गमाजीवर फौज पाठवून त्याचा पराभव केला आणि त्यानें लोकांचीं घोडीं, उंटें वगैरे नेलीं होतीं, तीं पकडून ज्यांची त्यांस परत आणून दिलीं.

यानंतर कांहीं काळानें पेशव्यांनीं भवानरावास नोकरीस येण्याबद्दल पुनः निकड लाविली, त्यावरून भवानरावानें आपला चुलत बंधु भगवंतराव त्रिंबक यास आपल्या तर्फेनें पेशव्याजवळ राहण्यास पाठविलें. सन १७६४ त माधवराव पेशव्यानें हैदरावर मोहीम केली, त्यांत भगवंतराव हजर होता. भवानरावानें मात्र इकडे महाराष्ट्रांत राहून मिरज प्रांतीं बरीच धामधूम सुरू केली. 'प्रतिनिधीनें पटवर्धनांचे खेड्यांस उपसर्ग दिला. त्याचा आम्ही सूड घेऊं', असें १७६४ च्या जून महिन्यांत पटवर्धनांनीं स्वारींत माधवरावास कळविलें. भवानरावाचा हा उपद्रव हळूहळू वाढतच गेला. 'कर्यात सावरडेनजीक मुक्काम करून राहिले आहेत. चित्तीं खवखव फार आहे'. गमाजीचा सरदार सुर्वे याची व भगवंतरावाचे फौजेची लढाई होऊन सुर्वे मिरजेस पटवर्धनांचे आश्रयास गेला.

या धामधुमीमुळें भवानराव पेशव्यांचे मनांतून अगदीं उतरला. या वेळीं दक्षिणेंत सर्वत्र मोठीच दंगल चालली होती. कोल्हापुरकर छत्रपति, इचलकरंजीकर घोरपडे, पुरंदरे व कोळी यांनीं महाराष्ट्रांत गोंधळ उडवून दिला होता. दरम्यान सन १७६४ त गमाजी यमाजी मृत्यु पावला[1]. तेव्हां त्याचें

१. खरे ले. ५४० त गमाजी जिवंत असल्याचा उल्लेख असून, पे. द. पृष्ठ १६६ (ता. १२-१-१७६५) वर तो कैलासवासी आहे. ले. ५४० ची मिति रविवार, ज्येष्ठ शुद्ध ११ शके १६८६ (१०-६-१७६४) आहे. अर्थात् यानंतर गमाजी सन १७६४ त वारला असें सिद्ध होतें. ले. ४४९ व ५४० एकत्र वाचावे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुतालिकीचें पद पेशव्यांनीं त्याचा चुलत भाऊ वासुदेव अनंत यांस दिलें, त्या वेळीं वासुदेव अनंतानें पुढें दर्शविल्याप्रमाणें पेशव्याची हुकमत पाळण्याचें कबूल केलें. 'पदाचे अधिकारी प्रतिनिधि त्यांचे मुतालिक तुम्ही. त्यास कारभाराचा बंदोबस्त तुमचेच हातें घेऊं. फौजा व सरंजाम असेल त्या अद्मासानें फौजेनिसीं आमचे समागमें चाकरी करीत जावी. इकडील लक्ष धरून आमचे सांगितल्याप्रमाणें वर्तत जावें. यमाजी शिवदेवांपासोन अन्याय झाले, कर्ज वगैरे फार झालें, ते विषयींचा उपद्रव तुम्हांस देणार नाहीं. लहान सहान गोष्टींचे बंदोबस्त रीतीनें तुम्हींच समजोन करावे'. ता. १२-१-१७६५ चा हा करार प्रतिनिधीचे इतिहासांत महत्त्वाचा आहे. याप्रमाणें मुतालिकास वश केल्याबरोबर भवानरावाचे हातपाय आंखडले गेले. पुढें सन १७६५ चे उन्हाळ्यांत पेशवे स्वारींतून पुण्यास आला तेव्हां भगवंतरावासच त्यानें प्रतिनिधीचे स्थानीं स्थापून भवानरावास साफ काढून टाकिलें. 'भगवंतरावास प्रतिनिधीचीं वस्त्रें व वासुदेव अनंतास मुतालकीचीं वस्त्रें येथें देऊन कारकून पाठविले आहेत, तर तुम्ही तेथें महाराजांस अर्ज करून पूर्ववत् बहुमानपूर्वक वस्त्रें उभयतांचीं लिहिल्या अन्वयें देवविणें', असें पत्र माधवरावानें व्यंकाजी पोतनीस यास ता. २८-५-१७६५ रोजीं लिहिलें. यावरून वस्त्रें देण्याचा हा विधि किती निर्जीव झाला होता हें दिसून येतें.

या उपक्रमानें भवानराव व भगवंतराव यांजमध्यें वितुष्ट वाढून लढाई सुरू झाली. सातारा प्रांतांतले डोंगरी किल्ले भवानरावाचे ताब्यांत असून छत्रपतीचे मंडळांत त्याचें वजन विशेष होतें. 'प्रतिनिधि उभयतां झुंजले. भवानरावांनीं चांगली मर्दुमी केली. प्रस्तुत कऱ्हाडास आले. भगवंतरावांनीं मसुरास मोर्चे लावून घेतले. उभयतांचे कजियानें कऱ्हाड प्रांत ओस पडला आहे'. (जुलई १७६५). हें युद्ध आठ दहा महिने जोरांत चाललें. प्रांतांतले तमाम किल्ले भगवंतरावाचे स्वाधीन करावे असा हुकूम पेशव्यानें ता. २३-९-१७६५ रोजीं काढला. पुढें भगवंतरावाचा सरदार यशवंतराव कोळेवाडींत होता त्याशीं भवानरावानें युद्ध करून कुटुंब परिवारासह त्यास पकडून दातेगडावर कैद करून ठेविलें. कोळेवाडीस आग लागून बायका पुरुष जळून मेले. भवानराव तमाम मुलखांत रोखे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करीत आहेत. काल भगवंतराव वाईस होते. पांचशें जमाव आहे. ऐसें अरिष्ट या प्रांतीं आलें आहे'. (२०-१२-१७६५). दोघेही शूर व फौजबंद. दोघांकडेही प्रांतांतले दंगेखोर मिळाले. वाई, सातारा, कऱ्हाड, पाटण एवढा मुलूख बेजार झाला. हा दंगा वाढत चालला असें पाहून पेशव्यानें भवानरावास पकडण्यासाठीं रामचंद्र गणेश यास फौज देऊन तिकडे पाठविलें. त्यानें सन १७६६ च्या मार्चांत भवानरावाशीं लढून कडेगांव घेतलें. भवानरावास बाबूजी नाईकही या वेळीं सामील होता, असें दिसतें. बाबूजी नाइकाची चिजवस्त याच वेळीं जप्त करण्यांत आली. दोघांचाही पाठलाग रामचंद्र गणेशानें इतक्या जोरानें केला, कीं त्यांस कोठेंच थारा राहिला नाहीं. इकडून स्वतः माधवराव पेशवा हरिपंत फडके वगैरेंसह गोदावरीच्या बाजूस फिरत असतां, रामचंद्र गणेशाची मोहीम फत्ते झाल्याचें वर्तमान ऐकून, माधवराव गंगापुरास मातुश्रीकडे जाणार, इतक्यांत हरिपंत फडके पुणतांब्यास होता त्यास भवानराव जाऊन भेटला. हरिपंत लिहितो, 'भवानराव चहूं राउतांनिशीं लष्करांत आले, आम्हांस वर्तमान कळतांच गेलों. त्यांचें मनांत श्रीमंतांकडे असेच जातों बोलले. आढेवेढे घेतले तरी शेवटीं पालखींत घालून श्रीमंतांकडे जात असों. कांहीं खात नाहींत. श्रीमंतांचें दर्शन झाल्याखेरीज अन्नउदकही घेत नाहीं म्हणतात. निखालसतेच्या गोष्टी फार सांगतात. श्रीमंतांजवळ जाईन, करतील तें करूत, असें बोलतात.

भवानरावास कोणी तरी कानमंत्र सांगितला, कीं पेशवे आतां सर्वच राज्याचा कारभार पाहतात, त्यांच्याशीं वांकडें करून चालणार नाहीं; त्यांची हुकमत मान्य कराल, तर माधवराव तुमची सर्व सोय लावून देतील. भवानराव मोठा आर्जवी होता. त्यानें पेशव्याची भेट घेऊन स्पष्ट बोलून त्याचे मनांतील अढी तेव्हांच काढून टाकिली. परंतु भगवंतराव आजपर्यंत पेशव्यांस चिकटून राहिला तेव्हां त्यास तोंडघशीं पाडणेंही पेशव्याचे जिवावर आलें. तेव्हां तूर्तातूर्त दोघांची समजूत काढण्याकरितां पेशव्यानें भवानरावास पुण्यास ठेवून घेऊन त्याचे खर्चास आपल्या जामदारखान्यांतून दरसाल ५० हजार रुपये रोख देण्याचें ठरविलें, आणि भगवंतरावाचा इतमाम कायम ठेविला. दोन तीन वर्षें भवानराव पुण्यास रिकामाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राहिला. इकडे कांहीं किल्ले व प्रांत भगवंतरावाचे ताब्यांत आले नव्हते, तेही सन १७६७ च्या मार्चापासून सेप्टेंबरपर्यंत पेशव्यानें हुकूम पाठवून भगवंतरावास देवविले.

भवानराव बाणेदार होता. त्यास पुण्यांत रिकामें बसून राहण्याचा अगदीं कंटाळा आला. (ढापरे यांचा प्रतिनिधि इ०). पण वर्षसहा महिन्यांहून जास्त काळ गेला असेलसें वाटत नाहीं. साडेतीन वर्षें झाल्यावर त्यानें पेशव्यास भेटून कळविलें, कीं आजपर्यंत येथें राहिलों, अद्यापि माझा निकाल होत नाहीं. याकरितां काशीस जाण्याची योजना केली आहे. असें म्हणून निरोप मागितला. पेशव्यानें त्यास काशीस जाण्यास परवानगी दिली. परंतु मागाहून कारभाऱ्यांनीं समजावलें कीं, भवानराव गृहस्थ काशीस जाऊन स्वस्थ बसणारा नव्हे, हें नसतें विघ्न तुम्हीं करून घेतलें. तेव्हां बाबूजी नाइकास भवानरावाकडे पाठवून पेशव्यानें पुनः त्याची समजूत करून परत आणिलें. 'भवानरावाची बोली लागली आहे; पुढें सरंजाम पेस्तर सालापासून देण्याचा ठराव झाला. अखेरसालपावेतों ३२ हजार रुपये भवानरावास पेशव्यांनीं द्यावे; दीड हजार घरास द्यावे; एक गांव हजार रुपयांचा पुणें देशीं द्यावा', असें करारांत आलें. 'भगवंतराव आमचा मूल आहे, त्याचा बंदोबस्त आम्ही पाहिजे तसा करूं', असें भवानरावानें सांगितल्यावर, तें कबूल करून पेशव्यानें भवानरावास प्रतिनिधिपद, फौजेबद्दल साडेचार लाख, व जातखर्चास ५० हजार, मिळून पांच लाखांचा सरंजाम ठरवून दिला. ही व्यवस्था माधवरावाचे अखेरीपावेतों चालली. या भानगडींतच कोंकणच्या व्यवस्थेसंबंधानें पेशव्यानें प्रतिनिधीशीं करार करून घेतला. (तह व करारमदार—पृष्ठ २१३).

पुढें माधवरावाचे मृत्युनंतर पुनः भगवंतराव व भवानराव यांची लढाई चालू झाली. भगवंतराव व मुतालिक वासुदेव अनंत यांचें वांकडें येऊन मुतालिक भवानरावास मिळाला. माधवराव पेशव्याचे मृत्युसमयीं प्रतिनिधींचें हें भांडण ऐन रंगांत आलें होतें. वसंतगड, कऱ्हाड, विटें येथें लढाया होऊन भगवंतरावाचा पराभव झाला, आणि तो विटें येथें जाऊन राहिला. तेव्हां सर्व दौलत भवानरावाचे ताब्यांत आली. भगवंतरावाकडे दीड लक्षांचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरंजाम चालत होता. भगवंतराव पुढें सन १७७५ सालीं मृत्यु पावला. नारायणरावाचे खुनानंतर भवानराव अंतर्यामीं कारभारी पक्षास मिळून राहिला. तथापि दादा कारभार करूं लागल्यावर त्यांचे तंत्रानें त्यास चालावें लागे. सन १७७४ त दादा कर्नाटकस्वारींत असतां त्याचे सांगण्यावरून भवानरावानें दोन तीन हजार फौज चाकरीस ठेविली. परंतु हा आतां आपल्या विरुद्ध उठेल असा संशय दादास आल्यामुळें, त्यानें भवानरावास हुकूम केला कीं, आतांचे आतां फौजेस निरोप द्या. तसें करणें धोक्याचें समजून भवानरावानें तें मानलें नाहीं. त्यावरून भवानरावाचा गोठ लुटण्याकरितां मुराररावा घोरपड्यास दादानें आज्ञा केली. मुराररावानें ती अमान्य केली. इतर सरदारांनींही तसाच जबाब दिला. कारण आज जी गत प्रतिनिधीची तीच उद्यां आमची, हें ते पक्कें ओळखून होते. तेव्हां स्वतः दादानें आपली हुजरात व गारदी अशी फौज नेऊन प्रतिनिधीच्या गोटासभोंवार उभी केली, आणि समेटाचा घाट घातला. परंतु प्रतिनिधि वठणीस येईना. शेवटीं एक दिवशीं रात्रीं प्रतिनिधीचा गोट लुटण्याचा हुकूम दादानें हुजरातीस व गारद्यांस दिला. परंतु प्रतिनिधीच्या लोकांनीं निकरानें लढण्याची शपथ वाहिली कीं, आपण मरून जाऊं, परंतु धन्याचे केंसास धक्का लागूं देणार नाहीं. भवानराव प्राणांवर उदार होऊन बायकोस घोड्यावर बांधून मरण्यास सज्ज झाला, हें पाहून दादाचे लोक इतका अतिप्रसंग करण्यास कचरले. पुढें कोणीच जाईनात. रात्रभर घोळ चालल्यावर पहांटे दादानें आपले लोक परत बोलाविले, आणि भवानरावास अभय सांगून पाठविलें. मनांतला हेतु कीं, हें काम युक्तीनें व कपटानें प्रसंग पाहून सिद्धीस न्यावें. ही धामधूम आठ पंधरा दिवस चालली. पुढें कांहीं दिवसांनीं स्वारींतून परत येतांना दादानें प्रतिनिधि व रामचंद्र गणेश यांस नजर कैदेंत ठेविलें. त्यांतून पुढें त्यांची लवकरच सुटका झाली. वास्तविक हा भाग नारायणरावाचे खुनानंतर उपस्थित झालेल्या प्रकरणांतच सांगण्यांत येईल. भवानराव श्रावण वद्य १३ शके १६९९, ता. ३०-८-१७७७ रोजीं कऱ्हाड प्रांतीं बैलवडें येथें मृत्यु पावला. त्याच दिवशीं त्याची स्त्री प्रसूत होऊन, तिला मुलगा झाला, तो परशुराम श्रीनिवास उर्फ थोटेपंत होय. यानें नशिबाचे व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राज्यांच्या घडामोडींचे अनेक खेळ पाहून ता. १०-५-१८४८ रोजीं स्वर्गवास केली.

२. सातान्यास छत्रपतींच्या भानगडी.—सप्तर्षि ऊर्फ सातारा किल्ला व छत्रपतींची व्यवस्था प्रथमपासून दादानें आपल्या हातीं ठेविली होती. ती सन १७६७ च्या दिपवाळीचे सुमारास माधवरावानें सर्वस्वीं स्वतःचे हातीं घेतली. आरंभीं या बाबतींत दादाची सर्व मदार सखारामबापूवर होती. 'सखारामबापू कारभारी कुलकुला म्हणजे पूर्ण मुखत्यारीचे जाहले'. दादाच्या अल्पवयी मुलास प्रतिनिधिपद देण्याची सल्ला सखारामबापूची होय. पुढें सन १७६३ चे उन्हाळ्यांत जानोजी भोसले यास छत्रपति करण्याचा घाट सिद्ध होऊन पुण्याकडील प्रदेश उद्ध्वस्त करीत गमाजी-बावा चालून आला, तेव्हां माधवराव पेशव्यानें महिपतराव त्रिंबक परंदरे यास घाईघाईनें ता. ३-५-१७६३ रोजीं हुकूम पाठविला कीं, 'स्वामीस किल्ल्यावर नेऊन ठेवणें आणि तुम्हीं निघोन पुण्यास येणें'. त्यावर रामराजे किल्ल्यावर जात नाहींत, असे त्यांचे जाबसाल तपशीलवार महिपतरावानें लिहून पाठविले. त्यावर पुनः माधवरावानें ता. १९-५-६३ रोजीं लिहिलें, 'राजश्रींस किल्ल्यावर न्यावयाचा मजकूर लिहिला तो कळला. त्यास आमचें येणें तिकडे होईल असा निश्चय नाहीं. प्रस्तुत काल खालीं राहवयाचा नाहीं. यास्तव लिहिल्याप्रमाणें सत्वर करणें'. पुनः दुसऱ्याच दिवशीं पेशव्यानें ता. २०-५-६३ रोजीं कळविलें, 'राजश्रीस आरोग्य झालेंच आहे. तरी हरतजवीज करून त्यांस किल्ल्यावर घेऊन जाणें'. यास्तव पुढें महाराज किल्ल्यावर गेले. आम्ही उतरावयाचे नाहीं, असें महाराजांनीं सांगितल्यावर गमाजीपंत माघारे फिरले. महाराज खालीं असते तर त्यांस पकडून दुसरा इसम गादीवर बसविणें शक्य होतें. परंतु पेशव्यांनीं त्यांस

---

१. **आधार.**—मा. रो. १०, २१, २२, १२०, १२१, १२५,–१२७; ऐ. टि. १-३२; पे. द. पृष्ठ १६५–१६६; तह व करार म. पृष्ठ २१३; का. सं. प. या. ११४, १२३; खरे ले. ४४९, ५४०, ५४२, ५७२, ५७३, ५८३, ५८५, ५९०, ७४८, ७५७, १२२२, १३२६, १३२७ व पृष्ठ २०१९–२०२३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किल्ल्यावर बंदोबस्तानें ठेविल्यामुळें गमाजीचा बेत फसला. 'ऋषिपर्वत गकार नामकाचे हातास लागला तर त्याचें पारडें भारी झालें म्हणोन समजावें', असा इशारा पटवर्धनांनीं पेशव्यांस दिला होता.

व्यंकाजी माणकेश्वर पोतनीस या नांवाचा एक गृहस्थ पुरंदऱ्याचा आत छत्रपतींचा कारभार पाहत असे. पेशव्यांचे तर्फे महिपतराव पुरंदरे तेथें होता. छत्रपतींच्या घोडयांची चंदी दररोज भरण्याबद्दल ता. १७-२-६३ची पेशव्यांची ताकीद व्यंकाजीपंतास असे. किल्ल्याचे बंदोबस्तास राणोजी सिंदे होता. व्यंकाजी पोतनीस वरकरणीं माधवरावास अनुकूल, पण अंतस्थ रीतीनें दादांचे पक्षांत किंवा गमाजीचे वगैरे फितुरांत सामिल असे. राक्षसभुवनच्या लढाईचें वर्तमान माधवरावानें व्यंकाजीपंतास कळवून लिहिलें कीं, 'तुम्ही गेलां ते समयीं आज्ञा करणें ती केली होती. त्यानंतर तुम्हीं जाऊन बहुत एकनिष्ठेनें चाकरी केली, हें सर्व येथें ध्यानांत आहे. तुम्ही पुरातन एकनिष्ठ. पुढेंही येथील लक्ष राखून एकनिष्ठेनें सेवा करीत जावी', (ता. १७-८-१७६८). यांत पोतनिसाच्या निष्ठेबद्दल संशय ध्वनित केला आहे; व तो पुढें थोडा बहुत खरा झाला. सन १७६४च्या पावसाळ्यांत पेशवा कर्नाटकांत छावणीस राहिला, आणि मागें चुलता त्याजविरुद्ध खटपट करूं लागला. गमाजी यमाजी सुद्धां या वेळीं पेशव्यांचे विरुद्धच वागतांना पाहून, व्यंकाजी पोतनिसानें कारस्थान उभारिलें. साताऱ्यास व्यंकाजीपंत व राणोजी सिंदे परस्पर एक मिळणींत नव्हते. राणोजी कौल जागा जतन करून श्रीमंतांचे पायांशीं एकनिष्ठ होते. त्यास अलीकडे तो प्रकार नाहीं. किल्ल्याचा बंद उठल्यावर किल्ला व्यंकाजीपंत आपले लगामीं लावून घेऊन आबा पुरंदरे याजकडे देणार. लष्करांतूनही सखाराम-बापूचें पत्र राणोजी सिंद्यास उमेदीचें आणून बुद्धिभेद केला', (जुलई सन १७६४). सप्तऋषीचा फितूर केला. गमाजीस पुढें करून किल्ला सरकारचा देणार. परभारें खूळ उभें करून, आपण नामानिराळे, ही हकीकत ठरोन, गमाजी परळीस येऊन राहिले. राणोजी सिंद्याचा देखील बुद्धिभेद केला. पाऊण लक्षाचा सरंजाम राणोजीस देऊं करून, जाल्यास दगा करावा, अशी बातमी दोघांतिघांकडून आली'. या कारस्थानाची बातमी पेशव्यास स्वारींत कळल्याबरोबर त्यानें लगेच(२५-८-१७६४) रोजीं नाइकास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्रिंबकराव पेठ्यास लिहिलें कीं, 'साताऱ्यास बंदोबस्त तीर्थरूपांस विनंति करून दौलतीस उपयोगी पडे ऐसा करावा. वडिलांस एकांतीं विनंति करून आज्ञा घेऊन बंदोबस्त राहावा. हें पत्र कोणासही न कळविणें. साताऱ्याचे फडणीस सबनीस गैरवाका समजावून दादासाहेबांनीं नाशकाला नेले होते. बेहेडा दूर करावा, ही घालमेल करणार होते. त्यास श्रीमंतांस समजावून पहिला बंदोबस्त फिरवूं नये, असें त्रिंबकराव व गोविंद शिवराम यांनीं केलें. कालगत विचित्र कीं, इतबारी सेवकांनीं चांगली गोष्ट सांगावी ते दादासाहेबांचे चित्तांत न यावी. बरकडांच्या विपरीत गोष्टी उत्तम मानाव्या. यावरून ईश्वराचे मनांत तमाशा पाहवा असें दिसतें.' परंतु दादांनीं आपला हट्ट सोडिला नाहीं. त्यांनीं व्यंकाजी माणकेश्वरास ता. १३-९-१७६४ रोजीं लिहिलें, कीं 'राणोजी सिंदे किल्ले सातारा यांस सिक्कामोर्तब नवीन तयार करून दिलें असें. शिक्यांत नांव 'रघुनाथ चरणीं तत्पर, राणोजी सिंदे निरंतर', याप्रमाणें कोरून नवीन शिक्कामोर्तब तयार करून द्यावा'. परंतु स्वतः दादाच्या नेभळेपणामुळें त्याचें कोणतेंच कारस्थान सिद्धीस गेलें नाहीं. माधवरावाच्या जरबेपुढें अनेक खटपटी लोक नरम झाले. 'व्यंकाजीपंतांनीं साताऱ्यास नवीन शिक्के करून ताम्रपट लोकांस देऊं लागले, ही बातमी सरकारांत कळली. श्रीमंतांस पत्रेंही सांपडलीं. त्यावर श्रीमंत इतराज होऊन ढालाईत सप्तऋषीस मशारनिल्हेस आणावयास गेले आहेत. श्रीमंत पोतनिसाची अब्रू घेणार. त्याजवर आरोप फार आले आहेत. तेथचा कारभार गणेश विठ्ठल वाघमारे यास सांगितला'. हा बंदोबस्त १७६५ च्या पावसाळ्यांत पेशव्यानें पुण्यास केला. व्यंकाजीपंतास पुनः पोतनिसीवर लगेच दाखल केलें असें दिसतें. कारण पोतनिसीचे वांटणीचें काम सन १७६६ च्या मे महिन्यांत पेशव्यापुढें होतें.

सातारच्या राजमंडळाची फडणिसी सखारामबापूकडे होती, ती थोडप-नंतर माधवरावानें काढून, नाना व मोरोबा फडणीस यांजकडे दिली. तसेंच महिपतराव पुरंदरे दादाचे कलाचा दिसल्यावरून ता. १-१०-१७६९ रोजीं त्यास काढून त्याचे जागीं कृष्णराव अनंतास साताऱ्यास नेमिलें.

लक्षांत ठेवणें जरूर आहे कीं, या व अशा भानगडी अनेक चालू असतां त्यांत प्रत्यक्ष रामराजाचें कांहीं एक अंग नव्हतें. फितव्याचे सर्व खेळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादाचे होते. सन १७६७ चे दिपवाळींत सातारा किल्ला दादाचे हातून काढून माधवरावानें आपले कबजांत घेतला. आरंभापासून छत्रपतीची व्यवस्था माधवराव सढळ हातानें करीत असे. महाराजांची स्त्री जानकीबाई मेली, तिच्या भूमिदानाची सनद ता. १४-६-१७६४ ची आहे. किल्ल्यावरील वाडे व घरें मोडकळीस आलीं त्यांची दुरुस्ती सन १७६७ त करण्यांत आली. छत्रपतींचे तैनातीस हुजरे माणसें ठेवणें तीं माधवराव आपले पसंतीनें ठेवी. त्यांस बागा व घोड्यांस चरण्यास कुरण, कलावंतिणी वगैरेंची तजवीज पेशव्यांनीं केलेली आढळते. स्वारींत जातां येतां माधवराव वारंवार साताऱ्यास जाऊन राजश्रींची भेट घेई. 'सन १७६६ त राजश्रींस समाधान नव्हतें. आतां आरोग्य झालें', असा उल्लेख आढळतो.

रामराजे यांचीं लग्नें दोन झालीं. थोरली दुर्गाबाई, शिर्के यांजकडील, धाकटी सगुणाबाई आईसाहेब बराणजी मोहिते यांची कन्या. या प्रत्येकीचे खर्चास सालिना आठ हजारांचे गांव नेमून दिलेले होते. रामराजे यांस पुत्र नाहीं. कन्या तीन जाल्या, त्यांचीं लग्नें येणेंप्रमाणें झालीं:—बाळाबाई रघोजीराव मोहिते कुंभारगांवकर यास दिली; संतूबाई दुर्गोजी महाडिक तारळेकर यास, व राणूबाई मालोजी बिन महादजी नाईक निंबाळकर यास दिली. हा महादजी नाईक राक्षसभुवनावर पेशव्यांचे तर्फेनें लढत असतां मारला गेला. राणूबाईचें लग्न ता. २१-२-१७६३ रोजीं झालें. मुलींसही नेमणुका बांधून दिलेल्या होत्या.[१]

३. कोल्हापुरकर जिजाबाई व माधवराव, (सन १७६०–७३).—कोल्हापुरकर संभाजी व त्याची बायको जिजाबाई यांची हकीकत पूर्वी मध्यविभाग २, पृष्ठ २८९–९७ येथें येऊन गेली आहे. सन १७५९ त नानासाहेबानें संभाजीशीं दोन करार केले. पहिल्यांत पेशव्यांचे सवालास संभाजीचा जबाब आहे, व दुसऱ्यांत संभाजीचे सवालास पेशव्याचा जबाब

---

१. **आधार**—का. सं. प. या. १७८, १७९, १८१; खं. १४. ३५, ३६, ३७, ७४; चं. १२०; मा. रो. १. ७१, ७८, १६६, ३५९, ३९८; खरे ले. २९४, ३३५, ५७६, १०४८; खं. ६. ४२४ व ४१८; स. मा. रो. १. ३७; ऐ. स्फु. ले. वर्ष ८ पृष्ठ २८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. 'रामराजा खोटा' हें तर लोकांचे प्रत्ययास आलेंच होतें, तेव्हां त्यास मारून न टाकतां लेकवळा समजून त्याचें पालन करावें, जिजाबाई आईसाहेब यांच्या वडीलपणास अंतर न करावें, करवीर छत्रपतींनीं पेशव्यांस कधीं अंतर न द्यावें, व पेशव्यांनीं त्यांचें कर्ज वारावें, अशा मतलबाचा पहिला करार आहे. दुसऱ्या करारांत कोल्हापुर राज्यांतील अनेक वादग्रस्त मुद्यांचा निकाल पेशव्यानें करून दिला आहे, आणि शेवटीं 'चिरंजीव भाऊंनीं ऐवज करार केला आहे त्याप्रमाणें प्रविष्ट होईल', असें वाक्य आहे. म्हणजे हाही करार, वर मिति नाहीं तरी, नानासाहेबानेंच संभाजीस करून दिलेला आहे. (तह व करारमदार, पृष्ठ ४५-४६).

या उपरांत ता. २-५-१७६० रोजीं मनोळी तालुक्यांत जिजाबाईचा अंमल बसवून देण्याचा करार नानासाहेबानें करून दिला. बहुधा वरच्या करारांत उल्लेख असलेल्या यादीची ही नक्कल असावी. हुकेरीचा मामलेदार शेषो नारायण रुईकर याजपासून जिजाबाईनें कर्ज काढून फेडीकरितां बेळगांवजवळचे चिकोडी, मनोळी व कागल हे तालुके लावून दिले होते; परंतु चिकोडीचे देसाई, कागलचे घाडगे, व मनोळीचे सिंदे, राणीची मालकी साफ नाकबूल करून शेषो नारायणाचा अंमल बसूं देईनात. तो अंमल बसवून द्यावा म्हणून पेशव्याचे दरबारीं शेषोपंताची फार दिवस खटपट चालली होती. त्यांतच जिजाबाईनेंही सक्तीची खटपट पेशव्यांकडे करून, त्यांच्याकडून देवावरच्या तुळशी उचलून शपथ घेवविली कीं, तुमचीं ठाणीं जिंकून तुमच्या हवालीं करून देऊं. ही शपथ पुरी पाडण्याचें काम माधवरावाच्या मनांत होतें; परंतु पूर्वी सवड आली नाहीं म्हणून १७६४ त हैदरावर जातांना ही कामगिरी माधवरावानें सिद्धीस नेली. या तीन तालुक्यांची ही भानगड फार वर्षे सर्वांसच मोठी त्रासदायक झाली, यांत संशय नाहीं. तूर्त माधवरावानें कोल्हापुरच्या गादीसंबंधानें काय तजविजी केल्या तें प्रथम सांगितलें पाहिजे. संभाजी ता. २०-१२-१७६० रोजीं वारला, त्या वेळीं धाकटी राणी कुसाबाई गरोदर होती. कोल्हापुर व सातारा ह्या दोन गाद्या एक करून घरगुती कलह कायमचा मिटवावा, असें पेशव्यांचे मनांत फार दिवस होतें. याच संधीस पानिपतचा प्रसंग, नानासाहेब पेशव्याचा मृत्यु, व माधवरावाचा चुलत्याशीं बेबनाव, हे प्रकार उपस्थित झाल्यामुळें, कोल्हापुरची गादी खालसा करण्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपला मनोदय पेशव्यास सिद्धीस नेतां आला नाहीं. विशेषतः जिजाबाईच्या मनांत कोल्हापुरचें राज्य स्वतंत्र राखण्याचें असून तिच्या या कठोर निश्चयापुढें पेशव्यांस हार खावी लागली. संभाजी वारल्याबरोबर संस्थान खालसा करण्यासाठीं नानासाहेबानें फौज पाठविली. ता. २०-१-१७६१ रोजीं जिजाबाई लिहिते, 'पंतप्रधानांनीं परामर्षाचें पत्रही न पाठवितां इकडील बंदोबस्तास फौज पाठविली, तेव्हां साहेबांच्या व प्रधान-पंतांच्या ऋणानुबंधास सीमा आहे! स्वामी हयात असतां संधान रक्षून आणा-शपथा घेऊन, साहेबांशीं अंतर करूं नये, याप्रमाणें प्रधानपंत वचनासीं गुंतले असतां, याप्रमाणें मजकूर घडून आला. चि० कुसाबाई गरोदर आहेत. जेथें क्रियाच राहिली तेथें काय बोलणें!' पुढें दादांनीं अनुबाई घोरपडे यांस लिहिलें कीं, 'कुसाबाई गरोदर आहेत म्हणून सांगतात, तर तुम्हीं कोल्हापुरास जरूर जाऊन शोध घेऊन निश्चय मनास आणून कळवावा'. त्याप्रमाणें अनूबाई कोल्हापुरास जाणार होती, परंतु त्याच संधीस नाना-साहेब पेशव्याची प्रकृति बिघडून हिंदुस्थानांतून परत येऊन त्यानें गोदावरीतीरीं अनूबाईस भेटीस बोलावलें. तेव्हां अनूबाई त्याजकडे टोक्यास गेली, कोल्हापुरास जाऊं शकली नाहीं. पुढें 'कुसाबाई वैशाख वद्य ७ इंदुवारीं पांच तास रात्रीस ता. २५-५-१७६१ रोजीं प्रसूत झाली. राजकुवर जन्मास आले. तुम्हां कारणें साखर पाठविली आहे. स्वीकार करणें'. असें पत्र जिजाबाईनें अनुबाईस लिहिलें. वास्तविक पुत्र झाला नव्हता, कन्या जन्मास आली. तरी जिजाबाईनें हें लटकेंच कारस्थान रचिलें. ता. ३०-५ १७६१ रोजीं जिजाबाई लिहिते, 'कुसाबाई गरोदर असते समयीं तुम्हांस येण्याविषयीं वरचेवर पत्रें पाठविलीं. कां कीं तुम्ही वयातीत बायका आणि पुरातन सेवक राबत्यांतील, साहेब दुःखांत निमग्न, प्रधानपंतांसही लिहिलें होतें. ऐशास त्यांच्या व तुमच्या ध्यानांत आलें जे, परीक्षेसाठीं बोलावतात. पुढें राजकुवर जाहलाच तर संदेह पडण्यास जागा राहत नाहीं. तुम्ही न आलां. साहेबांचे वंशांत अशा क्लिष्ट कल्पना यामागें झाल्या नाहींत व पुढें-ही होणें नाहींत. सर्व जनांस शिक्षा करणेचें व बुद्धिवाद सांगणेचें स्थळ हें. सांप्रत तुम्हीं येऊन परीक्षा पाहून, सांगणाराशीं सांगोन, त्यांचे मुखें होय म्हटल्यानें हा राजा होतो, नाहीं तर ब्रह्मदेवाचें लिहिणें लटकें पडतें, असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं'. यानंतर सहा महिन्यांनीं माधवराव पेशवा कर्नाटकांत जात असतां कोल्हापुरास जाऊन जिजाबाईस भेटला. तो १६-२-१७६२ रोजीं मातुश्रीस लिहितो. 'बाईंची भेट उद्यां होईल. राजा खोटा हें त्यांच्याच मुखें जाहलें. त्याचीं आईबापें धरून आणिलीं आहेत'. म्हणजे मुलगा झाला ही खतमी आपण खोटीच कळविली असें जिजाबाईनें कबूल केलें; आणि जो बाहेरचा मुलगा बदलून आणिला होता, त्याचे आईबापांस शासन करण्यांत आलें. असे खोडसाळ उद्योग केल्यानें जिजाबाईचा पुष्कळशा दुर्लौकिक झाला.

पुढें दत्तकाची परवानगी न देतां कोल्हापुरचें राज्य साताऱ्यास जोडावें, असाच पेशव्याचा विचार होता. परंतु जिजाबाईनें दत्तक घेण्याचा हट्ट धरिला. शहाजीराजे खानवटकर यांचा पुत्र माणकोजी यास दत्तक घेण्याचें तिनें ठरविलें. खानवट येथें माणसें पाठवून शहाजीराजाकडे तिनें मुलाची मागणी केली. परंतु पेशव्याच्या मान्यतेचें पत्र आणून दाखविल्याशिवाय आपण मुलगा दत्तक देत नाहीं असें शहाजीनें कळविलें. कारण जिजाबाईचे पश्चात् संस्थान खालसा झाल्यास मुलाचे हाल होतील, हें तो जाणून होता. त्यावरून कोल्हापुरचे पारसनीस पूर्वापार विश्वासु सेवक गोविंदराव प्रभु यांस जबाबाची मसलत विचारिली. त्यांनीं सांगितलें, प्रथम मुलास आणून लळा लावून घ्यावा. मग प्रधानांचा विचार घेतां येईल. त्याप्रमाणें जिजाबाईनें मुलास प्रथम त्याचे आजोळीं तारळ्याचे महाडिक यांजकडे आणवून तेथून मग कोल्हापुरीं आणिलें; आणि पुढील अक्षय्यतृतीयेच्या मुहूर्तानें म्हणजे ता. २७-४-१७६२ रोजीं जिजाबाई पेशव्याची भेट घेण्याच्या उद्देशानें गोविंदराव पारसनिसास घेऊन जेजुरीस आली. तेथें माधवरावानें व रघुनाथरावानें पुण्याहून जाऊन तिची भेट घेतली. 'करवीरचे गादीस मालक करून देण्याचा आपला संकल्प दिसत नाहीं. सबब महायात्रेस जाऊन देह अर्पण करण्याचा हेतु आहे', अशी आपली इच्छा तिनें पेशव्यास कळविली. शाहूमहाराजांची आज्ञाही सातारा व कोल्हापुर या गाद्या एक करूं नयेत, अशीच असल्याचें तिनें सांगितलें. माधवरावानें साफ सांगितलें, 'हीं दोन राज्यें पृथक् नसून वास्तविक एकच आहेत. कौटुंबिक कारणानें द्वैतभाव होता तो संपला'. हें ऐकतांच जिजाबाई

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्रोधाविष्ट होऊन बोलल्या, 'असें आहे तर राज्य आपलें स्वाधीन करून घ्यावें, आणि आमची महायात्रेची तयारी करावी'. या वेळीं पेशव्याची गृहस्थिति त्यास अनुकूल नव्हती. चुलत्याशीं त्याचा कलह सुरू होता; त्यांत कोल्हापुरच्या ह्या प्रकरणाची आणखी भर पडून विपरीत परिणाम होईल, असा पोक्त विचार कारभारी मंडळांत ठरवून पेशव्यानें जिजाबाईस दत्तकाची परवानगी दिली, आणि तिला गौरवानें पुण्यास आणून दत्तका-संबंधीं लेख पुरे करून दिले. ते घेऊन जिजाबाई परत कोल्हापुरास गेली, आणि विजयादशमीचे मुहूर्तानें पन्हाळा येथें तिनें ता. २७-९-१७६२ रोजीं माणकोजीस दत्तक घेऊन सिंहासनारूढ केलें. तोफा सोडून आनंदोत्साव करण्यांत आला. नांव शिवाजीमहाराज ठेविलें. या वेळीं त्याचे वयास पांचवें वर्ष होतें. रघुनाथरावानें ता. २३-१०-१७६२ रोजीं जिजाबाईस व नूतन महाराजांस लिहिलें, कीं 'शहाजी भोसले खानवटकर साहेबांचे वंशांतील, त्यांचा पुत्र दत्तक घेऊन राज्याची स्थापना करावी येतद्विषयीं सेवकांनीं विनंतिपत्र पाठविलेंच होतें. त्यास साहेबीं त्या पुत्रास विधियुक्त घेऊन विजयादशमीचे मुहूर्तें सिंहासनारूढ केलें हें वर्तमान परस्परें कळोन संतोषावाप्ति जाहली. केला प्रकार सर्वांस मान्य आहे. सेवकांचेंही लक्ष दुसरें नाहीं. वस्त्रें भूषणें पाठविलीं आहेत. प्रत्युत्तराची आज्ञा करावी'. या वेळीं पेशव्यांनीं जिजाबाईस करार लिहून दिला त्यांत असा मजकूर आहे. 'सातार्‍यास खोटा प्रकार झाला तो सर्वांच्या प्रत्ययास आला. या-उपर त्याविषयींचा आक्षेप न करितां आपले विचारें बाईसाहेबीं पुत्र घेतला हाच प्रतिपाद्य करावा'. हें जिजाबाईचें म्हणणें पेशव्यानें करार करून दिलें. याशिवाय आणखी पुष्कळ कलमें उभयतांतील तक्रारीसंबंधाचीं त्या करारांत आहेत. त्यांचा तपशील येथें देण्याचें प्रयोजन नाहीं. उपरांत महाराजांचे वयास सहावें वर्ष लागल्यावर पुढील सालीं चैत्र शुद्ध १२ म्ह० ता. २६-३-१७६३ रोजीं मुंजीचा समारंभ करण्यांत आला. दोन्ही समारंभांस मोठा थाट व खर्च जिजाबाईनें केला. येणेंप्रमाणें कोल्हापुरच्या गादीचें हें प्रकरण संपलें.

मनोळी व चिकोडी या दोन कोल्हापुर संस्थानच्या तालुक्यांची भानगड फार दिवस चालली होती. त्याची हकीकत अशीच बेंगाट आहे. ती सर्व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येथें देतां येत नाहीं. या तालुक्यांतलीं पुष्कळशीं गांवें पुंडपाळेगारांनीं लुटून बळकाविलीं, तीं परत काबीज करण्याचें सामर्थ्य जिजाबाईस नव्हतें. म्हणून सन १७६४ त माधवराव कर्नाटकचे स्वारींत असतां त्यानें फौजेच्या खर्चाबद्दल जिजाबाईकडून सात लक्ष रुपये घेऊन, त्यांचे दोन्ही तालुक्यांचा अंमल पुनः सुरळीत चालू करून दिला. परंतु ही रक्कम जिजाबाईजवळ नसल्यामुळें पुण्याचे सावकारांचें कर्ज काढून व त्यांस दोन तालुके पेशव्यांचे जामीन-गिरीनें तारण लावून देऊन, तिनें रकमेची भरती केली. 'चिकोडी घेऊन राणीस द्यावयाची आहे. पुढें मनोळीस सत्वरच जात आहों. मनोळीचें काम झाल्यावर पुढें जाऊं. मनोळी घेऊन दिली म्हणजे शेषो नारायण (जिजाबाई-चा कारभारी) यांनीं दोन लाख रुपये द्यावेसा करार आहे', असें माधवराव मातुश्रीस फेब्रुवारी सन १७६४ त लिहितो. पुढें पैशाची फेड वेळेवर झाली नाहीं, आणि सावकारांचा तगादा आला, तेव्हां पेशव्यांनीं तालुक्यां-ची उपज वसूल करून सावकारांची फेड करण्याचें काम पटवर्धनांस सांगितलें, त्यामुळें पटवर्धनांचा व जिजाबाईचा कलह लागला. हे तालुके पेशव्यांनीं जिजाबाईकडून जबरीनें घेऊन पटवर्धनास जहागीर दिले, हें डफचें विधान बिनचूक नाहीं. मनोळीकर कृष्णाबाई सिंदे इच्याशीं जिजाबाईचें वैर असून पटवर्धनांशीं कृष्णाबाईचा परम स्नेह होता. यामुळेंही या प्रकरणास कांहीं काळ उग्र स्वरूप प्राप्त झालें. सन १७७० च्या दिपवाळीनंतर कर्नाटकांत जात असतां माधवराव पुनः कोल्हापुरास गेला, आणि त्यानें जिजाबाईशीं तह करून प्रकरण मिटविलें. 'नवा जुना झाडून तालुका घेतला. पन्हाळा व कोल्हापुर दोन मात्र राहिले. करवीरकरांची कांहीं बाकी राहिली नाहीं'. जिजाबाईचा तंटा सांवतवाडीकर, इचलकरंजीकर, कागलकर, वगैरेंशीं वारंवार होत असे; आणि प्रांतांत बहुधा धामधूमच चालू होती. माधवराव पेशव्यानें शक्य तितके इलाज करून जिजाबाईचा जम बसवून दिला. सांवतवाडी-करांचे कारभारी बंधु जिवाजी विश्राम व विठ्ठल विश्राम जिजाबाईस रांगण्या-कडे सारखा त्रास देत होते. त्यांचाही बंदोबस्त माधवरावानें केला. पेशव्यानें

१. तह करारमदार यादी ५. ६. ७. पृष्ठ ५१–५५ यांत पूर्ण तपशील आहे. या पुढील यादी ८, ९, १०त पुढील अनेक भानगडी दाखल आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विठ्ठल विश्राम व जिवाजी विश्रामाचा लेक यांस पकडून लुटून फस्त केलें. विठ्ठल विश्रामास कोपळ किल्ल्यावर अटकेंत ठेविलें; आणि जिवाजीस कोणी आश्रा देईल, तर त्याचें पारिपत्य होईल. 'प्रसिद्धगड म्हणजे रांगणा जिजाबाईचे हवालीं झाल्याशिवाय विठ्ठल विश्रामाची सुटका होत नाहीं', असें ता. २२-३-१७६७ रोजीं पेशव्यानें कळविलें. अशीं आपसांतील लहान मोठ्या सत्ताधिशांचीं किती तरी प्रकरणें पेशव्यानें दूरदृष्टीनें निकालास लाविलीं. एकंदर मराठ्यांचें राज्य सुरळीत चालावें एवढीच त्याची भावना होती.

करवीरच्या शंकराचार्यांशींही जिजाबाईचा झगडा झाला. स्वामीच्या मठाशेजारीं संभाजी महाराजांचें दहन जबरदस्तीनें करून त्या जागेवर तिनें मंदिर बांधिलें. त्यांत मठांतील ब्राह्मणभोजनाची जागा मंदिरांत घेतली, त्याजबद्दल शंकराचार्यांनीं पेशव्याकडे कागाळी केली, तेव्हां हें प्रकरण पुष्कळच विकोपास गेलें. 'यवनांपेक्षां ब्राह्मण जातीचा द्वेष अतिशय. मातुश्रीस विपरीत काळासारखी बुद्धि निर्माण झाली आहे'. असें पटवर्धन लिहितात.

जिजाबाई पुढें ता. १७-२-१७७३ रोजीं मृत्यु पावली, त्या वेळीं नारायणरावाचे उच्छृंखल कारभारामुळें आणि त्याचे खुनानंतर राज्यांत निराळीच परिस्थिति उत्पन्न झाल्यामुळें, कोल्हापुरचे गादीसंबंधानें पुनरपि प्रश्न उपस्थित झाला नाहीं. वास्तविक सन १७३० त शाहूनें वारणेची हद्द ठरवून राज्याचे विभाग केले, तेव्हां साताऱ्याप्रमाणेंच कोल्हापुरचे राजानेंही आपला उद्योग दक्षिणेस तुंगभद्रेपावेतों किंवा त्या पलीकडेही करावा, अशी योजना होती; परंतु कोल्हापुरकरांत तसा कोणी पराक्रमी पुरुष निपजला नाहीं, म्हणून मराठशाहीसंबंधानें कोणतीही परिपोषक कामगिरी कोल्हापुरचे राज्यांतून झाली नाहीं. अष्टप्रधान किंवा सरंजामी सरदार यांजप्रमाणें कोल्हापुरचे छत्रपतींस पेशव्याचे ताबेदारींत राहतां येईना, आणि स्वतंत्र उद्योग करण्याची तर ताकद नाहीं, असा कांहीं विलक्षण पेंच कोल्हापुरकरांचे परिस्थितींत नेहमींच कायम राहिला. त्यामुळें पेशवे किंवा दुसरे कोणी एकंदर मराठशाहीचा कारभार पाहत असतां, त्यांच्या अडचणींत भर घालण्यापलीकडे किंवा त्यांस वेळीं अवेळीं विरोध करण्यापलीकडे, कोणतेंच उपयोगी काम कोल्हापुरचे राज्यांतून झालें नाहीं. इंग्रजांची सार्वभौम सत्ता प्रस्थापित झाल्यावर मात्र सर्व एका स्थितीस येऊन पोंचले. सातारा व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोल्हापुर येथील गाद्या एक झाल्या असत्या, तर पहिलीबरोबर दुसरीही इंग्रजशाहींत खालसा होऊन गेली असती, ती तशी झाली नाहीं एवढाच परिणाम आज दृश्य आहे[१].

४. मराठशाहीच्या घटनेंत कोल्हापुरची दुर्बलता.—मराठी राज्याची घटना शाहूचे पश्चात् अनेक कारणांनीं दिवसेंदिवस बिकट होत गेली. एकंदर राज्याच्या वाढीस पोषक अशी घटना मुद्दाम विचारवंतांनीं एकत्र बसून ठरविण्याचा योगच कधीं आला नाहीं. ज्या वेळीं जशी स्थिति प्राप्त झाली, तसतसे यदृच्छेनें घटनेंत फरक होत गेले. रामराजाचे अंगीं कर्तृत्व नसल्यामुळें सर्वांसच मोठा पेंच पडला. त्यांतून हा राजा खोटा अशी जेव्हां कैक वर्षांनीं चालकांची खात्री झाली, तेव्हां पूर्वीचा पेंच जास्तच वाढला. पानिपतचें संकट व ताराबाईचा मृत्यु या दोन गोष्टींनीं छत्रपतींच्या प्रश्नास नवीन महत्त्व आलें. आपल्या हातून छत्रपतींच्या संबंधानें चूक अगर पातक घडलें, अशी जाणीव पेशव्यांस होऊन त्यांचे लौकिकास कमीपणा येऊं लागला. हें लांछन नाहींसें करण्याचे अनेक मार्ग अनेकांनीं सुचविले. आपला वंशक्षय होतो याचें कारण काय, असें रामशास्त्री यास विचारितां, त्यानें स्वामिद्रोह म्हणून सांगितल्याची आख्यायिका आहे. यावरून या बाबतींत शक्य ते इलाज पेशव्यांनीं मनापासून घेतले. सातारा–कोल्हापुरचीं दोन राज्यें एक करून नवीन धनी करावा, अशी एक योजना होती. पण ती कोल्हापुरच्या जिजाबाईस पसंत पडली नाहीं. पेशव्यांच्या विरोधकांनीं जानोजी भोसल्यास छत्रपति करण्याचा घाट घातला तोही सिद्धीस गेला नाहीं. पेशव्यांनीं रामराजास मुक्त करून अधिकार दिला, पण तो चालविण्याचें शहाणपण त्यास नसल्यामुळें, नसत्या खटपटींस मात्र जोर आला. रामराजास काढून दुसरा छत्रपति त्याचे जागीं आणावा, तर हें काम कोणीं कसें करावयाचें! भोसल्यांचे कुळांत कर्तृत्ववान् इसम उपलब्ध झाल्याशिवाय

१. आधार—मा. रो. १. २१५, २१७, २२०; इ. ५०, ५५, ८७–९०, ९७; को. इतिहास मोडककृत ले. १०, १३, १४, १६; तह करारमदार पृष्ठ ४५–५५; खरे ले. ७२, २०१, २०८, ३४३, ४०४, ४०९, ४११, ४८४, ५०७; खं. १०. १०८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असा उपक्रम शक्य नव्हता. त्यापेक्षां चाललें आहे तेंच बरें असें पेशव्यांस वाटलें. त्यांतून माधवरावानें कांहीं तरी उपयुक्त व्यवस्था केली असती, पण चुलत्याशीं त्याचें सारखें वितुष्ट चालल्यामुळें, नवीन जोखीम अंगावर घेऊन असलेली स्थिति जास्त दुर्घट करणें त्यास बरें वाटलें नाहीं. स्वतःचाच आला दिवस तो मोठ्या संकटानें घालवीत होता. अशा विवंचनेंत वर्षानुवर्षें लोटलीं. पुढें नारायणरावाचा खून झाल्यावर पेशवाईच्या इतिश्रीचीच वेळ आली, तेव्हां छत्रपतींचा हा प्रश्न मागें पडला; आणि अखेरीस छत्रपति व पेशवे दोघांचाही अंत झाला.

एकंदर मराठी राज्याच्या घटकावयवांचा विचार करितांना, कोल्हापुरचें राज्य हें एक सर्वकाळ विशिष्ट प्रकारचें कोडेंच बनून राहिलें होतें. हें कोडें जितकें मराठी राज्यास जाचक तितकेंच स्वतःसही जाचक झालें, हें सहसा कोणाचे लक्षांत येत नाहीं. शाहूनें प्रथम गृहकलह तोडण्यासाठीं वारणेच्या तहानें राज्याचे दोन विभाग केले. कृष्णेच्या दक्षिणेस संभाजीनें व उत्तरेस शाहूनें वावरावें, अशी व्यवस्था ठरून राज्याचे उद्योग दोघांनीं सारखेच करावे असा मूळचा उद्देश होता. हा राज्याचा उद्योग शाहूनें जोरानें चालविला, तशी हालचाल संभाजीनें कांहीं एक केली नाहीं. बादशाही पाठिंबा घेऊन शाहूनें भट पेशवे व दुसरे होतकरू इसम हाताशीं धरून, अगोदर चौथाई-सरदेशमुखीच्या सनदा आणविल्या, आणि त्यांच्या जोरावर निरनिराळ्या सरदारांस बाहेरचे प्रदेश वांटून देऊन त्यांच्या संचारानें राज्याचा फैलाव सुरू केला. पेशवे, सिंदे, होळकर, पवार, वगैरे माळव्यांत शिरले. वऱ्हाड, मध्यप्रांत, ओरिसा, बंगालकडे नागपुरकर भोसले व्यवहार करूं लागले. दाभाडे व गायकवाड गुजराथ काठेवाडांत वावरूं लागले. साताऱ्याचे बाजूचा तोकडा प्रदेश पूर्वींच्या अष्टप्रधानांनींच घेरलेला होता, त्यांत फत्तेसिंग भोसल्याची स्थापना अक्कलकोटास करून, त्या योगानें निजामावर व कर्नाटकावर दडपण बसवून, तिकडे तंजावरचें राज्य व गुत्तीचे घोरपडे वगैरे मंडळीस जोडून घेण्याचा, शाहूनें उद्योग केला. परंतु अशा प्रकारचा कांहीं एक नवीन उद्योग संभाजीनें अंगावर न घेतां, उलट त्यानें अलग राहून वेळीं अवेळीं निजामासारख्या शत्रूंस मिळून शाहूचा व इतरांचा रोष मात्र संपादिला. साताऱ्ची बरोबरी करण्याच्या नादांत आपलेही अष्टप्रधान नेमून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्यांस व सरदारांस असलेलें लहानसें राज्य त्यानें वांटून दिलें, नवीन माणसें ठेवून आणखी कांहीं संपादन केलें नाहीं. शाहूनें सर्व राष्ट्राची आत्मिक भावना धारण केली. तंजावरचें राज्य आपलें अशा भावनेनें त्यास मदत करण्यासाठीं तिकडे अनेक स्वाऱ्या करविल्या. तशी हालचाल संभाजीनें कांहीं एक केली नाहीं. शाहूपासून अलग राहणें, आणि बाह्य देखाव्यांत धनीपणा गाजविण्यासाठीं साताऱ्याचें अनुकरण करणें, एवढ्याच गोष्टी संभाजी संभाळून राहिला. संभाजीची वडेजाव व्हावी अशी शाहूची इच्छा अर्थात्च नव्हती. तथापि त्याच्या वाटेस पेशव्यास किंवा दुसऱ्या कोणास शाहू जाऊं देत नसे. यामुळें लाडावलेल्या एकलकोंड्या मुलासारखी संभाजीची स्थिति झाली. मराठशाहीच्या मुख्य प्रवाहांत सामील न होतां तो अलग व तुटून दूर राहिला, त्यामुळें त्याच्या राज्यास नवीन जोम प्राप्त झाला नाहीं, उलट स्वसंरक्षण करण्यासही तो असमर्थ राहिला. त्याच्याच राज्यांतले पुंड पाळेगार बंडखोरी करूं लागल्यामुळें त्याचा वसूल वेळेवर येईना. फौजेच्या बळाशिवाय त्या वेळीं स्वसंरक्षण करणें कोणासच शक्य नव्हतें. असलेलें राज्य फुकटाखालीं वाटलें गेल्यामुळें नवीन फौज ठेवण्याचें सामर्थ्य त्यास राहिलें नाहीं. तेव्हां बंडाळी मोडून आपला वसूल उत्पन्न करून घेण्यासाठीं जिजाबाईस वारंवार पुण्यास पेशव्यांचीं आर्जवें करावीं लागत. संभाजी खरें म्हटलें तर नांवाचाच राजा होता. कारभार सर्व जिजाबाईच आपल्या हयातींत म्हणजे सन १७७३ पर्यंत मुखत्यारीनें पाहत होती. मिरजेपासून बेळगांवपर्यंतच्या लहानशा टापूपलीकडे कोल्हापुरचें राज्य कधींच वाढलें नाहीं. या टापूंत सुद्धां कशी बंडाळी चाले, त्याचा अजमास मनोळी तालुक्याचें प्रकरण कैक वर्षे चाललें त्या उदाहरणावरून चांगला करितां येईल. दक्षिणेस हैदरनाईक प्रबळ शत्रु उत्पन्न झाला; पश्चिम किनाऱ्यानें इंग्रज, पोर्तुगीज, वाडीकर सावंत वगैरे संधि साधून त्रास देतच असत. या सर्वांचा बंदोबस्त करणें पेशव्यांना स्वतःचे राज्यासाठीं भाग होतें. शाहूचे हयातींत या अडचणी फारशा उत्पन्न झाल्या नाहींत; पण त्याचे पश्चात् पेशव्यांचे हातीं कारभार आल्यावर, शत्रूंचे बंदोबस्तासाठीं त्यांनीं उत्तरेप्रमाणेंच दक्षिणेंतही पटवर्धन, रास्ते, भावे, वगैरे नवीन फौजबंद सरदार ठिकठिकाणीं सरंजाम देऊन ठेविले. इचलकरंजीकर घोरपडे पेशव्यांचे आप्त पडल्यामुळें, त्यांच्याच बाजूनें वागत. खालीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुरारराव घोरपडे एकटाच वावरत होता, त्यासही पेशव्यांनीं आपल्या लगामीं लावून घेतलें; आणि कर्नाटकांत वरचेवर स्वाऱ्या करून तिकडूनही राज्याची पुष्कळशी वाढ केली. या कामांत कोल्हापुरकर सामील न होतां अलग राहिले; म्हणून पेशव्यांच्या मुलुखगिरीचा परिणाम त्यांस फायदेशीर न होतां उलट जाचक झाला. पटवर्धन वगैरे नवीन सरदार परशत्रूंच्या बंदोबस्तासाठीं नेमिलेले होते. तरी कोल्हापुरकर विरोध दर्शवितील तर त्यांजलाही दहशत बसविण्यास ते पुरेसे होते. यामुळें कोल्हापुरकरांचे हातपाय सर्वस्वी आंखडल्यासारखे झाले. त्यांतूनही कोल्हापुरकर पेशव्यांचे विरुद्ध विशेष हालचाल करीत, तेव्हां महादजी सिंदे वगैरे प्रबल सरदारांस कोल्हापुरावर पाठवून त्यांचा बंदोबस्त पेशव्यांनीं कैक वेळां केला आहे. अशी ही कोल्हापुरच्या राज्याची कष्टमय कहाणी अखेरपर्यंत चालून शेवटीं सार्वभौम ब्रिटिश अंमलाखालीं तें राज्य स्थिरावलें.

यावरून सातारकरांशीं बरोबरी ठेवण्याच्या प्रयत्नांत कोल्हापुरचें कसें नुकसान झालें हें ध्यानांत ठेवण्यासारखें आहे. आपण छत्रपति, यजमान, मालक, पेशव्यांचे किंवा दुसऱ्या कोणाचे अंकीत होऊन फौज घेऊन आपण मुलुखगिरी करावयाची नाहीं, असा बाणा धारण करून ते मराठशाहीच्या मुख्य उद्योगांत सामील झाले नाहींत; आणि स्वतंत्र उद्योग करण्याची ताकद तर त्यांस कधींच आली नाहीं. धनीपणा गाजविण्याचें सामर्थ्य अंगीं असेल तर तो धनी; नाहीं तर नोकराहूनही त्याची स्थिति केंविलवाणी होते. तशीच कोल्हापुरच्या राज्याची स्थिति सदैव चालू होती. खरें पाहिलें तर कोल्हापुरचें राज्य हें अठराव्या शतकाच्या इतिहासांतलें एक कोडें म्हणजे perpetual anomaly होय. पेशव्यांच्या जाचामुळें कोल्हापुरची हीनावस्था झाली, हें प्रतिपादन लंगडें आहे. पटवर्धनादि फौजबंद सरदार जर पेशव्यांनीं ठिकठिकाणीं ठेवून दिले नसते, तर निजाम, हैदरअली वगैरेंनीं कृष्णेपर्यंतचा सर्व प्रदेश आक्रमिला असता. कोल्हापुरचा जो काय बचाव झाला, तो पेशव्यांचे सामर्थ्यामुळें झाला. वास्तविक उत्तर हिंदुस्थानपेक्षां कर्नाटकचा प्रदेश जिंकण्यास सुलभ असूनही, केवळ कोल्हापुरच्या या चमत्कारिक परिस्थितीमुळें, कर्नाटकचा कायम बंदोबस्त पेशव्यांकडून होऊं शकला नाहीं. पहिल्या बाजीरावापासून तों नानाफडणिसापर्यंत कर्नाटकच्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वाऱ्या सारख्या चालू होत्या; हा उद्योग मुख्यतः कोल्हापुरच्या कर्तव्य-क्षेत्रांतला असून तो त्या राज्यानें पार पाडला असता तर, शाहूच्या मूळ संकल्पास अनुसरून, पेशवे सर्वथैव उत्तरच्या उद्योगास मोकळे राहिले असते; आणि तेणेंकरून मराठशाहीचा अंमल सर्व देशांत चांगला बसला असता. कर्नाटकांत पेशव्यांनीं लक्ष ठेविलें नसतें तर सर्वच मराठशाहीवर शत्रूंची गदा आली असती. परकी प्रदेशांत आपल्या भरंवशाचे कायमचे सरंजामदार निर्माण करून हिंदुपदपातशाही सिद्ध करावयाची, ही पहिली योजना बाळाजी विश्वनाथानें शाहूचे हुकुमानें ठरविली, तीच पुढें वाढत जाऊन राज्याचा फैलाव झाला. नागपुर, सागर, झांशी, धार, इंदूर, ग्वाल्हेर, बडोदें, सांगली, मिरज, गुत्ती, अक्कलकोट, तंजावर, वगैरे स्थळांस टोलेजंग राजधान्यांची ऐपत या योजनेनें उत्पन्न झाली. हीं सर्व ठिकाणें म्हणजे महत्तर महाराष्ट्राच्या लष्करी वसाहती होत. या वसाहतींत त्या त्या सरदारांनीं आपापल्या वशिल्यांचीं हजारों कुटुंबें वसवून बंदोबस्त केला. तीं कुटुंबें अद्याप ठिकठिकाणीं नांदत असून स्वयंनिर्णयाच्या प्रस्तुतच्या मनूंत मराठ्यांच्या जेतृत्वाची साक्ष महाराष्ट्राबाहेर पटवीत आहेत. इंग्रजांप्रमाणें सर्व देश लष्करी सामर्थ्यानें ताब्यांत ठेवण्याची ऐपत मराठ्यांस कधींच आली नाहीं. लष्करच्या संचारास लागणारे रस्ते व इतर साधनें त्या वेळीं नसल्यामुळें, सरंजामी सरदारांची योजना पेशव्यांनीं अंमलांत आणिली. त्याशिवाय शत्रूंवर दाब ठेवणें त्यांस शक्य नव्हतें.

इंग्रजींत ज्यास Constitution म्हणतात ती राज्यकारभाराची घटना आरंभीं सर्व एकदमच बिनचूक तयार होत नसते. उद्योग वाढतां वाढतांच ती बनत जाते. प्रसंग उद्भवला पाहिजे, आणि त्या प्रसंगाचें निराकरण करणारा चतुर व दूरदृष्टीचा मुत्सद्दी पाहिजे, तेव्हांच अशी घटना बद्धमूल होते. अमेरिकेच्या वसाहतींचा इंग्लंडशीं कलह लागून झगडा झाला, त्या प्रसंगाचा उपयोग करणारा जॉर्ज वॉशिंग्टन पुढें येतांच अमेरिकेची राज्यघटना सिद्ध झाली. तेथें दोनच पक्ष असल्यामुळें हें काम सुलभ झालें. परंतु येथें अठराव्या शतकांत आंत बाहेर अनेक पक्ष व सत्ताधीश आपापला मतलब साधण्यास टपलेले असल्यामुळें, मराठ्यांच्या घटनेस स्थिरता प्राप्त झाली नाहीं. तरी पण निजामाचें संकट उद्भवतांच त्यास तोंड देण्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजीराव निर्माण झाला. शाहूचे अंतकाळीं मराठशाही तारण्याची ताकद नानासाहेबानें दाखविली. पानिपतचें अरिष्ट कोसळतांच अल्पवयी माधवरावास राज्य सांभाळण्याचें सामर्थ्य आलें. तो माधवराव अकालीं कालवश होतांच सखारामबापू, नाना फडणीस वगैरे बारभाईनीं संकटास तोंड दिलें. बारभाईच्या बहुमुखापेक्षां एकमुखी कर्तबगार इसम पुढें येता तर बहुधा जास्त चांगला जम बसला असता; किंवा नाना फडणिसाचे अंगीं लष्करी धोरण असतें, तर मराठशाहीस निराळें स्वरूप प्राप्त होण्याचा संभव होता. तशा स्थितींतही राष्ट्रानें एक नवीन होतकरू इसम सवाई माधवराव जन्मापासून तयार केला. परंतु तोही कालाधीन होतांच सर्व कारभार आटोपला; आणि तिऱ्हाईतपणें डोळ्यांत तेल घालून बसलेल्या धूर्त इंग्रजांचे फार वर्षांचे मनोदय सिद्धीस गेले. सारांश, मराठशाहींत सोयीची राज्यघटना कां निर्माण झाली नाहीं, याचा विचार करितांना कोल्हापुरच्या राज्याचें हें बिकट कोडें दृष्टीआड करून चालणार नाहीं. तत्कालीन राजकारणांत कोल्हापुरच्या परिस्थितीचें महत्त्व यथायोग्य ध्यानांत येण्यासाठीं हा एवढा प्रपंच येथें करावा लागला आहे.

५. पेशवाईतील साडेतीन शहाणे, सख्या, देवा, विठ्ठला.—पेशवे, निजाम व नागपुरकर भोसले यांच्या घरांतील दुहीचा फायदा घेऊन चढाईच्या कपटांनीं आपले मतलब तीन देशस्थ शहाण्यांनीं साधले आणि दोन वर्षें महाराष्ट्रांत प्रळय उडवून दिला, त्यावरून या साडेतीन शहाण्यांची उपरोधिक आख्यायिका मूळ उत्पन्न झाली. पेशव्यांचा सखारामबापू बोकील, निजामाचा विठ्ठल सुंदर, व भोसल्यांचा दिवाकर पुरुषोत्तम चारेघोडे, हे तीन पूर्ण शहाणे, व त्यांत पुढें नाना फडणीस अर्धा शहाणा वाढला. या सर्व शहाण्यांचीं जीवनवृत्तें, त्यांनीं केलेले खेळ, तत्कालीन घडामोडींच्या संदर्भानें व उपलब्ध कागदांच्या पुराव्यानें समजून घेतल्याशिवाय या प्रसिद्ध आख्यायिकेचें खरें ह्यद्गत कळणार नाहीं. सखारामबापू व नाना फडणीस यांचा परिचय या इतिहासांत जागोजाग भरपूर येणार आहे. मात्र दुसऱ्या दोघांचीं अल्प चरित्रें येथेंच देणें इष्ट होईल.

दिवाकर पुरुषोत्तम ऊर्फ **देवाजीपंत** हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण कोन्हेरराम कोल्हटकर याजपाशीं शागीर्द असून, अंगच्या बुद्धिमत्तेनें भोसल्यांचे कारभारांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उदयास आला. जानोजी भोसल्यास 'सेनासाहेबसुभा' पद नानासाहेब पेशव्याकडून मिळवून देण्यांत प्रथम त्याची हुशारी प्रगट झाली आणि नानासाहेबाच्याच कृपेनें त्याचा उत्कर्ष झाला. माधवरावास पेशवाई मिळाल्यावर सखारामबापूशीं संगनमत करून त्यानें दादाचा पक्ष घेतला, आणि पुढें विठ्ठल सुंदरास मिळवून माधवरावास बिकट पेंचांत आणिलें. परंतु माधवरावानें युक्तीनें या शहाण्यांचीं कारस्थानें मोडून राक्षसभुवनावर निजामाचा पाडाव करून विठ्ठल सुंदरास स्वर्ग दाखविला. तरी पुढें दिवाकरपंताचा उपद्व्याप चालू राहिलेला पाहून, भोसल्यांचे भानगडींत तो तडजोडीस आला असतां, माधवरावानें सन १७६८ त त्यास कैद केलें; आणि लगेच भोसल्यावर स्वारी करून कनकापुरच्या तहानें त्याजशीं सख्य जोडिलें. तेव्हां देवाजीपंत फिक्का पडला, आणि पेशवे—भोसल्यांच्या कलहाचें मुख्य बीज देवाजीपंत होय, अशी माधवरावानें जानोजीची खात्री पटवून त्याजकडून पंतास कैदेंतच ठेवविलें. परंतु पुढें जानोजी व माधवराव दोघेही दिवंगत होऊन नारायणरावाचा खून झाल्यावर सखारामबापू व नाना यांनीं बारभाईचें कारस्थान रचिलें, त्यांत देवाजीपंतानें बापूस चांगली मदत केली. पुढें पुनः त्यांचे खेळ सुरू झाले तेव्हां त्यांस आळा घालणारा अर्धा शहाणा नाना फडणीस वरचढ भेटला. देवाजीपंत सन १७८१ चे सुमारास नागपुर येथें मरण पावला.

विठ्ठल सुंदर परशुरामी हा यजुर्वेदी देशस्थ ब्राह्मण, मूळ ठिकाण संगमनेरचा, निजामशाहींत रामदासपंताचे विद्यमानें प्रथम निजामलीजवळ नोकरीस राहिला. तो मोठा बुद्धिमान व महत्त्वाकांक्षी होता. पेशवाईतील घडामोडींवर नजर ठेवून त्यानें निजामलीस पुढें आणिलें. सिंदखेडच्या मोहिमेंत निजामलीची चढाई विठ्ठल सुंदरानें करविली. त्यानेंच इब्राहीमखान गारदी यास निजामलीचे नोकरींत घेतलें. पण त्याच खानास पेशव्यांनीं आपल्या नोकरींत घेऊन निजामाचा पाडाव गेला. सलाबतजंगास नाहींसा करून विठ्ठल सुंदरानें निजामलीस गादी मिळवून दिली. पानिपतनंतर पेशव्यांच्या अडचणी ओळखून आणि चुलतेपुतण्यांच्या कलहाचा फायदा घेऊन, मराठ्यांचें राज्य उलथून पाडण्याचा योग त्यानें आणिला. इतर कारभाराप्रमाणेंच तो लष्करी डावपेंचांतही चांगला निष्णात होता. त्याचा व्याही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गमाजी यमाजी याचे मार्फत प्रतिनिधीस व देवाजीपंताचे मार्फत जानोजी भोसल्यास मिळवून, त्यानें तरुण माधवरावावर बिकट प्रसंग आणिला. परंतु माधवरावानें ता. १०-८-१७६३ रोजीं राक्षसभुवनचे संगरांत त्यास ठार मारिलें. त्या वेळीं विठ्ठल सुंदराचा पुतण्या राजा विनायकदास हाही मारला गेला. विठ्ठलपंतास 'राजाबहादूर प्रतापवंत' असा किताब असून, निजामशाहींत त्यांची जहागीर 'गणेश' ह्या नांवानें ओळखिली जाते. हल्लीं (१९२३) यांचे वंशज राजे विनायकदास हयात आहेत.

तिघेही पूर्ण शहाणे जवळ जवळ समवयस्क, सन १७६३ त सुमारें ४५ उमरीचे असावे. अर्धा शहाणा नानाफडणीस त्यांचेहून २५ वर्षांनीं लहान. नानाप्रकारच्या कारस्थानांनीं एकाचा डाव दुसऱ्यानें मोडून काढावा, एकमेकांकडील बातम्या, आचारी, पुजारी वगैरेंच्या द्वारें काढून, शहास प्रतिशह लढवावा, धन्याचे कुटुंबांत कलह वाढवून, आपल्याशिवाय तरणोपाय नाहीं अशी त्याची भावना करावी, आणि कोणत्याही युक्तीनें स्वतःची पिशवी भरावी, असे या शहाण्यांचे खेळ मनमुराद चालत. बुद्धिबळाचे डावांतील प्यादें मागें घ्या, किंवा सचिवपंताकडे नथ पाठवा, इत्यादि क्लृप्त्या या शहाण्यांच्या अकलेच्या निदर्शक आहेत. राज्याची अव्यवस्था होत आहे हें यांस दिसे, परंतु ती सुधारण्याकडे बुद्धीचा व्यय न करितां, तिच्यापासून केवळ स्वार्थ साधण्याकडे त्यांची नजर असे. या ब्राह्मणांनीं उच्च राष्ट्रीय कामगिरी सोडून हलकट कावेबाजींत संतोष मानिला, व राज्याच्या चिरंतन हिताची परवा ठेविली नाहीं, यामुळें इतर वर्गांचे ठिकाणीं ब्राह्मणांबद्दल जो अनादर व तिरस्कार उत्पन्न झाला, त्याची सुरुवात उत्तर पेशवाईंत या शहाण्यांपासून झाली असें दिसतें.

नाना फडणिसाचा गुरु माधवराव पेशवे. माधवरावानें आपल्या हयातींत या शहाण्यांच्या खटपटी हाणून पाडिल्या. एकास स्वर्ग दाखविला, दुसऱ्यास कैदेंत घातलें, आणि तिसऱ्यास जवळ बाळगून निर्माल्य बनविलें. प्रखर राष्ट्रीय भावना, कठोर कर्तव्यनिष्ठा, लेख व वचनें यथायोग्य पाळण्याविषयीं दक्षता, सत्य, निष्पक्षपात इत्यादि थोर गुणांनीं, एकंदर राज्यकारभारास या पेशव्यानें उच्च व निर्मल स्वरूप प्राप्त करून दिलें. परंतु त्याच्या अकालीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मृत्यूमुळें पुनः या शहाण्यांच्या खटपटीस ऊत आला, तेव्हां नाना फडणिसानें थोडा बहुत माधवरावाचा कित्ता पुढें ठेवून कांहीं काळ निष्ठुरतेनें कारभार हांकिला. त्यामुळें अर्ध्या कोंकणस्थानें तीन देशस्थांस जिंकिलें, अशा उपरोधिक अर्थाचा जातिविषयक विरोधही साडेतीन शहाण्यांच्या आख्यायिकेंत ध्वनित होतो. तिघां देशस्थ शहाण्यांचीं नांवें सख्या, देवा, विठ्ठला, या शब्दांनीं महाराष्ट्रांत प्रचलित असलीं तरी, चिंतो विठ्ठल रायरीकर, गंगाधर यशवंत चंद्रचूड वगैरे कित्येक व्यक्ती त्या वेळीं तशाच मासल्याच्या होत्या. उलट पक्षीं माधवरावाचें अनुकरण करणारे राष्ट्रप्रेमी देशस्थ किंवा कोंकणस्थ ब्राह्मण, रामशास्त्री प्रभुणे, गोविंद शिवराम खाजगीवाले, नारो आप्पाजी, कृष्णराव बल्लाळ काळे, महादाजीपंत गुरुजी वगैरे कांहीं थोडे-थोडके होते, अशांतला अर्थ नाहीं.

प्रकरण सदतिसावें

नागपुरकर भोसल्यांच्या फुटीचें निरसन

[सन१ ७६५–१७६९.]

१. स्वातंत्र्येच्छु जानोजीस नरम करण्याची आवश्यकता.
२. पहिली मोहीम, खोलापुरचा तह (नोव्हें. १७६५–मार्च १७६६).
३. दुसरी मोहीम, जानोजीचा पाडाव (जाने.–मार्च १७६९).
४. कनकापुरचा तह (२३-३-१७६९).

१. स्वातंत्र्येच्छु जानोजीस नरम करण्याची आवश्यकता.— पानिपतानंतर जानोजी भोसले, प्रतिनिधि व गोपाळराव पटवर्धन वगैरे मंडळी निजामास सामील झाली, म्हणूनच निजामानें पेशव्यांशीं झगडा आरंभिला. वास्तविक पेशव्यांचा समूळ उच्छेद करण्याचाच त्याचा घाट

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. परंतु माधवरावाच्या चतुराईनें निजामाचा हा डाव सर्वस्वी फसला. माधवरावानें युक्तीनें आपल्या सरदारांस निजामापासून फोडून त्यांची यथायोग्य समजूत काढिली. सन १७६३चा पावसाळा सुरू झाला तरी, हे रुसलेले सरदार फोडून आणीपर्यंत निजामाशीं गांठ न घालण्याचें पेशव्याचें प्रयोजन हेंच होतें. ता. १६-७-२३ रोजीं पेशवा मातुश्रीस लिहितो. 'भोसल्याकडील कागद आला त्यांत भाव, कीं 'तुम्हीं मोगलांवर चालून यावें म्हणजे आम्ही येऊं. तीस लक्षांचा मुलूख व अशेरीचा किल्ला आम्हांस द्यावा व सर्व मंडळीस समजाऊन आणावें', अशी भोसल्यानें मागणी केली. त्यावर पेशव्यानें करार करून दिला कीं, तीस लक्षांचा मुलूख त्यांस देणें, पैकीं पंधरा लाख रेवामुकुंदपुर व बाकीचा वऱ्हाडांत लावून देऊं. मात्र साताऱ्यास छत्रपतीची घालमेल करूं नये. (ना. भो. का. ३५). असा करार करून त्याची याद वकील रामाजी बल्लाळ गुणे याजकडे दिली. निजामाकडून जो मुलूख पेशव्यांस येईल त्यांतील निम्मा आपणांस द्यावा अशीही जानोजीची मागणी होती. पुढें राक्षसभुवनची लढाई आटोपल्यावर भोसल्यांनीं मुलखाची मागणी केली, तेव्हां प्रसंगीं येऊन पोंचले नाहींत, लढाईत मदत केली नाहीं, या सबबीवर माधवरावानें फेरबदलीच्या गोष्टी सांगितल्या. त्यावर होळकरांनीं बोलण्यांत आणिलें, जे 'सेनासाहेब जानोजी कूच करून निघाल्यामुळें नबाबाची फौज हलकी झाली. आमचे मार्फतीनें सेनासाहेब नबाबाचे फौजेंतून मोकळे करविले. ते आले म्हणून दुसरे सरदार फुटून नबाबाची हिंमत कमती पडली, आणि लढाईचे प्रसंगीं तुम्हांस यश आलें. त्यांशीं बेबनाव होणें चांगलें नाहीं. कराराप्रमाणें द्यावें'. त्यावरून बत्तीस लक्षांचा मुलूख, साखरखेडला, मेहकर वगैरे दिले, आणि भोसल्यानेंही इतउत्तर पेशव्यांचे स्वाऱ्यांत फौजेनिशीं चाकरीस यावें, असा ठराव झाला.

इकडे भोसल्यानें आपला विश्वासघात करून आपणांस तोंडघशीं पाडिलें, आणि आपला वऱ्हाड प्रांत त्यानें बळकाविला, ही गोष्ट निजामाचे मनांत अत्यंत डाचूं लागली. मोगलाई मुलखांत घासदाणा घेण्याचा भोसल्याचा पूर्वींचा हक्क असून, वऱ्हाडांत भोसल्याची निजामाशीं साठचाळिसीची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वांटणी होती[१]. या दोन्ही प्रकरणांत भोसल्यानें राक्षसभुवनानंतर निजाम हलका झालेला पाहून त्याजबरोबर पुष्कळशी दांडगाई चालविली. निजामाचा सरदार मोरो धोंडोजी वऱ्हाडांत होता, त्याजवर सन १७६५ च्या पावसाळ्यांत भोसल्यानें चाल करून त्याचा पाडाव केला. तेव्हां कराराप्रमाणें निजामानें भोसल्याशीं लढण्यासाठीं पेशव्याची मदत मागितली. भोसल्याचें प्रस्थ राक्षसभुवनानंतर फारच वाढलें होतें. माधवरावाबरोबर तो कर्नाटकचे स्वारींत सामील झाला नाहीं. चढेल सरदारांस नरम करण्याचें धोरण माधवरावाचें नेहमींच होतें. शिवाय प्रसंगास उपयोगी पडावे, म्हणून भोसले, निजाम इत्यादि मंडळींस दादा सदैव चढवून ठेवीत असे. माधवराव शिस्तीचा चहाता होता. कर्नाटकच्या स्वारींत भोसल्यानें आपली फौज घेऊन पेशव्यास सामील व्हावें असें ठरलें असतां तो गेला नाहीं. माधवरावाकडे जबाब न पाठवितां गंगोबा तात्याचेमार्फत तो दादाकडे बयादा लिहून पाठवी. ता. १८-२-१७६४ च्या पत्रांत जानोजी गंगोबास लिहितो, 'पंतप्रधानांचें पत्र खिजमतगारासमागमें निकडीचें आलें जे, कृष्णातीरीं तुम्हांकरितां मुक्काम करितों, लौकर येणें, म्हणोन, त्यास आम्ही कराराप्रमाणें यावयाचे तर्तुदेंतच होतों. सरदारी बोढगस्त सर्वांस अवगतच

---

१. साठचाळिसीच्या या तहावरून तत्कालीन राजकारणाची गुंतागुंत चांगली दिसून येते. हा तह निजाम व भोसले यांजमध्यें सन १७५७ त बुसीच्या खटपटींत उगम पावला. तो वऱ्हाड प्रांताबद्दल होता. या प्रांतावर पूर्वीं निजामाचा अंमल असून भोसले बाहेर संचार करूं लागले, तेव्हां त्यांनींही वेळीं अवेळीं चौथाईच्या निमित्तानें वऱ्हाडावर आपला शह बसविला होता. सन १७५७ त निजामली व जानोजी भोसले यांनीं एलिचपुरकर नबाबाचेमार्फत असें ठरविलें कीं, वऱ्हाडांतील एकंदर उत्पन्नाचे साठ टक्के भोसल्यानें व चाळीस निजामानें घ्यावे. कर्ज काढिलें तरी त्यांतही ही हिस्सेरसी लागू समजावी. भोसल्याचे साठ टक्क्यांत २५ चौथाईचे, १० सरदेशमुखीचे, व १५ घासदाणा वगैरे लष्करी खर्चाचे, अशी फोड होती. या तहाची स्पष्टता काळेकृत वऱ्हाडचे इतिहासांत पृष्ठ १९५ व ३८२ वर पहावी. खरे ऐ. ले. सं. १ ले. १८५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. फौजेची समजावीश करून यावें इतक्यांत बंगाल्यांतून नबाब कासीमअलीखानाचीं पत्रें आलीं जे फौजेनिशीं येऊन संकटांत मदत करणें; न आल्यास तुमचा पैका चौसालांचा बुडाला. न जावें तर बंगाल्याच्या ऐवजावरी सावकारांचे गळे गोवले आहेत. याजकरितां कर्नाटकांत येणें महकूफ करून बंगाल्यास फौज पाठवीत आहें. फौजेची जरूर असल्यास दोन सरदार गंगथडीस सहा सात हजार फौजेनिशीं पंचमहालाकडील ठाणीं घ्यावयासीं पाठविले आहेत, ते सेवा करतील. पोटास मात्र मागून घेतील. बाकी आमचें लक्ष आहे त्यामध्यें तिलप्राय अंतर नाहीं. पंतप्रधान विषाद मानतील तरी कळेल त्याप्रमाणें निराकरण करून, मर्जी बहाल राहे ते गोष्ट करावी. राजश्री मामास सांगोन पत्रें तिकडे ल्याहावीं'. अशा या भोसल्यांच्या बयादा नेहमींच्याच होत्या. आधीं मोहिमेंत सामील व्हावयाचे नाहींत, आणि बलात्कारानें झाले, तर हे बरोबर नसलेले बरे, अशी हंमेशची स्थिति होती. हा उपरटप्पी प्रकार सर्वस्वी बंद करण्याचें पेशव्यानें ठरविलें; आणि दादाची मध्यस्थी न ऐकतां सन १७६५त भोसल्यावर शस्त्र धरिलें.

पेशव्यास निमित्तही खासें सांपडलें. भोसल्यानें मीर कासिमाची मदत तर केली नाहींच, पण आनल्या आठ दहा वर्षांच्या हलगर्जीपणानें बंगाल प्रांत गमावून तो इंग्रजांच्या घरांत कसा घातला, हा प्रकार अन्यत्र मशहूर आहे. योग्य उद्योग केल्याशिवाय उगाच जवळपास लूट करून पैसा मिळवावा या पलीकडे ह्या सरदारांस राज्य चालविण्याचें बिलकूल चातुर्य नव्हतें, किंवा परिस्थितिही कळत नव्हती. जानोजीनें जवळच्या वऱ्हाड प्रांतावर स्वारी करून निजामाचा मुलूख उद्ध्वस्त केला, तेव्हां निजामानें तरी माधवरावाच्या वचनाची ह्या प्रसंगीं परीक्षाच पाहण्याचा निश्चय केला. राक्षसभुवनावरील तहांत उभयतांनीं प्रसंगीं मदत करण्याचें ठरलें होतें. म्हणून निजामानें या अडचणींत भोसल्यावर स्वारी करण्यासाठीं पेशव्यांची मदत मागितली. केलेला तह पाळण्याकरितां तशी मदत देण्याचें पेशव्यानें तावडतोब कबूल केलें. परंतु ही मदत करण्याची दादाची इच्छा नव्हती. अर्थात् राज्यकारभारांत वचन पाळण्याची योग्यता केवढी आहे हें अनुभवी दादापेक्षां तरुण माधवरावासच अधिक कळत होतें. माधवरावास याच गुणामुळें थोरपणा प्राप्त झाला. राक्षसभुवनावर केलेला निजामाचा तह ३२

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर्षें म्हणजे खर्ड्याचे लढाईपावेतों टिकला, याचें कारण माधवरावाची वचनबद्धता होय.

सन १७६५ च्या एप्रिलांतच निजामाची मदत करण्याचें माधवरावानें ठरवून पावसाळ्यानंतर फौजेची सिद्धता केली. कूच करून ता. २४-१२-६५ रोजीं तो बाळापुर येथें दाखल झाला. दादाचा विचार या वर्षीं हिंदुस्थानचे स्वारीस जाण्याचा असून, त्या तयारीनें तो नाशकाहून खानदेशाच्या बाजूनें प्रवास करीत चालला. परंतु 'आपणांस भेटल्याशिवाय हिंदुस्थानचे स्वारीस जाऊं नये', असें माधवरावानें त्यास निकडीनें कळविलें, तेव्हां दादा वऱ्हाडांत येऊन बाळापुर येथें माधवरावास भेटला. वास्तविक भोसल्यास दुखविण्याची दादाची मनापासून इच्छा नव्हती. पेशवे आपल्यावर चालून येणार ही बातमी येतांच, जानोजी भोसले घाबरून जाऊन दादाचे मार्फत समजूत करण्याचे खटपटीस लागला. जानोजीच्या अंगीं आवरशक्ति किंवा स्वयंनिर्णय नव्हता. देवाजीपंतासारखे हुटप्पी इसम वागवितील तसें तो वागे. घरांत भावांचे कलह चालू असून बाहेर इंग्रज, निजाम वगैरेंनीं त्याचा उच्छेद चालविला होता. बंगाल्यांतून इंग्रजांनीं मीर कासिमास काढून लावल्यावर तो प्रांत बहुतेक भोसल्याचे हातून गेल्यासारखाच होता. अशा स्थितींत जानोजीनें दादाची करुणा भाकिली, ती अशीः—'परस्परें बेल-तुळसीचें इमान झालें असतां, दोहींकडेसही विश्वास न पुरे. सिलेदार मन मानेल तो सरंजाम व पैका मागतात. येणेंकरून यवन बलाढ्य होतो; हिंदुस्थान वगैरे देशांतरींचे मनसुबे राहत चालले. पैसा नाहींसा झाला, म्हणजे शिलेदारांनीं यवनाकडे जावें. यवन बळवावा तेव्हां आपलीच घर-बूड होते. याउपरी रामराजा प्रतापानें नांदत नाहीं हा आक्षेप इकडून होणार नाहीं. आपण वडील, आपणांवर राज्यभार आहे, आम्ही लेकरें. लेकरूंपणाची आळ चालवावी. आम्हांस शत्रूची मसलत पडेल तेव्हां आपलें साहाय्य असावें. आपणांस पडेल तेव्हां आम्हीं न बोलावतां यावें. येऊं तेव्हां पोटास मात्र द्यावें. आतां आमचेकडून दंगा, यश, अपयश, संधींत अंतर घडेल तरी दोन बाप समजावे. रघूजीबावाचे वीर्यापासून जन्मला असेल तो आपणांकडे बांकडें पाहणार नाहीं. आपलें अभय असल्यास आम्हीं आपल्या समीप येतों. माधवरावांकडून अभय वचनाचें उत्तर घेऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सत्वर पाठवावें. हीच शपथ उभयपक्षींचे कारभारी आहेत, त्यांस कळवावी'. (ना. भो. का. ले. १३ व ४५, ता. २५-११-१७६५).

यावर ता. २५-११-१७६५ रोजीं दादानें जबाब पाठविला कीं, 'तुमची शपथ मान्य असे. चिरंजिवाचे नांवें पत्र पाठवावें असें लिहिलें. त्यास चिरंजीव हल्लीं मोहिमीवर लांब आहेत. येविषयींचे विस्तारें अर्थ रामाजी बल्लाळ यांस आज्ञापिले आहेत. तुम्हांस कोण्याकाळींही इकडून दगा होणार नाहीं. आपण निर्भय यावें'. याच तारखेस याच मजकुराचें पत्र दादानें भोसल्याचा दिवाण दिवाकर पुरुषोत्तम चोरघोडे यासही लिहिलें. परंतु दादाची ही मध्यस्थी माधवराव ऐकणार नव्हता; आणि आपल्या घरांतील कलहाचा फायदा भोसल्यास घेऊं देण्याचा माधवरावाचा इरादा नव्हता. भोसले भीत असेल तर तो माधवरावासच.

२. पहिली मोहीम, खोलापुरचा तह (नो. १७६५—मा. १७६६).— पेशवे ब्न्हाणपुरावरून नागपुरावर चालून येणार असें पाहून जानोजीनें देवाजीपंतास दादासाहेबाकडे रवाना केलें; आणि मागाहून आपणही त्यांचे भेटीस गेला. 'देवाजीपंतांनीं दादांचे पायांवर डोई ठेविली; बहुत प्रकारें विनंति करून जानोजीबावांस लवकर येण्याबद्दल लिहिलें. त्यांनीं येऊन दादासाहेबांची भेट डेऱ्यांतच घेतली. देवाजीपंतांनीं हरप्रकारें दादांची मर्जी प्रसन्न केली. जानोजीबावांस भोजनास तेथेंच उठविलें. बहुत प्रकारें भाषणें होऊन जानोजीबावा कृपेस पात्र झाले. दादांस विनंति लिहिण्याचा सांप्रदाय घातला'. याप्रमाणें दादानें शरणागतास अभय दिल्यामुळें पेशव्याचा हिरमोड होऊन 'इंद्रायसह तक्षकाय स्वाहा' या न्यायानें, प्रथम दादाचा बंदोबस्त करून मग भोसल्याचा समाचार घ्यावा अशी मनाशीं गांठ बांधून, तूर्त हा प्रसंग त्यानें हलक्यांत पार पाडिला. याच कारणानें सन १७६८ त चुलत्यास कैदेंत ठेविल्यावर सन १७६९ त पुनः भोसल्यावर स्वारी करण्याचें प्रयोजन पेशव्यास पडलें. प्रस्तुत ता. २६-१२-१७६५ चें वर्तमान. 'श्रीमंतांचा व भोसल्यांचा अद्याप मुकाबला झाला नाहीं. बहुतकरून सख्यच होईल'. ता. १०-१-१७६६ रोजीं माधवराव लिहितो. 'भोसले येथून पंचवीस कोसांवर दहा हजार फौजेनिशीं आहेत. मानस कीं एकदां खामखा लढावें. नाहीं तर रात्रीस दगा तरी करावा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पूर्वी कांहीं पेंचामुळें दादासाहेबांनीं भोसल्याशीं सलूखाचा संदर्भ केला कीं, पंधरा लक्षांची जहागीर माघारी द्यावी, परंतु आम्ही प्रस्तुत वडिलांशीं पक्कें केलें आहे, कीं तिसा लक्षांची जहागीर भोसल्यांनीं माघारी द्यावी, तरच सलूख करावा. भोसल्यांचा सलूख सत्वर झाल्यास वडिलांचें जाणें हिंदुस्थानांत होईल. जाण्याविषयीं मोठा आग्रह आहे. निजाम गंगेवर आले असतील तेही सत्वरच येऊन पोंचतात. भोसले अंतर्यामीं नरम आहेत'. पूर्वीं भोसल्यानें मराठेमंडळांतून फुटून, निजामास मिळून, कांहीं एक भला उद्योग न करितां, फुकटांत बत्तीस लाखांचा मुलूख राक्षसभुवनावर पेशव्याकडून मिळविला, ही गोष्ट पेशव्याचे मनांत डांचत होती. असे जर सर्वच सरदार वागूं लागले तर राज्य कसलें? आणि मोठ्या सरदारांस जर मर्जीमाफक वागतां आलें, तर मग लहान सरदार तरी दाबांत कसे राहणार? सबब भोसल्यास राज्याची शिस्त यथायोग्य शिकविण्याचा पेशव्याचा इरादा होता, तो त्यानें सिद्धीस नेला. लवकरच माधवराव व जानोजी यांच्या भेटी झाल्या. पंधरा वीस दिवस मुक्काम अमरावतीनजीक खोलापुर येथें होता. तेथेंच सर्व ठराव झाले, त्यास खोलापुरचा तह म्हणतात. ता. ११-२-१७६६ रोजीं माधवराव लिहितो, 'भोसले लढावें हा इत्यर्थ करून आले होते. परंतु आपली फौज फार जमा झाली, व तोफाही फारच यास्तव नाइलाज होऊन सलूख केला. तीस लक्षांची जहागीर माघारी दिली. वडिलांबरोबर हिंदुस्थानांत जावयाचें कबूल केलें; आणिक कित्येक जाबसाल मोगलांकडील कबूल केले. तीस लक्षांपैकीं पंधरा लक्ष निजामाकडे जाईल, बाकी पंधरा लक्षांची, त्यांत साडेचहूंची माघारी दिली. कांकीं थोडासा त्यांचा संतोष असावा. प्रस्तुत भोसले वडिलांबरोबर ता. ९-२ रोजीं निघोन गेले'. अशा रीतीनें ह्या वेळीं माधवरावाचे मध्यस्थीनें निजाम भोसले यांचा तंटा तुटला. आपल्या म्हणण्याप्रमाणें कामें उरकूनही त्याचें सर्व श्रेय चुलत्यास देण्याची माधवरावाची हातोटी कशी होती हें एका पत्रांत दिसून येतें. 'वडिलीं आज्ञा केली ते उचित. वडील दीर्घदर्शी, चारही मनसुब्यांचे प्रकार ध्यानांत आणून कर्तव्य तें करितात. निजामाची आमची भेट उमरखेडानजीक अकरा सावांनीं (२३-१-६६) झाली'. राणोजी करांडे नांवाचा सरदार पेशव्यास सामील झाला म्हणून त्यास भोसल्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अटकावून ठेविलें होतें, त्यास सोडण्याचें ठरलें असतां जानोजीनें सोडलें नाहीं म्हणून माधवरावानें चुलत्यास पत्र ८-२-१७६६ रोजीं लिहून त्याची सुटका करविली. ता. २६-२-१७६६ रोजीं माधवराव मातुश्रीस लिहितो, 'इकडील सविस्तर वृत्त बालबोध कागद लिहून सेवेसीं रवाना केला होता प्रस्तुत आम्ही खोलापुरचे मुक्कामाहून वडिलांचा निरोप घेऊन निराळें राहिलों. वडील भोसल्यांसह बऱ्हाणपुराकडे गेले. त्यानंतर भोसल्यांचें जाणें न होय. सक्ति करावी तर फौज थोडी, रोज दररोज भोसल्याचा कजिया. यास्तव त्यांची दोन हजार फौज मात्र बरोबर घेऊन, त्यांस निरोप देऊन पुढें अशेरीस गेले. त्यानंतर ही दोन हजार फौजही बहुत करून उठोन आली. आम्ही दरकूच कारंज्यानजिक आलों. येथें निजामाची भेट घेतली. परस्परें स्नेहपूर्वक बोलणें होऊन आम्ही व ते आपआपल्या डेऱ्यास गेलों. तेही एक दिवस येथें आले. पुढें त्यांचा आमचा स्नेह चालण्या-संबंधें बोलणें फार लांब झालें. सखारामपंतही होते. त्यानंतर दुसरे दिवशीं दिवाण रुक्नुद्दौला यांचेंही इमान प्रमाण झालें. कोणेक गोष्ट पेंचाची राहिली नाहीं. यावरून पुढें चालेल असें वाटतें. त्यांस पंधरा लक्षांची जहागीर द्यावयाचा करार ठरला होता, त्याप्रमाणें सनदा करून दिल्या. आमचे महालाचे गुंते कांहीं होते ते उरकले. आतां भोसल्यांचा व नबाबाचा लढा तोडावयाचा राहिला होता, त्यास भोसल्याची यादी लिहून परस्परें लढे उगवण्याचे होते ते मध्यस्थीचे रीतीनें उलगडून दिले. बाकी जाबसाल राहिले, त्यांचे फडशास्तव कृष्णराव बल्लाळ यास ठेवून आम्ही कूच करून आलों'. यांत उल्लेखिलेला भोसलेनिजामाचे जाबसालाचा कागद ना. भो. का. ले. ४३ येथें उपलब्ध आहे. या कृष्णराव बल्लाळानें यानंतर निजामाचा स्नेह चांगला राखिला. याचाच मुलगा पुढें प्रसिद्धीस आलेला गोविंद कृष्ण काळे एव्हांपासूनच निजामाशीं राहत असला पाहिजे. ता. २५-३-६६ रोजीं पेशव्यानें लिहिलें, 'आम्ही सत्वरच फौजेस निरोप देऊन वडिलांचे पाय पाहण्यास येतों'. अशा रीतीनें भोसल्यावरची ही मोहीम प्रस्तुत नोव्हेंबर १७६५ ते मार्च ६६ पावेतों चालून संपली. मात्र भोसल्याशीं कागदावर गोडी झाली, अंतःकरणांतील शल्य दूर झालें नाहीं, म्हणून पुनः पुढें झगडा झाला. तूर्त याच संधीस इंग्रजांचा शह निजामाकडे आल्यामुळें, निजाम ताबडतोब परत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हैदराबादेकडे गेला. पेशव्यानें परत येतांना रामचंद्र गणेशास भवानराव प्रतिनिधि व बाबूजी नाईक यांजवर पाठवून त्यांस अल्पावधींत कसें नरम केलें त्याची हकीकत अन्यत्र दिली आहे. किती कामें व प्रकरणें पेशवा ताडफाडीनें उरकीत होता, व त्यानें आपली जरब कशी कडक बसविली हें येथें कळून येतें. बाबूजी नाईक आप्त, प्रतिनिधि ब्राह्मण सरदार, भोसले शिरजोर, निजाम नेहमींचा शत्रु, अशा सर्वांशीं समतेचें व निश्चयाचें धोरण माधवरावानें ठेविलें, आपपर भाव ठेविला नाहीं, यांत त्याची योग्यता कळते. आपल्या दुहीचा फायदा त्यानें कोणासच घेऊं दिला नाहीं.

३. दुसरी मोहीम, जानोजीचा पाडाव, (जानेवारी-मार्च १७६९).— पुण्यास आल्यावर या पावसाळ्यांत माधवरावास राज्याचा कारभार निर्वेध करितां आला. निजामानें पुणें जाळल्यावर तें ओस पडलें होतें, त्याची सर्व बांधणी या वेळीं पेशव्यानें केली; आणि लोकांस सवलती देऊन शहराची दुर्दशा झालेली भरून काढिली. याच सालीं माधवरावानें पर्वतीवर शिवपंचायतनाची स्थापना केली. इकडे जानोजी भोसले आपल्या प्रांतांत स्वस्थ होता. पुढें सन १७६८ च्या उन्हाळ्यांत माधवरावानें चुलत्यावर स्वारी करण्याचें ठरविलें, तेव्हां दादानें गायकवाडासह जानोजी भोसल्यास आपल्या मदतीस बोलाविलें. जानोजीनें सिद्धता केली; आणि गोविंदराव गायकवाड तर फौज घेऊन दादास सामील झालाही. पण जानोजी येण्यापूर्वींच माधवरावानें सन १७६८ च्या जून महिन्यांत चुलत्याचा घोडपेस पाडाव करून त्यास बंदींत ठेविलें. तथापि जानोजीचें कृत्य क्षम्य नव्हतें. सरदारांनीं पूर्णपणें पेशव्याचे हुकमतींत वागलें पाहिजे, तसें नसल्यास राज्यच चालणें शक्य नाहीं, हा प्रकार माधवराव पूर्ण ओळखून होता. याच सुमारास म्हणजे ता. १८-८-६८ रोजीं दमाजी गायकवाड मृत्यु पावला, आणि त्याच्या मुलांत तंटे लागले ते तोडून माधवरावानें गोविंदरावास सरदाराचीं वस्त्रें दिलीं. दादास कुमक केल्याबद्दल दंड तेवीस लक्ष, वस्त्रें देण्याबद्दल नजराणा एकवीस लक्ष, व खंडणीची बाकी, मिळून पन्नास लक्ष रुपये देण्याचा व चार हजार फौज घेऊन मुलूखगिरीस येण्याचा करार गोविंदरावानें पेशव्यास लिहून दिला. हीच शिस्त भोसल्यास लागू करण्याचा विचार पेशव्यानें स्वीकारिला. मुख्यतः सर्व सरदारांनीं आपापल्या फौजा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मोहिमेसाठीं वेळेवर पाठवून राज्य सांभाळावें, असा पेशव्याचा कटाक्ष होता; आणि तो उद्देश हा भोसले कोणत्या ना कोणत्या निमित्तानें टाळीत होता. शिवाय हिशेबासंबंधानें वगैरे अनेक तक्रारी उभयतांत उपस्थित झाल्या. राणोजी करांड्याचें प्रकरण विकोपास गेलें. त्याचा बंदोबस्त जानोजीकडून झाला नाहीं, माधवरावाची कडक शिस्त पाहून त्याचें संधान आपण ठेविलें नाहीं, ह्याबद्दल जानोजी व त्याचा कारभारी देवाजीपंत यांस भीति उत्पन्न झाली. तेव्हां पेशव्याचे मनांतील वैषम्य काढण्यासाठीं त्यांनीं चिटणीस चिमणाजी रुक्मांगद यास माधवरावाचे समजुतीस पुण्यास पाठविलें. पण पेशव्याचे मनाची निखालसता झाली नाहीं. पेशव्यानें ता. २१-९-१७६८ रोजीं जानोजीस कळविलें कीं, दिवाकर पुरुषोत्तम यानें समक्ष येऊन खातरजमा करावी. त्यावरून देवाजीपंत पेशव्याचे भेटीस आला. त्यापूर्वीच पेशव्यानें हैदर व निजाम यांशीं संगनमत करून इंग्रजांवर स्वारी करण्याचा घाट रचिला होता. देवाजीपंतानें पेशव्याचा भाव जानोजीस लिहून पाठविला, आणि पेशवा इंग्रजांवर चाल करून जाणार ही संधि साधून, पेशव्यावरच स्वारी करण्याची भर देवाजीपंतानें भोसल्यास दिली. मूळपासून सगळ्या बखेड्याचें कारण हा देवाजीपंत होय, अशी माधवरावाची खात्री असल्यामुळें, या वेळीं त्यानें पंतास एकदम कैद करून आपल्याबरोबर ठेविलें, आणि सखारामबापूकडून कारभार काढून तो मोरोबा दादा फडणीस याजकडे सांगितला. आपआपल्या यजमानांच्या कुटुंबांत फूट पाडून हे दोन शहाणे आपला मतलब साधीत होते. त्यांस ठिकाणीं बसविल्यावर माधवरावानें मुधोजीस ता. ४-१०-१७६८ रोजीं जरबेचें पत्र लिहिलें, आणि जानोजीची समजूत चालविली. परंतु हा बनाव पाहून मागेंपुढें आपल्यावर पेशव्याची स्वारी येणार हें जाणून, सर्व भोसले बंधु या प्रसंगीं एकमतानें वागून फौजेचा बंदोबस्त करून पेशव्याचा पाडाव करण्याच्या उद्योगास लागले. त्यांनीं इंग्रजांची मदत या कामीं मागून ठेविली होती; आणि दुसरीकडेही इंग्रजांशीं पेशव्याचा बिघाडच होता. याच सालीं उत्तर हिंदुस्थानांत फौजा पाठविण्याची तजवीज पेशव्यानें जोरांत करून रामचंद्र गणेशाची रवानगीही तिकडे नेमिली होती. नोव्हेंबरांत पुणें सोडून पेशवा बाहेर पडला. आपल्या मनांतील उद्देशाचा थांग त्यानें बाहेर बिलकूल प्रगट केला नाहीं. पंढरपुर,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तुळजापुर, धारूर, पाथरी, या वाटेनें तो डिसेंबरांत एकदम वऱ्हाडांत शिरला; आणि गोपाळराव पटवर्धन व रामचंद्र गणेश वगैरे सरदारांस त्यानें तावडतोब आपल्याकडे बोलाविलें. निजामासही मदतीस बोलाविल्यावरून रुक्नुद्दौला व रामचंद्र जाधव आठ हजार फौज घेऊन त्यास सामील झाले. पिराजी निंबाळकरही येऊन मिळाला. पेशव्याची फौज गाडदी सुद्धां साठ हजारपर्यंत झाली. "मोगल व पेशवे एक झाले यामुळें बहुतांचा नाश झाला. फौज भारी मिळाली. लष्करांत सवंगाई विपुल, कांहीं न्यून नाहीं. घराहून निघाल्यापासून एकही मुक्काम नाहीं. चालीमुळें घोडीं माणसें बेजार आहेत". (ता. ११-१-१७६९). बरोबर जंगी तोफखाना होता. वऱ्हाडांतून भोसल्याचा मुलूख काबीज करीत या फौजा सन १७६९ च्या जानेवारींत थेट नागपुरावर आल्या. जानोजीनेंही आपल्या बाजूस लष्करी धोरणाची कमाल केली. ता. ११-१-१७६९ चें वर्तमान. 'देवाजीपंत बरोबर आहे. पंधरा लक्ष रुपये देतों म्हणतो. श्रीमंत ऐकत नाहींत. केवळ निग्रहास गोष्ट आली आहे. वर्धेच्या अलीकडील भोसल्याचा अंमल उठवून आपला बंदोबस्त केला. श्रीमंत सर्व गोष्टी उत्तम करीत आहेत. तर्दुद विशेष. फौज भारी. आमनेरचे किल्ल्यांत ठाणें बसवून श्रीमंत शनिवारीं नागपुरास आले. आज रविवारीं सर्व लष्कर आलें. रामचंद्र गणेशाची रवानगी भंडाऱ्यावर झाली. भोसल्याकडील मध्यस्थ बोलणें करावयास आले आहेत'.

नागपुरच्या दक्षिणेस सुमारें १०० मैलांवर चंद्रपुर म्हणजे हल्लींचें चांदा हें मोठें मजबूद ठिकाण मुधोजीचे ताब्यांत होतें. तेथें सर्व भोसले बंधु बंदोबस्तानें राहिले. मागें जडजवाहीर व मुलेंमाणसें गाविलगड किल्ल्यावर ठेवून, स्वतः जानोजी नागपुरचे उत्तरेस रामटेकास गेला. पेशव्यांशीं समोर टक्कर देण्याचें सामर्थ्य नसल्यामुळें त्यानें गनिमी काव्यानें पेशव्याच्या फौजेस हैराण करण्याचें ठरविलें. जानोजीही कसलेला शिपाई व मुत्सद्दी होता. देवाजीपंत जरी पेशव्याचे कैदेंत होता, तरी जानोजीस सर्व बातम्या अंतस्थरीतीनें तोच पोंचवीत असे. रामचंद्र गणेश व गोपाळराव पटवर्धन हे पेशव्याचे मुख्य भरंवशाचे सरदार होते. त्यांनीं प्रथम वऱ्हाडांतील भोसल्यांचा सर्व मुलूख वर्धानदीपर्यंत हस्तगत करून पांढरकवडा येथें मुख्य तळ ठेविला, आणि तेथून आमनेरचा किल्ला काबीज करून नंतर भंडारा घेतला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जानोजी व त्याचे भाऊ चांद्यास गेलेसें पाहून त्यांनीं नागपुरास येऊन तें शहर लुटून जाळिलें. पुढें चांदा काबीज केला कीं, भोसल्यांचें सामर्थ्य संपलें, असें ठरवून पेशव्यांचे फौजेनें चांद्यास वेढा घातला. जानोजी बाहेर मोकळा राहून फिरत होता; आणि पेशव्याच्याही लहान मोठ्या टोळ्या सर्व प्रांत हैराण करीत होत्या. पंचगव्हाण येथें भोसल्याचे सरदार नरहर जिवाजी रिसबूड व रघूजी बापू करांडे यांजला नरसिंगराव धायगुडे, आनंदराव गोपाळराव व बाळाजीपंत सफरे या पेशव्यांच्या सरदारांनीं गांठून लढाई केली; तींत नरहर जिवाजी पडला व करांडे पंचवीस स्वारांनिशीं जीव घेऊन पळून गेला. महिपतरावाजवळ फौज थोडीच असल्यामुळें तो चांदा येथें फार दिवस टिकाव धरण्यास असमर्थ होता. सबब युक्तीच्या वाटें वेढा उठविण्याचें जानोजीनें ठरवून, समोर सामन्यास न येतां, दूर राहून गनिमी काव्यानें पेशव्याच्या फौजेस हैराण करीत राहिला. तेव्हां पेशव्यानें आपल्या फौजेचे दोन भाग करून, एकानें तोफा घेऊन चांद्यास वेढा घातला, आणि दुसऱ्यानें जानोजीचा पाठलाग चालविला. अशा रीतीनें पेशव्यानें आजूबाजूचा भोसल्याचा मुलूख पुष्कळ काबीज केला.

या स्वारींत कपटनीतीचा माराही कांहीं थोडाथोडका झाला नाहीं. देवजीपंत पेशव्याचे कैदेंतूनच वाटेल तीं दीर्घ कारस्थानें करीत होता. जानोजी बाहेर असून दुसरे तीन बंधु व कुटुंब चांद्यास होतें, आणि पेशव्याचा त्यास वेढा होता. तें ठिकाण पेशव्याचे हस्तगत झाल्यास भोसल्यांचा निभाव लागणार नव्हता. महिपतराव दिनकर गुप्ते नांवाचा भोसल्याचा इमानी शूर प्रभु सरदार चांद्याचे बंदोबस्तास असून त्याचेच आप्त सखाराम हरि व बाबूराव हरि गुप्ते पेशव्यांचे फौजेंत होते. त्यांचे मार्फत महिपतराव दिनकरास वश करण्याचा प्रयत्न पेशव्यानें केला. पण महिपतरावानें इमान सोडिलें नाहीं. तोफांच्या मारापुढें किल्ल्याचा टिकाव फार दिवस लागणार नसल्यामुळें, पेशवे वेढा उठवून लगेच निघून जातील, अशी एक युक्ति देवाजीपंतानें सुचविली. महिपतरावानें एक पत्र देवाजीपंतास लिहिलेलें पेशव्यांच्या हातांत पडेल असें केलें. पत्रांत मजकूर असा कीं, 'प्रधानपंत चांद्यावर आले. बहुत उत्तम झालें. ही मजबूद जागा साध्य झाल्यानें भोसल्यांची सारी दौलत त्यांचे हस्तगत होईल, असें पंतप्रधानास सुचवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आठ पंधरा दिवस त्यांस या शहास गुंतवावें, म्हणजे दरम्यान जानोजीबावा पुण्यास जाऊन दादासाहेबांस सोडवून त्यांसह इकडे पेशव्यावर चालून येतील'. हें पत्र लष्करांत चौकीवर धरलें गेलें. तेव्हां पेशव्यास या कारस्थानाचा अंदेशा आला, आणि देवाजीपंतावर इतराजी करून त्याचा त्यानें कडक बंदोबस्त केला. 'दोन घरें प्यादे मागें घ्यावें' ही ऐतिहासिक गोष्ट या प्रसंगाची आहे.

इकडे जानोजीनें विचार केला, कीं चांद्याचा बचाव होऊं शकत नाहीं; व पेशव्यांचा पाडाव करणें तर अशक्य, तेव्हां बाहेरून आपण पेशवे व निजाम यांचे मुलखावर स्वारी करावी, म्हणजे ते आपल्या पाठीस लागत परत येतील. असा बेत करून तो पंधरा हजार घोडेस्वार बरोबर घेऊन माहुरवरून उमरखेड पावेतों आला. 'पुण्यास जाऊन शहर जाळून फस्त करावें. दादास सोडवावें, प्रतिनिधीच्या मार्फत सातारचें राजमंडळही बदलावें', अशा प्रकारची त्यानें हूल उठविली. पेशव्यास हा डाव समजतांच त्यानें रामचंद्र गणेश व गोपाळराव यांस तावडतोब जानोजीच्या पाठीवर पाठविलें, आणि आपण चांद्याचा वेढा उठवून सर्व लष्करासह परत वळला. तसेंच त्यानें पुण्यास नाना फडणिसास निकडीचीं पत्रें लिहून दादा सुद्धां सर्व मंडळीस सिंहगडास रवाना करण्यास सांगितलें. (ता. १२-२-१७६९). नाना फडणीस ही व्यवस्था करूं लागतांच पुण्यांतील लोकांची पराकाष्ठेची घांदल उडाली. अर्ध्या रात्रींत पुणें फुटलें. लोक वस्तवानी घेऊन सैरावैरां पळूं लागले. पुण्यांतून मावळांत जाण्यास दर बैलास पंचवीस रुपये भाडें पडूं लागलें. रविवार ता. १९ फेब्रुवारी प्रहर रात्रीपासून बुधवार २२ फेब्रुवारीपावेतों, पुण्यांत मोठाच प्रळय उडाला. गुरुवार ता. २३ रोजीं पेशव्याकडून पुनः बातमी आली कीं, भोसले पुण्यावर येत नाहींत, तुम्हीं स्वस्थ असावें. तेव्हां सर्वत्र शांतता झाली.

या वेळीं पेशव्याचा मुक्काम माहुरास असून त्यापुढें वीस कोस गोपाळराव व त्याचेही पुढें भालकीचे सुमारास भोसले, अशा त्यांच्या हालचाली होत्या. 'भोसले झुकांड्या देत पळतात व पेशवे पाठलाग करतात'. पुढें भोसले भालकीकडून मेदकाकडे चालूं लागला. मागें पेशव्याचा मुक्काम गंगातीरीं निर्मलानजीक ब्रह्मेश्वर येथें होता. 'भोसले पंधरा वीस रोज

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाडींतून पुढें व आमच्या फौजा मागें, असे चालिले. त्यानें फारच गनिमाई केली. तीन चार रोज भाकरी नाहीं. वक्र्यांवर जीव धरून फारच निकडीनें निघोन गेले. महिनाभर सारखी दौड आहे. शेवटीं पुनः झाडीच्या वाटेनें गंगा उतरून भोसले चांद्याकडे गेले. घोड्यांत व माणसांत कांहीं बाकी नाहीं. अशी स्वारी या मागें झाली नाहीं व पुढेंही होणें नाहीं. आतां सल्ला मामला होत आहे. अद्यापि मोगलसुद्धां सारे एकत्रच आहेत. यंदां चाकरी पडली ती लिहितां पुरवत नाहीं. झाडींत पंधरा रोज सूर्य-दर्शन नाहीं. दाणावैरण नाहीं. प्राणाशीं गांठीं पडल्या'. ता. १५-४-६९ चें वर्तमान. 'श्रीमंतांचा मुक्काम ब्रह्मेश्वरावर आहे. भोसले देवगड चांद्यास आहेत. त्यांजकडे सांडणी पाठविली आहे. सल्ल्याचा प्रकार झाला तर उत्तम. नाहीं तर पुन्हा चांद्यास जावें असें आहे. दोन्ही फौजा, तीन महिने धांवतां धांवतां थकल्या. अद्यापि प्रथम दिवस आहे'.

देवाजीपंताची युक्ति इतक्यापुरती सफल झाली. निदान जानोजी साफ बुडणार होता तो थोडा बहुत बचावला. चांद्याचा वेढा उठवून पेशवे पाठीवर आले, तेव्हां जानोजी उलटून मोगलाईत पूर्वेच्या बाजूस वळला. एकदां बापू करांड्यानें आड वाटेनें येऊन पेशव्याचे बुणगे लुटले, तरी हळूहळू पेशव्याच्या व पटवर्धनाच्या लष्करामध्यें जानोजी घेरला जात होता. मोहीम नेटानें चालविण्यास आणखी वर्ष सहा महिने फौजा गुंतवून ठेवाव्या लागतील; खर्च करून दुसरे मनसबे बुडविण्यापेक्षां भोसल्याशीं मिटतें घेणें श्रेयस्कर होय, असें गोपाळराव व देवाजीपंत यांचे विचारें पेशव्यानें ठरविलें; आणि देवाजीचा मुनशी तहाकरितां भोसल्याकडे रवाना केला. (२-३-१७६९). गोपाळरावानें पेशव्यास सुचविलें कीं, 'भोसल्याशीं कळेल तसा सल्ला करावा; देशास जावें; हिंदुस्थानांत फौजा रवाना कराव्या; भोसल्यासही त्राहि त्राहि झालें आहे. भगवंतें या वेळीं वांचविलें. पुढें नीट चालेल. श्रीमंत बोलले; 'लोक शब्द ठेवितील कीं मागें जास्ती पैका देत होते तेव्हां सल्ला न केला; आणि आतां कमी घेऊन सल्ला करतात'. गोपाळरावानें उत्तर केलें, 'हा मनसबा आहे. लोकांचे म्हटल्यावर काय आहे! असें करतांना जर भोसले केवळ लबाडीच्याच गोष्टी बोलूं लागला, तरी पारिपत्य करणें कांहीं अशक्य नाहीं. स्वामींनीं छावणीस राहवें, चांदें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घ्यावें. म्हणजे एक महिन्यांत भोसल्याचे डोळे उघडतील'. यावर कृष्णराव बल्लाळ यास रुक्नुद्दौलाकडे पाठवून निजामाचा मनोदय काढिला; आणि देवाजीपंताच्या विद्यमानें पेशव्यानें सल्ल्याचाच उपक्रम चालू केला. वर्धे-अलीकडील सर्व मुलूख भोसल्यांनीं सरकारांत द्यावा व चाकरी करावी, हीं कलमें पेशव्यानें सुचविलीं; आणि रामचंद्र गणेश व गोपाळराव यांजकरवीं भोसल्याचा पाठलाग चालविला. भोसल्यानेंही लगेच जबाब पाठवून सलुखाची इच्छा दर्शविली. त्यावर ७ मार्च रोजीं माधवरावानें त्यास शपथेचें पत्र लिहून खात्री केली. 'आपण कै० नानासाहेबांचे वेळेस निखालस वर्तलां. या अलीकडे कालगतीनें दरम्यान न व्हावयाच्या गोष्टी झाल्या. त्यास सांप्रत सर्व प्रकारें निखालस वर्तावें; व राज्याचें कल्याण इच्छावें. काडीमात्र दुसरा भाव नसावा. आपणाविषयीं आमचे मनांत तिळतुल्य दुसरा विचार नाहीं. इकडून अंतर होणार नाहीं. आपण शपथपूर्वक पत्र पाठवावें व त्याप्रमाणें चालावें. येथूनही तसेंच वर्तन होईल. त्यास कै० नानासाहेबांची व श्रीगजाननाची शपथ असे. जसे एकनिष्ठेनें वर्ताल, तशी तुमच्या दौलतीची अभिवृद्धि करण्यांत येईल. वरकड मजकूर मध्यस्थ सांगतील त्यावरून कळेल.

४. कनकापुरचा तह (२३-३-१७६९).—पेशव्यांनीं वऱ्हाडप्रांत हस्तगत केला. आतां ते नागपुर प्रांतही हस्तगत करण्यास सोडणार नाहींत. शिवाय भाऊ मुधोजी यास पेशव्यांनीं आपल्या बाजूस फितविल्याची बातमी जानोजीस कळली. या कारणांनीं तोही तह करण्यास आतुर झाला. सर्व किल्ली देवाजीपंताचे हातांत होती. त्यानें उभय पक्षींचें मनोगत ताडून तह घडवून आणिला. भोसल्याची इच्छाही तह करण्याची कळतांच कलमें तयार होऊन ता. २२ मार्च रोजीं सवालजबाब सुरू झाले. पेशव्यानें गोविंद शिवराम व देवाजीपंत यांस भोसल्यांकडे रवाना केलें. तेथून देवाजी-पंतानें कळविलें, 'बोलून आलों त्यांत कांहीं गुंता नाहीं. जानोजी भोसले यांस भेटीस घेऊन येतों'. अर्थात् देवाजीपंताचे मध्यस्थीनें तह ठरला तो ब्रह्मेश्वरनजीकच्या कनकापुरचा तह म्हणून प्रसिद्ध आहे. (ना. भो. का. ले. १९,२८,३७). अनेक तक्रारींच्या बाबतींत उभय पक्षीं सवाल जाब झाले त्यांचीं १९।२० कलमें तहांत आहेत, आणि वाटाघाटी चालू असतां अनेक मसुदेही झाले असल्याचें निरनिराळ्या कागदांवरून दिसतें. तहांतील मुख्य

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मतलब असा कीं, भोसल्यानें स्वतंत्रपणें वागूं नये. आपली फौज वाढवूं नये. पांच हजार फौज घेऊन सरकारी नोकरीस यावें. पेशव्याशीं निष्ठेनें वर्तावें. पंधरा लक्षांची जहागीर पूर्वी भोसल्यास दिली होती ती परत द्यावी. दरसाल पांच लक्ष रुपये खंडणी पेशव्यास द्यावी. पेशव्यांनींही अडचणीचे प्रसंगीं मदत करून भोसल्याचा सांभाळ ममत्वाचे दृष्टीनें करीत जावा. भोसल्यांनीं बाहेर राजकारण राखूं नये. बदमामली करूं नये. चाकरीस बोलावूं तेव्हां यावें अगर भावास पाठवावें; अगर दिवाकर पुरुषोत्तम यांनीं यावें. पेशव्यांकडूनही ममतापूर्वक निखालसपणें कृपा केली जाईल. 'कै० नानासाहेबांनीं पुत्राप्रमाणें लोभ केला, त्याप्रमाणें माधवरावानें अकृत्रिमपणें ममता करून चालवावें'. असें जानोजीनें कळविल्यावर पेशव्यानें जबाब पाठविला कीं, 'तुम्हीं एकनिष्ठेनें वर्तावें. दौलतीचें कल्याण तेंच वर्तणूक करावी. म्हणजे तुम्हांवरही ममतापूर्वक कुटुंबांतील असें जाणूनच कृपा केली जाईल'. 'पातशहा, इंग्रज, नजीबखान, सुजाउद्दौला वगैरेकडे भोसल्यानें खतपत्र पाठवूं नये व राजकारण राखूं नये. इंग्रज व निजाम यांजकडे भोसल्यांनीं आपले वकील ठेवणें ते पेशव्यांचे वकिलाचे मार्फतीनें ठेवावे. त्यांनीं फक्त मामलतसंबंधीं बोलाचाली किंवा कागदपत्र करावे. वरकड कोणेविषयीं राजकारण राखूं नये'. ह्या पेशव्याच्या मागणीस भोसल्यानें जबाब दिला कीं, 'दुसरी मसलत बोलण्यास आम्हांस कारण नाहीं'. वऱ्हाड प्रांताची सरदेशमुखी जानोजीस देऊन त्याचे कबजांत कोणते मुलूख राहवयाचे, त्याची तपशीलवार संपूर्ण यादी माधवरावानें ठरवून दिली.

याप्रमाणें सवालजबाब झाल्यावर उभयपक्षीं यथायोग्य सन्मानानें जानोजी व माधवराव यांच्या भेटी तारीख ७-४-१७६९ रोजीं वर्षप्रतिपदेच्या मुहूर्तानें वाशीम येथें झाल्या. निग्रहानुग्रहाच्या मार्गानें पेशव्यानें भोसल्यास मराठमंडळाशीं एकजीव केलें. यापुढें माधवरावाचे हयातींत जानोजी त्याजशीं अत्यंत ममतेनें स्नेह रक्षण करून वागला. देवाजीपंतासारख्या उपद्यापी माणसाचे नादीं लागल्यानें कसें नुकसान होतें, हें पेशव्यानें जानोजीचे चांगलें निदर्शनास आणिलें. 'हा मनुष्य तुमचे आमचे जवळ असावा. नाश करील. आम्ही आपले समागमें नेऊन पारिपत्य करितों', असें पेशव्यानें सांगितलें. तेव्हां जानोजी म्हणाला, 'आमचा तावेदार दरा अथवा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वाईट, त्यास आम्हीच शासन करूं. हेही आपले मर्जीशिवाय वागणार नाहींत'. अशी हमी देऊन जानोजीनें पंतास सोडवून आणिलें. पुढें त्याजवर जानोजीची इतराजी झाली. सेनासाहेबांनीं त्यास दंड करून कैदेंत ठेविलें; त्याचे सोयरे व त्या पक्षांतील चिमणाजी रखमांगद वगैरे सर्वांस दंड केला. 'भवानी काळो मुनशी' याची शिफारस माधवरावानें केली, त्यास पुढें जानोजीनें आपला कारभारी नेमिलें. देवाजीपंत ठिकाणीं बसल्यावर जानोजी व मुधोजी यांचाही प्रेमभाव वाढला. साडेतीन शहाण्यांत गणना असलेल्या या देवाजीपंताचा उपद्व्याप कसा राष्ट्रविघातक होता हें यावरून कळून येतें. धारदप्तरांतील कित्येक पत्रांवरून या भानगडींचा छडा लागतो[1].

पेशव्याची रजा घेऊन जानोजी परत जातांच, पेशव्यानें उत्तर हिंदुस्थानांत फौजा रवाना केल्या. त्यावर मुख्य रामचंद्र गणेश कानडे व त्याचे हाताखालीं विसाजी कृष्ण बिनीवाले यास त्यानें नेमिलें. शिवाय सिंदे, होळकर, विंचुरकर, नारोशंकर, वगैरे सरदारांच्या फौजा होत्याच. भोसल्याचा हल्ला पुण्यावर येणार ही बातमी ऐकिल्यावर दादानेंही कैदेंत असतां फितूर करून उचल केली; आणि उपास तापास व त्रागा केला, त्याचें निराकरण स्वारींतून पुण्यास आल्यावर पेशव्यानें जून महिन्यांत केलें.

---

१. यांच्या नकला रा० भालेराव यांनीं मला दिल्या आहेत. (गो. स. स.) सवता सुभा करण्याची मराठ्यांची परंपरा फार प्राचीन आहे. मध्यवर्ती नियंत्रणांत एकजुटीनें वागण्याची संवय त्यांस बिलकूल नाहीं. हेंच वळण राज्याचे बचावासाठीं माधवराव सर्वांस शिकवीत होता. परंतु मराठे सरदारांनीं आणभाक करून करार लिहून दिले, तरी त्यांचें वर्तन कसें दुटप्पी असतें याची प्रतीति प्रस्तुत जानोजीचे ठिकाणीं सुद्धां दिसून येते. कनकापुरचे तहाचें शल्य मनास बोंचून जानोजी ता. २९-१-१७७० च्या पत्रांत इंग्रजांस कसा आळवीत आहे, व वरील युद्धांत आपणांस ऐन वेळीं इंग्रजांनीं मदत न केल्याबद्दल त्यांस कसे चिमटे घेत आहे, हें त्यानें इंग्रजांस लिहिलेल्या अनेक पत्रांत चांगलें दिसून येतें. (पर्शि० कॅलेंडर्स, भा. ३ ले. ४५, २०३, ४६७ व ४६८).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तूर्त माधवरावानें तीन शहाण्यांच्या कचाट्यांतून जानोजीची सुटका केली ही त्याच्या हिताची गोष्ट झाली. मात्र दुर्दैवानें जानोजी व माधवराव दोघेही पुढें लवकरच मृत्युमुखीं पडून पुनः त्या कुटुंबांतील कलह राष्ट्रास भोंवला. कनकापुरच्या तहानंतर दोन वर्षें जानोजी जिवंत होता, त्या-अवधींत त्याचें पेशव्याशीं उत्तम सख्य होतें. सन १७७० च्या कर्नाटक स्वारींत जानोजीची फौज धापा टाकीत पेशव्यास सामील झाली. त्या सालच्या नोव्हेंबर महिन्यांत जानोजी येऊन पेशव्यास भेटला. दोन महिने उभयतां बरोबर होते. मोठ्या सौरस्यानें भेटी व बोलणें झाल्यावर माधवराव पेशव्यानें त्यास देशीं जाण्यास निरोप दिला. या भेटींतच बहुधा जानोजीनें भावाचा मुलगा दत्तक घेऊन आपल्या जहागिरीची पुढील व्यवस्था पेशव्याजवळ बोलून ठरविली असावी. जानोजीस मुलगा नव्हता. सबब मुधोजीचा मुलगा रघूजी यास त्यानें दत्तक घेऊन मुधोजीचाही संतोष केला; आणि ही सर्व व्यवस्था पेशव्याकडून मंजूर करून घेण्याकरितां जानोजी सन १७७२ चे एप्रिलांत पुण्यास माधवरावाचे भेटीस आला. बरोबर भवानीपंत मुनशी कारभारी होता. 'थेऊर येथें भेटी घेतल्या. प्रेम भारी झाला. विनंति केली कीं, आतां चिरंजीव बापू रघूजीबावा आपले सेवेशीं चाकरींत येतील, त्यांचें चालविणें आपलेकडेसच आहे. असें बोलून विदा झाले ते वेळेस पेशव्यांनीं मोत्यांचा तुरा शिरस्त्याशिवाय दिला. तेथून पंढरपुरास देवदर्शन करून जानोजींनीं निजामाचा सरदार धौसा याची भेट निंबाळकराचे मुलखांत घेतली. इतक्यांत शूळाची व्यथाही होतीच. नित्य गोळी औषधाची खात होते. त्या दिवशीं गोळी खाऊन लवकर जेवले नाहींत. सबब मात्रेनें अपचार केला. कठीण अवस्था झाली. ते समयीं मुधोजीबावास जवळ बोलावून आपलें कपाळ त्यांचें कपाळास घासलें, आणि बोलले, 'तुम्हीं भारी पराक्रमी व शहाणे होतां. परंतु प्रारब्ध आमचें होतें, तें दैव तुमचे दैवास घांसतों. असें म्हणून सर्वांचा निरोप घेऊन भगवंतस्मरण करून वैशाख शुद्ध १५ ता. १६-५-७२ रोजीं कैलासवासी शांत झाले. नाटकशाळा सती गेल्या'. येथेंच तूर्त जानोजीची हकीकत पुरी केली पाहिजे. देवाजीपंत पुढें सन १७८१ त नागपुरास मृत्यु पावला. नागपुरकरांच्या पदरीं सातारकरांप्रमाणेंच अनेक मोठमोठीं घराणीं प्रसिद्धीस आलीं. त्यांच्या हकीकती

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समजल्याशिवाय त्या भोसल्यांची बखर दुर्बोध होते. सबब अशा कांहीं घराण्यांच्या हकीकती पुढें प्रकरण ४१ यांत दिल्या आहेत.

प्रकरण अडतिसावें

इतर महत्त्वाच्या बाबती

[सन १७६३–१७७२]

१. बाबूजी नाइकाचा उपद्व्याप.
२. पुरंदर किल्ल्यावरील कोळ्यांचा दंगा (मे १७६४-सप्टें. १७६५).
३. तोतयांचा सुळसुळाट व पाडाव. (सन १७६१-७६).
४. इंग्रजांची माधवरावास धास्ती.
५. मॉस्टिनची पेशव्यांकडे वकिली.
६. उदयेच्छु महादजी शिंदे.
७. मानाजी फाकडे.

१. बाबूजी नाइकाचा उपद्व्याप.—पेशवाईच्या अव्वलपासून बहुतेक अखेरीपावेतों सर्व घडामोडी पाहिलेला आणि स्वतःही अनेक उलाढाली करणारा हा पुरुष बराचसा अनिश्चित धोरणानें वागून निष्कारण उपद्व्याप

१. आधार.—ना. भो. ब. पृष्ठ ७१-७८ व १२९; ना. भो. का. १३, १९, २८, ३३, ३४, ३५, ३७, ४३, ४५, ४६, ५१; चं. ८८, ११०, १११, ११४, १९७; का. सं. प. या. १०५, १०८, ११४; तह व करार म. पृष्ठ १३५-१४०; खं. १०-५१, ५७, ५८, ५९, ६०, ६१; पर्शियन कॅलेंडर्स ३. ४५, २०३, ४६८; खरे. ले. १८५, ३१८, ५६७, ५८४, ७८२, ७८४, ७८६, ७९१, ७९३, ७९९, ८०१, ८०२, ८२४, १०५९, १०७७. काळेकृत व. इ. पृष्ठ १९५; ३८२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करणारा दिसतो. पूर्वी याची हकीकत येऊन गेलीच आहे. वय व अनुभव या कारणांनीं त्यास जें काय महत्त्व होतें, तें माधवरावाशीं विरोध करून त्यानें गमावलें. आरंभीं चुलतेपुतण्यांच्या कलहांत तो केव्हां या पक्षास तर केव्हां त्या पक्षास मिळून असे. राक्षसभुवनच्या मोहिमेंत तो उभयतांचें साह्य मनापासून करीत होता. तथापि पुढें दादास मिलाफी होऊन तो माधवरावाचा हुकूम उठविण्यास टंगळ मंगळ करूं लागला, आणि सोलापुरचे मजबूद ठाण्यांत राहून त्यानें फौज वगैरे वाढविली. अशी बंडखोरी दिसतांच माधवरावाची त्याजवर इतराजी झाली, आणि सोलापुरचा किल्ला नाइकाचे ताब्यांत होता तो त्याजकडून काढून घेण्याचा हुकूम माधवरावानें केल्याबरोबर, तो जास्तच चिडून लढाईस प्रवृत्त झाला. चंदनवंदनचे किल्ले नाइकाचे ताब्यांत होते, तेही याच वेळीं माधवरावानें त्याजकडून काढून घेतले. सन १७६६ त विसाजी कृष्ण व शहाजी भोसले यांस पाठवून पेशव्यानें मार्च १७६६ त सोलापुरचें ठाणें हस्तगत केलें. 'विसाजी कृष्ण सोलापुरास आले. एक झुंज गांवाजवळ किल्ल्यांतून बाहेर निघोन झालें. बाबूजी नाईक पळून गेला. त्याचीं मुलेंमाणसें मंगळवेढ्यास पटवर्धनांचे आश्रयास गेलीं. त्यांचे पाठीवर रामचंद्र गणेशानें जाऊन त्यांची वस्तभाव लुटून आणली'. पुढें गोविंद शिवरामानें नाइकास समजावून आणिलें आणि त्याचा स्नेही नरसिंगराव धायगुडे याचे मार्फत नाइकाचे सरंजामाचा नवीन करार डिसेंबर १७६६ त पेशव्यांशीं केला. 'जातीस लाख रुपयांचा सरंजाम बारामती सुद्धां व पागा अडीचशें स्वारांची, त्याचे खर्चास पंचायशीं हजार, असे सरंजाम घेऊन सरकारचाकरी करावी. सोलापुर किल्ला सरकारांत द्यावा. श्रीमंतांशीं विरुद्ध करून शेवटास जाणें ही गोष्ट शक्य नाहीं. प्रस्तुत करार ठरला आहे त्याप्रमाणें स्थळ हवालीं करून मोकळें व्हावें. पुढें कृपा करणार धणी समर्थ आहेत', अशी समजूत घालून, सन १७६७ च्या जानेवारी मासांत सोलापुरचा किल्ला नाइकाचे हातून काढून, पेशव्यानें तो गोविंद शिवराम याचे ताब्यांत दिला. हुकुमाची तामिली करण्यांत माधवराव किती कठोर होता हें या प्रकरणावरून दिसतें. अशा लहानमोठ्या आप्त व परकीय इसमांस हुकूम पाळण्यास लावल्यानें माधवरावाची जरब बसली. दादासाहेब कैदेंत पडल्यावर तो त्रागा वगैरे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करूं लागला तेव्हां त्याची समजूत करण्यासाठीं माधवराव बाबूजी नाइकाचा उपयोग करून घेत असे. तरी पण अखेरपर्यंत नाइकावर माधवरावाचा विश्वास नव्हता. पुढें दादानें आपली मुलगी दुर्गाबाई बाबूजीचा मुलगा पांडुरंग नाईक यास दिली. लग्न ता. ७-२-१७७३ रोजीं झालें. तेव्हां नाईक व दादा यांचा घरोबा जास्तच वाढला. बाबूजी नाईक ता. ६-१-१७७७ रोजीं मरण पावला.

बाबूजी नाइकावर सन १७६६ त मोहीम झाली, त्या वेळीं दादाच्या निजामाकडे अनेक भानगडी चाललेल्या होत्या. निजामाचा भाऊ मीरमोगल व सरदार रामचंद्र जाधव यांस दादानें आपल्याकडे वश करून माधवरावाशीं विरोध चालविला होता. तोही कलह माधवरावानें मिटविला. 'जाधवरावास दादांनीं समजवावें. निजामअलीनें मीरमोगलास समजवावें; आणि जाधवरावाची पूर्वींची जहागीर त्यास परत द्यावी. मोगलही दाण्यादुण्यामुळें हैराण, खर्चाविशीं जळलेले, मेहनत होईना, यास्तव तह करणार. एक नाईक मात्र ओढीत आहेत'. असें वर्तमान ता. ८-११-१७६६ चें असून नाइकाचा निकाल पुढें झालाच.

२. **पुरंदर किल्ल्यावरील कोळ्यांचा बंडावा** (मे १७६४ सेप्टेंबर १७६५).—घोडनदीच्या युद्धांत माधवरावाचा पाडाव झाला, तेव्हां दादानें साह्यकर्त्यांची समजूत करण्याकरितां पुरंदर किल्ला नीळकंठ आबा पुरंदरे यास दिला. सिंहगड व पुरंदर हे दोन किल्ले पुण्याच्या बचावासाठीं पेशव्यांनीं मूळपासून आपल्याच कबजांत ठेविले होते. पुण्यावर यत्किंचित् परचक्र किंवा संकट आलें कीं कुटुंब, खजिना, कागदपत्र वगैरे सर्व सुरक्षित राहण्यासाठीं या किल्ल्यांवर पाठविण्याचा प्रघात होता. शेटसावकार सुद्धां अडचणीच्या प्रसंगीं आपली मालमत्ता या किल्ल्यांचे आश्रयास पाठवीत. अर्थात् या दोनही किल्ल्यांवरील शिबंदी, नोकरचाकर वगैरे सर्व बहुत वर्षांचे पिढीजाद नोकर पेशव्यांच्या कुटुंबाशीं अनुरक्त होते.

---

१. **आधार**.—च. ११५; का. सं. प. या. ११४; खरे ले. ६००, ६१७, ६२०, ६३४, ६३८, ६४१, ६४६, ६४९, ६६१, ७४५, ८०८; खं. ६. ४२७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुरंदऱ्यांचे घरांत तंटे होते. नीळकंठ आबा दादाचे पक्षांत असून धोंडो मल्हार ऊर्फ आबा पुरंदरे माधवरावाचे बाजूचा होता. तिसरा त्रिंबक सदाशिव ऊर्फ नाना बहुधा साताचे कारभारावर असून सन १७६४ त माधवरावाचे स्वारीबरोबर कर्नाटकांत होता. आबा व दादा यांचें वांकडें होतें. शिवाजी महाराजांचे वेळेपासून पुरंदर किल्ल्याच्या बंदोबस्ताची व्यवस्था ठरलेली कायम होती. औरंगजेब बादशहानें संभाजीचा वध करून तो प्रदेश हस्तगत केल्यावर, 'तेथील कोळी व बेरड लोकांनीं किल्ले पुरंदर हस्तगत करून द्यावयाची उमेद धरल्यावर त्यांची सर्फराजी कार्यसिद्धि झाल्यावर करावी', असा ता. १०-९-१६९१ रोजीं राजारामानें हुकूम सोडिला, आणि पुढें त्यांस तेथील बंदोबस्ताचें काम वंशपरंपरेनें ठरवून दिलें. तेव्हांपासून पुरंदरवरील कोळी व बेरड हे आज सत्तर वर्षांचे जुने हक्कदार बनले होते. यांचा ओढा गोपिकाबाई व माधवराव यांजकडे असून, कदाचित् आबा पुरंदऱ्याचे ताब्यांत किल्ला देऊं नये, अशी भर बाईनें कोळ्यांस दिली असेल. हे कोळी आबा पुरंदऱ्याचा अंमल बसूं देईनात, आणि त्याच्याशीं शिरजोरपणानें वागूं लागले, म्हणून त्या सर्वांस काढून देऊन आबानें नवीन इसम नोकरीस ठेवून जुन्यांस खालीं घालवून दिलें. हजार दोन हजार लोकांना आज कैक वर्षें नांदता संसार सोडून निघून जावें लागलें, ही गोष्ट त्यांस खपली नाहीं. यामुळें त्यांनीं दंगा करून किल्ला हस्तगत केला. 'वैशाख शुद्ध ६ (ता. ७-५-१७६४) रोजीं किल्ले पुरंदर कोळी यांनीं दंगा करून घेतला. हवालदार, सरनोबत वगैरे चार असामी ठार झाले, नवे लोक खालें घातले. जुने कोळी यांची समजावीस राघो गंगाधर यांनीं केली. घर शाकारावयाचें निमित्त करून, चारशें माणूस गडावर गेलें. वाघाची पारध निघाली ऐशी बाजी करून, सदरेवर चालोन आले. युद्ध फार जालें. पुरंदर घेतल्यावर पांचवे रोजीं रुद्रमाळ घेतली. हें वर्तमान नाशिकीं श्रीमंत दादांस कळल्यावर त्यांच्याकडून आबा पुरंदरे आले. कोळ्यांनीं गड घेतल्याबरोबर त्यांनीं धोंडोबा आपाचे कारकून विसाजी केशव सान्ये (कलमाचे शेवटीं टीप पहा), यांस गडास नेलें. त्यांचे आज्ञेनें सर्व वर्तणूक करतात. किल्ला घेतल्यावर कोळ्यांनीं लोकांची संपत्ति लुटून रोजमुरे वगैरे भागविले. विसाजीपंत व कोळी कारभार करितात.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलखांत सर्वत्र दंगा व धामधूम चालू आहे. राज्य बुडालें. या उपर पुरंदर कोणाकडे होईल कळत नाहीं. श्रीमंतांनीं नारायणाचे देवळांत मृत्युंजयाचे अनुष्ठानास प्रारंभ केला होता. तेथेंही दंगा होऊन सर्व जिन्नस कोळ्यांना वरता नेला. ब्राह्मण पळोन आले. श्रीमंतांची सर्व वस्तभाव व कागद देखील गडावर सर्वस्व बुडालें. पुढें श्रीमंत आलियावर रंग कसा बसेल पाहवें. कोळ्यांनीं सासवडास पुरंदरे, सरनाईक वगैरे अनेक मंडळीकडे रोखे करून पैसा बहुत नेला'.

आपल्या विरुद्ध वागणाऱ्या माणसांच्या हातीं किल्ला गेला, हें वर्तमान ऐकून दादास फार वाईट वाटलें. धोंडोपंत आपा पुरंदरे व त्याचा हस्तक विसाजी केशव यांनीं हें कृत्य माधवरावाचे शिकवणीनें केलें, अशी त्याची समजूत झाली. 'पुरंदरामुळें फारच विकल्प दादासाहेब विपरीत दर्शवितात; चित्तांत येऊन मनस्वी भाषण करितात. कोणे रंगास जाईल पाहवें. सर्व दौलतेचा कारभार येथील कारभारी दबळीतच आहेत', असें नाशकाहून त्रिंबकराव पेठे माधवरावास लिहितो. 'विसाजी केशवाचें पारिपत्य करण्यास श्रीमंतीं माणसें पाठविलीं. त्यांनीं येऊन बहुत पीडा केली. गडकऱ्यांचे कबिले कित्येक धरिले. बायकापोरांस हाणमार करवून चोळणे घालविले. पोरें सराऱ्यांवर टाकिलीं. गांव लुटून जाळून उद्ध्वस्त केले. माधवरावानें विसाजीचा कैवार न घेतां कानावर हात ठेवले, हें पाहून विसाजीनें ता. २५ जून १७६४ रोजीं वैतागाचें पत्र लिहिलें. माधवरावानें स्वारींतून ता. ५-६-१७६४ रोजीं नाशकास कळविलें कीं, 'पुरंदरचा प्रकार येथील संकेतानें किमपि न जाला. कोळी बेरड स्थाइक कदीम तिसां वर्षांचे चाकर, यांस दूर करून अन्नास वर्जित केलें, यासाठीं त्यांहीं दावा धरून हें कर्म केलें. दुष्ट लोक नानाप्रकारें विकल्प आणून देतील, त्यास इलाज नाहीं. विसाजीपंत धोंडोबा आपाकडून दोन तीन वर्षें दूर आहेत. ते कोळ्याबेरडांत आमचे आज्ञेशिवाय मिळाले आहेत. दादासाहेबांचें मर्जीप्रमाणें वर्तणूक करावी, हेंच येथील मानस आहे. किल्ला ज्याचे त्याचें स्वाधीन करणें, अशा ताकिदी येथून किल्ल्यास दिल्या आहेत. वरकड कुंण्ण कल्पना कोणी मनांत आणून देतील तर इलाज नाहीं'. माधवरावानें विसाजी केशवाचा बिलकुल मुलाहिजा केला नाहीं. त्याच्या आगळिकी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

बद्दल एकदम हुकूम पाठवून त्यानें ता. २०-६-६४ रोजीं धोंडो मल्हाराचा सरंजाम जप्त करविला.

दादाचे मनांतला डाव निराळाच होता. किल्ला सर्व आपल्या ताब्यांत ठेवून मागेंपुढें पुतण्याशीं झुंजण्याचा प्रसंग आल्यास पुण्याचा कबजा राखण्यास तो उपयोगी पडावा; म्हणजे कोळ्यांचे दंग्याचा प्रकार माधवरावाचे माथीं मारून वरती आबा पुरंदऱ्यासही त्यानें फसविलें. आबा नाशकास त्याच्यापाशींच होता. 'जुने कोळी काढून आपलीं नवीं माणसें किल्ल्यावर आणून तो श्रीमंतीं घेतला, त्यामुळें नीळकंठ महादेव श्रीमंतांपासून रुसवा करून नाशकाकडून सासवडास आले. परंतु लोकांस असा भास झाला कीं, दादाचे तर्फेनें आबा पुरंदरे मुलखांत उपद्रव करणार. तृतीयेच्या दिवशीं तर फारच गडबड झाली'. पण हा दादाचा डाव सर्वस्वी फसला. खरा प्रकार लगेच लोकांत प्रगट झाला. कोळ्यांनीं नाशकास जाऊन सर्व माप दादाचे पदरांत घातलें. तेव्हां त्यांची समजूत करणें त्यास भाग पडलें. तो कोळ्यांस लिहितो. 'तुम्ही पिढी दर पिढीचे एकनिष्ठ सेवक, तुम्हांपासून खावंदांची बेमानी झालीच नाहीं. ऐसें असतां किल्ले मजकूर आबा पुरंदरे याजकडे दिल्हा असतां, त्यांनीं खावंदांचे जागां दुजाभाव कल्पून तुम्हांस इमान प्रमाण मागत होते, तेव्हां तुम्हीं पहिल्यानें न दिल्हें, म्हणोन तुम्हांस दूर केलें, दुसरे लोक चढविले, तुम्हांस बाहेर घालवूं लागले, तेव्हां कळेल त्या प्रकारें तुम्हीं जागा हस्तगत केली. यामुळें खूनखराबी कित्येक गोष्टी तुम्हांजवळून झाल्या. इतक्यावर तुमची एकनिष्ठता जाणोन तुम्हांस सर्व अन्याय माफ केले. तुमचा अर्ज, कीं किल्ला फिरोन आबा पुरंदरे यांस अगर कोणासही न द्यावा. हा अर्ज तुमचा कबूल केला, खातरजमा असो देणें. हुजूरच किल्ला ठेवून तुमचें पूर्ववत्प्रमाणें चालविलें जाईल. किल्ल्यावर सरकारचा व पुरंदऱ्यांचा पैका टका, जवाहीर, कापडचोपड व इतरांची मालमत्ता आहे. ती सर्व सरकारची आहे. मनसब्याचे कामास आली पाहिजे, म्हणून त्याची पक्की याद करून किल्ल्यावरून उतरून देणें. सर्व लोकांस खातरजमेकरितां कौल पाठविला असे'. (ता. ३०-८-१७६४). येणेंप्रमाणें कोळ्यांची समजूत काढून, व आबा पुरंदऱ्यास फशीं पाडून, किल्ल्यावरची सर्व माल-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मत्ता मात्र हस्तगत करण्याचा दादाचा विचार होता. परंतु तेंही अखेर त्यास साधलेंसें दिसत नाहीं. सरकारचा जामदारखाना व कागदपत्र दादांनीं लांबविले असल्याचा संशय माधवरावास येऊन त्यानें स्वारींतून ता. ५-२-१७६५ रोजीं नाना पुरंदऱ्यास पत्र लिहून, 'जामदारखाना हल्लीं कोठें आहे तो कळवा, व त्याची संपूर्ण याद तुम्ही आपले माहितीनें करून पाठवा', असें सांगितलें. त्यानंतर फेब्रुवारींत ता. २४ रोजीं आबा पुरंदऱ्यास माधवरावानें हुकूम पाठवून जामदारखाना सर्व पुण्यास आणविला. सन १७६५ च्या पावसाळ्यांत चुलतेपुतणे पुण्यास भेटल्यावर किल्ल्याची भानगड चालूच होती. कोळी म्हणतात, 'किल्ला नीळकंठ महादेवास न द्यावा; कोणासही न देतां हुजूर ठेवावा. हें उभयतां श्रीमंतांनीं मान्य केलें. किल्ला सरकारांतच ठेवावा, पुरंदऱ्यास देऊं नये. ऐसा निश्चय जाला'. पुरंदर किल्ल्याच्या या प्रकरणावरून या वेळच्या कौटुंबिक कलहाचें स्वरूप निदर्शनास येऊन हरएक लहान मोठ्या बाबतींत माधवरावानें चुलत्यावर आपला शह कसा बसविला हें दिसून येतें[१].

३. तोतयांचा सुळसुळाट व पाडाव (सन १७६१-१७७६).—पानपतावर अनेक प्रसिद्ध व्यक्तींचा संहार झाल्यानें तोतयेगिरीस बराच ऊत आला, आणि त्यामुळें तत्कालीन राजकारणांत अनेक अडचणी उपस्थित झाल्या. तोतयेगिरीची कपटविद्या फार जुनी असून तिचीं उदाहरणें पाश्चात्य देशांतही घडलेलीं आहेत. असे ढोंगी लोक पुढें आले म्हणजे त्यांस अंधश्रद्धेचे अडाणी लोक तेवढेच सामील होतात असें नाहीं, तर अनेक शहाणे

१. **आधार**—खं. १५. ३५२, ३५३. खं. १३. ३०, ४८, ७४; मा. रो. २. ५७५; का. सं. प. या. १८०; खं. १४. ७; खं. १२. ६९; खरे ले. ४३२, ५७६–५७८. खं. १३. ३० हें पत्र ता. २५ जून १७६४ चें विसाजी केशव सान्ये याचें आहे. याचें आडनांव सोहनी नसून सान्ये आहे, असें चांबळीचे मास्तर रा० कृष्णाजी वासुदेव पुरंदरे कळवितात. यांनीं या प्रकरणाचे कांहीं अप्रकाशित कागद दिले, त्यांतील मतलब वर दाखल केला आहे. विसाजी केशव गोपिकाबाईचे विश्वासाचा असावा. त्याचे चिथावणीनें कोळ्यांनीं दंगा केला असें दिसतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणविणारे वजनदार इसम त्यांचे भजनीं लागतात, म्हणून राजकारणांत बखेडे होतात. प्रस्तुत पानपतावर पडलेले सदाशिवराव व जनकोजी शिंदे व यशवंतराव पवार यांचे तोतये प्रगट झाले. त्यांची हकीकत येणेंप्रमाणेंः—

'जनकोजी सिंदा म्हणोन करकुंबी प्रगट होऊन त्यानें दहा बारा हजार फौजेचे ठराव केले. दोन हजार फौज जमा झाली. जनकोजीप्रमाणें खाणाखुणा त्याजलाही होत्या. मोठा भ्रम सर्वांस पडला. तदोत्तर गोपिकाबाईनीं विश्वासू माणसें पाठविलीं, त्यांस कांहीं उत्तम खूण मिळाली. भापकर, गराडे, सर लष्कर, गाढवे, जाधव, आदिकरून त्यास ओळखोन एक ताटीं बसोन जेवले. संगमाजवळ उतरविला. दुसरे दिवशीं ता. २-११-६३ रोजीं श्रीमंत माधवरावही पुण्यास येऊन संगमाजवळ राहिले. त्याचे दुसरे दिवशीं यजमान वाड्यांत दाखल झाले. संध्याकाळीं तोतयास आणून नानाच्या दिवाणखान्यांत बसविला. पांच सात भले लोक समागमें होते. नाना पुरंदरे व गोविंद शिवराम यांनीं तपास केला', तेव्हां हा 'रघुजी थोरात' असा ठराव झाला. कैद करून ठेविला. कांहीं इतर सांपडले त्यांसही अटकेंत ठेविलें. सखारामबापूचे चुलत बंधू गिरगाजीपंत तोतयाजवळ कारभार करीत होते. यावरून हा तोतया सखारामबापूनें उभा केला, 'असा माधवरावास तपास लागला. सिंद्याचे कुटुंबांतील माणसांस ह्या तोतयानें कांहीं काल मोठ्या विवंचनेंत पाडिलें होतें. तथापि हें खूळ वर्ष सहा महिन्यांहून ज्यास्त टिकलें नाहीं.

पानपतावर गारद झालेल्या यशवंतराव पवाराचा तोतयाही अशाच प्रकारें उत्पन्न होऊन त्रास देत होता. त्यास पकडून ता. ४-१२-१७७४ रोजीं रतनगड किल्ल्यावर कैदेंत ठेवण्यांत आलें. (स. मा. रो. १.२४७).

परंतु सदाशिवरावाच्या तोतयाचें बंड चांगलें पंधरा वर्षें चालू होतें. पानिपतावर विश्वासराव व सदाशिवराव पडले. पैकीं विश्वासराव मेल्याबद्दल कोणास शंका नव्हती. परंतु सदाशिवरावाचें ठिकाण लागलें नव्हतें. म्हणून कित्येक सामान्य समजुतींच्या माणसांचा तर्क असा होता, कीं सदाशिवराव जीव बचावून कोठें तरी गुप्तपणें राहिले असावे. खुद्द पार्वतीबाईची अशी समजूत असून तिनें सौभाग्यचिन्हें टाकून दिलीं नव्हतीं. पानिपतानंतर सवा महिन्यांतच जिकडे तिकडे बातमी पसरली कीं, सदाशिवराव जिवंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहेत. जिवंत असते तर ते असे लपून छपून कां राहतील, याचा कोणींच विचार केला नाहीं. अर्थात् जिकडे तिकडे पत्रें खेळूं लागलीं. कासिदांच्या जोड्या दक्षिणेंतून उत्तरेंत व उत्तरेंतून दक्षिणेंत खेपा घालूं लागल्या.

बुंदेलखंडांत छत्रपुराजवळ कनोल गांवीं सुखलाल नांवाचा एक कनोजी ब्राह्मण राहत असे. त्याच्या बापाचें नांव रामानंद, आईचें नांव अन्नपूर्णा व आजीचें मन्मथा. या सुखलालाचा भाईबंदांशीं वतनासंबंधीं तंटा लागून तो त्रासला असतां देशांतरास जाण्याच्या हेतूनें नर वर येथें आला. तेथें एका दुकानांत बसला असतां दोन तीन दक्षणी गृहस्थ त्याजवळ जमा झाले, व त्यास म्हणूं लागले, तूं अगदीं भाऊसाहेबासारखा दिसतोस. आम्ही सांगूं तसा वागशील तर तुला पेशवाई मिळवून देऊं. सुखलाल धाडशी व धूर्त होता. त्यानें एकदम ती कल्पना उचलली. त्याबरोबर आणखी लुचे लोक त्यास सामील होऊन त्याचें स्तोम माजवूं लागले. नर वर एथील शंभुपुरी गोसाव्यांचा महंत व चेले त्यास सामील झाले. ता.५ ऑगस्ट १७६१ चें वर्तमान 'भाऊसाहेब सिप्रीस आले. गणेश संभाजी जाऊन भेटले. बंदोबस्त करून उभयतां नखरास व दतियास आले. तीन हजार फौज बरोबर आहे. निश्चय समजत नाहीं. कागदीं पत्रकीं दस्तक नाहीं.हस्ताक्षर लिहीत नाहीं. कोणी मायेचा गृहस्थ जाऊन ठीक करीत नाहीं'. दोन वर्षें पावेतों हा तोतया तिकडे असाच अज्ञात राहिला. पुढें नोव्हेंबर १७६३ त त्या तोतयानें पुनः उचल घेतली. नारोशंकरचा पुतण्या विश्वासराव लक्ष्मण त्यास झाशीं प्रांतीं सामील झाला. 'खासे याचे नांवचीं पत्रें येतात. स्वतः लिहित नाहींत. चोहोंकडे बंदोबस्त होत चालला. कचेरींत थट्टा होते, कीं स्वर्गद्वार मोकळें झालें. ज्या बायकांचे पुरुष वारले असतील, त्यांनीं डोई वाढवावी. नानाप्रकारें वल्गना होतात. वरकड खुणांमध्यें अंतर किमपि नाहीं. देशीं पत्रें सौभाग्यवती बाईस गेलीं आहेत. अक्षर मात्र लिहित नाहींत. भाषण हिंदुस्थानी, दक्षणी नाहीं'. असाच एक बैरागी सन १७६१ तच पुण्यांत पर्वतीखालीं येऊन राहिला होता. तो आपणांस भाऊसाहेब म्हणे. पण खरा भाऊसाहेब असेल तर उघडपणें कां येत नाहीं. ह्याचा विचार कोणींच केला नाहीं. गणेश संभाजी व विश्वासराव लक्ष्मण वगैरे मंडळींनीं भाऊसाहेब खरे म्हणून दक्षिणेंत पत्रें पाठविलीं. 'तोंडावर जखम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आहे. श्रीत्र्यंबकेश्वरास जाऊन डोईचे केस काढावे. देशची बोली बोलूं लागले. पार्वतीबाईस पत्रें भास्करभट वझे व शिवराम दीक्षित लेले यांचीं आलीं, कीं भाऊसाहेब खरे. आम्ही समागमें आहों'. याप्रमाणें जिकडे तिकडे मोठी चळवळ उडून गेली. भाऊसाहेब प्रगट झाल्याचें वर्तमान हां हां म्हणतां चहूंकडे प्रगटलें. महालोंमहालींचे कमाविसदार येऊन भेटले. त्यांच्यापासून पैका घेऊन तोतयानें फौज चाकरीस ठेविली. ग्वाल्हेर, झांशी, भेलसा ह्या प्रांतांत हा भाऊसाहेब असल्याविषयीं शंका राहिली नाहीं. पुढें एखाद्या मोठ्या सरदाराप्रमाणें फौज, तोफा, गारदी, डेरे, राहुट्या, हत्ती, पालख्या, नौबती, निशाणें, बाजार वगैरे थाटमाट घेऊन तो दक्षिणेंत येऊं लागला. वाटेनें खर्चाकरितां जबरदस्तीनें तो पैसा वसूल करी. ह्या बातम्या सन १७६४ त पेशव्यास कर्नाटकाचे स्वारींत असतां कळल्या. रघुनाथराव कर्नाटकांत जात असतां नीरानरसिंगपुरचे मुक्कामाहून त्यानें महादजी सिंदे व महादाजी गोविंद काकडे यांस माळव्यांत पत्रें लिहून पाठविलीं, कीं, 'भाऊसाहेब बरोबर असल्यास घेऊन यावें. तोतया असेल तर पारिपत्य करावें', परंतु सिंद्यास तो तोतया वाटल्यामुळें त्यानें त्याजकडे लक्ष दिलें नाहीं. समशेर बहादुराच्या मेहुण्यानें नारायणरावास फारशी पत्र पाठविलें, त्यांत भाऊसाहेब पेशव्याचा मजकूर होता. अशीं पुष्कळांचीं पत्रें आलीं. 'भाऊसाहेबाची रीत असी यावयाची नाहीं. मागें असे प्रकार लबाड झाले. म्हणून भरंवसा पुरत नाहीं. तरी खऱ्या लटक्याचा शोध करून कळवावें', असें माधवरावानें ता. १४-१-१७६५ रोजीं मातुश्रीचा कारकून गोरे यास लिहिलें. पुढें त्या सालचे उन्हाळ्यांत पेशवे कर्नाटकांतून परत आला, त्या वेळीं तोतया फौजेसह नर्मदा व तापी उतरून खानदेशांत फिरत होता. त्याजवर पेशव्यानें फौज पाठवून त्यास पकडून घनगड किल्ल्यावर कैदेंत ठेविलें. तथापि त्याची चौकशी होऊन खऱ्या-खोट्याची शहानिशा व्हावी, असें पुष्कळांचें म्हणणें पडलें. विशेषतः पार्वती-बाईचा आग्रह फार होता. महादजीस सरदारीचीं वस्त्रें देण्यापूर्वीं जनकोजी-च्या तोतयाची सुद्धां परीक्षा करावी, असा अनेकांचा सल्ला पडल्यावरून पेशव्यानें दोघांही तोतयांस पुण्यास आणवून त्यांची चौकशी केली. 'तोतया पर्वतावरून आणिला. तो येथें आला. पर्वतीस ठेविला आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरा तोतया जनकोजी दोन चार दिवसांत येणार. चौकशी करितां लटकें ठरलें म्हणजे सोलापुरास पाठविणार. मातुश्री अनुबाईच्या घरीं आणविला आहे, चौकसी झाली'.

'नाशकाचें खूळ पुण्यास आलें. चार पांच रोज लोकांनीं पाहिलें. परंतु कोणासही ओळख पुरेना. मग सर्वांनीं इत्यर्थ केला कीं, पर्वतीस जाऊन निकाल करून टाकावा. असा करार वाड्यांत झाला. मग कार्तिक शुद्ध १ मंगळवारीं (१५-१०-६५) थोरले मुत्सद्दी व शास्त्री मिळोन पर्वतीस देवळांत जाऊन त्या गृहस्थास गोशाळेंतून आणिला. देवापुढें बसवून रामशास्त्री यांनीं बोलावला कीं, तूं भाऊ तों नव्हस. परंतु न कळे, त्यास तूं काय असेल तें खरें सांग. मग बेलभंडार त्याचे पुढें ठेविला. तेव्हां त्यानें साफ सांगितलें कीं, मी कनोजा ब्राह्मण. मग सर्वांची निशा शपथेवरून झाली. बेडी अद्यापवर तशीच आहे. लोहगडावरील गृहस्थाची फारच भानगड पडली होती, त्यास जनकोजीस आणून चौकशी केली. निकाल दोन अक्षरांचा म्हणजे 'नाहीं, जनकोजी नव्हे' असा आहे. असा निर्णय झाल्यावर माधवरावानें सुखलाल यास नगरचे किल्ल्यावर अटकेंत ठेविलें. तथापि अनूबाई व पार्वतीबाई तसेंच परशुरामभाऊ पटवर्धनांची आई, भास्कर हरि पटवर्धन, रामचंद्र गणेश कानडे, रामचंद्र नाईक परांजपे, पार्वतीबाईचे बंधु कोल्हटकर वगैरे कित्येकांची खात्री झाली नाहीं. त्यांचें मत हा भाऊसाहेब खरा असेंच होतें. यापुढें सन १७७६ पावेतों ११ वर्षें हा तोतया निरनिराळ्या ठिकाणीं कैदेंत होता. सन १७७५ त दौलताबाद किल्ला निजामास परत देण्यांत आला, तेव्हां नाना फडणिसानें तोतयास तेथून काढून प्रथम मिरज येथें व पुढें ता. २४-११-१७७५ रोजीं रत्नागिरीचे किल्ल्यावर ठेविलें. तेथें रामचंद्र नाईक हा वजनदार गृहस्थ मामलतीवर होता. त्यानें तोतयास कैदेंतून सोडवून त्याजकडून बंड करविलें, त्याची हकीकत पुढच्या काळची असली तरी ती येथेंच संपविणें इष्ट आहे. रामचंद्र नाइकानें पुण्याहून आपल्या कुटुंबांतल्या मंडळींस इशारा पाठवून, ता. १८-२-१७७६ रोजीं तोतयास कैदेंतून मुक्त केलें, आणि त्याच्या नांवची द्वाही फिरविली. त्याबरोबर त्यास हजारों अनुयायी मिळाले. फौज चाकरीस ठेवून तो कोंकण प्रांत जिंकीत चालला. विजयदुर्ग, देव-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गड, अंजनवेल, गोवळकोट हे किल्ले त्याच्या स्वाधीन झाले. धुळपानें पेशव्याचें आरमार त्याचे हवालीं केलें. पुण्यास हें वर्तमान समजतांच कारभाऱ्यांनीं त्याजवर कांहीं गार्दी व आरब एका प्रभु सरदाराच्या हाताखालीं रवाना केले, त्यांस तोतयानें फितवून आपणांकडे वळविलें. तो प्रभु सरदार व त्याचे आरब निसटून प्रतापगडच्या आश्रयास गेले. नंतर तोतयानें सुवर्णदुर्ग किल्ला हस्तगत करून तेथील अंमलदार फडके व बचाजीपंत बर्वे यांस अटकेंत ठेविलें. तोतयाच्या एका टोळीनें देवरूखचें ठाणें घेऊन आंबाघांट चढून मलकापुरांत अंमल बसविला. पुढें उत्तर कोंकणही तोतयाचें हस्तगत झालें. तिकडचे पेशव्यांचे सरदार माणकर, सुर्वे वगैरे तोतयास जाऊन भेटले. हरि भास्कर पटवर्धन, व्यंकटराव घोरपडे वगैरे कित्येक वजनदार गृहस्थ अगोदरच त्यास अनुकूळ झाले होते. मुंबईचे इंग्रज, कोल्हापुरचे छत्रपति, हैदरअली या सर्वांकडून तोतयास उत्तेजन मिळत गेलें. त्याजवळ वीस हजार फौज जमली. चार महिन्यांनीं त्यानें बोरघाट चढून राजमाची किल्ला घेतला. सिंहगडही त्याचे हातीं जाणार असा रंग दिसूं लागला. तेव्हां कारभाऱ्यांनीं भीवराव पानशे यास तोफखाना देऊन तोतयावर पाठविलें, आणि सिंदे-होळकरांस त्याची कुमक करण्यास सांगितलें. या वेळीं दादा व कारभारी यांचें युद्ध चालू असल्यामुळें पुष्कळ सरदार व लोक बेदील झालेले होते. प्रत्यक्ष दादास त्याजबद्दल संशय नव्हताच, परंतु विलग प्रसंगामुळें त्यानें तोतयाचा थोडा बहुत उपयोग करण्यास कमी केलें नाहीं. सिंद्यानें मात्र ही कामगिरी खुशीनें स्वीकारिली. होळकर मनापासून काम करीत नव्हता. महादजीनें सिंहगडाखालीं तोतयाचे पुष्कळ आरब मारले व बाकीचे उधळून लाविले. नंतर सिंदे पानशाचे मदतीस बोरघाटांत आला. त्यांनीं राजमाचीच्या पायथ्यास तोतयाचा गोठ होता त्यावर हल्ला करून दाणादाण उडविली. तेव्हां तो स्वतः दोन तीनशें लोकांनिशीं कोंकणांत गेला, त्याचे पाठीवर सिंद्याचा दिवाण बाळाराव गोविंद लगोलग चालून गेला.

इतक्यांत तोतया बेलापुरास येऊन गलबतांत बसून मुंबईस इंग्रजांच्या आश्रयास जाण्यासाठीं निघाला. राघोजी आंग्रे टपणीवर होतेच. त्यांनीं जाऊन ता. ४-११-१७७६ रोजीं तोतयाचें गलबत धरिलें, तेव्हां तो व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचे अनुयायी अर्थात्च आंग्रे यांच्या हवालीं झाले. 'माझी पुनः चौकशी झाल्याखेरीज मला शिक्षा होऊं नये' असें तोतयानें आंग्रे यांजपासून वचन घेतलें, त्याबरोबर व्यंकटराव घोरपडे व हरबा आण्णा हे होते. त्यांस आंग्रे यानें सोडून दिलें, व बाकीचे लोकांसह तोतयास घेऊन तो पुण्यास येण्यास निघाला. तों महादजी सिंदे त्यास वाटेंत मिळाला. नंतर उभयतां तोतयास घेऊन ता. २८-११-१७७६ रोजीं पुण्यास आले. नखाचे कामास कुऱ्हाड लावणें प्राप्त झाली. पुण्यास पार्वतीबाई सुद्धां सर्व संशयग्रस्तांची व तोतयाची भेट करविण्यांत आली. तोतयाची चौकशी सुरू झाली. तींत रामशास्त्री, गोपीनाथ दीक्षित, हरिपंत फडके, बाबूजी नाईक बारामतीकर वगैरे सत्तावीस पंच होते. सर्वानुमतें तोतया खोटा असें ठरल्यावर सन १७७६ च्या डिसेंबर ता. १७ रोजीं त्याची धिंड काढून शहरांत सर्व लोकांस दाखवून नंतर मेखसूनें डोचकें फोडून त्यास देहान्त शासन देण्यांत आलें. तोतयाचा संसर्ग हजारों ब्राह्मणांस झाला होता, त्यांस सरकारांतून प्रायश्चित्तें देण्यांत आलीं. जे लोक या फितुरांत होते त्यांचे सरजांम जप्त झाले. कोणास दंड व कोणास कैद याप्रमाणें शिक्षा झाल्या. तोतयाचें बंड मोडल्यावर सरकारच्या फौजेच्या टोळ्या निरनिराळ्या घाटांनीं कोकणांत उतरून त्यांनीं महिन्या दोन महिन्यांत पुनः सर्वत्र अंमल बसविला.[१] सुखनिधानास ठार मारण्यापूर्वीं पार्वतीबाईची खात्री करण्यांत आली. 'रामचंद्र नाईक कित्येकांशीं बोलोन चालोन आले होते. त्यांचीं माणसें बरोबर आणिलीं होतीं; त्यांस येथील खुलासा लिहून पाठविला. नाईक येण्यापूर्वीं बहुतांस भ्रम होता, तो आतां गेला. पार्वतीबाईस नाइकाचे स्त्रीनें निरोपी शिरोपीं खातरजमा केली होती, त्याजवरून पार्वती-

१. संदर्भ—इ. पृष्ठ १२३ व ले. ६०, ८०–८२; खं. १. २९६, २९९-३०३; जु. ऐ. गो. ३-४; भा. इ. सं. इ. वृ. १८३४ भाग १ पृष्ठ ९८-१२६; खरे ले. ३८१, ३८२, ३९७-४०१, ५४५-५७९, ७४८, ७४९; व पृष्ठ १२५०-१२५४ व २४६३ व ले. १९२४-१९३५, व पत्रव्यवहार भाग ५-६; अधिकारयोग पृष्ठ ४१-४९; नाना फ. चरित्र, तोतयाचें नाटक इत्यादि; खं. १०-३०७; खं. १२-१७८-१८१; स. मा. रो. १-२४७ व २ ले. ५९८-६३१ यांत शिक्षा, नांवें, तपशील भरपूर आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाई किंचित् डावडोल (रंजीस) तर जाहलीच; परंतु शहाणी बायको. लौकिकांत फारसें दाखविलें नाहीं. आतां नाईक पुण्यास आल्यावर भ्रांति निवारण केली. त्याजवरून सर्वांची निभ्रांत झाली'.

इंग्रज, हैदर वगैरे मराठ्यांचे प्रतिपक्षी स्वार्थाकरितां तोतयास कसे उचलून धरीत होते, हें ध्यानांत ठेवण्याजोगें आहे.

तोतयाचें खूळ एवढ्यावरच संपलें नाहीं. सदाशिवरावभाऊचा आणखी एक तोतया काशी येथें प्रगट होऊन सन १७७९-८१ पावेतों गडबड करीत होता, त्यास चेतसिंगानें चुनारगड येथें कैद करून ठेविलें. पुढें त्याची चौकशी वॉरन हेस्टिंग्सनें करून त्यास सोडून दिलें.

४. इंग्रजांची माधवरावास धास्ती.—पानिपतावर मराठ्यांचा संहार झाला असें समजून इंग्रजांनीं हळूहळू किनाऱ्याचे बाजूनें महाराष्ट्रांत आपली सत्ता वाढविण्याचा उद्योग चालविला. सन १७६३ त फ्रेंच सत्तेचा पाडाव होऊन मद्रास किनाऱ्यावर इंग्रजांचें वर्चस्व कायम झालें, आणि बंगाल प्रांताची दिवाणी ता. २०-८-१७६५ रोजीं क्लाइव्हनें बादशहापासून संपादन केली. इकडे राक्षसभुवन येथें निजामाचा पाडाव होऊन सन १७६३ चे अखेरीस महाराष्ट्रांत माधवरावाचा जम बसला, आणि अल्पावधींत त्याचें तेज चहूंकडे फाकूं लागलें, त्यामुळें इंग्रजांचें मन विशेषतः मुंबईच्या बाजूस अस्वस्थ होऊं लागलें. माधवरावानेंही प्रसंगानुसार त्यांजवर आपली दहशत बसविण्यास कमी केलें नाहीं. 'मराठ्यांच्या वाढत्या सत्तेबद्दल आम्हांस मोठा खेद वाटत आहे',[1] असा खुद्द मुंबईच्या कौन्सिलचा अभिप्राय वाचून त्यांच्या मनाची कल्पना करितां येते. 'मुंबईकर: इंग्रजानें लढाईचें मातबर सामान मालवणास आणून बहुत मारामारी केली; ता. २७-१-१७६५ रोजीं किल्ला हस्तगत केला. श्यामलाकडील माणूस कुमकेस होतें'. हा किल्ला कोल्हापुरकर जिजाबाईचे ताब्यांतला असून त्याचें नांव या वेळीं इंग्रजांनीं फोर्ट ऑगस्टस् असें ठेविलें. 'इंग्रज फारच शेफारला. अभिमान फार झाला. श्रीमंतांनीं कोंकणांत त्याज-

1. 'The growing power of the Marathas is a subject much to be lamented'. Forrest. P. 141.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वर फौजा रवाना केल्या. वाढलें मोडतच आहे. हें असाध्य स्थळ मातुश्रीनें गमावलें'. किल्ला हातचा गेल्याबद्दल जिजाबाईस फार वाईट वाटलें. याच वेळीं इंग्रजांनीं वाडीच्या सांवतावर चढाई केली. 'सांवताजवळ बोली घातली कीं, मालवणापासून रांगण्यापावेतों मुलूख द्यावा. गलबतें सारीं द्यावीं म्हणजे तह होईल'. तें सांवतांनीं ऐकिलें नाहीं. म्हणून त्यांचा रेडाचा किल्ला यशवंतगड इंग्रजांनीं काबीज केला. सिंधुदुर्ग गेल्याची चिंता वाटत असतां इंग्रजांनीं यशवंतगडावर तोफांची मारगिरी अतिशय करून तोही हस्तगत केला, हें निवेदन झाल्यावरून बहुतच आयासास कारण झालें; आणि जिजाबाई किल्ले परत घेण्याच्या उद्योगास लागली. "कोंवळा मोड आहे, तों मोडल्यानें उत्तम, भारी जाहलेनें सर्वांचें वाईट", असें जिजाबाई तारीख १२-३-१७६५ रोजीं लिहिते. पश्चिम किनाऱ्यावर या उलाढाली चालू असतां, पेशवा कर्नाटकांत हैदरअलीशीं झुंजत होता, म्हणून इंग्रजांचा प्रतिकार करण्याची त्यास या वेळीं विशेष ताकद नव्हती. सबब जिजाबाईनें इंग्रजांस साडे सात लक्ष दंड भरून मालवणचा किल्ला परत घेतला. ता. १२-३-१७६६ रोजीं इंग्रजांनीं जिजाबाईशीं स्वतंत्र तह करून तिचे हातपाय बरेचसे बांधून घेतले, आणि मालवणास वखार घालण्याची परवानगी मिळविली. मराठमंडळ फोडण्याचा त्यांचा हा पहिला प्रयत्न होय. याच वेळीं व यानंतर नागपुरकर भोसले व रघुनाथराव दादा यांस मराठमंडळांतून फोडण्याचे प्रयत्न इंग्रजांनीं अतिशय केले; पण अनेक कारणांमुळें ते या वेळीं तरी सफळ झाले नाहींत.

माधवरावास मात्र इंग्रजांच्या चढत्या पायरीची बरोबर कल्पना होती; म्हणून आरमार, तोफा, दारूगोळा, किल्ले, इत्यादि साहित्य नवीन बनविण्याकडे त्यानें उत्तरोत्तर विशेष लक्ष दिलें. पूर्वी तोफा इंग्रजांकडून मुंबईहून विकत घेण्याचा परिपाठ होता. 'पंधरा तोफांचें दस्तक घेतलें, ज्या मिळतील व सोयीस येतील त्या घेऊं'. अशा रीतीनें महाप्रयासानें तोफा आणिल्या. त्या शेवटीं निरुपयोगी अशा आढळल्या. तेव्हां हें परावलंबन नाहींसें करण्याकरितां पेशव्यानें पुण्याजवळच तोफा ओतण्याचे कारखाने काढिले. बाणांचा कारखाना नाशकास ता. १४-११-१७६६ रोजीं घातला. ओतूर येथें त्याच सुमारास गोळे ओतण्याचा कारखाना सुरू केला, त्यापुढचे वर्षी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बागलकोटाजवळ दारूचा कारखाना घातला; आणि नव्या तोफा ओतण्याचा मोठा कारखाना पुण्यास घातला. गाड्यांची म्हणजे कवाइती फौज तयार करण्याची योजना, सरंजामी सरदारांची नवीन रचना, तसेंच आरमाराची व किल्ल्यांची व्यवस्था, ह्या बाबतींत माधवरावाचें लक्ष किती होतें हें त्याच्या रोजनिशींतील मुक्कामांवरून निदर्शनास येतें. विजयदुर्गचे धुळप, वाडीचे सावंत, गोव्याचे पोर्तुगीज, ह्या सर्वांशीं योग्य कारस्थानें करून इंग्रजांचा बंदोबस्त करण्याचे माधवरावानें कसून प्रयत्न केले. परंतु अकालीं मृत्युमुळें त्याचा हा उद्योग फळास आला नाहीं. इंग्रजांशीं त्याच्या तक्रारी झाल्या, त्याचें दिग्दर्शन मा. रो. १ ले. २५४–२६४ यांत पाहण्याजोगें आहे. शिवाय इंग्रजांनीं आपले वकील माधवरावाकडे पाठविले त्यांची हकीकत स्वतंत्रच दिली आहे. बादशहास दिल्लीस नेते समयीं इंग्रजांचा व माधवरावांचा कसा खटका उडाला त्याचें वर्णन दिल्ली प्रकरणीं केलेलें लक्षांत ठेविलें पाहिजे. मराठी फौजांनीं बादशहास अलाहबादेहून दिल्लीस नेऊन तख्तावर बसविलें, त्याबद्दल माधवरावास संतोष वाटला, पण इंग्रजांसंबंधानें त्या प्रसंगीं माधवरावाचे विचार त्याच्या एका पत्रांत नमूद आहेत ते असेः— 'इंग्रजां (चें) पातशहाजवळ प्राबल्य. पातशहास दिल्लीस स्थापावें हा हेत पांच सात वर्षें इंग्रजांनीं केला आहे. ते पातशहास दिल्लीस आणते तर त्यांचें सामर्थ्य नव्हतें असें नाहीं, आणितेच; परंतु ते पाण्यांतील पावप्यादे, इतकी हिंमत त्यांची नाहीं. या अर्थें पाहतां पातशहांनीं इंग्रजांचा प्रकार तादृश मानिला तोच वृद्धिंगत करावा, इंग्रजांचा प्रवेश दिल्लींत होऊं देऊं नये. दिल्लींत प्रवेश जालिया उखळणार नाहींत. टोपीकरांत इंग्रजांनीं डोई उचलली आहे. बंगाल व कलकत्ता व मच्छलिबंदर वगैरे बंदरें सुरत पावेतों आपले जमींत आणिलीं. कर्नाटक पायनघाट कुल इंग्रजांनीं महंमद अल्लीखानांस आटोपिला. सुरत तों मुंबईप्रमाणें इंग्रजांनीं आपली केली. दिल्लींत प्रवेश त्यांचा जाल्यास पातशहा जेरदस्त त्याचा होईल, फार अवघड पडेल. इंग्रज चढीं लागला आहे. त्याचें सुख सुजाद्दौला आदिकरून कोणास नाहीं. तरी अमीर सर्व आपले करून, सरदारांची फूट मोडून, एक होऊन इंग्रेज माघारे जात तें करावें. इंग्रेजांनीं बंगाला पातशहापासून लिहून घेतला, तोही तजविजीनें सुटे तें पुढें केल्यास होईल. तूर्त त्यांचा प्रवेश दिल्लींत न होतां, पातशहास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहून माघारे जात इतकेंच करावें. पातशहा आपला एहसानमंद होऊन, बंदोबस्त आपले हातून करून घेई,ऐशी कारस्ती जी होईल ती करावीच करावी. मनसुबेबाजपणाचा प्रकार हरहुन्नरें, एकास बैसवावें, एकास ऊठ म्हणावें, आपलें वजन पुर्तें त्यांजवर वाढावें, ऐसा समय आहे. यांत जो फैल मजबुदीनें कर्तव्य तो करणें', (ता.२२-६-१७७२). पुढील कारकिर्दींत हैदर व टिपू यांजवर ज्या स्वाऱ्या मराठ्यांनीं केल्या त्यांत त्यांना अपयश असें सहसा आलेंच नाहीं, ही गोष्ट लक्षांत घेतली म्हणजे माधवराव अल्पायुषी झाला नसता, तर पाश्चात्य युद्धपद्धतीचा योग्य अवलंब करून इंग्रजांस त्यानें आळा बसविला असता, असें निःसंशय वाटूं लागतें. इंग्रजांच्या उद्योगाचें इद्गत समजून घेणें असल्यास, पर्शियन कॅलेंडर्समधला पत्रव्यवहार चांगला उपयोगी पडेल.[1]

५. मि० मॉस्टिनची पेशव्यांकडे वकिली.—माधवरावाच्या कारभारानें मराठ्यांची सत्ता जोरांत आलेली पाहून इंग्रजांना वैषम्य वाटूं लागलें. निजाम व हैदर हे सुद्धां इंग्रजांशीं द्वेषभाव करूं लागले; तेव्हां साधल्यास मराठ्यांची मदत हैदरावर चढाई करण्यास मिळवावी अशा उद्देशानें, सन १७६७ च्या अखेरीस मुंबईकर इंग्रजांनीं आपला वकील टॉमस मॉस्टिन यास पुण्यास पेशव्याचे भेटीस पाठविलें, आणि त्याबरोबरच दुसरा वकील चार्लस ब्रोम नांवाचा रघुनाथरावाचे भेटीसाठीं आला. ही मंडळी ता. १९-११-१७६७ रोजीं मुंबईहून निघून ता. २९ रोजीं पुण्यास पोंचली. तेथून पुढें मि० ब्रोमनें त्रिंबकास जाऊन तेथें डिसेंबरच्या अखेरीस ८-४ दिवस दादाची भेट घेतली; आणि परत पुण्यास तो २२ जानेवारी रोजीं आला. पुण्याहून हे वकील परत २७ फेब्रुवारी १७६८ रोजीं निघून ता. ३ मार्च रोजीं मुंबईस पोंचले. या वकिलातीची हकीकत खालीं देण्यांत येत आहे. (फॉरेस्ट, पृष्ठ १४१-१७६).

---

१. आधार,—खरे ले. ५५०, ५५४, ५५७, ५६३, ६०४, ६१७; मा. रो. ३४१, ३५७, ३६६, ३६८, ३७०,– ३७४, ३८३,–४०८; ऐ. टि. २-१९, ५०, ४.६; कै. या. पृष्ठ १५९; पिंगुळकरकृत सा. इ. ले. ८४-८६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुरुवार, तारीख ३ डिसेंबर १७६८ रोजीं या वकिलांची पुण्यास पेशव्यांशीं पहिली भेट झाली, तेव्हांपासून दोन तीन महिनेपावेतों आठचार दिवसांनीं अशा भेटी होतच गेल्या. त्यांपैकीं बहुतेक औपचारिक असून खऱ्या मतलबाच्या अशा थोड्याच झाल्या. कारण पेशव्याच्या कारभारांतील अंतस्थिति व त्यांचे इंग्रजांसंबंधीं विचार शक्य तितके काढून घेण्यासाठींच हे वकील पुण्यास आले होते. हा त्यांचा उद्देश पेशव्याच्या दरबारानें तेव्हांच ताडला, आणि आपल्या व्यवहारांची फारशी दाद त्यांस लागूं दिली नाहीं. हैदरावरील गेल्या स्वारींत पेशव्यानें बिदनूर संस्थान जिंकून तेथील राणीनें दत्तक घेतलेला राजपुत्र कैद करून पुण्यास आणिला होता, त्या राजपुत्राचीही भेट इंग्रज वकिलानें घेतली. त्यास आपल्या हाताशीं घालून बेदनूर हस्तगत करून हैदरावर चढाई करण्याचा इंग्रजांचा विचार होता. ह्या वकिलांशीं पेशव्याचें सर्व बोलणें गोविंद शिवराम व रामाजीपंत चिटणीस यांचेमार्फत होत होतें. शिवाय सखारामबापू, मोरोबा फडणीस, हकीम महंमदअली, हेही भेटीचे प्रसंगीं हजर असत. सुरतेपासून विजयदुर्गपर्यंतचे समुद्रकांठचे सर्व किल्ले तपासून पाहण्याचा माधवरावाचा विचार असल्याची बातमी मॉस्टिननें मुंबईस इंग्रजांस कळविली. तो लिहितो. 'पेशव्यांचे दरबारची मंडळी मला कांहीं एक थांग पत्ता लागूं देत नाहींत, उलट माझ्याकडूनच शक्य तितकी माहिती काढून घेतात. जंजिऱ्याचे सीदी व हैदरअली यांचे बाबतींत माझ्याशीं गोष्ट काढण्याचा त्यांचा विचार असावा, पण ते होऊन कोणताही उपक्रम करीत नाहींत. उत्तरेंत जाट, दक्षिणेंत हैदरअली व पुण्यांत राघोबा, असीं तीन चित्तविक्षेपाचीं दडपणें हल्लीं पेशव्यावर आहेत. ता. १ जानेवारी १७६८ रोजीं गोपाळ चक्रधर नांवाचा राघोबाचा वकील मला येथें येऊन भेटला. आमच्याशीं बळकट दोस्तीचा करार ठरवून पुतण्याचा पाडाव करण्याचा दादाचा विचार आहे. ता. ४-१ रोजीं महादजी सिंदे हिंदुस्थानांतून पुण्यास आला. संगमापावेतों सामोरे जाऊन पेशव्यानें त्याचा सत्कार केला. तुळाजी आंगऱ्याचे मुलांस आम्ही आपले. जवळ मुंबईस आश्रय दिला, याबद्दल पेशव्यास फार राग आहे. ता. ५-१ रोजीं पेशव्यानें बोलाविल्यावरून मी त्यांजकडे भोजनास गेलों होतों. ता. १५-१ रोजीं महादजी सिंदे यांस पोषाख देऊन त्याची रवानगी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हिंदुस्थानांत करण्यांत आली. अर्काटचा नबाब महंमदअली व निजाम यांचा कायम दोस्तीचा तह झाल्याची बातमी ता. १०-१ रोजीं आम्हांस पुण्यास कळली. बेदनूर व सोंधें हस्तगत करण्याचा इंग्रजाचा विचार मीं कळविल्यावर माधवरावानें त्यासंबंधाचा साफीनें निषेध केला'. असा ह्या वकिलाचा आशयार्थ नमूद आहे. त्यानंतर उभयपक्षीं पुढील बोलणें करण्याकरितां रामाजी चिटणीस यास माधवरावानें मुंबईस पाठविण्याचें ठरविलें, आणि वकिलास घोडा व शिरपाव देऊन ता. २८-१-१७६८ रोजीं पुण्याहून विदा केलें.

सन १७६३ त सप्तवार्षिक युद्धानें जगाच्या राजकीय उलाढालींत इंग्रजांस प्राधान्य प्राप्त झालें, तें बहुधा अद्यदिवसपर्यंत चालू आहे. या प्राधान्याचा उपयोग इंग्रजांनीं हिंदुस्थानांत आपली राज्यवृद्धि करण्याकडे कसकसा केला, हें इंग्रजी राजकरणांतलें एक महत्त्वाचें आख्यान आहे. या आख्यानाची निर्मिति अस्सल कागदांच्या आधारें अद्यापि मराठींत झालेली नाहीं. माधवराव पेशव्याचे वेळेपासून मराठी इतिहासांत या बाबतीस प्राधान्य मिळूं लागलें. त्यांजवर माधवरावाचें चांगलें लक्ष होतें, ही गोष्ट पर्शियन कॅलेंडर्सच्या तीन पुस्तकांमधील पत्रांवरून व्यक्त होते. या कॅलेंडर्सचे आणखी पुढील भाग छापण्यास तयार झालेले आहेत असें कळतें. छापी भागांत नागपुरकर भोसले व कलकत्तेकर इंग्रज यांचाच मुख्यतः प्रपंच आहे. त्यांत दिसून येणारी जानोजी भोसल्याची पोकळ धडपड पाहून त्याची कींव वाटूं लागते. खरें म्हटलें तर जानोजी भोसल्याचे व्यवहार पुण्याच्या दरबाराशीं झाले, त्यापेक्षां खुद्द नागपुराकडे व बंगालबहार-ओरिसासंबंधानें पूर्वेच्या बाजूस मुर्शिदाबादच्या सुभ्यांकडे व इंग्रजांकडे विशेष झाले. याचें प्रत्यंतर कळून येण्यासाठीं पर्शियन पत्रव्यवहाराचे तीनही भाग काळजीपूर्वक वाचावे. त्यांत सन १७५९ पासून १७७२ पर्यंतचे कागद आहेत. बंगाल वगैरे प्रांतांची चौथाई रघूजीच्या वेळेपासून भोसल्यांस मिळत होती. पुढें प्लासीच्या लढाईनंतर इंग्रजांकडे स्वामित्व आलें तेंव्हांपासून चौथाईचा भरणा बंद पडला. त्यावरून या चौथाईच्या देण्याबद्दल जानूजीनें इंग्रजांकडे पत्रांची व वकिलांची सारखी झोड उठविली होती. इंग्रजांनीं मात्र त्याबद्दल अखेरपर्यंत टाळाटाळ केली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जानोजीनें स्नेहभावानें, रागानें, दरडावणीनें शक्य तितकें लिहून इंग्रजांस आळविण्यांत कमी केलें नाहीं. शिवभट साठे यासंबंधानें जोर दाखवी, म्हणून त्यास इंग्रजांनीं हलकेच जानोजीच्या मार्फत ओरिसाचे सुभेगिरीवरून काढिलें; आणि त्यास लिहिलें कीं, 'तुम्ही चौथाई मागतां व दंगा करितां हें कामाचें नाहीं. अशानें तुमच्यावर जानोजीचा राग होईल. चौथाईशीं तुमचा संबंध नाहीं. जानूजी व नबाब पाहून घेतील'. अशा अनेक सबबी इंग्रजांनीं लिहिलेल्या वाचण्यालायक आहेत.

मीर झैनुल-अबिद्दीन नांवाचा इंग्रजांचा वकील भोसल्यांकडे होता. तसेंच उदेपुरी गोसावी नांवाचा जानूजीचा वकील कलकत्त्यास होता. मद्रास व कलकत्ता हीं पूर्व किनाऱ्यावरील नाक्याचीं ठिकाणें हस्तगत केल्यावर, आपल्या अंमलाची रेषा सरळ करण्याची बुद्धि इंग्रजांस होऊन, उत्तरसरकार व ओरिसा हे दोन प्रांत कबजांत घेण्याची त्यांनीं धडपड चालविली. पश्चिम किनाऱ्यावरही त्यांचें लक्ष कमी होतें असें नाहीं. तिकडचा मालवण किल्ला त्यांनीं घेतलाच; पण माधवरावाचे हयातींत पश्चिम किनाऱ्यावर जास्त झडप घालण्यास त्यांस छाती झाली नाहीं. एखाद्या मोठ्या भक्कम खडकांतील भेगांत पाणी झिरपून त्याचे तुकडे हळूहळू अलग होत जातात, त्याप्रमाणें इंग्रजांनीं दहा पंधरा वर्षांच्या उद्योगांत एतद्देशीय सत्ताधीशांशीं व्यवहार करून त्यांस असे कांहीं अलग व असहाय केलें कीं, बादशहा, वजीर, निजाम, बंगालचे नबाब, नागपुरकर भोसले वगैरे लहान मोठी मंडळी एकमेकांशीं बाहेरून सख्य दाखवून आंतून एकमेकांच्या माना कापीत. एकाचीं पत्रें दुसऱ्यास दाखवीत, अंतस्थ बेतांच्या बातम्या पुरवीत आणि इंग्रज हे आपले संरक्षक आहेत, मित्र आहेत असें मानीत. सुजाउद्दौल्यास माधवराव पेशव्याचीं पत्रें गेलीं, तीं त्यानें बजिन्नस इंग्रजांचे हातांत दिलीं. येणेंप्रमाणें सर्वत्र फसवाफसवीचा बाजार कसा माजला होता हें पर्शियन पत्रांवरून चांगलें कळून येतें. त्यांतल्या त्यांत माधवराव पेशव्याचा व त्याच्या हुकमतींतील सरदारांचा व्यवहार सन्मान्य, प्रामाणिक व चोख दिसतो.

६. **उदयेच्छु महादजी सिंदे.**—याचा जन्म सन १७२७ चे सुमारचा आहे. म्हणजे अहल्याबाई होळकर व महादजी जवळ जवळ समवयस्क होत. पानिपतावरून परतल्यावर तो कांहीं काळ ग्वाल्हेरकडे आपला जम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बसवून होता. त्याचा पुतण्या तुकोजीचा मुलगा केदारजी हाही त्याजबरोबर असे. पुण्यास दादा–माधवरावांचें भांडण प्रथम जोरांत चालू होतें, तोंपर्यंत सिंद्यांचे सरदारीचा निकाल लागला नाहीं. परंतु माधवरावाचें लक्ष महादजी-कडे असून राणोजीच्या वंशानें जी राष्ट्रसेवा केली तिचा मोबदला म्हणून महादजीसच सरदारी देणें योग्य होय असा त्याचा मूळपासून निश्चय होता. राक्षसभुवनाचे पूर्वी जानोजी भोसले जेव्हां निजामास मिळाला, तेव्हां वऱ्हाडाकडील त्याचे मुलखावर स्वारी करण्याविषयीं माधवरावानें महादजी-स कळविलें. त्याबरोबर महादजी अत्यंत त्वरेनें धावून त्या कामगिरीस आला; होळकरासारखा वयादा सांगत बसला नाहीं. महादजी चालून आल्यामुळेंच जानोजी निजामास सोडून पेशव्याकडे आला. माधवरावाचे तंत्रानें वागल्यामुळें महादजीवर दादाची सदैव गैरमर्जी होती, आणि त्या-मुळेंच सरदारी एकदम त्याचे नांवानें झाली नाहीं.

राक्षसभुवनानंतर गंगेच्या कांठीं महादजी व माधवराव यांच्या भेटी झाल्या. त्याच वेळीं जनकोजी सिंद्याचा तोतया उत्पन्न होऊन कांहीं वेळ घोटाळा उत्पन्न झाला. पुढें नारो शंकरानें प्रयत्न करून सिंद्याची सरदारी ता. २५-११-१७६३ रोजीं केदारजीचे नांवें ठरवून आपण त्याची दिवाण-गिरी पत्करिली, आणि कर्ज काढून नजराणा व दरबार खर्च करून कांहीं व्यवस्था लाविली. त्या वेळीं करारजाब झाल्याचा कागद १५-१२-१७६३ चा आहे. नंतर माधवराव निघून कर्नाटकचे स्वारीस गेला.

ह्या सिंद्यांचेच घराण्यांतील एक शूर पुरुष मानाजी नांवाचा नाना-साहेबाचे वेळेपासून प्रसिद्ध होता. त्यास मानाजी फाकडे म्हणत. त्यासच सिंद्याची सरदारी देण्याचा दादानें निश्चय केला. सन १७६४ त माधवराव पेशवे कर्नाटकस्वारींत असतां ता. १० जुलई रोजीं दादानें तीन लक्ष रुपये नजराणा घेण्याचा करार करून सिंद्याची सरदारी मानाजीचे नांवें करून दिली; व त्याजबद्दल बहुमान पोषाख पुढें २५ आक्टोबर रोजीं दिला. यांत दादाचा हेतु आपल्या पक्षास सिंदे घराण्याचें नेहमीं पाठबळ असावें, असा होता. मानाजी बहुधा माधवरावाचे विरुद्ध वागत असे. पुढें बारभाईच्या युद्धांत दादाचा एक मुख्य साह्यकर्ता हा मानाजीच होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मानाजीस सरदारी मिळाली ही गोष्ट अर्थात् महादजीस रुचली नाहीं, तेव्हां तो बंडावा करून लगेच उत्तरेंत निघून गेला. त्यास रस्त्यांत पकडावा म्हणून दादानें होळकराचा सरदार देवजी बयाजी यास ता. १५-७-१७६४ रोजीं हुकूम पाठविला. परंतु देवजीस सातपुड्याजवळ चुकवून महादजी निघून पुढें चालता झाला. इकडे महादजीनें आपली खटपट माधवरावाकडेही चालविली होतीच. दादानें मानाजीस वस्त्रें दिलीं, त्यानंतर एक महिन्यानें माधवरावाकडून महादजीनें सरदारीचीं वस्त्रें घेतलीं.. 'महादजीस पेशव्यांनीं सरदारी सांगोन हिंदुस्थानांत पाठविलें. येथें पुण्यांत जनकोजी सिंदे यांचे आईनें दुसरा मुलगा मानाजी सिंदे दत्तक घेऊन त्यास दादाकडून सरदारीचीं वस्त्रें देवविलीं'. असें वर्तमान ता. ५-८-१७६४ चें आहे.

महादजीच्या संबंधानें ही जी चुलते पुतण्यांत तफावत होती, त्यापेक्षां जास्त चुरस निरनिराळ्या कारभाऱ्यांत होती. मुख्य सरदारी कोणीं करावी आणि त्याचा कारभारी किंवा मुतालिक कोण नेमावा, यासंबंधानें मोठी चढाओढ चालली. केदारजी व महादजी यांनीं दादाचा कारभारी चिंतो विठ्ठल रायरीकर यास पंचवीस हजार रुपये पोंचविले तेव्हां प्रथम त्यांची दाद लागली. सरदारीच्या घालमेलींत या कारभाऱ्यांचें दैव उगवत असे. सिंद्यांचे असे अनेक कागद पाहण्याजोगे आहेत. हिंदुस्तानांत जातांना महादजीच्या बरोबर महादेव गोविंद काकडे नांवाचा दादाचे प्रीतींतला एक श्रीमान गृहस्थ, व चिंतो विठ्ठलाचा बंधु मोरो विठ्ठल यांस दादानें दिलें होतें. हें नारो शंकरास खपलें नाहीं. त्यांच्या सल्ल्यानें महादजीनें वर्ष सवावर्ष कसा-बसा मामलतीचा निकाल काढिला, परंतु त्यांजमध्यें लवकरच बेबनाव होऊन, महादजी व महादेव गोविंद हे दोघे निराळे फुटून राहिले. पुढें त्यास धरण्याच्या हेतूनें नारो शंकराचे सूचनेवरून संधि पांहून सन १७६५त महादजीचे सरदार राघोराम, राघो मल्हार व बाजी नरसिंह यांनीं छापा घातला. 'लढाई होऊन महादजी गोविंदास आठ जखमा लागल्या. तीन दिवसांनीं मृत्यु पावले. बायको सहगमन गेली. याबरून यजमान (दादा) माधवराव सिंद्यावर रागें भरले. मोरो विठ्ठलास सिंद्याचे बाईनें हाकून दिलें'. ह्या वेळीं महादजीची अगदीं विपन्नदशा होती. घरांत मातुश्रींचीं वगैरे भांडणें असून त्यांस भक्षावयास व राहण्यास जागा नव्हती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७६६-६७ त दादानें उत्तरेंत स्वारी केली त्या वेळीं महादजीशीं त्याचा पुष्कळ बेबनाव झाला. महादजी विरुद्ध वागला म्हणून गोहदचे वेढ्यांत आपणास यावें तसें यश आलें नाहीं, असें दादास वाटे. वास्तविक प्रकार पाहिला तर, महादजी होता म्हणूनच दादाची बाजू इतकी तरी निभावली. चुलत्याचे रोषानें महादजीचा नाश होणार असें माधवरावास कळतांच, त्यानें नारो शंकर व विंचुरकर यांस पत्रें लिहून कळविलें, कीं 'आजपर्यंत सिंद्यांचे सर्व पुरुष आपले कार्याकरितां बळी पडले. फक्त महादजी एवढा एकटा उरला आहे. तो होतकरू व स्वामिभक्त आहे. सबब त्याचा बचाव हरतऱ्हेनें करावा'. दादानें नारो शंकराकडील सिंद्याची दिवाणगिरी काढून फडणिसीचे काम मोरो विठ्ठल रायरीकरास दिलें. नारो शंकराचीं या वेळचीं पत्रें वाचण्यालायक आहेत. पुढें होळकरांचा कारभारी गंगोबा तात्या चंद्रचूड सिंद्याचे सरदारींत पेशव्याजवळ ढवळाढवळ करूं लागला. कांहीं दिवस पेशव्यानें गंगोबास सिंद्याची मुतालकी देऊन दिवाणगिरी बाजी नरसिंह यास दिली. माधवरावाच्या कडक शिस्तीचा जोरही महादजीस पुष्कळदां सहन करावा लागे. केदारजी व महादजी सिंदे आणि घरांतील बायका (१) जयाप्पाची संतूबाई, (२) जोत्याजीची सगुणाबाई, (२) दत्ताजीची भागीरथीबाई, (४) महादजीची आई चिमाबाई आणि (५) तुळसाबाई अथवा तुळजाबाई (बहुधा केदारजीची बायको) इत्यादिकांच्या तक्रारी, पेशव्याकडे अव्याहत चालू होत्या. त्यांच्या निकालाचे कागद अनेक उपलब्ध आहेत. केदारजी बहुधा सन १७६७ त मृत्यु पावला, पश्चात् त्याचे बायकोस पेशव्यांनीं लोहगडावर अटकेंत ठेविलें होतें. पुढें सन १७६७ चे अखेरीस दादासाहेबांशीं माधवरावाचा सलूख झाल्यानंतर माधवरावानें महादजीचे नांवें ता. १८-१-१७६८ रोजीं सरदारीचीं वस्त्रें करून दिलीं, तेव्हां घरांतील तंटा मिटला. या प्रसंगीं सरदारांच्या प्रदेशाची वांटणी व व्यवस्था माधवरावानें कसोशीनें ठरवून दिली, ती तह करार मदार, पृष्ठ १५२ वर पाहण्यालायक आहे. सन १७६८ पासून महादजीस मुखत्यारीनें वागण्याची स्वतंत्रता मिळाली. ता. ३०-११-१७६८ रोजीं पेशव्याचें कर्ज ५० लाख वारण्याची जिमा महादजीनें घेतली होती, आणि बहुधा तें वचन माधवरावाचे मृत्यूपूर्वीं त्यानें पुरें केलें असावें. सन १७६९ त भोसल्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरील स्वारींत महादजीचें साहाय्य पेशव्यास पूर्ण होतें; आणि त्यानंतर उत्तरेंत फौजा गेल्या तेव्हां तर त्यानें प्रथम उदेपुरावर स्वारी करून खंडण्या वसूल करून पैसा मिळविला, म्हणूनच पुढील स्वारीचा खर्च भागला. महादजीची बायको गंगाबाई म्हणून होती, तिला महादजी उत्तरेंत असतां देवाज्ञा झाली. बादशहास दिल्लीस आणून सिंहासनावर बसविण्याची कामगिरी महादजीनें पुरी केली, तिचें वर्णन त्या भागांत देण्यांत येईल.[1]

७. मानाजी फांकडे.—महादजी सिंद्याचा प्रतिपक्षी व उत्तर पेशवाईतील प्रसिद्ध पुरुष मानाजी सिंदे फांकडे याची हकीकत येथेंच सांगणें जरूर आहे. हा शूर परंतु उद्दाम वृत्तीचा सरदार रघुनाथरावाचा पक्षपाती असून कोणाचेही हुकमतींत न वागतां लहरीप्रमाणें चालणारा होता. सिंद्याचे दौलतीवर त्याची नेमणूक कांहीं दिवस झाली, परंतु राणोजीच्या वंशाशीं त्याचा कौटुंबिक संबंध निर्दिष्ट केलेला आढळत नाहीं. त्याचें एकंदर चरित्र मोठें मनोवेधक व साहसपूर्ण असलें पाहिजे, परंतु त्याची सुसंगत माहिती मिळत नाहीं. नाना फडणिसानें व महादजीनें त्यास कसेंबसें धाकांत ठेविलें, परंतु सवाई माधवरावाचे पश्चात् त्यानें दौलतराव शिंद्याजवळ प्रमुखपणानें वागून बाजीरावास साह्य केलें. मराठशाहींतील तीन फाकड्यांपैकीं तो एक होय. कोन्हेर त्रिंबक एकबोटे व कॅ. स्टुअर्ट हे दुसरे दोघे फांकडे. बारभाईशीं लढण्यांत रघुनाथरावाच्या पक्षास अखेरपर्यंत चिकटून राहणाऱ्या थोड्या इसमांपैकीं मानाजी फांकडे हा एक होता. सन १७७६ त पुरंदराच तह कायम होऊन दादाचे पाठीवरील मराठी फौजा परत आल्या, तेव्हां मानाजी फांकडे सुद्धां बारभाईकडे चाकरीस आला. त्या वेळीं त्यानें खालील बाणेदार पत्र हरिपंत फडक्यास लिहिलें. 'इंग्रजांचे विचारें तह ठरला. श्रीमंत मुंबईस जाणार. फौज झाडून देशीं यावी येविशीं आपणास कळलें. त्यास

१. **आधार.**—सरदारीच्या भानगडीचे कागद मुख्यतः खं. १३ यांत आहेत. तह करार मदार पृष्ठ १५२; मा. रो. १. १५९, १६०, १६३, १६९, १७८, १८२–८६, व १९४; खं. १२. ८२, ८५ १८८; खरे ले. ५७५, ६३३; नातूकृत म. शि. चरित्र; पे. द. पृष्ठ १९६–२००.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपला कोणी भला माणूस येथें आपलें पत्र घेऊन आलियास आम्ही फौजेनिशीं येऊन आपले हातीं चाकरीचा योग घडलिया सेवा करूं. न घडलिया घरास जाऊं. आम्हांकडे वरकडांसारखी आंत बाहेर गोष्ट नाहीं. ज्या कमानेस तीर तेथें लागेल, दुसरें आम्हांपासून घडणार नाहीं. ज्यापाशीं राहूं त्याचा शेवट याच रीतीनें लावूं. पुरवेल त्यानें आम्हांस पदरीं बाळगावें. हें न घडल्यास ईश्वरसत्ता. या पत्राचें अक्षरशः मनन करून मर्जीस गोष्ट आलिया मान्य करावी. लिहिलेप्रमाणें पत्र आलियास देशीं येण्याची सोय घडवूं. नाहीं तर ईश्वरइच्छा प्रमाण. संक्षेपें विनंति लिहिली असे. कृपा करणार आपण आहेत. बहुत काय लिहिणें'. (खरे ले. १८३१--एप्रिल सन १७७६). यावरून मानाजीची समजूत होऊन तो पूर्ववत् नोकरींत आला. सवाई माधवराव लहान असतां त्याचे भेटीस मानाजी फांकडे आला, तेव्हां नाना फडणीस वगैरे कारभाऱ्यांची घाबरगुंडी कशी उडाली, त्याचें वर्णन हरिवंश बखरींत रसभरित आहे. सवाईमाधवराव लहान दोन वर्षांचें मूल. त्यानें सरदारांच्या भेटी दरबारांत घेतल्या, त्या वेळीं मानाजीची भेट कशी घ्यावी; हा उद्दाम गृहस्थ, न जाणों, काय करील व काय न करील! त्या भेटीचें वर्णन अस्सलच वाचण्याजोगें आहे. 'हीं बामणें मला फितुरी म्हणतात', असें त्यानें दरबारांत नाना फडणिसाचे तोंडावर बोलून दाखविलें. यानंतर मानाजीनें राज्यांत अनेक कामगिऱ्या केल्या. मानाजी फांकडे, सखाराम हरि यांच्यासारखीं साहसी माणसें स्वतंत्र वातावरणांतच वाढतात; आणि ते आपल्या राज्याचें सामर्थ्यही वाढवितात. मात्र त्यांजकडून काम घेणारा योग्य धनी पाहिजे. अलेक्झांडर बादशहास एका चोरानें 'बडा चोर' म्हणून तोंडावर म्हटलें, त्यांत पुष्कळसें तथ्य असतें. मानाजी सन १७९७ चे सुमारास मरण पावला. (इ. सं. ऐ. चरित्र २-१३).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण एकुणचाळिसावें

उत्तर हिंद, पानिपतच्या कर्तव्याची पूर्तता

[सन १७६१–१७६९]

१. पानिपतोत्तरची परिस्थिति.
२. इंग्रजांकडून मल्हारराव होळकराचा पराभव व मृत्यु.
३. मल्हाररावाची योग्यता व अहल्याबाई.
४. गोहदचा वेढा, अहल्याबाईवर दादाचा राग.
५. राजकारणाची परिणति, जाठांचा पाडाव, (जून १७६९-७०).
६. नजीबखानाशीं अनुसंधान व त्याचा मृत्यु (३१-१०-१७७०).
७. बादशहाचें दिल्लीस प्रयाण (१२-३-१७७१–२६-१२-७१).
८. रोहिल्यांचा पाडाव व पानिपतचा सूड (जाने. १७७२–जून ७३).

१. पानिपतोत्तरची परिस्थिति.—पानिपतानंतर उत्तर हिंदुस्थानांत ठिकठिकाणीं मराठे सरदारांनीं आपआपले टापू संभाळण्याचा प्रयत्न केला. तथापि जाठ व रोहिले यांनीं बरीच उचल घेतली हें पूर्वीं सांगण्यांत आलेंच आहे. अंतर्वेदींत इटाव्यापासून प्रयागपावेतों सुजाउद्दौल्यानें ठाणीं बसविलीं. इटाव्यापासून वर हरद्वारपावेतोंच्या प्रदेशांत रोहिल्यांनीं अंमल बसविला. यमुने अलीकडे बुंदेलखंडांत ठिकठिकाणचे रजपूत राजे आपला जोर करूं लागले. त्या वेळीं गोविंदपंताचा मुलगा बाळाजी गोविंद याची कुमक करण्याकरितां पेशव्यानें विठ्ठल शिवदेवास लिहिलें. 'नजीबखान इंद्रप्रस्थीं बंदोबस्त करून पानिपताकडे जाऊन बहादुरखान बालोच्याशीं स्नेह संपादून अंतर्वेदींत बागपताकडे आले. पट्टणास पातशहा आहे, त्यास आणून दिल्लीस स्थापन करावा. त्यास त्याशीं व रोहिले सुजाउद्दौल्यांशीं पेंच. गाजुद्दीनखानास जाठानें वजिरी दिली, परंतु ती चालणें नाहीं. जाठ व रोहिले यांचा पेंच पडला. चोहींकडे दंगाच आहे'. (५-८-१७६१) सन १७६१–६२ सालीं नारो शंकर, अंताजी माणकेश्वर, यशवंतराव पवार व सिंदे-होळकर यांचीं पथकें तिकडे वावरत होतीं, म्हणून पेशव्यांचा दबाव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बराच कायम होता. परंतु पुढें सन १७६२ त दक्षिणेंत चुलतेपुतण्यांचें भांडण लागलें तेव्हांपासून तीनचार वर्षें पेशव्याकडून हिंदुस्थानचा बंदोबस्त कांहीं एक होऊं शकला नाहीं. होळकर देशींच आला; व सरदारीचा बंदोबस्त नसल्यामुळें सिंदे तर सर्वथैव पंगु बनले. माळव्यांत मराठ्यांच्या फौजा नाहींत असें पाहून यवनानें उचल घेतली. (२४-१-१७६३). बाबूराव कोन्हेर यास माधवराव पेशवा ता. १२-८-१७६२ रोजीं लिहितो, 'तुम्ही प्रस्तुत सुजादौल्याजवळ आहां हें उत्तमच केलेंत. सरकारचीं ठाणा गेलीं आहेत तीं हस्तगत करावीं. रजवाडे यांस साहित्यपत्र पाठविलें जाईल'. एकंदरींत तूर्त उत्तरेकडील राजकारणांतून दोन प्रबळ सत्ताधीश मराठे व अबदाली कमी झाले, त्यायोगें स्थानिक संस्थानिकांस चेव आला आणि कांहीं काळ सर्वत्र अंदाधुंदी माजली. पंजाबांत शीखांनीं फारच जोर केला, आणि अबदालीचा अंमल उखडून दिला. सन १७६२ चे आरंभीं अब्दालीनें नुरुद्दीनखान नांवाच्या सरदारास तेथें बंदोबस्तास पाठविलें. परंतु शीखांनीं त्याचाही पराभव करून सरहिंद वगैरे प्रांत हस्तगत केले. तेव्हां सन १७६२ चे नोव्हेंबरांत अबदाली स्वतः पंजाबांत आला; आणि पंधरा दिवसांत शीखांचा पाडाव करून पुनः सरहिंद पावेतों अंमल बसवून परत गेला. याच वेळीं त्यानें आपले वकील मराठ्यांकडे पाठवून त्यांच्यांशीं सलूख करून घेतला; म्हणजे अबदाली व मराठे यांचा झगडा पानिपतानंतर उरला नाहीं. हिंदुस्थानांत व्यवहार ठेविल्यापासून आपणांस लभ्यांश नाहीं, अशी अबदालीची खात्री झाली. पंजाब प्रांत मात्र अफगाणिस्तानचे लगत्याचा त्यास हाताखालीं घालावयाचा होता; आणि पानिपताचे वेळींही मराठ्यांनीं पंजाब मोकळा केला असता, तर कदाचित् तो दुर्धर प्रसंगही ओढवला नसता. परंतु अबदाली परत गेल्याबरोबर शीखांनीं उलट खाऊन त्याचा सरदार झैनखान यास लढाईंत मारिलें, तेव्हां सन १७६४ च्या जानेवारींत पुनः अबदाली थोडा वेळ पंजाबांत आला; पण अफगाणिस्तानांत गडबड झाल्यामुळें त्यास लगोलग परत जावें लागलें. सन १७६७त पुनः एकवार अबदाली पंजाबावर आला असतां शीखांनीं त्याचा चांगलाच पराभव केला. त्यानंतर स्वदेशीं परत गेल्यावर तो लवकरच कायमचा आजारी पडून शेवटचीं चार पांच वर्षें त्यास कांहींच उद्योग

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करितां आला नाहीं. सन १७७३ च्या जून महिन्यांत वयाचे पन्नासावे वर्षीं अबदाली मर्घान येथें मरण पावला.

इकडे राक्षसभुवन आटोपतांच उत्तर हिंदुस्थानांतील भानगडींचीं व निकडीचीं प्रकरणें पेशव्याचे नजरेस आलीं, तरी कर्नाटकाचा कार्यभाग उरकून मग हिंदुस्थानांत जावें, असाच त्यानें विचार ठरविला. सन १७६३ च्या ऑक्टोबरांत होळकर व सिंदे हिंदुस्थानांत गेले. 'मल्हारबा व ते एक झाल्यामुळें पुढें जबरदस्ती पाडावी असें आहे'. स्वतः माधवराव कर्नाटकांत असतांही त्याचें चित्त उत्तर हिंदुस्थानांतील व्यवहारांवर होतें. सन १७६४ च्या जून महिन्यांत त्यानें चिंतो विठ्ठलास लिहिलें, कीं मल्हारबाकडील व सिंद्यांकडील वर्तमान हंमेशा पाठवीत जावें. तेव्हां चिंतो विठ्ठल नासिक येथें दादांचा कारभार पाहत होता; आणि सामान्यतः उत्तरेंतील व्यवहारांचा निकाल दादाच करीत असे. तरी माधवराव उत्तरेंत जाऊं शकला नाहीं, हा प्रकार अनिष्ट समजला पाहिजे. सन १७७० च्या पुढें माधवराव प्रकृतीनें असमर्थ होऊन बसला, त्यापूर्वी त्यास हिंदुस्थानांत जातां आलें असतें, तर तिकडच्या कारभारास निराळी दिशा लागली असती, याविषयीं संशय वाटत नाहीं. नारो शंकर व विठ्ठल शिवदेव माधवरावाबरोबर कर्नाटकांत गेले. इकडे सिंदे होळकरांच्या सरंजामांचा निकाल लगोलग झाला नाहीं. त्यामुळें उत्तरेंतील कारभार पांच सहा वर्षें असाच बिघडत गेला.

या वेळच्या उत्तर हिंदच्या परिस्थितींत अनेक सत्ताधीश आपआपल्या अर्थाकरितां झगडत होते. बादशहा अलाहबादेस सुजाउद्दौल्याच्या कच्छपीं राहून, आपणांस दिल्लीचे मसनदीवर कोण नेऊन बसवितो, या विवंचनेंत होता. इंग्रजांनीं मीरकासिमास घालवून बंगालचा ताबा बहुतेक घेतला होता, तरी नागपुरकर भोसले त्या प्रांतावर आपला हक्क भांडवीत होतेच. बुंदेलखंडांत खुद्द मूळचे बुंदेले रजपूत तर बळवान् होतेच, परंतु त्याशिवाय जाटांनीं थेट मथुरेपासून गोहदपर्यंतचा प्रदेश हस्तगत केला होता. यमुनेपलीकडे अंतर्वेदीच्या मुलखांत रोहिल्यांनीं आपला जम बसविला. या सर्वांशीं उगवत्या इंग्रजांनीं आपलीं संधानें थोडीं बहुत चालविलीं होतीं, पर्वतावरील मोठ्या मजबूद खडकांत फटींतून पावसाचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाणी झिरपत जाऊन तें हळूहळू त्या प्रबल खडकाचे अलग तुकडे पाडून त्यांचा अखेरीस चुराडा उडवितें, त्याप्रमाणें इंग्रजांनीं निरनिराळ्या इसमांत फूट पाडून त्यांस आस्तेआस्ते अलग व असहाय करण्याची प्रवृत्ति धारण केली होती. ही प्रवृत्ति थोड्या बहुत अंशानें सफल होण्यास पेशव्यांचा गृहकलह कारण झाला. इंग्रज हे परके लोक, केवळ व्यापाराकरितां येथें आलेले, नाइलाजानें फक्त स्वसंरक्षणापुरते एतद्देशीयांच्या राजकारणांत पडणारे, असाच सार्वत्रिक समज असल्यामुळें, पाहिजे त्याच्याशीं निस्पृह-तेच्या बाण्यानें त्यांस वागतां येई. जरूर व शक्य असलें तर एखादें राजकारण अंगावर घ्यावें; तें सिद्धीस गेलें तर बरेंच. न सिद्धीस गेलें तर तितक्यापुरती माघार घेऊन नुसती एतद्देशीयांच्या व्यवहारांची टेहळणी ठेवून स्वस्थ बसावें. झाला तर फायदा, नाहीं तर नुकसान कांहींच नाहीं. अशा प्रकारची ही वृत्ति त्यांच्या परकीयत्वामुळें त्यांस धारण करितां आली. ही वृत्ति कोणाही एतद्देशीयास स्वीकारतां येणें शक्य नव्हतें. त्यांचे सर्व हितसंबंध येथेंच पडले म्हणून कांहीं तरी निश्चय करून आलेला प्रसंग पार पाडल्याशिवाय त्यांस गत्यंतर नसे. या वेळचे इंग्रजांचे व एतद्देशीयांचे संबंध ध्यानांत आणण्यासाठीं इंग्रजांची ही वृत्ति अवश्य लक्षांत ठेविली पाहिजे.

पानिपतानंतर तीन वर्षें गृहकलहामुळें मराठे सरदारांचें लक्ष उत्तरेंतून निवृत्त झालें. त्या संधीचा फायदा घेऊन सुरजमल्ल जाटानें मोठीच उचल घेतली. परंतु त्यास नजीबखान रोहिला प्रतिस्पर्धी भेटला. हे दोघेही दिल्लीचा कबजा घेण्यासाठीं झगडूं लागले. सन १७६३ त सुरजमल्ल दिल्लीजवळ तळ देऊन राहिला असतां, नजीबखानाच्या फौजेनें त्याजवर हल्ला करून सुरजमल्लास ठार मारिलें, (ता. २५ डिसेंबर १७६३). या वेळच्या बादशाहीच्या इतिहासांत जाटांचा संबंध विशेष असून, मराठ्यांच्याप्रमाणेंच, शीख, जाठ, रोहिले वगैरेंच्या हकीकती संगतवार मिळाल्याशिवाय, निरनिराळ्या धाग्यांची गुंतागुंत सुटावयाची नाहीं. यासाठीं प्रो० कानुंगो यांचा नुकताच (जून १९२५) प्रसिद्ध झालेला इतिहास[1] प्रस्तुत

1. History of the Jaths Vol. 1, by Prof. Quanungo, M. A., Lucknow Univ., Rs. 3-8, Pub. M. C. Sarkar & Sons., Calcutta.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरणीं विशेष कामाचा आहे. मरणसमयीं सुरजमल्लाचें वय पंचावन वर्षांचें असून त्यास चार राण्या व पांच मुलगे होते:--जवाहीरसिंग, रतनसिंग, नवलसिंग, रणजितसिंग व नहरसिंग. राणी किशोरी ऊर्फ हौशा ही सुरजमल्लाची आवडती राणी त्या वेळीं सुप्रसिद्ध असून, तिनेंच पानिपतांतून पळून येणाऱ्या मराठ्यांचा परामर्ष घेतला होता. परंतु तिला मूल नव्हतें. वरील सर्व मुलांत जवाहीरसिंग हाच कर्तृत्ववान असून लढाईंत व राज्यकारभारांत अनुभवलेला होता. त्यास पुढें भरतपुरची गादी मिळाली आणि त्याजबरोबरच मराठ्यांचे हर्षामर्षाचे प्रसंग उद्भवले. स्थिरस्थावर झाल्यावर जवाहीरनें नजीबखानावर चढाई करून दिल्लींत त्यास कोंडिलें; नोव्हेंबर १७६४ पासून फेब्रुवारी १७६५ पावेतो अनेक लढाया मारून नजीबखानाचा संहार केला, आणि आपल्या बापाच्या मृत्यूचा सूड घेतला. या मोहिमेंत मल्हारराव होळकराचें साह्य जवाहीरसिंगानें घेतलें होतें; आणि नजीबखान मल्हाररावाचा मानसपुत्र असल्यानें, त्याच्याच मध्यस्थीनें नजीबखानाचा बचाव झाला. पुढें जवाहीरसिंगानें सभोंवार अनेक युद्धप्रसंग करून आपलें राज्य व बल अतोनात वाढविलें. सन १७६८ त त्याचा एकाएकीं खून होऊन जाठांचे राज्यांत गोंधळ उडाला. जवाहीर जिवंत असता तर सिंदे होळकरांचें दिल्लीकडील कारस्थान फार दुर्घट झालें असतें.

इकडे बुंदेलखंडांत गोविंदपंत बुंदेल्याचे दोघे चिरंजीव बाळाजी व गंगाधर यांनीं कारभारी विसाजी गोविंद चांदोरकर व गोविंदपंताचा भाऊ काशीपंत काका वगैरेंच्या मदतीनें, सागर, गुलसराई, जालवण वगैरे ठिकाणीं आपला जम थोडाबहुत बसविला. पानिपतचे वेळीं नानासाहेबानें उत्तरेंत स्वारी केली, त्या वेळीं जानोजी भोसले त्याजबरोबर होता, त्याची मदत घेऊन विसाजीपंत चांदोरकर यानें कित्येक बंडखोरांचा पाडाव केला (८-५-१७६१). पुढें सन १७६४ त बाळाजी व गंगाधर गोविंद पुण्यास पेशव्याचे भेटीस आले. त्यांचा माधवरावानें योग्य सत्कार करून सरंजामाचा बंदोबस्त करून दिला, आणि त्यांस उत्तरेंतील उद्योगावर रवाना केलें. परंतु तिकडे योग्य पुढारी नेमून त्यांची हुकमत व व्यवस्था दादानें ठरवून दिली नाहीं. सिंदे व होळकर यांची चित्तशुद्धि नव्हतीच, त्यांतून मल्हारराव होळकर आतां

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वृद्ध होऊन जोरानें कामें उलगडण्यास नालायक झाला होता. 'सुभेदारांची प्रकृत, नादीं लागोन, हरएक मजकूर बोलावा तेव्हां पाल्हाळ उदंड बोलतात, त्याजवर न जावें'. सिंद्यांचे घरांत तर नानाप्रकारच्या भानगडी होत्या. सन १७६३ च्या ऑक्टोबरांत जनकोजीचा तोतया उपस्थित झाला. 'त्यास पुण्यास आणिल्यावर रघोजी थोरात असा निर्गम झाला तो कैद करून ठेविलें'. दादा महादजीचे विरुद्ध असल्यामुळें त्याचे सरदारीचा निकाल कैक वर्षें झालाच नाहीं. शिवाय सिंद्यांचे घरांतही भांडणें होतीं, या कारणांनीं उत्तर हिंदच्या उद्योगांत महादजी सर्वथैव लंगडा राहिला. या वेळीं महादजीसच एकदम सर्व सरदारी व मुखत्यारी मिळाली असती, तर उत्तरेंतील प्रकरणांस निराळें स्वरूप आलें असतें. तूर्त महादजीनें सन १७६५ चे उन्हाळ्यांत कोट्याची मसलत अंगीकारिली, आणि होळकरानें सुजाउद्दौल्यास साह्य देण्याचें कबूल करून इंग्रजांवर चढाई केली. त्यांत त्यास अपशय आलें. 'कोट्याची मसलत झाल्यावर होळकरांकडे जावें लागतें. तिकडील पत्रें आलीं, कीं इंग्रजांची व होळकरांची लढाई होऊन होळकर माघारीं काल्पीस आले. आम्ही होळकरांस लिहिलें, तें अजून अमलांत येत नाहीं. इंग्रजांस अत्यंत भितातसें दिसतें. यांचे लक्षणाचा विस्तार श्रीमंतांस लिहिला आहे'. यानंतर महादजी सिंदे व त्याचा दिवाण महादाजी गोविंद यांची कटकट होऊन उज्जनजवळ लढाई झाली, तींत काकडे मारला गेला. हा काकडे एक श्रीमान गृहस्थ, दादा व चिंतो विठ्ठल यांचे मर्जीतला मुद्दाम त्यांनीं हिंदुस्तानांत सिंद्याची रवानगी करते समयीं त्याचे दिमतीस दिला होता. त्याजबरोबर मोरो विठ्ठल रायरीकरही होता. काकड्यास मारल्यामुळें महादजीवर दादाची भारी इतराजी झाली. हे प्रकार सन १७६५ च्या मे-जून मधले आहेत.[1]

---

१. आधार.—भा. व. पु. १ बुं. कै. पृष्ठ १७; का. सं. प. या. १०१, १०६, १०७, ३७५. खं. १. २८८, २९७, २९९; खं. १०. ४; खं. १३. १५; खं. ६. २४१; खं. १४. १६; लतीफकृत पंजाबचा इ०; मा. रो. १. १, ३, ७, १९४; इ. ७७; ऐ. चरित्रें २-१; चं. १५१; खरे ले. ३७६. ३७९, ३८२, ५७५; कानुंगोचा जाठांचा इतिहास भा. १.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. इंग्रजांकडून मल्हारराव होळकराचा पराभव व मृत्यु (२० मे १७६५).—ह्याच संधीस म्हणजे सन १७६५ त क्लाइव्हची स्वारी इंग्लंडाहून बंगाल्यांत आली. त्यापूर्वीं बंगाल्यांत काय काय भानगडी चालल्या होत्या, त्यांचें अनुसंधान इंग्रजी इतिहासांतून वाचकांनीं ठेविलें पाहिजे. बंगालचा सुभेदार मीरकासम याचा इंग्रजांनीं पाडाव करून बंगाल व बहार प्रांत हस्तगत केले, तेव्हां ते परत घेण्यासाठीं मीरकासम, बादशहा व सुजाउद्दौला या त्रिवर्गांनीं संगनमतानें पटणावर स्वारी केली. परंतु पटणा त्यांचे हातीं न आल्यामुळें त्यांच्या फौजा वर ८० मैल भागीरथीचे कांठीं बक्सार येथें सन १७६४ च्या पावसाळ्यांत छावणी करून राहिल्या असतां, इंग्रज सेनापति सर हेक्टर मनरो पावसाळ्यांतच खालून त्यांजवर चालून गेला, आणि २३ ऑक्टोबर रोजीं बक्सार येथें त्यानें तिघांचा पराभव करून त्यांस परत फिरविलें, आणि त्यांचे मागोमाग जाऊन वर बनारसपासून अलाहबादपावेतोंचा प्रदेश त्यानें हस्तगत केला. इंग्रजांचा असा शह एकदम वरपावेतों येईल अशी या त्रिवर्गास कल्पनाच नव्हती. तेव्हां कोणत्याही उपायानें इंग्रजांस मागें हटविण्याचा सुजानें विचार चालविला. इंग्रजांचाही पेश सर्व रजवाड्यांकडे होताच. सन १७६५ च्या आरंभीं सिंदे होळकर नजीक आलेले ऐकतांच, सुजानें आपले वकील होळकराकडे पाठवून इंग्रजांशीं लढण्यास त्याची मदत मागितली. इकडे इंग्रज सेनापति मनरो याची बदली होऊन त्याचे जागीं जनरल कार्नॅक नेमून आला. कार्नकच्या हाताखालीं मेजर फ्लेचर वागत असून तो अलाहबाद पावेतोंचा प्रदेश सांभाळून होता. बनारसच्या वर १८ मैल भागीरथीच्या दक्षिण काठीं चुनारगड नांवाचा किल्ला[१] मजबूद व नाक्यावरचा होता, तो मेजर फ्लेचर व मेजर स्टिबर्ट यांनीं वेढा घालून सन १७६५ च्या फेब्रुवारींत हस्तगत करून, एतद्देशीयांच्या फौजांनीं खालीं बहार बंगाल्यांत शिरण्याचा मार्ग अडवून ठेविला. सियर मुताखरीनचा कर्ता गुलाम हुसेन चुनारगडावर किल्लेदार असून, त्यानें हा किल्ला इंग्रजांचें हातीं न देण्याची शिकस्त केली. पण त्यास मदत न आल्यामुळें निरुपाय होऊन त्यानें किल्ला इंग्रजांचे हवालीं केला. त्यानंतर तीन दिवसांनीं

१ हल्लीं रेल्वेचें स्टेशन आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे ता. ११-२-६५ रोजीं फ्लेचरनें अलाहबादेवर येऊन तोही किल्ला काबीज केला. तों जनरल कार्नकही तेथें येऊन दाखल झाला. सारांश, अलाहबादपासून कलकत्त्यापर्यंतचा सर्व प्रदेश एतद्देशीयांचे हातून मोकळा होऊन त्याचे मालक इंग्रज बनले. तेव्हां बादशहास झुगारून देऊन आपणच या प्रदेशाचें स्वामित्व पत्करावें, कीं दुसरी कांहीं दिखाऊ व्यवस्था करून आपला अर्थ साधून घ्यावा, हा महत्त्वाचा प्रश्न बंगालच्या इंग्रजांपुढें उपस्थित झाला. पानिपतानंतर मराठे व मुसलमान या दोन्ही सत्ता निर्बल झाल्यानें इंग्रजांस पुढें येण्यास वाव मिळाला, असें जें वारंवार प्रतिपादन करण्यांत आलें आहे, त्याचें प्रत्यंतर या वेळच्या परिस्थितींत चांगलें सांपडतें. नजीबखानानें मराठ्यांपासून बादशाही वांचविण्यासाठीं अबदालीस आणिलें, परंतु तो त्याचा हेतु सफल न होतां, उलट बादशहा मात्र स्वस्थानास मुकला. बंगालचा बचाव करण्याचा कांहीं एक प्रयत्न बादशहास किंवा इतर मुसलमानांस करितां आला नाहीं. तेव्हां सुजा व बादशहा यांनीं या अडचणींत पुनः मराठ्यांकडे धाव घेतली. सन १७६४ त पेशव्यांचे अंतःकलह मिटून त्यांच्या फौजा उत्तरेंत पूर्वींचा उद्योग करूं लागल्या, तेव्हां सिंदे होळकर जवळ आलेले पाहतांच, त्यांजकडे सुजानें व बादशहानें मदतीसाठीं याचना केली. त्यापूर्वींच नजीबखान रोहिल्यानें होळकराशीं संधान बांधून त्यास अंतर्वेदींत आणिलें होतें. 'अंतर्वेदच्या बंदोबस्तासाठीं अनूपशहरीं आलों. तेथें नबाब सुजादौले येऊन भेटले. कित्येक प्रकारें निखालस भाव बोलून सहाय व्हावयाचा करार करून गेले. याउपर इटाव्यास आलों. येथील काम उरकून गंगातीरीं जाणार', असें होळकर पुण्यास ता. ३०-३-१७६५रोजीं लिहितो. सेयर-मुताखरीनचा कर्ता लिहितो, 'मल्हारराव होळकराची मदत संपादन करून त्याची व आपली फौज एकत्र जमल्यावर वजीर सुजादौला यानें इंग्रजांशीं दोन हात करण्याचा निश्चय केला. गाजीउद्दीनही कांहीं थोडी फौज घेऊन मदतीस आला. पण निश्चयानें कोणतीही कामगिरी तडीस नेण्याचें सामर्थ्य आतां गाजीच्या अंगीं बिलकूल नव्हतें. सर्वांच्या फौजा भाडोत्री असून, बक्सारच्या लढाईत मार खाल्ल्यापासून कोणाचेही मनांत हिंमत म्हणून कशी ती उरली नव्हती. इंग्रजांची फौज अलाहबादेहून वर येऊं लागली, तेव्हां आरंभीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मल्हाररावाच्या टोळ्यांनीं त्यांच्या आजूबाजूस घिरट्या घालून, सभोंवारचा प्रदेश इतका उद्ध्वस्त करून टाकिला, कीं दाणवैरणीची आपणास पंचाईत पडेल अशी इंग्रजांस धास्ती वाटूं लागली. परंतु ता. ३-५-१७६५ रोजीं कुराच्या[१] मैदानांत समग्र मुसलमान फौजांची व इंग्रजांची दृष्टादृष्ट होतांच, इंग्रजांच्या तोफांचा मारा सुरू होऊन, मल्हारराव होळकराची सर्वथैव गाळण उडून गेली. तोफखान्याचा असा प्रभाव मल्हाररावानें पूर्वीं कधीं अनुभविला नव्हता. थोडा वेळ इकडून तिकडे टेहेळणें केल्यावर कांहीं इलाज चालत नाहींसें पाहून, मल्हाररावानें आपल्या फौजेसह असा कांहीं पोबारा केला, कीं ग्वाल्हेर गांठीपर्यंत त्यानें एकदां सुद्धां मागें वळून पाहिलें नाहीं. ह्या झटापटींत इंग्रज फौजा त्याचा पाठलाग करीत यमुनेवर आल्या. दक्षिणकांठीं काल्पी येथें मल्हाररावाचा तळ व उत्तरकांठीं मेजर फ्रेचरचा होता. ता. २२ रोजीं फ्रेचरनें दोन निवडक तुकड्या घेऊन यमुना ओलांडून अलीकडे काल्पीवर हल्ला केला; आणि होळकरास तेथून हुसकून दिलें. पुढें अंतर्गत प्रदेशांत दूर जावयाचें धाडस न करितां फ्रेचर परत अलाहबादेस गेला. त्याच सुमारास क्लाइव्हची स्वारी कलकत्यास येऊन थडकली. 'होळकराचें व इंग्रजांचें युद्ध यमुनापार झालें. इंग्रजांपाशीं तोफांचा मारा फार; तेव्हां निघाले. काल्पीस आले. इंग्रजानें गाजीउद्दीनखान व सुजा यांचें लष्कर लुटलें. मल्हारबा फार खट्टे आहेत. याउपरी मागती झुंजूं म्हणतात'. आजपावेतों इंग्रजांस हरविण्याचे सुजानें नाना यत्न करून पाहिले, पण त्याचा कांहीं उपाय चालेना. तेव्हां एका प्रसंगीं अहंमदखान बंगशनें त्यास स्पष्ट बोलून दाखविलें कीं, 'दुसऱ्यांच्या मदतीची अपेक्षा न ठेवितां स्वतःचा हिय्या करून इंग्रजांवर बेधडक चालून जा. जय मिळाला तर बरें. नाहीं तर मरून जा. तशी छाती होत नसेल, तर यत्किंचित् लज्जा मनांत न बाळगितां, एकदम एकटे उठून इंग्रज सेनापतीस जाऊन भेटोन त्यांच्यांशीं स्नेह संपादून ते ठेवितील तसे रहा'. हा शेवटचा कानमंत्र सुजानें इतउत्तर सर्वथैव अंगीकारिला, हें महशूर आहेच.

लगोलग इलाज करून सिंदे होळकरांचे मदतीनें मुसलमानांनीं एकदम इंग्रजांवर हल्ला केला असता, तर ते तेव्हांच उखडून निघाले असते. पण

१. दुआबांत कानपुरच्या दक्षिणेस २५ मैल.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एतद्देशीयांची ढिलाई व ताबडतोब निश्चय करून अडचणींचें निरसन करण्याची इंग्रजांची हातोटी, या विरोधाचा तीव्र प्रत्यय येथेंच दिसून येतो. ता. १० ऑगस्ट १७६५ रोजीं महादजी सिंदे पुण्यास लिहितो, 'अतःपर होळकरांकडे जात आहें. त्यांचा मुक्काम दतियावरी आहे. ते आम्ही एकत्र होऊन कित्येक मातबर कामें करावीं हाच अर्थ चित्तांत धरिला आहे, दुसरा प्रकार नाहीं'. अर्थात् सिंदे होळकर एकचित्तानें वागत नव्हते. फेब्रुवारी-पासून ऑगस्टपर्यंतचा सोन्यासारखा वेळ फुकट गेला. मे महिन्यांत क्लाइव्ह दाखल झाला. त्यानें तेव्हांच ताडिलें, कीं बंगाल बहारचा एवढा मोठा ग्रास एकदम आपणांस पचणार नाहीं. तसा प्रयत्न केल्यास सर्व एतद्देशीय सत्ताधीश एक होऊन आपला पाडाव करतील. सबब तशी संधिच त्यांस देऊं नये. असा निश्चय करून आपल्या अधिकाऱ्यांची निर्भर्त्सना करीत, क्लाइव्ह लगेच अलाहबादेस गेला. तेथें त्यानें बादशहा व वजीर यांच्या भेटी घेऊन त्यांजपाशीं स्वतंत्र करार ठरविले. ता. १२ ऑगस्ट १७६५ रोजीं क्लाइव्हनें बादशहापासून बंगालची दिवाणी मिळविली. बादशहाचा आग्रह आपणांस इंग्रजांनीं आग्र्यास पोंचवावें असा होता. बादशहा ता. ११-८-६५ रोजीं लिहितो, 'आणखी एक वर्षपावेतों आम्हांस आग्र्यास नेऊन पोंचविण्यास आपणास सवड नाहीं असें क्लाइव्हनीं आमचे वकिलास कळविलें, तें ऐकून विस्मय व खेद वाटला. जनरल कार्नकनें पराभव केल्यापासून मल्हारराव होळकर फजित पावून पळून गेला खरा; परंतु तेवढ्यानें तो स्वस्थ बसणारा नव्हे. हल्लीं तो बुंदेलखंडांत फौजा जमवीत असून दक्षिणेंतून त्यास मोठी मदत येत आहे. तो लवकरच इकडे चाल करील म्हणजे, मग आमची इकडे एक वर्षभर धडगत राहणें शक्य नाहीं. एक वर्ष आपण स्वस्थ बसाल, तर आपला आश्रय केल्याबद्दल आम्हांस पश्चात्ताप होईल'. वास्तविक इंग्रजांचा विचार प्रयागच्या वर जाण्याचा या वेळीं बिलकूल नव्हता. कलकत्त्याचा समुद्र-तळ सोडून अलाहबादेपर्यंत वर आलों, हेंच त्यांस धोक्याचें वाटत होतें. बादशहानें मराठ्यांचे हातांत जाऊं नये एवढ्याचसाठीं ते हे वर्षावर्षाचे वायदे करीत होते. अशा रीतीनें इंग्रजांच्या वायद्यांस कंटाळून शेवटीं बाद-शहानें मराठ्यांचा जम चांगला बसलेला पाहून, सन १७७० त आपली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मान मराठ्यांच्या हातांत दिली. या वेळचीं लहान मोठीं कारस्थानें व निरनिराळ्या पक्षांचे कावे समजण्यास पर्शियन कॅलेंडर्सचे तीन भाग फार उपयोगी पडतील.

सन १७६५ त पेशव्यांनीं भोसल्यास नरम केल्यावरची चुलत्यापुतण्यांची मनःस्थिति पूर्वीं वर्णिली आहेच. उत्तरेंतील कारस्थानें उरकण्याची दादास ऐपत नाहीं हें माहीत असतांही, केवळ त्याच्या आग्रहास्तव माधवरावानें त्यास हिंदुस्थानांत जाऊं दिलें. सन १७६६ च्या जानेवारींत दादा चाळीस हजार फौज घेऊन ब्ऱ्हाणपुराहून पुढें निघाला. घमेंड मोठीच होती. 'पातशहाचा हुक्म आला कीं, जलद येऊन पोंचावें, पातशहातीचा बंदोबस्त करावा. या अन्वयें मल्हाररावाचीं वगैरे वरचेवर पत्रें आलीं. उत्तर प्रांतें जाण्याची बहुत त्वरा. एक दिवस महिन्याच्या जागां जाऊं लागला आहे', असें दादा लिहितो. परंतु मल्हारराव व दादा यांची जोडी एकत्र असली म्हणजे उद्योग किती झटपट तडीस जाई, त्याची कल्पना वाचकांस आहेच. मल्हारराव दतियास आला तो बहुतेक अखेर मजलीस येऊन ठेपला. मार्च-एप्रिलांत दादाची व त्याची गांठ पडली असावी. परंतु विशेष कांहीं उद्योग घडण्यापूर्वींच म्हणजे ता. २०-५-१७६६ रोजीं मल्हारराव मरण पावला. 'दादा व सुभेदार यांच्या भेटी झाल्यानंतर मल्हारजीच्या व श्रीमंतांच्या भेटी करून दिल्या. असें असतां सुभेदारांचे शरीरीं दोन अडीच मास समाधान नव्हतें. जाठांचे पारिपत्याकरितां श्रीमंत सहवर्तमान झांशी प्रांतांत अलमपुरास आल्यावर कायम झाले. दैवी मानवी उपाय, अनुष्ठान व दानधर्म बहुत कांहीं केलें. आयुर्मर्यादें करून गुणास न येतां वैशाख शुद्ध ११ मगळवारीं पावणे दोन प्रहर दिवसा देवाज्ञा पावले. द्वारकाबाई व बजाबाई यांनीं सहगमन केलें. क्रियेस दीड दोन लक्ष खर्च करावा असें आहे. श्रीमंतसुद्धां सर्व मंडळी सन्निध असतां देहावसान झालें. पंधरा दिवस झाल्यानंतर गोहदेस जाणार'. ह्या प्रसंगीं सुभेदाराची सून अहल्याबाई हिनें आपला मुलगा मालेराव यास ता. ४-६-१७६६ रोजीं पत्र लिहिलें, तें असें:—'आतां शोक करावयाचा प्रकार नाहीं. सरदारीचा विचार दौलत चालली पाहिजे. यास्तव विवेक करून कामाकाजांत चित्त घालून आव घालावा. ज्याप्रमाणें तीर्थस्वरूप सरदारी चालवीत आले, त्याचप्रमाणें तुम्हीं पाया घालून काम-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

काज चालवून वडिलांप्रमाणें लौकिक होय तेंच करून उमदी नजर धरून; वडिलांची कीर्ति आहे त्यापेक्षां अधिक संपादन करावी, यांतच तुमचा लौकिक आहे. रा० गंगाधरपंत तात्यांचे मर्जीनुरूप वर्तत जावें'. माधवराव विठ्ठल शिवदेवास लिहितो, 'मल्हारजी होळकरांस देवाज्ञा झाल्याचें वर्तमान श्रवण होऊन परम खेद झाला. मातबर सरदार मोठे दाबाचे होते. तीर्थरूपांची व त्यांची परस्पर भेटी होऊन काल झाला हा सुकृतांशच. तिकडील मनसुबे तुमचे होतें झाले, व पुढेंही उमदे उमदे मनसुबे करून हिंदुस्थानचा बंदोबस्त करावा ही तुमची उमेद आहेच. तदनुरूप तीर्थरूपांस विनंति करावी. ज्यांत लौकिकास्पद तेंच तीर्थरूपांचे आज्ञेप्रमाणें करून दाखवाल'.

३. **मल्हाररावाची योग्यता, अहल्याबाई.**—मल्हारराव होळकराच्या योग्यतेसंबंधीं पूर्वी पानिपत प्रकरणांत व इतरत्र भरपूर विवेचन करण्यांत आलेलें आहे. याचा जन्म ता. ५-४-१६९३ चा असल्यानें मृत्युसमयीं त्याचें वय ७३ वर्षांचें होतें. पेशवाईच्या अव्वलीपासून मराठशाहींतील सर्व घडामोडी व स्थित्यंतरें पाहून त्यांत प्रत्यक्ष भाग घेतलेला अनुभविक जुना सरदार या वेळीं हा एकच असून, बाजीरावानें गनिमी काव्याची युद्धकला उपयोगांत आणिली तिचा तोच जनक होता असें म्हटलें तरी चालेल. स्वतःचा मतलब साधून राज्याचें कल्याण साधेल तितकें करण्याचा त्याचा यत्न असे. पेशव्यांशीं त्यानें बेइमानगिरी केलेली नाहीं. वार्धक्यामुळें व बरोबरीची सर्वच मंडळी नाहींशी झाल्यामुळें, अलीकडील माधवरावाच्या तरुण पिढीवर त्याचें वजन पडूं शकलें नाहीं. तो केवळ शिपाईगिरींतच प्रवीण होता असें नाहीं, तर त्याचे अंगीं मसलत, दूरदृष्टि व सावधपणा हे गुण विशेष होते. शिंद्यांचे घराण्याशीं त्याचें मूळपासून बरें नव्हतें, हें या पूर्वी अनेक वेळां दिसून आलें व पुढेंही यावयाचें आहे. मराठमंडळांतील फुटीची भावना त्याच्या ठिकाणीं अनेक व्यवहारांत दिसून येत असे. मल्हाररावाबद्दल माधवराव पेशव्याचा अभिप्राय चांगला नव्हता. सर्व राष्ट्रास

---

१. **आधार.**—खं. १२. ६८; चं. १०६, १०७, १०८; खरे ले. ५८१, ५८४; पर्शियन कॅलेंडर्स, भाग १. २६८८; सेयर मुताखरीन भाग २, पृष्ठ ५८०; फॉरेस्टकृत क्लाइव्ह. कानुंगो, जाटांचा इतिहास.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मान्य झालेल्या या निस्पृह पेशव्याचें मत चांगलें नसणें ही गोष्ट मल्हार-रावाच्या योग्यतेस बाधक मानतां येते. इंग्रजांनीं त्याजवर मात केली, त्याचें अतोनात दुःख होऊन तो खंगला, आणि त्यांतच त्यास मृत्यु आला. त्यास तीन बायका गौतमाबाई, बनाबाई व द्वारकाबाई अशा असून हरकूबाई म्हणून खांडा[1] राणी होती. ही हरकूबाई पुढें अहल्याबाईजवळ तिची मर्जी संपादून राहत असे. गौतमाबाई सवाष्णपणींच वारली, व दुसऱ्या दोघींनीं सहगमन केलें. गौतमाबाईच्या पोटीं एक मुलगा खंडेराव झाला, तो कुंभेरीच्या वेढ्यांत ता. १७-३-१७५४ रोजीं गोळी लागून मरण पावला. उदाबाई व सीताबाई अशा दोघी मुली मल्हाररावास असून, उदाबाईचें सासर वाघमारे यांजकडे होतें. तुकोजी होळकर म्हणून मल्हाररावाचा एक नातलग होता, त्यास त्यानें हाताखालीं ठेवून वाढविलें. हा तुकोजीच अहल्याबाईच्या वेळच्या मुलूखगिरींत प्रमुखपणें वागत होता.

सुप्रसिद्ध **अहल्याबाई** खंडेरावाची बायको व मल्हाररावाची सून होय. सन १७८१ च्या एका पत्रांत 'आपले वयास पंचावन वर्षे झालीं', असें अहल्याबाई स्वतः लिहिते, त्यावरून तिचा जन्म १७२५ च्या सुमारचा होय हें सिद्ध आहे. तिचें लग्न तारीख १४-५-१७३८ रोजीं झालें. तिला एक मुलगा मालेराव व मुलगी मुक्ताबाई अशीं दोन अपत्यें झालीं. मालेरावाचा जन्म देपाळपुरास सन १७४५ त व मुक्ताबाईचा सन १७४८ त झाला. खंडेराव दुर्वृत्त होता. त्यास अहल्याबाईशिवाय आणखी बायका होत्या, त्या मृत्युसमयीं सती गेल्या. अहल्याबाई फार बुद्धिमान्, व्यवहारदक्ष व सर्वांवर छाप बसविणारी असल्यामुळें, मल्हाररावानें कारभार बहुतेक तिच्यावर सोंपविला होता. खंडेराव मरण पावल्यावर ती सती जाण्यास निघाली असतां मल्हाररावानें तिला केवळ दुसरा पुत्र समजून मोठ्या काकुळतीनें राहविलें, यावरून तिच्यावर मल्हाररावाचा केवढा इतबार होता, आणि ही आपली जबाबदारी तिनें केवढ्या दक्षतेनें पार पाडिली, हें पुढें तिच्या कारभारांत चांगलेंच निदर्शनास आलें.

---

१. खांडाराणी म्हणजे तलवारीशीं लग्न लाविलेली. इची संतति औरस समजली जाते. खांडा म्हणजे सरळ तलवार.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मल्हाररावाचे मृत्यूनंतर होळकर घराण्याचें राज्य व प्रतिष्ठा कायम राहण्यास अहल्याबाईचें शहाणपणच कारण होय. तिचा मुलगा मालेराव हा जनकोजी सिंद्याचे बरोबरीचा असून, त्यास ता. २-१-१७५६ रोजीं नानासाहेबानें माळव्यांत वतन दिलें होतें. परंतु तो वेडसर असून मल्हाररावाचे मागोमाग ता. २७-३-१७६७ रोजीं वेडाचे लहरींत मरण पावला. त्यामुळें अहल्याबाईवर दुःखाचे डोंगर कोसळले. त्याच विपन्न स्थितींत तिला गांठून पुढील व्यवस्था आपल्या मर्जीप्रमाणें करून घेण्याच्या हेतूनें रघुनाथराव पेशव्यानें तिच्यावर स्वारी करण्याचा उपक्रम आरंभिला, त्याची हकीकत दुसरीकडे दिली आहे. 'मालेरावाच्या पश्चात् दूरचा आप्त तुकोजी होळकर मल्हाररावाचे बायकोचे मांडीवर दत्तक देऊन दीर केला[1]; व त्यास आपले हाताखालीं ठेवून माधवराव पेशव्याकडून तिनें आपल्या नांवें दौलतीचा हुकूम आणविला; आणि अठ्ठावीस वर्षें राज्यकारभार मोठ्या दक्षतेनें चालविल्यावर वृद्धापकाळीं श्रावण वद्य १४ शके १७१७ (ता. १३ ऑगस्ट १७९५) रोजीं ती साध्वी अहल्याबाई मरण पावली. वय व अनुभव, शहाणपण व निःस्वार्थ, या गुणांनीं अहल्याबाईशीं साम्यता पावतील अशा व्यक्ति मराठशाहींत फारच थोडया झाल्या. पुरुष असती तर महादजी सिंद्याहून तिची योग्यता राष्ट्राचे जास्त उपयोगीं पडून कदाचित् मराठशाहीचा भावी इतिहास पुष्कळ अंशीं बदलला असता. तुकोजीचें व तिचें फारसें पटलें नाहीं. तेव्हां मुलीचा मुलगा नथ्याबा यास दत्तक घेण्याचा तिनें विचार केला, आणि ता. १७-८-१७७९ रोजीं पेशव्यास पंचवीस लाख नजराणा देण्याचें ठरवून तिनें दत्तकाची परवानगी मिळविली. परंतु हें दत्तविधान झाल्याचा उल्लेख आढळत नाहीं. तिचा नातू नथ्याबा पुढें सन १७९० त मरण पावला आणि तिचा जांवई यशवंतराव फणसे ता. ३-१२-१७९१ रोजीं वारला, तेव्हां मुक्ताबाई सती गेली. त्या वेळीं अहल्याबाईस जो दुःखावेग झाला त्याचें वर्णन अत्यंत हृदयद्रावक आहे. माधवराव पेशव्यानें तिचा चांगलाच परामर्ष घेतला होता. उत्तर हिंदचे स्वारीपूर्वी ता. १२-११-१७६८ रोजीं माधवरावानें तुकोजीच्या सर्व मागण्यांचा

१. भा. व. २, महाराष्ट्र मं. बखर, होळकर पहा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

योग्यायोग्य पाहून निकाल केला, तो तह पाहण्यालायक आहे; त्यांतच अहल्याबाईच्या हिशेबाचा निकाल दहा वर्षांचा केलेला आहे.'

४. गोहदचा वेढा व दादाचा अहल्याबाईवर राग, (ऑक्टोबर–डिसेंबर १७६६).—गोहदच्या राण्यास बाजीरावानें उदयास आणिलें. मराठ्यांस चांगली मदत केल्याबद्दल बाजीरावानें त्यास गोहदचा किल्ला व परगणा जहागीर दिला. पानिपतानंतर पुष्कळ सत्ताधीशांनीं उठाव केला, त्यांत हा राणा स्वतंत्रतेनें वागून, मुलूख हस्तगत करून मराठ्यांस जुमानीसा झाला. भरतपुरकर जाठाशीं त्याचें सूत होतें. दादानें सन १७६६ त मल्हाररावाच्या मृत्यूनंतर दिल्लीकडे चाल केली, तेव्हां गोहदकरास मागें मोकळें ठेवून पुढें जाणें त्यास शक्य नव्हतें. दादानें सामोपचारानें त्यास हटकलें असतां तो चढाईचींच बोलणीं बोलूं लागला. तेव्हां प्रथम त्या राण्याचें पारिपत्य करण्यासाठीं दादानें पावसाळ्याचे आरंभींच गोहदेस वेढा घातला. 'दादासाहेब गोहदच्या शहास गुंतले. छावणी झाली. चमेलीपलीकडे राजेरजवाडे एक झाले आहेत; भरतपुरचा जोहरमल्ल याचा सल्ला अद्यापि होत नाहीं. त्याचा भाऊ जवाहीरमल्ल दादांस मिळाला आहे. तो म्हणतो, कीं गोहदचा किल्ला मजला घेऊन देणें, मी तुम्हांस निम्मे मुलूख देतों. त्यांजकडील महालांची जशी वजीर गाजीउद्दीनखान यांजकडेस सांगितली', (ता. ६-१०-१७६६). मराठ्यांस पुढें येऊं देऊं नये, अशी जाट व इतर संस्थानिकांची इच्छा होती. गोहदचा राणा शूर व फौजबंद असून तो निकरानें लढत होता. दादाही हट्टास पेटून गोहद घेतल्याशिवाय सोडणार नाहीं, म्हणून मोर्चे लावण्याची निकड करीत होता. परंतु गोहदकरांचीं कही बाहेर हिंडत असल्यामुळें मराठी लष्करांत दाणावैरण महाग होऊन पैक्याची ओढ झाली. लष्करच्या लोकांत दंगे होऊं लागले. होळकर व गायकवाड अगोदरच दादास सोडून माघारे आले. ता. ११ ऑक्टोबरचें वर्तमानः 'दादासाहेब नित्य तोफांची मारगीर करतात.

१. भा. व. श. पृष्ठ १४; खं. ६. १२१; चं. ले. २०२; ऐ. टि. २. ५४, ४. ४, ५. ९; तह व करारमदार पृष्ठ १६१–१६२; भा. व. २ म. मं. बखर ना. रो. २–१६५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लष्करांत हलाकी फार आहे. होळकरांची फौज इंदुरास आली. वरकडही फौजेंतून राऊत फार उठोन आले. फौजेस रोजमुरा नाहीं. शिंदे आदिकरून बारा पंधरा हजार फौज आहे. गोहदेचा तह उरकून मराठे पुढें येतील, यास्तव जाठाची फौज चमेलीजवळ जमली आहे. रोहिले यमुनेच्या घांटास आहेत'. नारो शंकर ता. २४-११-६६ रोजीं लिहितो, 'दादा समागमें आलीया नफा झाला, तो लिहितां पुरवत नाहीं. इजत वांचवून घरास आलों कीं मिळविली. किल्ला जेर होत नाहीं. नदीचें पाणी उतरतांच जाठ चंबळेच्या अलीकडे यावासा आहे. शिंदे नको म्हणत असतां दादानें हल्ला करविला. त्यांत आपण खासा मोर्चांत जाऊन बसले. हरि भिडे याजकरवीं निशाण उपटून खांद्यावरी नेलें. नारो आम्हांकडील नामी माणूस ठार झालें. परंतु श्रीमंत निशाणें माघारीं येऊं न देत. निशाण जळालें. तीन हल्ला एकामागें एक ऐशा केल्या. त्यामुळें दादांचा फार हिरमोड झाला. वेढा उठविण्याचें त्यांच्या जिवावर आलें. जाठ तर शरण येईना. शेवटीं शिंद्याचे मध्यस्थीनें पंधरा लाख रुपये खंडणी देण्याचा करार करून गोहदकरानें दादाची समजूत काढिली, तेव्हां त्यानें वेढा उठविला. वेढा सुमारें तीन महिने चालून सन १७६७ ज्या जानेवारींत तह झाला'.

बादशहा व सुजाउद्दौला इंग्रजांशीं तह करून स्वस्थ बसले, आणि इकडे जाठ व रोहिले मराठ्यांशीं लढण्यास सज्ज झाले. अशा स्थितींत पुढें चमेली पार जाण्यांत कांहींच फायदा नाहीं, असें वाटून दादा मागें फिरला. त्यास कर्ज होऊन पैशाची ओढ लागली; आणि मोठ्या तयारीनें निघालेल्या स्वारींत अपयश घेऊन त्यास परत फिरणें भाग पडलें. याचा राग त्यानें पुढें पुतण्यावर काढिला. बहिरो अनंत व विठ्ठल शिवदेव यांस मागें बंदोबस्तास ठेवून सन १७६७ च्या फेब्रुवारींत दादा मागें फिरला. २०मार्चची हकीकत. 'तूर्त भेलशाचे ठाण्यास स्वार व प्यादे पाठविले आहेत. उदईक कोट्याकडे जाणार. श्रीमंत नरवरावर आहेत. जाठाचे घरांत कलह लागला आहे. माधवसिंगाकडील दहा हजार फौज श्रीमंतांकडे आली, कीं जाठाचें पारिपत्य करावें. उमराव गीर गोसावीही जाठाचें पारिपत्य करावें, म्हणून आला आहे'. असे उद्योग तीन महिने माळव्यांत करून दादा जून महिन्यांत रेवा उतरून आनंदवल्लीस दाखल झाला. 'या सालीं मातबर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कार्य होऊन आलें नाहीं. किरकोळ कार्य झाल्याचा मजकूर काय? यास्तव पत्र न लिहिलें', असें दादा गोपिकाबाईस ता. २०-४-१७६७ ला लिहितो. 'दादांनीं आम्हांस व विठ्ठल शिवदेवास या प्रांतीं ठेविलें होतें. गोहदकर जाठ जमाव धरून बाहेर निघाला. ह्यांची त्याची लढाई झाली. जाठास मोडून गोहदेंत घातलें. जवाहीरमल्लाची फौज मदतीस घेऊन दोन गड घेतले', असें मे १७६७ त बहिरो अनंत गोपाळरावास लिहितो.

मल्हारराव होळकर मरण पावल्यावर मालेरावास सरदारीचीं वस्त्रें ता. २३-७-१७६६ रोजीं माधवरावानें दिलीं होतीं. परंतु हा मालेराव ता. २७-३-१७६७ रोजीं मरण पावला, तेव्हां होळकराच्या घरांत वारस नाहीं, म्हणून त्या सरदारीची व्यवस्था आपण मर्जीप्रमाणें करून द्रव्य मिळवावें, अशी दादास इच्छा उत्पन्न झाली; आणि पुत्रशोकांत बाईला गांठून पैसा मिळविण्याचा त्यानें विचार केला. होळकराचा कारभारी गंगाधर यशवंत चंद्रचूड, दादाचा कट्टा अभिमानी, या मसलतीस सामील होता. त्या दोघांनीं असें ठरविलें, कीं अहल्याबाईचे मांडीवर दत्तक देऊन त्याचे नांवानें गंगोबानें कुल कारभार करावा. ही व्यवस्था अहल्याबाईस बिलकुल आवडली नाहीं. ती बुद्धिमान् व बाणेदार बाई लग्न झाल्यापासून आज तीस वर्षें सर्व कारभार डोळ्यांनीं पाहत होती. दुसऱ्याचे तंत्रानें वागणें तिला बिलकुल पसंत नव्हतें. तशांत गंगोबा व दादा मतलबानें वागून कारभार कसा बिघडवितात, हें तिला चांगलेंच ठाऊक होतें. तिनें साफ कळविलें, कीं जहागिरीची व फौजेची व्यवस्था मला पाहिजे ती मी मुखत्यारीनें करीन, त्यांत बाहेरच्यांनीं हात घातलेला आपणास अगदीं खपणार नाहीं. तिनें हें माधवराव पेशव्यास कळविल्यावर तें त्यास पसंत पडलें; व त्यानें लगेच लिहिलें, 'तुमचे दौलतीविसीं पापबुद्धि ठेवील त्याचें पारिपत्य बेलाशक करावें. तुमच्याकडील दोघे हुजूर पाठवावे'. त्यावरून नारो गणेश व शिवाजी गोपाळ या दोन खासगीकडील कारकुनांस बाईनें माधवरावाकडे पाठविलें. त्यांनीं सर्व प्रकार माधवरावास समजावून त्यांजकडून अनुकूल जबाब आणविला. परंतु दादानें आपला आग्रह सोडिला नाहीं. त्याचा मुक्काम माळव्यांत असतां त्यानें एकदम फौज घेऊन इंदुरावर चाल करण्याचा धाक घातला. तें पाहतांच अहल्याबाईनेंही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लढण्याची सिद्धता केली. तुकोजीस अहल्याबाईनें फौजेवर मुख्य नेमिलें, आणि गंगोबास कारभारावरून काढून त्याचे जागीं नारो गणेश याची नेमणूक केली; तसेंच या सर्व हकीकती तावडतोब माधवरावास लिहून त्याजकडून कारभाराच्या लेखी सनदा आणविल्या. या सनदा ता. ३ व ता. १० जून १७६७ च्या आहेत. नारो गणेश हा पुढें होळकराचे कारभारांत पंचवीस तीस वर्षे होता. अहल्याबाईची वरील व्यवस्था होण्यापूर्वींच रघुनाथरावानें तिला तंबी देण्याचा प्रयत्न केला. सिंदे, भोसले, गायकवाड, दाभाडे वगैरे सरदारांसह दादाचा मुक्काम उज्जनीचे बाजूस असून, आपल्या मर्जीप्रमाणें न वागल्यास आपण एकदम फौजेनिशीं चाल करूं, असें त्यानें बाईस कळविलें. प्रसंग अत्यंत आणीबाणीचा होता. तुकोजी होळकर दूर होता, त्यास बाईनें तावडतोब आपल्याजवळ बोलाविलें; आणि निकडीनें आपले दूत माधवरावाकडे पाठविले. इकडे भोसले, गायकवाड व दाभाडे दादांपाशीं होते, यांस बाईनें आपली हकीकत समजावून त्यांचीं मनें आपल्याकडे वळविलीं. याप्रमाणें दादाशीं दोन हात करून त्यास आपलें पाणी दाखविण्याचा तिनें निश्चय केला; आणि तो सिद्धीस गेला. दबावाखालीं बाईस नरम आणूं अशी दादास घमेंड होती, ती तिनें बिलकूल चालूं दिली नाहीं. महादजीला दादानें इंदुरावर चाल करून जाण्यास सांगितलें असतां तो बोलला, 'मी जातीनें पेशव्याची पाहिजे ती चाकरी करण्यास तयार आहें. पण या कामास मी आपली फौज लावणार नाहीं'. भोसले व गायकवाड तर उघडच अहल्याबाईस सामील झाले. बाईची तयारी व निष्ठुर जबाब पाहतांच दादा नरमला. सर्व सरदारांनीं व सल्लागारांनीं त्याची निर्भर्त्सना करून हा भलताच नाद सोडून द्या असें सांगितलें. यावरून बाईच्या कर्तबगारीबद्दल सर्व सरदारांत व लहान मोठया नोकरांत केवढी मान्यता व खात्री होती तें दिसून येतें. दादास तर आपला बेत सोडूनच द्यावा लागला. 'आम्ही केवळ सांत्वनार्थ

१. नारो गणेश हा प्रथम अहल्याबाईकडे असून तोच पुढें तुकोजीचा कारभार करूं लागला. खोटे हिशेब समजावून तो बाईस फसवी, म्हणून तो पुढें तिच्या मनांतून उतरला. परंतु कांहीं काळानें तुकोजीशींच त्याचा बेबनाव होऊन तो त्याचा छळ करूं लागला, तेव्हां अहल्याबाईनें त्याचा बचाव केला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आपल्या भेटीस येतों, सरदारींत घालमेल करण्याचा आपला हेतु नाहीं', असें त्यानें बाईस कळविलें. बाई म्हणाली, 'असें आहे तर फौज घेऊन येण्याचें प्रयोजन नाहीं. सडे यावें'. या प्रसंगाचें अस्सल पत्र उपलब्ध आहे तें असें. 'दादा उज्जनीस आले. तेथें आठ मुक्काम होते. राजश्री सदाशिव रामचंद्र यांच्या वाड्यांत चार रोज जाऊन श्रीमंत राहिले होते, त्यास सिंद्यांचा कांहीं ऐवज तेथें होता त्यास त्याच्या पोतनिसाजवळ चौकशी करून, रोख रुपये साडे पांच लक्ष व कापड दोन अडीच लक्षांचें यांशिवाय जवाहीरही घेतलें. तेथून निघून इंदुरास आले. संवत्सर प्रतिपदा येथें केली. एक मुक्काम तेथें होता. त्यास उज्जनीहून अगोदर गोविंदराव तात्यांस इंदुरास पांच सात लक्ष रुपये खर्चास व तोफा मागण्यास बाईकडे पाठविलें. त्यास तिणें साफ सांगितलें कीं, आपणांस एक पैसा द्यावयास मिळत नाहीं. याचप्रमाणें श्रीमंतांची भेट झाल्यावर तात्यांनीं निवेदन केलें. पाडव्याचे दिवशीं श्रीमंतांनीं तात्यांस सांगितलें कीं, आज पाडवा आहे. आम्हांस लोकांस द्यावयास लाख दोन लाखांचें कापड मागणें. त्याजवरून तात्यांनीं कापडाचेंही बाईस विचारलें. त्यास तिनें सांगितलें कीं, श्रीमंत आपल्या वाड्यांत येतील ते समयीं काय अनुकूल पडेल तें कापड व पोशाख व लोकांस देणें तें देऊं. परंतु तेथें कापड द्यावयास अनुकूल पडत नाहीं. त्याजवरून पांच तोफा मात्र घेतल्या'. पुढें उभयतांची भेट झाली, तेव्हां दादाचा सत्कार बाईनें यथायोग्य केला. तसेंच भोसले, गायकवाड वगैरे सरदारांसही कठिण प्रसंगीं आपणांस मदत केल्याबद्दल गौरव करून तिनें निरोप दिला. 'तुम्हीं उपकार केल्यानें आमचा सर्वोपरी बचाव झाला', असें घरोब्याचे वृद्धीचें बोलणें करून बिदा केलें. गायकवाड वगैरे सरदारांचा ओढा अहल्याबाईकडे झालेला पाहून दादास मोठी चीड आली. त्यानें लगेच गुजराथेंत जाऊन गायकवाडास जरब देऊन त्याचे कांहीं महाल व ऐवज घेण्याचा विचार केला. एकंदरींत दादाच्या या स्वारीपासून कोणासच कांहीं लभ्यांश झाला नाहीं[1].

---

१. **आधार.**—खरे ले. ५९४, ६१०, ६३३, ६३४, ७०६, ७१४, ७१५, ७२०, व पृष्ठ १२४४. मा. रो. १-५५, १७२, १७५, १७६, होळकर कै. पृष्ठ ३९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. राजकारणाची परिणति व जाठांचा पाडाव (जून १७६९-जून १७७०).—दादा स्वारींतून परत आल्यावर सन १७६७ च्या पावसाळ्यांत चुलते पुतण्यांचा तंटा प्रथम तडजोडीनें मिटतांच डिसेंबरांत माधवरावानें हिंदुस्थानाच्या स्वारीची तयारी केली. 'होळकरांस उदईक वस्त्रें होतात. नारो शंकर, विठ्ठल शिवदेव व त्रिंबक शिवदेव यांस निरोप देणार. दादांचें कर्ज पंचवीस लाख वारण्यास ऐवज लागला, त्याची पट्टी साऱ्या सरंजामदारांवर घालितात. महादजी सिंदे यांस आज वस्त्रें होणार. हिंदुस्थानांत जाठाचा विचार श्रीमंताच्या ठाण्यास उपद्रव करून नर्मदेपावेतों यावें असा होता. जयपुरच्या माधवसिंगास तो सामील व्हा म्हणत होता. परंतु माधवसिंग त्याजवर चालून गेला. त्यांचें झुंज मातबर झालें. त्यांत खासा जवाहीरमल्ल मोड होऊन ठार झाला. श्रीमंतांचें पुण्य विचित्र आहे'. ता. १५-८-१७६८. ही लढाई मावंदा येथें जयपुर हद्दींत ता. १४ डिसेंबर १७६७ रोजीं होऊन दोनही पक्षांचा पुष्कळच संहार झाला, पण शेवटीं जय जाठास मिळाला. जवाहीरसिंग लढाईंत मारला गेला नाहीं, त्याचा पुढें जुलई १७६८ त खून झाला, असें कानुंगोच्या जाठ इतिहासांत सांगितलें आहे (पृष्ठ २०७-२१८).

यावरून सन १७६८ च्या आरंभीं मराठ्यांचा एक जोराचा सरदार उत्तरेंत जाता तर त्यांचा जम लगोलग बसला असता, परंतु याच वेळीं दादानें माधवरावाशीं लढण्याची तयारी केली. पुढें जून महिन्यांत धोडप येथें दादास झोडपल्यावर लगेच फौजा उत्तरेंत जावयाच्या, तों वाटेंत पुनः जानोजी भोसल्यानें चढाई धारण केली. त्याचें निवारण करीपर्यंत सन १७६९ चा उन्हाळा आला. पुढें दक्षिणेंत निर्वेध झाल्यावर रामचंद्र गणेश, महादजी सिंदे व तुकोजी होळकर यांस माधवरावानें सन १७६९ चे उन्हाळ्यानंतर हिंदुस्थानांत रवाना केलें. त्यापूर्वीं तिकडे होळकराची फौज मात्र थोडी बहुत हालचाल करीत होती. दरम्यान माधवसिंग निवर्तला. त्याचे पुत्रास अहल्याबाईनें राज्यावर स्थापून तेथील बंदोबस्त केला. उत्तर हिंदकडील या वेळची परिस्थिति बाळाजी गोविंद खेरानें ता.५-४-१७६९च्या पत्रांत रामचंद्र गणेशास लिहून कळविलेली ध्यानांत आणिल्यास, पुढील उपक्रम चांगला समजेल. पानिपतानंतर मराठे व अबदाली दोघेही दिल्लीच्या प्रकरणांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निवृत्त झाल्याबरोबर रोहिले, जाठ व वजीर सुजाउद्दौला यांची आपआपसांत झोंबाझोंबी सुरू झाली. बादशहा अलाहबादेस राहून राजधानीस येण्याची सिद्धता करीत होता. दुसरे कोणी साह्य करीत ना, तेव्हां इंग्रजांची कांस धरून त्यानें बंगाल बहारची दिवाणी त्यांस दिली. तरी ते त्यास दिल्लीस घेऊन जाण्यास कबूल होईनात. दिल्लींत त्याचा मुलगा जवानबख्त हा नजीबखानाच्या साह्यानें थोडा बहुत टिकाव धरून होता. मलिका अज्जमानी वगैरे स्त्रियांचेंही त्यास पाठबळ होतें. सुरजमल्लाच्या मृत्यूनंतर नजीबानें जाठांवर स्वारी करून त्यांचा पाडाव केला; आणि आग्रा व अंतर्वेदींत अंमल बसविला. पुढें मराठे इकडे चालून येणार असें कळतांच नजीबानें अबदालीसच पुनरपि हिंदुस्थानांत बोलाविलें; आणि तोही सन १७६७ चे हिंवाळ्यांत पंजाबांत आला, पण शिखांपासून पराभव पावून लगेच परत गेला. पेशव्याचे घरांत चुलतेपुतण्यांचा तंटा लागून ते आपसांत लढूं लागल्यामुळें, नजीबखान संतोष पावून निर्धास्त होता. परंतु ह्या तंट्याचा निकाल होऊन माधवरावानें जेव्हां आपली तडफ सर्व हिंदुस्थानांत प्रगट केली, तेव्हां दिल्लींतील उमराव चिंताग्रस्त झाले. या वेळीं मराठ्यांची एकंदर फौज सुमारें पन्नास हजार उत्तरेंत आली होती. त्यांस एकदम दिल्लीवर जाण्याचा माधवरावाचा हुकूम असतांही, माळव्यांत नानातऱ्हेच्या वाटाघाटी होऊन एकदम दिल्लीवर न जातां, बादशहा, वजीर नजीबखान वगैरे निरनिराळ्या मंडळींशीं बोलणीं करून व त्यांच्याशीं ठराव करून मग दिल्लींत जावें, असें त्यांनीं विचारांतीं ठरविलें. सिंदे, होळकर व रामचंद्र गणेश या तिघांनीं तीन कार्यक्रम वांटून घेतले. पावसाळा असल्यामुळें रामचंद्र गणेश बुंदेलखंडांत छावणी करून पूर्वींचा उठलेला अंमल बसवीत राहिला. सिंदे उदेपुराकडे व होळकर बुंदीकोटाकडे जाऊन त्यांनीं राजपुतान्यांतील खंडण्या वसूल केल्या. पैसा उत्पन्न झाल्याशिवाय त्यांचा खर्च भागणारा नव्हता; आणि पूर्वींप्रमाणें सर्व संस्थानिकांवर जरब बसल्याशिवाय दिल्लीचा पुढील कार्यभाग सिद्धीस जाणें शक्य नव्हतें. सिंद्यानें तर नुसत्या दबावानें कैक वर्षांची खंडणी बाकी राहिलेली वसूल केली. त्यामुळें खर्चाची अडचण निवारण झाली. ता. ४-१२-१७६९ रोजीं होळकराचा सरदार खंडोजी अरगडे लिहितो, 'बुंदीकोट्याचें प्रकरण बारा लक्षपर्यंत चुकणार आहे. पुढें जाठांचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मुलखांत जाऊं. गोपाळराव बर्व्यांची फौज पुढें बिनीस आहे. आठ पंधरा दिवसांत सिंदे येऊन एकत्र होतील. जाठांचें पारिपत्य केल्यास माधवसिंग जयनगरकर पन्नास लक्ष देण्यास तयार आहे. हल्लीं जयनगरास जात आहों. सिंदे आल्यावर एकत्र होऊन जाठांवर जाणार. खेचीवाडा व भोपाळ येथील खंडणी झाली. उदेपुरास सिंद्यांनीं साठ लक्ष खंडणी घेऊन छावणी केली. श्रीमंतांकडे वीस लक्ष रुपये हुंडी करून पाठविले. जाठांचें पारिपत्य केल्यास बादशहाही पन्नास लक्ष देण्यास कबूल आहे. स्वारीची सबनिसी गोपाळराव बर्वे याजकडे आहे. जाठानें आमचे तोंडावर दहावीस हजार फौज पाठविली आहे. शिमग्यांत लढाईचा प्रसंग घडेल'. यावरून उघड दिसतें कीं, सदाशिवरावाच्या वेळेपेक्षां या वेळीं मराठ्यांच्या उमेदी फार उच्च स्वरूपाच्या असून, त्यांनीं आपला दरारा तिकडे चांगलाच बसविला.

इकडे बादशहा व इंग्रज यांचीं अनुसंधानें काय चाललीं होतीं तीं प्रथम ध्यानांत घेतलीं पाहिजेत. सन १७६९ चे अखेरीस कलकत्त्यास इंग्रजाकडे गव्हर्नर कार्टियर याची नेमणूक झाली. त्या पूर्वींच मराठ्यांच्या फौजा हिंदुस्थानांत येऊन मीरकासम वगैरे त्यांजकडे खटपट करूं लागले. सुजाउद्दौला, नजीबखान व मीरकासम हे एक होऊन मराठ्यांस सामील करून घेऊन आपला उद्योग हाणून पाडतील, अशीं इंग्रजांस धास्ती पडली. मराठ्यांच्या कारस्थानांची इत्थंभूत माहिती काशीचा राजा बळवंतसिंग इंग्रजांस लगोलग पुरवीत असे. तो ता. १६-३-१७७० रोजीं लिहितो, 'बंगालचा पदभ्रष्ट नवाब मीरकासम रोहिल्यांकडे जाऊन राहिला आहे. त्याचा विचार रोहिल्यांची व मराठ्यांची मदत घेऊन इंग्रजांशीं लढाई द्यावी असा आहे. गोहदच्या राण्याची व शीखांची मदत तो मागत आहे. शीख व नवलसिंग जाठ यांचा सल्ला झाला आहे. मराठ्यांच्या फौजा करवलीवर राहून जयपुर वगैरे रजपूत राजांकडून जोरानें खंडण्या वसूल करीत आहेत. त्यांचे वकील अलाहबादेस बादशहाकडे बोलणें करण्याकरितां आले आहेत. तेथेंच वजीर सुजाही त्या वाटाघाटींत आहे. मराठे वकिलास त्यानें फैजाबादेस नेऊन पोषाख वगैरे दिले; आणि आपला वकील देऊन त्यास परत सरदारांकडे पाठवून कळविलें, कीं तुम्हीं आपल्या फौजा घेऊन काल्पीवर यावें; म्हणजे आपण पुढील वर्तनक्रम ठरवूं. बादशहानें मीर्झा नजफखानास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दूर करून सुजास हाताशीं धरिलें आहे'. हा बळवंतसिंग पुढें ता. २३ ऑगस्ट १७७० रोजीं मरण पावला. त्या वेळीं काशींत सुजाउद्दौल्याकडून दंगा होईल अशी तेथील लोकांस जबरदस्त भीति पडली होती.

मराठयांचा वकील देवराव महादेव हिंगणे हा १७७९ च्या सेप्टेंबरांत बादशहासंबंधीं बोलणें करण्याकरितां सुजाउद्दौलाकडे गेला होता. त्याचे मार्फत दिल्लीस जाण्यासंबंधीं बादशहाशीं वाटाघाट चालू झाली. मीर्झा नझफखान हा एक गृहस्थ बादशहाचा मुख्य सल्लागार असून त्यास इंग्रजांनीं अंतस्थ रीतीनें आपल्यास अनुकूल करून घेतलें होतें. इंग्रजांकडून त्यास सालीना दोन लाखांची नेमणूक चालू असून तो सदैव त्यांचेंच हित पाहत असे. त्याच्या मार्फत सुजा व बादशहा यांच्याशीं चाललेलीं सर्व कारस्थानें इंग्रजांस कळत होतीं. त्यामुळें सुजावरचा इंग्रजांचा विश्वास उडाला होता. परंतु सुजा स्वतः कोणताच निश्चित पक्ष स्वीकारण्यास तयार नव्हता; दोन दगडींवर हात ठेवून प्रसंग पडेल तसें करण्याचा त्याचा बेत होता. अशा भानगडींत काल-हरण बेसुमार होऊं लागलें. वास्तव मराठ्यांनीं बुंदेलखंडांतून पूर्वेकडे बंगाल्यावर जाण्याचा विचार केला. परंतु इंग्रजांच्या तोफखान्याची भीति सर्वांचे मनावर विशेष असल्यामुळें, ते प्रथम जाठांचे मुलुखावर वळले. दिल्लीचा कबजा घेतल्याशिवाय बादशहास अलाहबादेहून हालवितां येत नव्हतें; आणि दिल्ली हस्तगत होण्यास अडथळा जाठ व रोहिले यांचाच होता. तेव्हां त्या दोघांस प्रथम नरम करण्याच्या इराद्यानें सन १७७० त मराठे चंबळ उतरून व लगेच जाठांचें पारिपत्य करून आग्रा घेऊन बरसातीस अंतर्वेदींत उतरले.

बुंदेलखंडांत गोविंदपंताचे मुलगे बाळाजी व गंगाधर आपसांत भांडत असल्यामुळें बुंदेले राजे चढेल झाले, त्यांस विसाजी कृष्णानें नरम करून ताळ्यावर आणिलें, आणि सन १७६९ चे अखेरीस सर्व फौजा निर-निराळ्या कामगिऱ्या आटपून चंबळवर एकत्र होऊन जाठांचे मुलखांत शिरल्या. जवाहिरमल्ल जाठ मरण पावल्यावर त्याचा अल्पवयी मुलगा केसरीसिंग गादीवर बसला होता. परंतु त्याचा कारभार कोणीं पाहवा या-संबंधानें जवाहिरचे दोघे भाऊ रणजितसिंग व नवलसिंग यांचा कलह लागला असून, त्यांत रणजितसिंगानें मराठयांस मदतीस बोलाविलें. तें निमित्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्वीकारून मराठे सरदार जाठांचे मुलखांत शिरले आणि निरनिराळीं ठिकाणें हस्तगत करून खंडण्या घेऊं लागले. तें बंद करण्यासाठीं नवलसिंग त्यांजवर सहा सात कोस पुढें चालून आला, तेव्हां त्यांची व यांची मारागिरी तीन प्रहर-पावेतों झाली. 'रामचंद्र गणेशानें निकड करून हल्ला केला, तेव्हां जाठांचा मोड झाला, फौज लुटली गेली. तो मात्र सडा शेंपन्नास राऊतांनिशीं पळोन गेला. यांजकडे लूट पुष्कळ आली. तेथील बंदोबस्त करून पुढें गेले. नजीबखान रोहिला याजकडील वकील आला आहे. बोलणें होऊन भेटी सत्वरच होतील'.[१] वरील लढाईस गोवर्धनची लढाई म्हणतात. ती ता. ५ एप्रिल १७७० रोजीं झाली. नवलसिंगाकडे मि० सुमरू व फ्रेंच ज० माडेक हे युरोपियन अंमलदार होते, त्यांचा तुकोजी होळकरानें पराभव केला.

६. नजीबखानाशीं अनुसंधान व त्याचा मृत्यु, (३१-१०-७०).— या वेळची मराठ्यांची जूट व सरसी पाहून नजीबखानास मोठीच धास्ती पडली. त्यास आतां आपल्या पापाचे घडे पूर्ण भरले असें वाटून तो पुनः स्वसंरक्षणार्थ पहिलेच खेळ खेळूं लागला. त्यांत त्यानें होळकराशीं संधान बांधून, मराठ्यांशीं स्नेह ठेवून 'तुमचे उद्योग सफल करून देतों', असें बोलणें आरंभिलें. परंतु नजीबाशीं सख्य ठेवण्याची गोष्ट महादजीस बिलकूल पटली नाहीं. तेव्हां विसाजीपंताचे द्वारें त्यानें आणखी तसेच प्रयत्न चालविले कीं, 'मराठे व नजीबखान या उभयतांनीं एकमेकांस मनापासून साह्य करावें; आणि बादशहास दिल्लीस आणून त्याची सु-व्यवस्था लावून द्यावी'. याप्रमाणें ठरवून नजीबानें बादशहाची मातुश्री झीनत-महाल दिल्लीस होती तिला पत्र लिहिलें, कीं 'ही संधि चांगली आहे. तुम्ही बादशहास लिहून दिल्लीस येण्याची विनंति करा'. इतकें केल्यानंतर नवलसिंगास नरम करण्याचे कामांत नजीबानें जवानबख्तासह आपली फौज आणून मराठ्यांस मदत केली. या मसलतींत पूर्वीचा वजीर गाजीउद्दीनखान-सुद्धां त्यांस येऊन सामील झाला. सर्वांनीं मिळून गोवर्धनच्या लढाईंत प्रथम जाठांचा पाडाव केला, तेव्हां ठिकठिकाणीं ठाणीं बसवून मराठी फौजांनीं पुढें

१. आधार.—का. सं. प. या. ११३, २९-३०; खं. १०. ९२; खं. ६-४३१; खरे ले. ७५४, ७७६, ८०७, १०१५; पर्शियन कॅलेंडर पा. ३ नं. १२८ व प्रस्ता. पृष्ठ २४—२६. कानुंगो—जाठांचा इ०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चाल केली; आणि आग्रा काबीज करून मराठ्यांच्या फौजा यमुना उतरून पावसाळ्यांत अंतर्वेदींत छावणी करून राहिल्या. ता. २१-७-१७७० चें वर्तमान. 'नजीबखान येऊन भेटला. जाठांची मसलत पांसष्ट लक्षांवर ठरली. आठ चहूं रोजांत रुपयांची निशा होईल. मग पठाण अहंमदखान बंगश फर्रुखाबादचा याजवर जाणार. त्यानें तोंडावर दहा हजार फौज घेऊन बाबूराव हरि गेले आहेत. गंगेपलीकडे बंगश चाळीस हजार फौज जमवून उतरला आहे. त्याचें व नजीबखानाचें एक सूत्र आहे, कीं पेशव्यांची मसलत फसवावी. असें असून हे त्रिवर्ग, रामचंद्र गणेश सिंदे व होळकर त्याचे भरीं पडले आहेत. नजीबखान मसलत देतो त्याप्रमाणें हेही नाचतात. कोणाची मसलत कोणाचे खात्रेस येत नाहीं. मराठ्यांचें लष्कर त्यानें आणखी पेंचांत घातलें आहे. नजीबखान महा खेळ्या आहे'.

जाठांचें प्रकरण उरकल्यावर मराठ्यांचीं राजकारणें अवघड होऊं लागलीं. तरी मराठ्यांची जूट व चलती पाहून सर्व शत्रूंस भीति उत्पन्न झाली. रयत लोक त्यांस चळचळां कापूं लागले. नजीबखानानें पानिपतचे प्रसंगीं कपट करून मराठ्यांस बुडविलें, त्याचा सूड घेण्याचें वारें सर्वांचें अंगीं पूर्णपणें संचरलें होतें. महादजी सिंद्यास तर त्याचा सूड केव्हां घेईन असें होऊन गेलें होतें. रामचंद्र गणेशही महादजीच्याच मताचा होता. परंतु होळकर व विसाजी कृष्ण यांचा आग्रह असा पडला कीं, प्रथम नजीबखानाचा तितका उपयोग करून आपला कार्यभाग सिद्धीस न्यावा; आणि मग त्याचें पारिपत्य करावें. हें दुमत सर्वांनीं दक्षिणेंत माधवरावास लिहून पाठविलें; आणि पुढील उपक्रम काय करावयाचा याचा खुलासा विचारिला.

माधवरावाकडून जबाब आला, कीं नजीबाशीं कायमची दोस्ती करूं नये. तूर्त दिल्लीच्या मसलतीस त्याचा शक्य तितका उपयोग करून घ्यावा; आणि मागाहून त्यास जेर करावें. ती गोष्ट महादजीसुद्धां सर्वांनीं मान्य केली. पानिपतपूर्वीं दुआबांतील जितका प्रदेश मराठ्यांचे ताब्यांत होता, तेवढ्याच्या सनदा शहाजाद्याकडून नजीबानें ताबडतोब आणून मराठ्यांस द्याव्या, म्हणजे आपण तुमच्याशीं सख्य ठेवून पानिपतापूर्वीं होता तेवढा प्रदेश तुमचा तुमच्याकडे चालवूं आणि तुमचा बचाव करूं, असें सरदारांनीं नजीबास कळविलें. तेव्हां लगोलग त्यानें तशा सनदा शहाजाद्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कडून आणून दिल्या आणि स्वतः तुकोजी होळकराच्या विचारानें सरदारांचे भेटीस येऊन त्यांचेच लष्करांत नजीबखान व त्याचा मुलगा झबेताखान येऊन जाऊन निर्धास्त राहूं लागले. ता. १९-५-१७७०ची बातमी इंग्रजांस गेली, कीं 'तुकोजी होळकर सर्व लष्करासह यमुना उतरून वृंदावनचे घाटाजवळ राहिला असून त्याचे मागून तीन दिवसांनीं रामचंद्र गणेशही यमुना उतरून तुकोजीचेच शेजारीं तळ देऊन राहिला आहे. महादजी सिंदे यमुनेअलीकडे आहे. त्यांचा विचार अंतर्वेदींतील प्रदेश हस्तगत करण्याचा दिसतो'. प्रथम नजीबखानाचे वाटेस न जातां अहंमदखान बंगश याचा मुलूख हस्तगत करण्याचा उद्योग मराठ्यांनीं आरंभिला. सैफुद्दीन महंमद नांवाचा बादशहाचा वकील मराठ्यांचे बाजूनें कसून खटपट करणारा या वेळीं मराठ्यांकडे येऊन बोलणें करूं लागला. जाठांच्या पाडावामुळें मराठ्यांचा जोर व एकोपा व्यक्त होऊन त्यांचा वचक बसून बादशहासही त्यांचा भरंवसा वाटूं लागला, तेव्हां 'तुम्ही आम्हांस दिल्लीस पोंचवितां, कीं आपण मराठ्यांचें साह्य घेऊन तिकडे जाऊं', असें बादशहानें इंग्रजांस निक्षून विचारिलें. ता. २८ एप्रिल १७७० च्या पत्रांत इंग्रज गव्हर्नरनें त्यास जबाब पाठविला, कीं मराठ्यांचे संबंधांत आम्ही आजपर्यंत आपणांस सांगत आलों तेंच आमचें मत कायम आहे. त्यांच्या शब्दावर बिलकूल विश्वास ठेवूं नका. यापूर्वीं ते इतके वेळां दिल्लीस आले असतां बादशहाच्या कोणत्या इच्छा त्यांनीं पूर्ण केल्या? तुमच्या राज्याचा नाश हाच त्यांचा सर्व फायदा, असें असतां आपलें नुकसान करून ते तुमचा फायदा करतील, असें तुम्हांस वाटतें तरी कसें! असें करतां करतां ते सर्व राज्य बळकावून बसतील, आणि तुम्हांस पोटासाठीं त्यांच्याकडे तोंड वेंगाडणें भाग पडेल. म्हणून इकडील सर्व मंडळी हाताशीं घेऊन प्रथम तुम्हीं यांचाच नाश करणें जरूर आहे. केवळ बादशहाचे कल्याणाची कळकळ आम्हांस वाटते म्हणूनच लहान तोंडीं मोठा घास घेऊन हा सल्ला आम्ही आपणांस देत आहों'. परंतु इंग्रजांच्या या सल्ल्याची बादशहास जरूरच नव्हती. मराठ्यांनीं बादशहाकरितां पानिपतावर केवढा घात स्वतःचा करून घेतला हें तो जाणत असून सुजाउद्दौला, नजीबखान, इंग्रज व मराठे, ह्या प्रत्येकाच्या कर्तृत्वाची त्यास चांगली माहिती होती. राजधानी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

शिवाय राज्य नाहीं हें ओळखून इंग्रजांचे थापांस तर तो अगदीं कंटाळून गेला होता. नजिबखानावरही त्याचा विश्वास यत्किंचित् नव्हता. मराठ्यांची छावणी अंतर्वेदींत होतांच सुजा त्यांस जाऊन भेटला. त्यांच्याशीं संगनमत करून सरदारांनीं बादशहास दिल्लीस आणण्याचें ठरविलें. 'अंतर्वेदींत श्रीमंतांची फौज घेऊन रामचंद्र गणेश आले आहेत. तिकडे सुजाउद्दौला गेला आहे'. ता. १०-८-१७७० रोजीं बादशहानें रामचंद्र गणेशास कळविलें, कीं सुजाचा व आमचा स्नेह पक्का झाला असून इंग्रज किंवा सुजा यांच्याहून जास्त निष्ठेनें, आम्ही आपली सेवा करून दिल्लीचा कारभार सुरळीत करून देण्यास तयार आहों, असें आपण कळविलें तें ऐकून आम्हांस संतोष झाला. सुजांनींही त्यासंबंधानें खातरजमा केली. बोलतां त्याप्रमाणें करून दाखवा म्हणजे इंग्रज व सुजा यांच्याप्रमाणेंच आमचें प्रेम तुमच्या ठिकाणीं राहील'. याच मतलबाचीं पत्रें बादशहानें याच तारखेस पेशवे माधवराव, तुकोजी होळकर व विसाजीपंत यांस लिहिलीं. परंतु बादशहाचे अंगीं निश्चय किंवा कर्तृत्व बिलकूल नव्हतें. यामुळें जो कोणी त्यास साह्य करी तोच फशीं पडे. गाजीउद्दीननें त्याच्या बापास ठार मारिलें असल्यामुळें तो मराठ्यांचे मसलतींत असलेला पाहून बादशहास त्यांचा भरंवसा येईना. नजीबखानावर तर त्याचा विश्वास नव्हताच. इकडे आईनें बादशहास वारंवार विनंति करून लिहिलें, कीं 'मराठे जवळ आले, आतां तुम्ही येथें लवकर याल तरच निभाव लागेल, नाहीं तर माझी धडगत नाहीं'. त्यावरून बादशहानें दिल्लीस जाण्याचाच निश्चय ताबडतोब केला. आपले मदतीस इंग्रजांचीं चार पलटणें त्यानें मागितलीं. मीर्झा नझफखान यास दिल्लीस पाठवून मराठे सरदारांस त्यानें कळविलें, कीं आम्ही लवकरच दिल्लीस येतों; दुसरा कोणी राजपुत्र तुम्हीं तख्तावर बसवूं नये, आणि जवानबख्ताचा सांभाळ करावा'.

बादशहाचा हा निश्चय पाहून इंग्रजांचे पोटांत दुखूं लागलें. मुनीरुद्दौला नांवाचा बादशहाचा वकील इंग्रजांजवळ होता, त्यास त्यांनीं अलाहबादेस पाठवून बादशहाची पुष्कळ कानउघाडणी केली. इकडे इंग्रजांशीं हातघाईचा प्रसंग आणण्याची मराठ्यांस बिलकूल इच्छा नव्हती. म्हणून माधवराव पेशवा व रामचंद्र गणेश यांनीं मुद्दाम सन १७७० च्या ऑगस्टांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कलकत्त्यास इंग्रजांकडे आपला वकील हरि पंडित यास नजराणे देऊन पाठविलें आणि त्यांच्याशीं स्नेहभाव दर्शविला. ता. २७-९-१७७० रोजीं खालील पत्र माधवरावानें इंग्रजांस लिहिलें. 'तुमचा आमचा मित्रभाव असतां पुष्कळ दिवसांत तुमचेकडून दोन ओळींचें पत्र सुद्धां येत नाहीं हें अपूर्व आहे. परंतु पत्र न आलें तरी तुमचे आमचे मित्रत्वांत तफावत असण्याचें कारण नाहीं. हल्लीं आमच्या फौजा घेऊन रामचंद्र गणेश हिंदुस्थानचे बंदोबस्तास गेले आहेत. तो बंदोबस्त करितांना तुमच्या सूचना येतील त्या मान्य करण्याविषयीं आम्हीं रामचंद्र गणेशास फर्माविलें आहे. यासंबंधानें बोलणें करण्याकरितां आमचे वकील हरि अमानजी पंडित यांस पूर्वींच आपल्याकडे रवाना केले आहेत. खैरखबरीचीं पत्रें वरचेवर येत असावीं'. उत्तरहिंदच्या कारस्थानांत मराठे व इंग्रज हे दोनच प्रतिपक्षी असून दोघेही एकमेकांस वचकून होते, ही गोष्ट या वेळच्या पत्रव्यवहारावरून निदर्शनास येते. इंग्रजांच्या खटपटीमुळें बादशहाचें दिल्लीस जाणें एक वर्ष लांबलें. नाहीं तर सरदारांचा कार्यभाग लगोलग सिद्धीस गेला असता.

मराठ्यांचें लष्कर दिल्लीवर एकदम चालून न जातां अंतर्वेदींत शिरलें यामुळें तिकडील सत्ताधीशांचे अंदाज पुष्कळसे चुकले. दिल्ली एकदम मराठ्यांचे हस्तगत होण्यास विलंब लागला नसता, परंतु शहाजादा किंवा झीनतमहाल वगैरे बायांस निष्कारण धास्ती घालणें मराठ्यांस योग्य वाटलें नाहीं. मालक जाग्यावर नसतां राजधानी शहर हस्तगत केल्यानें कसा गैरसमज होतो, याची आठवण पूर्वींच्या सदाशिवरावाच्या अनुभवावरून सर्वांस होती. त्यास अनुसरून केवळ पूर्वींचा अंमल बसविण्याकरितां म्हणून नजीबखानाचे सल्ल्यानें मराठी फौजा प्रथम अंतर्वेदींत गेल्या. फर्रुखाबादचा नबाब अहंमदखान बंगश यानें आपल्या ताब्यांतले १६॥ परगणे पानिपतापूर्वीं मराठ्यांस ताम्रपट करून दिले होते ते पुढें त्यानें परत घेतले, तेव्हां ते परत देण्याकरितां रामचंद्र गणेशानें मागणी केली असतां, ती बंगशानें साफ नाकबूल केली. तेव्हां त्याजवर स्वारी करण्याच्या इराद्यानें मराठ्यांनीं आपली छावणी गंगेच्या कांठीं रामघाट येथें केली. नदीच्या पलीकडे अहंमदखानाचा तळ होता. परंतु या ठिकाणीं नद्या भरून चालल्या असल्यामुळें मराठ्यां-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

च्या हालचाली बंद होऊन ते कोंडले गेले; आणि सर्व सूत्रचालक नजीबखान यानें पुनः आपणांस आणून भयंकर अडचणींत घातलें, अशी अल्पकाळ मराठ्यांची समजूत झाली. आजूबाजूचा प्रदेश सर्व शत्रूंचा होता. बंगश व नजीबखान यांचें अंतस्थ सूत होतें; आणि मराठ्यांच्या अडचणींचा फायदा घेण्यास सुजा व इंग्रज टपलेले होते. आपल्या लष्कराची ही वार्ता ऐकून दक्षिणेंत पेशव्यास मोठी चिंता उत्पन्न झाली, आणि त्यानें लगोलग दुसरी फौज मदतीस पाठविण्याचीही तयारी केली. इतक्यांत सरदारांनीं युक्तीनें आपल्या फौजा यमुनेअलीकडे आणिल्या, तेव्हां संकट निरसन झालें. दुसरें असें झालें, कीं याच सुमारास नजीबखान हा आपला मुलगा झबेताखान यास मराठयांचे लष्करांत ठेवून आपण नजीबगड येथें जात असतां रस्त्यांतच ता. ३१-१०-१७७० रोजीं एकाएकीं मरण पावला; आणि इकडे नद्यांचें पाणी ओसरून मराठयांचा संचार चहूंकडे सुगम झाला. 'रामचंद्र गणेश फौजेसह यमुनेपलीकडे एक जागां कोंडून अडकले होते, ते अलीकडे आले, आतां कोण्डचा शह नाहीं, तिकडे फौजा पाठविण्याचा मनसबा होता तो राहिला. श्रीमंतांचें पुण्य समर्थ. असें ता. १९-१०-१७७० चें म्हणजे नजीबखानाच्या मृत्यूपूर्वींचें वर्तमान आहे. नानातऱ्हेच्या उलाढाली करून प्यादयाचा फर्जी झालेला व पंधरा वर्षें मराठयांस त्रास देणारा हा दिल्लींतील शेवटचा उमराव नाहींसा होतांच पुढील कारस्थानांस निराळें वळण लागलें.'[1]

७. बादशहाचें दिल्लीस प्रयाण, (१२-४-१७७१—२६-१२-७१).—नजीबखानाचे मृत्यूचें वर्तमान येतांच रामचंद्र गणेशानें झबेताखानास ताबडतोब नजर कैदेंत ठेविलें. त्याच्यापासून दंड व मुलूख घेऊन मग सोडावें असा सिंदे व रामचंद्र गणेश यांचा बेत होता; परंतु तुकोजी होळकरानें त्याचे बापास संरक्षणाची शपथ दिली असल्यामुळें, त्यानें झबेताखानास एका अंधेऱ्या रात्रीं मराठी लष्करांतून बाहेर काढून दिलें. अर्थात् बाहेर गेल्याबरोबर झबेताखानानें बादशहाकडून मीरबक्षीगिरी मिळवून मराठ्यांशीं लढाई

---

१. आधार.—खरे ले. १००१, १०१५, १०४३; पर्शियन कॅलेंडर्स भाग ३. १९०, २१६, ३५४, ३८७, ३२५—३२८, ४६९, ९१३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करण्याची खटपट चालविली. कार्तिक महिना सुरू होतांच मराठे दुआबांत चहूंकडे लूटालूट करूं लागले. बंगशाची फौज त्यांजवर चालून आली. त्यांचे मदतीस रोहिला सरदार हाफीज रहमतखान आपली आणखी फौज घेऊन आला. परंतु या वेळीं मराठ्यांचा आवेश व शिस्त इतकी कांहीं परिपूर्ण होती, कीं तीन चार महिने अनेक लढाया होऊनही दरएक प्रसंगीं मुसलमानांचाच पाडाव होत गेला. दुआबांतील बहुतेक प्रदेश त्यांनीं हस्तगत करून लुटला आणि रोहिल्यांची धूळदाण उडवून दिली. ता.१५-१२-७० रोजीं महादजी सिंदे व रामचंद्र गणेश यांनीं इटाव्याचा किल्ला हस्तगत करून फर्रुखाबादेवर चाल केली. आपलें सारेंच राज्य आतां जाणार असें पाहून मे महिन्यांत अहंमदखान बंगश मराठ्यांस शरण आला; आणि पानिपतपूर्वीप्रमाणें सर्व प्रदेश मराठ्यांस देऊन त्यानें आपला बचाव केला! यानंतर लवकरच म्हणजे सन १७७१च्या ११ जुलईस हा दुसरा महत्त्वाचा मुसल्मान सरदार मृत्यु पावला. यापूर्वींच रोहिला सरदार हाफीज रहमत ही मोहीम सोडून स्वसंरक्षणार्थ आपल्या मुलखांत निघून गेला होता. सुजाउद्दौला दोहोंकडे संधान ठेवून आपला बचाव करून तटस्थ होता. अशा रीतीनें मराठ्यांचा शत्रुपक्ष पुष्कळच हलका झाला.

यापूर्वींच पठाण—रोहिल्यांचा व मराठ्यांचा तह ठरवून युद्ध मिटविण्याचा प्रयत्न गाजीउद्दीन यानें पुष्कळ केला होता. परंतु सिंदे—होळकरांतील चुरसीमुळें तो सिद्धीस गेला नाहीं. तेव्हां गाजीउद्दीन तुकोजीचा आश्रय पत्करून अजमीर येथें जाऊन राहिला. झबेताखानासही तुकोजीनें आपल्याजवळ आश्रय देऊन ठेविलें. मराठ्यांचे उद्देश परिपूर्ण होण्याच्या ऐन रंगांत येत असतां त्यांचीं आपसांतील भांडणें मात्र विकोपास चाललीं. झबेताखानास तुकोजीनें आपल्याजवळ आश्रय दिला, ही गोष्ट महादजी, रामचंद्र गणेश व विसाजीपंत या तिघांसही रुचली नाहीं. त्यांनीं धाक दाखविल्याबरोबर तुकोजीनें झबेताखानास आपल्या जवळून घालवून दिलें. पुढें बादशहाचा विचार दिल्लीस लवकर येण्याचा दिसेना; तेव्हां सरदारांनीं तेथें जाऊन दुसराच इसम तख्तावर स्थापण्याचा धाक घातला, (फेब्रुवारी १७७१); आणि गाजीउद्दीनखानास जवळ आणिलें. झबेताखान मात्र त्यांस सामील नव्हता, व तुकोजी होळकरही तटस्थ होता. मराठे दुसरा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बादशहा तख्तावर बसविणार ही वार्ता ऐकून सर्व मंडळींचें धाबें दणाणलें. सुजाउद्दौला तर घाबरून गेला. त्यानें तावडतोब इंग्रजांची मदत मागितली. 'दिल्लीहून दोन कोसांवर शेरगंज येथें मराठ्यांचा मुक्काम झाला आहे, मीर कासम व गाजीउद्दीनखान हे त्यांजबरोबर आहेत. ता. ७-२-१७७१ रोजीं सैफुद्दीन महंमदखानास दिल्लींत पाठवून त्यांनीं शहाआलम बादशहाची द्वाही फिरविली आणि किल्ल्याचा तावा मागितला. बेगमनें किल्ला मराठयांचे ताब्यांत देण्याचें नाकारिलें. त्यावरून मराठयांनीं तोफा आणून किल्ल्यावर मारा चालविला, त्याबरोबर ता. १०-२-१७७१ रोजीं किल्ला मराठयांचे हस्तगत झाला. 'सरकारचे झेंडे दिल्लीस उभे केले. त्यांनीं शहाजाद्यास बादशहाचे नांवानें तख्तावर बसवून नजरा केल्या; आणि आपला एक सरदार फौजबंद त्याजपाशीं ठेवून दिला आहे. आम्हीं फर्रुखाबादेहून दिल्लीस आलों. शहर व किल्ला हस्तगत करून सरकारचा अंमल बसविला. पातशहा अलीगोहरची द्वाही फिरविली. या उपरी पातशहातीचा बंदोबस्त करावा; फौजेचे खर्चास पैका मेळवावा ऐसा इरादा आहे'. या गोष्टी ऐकून इंग्रज अतिशय बेदील झाले; आणि तुम्ही मराठ्यांकडे जाऊं नका म्हणून बादशहाचीं नानाप्रकारें आर्जवें करूं लागले. सुजाउद्दौल्यासही त्यांनीं वारंवार लिहिलें, कीं 'तुम्ही मध्यें पडून मराठ्यांचा प्रतिकार करा. रोहिल्यांवरील मोहीम सोडून हे एकदम दिल्लीवर कां आले तें समजत नाहीं. सर्व हिंदुस्थान आतां मराठे जिंकणार हें बरें नाहीं. गरीब असहाय रयतेचा कैवार तुम्हीं घेतला पाहिजे. झबेताखान सुद्धां मराठयांस मिळून गेला हें फार वाईट झालें. तुमच्याजवळ चांगली लढाऊ फौज आहे. तुम्ही सर्व एक होऊन मराठ्यांवर चाल कराल तर त्या लबाडांचा फन्ना उडवून द्याल'. इंग्रजांनीं कांहीं बनावट पत्रें सुद्धां बादशहाचे हातीं पाडिलीं. परंतु अशा शाब्दिक उपदेशापलीकडे इंग्रजांनीं बादशहाचे जाण्यास कोणताही अडथळा केला नाहीं. आपण त्याचा उपयोग जरुरीपुरता करून घेतल्यावर, पुढें जर तो सव्वीस लक्षांच्या नेमणुकीवर आणि कुरा अलाहबाद प्रांतांवर पाणी सोडून जातो तर जाईना. हातीं आलेल्या ग्रासांत दुसऱ्यानें ढवळाढवळ करूं नये, एवढी खबरदारी मात्र इंग्रजांनीं ठेविली, आणि पुढें काय प्रकार होतात हें पाहत ते स्वस्थ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बसले. मराठ्यांकडेही इंग्रजांनीं संधान ठेवण्यास कमी केलें नाहीं. कलकत्याचे गव्हर्नरानें मराठ्यांस कळविलें, कीं 'तुम्हीं दिल्ली सोडून जात असाल तर तुम्हांस आम्हीं पांच लाख रुपये देऊं'. परंतु इतक्यांत त्यांस अशी खोटीच बातमी आली, कीं 'माधवराव पेशवे मृत्यु पावला, आतां मराठी फौजा आपोआपच परत जातील; आणि आपले पांच लाख रुपये वांचतील', असें जनरल बारकर सुजास ता. १०-३-१७७१ रोजीं लिहितो. ता. ३-४-१७७१ चें वर्तमान. 'मराठे दिल्लीचा किल्ला हस्तगत करून बसले आहेत. झबेताखान शुक्रताल येथें किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला आहे. त्याजवर चालून जाण्याचा मराठ्यांचा विचार चालला आहे. बादशहांनीं दिल्लीस येण्याचा विचार कायम करून ता. २९-३-१७७१ रोजीं अलाहबादेहून निघण्याचा बेत ठरविला आहे'. या पूर्वींच ता. १२-२-१७७१ रोजीं मराठ्यांचा बादशहाशीं करार झाला त्यांतील कलमें:—प्रथम मराठ्यांची मागणी असून त्याखालीं शहाजाद्यानें करार लिहून दिला आहे.

१. राजधानी व किल्ला बादशहाचे हवालीं केल्यावर पंचवीस लाख रुपये खर्चाबद्दल मराठ्यांस द्यावे. उ०—आठ दिवसांत दहा लाख रुपये देऊं.

२. बादशहा दिल्लीस येऊन पोंहचतांच पंधरा लाख रुपये द्यावे; ते न आल्यास दोन महिन्यांनीं द्यावे. उ०—बादशहा आल्यास रक्कम देऊं, न आल्यास प्रांतांच्या वसुलांतून घ्यावे.

३. पूर्वींच्या शिरस्त्याप्रमाणें मीरट वगैरे प्रदेशाच्या सनदा मराठ्यांस द्याव्या. उ०—देऊं.

४. मराठ्यांनीं आपले पूर्वींचे शिरस्ते चालवावे. उ०—कबूल.

५. वजिरीशिवाय बाकीच्या सर्व नेमणुका मराठ्यांनीं आपल्या मर्जीप्रमाणें कराव्या. उ०—कबूल.

याप्रमाणें ठराव होऊन बादशहा अलाहबादेहून शुक्रवार, ता. १२ एप्रिल १७७१ रोजीं निघाला. कुरा परगण्याच्या हद्दीपर्यंत इंग्रज फौज त्यास पोंचविण्यास आली; व सुजाही आपल्या हद्दीपर्यंत आला. जाजमौ येथें बादशहाचा मुक्काम ता. ३ जून रोजीं झाला. २६ जुलई रोजीं तो फर्रुखाबादेस पोंचला. या सालीं सर्व मराठे सरदारांनीं आपला तळ दिल्लीजवळ दिला, यमुनेपलीकडे फौज ठेविली नाहीं. बादशहा निघून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गेल्यावर अलाहबादचा किल्ला त्यानें वजिरास दिला. पण इंग्रजांनीं तो स्वत:कडे ठेविला, वजिरास दिला नाहीं. शेवटीं सुजाउद्दौल्यानें या किल्ल्याबद्दल इंग्रजांस लिहिलें कीं, 'तुम्ही आमचे परम दोस्त आहां, तेव्हां किल्ला माझे हातांत असला काय किंवा तुम्हां दोस्तांचे हातांत असला काय सारखाच. वास्तविक तुम्ही दोस्त कधीं माझें नुकसान करणार नाहीं ही मला खात्री आहे'. याशिवाय याच वेळीं इंग्रजांनीं वजिराचा चुनारगड किल्ला सुद्धां मागून आपल्या ताब्यांत घेतला. अलाहबादेस कॅ० गॅलेझ (Capt. Galliez) व लखनौस कॅ०हारपर (Capt. Harper) हे इंग्रज अंमलदार होते. फर्रुखाबादेहून बादशहानें आपले लोक पुढें पाठवून दिल्लीचा ताबा मराठ्यांकडून मागितला. त्याप्रमाणें मराठयांनीं ता. १२-८-१७७१ रोजीं दिल्लीचा किल्ला त्याचे हवालीं केला. यानंतर बादशहा दिल्लीस लवकर पोंचला असता; परंतु अहंमदखान बंगश ता. ११ जुलई रोजीं मरण पावल्यामुळें त्याचे मुलांची व्यवस्था करण्यासाठीं फर्रुखाबादेजवळ नबीगंज येथेंच बादशहा छावणी करून राहिला. इंग्रजांकडून सव्वीस लक्ष नेमणूक दरसाल बादशहास यावयाची, ती त्यांनीं देण्याचें बंद केल्यानें बादशहाची गैरसोय होऊं लागली; म्हणून त्यानें इंग्रजांस त्याबद्दल जोरानें लिहिलें. बादशहाची ही मागणी नाकारतांना सुद्धां इंग्रजांनीं अशी कांहीं गोड व खुबीची भाषा आपल्या पत्रांत वापरली, कीं भाषेंतच त्यानें मोहून जावें. पावसाळ्यानंतर बादशहा दिल्लीकडे निघाला. त्याचा तळ अनुपशहराजवळ ता. १८ नोव्हेंबर रोजीं झाला. तेथें मराठे सरदार त्यास घेण्यास सामोरे आले. ते येईपर्यंत बनियागंज येथें बादशहाचा मुक्काम होता. ता. १८नोव्हेंबर रोजीं महादजी सिंद्यानें बादशहाची भेट घेतली. रोहिल्यांचें पारिपत्य करण्याचा करार ठरवून, आणि दिल्लीच्या बाहेर कांहीं दिवस सर्व सरदारांच्या व बादशहाच्या भेटी होऊन, सिद्धता झाल्यावर ता. २५ डिसेंबर १७७१ रोजीं मोठया समारंभानें बादशहानें दिल्लींत प्रवेश व सिंहासनारोहण केलें. येणेंप्रमाणें दोन वर्षांचा उद्योग फलद्रूप होऊन माधवराव पेशव्याचा हेतु सिद्धीस गेला, आणि सर्व हिंदुस्थानभर त्याच्या कारभाराची वाहवा झाली. वास्तविक मराठयांच्या कृत्यानें या वेळीं दिल्लींत नवी सृष्टि बनली. अनुभवी रोहिले सरदार नजीबखान ता. ३१-१०-१७७० रोजीं, दुंदेखान

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. १७-४-१७७१ रोजीं व अहंमदखान बंगश ता. ११-७-१७७१ रोजीं एकामागून एक अल्पावकाशांत मरण पावल्यामुळें मराठ्यांचें कार्य सुकर झालें. आलेल्या या संधीचा उपयोग त्यांनीं चांगला केला. एक हाफीज़ रहमतखान मात्र जुन्यांपैकीं राहिला, त्याचा पुढें मराठे सरदारांनीं पाडाव केला. बादशहास दिल्लीस आणल्याबद्दल ता. २१-२-१७७२ च्या पत्रांत माधवरावानें सरदारांचें अभिनंदन करून खुलासे विचारले ते असेः—'पातशहास आणून तख्तावर बसविलें हे कीर्ति स्वामीची दिगंतरास गेली. इराण, तुराण, बदकशानपर्यंत खबरा गेल्या. तमाम अमीर व राजेरजवाडे व जमीदार वगैरेकडून पातशहास नजरा येतात. पातशहा स्वमुखें हा प्रताप स्वामींचा म्हणोन वारंवार स्वामीचा स्तव करितात, म्हणोन तपशिलें लिहिलें कळलें. ऐशास पातशहा आलम बहुत दिवस भटकत फिरत होते, इंग्रज व सुजाअतद्दौला यांचा आसरा करून होते. तत्रापि दिल्लीस आणून तख्तावर बसविणें हें त्यांस दुरापास्त होतें. त्यांस हे गोष्ट न जहाली. तुमची व सरदार होळकरांची विमनस्कता असतां, तुम्हीं व राजश्री महादजी शिंदे यांनीं पातशहाशीं राजकारण करून त्यांस प्रयागाहून आणून दिल्लीस स्थापना केली, याचा लौकिक मोठा असाधारण जाहला. कीर्तिस्पद प्रकारांत न्यून नाहीं हें खरें; परंतु पातशहांनीं तुम्हांशीं पैका व मुलूख द्यावयाचा व कितेक मतलब करून द्यावयाचा करार केला, त्यास त्यांपैकीं पैका व मुलूख पातशहांनीं तुम्हांस काय दिल्हा? तीन छावण्या गुजरल्या; चवथी छावणी समीप आली; फौजेची उस्तवारी कशी केली व करणार? यांत पातशहाचा मतलब, जे गोष्ट कोणास जाहली नाहीं ते गोष्ट हिंमत बांधून तुम्हांजवळून करून घेतली. हे गोष्ट मात्र त्याची सिद्ध जाहली. आपले स्वहिताचा प्रकार कसा? सर्वा गोष्टींची गोष्ट सरकारची फौज खराब जाहली. त्याप्रमाणें पैका व मुलूख तों साधलाच पाहिजे. प्रयाग व काशीचे मतलब होऊन यावे, ते तुम्हीं करून घेतलेच असतील. ज्यापक्षीं सलतनतच्या (राज्याच्या) बंदोबस्ताचा हवाला तुम्हांकडे लागला, तेव्हां फौजेची उस्तवारी व कर्जपरिहार करणें तुम्हांस अगाध नाहीं. सरकारांत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खजाना पाठवून द्याल ऐसें दिसतें व तुम्ही या तरतूद साधनेंत असालच. कसकसें योजिलें आहे तें लिहून पाठविणें'.[1]

८. रोहिल्यांचा पाडाव, व पानिपतचा सूड.—यापुढें फक्त रोहिल्यांचा अडथळा उरला होता आणि नजीबखानाचे घराण्याचा सूड घेण्याचा महादजीचा संकल्प होता. त्यास अनुसरून लगेच विसाजीपंत व महादजी यांनीं बादशहास बरोबर घेऊन सन १७७२ त रोहिल्यांवर चाल केली. रोहिल्यांस जिंकून त्यांचा प्रान्त आपल्या ताब्यांत आणणें हें बादशहाचेंही कामच होतें. या युद्धाचा सर्व मारा झबेताखानावर पडला. हाफीज रहमतनें त्यास मदत केली नाहीं. त्यांस अटकाव करण्यासाठीं रोहिल्यांच्या टोळ्या गंगेच्या काठीं ठिकठिकाणीं जमा झाल्या होत्या. परंतु महादजी सिंद्यानें हुलकावणी दाखवून गंगेच्या पलीकडे जाऊन रोहिल्यांची कत्तल उडविली. झबेताखान शुक्रतालच्या किल्ल्यांत बंदोबस्तानें राहिला असतां त्याजवर सिंद्याचे तोफांचा मारा होतांच झबेताखानाची दाणादाण उडाली; आणि तो स्वतः काळोख्या रात्रीं निसटून गंगेपलीकडे बिजनोर प्रांतांत गेला. त्याचे पाठोपाठ मराठ्यांनीं जाऊन सर्व प्रांत लुटून उद्ध्वस्त केला. पुढें झबेताखान नजीबगडास गेला, तेंही ठिकाण मराठ्यांनीं हस्तगत केलें. त्याचीं मुलेंमाणसें व जामदारखाना नजीबाबादेस होतीं. वेढा घालून मराठ्यांनीं तें स्थळ लगेच हस्तगत केलें. नजीबाबादेसच मराठ्यांचे लेखांत 'फत्तरगड' असें नांव दिलेलें आहे. तेथें नजीबखानाची कबर होती ती फोडून त्यांनीं छिन्नविच्छिन्न केली. पानिपतावरून नेलेली मराठ्यांची अपार संपत्ति येथें होती ती सर्व व झबेताखानाचीं बायकामुलें मराठ्यांच्या हातीं पडलीं. पानिपतावर कैद केलेल्या कांहीं मराठी बायकाही या वेळीं

---

१. **आधार**.—कैफियती व यादी पृष्ठ १६० वरील पत्रें; बु. प्र. पृष्ठ १५९ वरील पत्र; खरे ले. १११०; पर्शियन कॅलेंडर्स, भाग ३ रा–५४४, ५६९, ५७१, ६०५, ६१४, ६२५, ६३०, ६३२, ६४९, ६५०, ६५८, ६६७, ६६९, ६९०, ६९४, ६९५, ७१९, ७५९, ७६६, ७७४, ७८६, ७९५, ८१०, ८१२, ८३७, ९०७, ९३४, ९३५, ९३७, ९४१, ९७९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांपडल्या असें म्हणतात. दुसरा एक मजबूद किल्ला घोसगड म्हणून होता. तोही मराठ्यांनीं हस्तगत केला. येणेंप्रमाणें सर्व रोहिलखंड त्यांच्या हस्तगत झालें आणि त्या सर्व प्रदेशांत मराठ्यांनीं धुमाकूळ उडवून दिला. कत्तल, लुटालूट, जाळपोळ यांत त्यांनीं आपली शिकस्त करून पानिपतचें उसनें फेडण्यांत कांहीं कमी केलें नाहीं. नजीबखानाच्या राज्याचा आपण विध्वंस करून पुरेपूर सूड घेतला याबद्दल महादजीस पुढें नेहमीं मोठा अभिमान वाटे. 'रोहिले इतके शूर, परंतु मराठ्यांचा एखादा स्वार दृष्टीस पडतांच त्यांनीं आपल्या जागा सोडून धूम पळत सुटावें, असें झालें. मराठ्यांसमोर उभे राहण्याचा मगदूर कोणाचा राहिला नाहीं. लोक राहता प्रदेश सोडून हिमालयाचे पायथ्याशीं तराईंत पळून गेले. झबेताखान जाठांचे आश्रयास जाऊन राहिला'. नारायणराव पुण्याहून विसाजी कृष्णास ता. २८-५-१७७२ रोजीं लिहितो, 'तुम्हीं विनंतिपत्र पाठविलें तें प्रविष्ट जाहलें. जाबतेखानास मोडून ताराज केलें, तो पळून पहाडांत गेला, युद्ध मोठें जालें, शुक्रताल घेतलें, पथ्थरगड घेतला, त्यांची दौलत, हत्ती, घोडे, तोफा, वगैरे सरंजाम पाडाव केला, स्वामीच्या फौजेस मोठें यश आलीयाचा विस्तार लिहिला, तो श्रवण होऊन संतोष जाहला. या प्रसंगीं तुम्हीं सर्वांनीं युद्धाची तरतूद फार चांगली केली. अमित यश संपादिलें. शाबास! रोहिला अति गर्वित होता व त्यांनीं अन्याय फारच केले होते. त्याचें अन्यायानुरूप पारपत्य यथायुक्त जाहलें. या उपरील तिकडील वर्तमान लिहीत जाणें. याप्रमाणें सर्व ठिकाणीं सन १७७२ त आपला अंमल बसवून मराठी फौजा छावणीसाठीं दिल्लीस परत आल्या. मीरबक्षीगिरी झबेताखानाचे नांवें होती ती महादजी सिंद्यानें नारायणराव पेशव्याचे नांवें बादशहापासून करून घेतली, यास्तव होळकर व सिंदे यांचें वांकडें आलें. मीरबक्षीगिरी आपणांस द्यावी म्हणून झबेताखानानें बादशहाकडे खटपट चालविली होती, तिला होळकर व बिनीवाले अनुकूल झाले, याचा महादजीस राग आला. मराठे मंडळांत फूट पाडण्याचा सुजा व इंग्रज यांचा प्रयत्न सारखा चालूच होता. बादशाहीचा पाडाव मराठ्यांनीं केला व पानिपतचें नुकसान भरून काढलें, हा प्रकार तिकडे हिंदुस्थानांत कोणासही रुचला नाहीं. विशेषतः या कारस्थानाच्या मुळाशीं इंग्रज होते. त्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संबंधानें माधवरावाचा अभिप्राय अन्यत्र दिलाच आहे. रामचंद्र गणेश व विसाजी कृष्ण यांजमध्यें एकसारखीं भांडणें होत होतीं; आणि त्यासंबंधाच्या तक्रारी वारंवार पुण्यास पेशव्याकडे जात होत्या. त्या ऐकून सन १७७१चे उन्हाळ्यांतच रामचंद्रपंतास पेशव्यानें परत बोलावून फौजेचें काम विसाजी कृष्णास सांगितलें. त्यावरून सन १७७१ च्या पावसाळ्यांत दिल्लीजवळ मराठ्यांचा तळ असतां, विसाजीपंतानें रामचंद्रपंतास कळविलें, कीं 'तुम्ही सर्व व्यवस्था आमच्याकडे सोंपून दक्षिणेंत जा, अथवा तुम्हीच सर्व व्यवस्था मजकडून सोंपून घ्या, म्हणजे मी पुण्यास निघून जातों'. यावरून रामचंद्र गणेशानें त्रागा करून प्रयाण केलें, पण महादजी व तुकोजी यांनीं त्याची समजूत करून ता. ३०-६-१७७१ रोजीं त्यास परत आणिलें. ही तात्पुरती समजूत फार दिवस टिकली नाहीं. बादशहा दिल्लीस येईपर्यंत रामचंद्र गणेश कसाबसा तिकडे राहिला, आणि पुढें पेशव्याचा निक्षून हुकूम आल्यावरून सन १७७२ च्या आरंभीं तो दक्षिणेंत आला. ही मानखंडना त्या पराक्रमी गृहस्थास सहन झाली नाहीं. 'रामचंद्र गणेशानें चतुर्थाश्रम संपादावयाचा बेत केला होता, त्यास एक दोन दिवस नारायण पात्र घेऊन भिक्षाही मागितली. हें वर्तमान श्रीमंतांस व सखारामबापूस कळलें त्यावरून त्यांनीं मध्यस्थी करून राहविलें', (ता. १०-७-१७७२). या वेळीं पेशव्याची स्थिति आसन्नमरण असल्यामुळें पंताची समजूत निघाली नाहीं. नाहीं तर दुसरी योग्य कामगिरी देऊन त्यास माधवरावानें खूष ठेविलें असतें. तथापि पुढें लवकरच त्याची समजूत होऊन तो नारायणरावाचे वधानंतर बारभाईचे पक्षांत बरींच वर्षें उद्योगावर होता; इंग्रजांशीं लढतांना खंडाळ्याचे घांटाखालीं ता. १२-१२-१७८० रोजीं तो धारातीर्थी मरण पावला.

सन १७७२ च्या पावसाळ्यांत माधवरावाची प्रकृति अतिशय बिघडली. त्याचा परिणाम उत्तरेंतील राजकारणावरही झाल्याशिवाय राहिला नाहीं. मराठ्यांनीं रोहिलखंड पादाक्रान्त केल्यामुळें त्यांची धाड आतां पुढें मागें आपणांवर येईल असें वाटून, सुजाउद्दौला व हाफीज रहमतखान यांस विशेष धास्ती उत्पन्न झाली. इंग्रजांचा त्यांजकडे पूर्वीपासून पेश होताच, तेव्हां हळूहळू मराठ्यांविरुद्ध त्यांनीं जबरदस्त कारस्थान उभारिलें. बादशहाही त्यांत सामील झाला. त्यांतच सिंदे होळकरांच्या भांडणाची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भर पडली. विसाजीपंत दोन्ही बाजू सारासार विचारानें संभाळीत होता. विरोधी कारस्थान जड होऊं नये म्हणून त्यानें झबेताखानास हाताशीं धरून त्याची समजूत काढिली, व दंड घेऊन त्याचीं मुलेंमाणसें सोडून दिलीं. त्यावरून महादजी सिंदे रुष्ट होऊन दिल्ली सोडून जयपुराकडे खंडण्या वसूल करण्याकरितां निघून गेला. 'होळकर व विसाजी कृष्ण एकचित्त. सिंदे मराठयांत कलह. सिंद्यांनीं मीरबक्षीगिरी नारायणरावाचे नांवें करून घेतली. होळकरांचें व विसाजीपंताचें मानस झबेताखानाला ही मीरबक्षी-गिरी द्यावी असा आहे'. मीर्झा नजफखान इंग्रजांचे तर्फेनें बादशहापाशीं खटपट करीत होता. हिंदुस्थानाकडील वर्तमान तर 'विसाजीपंत व सिंदे होळकर यांचें वैमनस्य आहे. म्हणून श्रीमंतांचा त्याजवर रोष आहे. त्यास आणावयास दुसरा कारकून तयार केला आहे', (ता. ३०-७-७२). बादशहानें मीर्झा नजफखानास मीरबक्षी करून मराठयांवर हल्ला करण्यास उत्तेजन दिलें. होळकर व बिनवाले यांच्या फौजा दिल्लीबाहेर तळ देऊन राहत असतां त्याजवर पंधरा हजार बादशाही फौज एकाएकीं चालून आली. परंतु मराठयांनीं त्याजवर हल्ला करून पराभव केला, आणि शहरास वेढा घातला. तेव्हां बादशहाची त्रेधा उडाली आणि त्यानें मराठयांशीं पूर्वींप्रमाणें मैत्री केली, (डिसेंबर १७७२). तथापि सुजा व रोहिले यांचें कारस्थान मराठयांचे विरुद्ध जोरांत सिद्ध झालें. रोहिल्यांनीं मराठयांचीं ठाणीं उठविलीं, तेव्हां तुकोजी होळकर व विसाजीपंत यांनीं पुनः रोहिल्यांवर चाल केली. तुकोजीचे मदतीस मोठा तोफखाना घेऊन विसाजीपंत जाऊं लागला, तेव्हां हाफीज रहमतखानानें मराठयांशीं तह करून त्यांची समजूत काढिली. हा प्रकार चालतो आहे, तोंच सुजानें इंग्रजांचा तोफखाना मदतीस घेऊन सन १७७३ च्या उन्हाळ्यांत रोहिल-खंडावर चाल केली, त्या वेळीं विसाजीपंतावर कांहीं काल कठिण प्रसंग येऊन गुदरला, (मे १७७३). इंग्रजांच्या तोफखान्यापुढें त्याचा निभाव लागेना व पुण्यास माधवराव पेशवे मरण पावल्यामुळें तिकडून मदत होणें बंद झालें. अशा स्थितींत रोहिलखंडांत राहणें धोक्याचें वाटून बिनीवाले व होळकर जून १७७३ त नारायणराव पेशव्याचे हुकमानें तिकडून परत निघाले. नारायणरावाचा खून झाल्यावर लवकरच विसाजीपंत दक्षिणेंत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

येऊन पोंचला. तेव्हांपासून पुढें दहा वर्षें पावेतों मराठ्यांचें लक्ष दिल्लीचे कारभारांतून साफ नाहींसें झालें. बादशाही उमराव मीर्झा नजफखान दिल्लीचा कारभार दक्षतेनें पाहत असून, मराठेही इंग्रजांशीं लढण्यांत गुंतल्यामुळें, त्यांचें तिकडील वजन बहुतेक नष्ट झालें. अंतर्वेदींत फक्त इटाव्याचें एक ठिकाण कांहीं काल शिकस्तीनें टिकाव धरून होतें, तेंही पुढें मराठ्यांचे हातून गेलें. सन १७८२ च्या एप्रिलांत मीर्झा नजफखान राजयक्ष्म्यानें मरण पावला, आणि मराठ्यांचें युद्धही पुढें लवकरच संपलें, तेव्हां सन १७८४ त महादजी सिंद्यानें पुनरपि उत्तर हिंदचा उद्योग हातीं घेऊन चार वर्षांनीं तो शेवटास नेला, त्याची हकीकत पुढें येईल. व्यक्तिशः तुकोजी होळकर, विसाजी कृष्ण, रामचंद्र गणेश हे मोठे शूर व पराक्रमी होते. पण सर्वांस धाकांत ठेवून त्यांजकडून कामें करवून घेणारा माधवरावासारखा वजनदार धनी मराठ्यांत कोणी नसल्यामुळें वैयक्तिक पराक्रम विसकळीत होऊन राष्ट्राचें पाऊल मागें आलें. यास मुख्य कारण माधवरावाचा अकालीं मृत्यु होय. विपरीत काळ आला म्हणजे चांगल्या वस्तु व चांगलीं माणसें झपाट्यानें नाहींशीं होतात. तशी स्थिति मराठी राष्ट्राची या वेळीं झाली. गारद झालेली पिढी माधवरावानें भरून काढून अल्पावकाशांत किती तरी नवीन चांगलीं माणसें तयार करून मराठी राष्ट्र सिद्ध केलें. परंतु हा उत्कर्ष त्याच्या मृत्यूबरोबर लगेच मावळला. सिंदे-होळकरांस हैदरावर स्वारी करण्याकरितां माधवरावानें अगोदरच दक्षिणेंत बोलाविलें होतें. त्याप्रमाणें महादजी इकडे येण्याच्या तयारींत असतां माधवरावाचे मृत्यूची बातमी पोंचून त्यास अत्यंत दुःख झालें. माधवरावानें त्याचा सर्वोपरी सांभाळ करून कृपादृष्टीनें चुलत्याचे तडाख्यांतून अनेकदां त्याचा बचाव केला होता. एवंच माधवरावाचे प्रोत्साहनानें मराठ्यांनीं बादशाही कारभारांत जो संचार केला त्याचें पर्यवसान वरप्रमाणें जरी तूर्त क्षणभंगुर झालें, तरी त्याचा वचपा बऱ्याच अंशीं महादजीनें पुढें भरून काढिला. महादजी व नाना फडणीस हे पेशवाईची परंपरा कायम ठेवणारे शेवटचे दोन पुरुष होत.[1]

१. **आधार.**—नातूकृत महादजी सिंदे, पृष्ठ १०८; खरे ले. ११८७, १२४४, १२५२, व खरे पृष्ठ १८८८; पर्शियन कॅलेंडर्स भा. ३; का. सं. प. या. २९३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण चाळिसावें

माधवरावाचा अंतकाल व योग्यता

१. माधवरावाचा व्याधि व राजयक्ष्मा.
२. कटोऱ्यास हवाफेर.
३. आजाराचे अखेरचे दिवस.
४. राज्याची निरवानिरव.
५. कौटुंबिक राहणी, गोपिकाबाई, आनंदीबाई, रमाबाई.
६. कामाचा उरक.
७. कडक शिस्त.
८. प्रमुख व्यक्ती.
९. राज्याचा वसूल.
१०. शास्त्रीय ज्ञानाकडे दुर्लक्ष.
११. तुलना.

१. माधवरावाचा व्याधि राजयक्ष्मा.—अल्पावधींत जिवापाड श्रम करावे लागल्यामुळें माधवरावाचे प्रकृतीवर विलक्षण ताण पडला. पानिपतावरील संहारापासून तों त्याचे अंतकाळपर्यंत मनुष्याच्या अत्यंत वाढीच्या आयुष्यांत कुटुंबांतल्या व बाहेरच्या उपाधी, स्वाऱ्या व विवंचना यांमुळें त्याची नाजूक शरीरयष्टि अकालीं खचली. वास्तविक इतका तरी ताण तिनें कसा सहन केला ह्याचेंच आश्चर्य मानलें पाहिजे. अकरा वर्षांच्या कारकिर्दींत निदान सात तरी मोठ्या स्वाऱ्या व पांच चार लहान स्वाऱ्या त्यानें केलेल्या निर्दिष्ट आहेत. स्वाऱ्यांत असतांही राज्यकारभाराचीं कामें बंद न पडतां नित्याप्रमाणें धडाडीनें चालत. शिवाय प्रत्यक्ष लढण्याचीं व तहांच्या वगैरे वाटाघाटींचीं कामेंही तो स्वतःच करी. सन १७७० अखेर कर्नाटकचे स्वारीस निघून गेला असतां, प्रकृति विशेष बिघडल्यामुळें मिरजेवरूनच त्यास परत फिरावें लागलें, तेव्हांपासून त्याच्या बाहेरच्या हालचाली बहुतेक बंद झाल्या; आणि त्या पुढचीं दोन वर्षें तो पुणें, नासिक, नगर, यांच्या दरम्यान हवाफेर, प्रकृतीचे उपचार व राज्यकारभाराचीं कामें करीत हिंडत होता. पहिल्या दहा वर्षांत दरसाल पावसाळ्याचे तीन चार महिने मात्र त्याचे पुण्यास किंवा आजूबाजूस जात. साधारण विश्रांतीचा काल म्हटला म्हणजे एवढाच. त्यांतही राज्याचे हिशेब, सरदारांच्या व कारभाराच्या भानगडी बहुधा पुण्यासच चालत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कर्नाटकांत स्वतः चार व हस्तकांची एक मिळून पांच स्वाऱ्या करून त्यानें हैदर टिपूकडील व्यवहार मिटवून तिकडचा अंमल सुरळीत केला. सन १७६९–७२ पावेतों उत्तर हिंदकडे फौजा पाठवून पानिपतावर अपुरा राहिलेला कार्यभाग त्यानें पार पाडिला; छत्रपति, प्रतिनिधी नागपुरकर व अक्कलकोटकर भोसले, सिंदे, होळकर, गायकवाड व दुसरे अनेक लहान मोठे सरदार यांचे बंदोबस्त न्यायनीतीच्या निष्ठुरतेनें परंतु दयार्द्र अंतःकरणानें बांधून दिले; दिल्लीचा बादशहा, निजाम, अयोध्येचा वजीर, इंग्रज, रजपुत संस्थानिक, शीख, जाठ, इत्यादि परकीय मंडळींचे उद्देश व उलाढाली स्वराष्ट्र कार्याकडे उपयोजिल्या; आणि बदललेल्या परिस्थितींत मराठशाहीच्या राज्यकारभारास व्यवस्थित स्वरूप आणून दिलें. अर्थात् पूर्वींच्या तीन पिढ्यांतील कारभारांत राहिलेली अपूर्तता व झालेल्या चुका ह्या तरुण पेशव्यानें अल्पावधींत सुधारून राज्याचें गाडें सुरळीत मार्गावर आणून पूर्वजांचे संकल्प सिद्धीस नेले. एवढा उद्योग करण्यांत किती श्रम व त्रास पडला असेल हें केवळ कल्पनेनेंच जाणलें पाहिजे. त्यानें जिवापाड मेहनत केली त्यामुळें शरीरांत रुजत असलेल्या क्षयरोगाच्या गुप्त व्याधीस अंकुर फुटून तो हळू हळू वाढीस लागला; आणि शेवटीं सर्व उपाय वायां जाऊन त्यासच हा थोर पेशवा अकालीं बळी पडला. माधवरावाची शरीरयष्टि उंच, थोराड व बळकट होती. हाड मजबूद होतें. परंतु अंगांत व्याधीचा प्रादुर्भाव बहुधा पूर्वींपासूनच असल्यानें शरीरास मांसलता कधींच प्राप्त झाली नाहीं. त्याच्या विषयवासनेसंबंधीं कांहीं सांगतां येत नाहीं. अंगांत मुरत असलेल्या व्याधीस ह्या वासनेचें साह्य असतें, तर कदाचित् याहूनही अगोदर तो खचला असता. आरंभींचें कोमल, गौर व नयनमनोहर रूप श्रमानें, काळजीनें व कठोर निग्रहानें शेवटीं शेवटीं अत्यंत निस्तेज व निःसत्त्व दिसूं लागलें. डोळे मूळचे पाणीदार व चेहरा उग्र होता. कोणासही समोर जाऊन त्याजकडे वर पाहण्याची छाती होत नसे. बहुधा सर्व लोक पुढें जाण्यास कांपत. राजयक्ष्मा रोगच असा आहे कीं, त्यामुळें मनुष्य स्वभावानें तिरसट व दुराग्रही बनतो; परंतु स्वतःविषयीं अखेरपर्यंत निराश होत नाहीं. तशीच स्थिति या पेशव्याची झाली. सर्वांनीं आशा सोडल्यावरही त्यानें आणखी सहा महिने काढिले.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सन १७६९ चे पावसाळ्यांत प्रकृतीचे योगानें काम उरकेना म्हणून महादाजीपंत गुरुजींनीं नारायणरावाजवळ बसून ताकीदपत्रांवर मखलाशी करावी असें ठरविण्यांत आलें. पुढें त्या सालच्या दसऱ्यास कर्नाटकची मोहीम ठरून माधवराव प्रवासास निघाला, तेव्हां प्रकृतीची चिंता उत्पन्न होऊन पुण्यांत शत ब्राह्मण ठेवून मृत्युंजयाचा कोटि जप करण्यांत आला. या जपासंबंधानें गोपिकाबाईची ताकीद नाना फडणिसास सक्त होती. 'जे ब्राह्मण लावले ते अनुष्ठान समाप्तीपर्यंत वाडयांत राहूं द्यावे; त्यांनीं यजमानास आरोग्य होण्याविषयीं प्रार्थना करीत जावी; कोणी त्वरेनें जप करतो, कोणी सावकाश करतो, तर आठ पंधरा दिवस जास्त लागले तरी हरकत नाहीं, पण जप सांग करावा. अनुष्ठानावर चौकशी करण्यासाठीं शिष्ट ब्राह्मण कोण ठेविले त्यांचीं नांवें लिहून पाठवावीं. अनुष्ठानांत व्यंग पडूं न द्यावें. ब्राह्मणांनीं वाड्यांतच निजावें, व्रतस्थ राहवें. उत्तम परीक्षेनें ब्राह्मण लावावे'. या ताकिदीप्रमाणें नानानें सर्व व्यवस्था उत्तम ठेवून बाईस नाशकास तसें लिहून पाठविलें. कर्नाटकस्वारींत असतां सन १७७० च्या एप्रिलांत माधवरावाची प्रकृति विशेष बिघडली, तरी त्यानें पावसाळ्यांत कर्नाटकांतच राहण्याचा निश्चय केला होता. मे महिन्यांत निजगल किल्ल्यावरील हल्ल्यांत नारायणरावाचे उजवे मनगटास गोळी लागून जखम झाली, ती लवकरच बरी झाली, तरी अनेकांच्या आग्रहास्तव त्रिंबकराव पेठे यास कर्नाटकचें काम सांगून माधवराव जूनचे आरंभीं पुण्यास परत आला. रस्त्यांत ज्येष्ठ शुद्ध १५ रोजीं ग्रहणास कृष्णातीरीं सुवर्णतुला केली. उभयतां श्रीमंत शरीरें करून बरे आहेत, असा १७७० च्या जुलैतला उल्लेख आहे. नंतर श्रावणमासची दक्षणा मोठ्या थाटानें झाली. ब्राह्मण पुष्कळ जमले म्हणून दक्षणा गेल्या सालपेक्षां कमी दिली. आपल्या हातून सर्व काम उलगडत नाहीं आणि असाच ताण पडल्यास आपण टिकणार नाहीं, ही जाणीव पेशव्यास होती. ऑगस्टांत नारायणरावास दिवाणगिरीचीं वस्त्रें देऊन सखारामपंतास मुतालिकीचीं वस्त्रें दिलीं; आणि नारायणरावाजवळ बसून त्यास समजावून कारभार करावा, असें पेशव्यानें फर्माविलें. आपलें काम कमी व्हावें आणि आपलें बरेंवाईट झाल्यास पुढील कारभाराचा अनुभव नारायणरावास मिळावा, असा यांत दुहेरी हेतु होता. परंतु ही योजना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सखारामबापूस पसंत पडली नाहीं. कर्नाटकस्वारीचा हव्यास पेशव्यास लागला होता. १७७०त भाद्रपद शुद्ध १३ सच डेरेदाखल झाले. दसऱ्यास जानोजी भोसले भेटीस येणार होता, परंतु त्याचें येणें कार्तिकपावेतों झालें नाहीं. कार्तिकांत पेशवा वांईवरून जेजूरीस आला. तेथें भोसल्याची व त्याची भेट झाली. पुढें सुमारें दीड महिना पेशवा व जानोजी दोघे बरोबर होते. 'उभयतांचें सौरस्य चांगलें झालें. जेजुरीस आल्यानंतर नित्य चढूं घटकांत प्रकृति बिघडूं लागली, ते आपली आपल्यास कळूं लागली. स्वारींत मेहनतींमुळें निभावणार नाहीं, तेव्हां परत जाणें प्राप्त. औषध-उपाय नियमित स्थळीं बसूनच करावा लागतो', असें पेशव्यानें त्रिंबकराव पेठयास १२-१२-७० रोजीं लिहिलें; आणि मातुश्रीसही लिहिलें कीं, 'पथ्य आज्ञेप्रमाणें करीत आहे. जेवण औषध मोरोबा व राजेश्वर भट यांचे सांगितल्याप्रमाणें करितों. यानंतर दिवसेंदिवस समाधान वाटल्यास वडिलांचे सेवेसीं यावें हेंच मानस आहे'. यांचे पूजेस फुलें व पथ्यास भाजी वगैरे लागे, त्याची तजवीज स्वारींत सुद्धां विशेष दक्षतेनें ठेवण्यांत येत असे. मातुश्रीनें गंगापुराहून पुण्यास येऊन आपल्याजवळ राहवें असें पेशव्यानें तिच्या कारकुनास लिहिलें. 'माझे वाटची बहुत विनंति करून लवकर येणें होय तें करणें. जसें बाईसाहेबांस गंगापुर सोडून यावें असें वाटत नाहीं, तसेंच आम्हांस घरीं आल्यावर बाईसाहेब नसल्यास कठीण होतें. येणेंप्रमाणें विनंति करून लवकर येणें होय तें करणें'. परंतु ती आली नाहीं. माधवरावच नाशकास जाऊन तिला भेटून परत आला.

फेब्रुवारी १७७१ पासून पेशव्याचा मुक्काम नासिक, नगर, पुणें यांचें दरम्यान औषधोपचारासाठीं झाला. दरम्यान दादास कैदेंतून सोडून त्याची व्यवस्था ठरवून कुटुंबांतील तंटा मिटवावा असेही प्रयत्न चालले होते. 'सिद्धटेकावरून दादाकडे मुत्सद्दी जाऊन बोलून आले. उभयतां श्रीमंतांचें समक्ष बोलणें झालें म्हणजे दादा कैदेंतून सुटणार. सात लक्षांची जहागीर व त्र्यंबक किल्ला त्यांस द्यावा असा मनसबा आहे'. पुढें दादाची व पेशव्याची भेट थेउरास होऊन उभयतां माघारे पुण्यास गेले. तेथून दादा आनंदवल्लीस जाणार, अशी १७७१ च्या फेब्रुवारीची नोंध आहे. अर्थात् उभयतांचें सौरस्य झालेलें दिसत नाहीं. पुढील एप्रिल मासांतील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकृतीचें मान. 'शरीरभावना आहे तशीच आहे दरबार होत नाहीं. कोणाचा सवालजाब होत नाहीं. चित्त स्वस्थ नाहीं. पुण्यांत राहणें गोड वाटत नाहीं. मर्जीस येतें तेव्हां बाहेर निघावें. कोणाचें फारसें ऐकूं नये, अशी क्षणभंगुर मर्जी झालेली आहे'. 'मातुश्रीबाई गंगापुराहून आल्या', हा खरे ले. ११३५ चा उल्लेख बिनचूक असेल तर, गोपिकाबाई सन १७७१ च्या एप्रिल महिन्यांत थोडे दिवस पुण्यास येऊन माधवरावास भेटून गेली असें दिसतें. पुढील जुलैंत तिचा मुक्काम गंगापुरासच होता. जून महिन्यांत प्रकृतीस बराच आराम पडला. 'पंधरा वीस दिवस पोटांत लिडीक उठत नाहीं. मोरोबा दादाच्या बागेंत राहिले आहेत. तेथून थेउरास जाणार'. प्रकृतीस आराम पडल्याची बातमी ऐकून राज्यांत मोठा आनंद झाला.[1]

२. कटोऱ्यास हवाफेर.—गोदावरीचे काठीं टोक्याजवळ कटोरें म्हणून गांव होतें, तेथें माधवराव हवेसाठीं कांहीं दिवस जाऊन राहिला. बरोबर गोविंद शिवराम आणि हरिपंत फडके होते. मातुश्री रमाबाईसुद्धां गंगापुरास गेली. पुण्यास कारभार नारायणरावाजवळ मोरोबा फडणीस अखत्यारीनें करीत. 'नाना फडणिसास कांहीं करणें तर मोरोबास पुसून करतात. कृष्णराव बल्लाळ व महादाजीपंत गुरुजी हेही नेहमीं दरबारांत असतात. श्रीमंतांसमागमें फारसें कोणी गेलेंच नाहीं. औषधें घेत आहेत. कटोऱ्यास आषाढ शुद्ध १ स सुवर्णतुळा झाली. सप्तशृंगीचे स्वामी व कटोऱ्याचे स्वामी उभयतां अंगारा व तीर्थ देत असतात. उभयतां स्वामींची अट आहे कीं, दादास मोकळीक करावी. हकीम, वैद्य वगैरे औषधें देतात. कटोऱ्यास कांहीं गुण वाटत आहे', (जुलै १७७१).

---

१ **आधार** कलम १-२-३ चे.—इ. १००, १०३; ऐ. टि. २-१९, ४-६, ६-१५; भा. व. श. पृष्ठ ६०; खरे ले. ८५०, ९६३, ९७८, १००५, १०१३, १०५९, १०६२, १०६९, १०७२, १०७६, १०७७, १०८३, १०८५, १०९४, १०९५, ११३५, ११४५, ११४७; ११४८, ११५९, ११६०, ११७५, ११९२, ११९६, १२०५, १२१०, १२१२, १२१६, १२२१, १२२२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कटोऱ्यास बरें वाटल्यामुळें तेथेंच पुढें माधवरावानें नारायणराव व कारभारी यांस निकडीनें बोलावून घेतलें. तेथें ता. २८-८-१७७१ रोजीं नारायणरावास उपदेश केला, त्याचीं खालील कलमें कारकुनांनीं लिहिलेलीं उपलब्ध आहेत. (१) बचाजीपंतावर कृपा असावी; (२) नाना फडणिसांशीं बहुत सख्य असावें; (३) सौभाग्यवती रमावहिनीशीं बहुत सख्य करावें; (४) पुण्यकर्म विशेष करावें; (५) उदासीनता व क्रोध किंचित् कार्याकारण धरावा; (६) इंद्रियनिग्रह धरावा; (७) पुस्तकांचा बंदोबस्त करावा, (८) तीर्थरूपांची भेट झाल्यावर बोलून कृपा संपादन करावी; (९) त्रिपादी पाठ करावी. इतक्या या ताकिदींवरून दिसतें कीं, नारायणराव बराच व्रात्यपणा करीत असावा, आणि त्याजबद्दल चुलत्याचे मनांतही वैषम्य वाटत असावें. ता. ८-१०-१७७१ रोजीं पेशवा मातुश्रीस लिहितो, 'शरीरसंरक्षण विशेष करावें, बाबा वैद्यास व सखारामपंतांस सत्वर समीप आणावें म्हणून आज्ञा, त्यास सखारामपंत मार्गेंच येऊन तीर्थरूपांकडे गेले. बाबा वैद्यही सत्वरच येतील. माझें पत्र दुसऱ्यास कळूं न देणें म्हणून आज्ञा, त्यास मर्जीप्रमाणें करितों. लवकरच तीर्थरूपांची भेट होईल. नंतर वरकड मजकूर सेवेसीं लिहीन. प्रस्तुत माझी शरीर प्रकृति बरीच आहे. उरांत दुखत होतें तें बरें झालें आहे. परंतु जागा वळकट व्हावयास्तव औषध करीत असतों. पोटांतही फिरंग्याचें औषध घेतों'. हा फिरंगी युरोपियन वैद्य पांच सात वर्षांपासून माधवरावाजवळ उपचारासाठीं होता. सन १७७१ च्या अखेरीस प्रकृति चांगलीच सुधारली. नारायणरावानें मातुश्रीस लिहिलें, तीर्थरूपांची प्रकृति उत्तम आहे.

परंतु पुनः १७७२ च्या पावसाळ्यांत माधवरावाची प्रकृति बिघडतच चालली. त्याच संधीस गोपिकाबाईची प्रकृति गंगापुरास विशेष बिघडली. तिच्यासाठीं गंगा विष्णु वैद्य पुण्याहून तिकडे गेला. गंगापुरपर्यंत पालख्यांची डाक बसवून स्वतः माधवराव तिला भेटण्याकरितां जाणार होता. पण तितकी शक्ति त्यास राहिली नव्हती. गोपिकाबाईनें तर काशीयात्रेस जाण्याची तयारी केली होती. इकडे पुण्यांत सर्व कारभाऱ्यांनीं वाड्यांतच येऊन कारभार करावा, आपले घरीं सरकारी कामें करूं नयेत, अशी ताकीद पेशव्यानें केली. शतचंडीचे अनुष्ठानासाठीं नारायणराव धोमास जाऊन आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कोणाच्या अंगीं भुतें, ग्रह वाढत असतात, त्यांनीं कांहीं बाधा आहे म्हणून सांगितलें. त्यावरून पेशवा, सर्व कारभारी व दादासाहेब सुद्धां, थोडे दिवस घोमास जाण्यास निघाला. परंतु शक्ति नसल्यामुळें थेउरासच गेला. 'दादासाहेबांनीं आग्रह करून राहविलें. पुढें प्रकृति जास्त बिघडली. त्यांत राग व लहर, आणि दुखणें श्रीमंताचें', त्यामुळें सर्वत्र केवढी धामधूम उडाली असेल याची कल्पनाच करावी. 'घटकेंत डेरे उभारणें व घटकेंत पाडणें, दोन प्रहर रात्रीस कूच करणें, त्या वेळीं माणसें नाहीं मिळालीं म्हणजे वैताग करीत. एक दिवशीं मध्यरात्रीं निघून थेउरास गेले. देवदर्शन व एक प्रदक्षिणा करून पथ्य घेतलें. रात्रीं लोक बरोबर आले नाहींत त्यांस दुसरे दिवशीं मारहाण केली. ज्वरांश आहे. म्लान वदन आहे. मर्जी दिवसें दिवस कठीण. पथ्य करीत नाहींत. वैद्यानें खाऊं नका म्हणावें तोच पदार्थ खावा, न दिल्यास शिवीगाळ करावी'. (ऑगस्ट १७७२). रामाजी महादेव कोंकणचे सुभे व मोरोबादादाचे वडील बाबूराव फडणीस याच संधीस मरण पावले. दोघेही फार दिवसांचे अनुभविक होते. कोंकणचा सुभा हरिपंत फडके यास सांगितला. या वेळीं अत्यंत जिव्हाळ्याचा मनुष्य माधवरावास हरिपंत फडकेच होता. या वर्षीं पुण्यांत दक्षणा वांटली, त्यास खर्च तीन लक्ष चार हजार झाला. पुण्यांत श्रावण मासांत बाहेरचे ब्राह्मण येत, त्यांची वस्ती घरोघरीं पांच पन्नास पाहुणे म्हणून होत असे. पेशव्याचा मुक्काम थेउरासच होता. पुण्याचा कारभार व बंदोबस्त नारो आप्पाजीकडे असे. नारो आप्पाजी तुळशीबागवाले हा मोठा नेकीचा इसम त्या वेळीं पुण्यांत प्रमुख होता.

हिंदुस्थानांतून एक प्रसिद्ध नामांकित वैद्य महीधर गंगा विष्णु नांवाचे आणविले होते, त्याचें औषध पुनः श्रावणांत सुरू केलें. 'प्रकृति दोन दिवस बरी दोन दिवस वाईट अशी आहे'. त्रिंबकराव पेठ्यास कर्नाटक स्वारींतून तावडतोब बोलाविलें. तो सप्टेंबरचे आरंभीं येऊन दाखल झाला. 'दादा व नारायणराव यांनीं सामोरें जाऊन त्याचा गौरव केला. श्रीमंतांची प्रकृति चहूं दिवसांखालीं बिघडली होती. मागती यथाप्रकारें आहेत, पृथ्वीचें छत्र आहे. श्रीनें कृपा करावी तरीच बरें. श्री० गोपिकाबाईस बरें नाहीं म्हणून प्रकृति पाहण्यास दादा गंगापुरास गेले. प्रकृति नीट झाल्याशिवाय काशी-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यात्रेस जाऊं नये, असें सांगावयास गेले. श्रीमंत प्रकृति नीट असते तेव्हां कांहीं बोलतात, कामकाज करतात. अनुष्ठानें उपाय बहुत होताहेत'.

सन १७७२ च्या फेब्रुवारींत माधवराव सिद्धटेकास होता. तेथें जानोजी भोसले भेटीस येणार असून प्रकृति बरी होती. या वेळीं पेशव्याचें भाग्य अत्युच्च शिखरास पोंचलें होतें. दिल्लीचा बादशहा कबज्यांत येऊन पानिपतवर राहिलेला कार्यभाग सन १७७१ अखेर पुरा झाला; आणि कर्नाटकचा कारभारही त्रिंबकरावानें चांगला उरकला. यामुळें पेशव्याचे मनास बराच धीर आला असावा. परंतु त्या सालच्या उन्हाळ्यांत प्रकृतीनें पुनः उलट खाल्ली. त्याच वेळीं म्हणजे बहुधा एप्रिल मासांत जानोजी भोसले येऊन माधवरावास थेऊर येथें भेटला. आपले पश्चात् आपला पुतण्या रघूजी यास सेनासाहेब सुभा करून नागपुरची जहागीर त्याचे नांवें चालवावी, अशी जानोजीची पेशव्यास टोंचणी होती. तसेंच दादास मुक्त करावें असाही जानोजीचा आग्रह होता. पेशव्याची भेट घेऊन पंढरपुरावरून तुळजापुरास गेला असतां, जानोजी भोसले निजामअलीकडील सरदार धौशा याची भेट घेऊन परत आल्याबरोबर, अंगाची काईल होऊन एकाएकीं ता. १६ मे १७७२ रोजीं मरण पावला. इकडे पेशव्याचे 'शरीरीं रोगाची प्रबलता विशेष वाढली. सर्वकाळ अंगाचा दाह. केळीच्या पानांच्या सुरळ्या आणून त्यांजवर निजावें. पुढें ज्येष्ठ वद्य ५ (२० जून) रोजीं श्रीमंत पुण्यास वाड्यांत आले. सप्तमीस सखारामपंतास कारभार सांगितला. धाकटे रायाजवळ बसून कारभार करावा. द्यावें देणें नारायणरावांकडे. दादासाहेब आनंदवल्लीहून आले. वाड्यांत राहिले आहेत. श्रीमंतांची प्रकृति ठीक नाहीं. तरी प्रातःकाळीं चार घटका व सायंकाळीं एक प्रहर दरबार होऊन कामकाजें होतात. प्रकृति फारच कठिण आहे. भरंवसा दिसत नाहीं'. आपल्या हातचा कारभार गेल्यामुळें मोरोबा फडणीस रुसून पंढरपुरास गेला. आपली निभावणूक नाहीं असें पाहून पेशव्यानें चुलत्याशीं विशिष्ट करार करून त्यास मुक्त केलें. वर्ष दीडवर्ष दादास सोडण्याचा हा विचार असाच भिजत पडला होता. विशेषतः 'नजरबंद ठेविल्यानें बहुत उग्र अनुष्ठान करितात. सर्व काळ सूर्य अवलोकन करून हरणाचें दूध भक्षावें. हें अनुष्ठान माधवरावास बाधून त्याचें दुखणें वाढतें', असाच समज सार्वत्रिक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होता. म्हणून स्वतःचा विचार नसतांही केवळ लोकांच्या समजुतीस्तव मार्च महिन्यांत माधवरावानें चुलत्यास मोकळें केलें.

३. आजाराचे अखेरचे दिवस.—अशा संकटकालीं दादाचा मूळ स्वभाव प्रत्ययास आला. ता. ६-१०-७२ रोजीं 'विजयादशमीस बाहेर पडले आणि दोन हजार स्वार व गारदी चाकरीस ठेवून, निजाम, हैदर, भोसले यांस पत्रें लिहून आपल्या कुमकेस बोलाविलें. तुळापुरास गेले तों मागून लोक जाऊन फितुराचे कागदपत्रांसह पकडून आणिले. शागीर्द मंडळी ७ असामी धरून बेड्या घालून किल्ल्यांवर पाठविले. आणि दादासाहेबांकडे तुळापुरास कृष्णराव बल्लाळास पाठवून आणवून पहिल्याप्रमाणें सक्त नजरकैदेंत ठेविलें. पेशव्यांचें प्रारब्ध थोर आहे'. म. सा. छो. बखरींत असा उल्लेख आहे कीं,—'दादासाहेब, अमृतराव व आनंदीबाई यांस जप्तींत ठेविलें. कोणे गोष्टीची अनुपत पडूं दिली नाहीं. दादासाहेब सूर्योदयास स्नान करून अनुष्ठान करीत. मरणसमयीं पुढील व्यवस्था रावसाहेबांनीं हरिपंत फडक्यास सांगितली'. ता. १०-१०-७२ रोजीं मोरोबा पटवर्धन पुण्याहून लिहितो. 'थेउरास भेटीस यावें म्हणून सांगून आल्यावरून आश्विन शुद्ध चतुर्थीस निघोन गेलों ते दिवशीं मर्जी ठीक नव्हती म्हणून भेट न झाली. दुसरे दिवशीं श्रीमंतांनींच स्मरण करून बोलावूं पाठविलें, तेव्हां सर्व मंडळी घेऊन गेलों. दर्शन झालें. एक घटका आंत होतों. श्रीमंतांनीं पुसलें, तुमची प्रकृति कशी आहे ? औषध घेत असतां कीं नाहीं ? वरकडांसही हे कोण हे कोण, म्हणून विचारलें. उपरांतिक सर्वांस विडे दिले'. रमाबाई बहुतेक पुण्यासच असे, थेउरास नव्हती. तेथें सन्निध नेहमीं हरिपंत फडके, कारकून इच्छारामपंत ढेरे व हुजऱ्या चापाजी टिळेकर असत. शेवटच्या महिन्यांतील प्रकृतीचें मान दिवसेंदिवस खालीलप्रमाणें आढळतें. 'आश्विन वद्यांत दादासाहेबांसही थेउरास आणविलें. प्रकृति बिघडतच चालली. मोठाच बाखा झाला. कांहीं बाकी नव्हती. ईश्वर काय करतो न कळे. अवस्था फारच कठिण. औषध घेण्याचें टाकिलें. कार्तिक वद्यांत फारच घाबरे वरचेवर होऊं लागले. त्रिंबकराव मामास पुण्याचे बंदोबस्तास पाठविलें. थेउरास वाड्यांत होते ते गणपतीच्या देवळाच्या आवारांत ओवऱ्यांत येऊन राहिले. सर्व मंडळी झाडून थेउरास आली आहेत. दादासाहेबांस व सखारामपंतास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणाले कीं, 'आपल्या हातून वेदना सोसवत नाहींत, खंजिर द्या, पोटांत खुपसून घेतों'. तेव्हां दादासाहेबांनीं शपथ घेऊन सांगितलें रविवारपर्यंत गुण न आला तर खंजीर देतों. त्यावरून पुनः दुसरे दिवशीं खंजीर मागितला. बहुत रागें भरले. अर्जुनवाद्यें केलीं. ज्वर नव्हता तरी नुसत्या संतापानें घाबरे झाले. सर्व लोक उपाशींच होते. हें कळतांच आपण पथ्याचें घेतलें, तेव्हां सर्व लोक जेवले. श्रीगणपतीस जलाची संतत धार धरली आहे. ज्वर-शांति व अनुष्ठानास ब्राह्मण घातले आहेत. मातुश्रीबाई काशीयात्रेस जाणार होत्या त्या राहिल्या. श्रीमंतांस कांहीं वायूचा संचार होतो. कांहीं अविचार बोलणें अथवा असमंजस करणें असें नाहीं. आठवण चांगली धरून बोलतात. बहुतच आक्रोश करितात. कार्तिक शुद्ध ८ रोजीं रमाबाईस सहगमनाविषयीं फार बोध केला. रुबरू तिणें इतकाच जबाब दिला कीं, ईश्वरसत्ता प्रमाण. कारभाराचें बोलणें सर्व सोडलें. एकशें ऐशीं गाई दानास प्रारंभ केला. दुसऱ्यानें भरवावें तेव्हां जेवण. नेहमीं दादासाहेब जवळ असतात. दहा हजारांचा मोत्यांचा तुरा देवास दिला. भूतबाधा, मांत्रिक प्रयोग, असेंही कोणी म्हणतात. दादासाहेबांचा गुरु कोणी गौड मांत्रिक नर्मदेस आहे, त्याचा हा प्रयोग आहे, असें कोणी म्हणतात. दहा लक्षांचा नवस श्री-व्यंकटेशास करून पंधरा दिवस झाले. देवानें घोड्यावर बसते करावें, स्वतः जाऊन नवस फेडावा, मग कारभार करावा'. परंतु दिवसेंदिवस अधिक. शक्ति नाहीं, तेव्हां हाका बोंबा होत होत्या तें मात्र राहिलें. इच्छारामपंतानें खंजीर दिला नाहीं तेव्हां मुसक्या बांधून त्यास मारविलें. एकदम पर्जन्य फार पडला, त्यामुळें हवा खराब झाली. चौकी दाट बसविली. बातमी बाहेर फुटों देत नाहींत. देवळांत कोणीं बसूं नये. दर्शन मात्र घेऊन बाहेर यावें असें आहे. सर्वांगास सूज आली आहे. धाकटेराव व हरिपंत भरवितात. नित्य क्षीरभोजन शत ब्राह्मणांस होत आहे. कार्तिक शुद्ध ११ रोजीं सायंकाळचे प्रहर दिवसास फार गडबडले. भुईवर उतरले. रात्रौ भूमिशयनच होते. येतील त्यांस येऊं देत जाणें, मना न करणें, अशी आज्ञा झाली. नाना फडणीस समीप होते. धाकट्यांस निरवणूक करणें ती केली. पहांटे सर्वप्रायश्चित्त द्या म्हणून निकड केली. द्वादशीचे दिवशीं सकाळीं क्षौरान्त विधिपूर्वक सर्व प्रायश्चित्त केलें. पन्नास हजार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रुपये कांची–कामाक्षीस धर्म करण्याचीं उदकें घातलीं. भूमि सारवून सोंवळा बिच्छाना घालून शूद्रस्पर्श नसावा या न्यायें राहिले. फार अवस्था कठिण शरिराची. दुसऱ्यानें हात पाय उचलावे तेव्हां हालचाल घडते. धाकटे यजमान सर्वांस फार दरडावतात. इतका दुखणेकरी हालचाल बंद. शब्द नसतां अजून लोक चळचळां कांपतात. मोठा दाब. ईश्वरकृपेनें मुसळास अंकूर फुटेल तर पाहवें. रमाबाई फक्त गोमूत्र व दूध यांजवर पांच सात दिवस आहेत. बहुत कृश झाली आहे. तेरदाळकर रणछोड वैद्य व रूपेश्वर वैद्य आले. गंगाविष्णुही आहेत. उपाय बहुतच होत आहेत. कार्तिक वद्य ३ चे दिवशीं रमाबाईनीं सती जातेवेळीं नेसण्याचीं पातळें आणावयास सांडणीस्वार पुण्यास पाठविला. त्यावरून पुण्यांत मृत्यूची आवाई उठून दोन घटका दुकानें बंद झालीं. मागाहून खरी बातमी समजली तेव्हां गडबड शांत झाली. हें वर्तमान पेशव्यास समजलें. तेव्हां सांडणीस्वाराचे हात तोडण्याचा हुकूम केला. लोकांनीं रदबदल केली तेव्हां हात तोडणें राहिलें. नेहमीं सेवेंत असणाऱ्या मंडळीस प्रत्येकास हजार पांचशेंचे गांव इनाम दिले. खिजमतगारासही रोख बक्षिसें दिलीं. आपाजीराव पाटणकर व खंडेराव दरेकर यांस तुमचें कर्ज वारीन, म्हणून वचन दिलें होतें. त्याचें स्मरण ठेवून त्यांस विचारलें, तुमचें कर्ज किती आहे? परंतु अशा स्थितींत आपल्या कर्जाचा प्रश्न त्यांनीं श्रीमंतांस कळूंच दिला नाहीं. 'गजानन कृपा करील तर काय न होईल', एवढेंच बोलले. हरिपंत फडके यांस आपलें श्रीवर्धनच्या देशमुखीचें वतन इनाम करून दिलें. चार दिवस सारे मातबर श्रीमंतांजवळ बसूनच आहेत. चार चार घटका सर्वांनीं बसावें असें श्रीमंत बोलले. कोणास मनाई नाहीं, अशा रीतीनें क्षीण होऊन गेले. श्रीमंतांनीं खाशा गाई होत्या त्या आपले हातानें ब्राह्मणांस दान दिल्या. मोक्षधेनूचा संकल्प स्वमुखें करून दानें दिलीं. वैद्यास अगोदरच प्रार्थना असे कीं, मरण समयीं अतिसार व्हावा, हें उत्तम, कफ होऊं न द्यावा. नाहीं तर गजाननाचें स्मरण व्हावयाचें नाहीं. दोन घटकांनीं प्राण जाणार, त्यापूर्वीं सर्व मंडळी व मोठमोठे वैदिक ब्राह्मण बोलावून नमस्कार केला. 'आम्ही महायात्रेस जातों, स्वारीची तयारी करा', म्हणोन सांगितलें. प्राण जाऊं लागला ते समयीं अन्न घालूं नका, दूध अथवा गंगोदक घालणें, अशी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ताकीद केली. स्मृति अखेर क्षणापर्यंत होती. बुधवार कार्तिक वद्य ८स दोन घटका दिवस असतां 'गजानन' 'गजानन' म्हणत मोठ्या योग्याप्रमाणें नेत्रद्वारें प्राण गेला. प्रजेचें छत्र गेलें, मोठा घात झाला. बाईसाहेबांनीं तरुणपणांत स्त्रीधर्माची शर्थ केली. सर्व जवाहीर आपले हातानें वांटलें. धर्मशीलेवर उभें राहून, दादासाहेबांस बोलावून धाकटे श्रीमंतांस त्यांचे हातीं दिलें. सर्वांचें वडीलपणें यथास्थित चालावें, असें सांगोन सती गेली. मोहोरांच्या पिशव्या दोन जवळ ठेवून जो नमस्कार करावयास आला, त्यास कनिष्ठास देखील एक एक मोहोर दिली. श्रीमंतांचा प्रताप जसा होता तसा बाईनीं शेवट केला. त्यांच्या पुण्यास जोडा नाहीं, सूर्यमंडळ भेदोन गेलीं'. द्वाविमौ पुरुषौ लोके सूर्यमंडलभेदिनौ। परिव्राड् योगयुक्तश्च रणेचाभिमुखो हतः ॥ या कोटीपैकीं माधवराव पेशवे होते. उभयतांच्या उत्तरकार्याचा खर्च विधिवार रुपये सत्तर हजार झाला. शिवाय एक लक्ष रुपये रोख दानधर्म म्हणून देण्यांत आले. रमाबाईचें वय मरणसमयीं पंचवीस वर्षांचें असावें. तिच्याविषयीं फारशी हकीकत उपलब्ध नाहीं. हरेश्वर, नासिक, वगैरे ठिकाणीं ती जात असे. जमल्यास स्वारींतही नवऱ्याबरोबर जाई. तिचा बाप १७६७ च्या डिसेंबरांत वारला, तेव्हां आई नाशकास होती, तिला भेटण्यास रमाबाई पुण्याहून गेली होती. (Forrest P. 159). उत्तरकार्याचा खर्च व तपशील, मा. रो. १. १०१ येथें दाखल आहे.

४. राज्याची निरवानिरव.—माधवरावाच्या रुग्णावस्थेची व अंतकाळची हकीकत तत्कालीन शब्दांनींच वर दिली आहे. त्यांत पेशव्यानें राज्याची पुढील व्यवस्था काय ठरविली, तेवढें स्वतंत्रतेनेंच सांगणें जरूर आहे. ह्या शेवटच्या व्यवस्थेंत हरिपंत फडके सन्निध असून शिवाय रामशास्त्री व सर्व प्रमुख कारभारी बहुतेक सारखे जवळच असत.

दादासाहेब कलिपुरुष राज्यांत बखेडे कशा प्रकारें करीत होता, त्याची जाणीव माधवरावास पूर्ण असून त्याचा बंदोबस्त कसा राहतो, हीच त्यास अंतकाळीं सर्वांत मोठी विवंचना होती. अशा गृहस्थास सामदामानें वागवून निभवावें लागतें. वर्दळीस येण्यांत जास्तच कलह पेटून त्यांत राज्याचें नुकसान होतें, ही भावना माधवरावाची दिसते. धोडपचे युद्धानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादाची बाहेरची हालचाल बंद होऊन अडथळे समाप्त झाले, त्यामुळें अल्पावकाशांत अनेक प्रकरणांचे निकाल माधवरावास त्वरेनें करतां आले. पुढें त्याची प्रकृति बिघडली, त्याचें मुख्य कारण चुलत्याचें अनुष्ठान होय, तो प्रतिबंधांत आहे तोंपावेतों हें अनुष्ठान बंद पडणार नाहीं, आणि तें बंद झाल्याशिवाय पेशव्याची प्रकृति सुधारणार नाहीं, असा सार्वत्रिक समज मोठमोठ्यांचा होता. मात्र माधवरावास त्याची बिलकुल पर्वा वाटत नव्हती. तरी दोन वर्षेपावेतों अहोरात्र कानीं कपाळीं हा प्रश्न घाटत असून जानोजी भोसले वगैरे मोठमोठ्या सरदारांच्या शिफारसी आल्यावरून, माधवरावानें चुलत्याकडून सन १७७२ च्या फाल्गुन मासांत करार लिहून घेऊन त्यास मोकळें केलें. ता. २२-६-१७७२ रोजीं सखारामपंतास कारभार सांगितला. नारायणरावास जवळ घेऊन कारभार करावा, द्यावें देणें नारायणरावांनीं करावें, असें पुण्यास येऊन माधवरावानें ठरवून दिलें; परंतु दादाची चिंता त्यास मोठी होती. दादा मोकळा झाला तेव्हांपासून त्याचा आग्रह आपली व्यवस्था लावून घेण्याचा होता, आणि पेशव्याच्याही मनांत दस्तऐवजी लेख करून पुढील व्यवस्था ठरवावी असें होतें. 'रघुनाथराव वाड्यांत होते. त्यास रामशास्त्री समवेत थेउरास आणवून स्नेहाच्या गोष्टी करून अवतार समाप्त केला'. यावरून ता. ३०-९-१७७२ रोजीं खालील नऊ कलमी याद पेशव्यानें ठरविली; व कारभाऱ्यांनीं त्यांवर कबुली लिहून दिली. तिचाच गोषवारा बहुतेक धा. रा. बखरींत आहे:—'१ दौलतीस कर्ज आहे तें वारावयाचें. त्यास गुरुजींजवळ ऐवज आहे तो घेऊन तूर्त निवळ कर्ज असेल त्यास द्यावा. दुसरा ऐवज, दौलतीसंबंधीं मसलत न करितां, आधीं कर्ज वारावें. मग दौलतीसंबंधीं जसें करणें तसें करावें'. 'कर्ज वारण्याविषयीं चित्तापासून जलदी करून वारूं. कदाचित् जरुरीची मसलत पडल्यास करावी लागेल. शपथपूर्वक लिहिल्याप्रमाणें करूं. दौलतसंबंधीं ऐवजानें कर्ज वारून गुरुजींकडील ऐवजामाफक, कर्ज राहील तेव्हां, ऐवज घेऊन रोकडीचें कर्ज वारूं'.

२. कोंकणांत व देशांत इजारे झाल्यामुळें रयतीस सुख नाहीं, त्यास वारकाईनें मनांत आणून, वाजवीचे रीतीनें जसें जाहलें असेल तें नीट करून, प्रजापालन करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

३. श्रीकाशी, प्रयाग, हीं दोन्ही स्थळें सरकारांत यावीं, असा तीर्थरूपांचा हेत होता. त्यास प्रस्तुत करण्याजोगे दिवस आहेत. दहावीस लक्षांची जहागीर मुबदला पडली तरी देऊन, दोन्ही स्थळें हस्तगत करावीं. प्रयत्न करावा.

४. तीर्थरूप मातोश्रीबाईसाहेबांचा हेत काशीस जावयाचा आहे. त्यांस सुपथ पडल्यावर यात्रा घडवावी.

५. तीर्थरूप भाऊसाहेबांची क्रिया माघ-मासीं जरूर करावी. काकूबाई जाऊत वा राहूत. उत्तम प्रकारें क्रिया करावी.

६. काशीचे ब्राह्मणांस वर्षासनें आहेत, तीं पिढीजाद करून देऊन, वर्षास पावतीं करीत जावीं.

७. काशीस दोन लक्ष ब्राह्मणभोजन करावें. दक्षणा दोन पैसेप्रमाणें द्यावी.

८. तीर्थस्वरूप दादासाहेबांस पांच लक्षांची जहागीर निवळ लावून द्यावी. याहून थोडेंबहुत अधिक मागितल्यास त्यांचा संतोष राखून मर्जी प्रसन्न राखावी. निदान सात लक्षांची जहागीर देऊन मर्जी राखूं. अधिक कांहीं मागूं लागल्यास ऐकूं नये.

९. श्रावणमासाचा धर्मादाय पूर्वीपासून चालत आला आहे, तसा चालवावा. पांचा लक्षांची दौलत राही तावत्कालपर्यंत चालवावा. यासी अनमान करूं नये.

'नऊ कलमें लिहिलें अन्वयें श्रीगणपतीची शपथपूर्वक करूं'.

१. वरील यादीवरून अंतकाळीं पेशव्यास कोणकोणत्या गोष्टींची विवंचना लागली होती, हें कळून येतें. मुख्य विवंचना कर्जाची होती.

ता. २३-१०-१७६७ रोजीं सिंदे-होळकरांनीं दौलतीचें कर्ज पन्नास लाख मुदतबंदीनें तीन वर्षांत वारण्याचा करार माधवरावास लिहून दिला होता. (पे. द. पृष्ठ २०२). यावरून सर्व कर्ज पन्नास लाखांहून ज्यास्त नसावें, आणि वरील कराराप्रमाणें तें फिटलें नाहीं म्हणून अंतकाळीं मोठी चिंता पेशव्यास लागली. हिंदुस्थानांतून उत्पन्न येईल त्याची शेंकडेवारी वरील करारांत नमूद असलेली ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. ती अशीः—

शेंकडा २५ पेशवे प्रधान; शेंकडा ५ दादा; शेंकडा २३।– होळकर शेंकडा २३।– सिंदे; शेंकडा २३।~ इतर सरदार स्वारींत जातील त्यांस वांटून देण्याचे : एकूण १००. मुलूखगिरीची ही वांटणी शाहुछत्रपती-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पासून कसकशी बदलत गेली हें तपासणें योग्य होईल. वरप्रमाणें कर्ज वारलें नाहीं तेव्हां स्वतःजवळ आंत बाहेर जो काय ऐवज असेल तो सर्व भरीस घालून कर्ज वारावें अशी ताकीद पेशव्यानें मरणापूर्वी दिली, तेव्हां खाजगी खजिना वगैरे एक कोट रुपये देऊन कर्ज वारिलीं. बरेंचसें कर्ज नाना फडणीस वगैरेंच्या खटपटीनें रामचंद्रपंत परांजपे सावकार यानें आपल्याकडे हवाले घेऊन सावकारांच्या सोडचिठ्या आणून पेशव्यास दाखविल्या, अशी आख्यायिका आहे, तींत थोडेंबहुत तथ्य असावें. पुढें नाना फडणिसानें दौलतीचें कर्ज वारून राज्याची सुव्यवस्था केली, हें प्रसिद्धच आहे. शाहू छत्रपतीप्रमाणेंच माधवराव पेशव्यासही लोकांचें कर्जांत मरण येणें अत्यंत अनिष्ट वाटत होतें.

२. रयतेचे सुखाची कळकळ माधवरावास वाटली ती त्याच्या थोर कर्तव्यनिष्ठेची साक्ष देते.

३. मराठशाहीसंबंधानें वडिलांचे हेतु माधवरावानें पुरे केलेच होते. दिल्लीच्या बादशहाचा कबजा हातांत आल्यावर काशी व प्रयाग हीं क्षेत्रें आपल्या हातीं घ्यावीं अशी त्यानें शेवटची आज्ञा लिहून ठेविली, पण ती सिद्धीस गेल्याचें दिसत नाहीं. मात्र वस्तुतः इतर मुलखाबरोबर हीं क्षेत्रेंही आतां नांवानें तरी मराठ्यांचेच हातीं आलीं.

४. गोपिकाबाईची काशीयात्रा बहुधा झालीच नाहीं असें दिसतें.

५. भाऊसाहेबांची क्रिया झालेली नसून पार्वतीबाई सवाष्णपणें वावरत राहिल्यानें लौकिकास वाईट व तोतयाचें खूळ वाढण्यास कारण होई. सबब त्यांची उत्तरक्रिया करून पार्वतीबाईनें सोवळें व्हावें अशी पेशव्याची आज्ञा असून, 'काकूबाई राहूत व जाऊत' असें वाक्य आहे, म्हणजे ती सती जावो किंवा राहो. सती न गेली तरी उत्तरक्रिया करावी. क्रिया न झाल्यामुळें पाप होऊन तें आपल्या कुळास बाधतें अशी माधवरावाची समजूत दिसते. नारायणरावास वस्त्रें झाल्यावर दुर्गाबाईचे लग्नापूर्वी दादा व सखारामबापू यांचे मनांत विधि उरकावा असें होतें; परंतु नारायणरावाचें मत अनुकूळ नव्हतें. 'पुण्यांत येऊन वचनें काढून सिंहस्थापावेतों राहविलें. बाईस विचारतां ती म्हणाली, पर्वतीवर तोतया अडकवून ठेविला आहे, त्यास आणून निकाल करावा आणि मग विधि उरकावा'. परंतु तें १७६५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पर्यंत झालेंच नाहीं. बापूचे मनांत तर जबरीनें विधि उरकून मग ब्राह्मणांस असें होतें, (खरे ले. १२४३). अखेरीस उभयतांची उत्तरक्रिया पार्वतीबाईचे मृत्यूनंतर सन १७८३ त झाली.

६।७. काशीचे ब्राह्मणांचीं वर्षासनें चालविण्याबद्दल विशेष आज्ञा आहेत, त्या त्या कालच्या धर्मसमजुतीस अनुसरून आहेत.

८. दादासाहेबास पांच लक्ष किंवा जरूर लागल्यास अधिकही नेमणूक देऊन त्यास संतुष्ट ठेवावें अशी मुद्दाम ताकीद दिली आहे, ती महत्त्वाची आहे. राज्यकारभारांत दादास कांहीं एक अधिकार अगर महत्त्व पेशव्यानें ठेविलें नाहीं. वडील म्हणून त्यास पोसावें आणि त्यानेंही स्वस्थ स्नानसंध्या करून संतोषानें असावें. अर्थात् आपले पश्चात् नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें आणवून सखारामबापू व नाना फडणीस या दोघांनीं राज्याचा कारभार करावा, असें माधवरावानें शेवटीं ठरवून दिलें. यादीवर गणपतीसमोर शपथा झाल्याचा उल्लेख आहे. अर्थात् या दोन कारभाऱ्यांनीं शपथपूर्वक दरेक कलमास जबाब लिहून दिलेले आहेत. त्यावरून ते दोघे हल्लींच्या पालकांच्या किंवा ट्रस्टींच्या स्वरूपाचे दिसतात. स्वतः पेशवाई मिळविण्याचा उघड व प्रच्छन्न प्रयत्न दादानें अनेकवार करून पाहिला, तो माधवरावाचे शहाणपणानें सिद्धीस गेला नाहीं. माधवरावानंतर नारायणरावाचे नालायकीनें पुनरपि दादास संधि प्राप्त झाली, तिचा उपयोग त्यानें कसा करून घेतला हें पुढें दिसून येईल. वरील यादी म्हणजे माधवराव पेशव्यांचें मृत्युपत्रच होय.[1]

५. **कौटुंबिक राहणी.—मातुश्री, गोपिकाबाई व माधवराव** यांच्यासंबंधानें मागें अनेक उल्लेख आलेच आहेत. राक्षसभुवननंतर सन १७६४ च्या चैत्रांत ती नाशकास गेली, तेव्हांपासून ती बहुतेक गंगापुरास राहत असे. तेथील वाडा बांधण्यास अठरा हजार रुपये खर्च झाले. तिच्या खर्चास सालाची नेमणूक बारा हजार रुपये होती. माधवराव तिला

१. आधार.—पे. द. पृष्ठ १३४—१३६ व २०२; ऐ. टि. १. ८; ऐ. स्फु. ले. ३·२२, ३·२३; महेश्वर दर० बातमीपत्रें १. ८; का. सं. प. या. ले. ४९६ पृष्ठ ५४१; खरे ले. ११७३, ११७५, ११८२, ११८३.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वारंवार पत्रें पाठवून सर्व महत्त्वाच्या गोष्टी जेव्हांच्या तेव्हां कळवी. बारा दिवसांत मातुश्रीचें पत्र आलें नाहीं त्यावर 'बहुत दिवस आशीर्वादपत्र येऊन वर्तमान कळत नाहीं', असें त्यानें लिहिलें आहे. म्हणजे त्यांचीं पत्रें किती जात होतीं याची कल्पना होते. अमुक एका कामांत मीं काय करावें, कसें वागावें, अशी सल्ला मातुश्रीला विचारल्याचा शेकडों पत्रांत एकही उल्लेख नाहीं. यावरून तिला खबर देणें, प्रकृति विचारणें व आज्ञा पाळणें, या पलीकडे कारभारांत माधरावानें तिची सल्ला घेतलेली दिसत नाहीं. सन १७६४ चे अखेरीस दादा नाशकाहून माधवरावाकडे कर्नाटक स्वारींत गेला, तेव्हां मातुश्रीला गंगापुरास राहण्याचें कारण नव्हतें, म्हणून ता. २८ जानेवारी १७६५ रोजीं माधवराव तिला लिहितो, 'बहुत दिवस पत्र येत नाहीं, प्रस्तुत वडिलांची शरीरप्रकृति कशी आहे. पुण्यास कधीं येणार ? पुण्यास यावयाविषयीं एक दोन पत्रें निकडीनें पाठविलीं, यास्तव मर्जीत कांहीं विपर्यास आला किंवा कसें, तें लिहिणें. पुण्यास यावयाचें कारण हेंच कीं, प्रस्तुत गडबडीचे दिवस. कोळ्यांनींही पुण्याकडे दंगा मांडिला आहे. गंगास्नानेंही बहुत झालीं. आधींच शरीरप्रकृति अशक्त. नित्य गंगेचें स्नान, तेथची हवा सर्द, म्हणून पुण्यास यावयास लिहिलें होतें. याशिवाय कागदपत्र जाण्यायेण्यास नाशिक फार लांब पडतें. यास्तव जरूर पुण्यास येण्याचें करणें. असेंही असून मर्जीस न येईल तर मलाही वडिलांचे मर्जीपेक्षां अधिक काय आहे ?' हें पत्र रामचंद्रपंत गोरे कारकुनास लिहिलें असून 'पत्र तुमचे विचारास आल्यास दाखविणें, नाहीं तरी फाडून टाकणें', असें शेवटीं लिहिलें आहे. म्हणजे मातुश्रीचा कल माधवराव किती सांभाळीत होता हें दिसतें. 'तुम्हांजवळ आज्ञा वारंवार केली कीं, तालीम न करणें. त्यास आज्ञेपेक्षां तालीम अधिक कीं काय ! तालीम सोडिली. नमस्कार मात्र घालीत असतों, असें वडिलांस श्रुत करणें', असें ३१-५-६७ रोजीं माधवराव लिहितो. दादाही तिला वारंवार पत्रें लिहीत. 'गंगापुरचें घर तयार झालें. सांप्रत घरांत गेलों. गंगातीरीं राहवें हेंच मानस आहे. इकडे कांहीं उपद्रव झाल्यास त्र्यंबकीं जाऊं म्हणून लिहिलें, बहुत उत्तम आहे. मर्जीस पडेल तेथें राहवें' असें तिला ता. ८-२-१७६५ रोजीं दादानें लिहिलें. सन १७६३ च्या वैशाखांत मोगलानें पुणें जाळलें, त्यापुढील

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सालच्या उन्हाळ्यांत पुरंदरचा दंगा चालू होता. तेव्हां नाना फडणीस बाईस लिहितो. 'यामुळें पुण्याची वस्ती यथास्थित न झाली, फुटकी वस्ती आहे. लोक दहशत खाऊन तजावजा आहेत. हल्लीं नारायणराव आले म्हणून लोकांस भरंवसा येऊन पूर्वीप्रमाणें वस्ती होत चालली. याकरितां नारायणराव यांस आपण गंगापुरास न नेणें, आपणच येथें यावें, व रावसाहेबांचींही पत्रें आलीं म्हणून सेवेशीं लिहून पाठविलें होतें. त्यास उत्तर आलें कीं, पुण्यास येत नाहीं. त्यास ऐसें आपण लिहिल्यास सेवक लोकांचें काय चालतें ? परंतु आपण येथें आल्यानें लोकांस धीर पुरोन गांवची भरवस्ती होईल', (ता. ५-३-१७६५). पुढील एप्रिलांत माधवराव लिहितो. 'नासिक प्रांतीं पावसाच्या आपत्तीमुळें महागाई फार झाली आहे, सबब त्या प्रांतीं धान्य वगैरे आणण्यास जकात माफ करावी, असें मातुश्रींनीं लिहिलें. त्यास एके ठिकाणीं जकात माफ केल्यास सर्वत्र माफ करावी लागेल, अशी विनंति करून आज्ञा होईल त्याप्रमाणें लिहून पाठविणें'. ता. १६-२-१७६७ रोजीं माधवराव गोरे यास लिहितो, 'प्रस्तुत वडिलांची प्रकृति कशी आहे ? गंगा विष्णु वैद्यास तेथें न्यावें अशी विनंति वडिलांजवळ केली होती, त्यावरून नेला असेल; नसला नेला तर तुम्ही फार प्रकारें विनंति माझे बाटची करून त्यांचें औषध महिना पंधरा दिवस घेत तें करणें. हें काम आमचें खासगत तुम्हांकडे आहे. तरी जरूर जरूर काम करावें'. इतकी काळजी माधवराव आईची ठेवीत होता. ता. ३०-४-१७६७ रोजीं नाना फडणीस गोपिकाबाईस लिहितो, 'रावसाहेबांची स्वारी पुण्यास येत आहे, त्यापूर्वीं आपणास यावयाचें करावें, ओझ्यास उंट रवाना केले आहेत. लवकर निघून आल्यास फार उत्तम आहे'. परंतु ती पुण्यास आलीच नाहीं. माधवरावानें हर प्रयत्न केले कीं, मातुश्रीनें पुण्यास यावें, पण ती आली नाहीं. सन १७६९ त भोसले पुण्यावर चालून येणार म्हणून गडबड उडाली. तेव्हां पत्र पावतांच दादासाहेब व सौभाग्यवती काकूबाई (आनंदीबाई) यांस सर्व वस्तभाव सुद्धां सिंहगडास पाठवितों. आपण पत्र पावतांच नारायणरावास घेऊन त्र्यंबकेश्वरास जावें. अनमान करावयाचा नाहीं. उपेक्षा करूं नये', असें नानाफडणिसानें मातुश्रीस रगडून लिहिलें. पण ती गंगापुराहून हालली नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कुटुंबांतील कलह पाहून तिच्या मनास अप्रतिम उद्वेग होऊन ती जी एकदां सन १७६४ त पुणें सोडून गेली ती कायमचीच गेली. नारायणरावाचे खुनानंतर दुःखावेग अनिवार होऊन ती कांहीं महिने जोगीण होऊन मठांत राहिली; भिक्षा मागून निर्वाह करी. सवाईमाधवरावाच्या जन्मानंतर तिच्या मनास किंचित् समाधान झालें. हिच्यांसारखे तीन मुलगे पोटीं होऊन तिघांचे तीन विपरीत परिणाम झाल्यावर कोणत्या आईस इहलोकची यात्रा कष्टप्रद वाटणार नाहीं !!

'तुम्ही दादांपासून वेगळे होऊन जाणार म्हणून ऐकलें; तुम्हीं तर कांहींच न लिहिलें; त्यास सविस्तर वृत्त बालबोध कागद लिहून सेवेशीं रवाना केला होता'. या लिहिण्यावरून दुसऱ्यास न कळावयाजोग्या नाजूक गोष्टी माधवराव मातुश्रीस मुद्दाम बालबोधींत लिहीत असे. म्हणजे तिला मोडी वाचतां येत नव्हतें, म्हणून तिची इतकी व्यवस्था तो स्वतः ठेवी. इतकेंही करून कारभारांत मातुश्रीच्या शिफारसी तो ऐकत नसे. मातुश्रीच्या सर्व पत्रांत स्वतःस तो माधवराय असें म्हणवितो; 'अपत्यें माधवरायानें चरणावरी मस्तक ठेवून' असें लिहितो. इतर सर्व मंडळींस तो 'माधवराव बल्लाळ प्रधान' असें लिहितो. गोपिकाबाईस राज्यांतील तमाम विषयांची व व्यक्तींची फार चांगली माहिती होती व त्यांचा तपासही ती कसोसीनें ठेवी. चं. द. ले. ११४ व ११८ त माधवरावानें मातुश्रीस इंग्रज-निजामाचे तहाची फोड लिहिली आहे, त्यावरून हिंदुस्थानांतील निरनिराळ्या सत्ताधीशांचीं कारस्थानें तिला किती बारकाईनें कळत होतीं याचा बोध होईल. गोपिकाबाईची खासी चाकर येसू इचा मुलगा बाबूसिंग म्हणून होता. त्याचें लग्न गोपिकाबाईनें सुलतानजी दरेकर याच्या मुलीशीं सन १७७१ च्या वैशाखांत करून दोहोंकडचा खर्च स्वतःच केला. खर्च ३७५० रुपये झाला. त्याचा तपशील गोपिकाबाईचा कारभारी रामचंद्र नारायण यानें दिलेला पाहण्यालायक आहे. (मा. रो. २. ७६८).

आनंदीबाईची हकीकत व जीवनवृत्त दादाचें प्रकरणांत दिलें आहे. माधवरावाचे मनांतला आनंदीबाईबद्दल बरा किंवा वाईट कांहींच अभिप्राय आढळत नाहीं. तशांत मनांतील अभिप्राय कारणाशिवाय बाहेर कोणास सहसा कळविण्याचा माधवरावाचा संप्रदायही नव्हता. परंतु तो स्वतंत्र विचाराचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असल्यामुळें न्यायबुद्धीनें सर्वांशीं वागण्याचा त्याचा रिवाज असून कुटुंबांतलि बायकांच्या भानगडींत तो सहसा पडत नसे. प्रत्यक्ष मातुश्रीसंबंधानें सुद्धां पुत्र म्हणून आज्ञा पाळण्यापलीकडे विशिष्ट स्वरूपाचा लळा त्यानें प्रगट केलेला नाहीं. पार्वतीकाकूबद्दल तर त्यास अनादरच असावा असें सदाशिवरावाच्या उत्तरकार्यांतील उल्लेखावरून वाटतें. आनंदीबाई नवऱ्याप्रमाणें उच्छृंखल असती तर तिच्या हालचालींवर नजर ठेवण्याची ताकीद माधवरावानें दिली असती, परंतु दादावर सक्त नजर असतां आनंदीबाईबद्दल यत्किंचित् तपास ठेविलेला उल्लेख नाहीं, यावरून तिच्याबद्दल विशिष्ट प्रकारचें वाईट मत माधवरावाचें नव्हतें, आणि माधवरावाचे हयातींत ती कारस्थानें करीत नसावी, असें अनुमान होतें.

रमाबाई.—माधवरावाचें आचरण नियमित व कडक होतें. तालीम, स्नानसंध्या, नमस्कार, पोथी वाचणें वगैरे तो नियमानें करीत असे. पुढें पुढें प्रकृति बिघडूं लागली. तेव्हां मातुश्रीच्या आग्रहावरून त्यानें दंडबैठका वगैरे जोराची तालीम सोडून दिली. आहारपेयादि आवडनिवड त्यास विशेष नव्हती. सदा औषधें व पथ्यें चालूच होतीं. कोठेंही स्वारी गेली तरी भाज्या, पानें, फुलें, पथ्याचे पदार्थ वगैरे जागोजागीं पुरविण्याचा बंदोबस्त आगाऊ होत असे. त्याचें लग्न साडेआठ वर्षांचें वय असतां ता. ९-१२-१७५३ रोजीं रमाबाईशीं झालें. गर्भादान ता. ३-७-१७६५ रोजीं म्हणजे लग्नानंतर ११–१२ वर्षांनीं झालें, त्या प्रसंगीं तिचें वय १४–१५ वर्षांचें धरल्यास लग्नांत ती अगदींच लहान ४ वर्षांची असावी. प्रथम लग्न दुसऱ्या मुलीशीं ठरून तें मोडल्यानें आयत्या वेळीं रमाबाई पसंत केली, त्यावरून ती लग्नांत अल्पवयीच असावी. अर्थात् माधवरावाचा वैवाहिक काल फार फार तर सात वर्षांचा दिसतो. त्यांतून शेवटचीं दोन वर्षें तो जवळ जवळ अंथरुणासच खिळलेला होता. सन १७७० च्या ऑक्टोबरांत स्वारींत निघण्याचा मुहूर्त ठरला असतां 'चतुर्थ दिवसाचा गुंता पडला सबब राहिले', असा उल्लेख आहे. सन १७६५ ते १७७० च्या पांच वर्षांच्या वैवाहिक कालांत माधवरावाचा मुक्काम बहुधा स्वारींत व प्रवासांत असे. क्वचित् प्रसंगीं जवळच्या यात्रेस किंवा स्वारींत रमाबाई माधवरावाबरोबर असे. एकदांच ती कर्नाटकस्वारींत गेली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. ४-४-१७७२ रोजीं हरेश्वरच्या यात्रेस ती गेल्याचा उल्लेख आहे. गंगापुर, वाई वगैरे ठिकाणीं पेशव्यांच्या स्त्रिया वारंवार यात्रेस जात असत. स्वतः रमाबाई अत्यंत नेमनिष्ठ होती. उपासतापास करून तिनें शरीरास फार कष्टविलें होतें. या सर्व गोष्टी ध्यानांत घेतल्या म्हणजे विषयवासनेंत माधवरावाचा काल फारसा गेला नाहीं. राजयक्ष्माच त्यास मारीत होता, नाहीं तर त्याचें शरीर चांगलें टिकलें असतें.

ज्योतिष.—माधवरावाचा ज्योतिषावर मोठा भरंवसा होता असें दिसतें. महत्त्वाच्या भेटी, लढाई, तह, वगैरे प्रसंग तो मुहूर्त पाहून करीत असे. 'आज दिवस बरा नव्हता म्हणून भेट घेतली नाहीं', असे उल्लेख ठिकठिकाणीं आहेत. सन १७६९ सालीं भोसल्यावर मोहिमा चालू असतां काशीप्रयागकडील कोणी 'मुरली ज्योतिषराय' ह्यानें लिहिलेलें एक हिंदी पत्र आहे. त्यांतील मजकूर. 'श्रीराजेसाहेब पंडित प्रधान श्रीमंत माधवराव-साहेबजी अनेक आशीर्वाद वाचणें. महाराजके ग्रहविचार करके माघमास विषे पत्र भेजाथा. सो महाराजने देखा होगा. जानोजी भोसलेको ऐसा लिया जेसे सिंहके आगे मृग. अमारा कागद अनामत रखियेगा. देख लेना. बडी बडी मोहीम और लढाईयां फत्ते करोंगे जे तुमसे रजू नहीं, ते हाथ बांधके मिलेंगे. दुश्मन भाग जावे, मारे जावे, पकडे जावे. जो मनसुबा होवे सो श्रीमंतके हातसे सैरें पातशहा वजीरसे दोस्ती होवे, जश तमाम शहरोंमें होवे. जो दुष्ट है सो दब जावे. राजतेजकी वृद्धि होवे. खबर सार जवाब भेजा करो'. यावरून अनेक ज्योतिषांची सल्ला तो घेई यांत संशय नाहीं. (का. सं. प. या. १७६).

६. **कामाचा उरक.**—सवाई माधवरावाकरितां लिहिलेल्या बखरींत थोडक्यांत मार्मिक अभिप्राय दिलेला आहे, तो असा. 'हिंदुस्थानांत व कर्नाटकांत गड, किल्ले व स्थळें नानासाहेबांचे कारकीर्दीस आलीं नव्हतीं, तीं घेऊन शत्रू पादाक्रान्त केले. बारा वर्षें राज्य रक्षण करून नानासाहेबां-हून अधिक पराक्रम केला. त्याजवर व्यथा होऊन दोन तीन वर्षें हैराणच होते. थेऊरचे मुक्कामीं कैलासवास केला. रमाबाईनीं सहगमन केलें'. यांत नानासाहेबाहून माधवरावाचा कारभार सरस झाला, असा तत्कालीन भाव व्यक्त होतो. मात्र तो अत्यंत त्रोटक असल्यामुळें त्यावरून वस्तु-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

स्थितीचा बोध नीट होत नाहीं. परंतु त्याच्या स्वभावाचें व कर्तृत्वाचें अनुमान त्याच्या अनेक पत्रांवरून होतें. त्याचीं पत्रें विपुल आहेत आणि त्यांतील पुष्कळसे उतारे वर ठिकठिकाणीं दिलेच आहेत. कारभाराचा कालावधि ध्यानांत घेतला तर नानासाहेबाहून किंवा भाऊसाहेबाहूनही त्यानें जास्त लेखन केलें असलें पाहिजे असें दिसतें. मातुश्रीस त्याचीं पत्रें दर आठवड्यास किंवा पंधरवड्यास नियमानें गेलेलीं आहेत. पटवर्धनी दप्तरांतून हीं पत्रें रा० खरे यांनीं छापिलीं, यावरून ज्या त्या वेळीं पटवर्धनांच्या कारकुनांनीं त्यांच्या नकला पैदा केल्या असाव्या. माधवरावाच्या लिहिण्यांत ताडफाडीचा, निकराचा व बिनछपवाछपवीचा प्रकार व्यक्त होतो. नानासाहेबाचें लिहिणें जास्त गंभीर, मधुर व गुंतागुंतीचें, तसें माधवरावाचें नाहीं. मनांत एक व कागदावर एक असा प्रकार माधवरावांत नाहीं. कोणाचीही भीडभाड न ठेविण्याचा निस्पृह स्वभाव त्यांत उतरला आहे. मातुश्रीस पत्रें पाठवून शिवाय तिच्या कारकुनासही वारंवार पत्रें लिहून तो विचारपूस करी. स्वारींत व बाहेर असतां कारभारांतील सर्व महत्त्वाच्या बाबती, लढाया, तह, जयापजय वगैरे सर्व त्यानें मातुश्रीस कळविले आहेत. यावरून मातुश्रीलाही राज्यांतील तमाम कामांची चांगली माहिती होतीसें दिसतें. चुलत्यास लिहिलेल्या पत्रांत त्याच्या अन्यायांचें माप माधवरावानें भरपूर पदरांत घातलें आहे. अंतःकरण दयार्द्र पण न्यायांत निष्ठुर, हा त्याचा बाणा त्याच्या पत्रांत व एकंदर कारभारांत व्यक्त होतो. स्वतःकरितां कांहीं नाहीं. आपण सर्व राज्याचे नोकर, राज्य हें केवळ संरक्षणार्थ आपल्याकडे आलेलें आहे, उपभोगार्थ नव्हे, ही त्याची भावना पदोपदीं व्यक्त होते. अल्पावकाशांत अनेक भानगडींचे निकाल ताबडतोब करून तो व्यवस्था सुरळीत लावी. स्वारींत असतांना अनेक सरदारांच्या व प्रकरणांच्या भानगडी तोडलेल्या मनांत आणिल्या म्हणजे, एकंदर मराठशाहींत कामाचा उरक माधवरावाइतका दुसरे कोणाचा दिसून येत नाहीं. स्वीकारलेल्या कामाचा पिच्छा पुरवून तें तडीस नेल्याशिवाय सोडायचें नाहीं, असा त्याचा निर्धार असे. स्वारींतून मातुश्रीस लिहिलेल्या पत्रांत त्याचा हुरूप, निश्चय व तडफ हे गुण सहज दिसून येतात. 'मनोळी व चिकोडीचा गुंता उरकून धारवाडास आलों. कित्तूरचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गुंता थोडा राहिला आहे. तो सत्वरच उरकून तुंगभद्रा तीरास जाऊं. सावनुरकर भेटीस येणार. मुरारराव निघाले आहेत. हैदर नाईक व मीरफैजुल्ला बिदनुरीं आहेत. वरकड वर्तमान होईल तें सेवेशीं लिहीन'. या एका वाक्यांत एक एक प्रकरण भरलेलें आहे. दुसरें वर्णन पहाः 'हुबळीहून कूच करून सावनुरास आलों. तेथें नबाब भेटीस आले. भेट झाल्यानंतर दुसरे दिवशीं आम्ही नबाबाचें घरीं गेलों. मेजवानी केली. हत्ती, घोडे, वस्त्रें दिलीं. दुसरे दिवशीं आम्हीं नबाबास डेऱ्यास बोलावून मेजवानी केली. दोन हत्ती दोन घोडे दिले. नबाबास एक शिरपेंच व पुत्रांस दोन पदकें दिलीं'. लढायांचीं वगैरे वर्णनें अत्यंत आवेशाचीं व निश्चयाचीं द्योतक आहेत. निजामाकडील आपल्या वकिलास माधवराव लिहितो, 'हैदराचा वकील गप्पा मारीत असेल त्याजवर तुम्हीं न जाणें. सविस्तर अर्थ युद्धाचा वगैरे नबाबास सांगणें. ईश्वराची कृपा आहे तर या दोहों चौ रोजांत त्याचें उत्तम प्रकारें पारिपत्य होईल'. माधवरावाच्याच तोडीचा व जिवाची तमा न धरितां सांगितलेली कामगिरी खात्रीनें बजावणारा एक गोपाळराव पटवर्धन त्या वेळीं होता. कर्नाटकांतील स्वाऱ्यांत यश येण्याचें मुख्य कारण ह्या गोपाळरावाचा अप्रतिम उद्योग होय. लढाईपूर्वी माधवराव चुलत्याचे भेटीस गेला तेव्हां त्याचे बरोबर गोपाळराव, वामनराव, परशुरामभाऊ व निळकंठराव असे चौघेजण होते. गोपाळरावावर संस्थानद्रोहाचा आरोप रा० राजवाड्यांनीं केला, त्या वेळीं पटवर्धनी दप्तरांतील पहिल्या चार खंडांतले कागद त्यांच्या वाचण्यांत आले नसावे. धन्याची मर्जी सांभाळून एकनिष्ठेनें हुकुमाची तामिली व राज्याची सेवा करावी, हें एकच ध्येय ह्या पटवर्धन मंडळींत माधवरावाचे वेळेस दिसतें. रा० खऱ्यांचे खंड म्हणजे त्यांच्या उद्योगाचें चिरंतन स्मारकच आहे.

हिशेबाच्या कामीं माधवरावाचें लक्ष फारच तीक्ष्ण होतें. 'रावसाहेबांनीं हल्लीं कारस्थानी हिशेबावर धरली आहे. कोंकणपट्टीचे हिशेबास प्रारंभ झाला आहे. नाना व मोरोबा फडणीस, महादाजीपंत गुरुजी, नारो आप्पाजी, हरिपंत फडके, रामाजीपंत चिटणीस, हे सर्व हुशार, पाणीदार व निःस्पृह गृहस्थ जवळ बाळगून महालोंमहालचे हिशेब पाहून नवीन मामलती ठरवून देण्याचें काम पावसाळ्यांत पुण्यास जारीनें चाले. पेशवा स्वतः

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बुद्धिमान् व तरतरीत असून त्यास लबाडी बिलकुल खपत नसे. कोणी फसविण्याचा यत्न केल्यास तो कधीं पचत नसे. आत असो कीं मर्जीतला असो, गुन्हा दिसल्याबरोबर त्यास शिक्षा, विटंबना ही व्हावयाचीच. त्याच्या समोर गुन्हा कधीं छपत नसे. गंगथडीचा मामलेदार लक्ष्मण कोन्हेर यानें दरबारांतील लोकांस पैसे चारून खोटे हिशेब सरकारांत गुदरले. त्यावर पेशव्यानें त्याचे घरावर अचानक जप्ती नेऊन कच्चे कागद आणिले; आणि पावणेचार लक्ष रुपये मामलतींत खाल्लयाचें शाबीत केलें. अनेक कारभाऱ्यांस पैसे भरल्याची यादीच सांपडली. आरमाराचे हिशेबांतही छडा लावून अधिकाऱ्यांनीं पन्नास हजार रुपये खाल्लयाचें सिद्ध केलें. तोफखान्याचे हिशेबींही अशाच लबाड्या उघडकीस आणिल्या. पुण्यांतील निरनिराळ्या सरदारांचे कारकून आपल्या धन्यास कळवूं लागले कीं, 'आतां कागदपत्रांस फार भ्यावें. तमाम रुमाल आणूं लागले. आम्हांकडील पत्रें निराळीं ठेवावीं. केवळ कलमदानांत न ठेवावीं. आम्ही आपल्या तर्फेनें ममता संपादण्यास चुकत नाहीं. परंतु मर्जी फारच नाजूक झाली आहे. पेशव्याचे मामा रास्तेबंधु पुण्यांतच आहेत, त्यांजकडील चौथाई सरंजाम घेण्याची घालमेल फार पडली होती. फारच ओढून पाहिलें. न चालेसें झालें तेव्हां चौथाई सरंजाम सरकारांत घेतला. गेल्या स्वारींत फौज सामील व्हावयास दिवसगत झाली, म्हणून फार रागें भरले'. राक्षसभुवनानंतर पैशाची ओढ झाली तेव्हां तमाम सरदारांचे चौथाई सरंजाम सरकारांत घेण्याचा ठराव पेशव्यानें केला. त्यांत होळकर, रास्ते वगैरे कित्येक लाडकीं कुळें होतीं. त्यांनीं फारच टाळाटाळ चालविली. पण माधवरावापुढें कोणाचेंही चाललें नाहीं. 'हिशेबांचा जाबसाल होऊं लागला, म्हणजे कामाची जलदी फार होते. बोलावणें गेल्याबरोबर न आल्यानें रागें फार भरतात. कागद कोणी माघारे टाकले तर फारच बेमर्जी होते. मग कोणाचेंही ऐकत नाहींत. कानाचे अल्प फारच झाले आहेत. सखारामपंत पांच सहा दिवस दरबारास येऊं लागले आहेत. नारो आपाजी, दिनकर महादेव, महादाजीपंत गुरुजी या त्रिवर्गांकडे हिशेब तपासण्याचें काम सांगितलें आहे. समंजसांशीं गांठ आहे. कागदपत्र चांगले असले म्हणजे काय चिंता आहे?' वरील मंडळींकडून हिशेब बरोबर असल्याबद्दल दाखला मिळविण्यांत सर्व लोक मोठा अभि-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मान मानीत. नाना फडणिसाचें कसबही यांतच सिद्ध झालें. 'स्वारीस निघावयाची त्वरा आहे. तमाम पागा आणविल्या. लोकांस जलदीचीं पत्रें पाठविलीं. नाशकास जाण्याचा मनसवा परिच्छिन्न राहिला. आश्विन वद्य प्रतिपदेस डेरे दाखल होऊन पुण्याचे आसपास पर्वती, थेऊर, जेजुरी, मोरेश्वर व करकंबभोसें या पंच यात्रा करून लोक जमा करीत पंढरपुरावरून जाण्याचा निश्चय ठरला आहे. दरबारची मर्जी फारच नाजूक झाली आहे. रंग पाहून जावसाल करतों. प्रसंग दिसेल तसें विल्हेस लावूं. कागदपत्रांस फार जपावें लागेल. तमाम रुमाल आणूं लागले. काल पुरंदर पाहण्यास जाणार होते. गेले तों मुहूर्त उत्तमसा नव्हता. निघाले तों पर्जन्य पडूं लागला. भिजत डेऱ्यास गेले. पुण्याजवळ असतां एक हत्ती मेला. यास्तव फिरून पुण्यास येऊन एकदोन दिवस राहून चांगला मुहूर्त पाहून निघावें असा सिद्धांत आहे. सखारामपंत सासवडास गेले आहेत. ते पंचमीस निघतात. नारो आपाजी व गुरुजी महादाजीपंत समागमेंच आहेत'. याप्रमाणें कर्नाटकांत जाऊन मोठमोठ्या मोहिमा केवळ दबाबाखालीं माधवरावानें पार पाडिल्या. शिऱ्यांचा प्रचंड किल्ला तावडतोब हस्तगत झाला. माधवराव मितभाषणी असे. उत्तम, बरें, ठीक, जरूर नाहीं, अशा शब्दांनीं किंवा संकेतांनीं अनेक कामांचा निकाल तो तेव्हांच करी, वादविवाद करीत किंवा हुज्जत घालीत बसत नसे. ह्या स्वभावामुळेंच त्याजकडे येऊन बोलणारे इसम किंवा कामें समजावणारे कारभारी थोडक्यांत मुद्देसूद बोलून कामें समजावीत. अधिकउणें बोलणारास तात्काल शासन होत असे. हिशेबासंबंधीं त्याची दक्षता खालील पत्रांत व्यक्त होते. 'सालमजकुरीं कोणकोणते महालांच्या रसदा करार झाल्या, कोणते महाल विल्हेस लागले, त्यांपैकीं लगोलग ऐवज किती येणार व मुदतीनें किती, पैकीं पोता जमा किती झाला व बाकी काय, तें लिहून पाठविणें. ज्या महालांच्या रसदा घेणें असतील तेही महाल विल्हेस लावून, लिहिलेप्रमाणें आधीं करणें'. हें पत्र माधवरावानें बहुधा जून सन १७७० त पुणें येथें नानाफडणिसास स्वारींतून लिहिलें आहे (का. सं. प. या. १५८). माधवरावाच्या एकंदर अमदानींत प्रथम तीन वर्षें नीलकंठ महादेव पुरंदरे व सखारामबापू, त्यानंतर नऊ महिने त्रिंबकराव पेठे, पुढें साडेचार वर्षें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सखारामबापू, त्यावर घोडप स्वारीपासून चार वर्षे मोरोबादादा, असे त्याचे कारभारी असल्याचा उल्लेख आहे (का. सं. प. या. पृष्ठ ४३३).[1]

७. **कडकशिस्त.**—मीर रेजा नांवाचा हैदर अलीचा मेहुणा शिऱ्याचे सुभ्यावर होता. शिऱ्यास मोर्चे लावून माधवरावानें किल्ला घेतला; आणि मीर रेजास नवीन जहागिर देऊन आपल्या नोकरींत घेतलें. पुढें मीर रेजा स्वारींत बरोबर असतां एके दिवशीं मुरारराव घोरपड्याच्या लोकांनीं मीर रेजाचा गोठ ता. ८-३-१७६७ रोजीं लुटला. त्या आगळिकींतील माधवरावाचें वर्तन अस्सल कागदांतूनच वाचण्याजोगें आहे. पेशवे चेनदुर्गास वेढा घालून बसले असतां हैदराचा सरदार मीर रेजा पटवर्धनांच्या विश्वासावर मराठी लष्करांत येऊन राहिला होता, त्याचा गोठ कांहीं बदमाष लोकांनीं लुटिला. तेणेंकरून रावसाहेबांस फार वाईट वाटलें व त्यांनीं लुटणाऱ्या लोकांचें पारिपत्य करून लुटींत गेलेली सर्व वस्तवानी त्याची त्यास मिळवून दिली. त्या प्रसंगाचें वर्णन मारो बल्लाळानें केलें आहे तें असें:—

"सायंकाळचे सहा घटका दिवसास श्रीमंत पोथी वाचीत डेऱ्यांत बसले होते. तों एकाएकीं गडबड होऊन लष्करांतून पाय उतार माणसें पिछाडीस हजारों जाऊं लागलीं. गडबड काय आहे, म्हणून मनास आणितां 'मिराच्या लष्करावर हल्ला झाला, लष्कर लुटलें'. असें श्रीमंतास कळतांच डेऱ्यांतून बाहेर येऊन पागेचे राऊत वगैरे ताकिदीस पाठवून दिले. राऊत जाऊन मिराच्या गोटांत पोंचत तों गोट लुटून फस्त केला. जवळ लष्कर मुराररराव याचें होतें. ठिकाण कांहीं लागलें नाहीं. श्रीमंतानीं लष्करच्या अडीचशें माणसांचे हात कान कापिले. केवळ रुद्रावतार झाले. राग आंवरेना.

---

१. **आधार.**—या व मागील कलमांचे. चं. द. ११४, ११८; इ. ९५, ९६. ऐ. टि. २·१९, २·५०, ४·६; खरे ले. ४०९, ४१८, ४२०–४२२, ४४६, ५४८, ५६०, ५६४, ५६८, ५९८, ६००, ६०९, ६१४, ६५२, ६५९, ६८४, ६९४, ७१६, ७१८, ७२२, ७३०, ८०८, १००६, १०३७, १०५४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

याप्रमाणें या गोष्टीचें श्रीमंतास कठिण वाटलें. मागाहून मिराच्या समाधानास बाळोजी पलांडे व कृष्णराव बल्लाळ पाठवून दिले. हे तेथें गेले, त्यांनीं सांगून पाठविलें जे, मिराच्या सलतनेपैकीं कांहीं बाकी राहिली नाहीं. अंगावर वस्त्र देखील नाहीं. असें सांगून पाठविलेवरून श्रीमंतांनीं वस्त्रें, भांडीं, जेवणाचें साहित्य, मिठाई, ऐसी रातोरात पाठवून दिली. तमाम गोटांत ताकीद केली आणि वस्तभाव, घोडीं, उंटें, हत्ती, बैल, ढोर, तमाम जमा करून मिराकडे पाठवून दिलें. अद्यापि वरचेवर पाठवीतच आहेत. श्रीमंतानीं बहुत प्रकारें सामान व नक्त व जवाहीर वगैरे मिरास दिलें. आज तिसरे प्रहरीं श्रीमंत त्याच्या डेऱ्यास जात आहेत. मिराचीही खातरदास्त झाली जे, सरकारांतून हे गोष्ट जाहली नाहीं. कोणी लुच्चांनीं हें केलें."

श्रीमंत कालपासून रागें फार आहेत. दोन चार शिलेदारांचे हात तोडिले, पेंढारी व चाकरीचीं माणसें यांचेंही दोनशेंपर्यंत तोडिले. बहुतांनीं रदबदली केली, परंतु न ऐकिलें. ज्यांनीं घोडीं, उंट, बैल वगैरे नेले होते त्यांस ताकीद झाली कीं, हात तोडूं. त्यावरून सवेंच ज्या लोकांनीं बांधलीं होतीं त्यांनीं सोडून दिलीं. श्रीमंत काल मीरफैजुल्लाचे डेऱ्यास गेले होते. आज तीन दिवस चौकशी व त्याचें साहित्य ह्याखेरीज दुसरा विषय नाहीं. श्रीमंत फारच श्रमी आहेत. पारिपत्याविषयीं मोठा अनर्थ आहे. बहुतांच्या अब्रूवर आली आहे. मुरारराव घोरपड्यास सांगितलें कीं, तुम्हांकडील गारदी गोट लुटावयास गेले होते, त्यांस आणून देणें, आम्ही पारिपत्य करितों. त्यांनीं तुमचें नांव सांगितलें तर मग गारद्यांकडे गुंता नाहीं. तुम्हींच गुत्तीस जावें. तुमचा आमचा ऋणानुबंध तुटला'. या वेळीं सखारामबापूच्या अत्यंत आग्रहावरून मुराररावाची मानहानि टळली. अशा प्रकारचें न्यायनिष्ठुर किंवा कोणाची भीडभाड न करणारें माधवरावाचें वर्तन पाहून सर्व राज्यांत त्याचा वचक अतोनात बसला. मोठमोठे सरदार त्याचा हुकूम झेलूं लागले. तेणेंकरून राज्यांत शिस्त व दरारा उत्पन्न झाला. असा वचक बसल्याशिवाय राज्य सुरळित चालणें शक्य नसतें. हैदरावरही ह्या सर्व कारभाराचा इष्ट तोच परिणाम झाला. त्यानें पेशव्यास अनुकूल असा तह करून दिल्यावर पेशवा परत स्वदेशीं आला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खं. ६-५२० यांत माधवरावाच्या जरबेचा एक विलक्षण मासला उपलब्ध होतो. भलत्याच वेळीं निष्ठुर हुकूम दिलेले पाळण्यास लोक कांकूं करीत. तोंडावर नाहीं म्हणण्याची छाती त्यांस होत नसे. 'घरीं गेल्यावर साफ सांगत, आम्हांस अनुकूल पडत नाहीं. तेव्हां वेडेंवांकडें पुष्कळ बोलोन पागा हिरून आणीन, लुटून टाकीन अशीं भय वाक्यें बोलिले. शितोळ्यांचा जमाव प्रहर रात्रीं भांडूं लागला, त्यावर खिजमतगारांची चौकी पाठविली. हल्ल्यास गाडदी तयार करविले. सखाराम हरि वगैरेंनीं बहुत सांगितलें, परंतु न ऐकत. झुंजाचे अलीकडे क्रूरता फारच धरिली आहे. नित्य एक दोन हात तोडितात; डोकीं मारितात. रदबदल कोणाची चालत नाहीं. जें करतील तें प्रमाण. इजत जतन होऊन पुण्यास येईल तो प्रालब्धाचा. मामास एक जखम लागली, सबब समाधानाचें पत्र लिहावें'. हा प्रकार भोगसाई या ठिकाणीं म्हणजे बहुधा कर्नाटक स्वारींतला असावा.

सरंजामदारांच्या फौजा, घोडे, माणसें, सामान, वगैरे स्वतः तपासून घेण्यांतही माधवरावाची नजर करडी असे. 'गणत्या घ्यावयाची चौकशी फार झाली ती पत्रीं कोठवर लिहावी. परवां तमाम गोट गणत्या घेतल्या. रामचंद्र गणेश, गुरुजी, हरिपंत फडके वगैरे मातबर लोक पाठविले. जिंतीकर भोसल्यांची गणती घ्यावयास नारो कोन्हेर गेले. चांगलीं घोडीं असतां वाईट म्हणून निमित्त ठेवून घासघीस केली. तेव्हां त्यांनीं शंभर रुपये कबूल केले. ते रात्रौ घेतले, इतकें श्रीमंतांस कळलें. बोलावून आणून चौकशी केली. शेवट रुजुवातीनें अंगीं लाविलें. ढालाईत लावून लष्कराबाहेर घालवून देण्याची आज्ञा झाली. सालमजकुरीं चौकशीची सीमा आहे. पंक्तिभोजनास बोलावून लोकांची रुबरू पहाणी करावी. परीक्षा घ्यावी, असेंही श्रीमंत वारंवार करीत. यावरून त्याच्या करडेपणाची कल्पना होते. 'सरंजामीयांचे हिशेब आणविले आहेत. सरंजाम दिल्यापासोन महालोमहालचे आकार काय ? सरंजाम दिला तेव्हां वसुलाप्रमाणेंच दिला नाहीं. वसूल तनखे लावून दिले आहेत. त्यास नक्की वसूल काय झाला असेल त्याप्रमाणें सरकारच्या कागदीं जमाखर्च उगवावा. नक्की वसूल काय तो आणविला आहे. याप्रमाणें फौज कोण कशी ठेवितो हेंही कळेल'.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

माणसाची योग्यता ओळखून त्यास आदरानें व प्रेमानें वागविण्यांत माधवराव अत्यंत दक्ष असे. रामशास्त्री, महादाजीपंत गुरुजी, गोपाळराव पटवर्धन, मोरोबा व नाना फडणीस, गोविंद शिवराम खासगीवाले, हरिपंत फडके यांजवर त्याची मर्जी नेहमींच बहाल असे; आणि तेही सर्व योग्यतीच राज्याच्या हिताची सल्ला देऊन वागत. वडीलकीच्या नात्यानें मातुश्रींना अत्यंत सन्मान तो देई, व त्यांची आज्ञा तो अणुरेणु इतकी मोडीत नसे. परंतु राज्यकारभारांत मातुश्रीची सल्ला त्यानें कधीं घेतली नाहीं, व तिनें दिली नाहीं. प्रत्यक्ष तिचे बंधू रास्ते यांस किंवा मुराराव घोरपडे यासारख्या वजनदार सरदारांस त्यानें बोलबोल म्हणतां ठिकाणावर आणिलें. स्वारींतून महत्त्वाच्या हकीकती तो रामशास्त्री यास कळवीत असे. 'हैदरखानाचा ३३ लक्षांवर करार झाला. इतःपर गुंता नाहीं. आपणांस कळावयाकरितां लिहिलें आहे' असें दर स्वारींतून तो शास्त्रीबोवास लिहितो.

नाना पुरंदऱ्यास माधवराव ता. २२-११-१७६६ रोजीं लिहितो: 'आम्ही दरमजल कृष्णातीरास जातों. तुम्ही सावकाश जाऊं म्हणून चित्तांत आणाल तर तसें न आणितां सत्वरेंच येऊन पोंचणें. विलंब न लाविणें'. नाना पुरंदऱ्याचा मुलगा महिपतराव ऊर्फ बजाबा यास माधवराव लिहितो. 'चाकरी करून दाखवावी म्हणून लिहिलें. त्यास आपल्या मातबरीसारखी चाकरी करून दाखवावी यांतच सर्व आहे. कोणी म्हणतात कीं, चाकरी करितों हेंच मोठें काम आहे. आपलें स्वरूप काय आणि सरकारची तैनात काय खातों हें मनांतच येऊं नये. आणि करतों चाकरी हीच फार, असें मानून कित्येक आहेत. पण तुमची उमेद आहे याचप्रमाणें काम तुम्हांपासून घ्यावें हेंच येथेंही मनांतून आहे. तुमची मातबरी अशी आहे कीं, सर्वांपेक्षां चाकरी अधिक करावी यांतच स्वरूप आहे. पत्र दुसऱ्यास नच कळावें. येथून माझ्या आतचें[1] जाईल तें अथवा तुमचें दोन्ही पत्रें नच कळावीं'.

रमाबाईनें एकदां आपला कारकून जिवाजी परशुराम यास पुण्यांत पटवर्धनांकडे पाठवून विचारलें, 'तुमच्या दोन हत्तिणींपैकीं एक चलाख हत्तीण

१. माधवरावास ह्चा उच्चार येत नसे, म्हणून हातचें बद्दल आतचें असें त्यानें लिहिलें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आमचे अंबारीस देणें. तुम्हांस मुबदला हत्ती चांगला देऊं. त्यावर मोरोबा पटवर्धनानें उडवाउडव करून जबाब दिला, 'हत्तीण चलाख नाहीं'. परंतु पटवर्धनांची नौबतीची हत्तीण चांगली चलाख आहे असें बाईस कोणीं सांगणारानें सांगितलें. यांनीं टाळाटाळ केली. गांठ पडल्यावर तुम्हांस भीड घालतील. त्यांचे अंबारीची हत्तीण आहे, परंतु झोल आहे म्हणून आमची मागतात, असें मोरोबानें गोपाळरावास कळविलें'. एवढीशी हत्तिणीची बाबत नवऱ्याचे मार्फत करून घेण्याची बायकोची प्राज्ञा नव्हती. नवऱ्याचे पाठीमागें रमाबाईचीं विड्याचीं पानें नाना फडणिसानें बंद केलीं ही अशाच प्रकारची आख्यायिका मशहूर आहे.

राज्यकारभारांत माधवराव सर्वथैव निरंकुश व स्वमतानुवर्ती (autocrat) होता. त्याचें मन वळवून अमुक काम त्याजकडून करवून घेऊं, अशी प्राज्ञा त्याजपुढें कोणाची चालत नसे. तो केवळ सत्याचा पक्षपाती असून थाटमाट, चैन किंवा आराम त्यास बिलकूल खपत नसे. सत्य हें खडतर व कष्टसाध्य असतें, त्याचीच मूर्तिमंत प्रतिमा माधवराव होता. आपण राष्ट्राचे सेवक आहों अशी त्याची एकनिष्ठ भावना होती. त्याचा कारभार सर्वथैव लष्करी बाण्याचा होता. वाटाघाटींत किंवा विचारांत निष्कारण वेळ न घालवितां, झटपट काम करून सर्वांगीण प्रगति संपादण्याकडे त्याचें लक्ष असे. अशा पुरुषास अडचणींचें किंवा प्रत्यक्ष मृत्यूचें सुद्धां भय वाटत नाहीं. स्वतःच्या हिंमतीवर तो वागतो. शेवटच्या मृत्युप्रसंगीं सुद्धां डगमगल्याचा शब्द माधवरावाचे तोंडून निघाला नाहीं. 'ईश्वर करील तसें होईल, संसार असत्य', वगैरे दादाचे शब्द त्यास कधीं पटले नाहींत. मनुष्यप्रयत्नच बलवत्तर, मनुष्य करील तें होईल हें त्यानें आपल्या उदाहरणानें सर्व राष्ट्रास स्पष्ट करून दाखविलें. लहान मोठ्या अनेक बाबतींकडे त्याचें लक्ष सारखें वेधलेलें असे. पुणें जाळल्यानंतर माधवरावानें सालोसाल मोठी मेहनत घेऊन शहराची सर्व नवीन रचना केली. सर्व लोकांस परत आणून दुरस्ता हवेल्या सिद्ध केल्या. वस्ती बहुत जाहली. मातुश्रीचें समाधान झालें. बाबूराव हरि वगैरे मंडळीस सवलती देऊन पुण्याच्या पेठा कशा वसविल्या त्याची हकीकत मा. रो. २ ले. ७७७-७८२ यांत व म. सा. छो. ब. त सांपडेल. अशा किती तरी बाबती सांगतां येतील. घोड्यांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पैदास बरोबर ठेविण्यांत त्याची दक्षता दिसून येते. मसकतहून उत्तम घोडे खरेदी आणण्याविषयीं रघूजी आंग्यास माधवरावाच्या आज्ञा वारंवार आहेत. अर्थात् घोडयांचा व्यापार पश्चिम किनाऱ्यावरून चांगला चालत असून, बाहेरून चांगल्या जातीचे घोडे देशांत येत असत.

माधवरावच्या थोर गुणांचें विवेचन आजपावेतों अनेक विद्वानांनीं व लेखकांनीं निरनिराळ्या प्रसंगांनीं इतकें केलें आहे कीं, त्याची चिकित्सा किंवा पुनरुक्ति करण्याचें कारणच नाहीं. ग्रँट डफसारख्या परकीय इतिहास-कारानेंही त्याचे गुणानुवाद भरपूर गाइलेले वाचकांच्या परिचयाचे आहेत. तेव्हां त्यासंबंधानें स्वतंत्र विवेचन न करितां, प्रत्यक्ष उदाहरणांनीं स्पष्ट होणारे प्रकार तेवढेच वर निर्दिष्ट केले आहेत. एकंदरींत मराठ-शाहींत शिवछत्रपतीनंतर बऱ्याच अंशीं त्याचें अनुकरण करून राष्ट्राचा भाग्योदय करणारा दुसरा थोर पुरुष हा माधवरावच झाला असें म्हणणें अवास्तव नाहीं.

८. **प्रमुख व्यक्ती.**—मराठशाहींत फुटींचा कल किती होता हें ठिक-ठिकाणीं दाखविलेंच आहे. सरदारांस नरम करून राज्य सुरळीत ठेवण्याचा प्रयत्न बाजीरावानें केला असें सामान्यतः समजण्यांत येतें. पण तसा प्रयत्न मोठ्या नेटानें माधवरावानेंच केला हें लक्षांत ठेविलें पाहिजे. वास्तविक माधवराव या बाबतींत अतिशय निरंकुश होता. नानासाहेबास आरंभीं शाहूचें नियंत्रण होतें, आणि कठोर निग्रहानें वागण्याचा त्याचा स्वभावही नव्हता. परंतु माधवरावास कोणतेंच नियंत्रण नव्हतें. प्रतिनिधि, बाबूजी नाईक, जानोजी भोसले, मुरारराव घोरपडे, रामचंद्र जाधव, सिंदे, होळकर, गायकवाड, नारो शंकर, सदाशिव रामचंद्र, इत्यादि सर्व डोईजड मंडळींस माधवरावानें असें नरम आणिलें कीं, ते सर्व अजीजी करीत माधवरावाची आज्ञा झेलूं लागले. नीलकंठ आबा पुरंदरे, सखारामबापू, देवाजीपंत, चिंतो विठ्ठल, गंगोबातात्या या गृहस्थांचें केवढें प्रस्थ, पण हे सर्व त्यास शरण आले. ज्या सरदारांस किंवा कारभाऱ्यांस स्वतःच्या शौर्याची किंवा शहाणपणाची घमेंड होती, त्यांचा गर्व उतरवून त्यांचे तोडीचीं नवीन माणसें माधवरावानें तयार केलीं. गोविंद शिवराम लिमये हा एक अत्यंत तडजोडीचा, हुशार व निःस्वार्थी गृहस्थ महत्त्वाच्या कारभारांत पेशव्याजवळ

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असे. शत्रुमित्र दोघेही गोविंदरावतात्यास सारखाच मान देत, व आपापल्या कार्यासाठीं गौरवून पत्रें लिहीत. कृष्णराव बल्लाळ काळे, नारो आपाजी, महादाजीपंत गुरुजी, हरिपंत फडके, गोपाळराव पटवर्धन, गोविंद शिवराम वगैरे कित्येक इसम माधवरावाच्या अत्यंत कृपेंतले, निःस्पृह, कर्तबगार व राज्य-हितास जपणारे, असे केवळ माधवरावाच्या शिस्तींत तयार झाले. यांस खरोखरच नररत्नें असें म्हणतां येईल. दुर्भाग्य कीं अशांची परंपरा पुढें चालविणारा धनी राहिला नाहीं. मोरोबा फडणीस माधवरावाचा कारभारीच होता. नाना व त्याचा मुलगा महिपतराव पुरंदरे माधवरावाच्या भजनीं असत. नाना फडणीस तर कांहीं थोड्या बाबतींत माधवरावाचीच आवृत्ति होय असें म्हणतां येईल. कांहीं मंडळी लष्करी कामांत, तर कांहीं हिशेबांत, कांहीं कारभारांत तर कांहीं परराज्यांचे व्यवहारांत, अशा रीतीनें एक एक विषयांत अप्रतिम हुशारीचीं माणसें निर्माण झालीं. पुण्याची वसाहत करून शहरसुधराईच्या व बंदोबस्ताच्या कामांत नारो आपाजीचा हात धरणारा कोणी नव्हता. सरदार मंडळींत शहाजी भापकर, खंडेराव दरेकर, महिपतराव कवडे, आनंदराव व जानोजी धुळप, नरसिंगराव धायगुडे, सखाराम हरि व त्याचा भाऊ बाबूराव गुप्ते, त्रिंबकराव पेठे, रामचंद्र गणेश, विसाजी कृष्ण व गोपाळराव पटवर्धन हे शिपाइगडी माधवरावाचे जीवास जीव देणारे होते. त्रिंबकराव पेठे, सखाराम हरि, मानाजी फांकडे, सखारामबापू, नाना फडणीस, हरिपंत फडके इत्यादिकांचें स्वभाववैचित्र्य सर्वथा कादंबरींतच शोभण्यासारखें आहे. शत्रुपक्षीय हैदर, निजाम, इंग्रज, नबाब महमदअली, वगैरे सत्ताधीश माधवरावाची आज्ञा झेलूं लागले. चुलता ठिकाणीं बसला. मातुश्री तीर्थवासास राहिली. या सर्व गोष्टी पाहिल्या म्हणजे या तरुण पेशव्याचें राज्य करण्याचें कौशल्य अप्रतिम होतें याविषयीं संशय वाटत नाहीं.

ब्राह्मणांसच पुढें करून माधवरावानें मराठे मंडळीस मुद्दाम मागें सारलें असें बिलकूल दिसत नाहीं. तथापि त्यास चुलत्याचे विरुद्ध झगडावयाचें असल्यामुळें, स्वतःचे विश्वासाचीच पटवर्धनांसारखी मंडळी जवळ आणावी लागली, हेंही ध्यानांत ठेवलें पाहिजे. या परिस्थितीचा परिणाम असा झाला कीं, पुष्कळसें उत्तेजन ब्राह्मणांस मिळालें व ब्राह्मण मंडळी कारभारांत व इतर विषयांत पुढें आली. ब्राह्मणांतही कोंकणस्थच पुढें आले असें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं; अनेक देशस्थही तितक्याच हुशारीचे व माधवरावाचे प्रेमांतले होते. कृष्णाजी बल्लाल, नारो अप्पाजी, यांचीं उदाहरणें ध्यानांत ठेवण्याजोगीं आहेत. अहल्याबाई जातीची धनगर, पण बुद्धिमत्ता, निःस्वार्थ कर्तबगारी वगैरे गुणांत तिची बरोबरी करणारा इसम त्या वेळीं महाराष्ट्रांत दुसरा कोणी नव्हता, हें पाहूनच माधवरावानें तिला सर्व जहागिरीचा कारभार दिला. जानोजी भोसले, महादजी सिंदे, मुरारराव घोरपडे, रामचंद्र जाधव, वगैरे मंडळींस शक्य तितकें उत्तेजन देऊन त्यांचे साह्यानें राज्याची मजबुदी केली. सरदारांच्या वतनांवर स्वार्थदृष्टि माधवरावानें कधीं ठेविली नाहीं. तसेंच थारमारावर व किल्ल्यांवर सदैव फंदफितुरी होत असल्यामुळें, तेथेंही भरंवशाचे ब्राह्मणच बहुधा नेमण्यांत आले. शिवाजीचे वेळीं किल्लेदार मराठे असत ते शंभर वर्षांत सर्रास ब्राह्मण झाले, हें रोजनिशींतील किल्ल्यांची व्यवस्था वाचली म्हणजे स्पष्ट दिसून येतें. अर्थात् माधवराव कितीही हुशार असला तरी न कळतां त्याजकडून ब्राह्मणांस उत्तेजन चांगलें मिळालें यांतही संशय नाहीं. इंग्रजांचें नियंत्रण वेळींच करण्याचा माधवरावाचा मोठा हेतु होता; पण अकालीं मृत्यु आल्यानें ती गोष्ट सिद्धीस गेली नाहीं. मराठशाही-चा ऱ्हास फुटीमुळें होत आहे, याची जाणीव पेशव्यास असून, निष्पक्ष-पातानें व प्रेमानें वागवून सर्वांस एकीच्या बंधनांत त्यानें निगडित केलें. दहा वर्षांच्या त्याच्या कारभारांत इतकी नवीन होतकरू मंडळी निरनिराळ्या पेशांत तयार झाली, कीं पानिपतावरील संहाराची आठवण सर्वथैव बुजून गेली. तेणेंकरून राष्ट्रांत नवीन जोम उत्पन्न झाला; आणि याच जोमाचा उपयोग पुढें बारभाईस दादाचे विरुद्ध झगडतांना विशेषेंकरून झाला. पुढील तीस वर्षांत मराठशाहींत वावरणाऱ्या व्यक्ति माधवरावाचे तालमींत तयार झाल्या. अशीं तयार माणसें नसतीं तर इंग्रजांनीं मराठशाहीचा ग्रास पहिल्याच युद्धांत गिळंकृत केला असता.

आपणास लोक फसवतील अशी भीति सदैव दादास असे, तशी माधवरावास कधींच वाटली नाहीं. माधरावास कोणताही कारभारी चाले. दादास सखारामबापूची धास्ती वाटे, पण आपणास लोक फसवितील ही शंकाच माधवरावाचे मनास शिवली नाहीं. तो कोपिष्ठ होता आणि सात्विक माणसाचा कोप लवकर येतो व लवकर जातो, तसें त्याचें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें. हा सात्विक कोप त्यास दाबून ठेवतां येत नसे (खरे, पृष्ठ १२०८). माधवरावाची ही सात्विकता अनेक कागदांत व्यक्त झाली आहे (खरे पृष्ठ १२७७). बहुतेक सर्व व्यक्तींस माधवराव स्वतः पत्रें लिहीत असे; आणि त्यांचें प्रेम व आदर संपादण्यास सदैव झटे. स्वाऱ्यांतील महत्त्वाच्या घडामोडी तो पुण्यास रामशास्त्री, नाना फडणीस वगैरे मंडळीस लिहून कळवी. बाह्य मंडळींच्या विविध कारस्थानांचें इंगित दूरदृष्टीनें ओळखून, तदनुसार आपलें धोरण तो ठेवी (खरे पृष्ठ १३०३). राग आला असतांही चुलत्याशीं आर्जवानें वागे (खरे पृष्ठ ६१७). तसेंच त्याचा आत्मविश्वासही दांडगा होता. अनेक अत्यंत विकट प्रसंग आले असतां, आपलें कसें होईल याची भीति त्यास शिवली सुद्धां नाहीं (खरे पृष्ठ ७८०). त्याची जरब, त्याची तडफ व त्याचा हुरूप नेहमींच जबरदस्त असत. कधीं डगमगल्याचें एकही उदाहरण नाहीं (खरे पृष्ठ ७८२, ७८३, ७८४, ७९१). जें होणार तें सुटत नाहीं, परमेश्वराचे मनांत असेल तें खरें, अशीं वाक्यें दादा व सखारामबापू वगैरे मंडळींच्या तोंडांत नेहमीं येतात, तसें एकही वाक्य माधवरावाचें एवढ्या विस्तृत पत्रव्यवहारांत किंवा ऐन मृत्यूच्या वेळीं सुद्धां आढळत नाहीं. एकएका अडचणीची शक्य त्या तऱ्हेनें निरवानिरव करून तो पुढील उद्योगास लागे. कशाही संकटानें अडून बुचकळ्यांत पडला नाहीं.

९. **राज्याचा वसूल.**—मराठी राज्याचा एकंदर वसूल किती होता, आणि त्यांतून राज्याचे खर्चास निवळ पेशव्यांचे पदरांत काय पडे तें नक्की सांगतां येत नाहीं. थोरले बाजीराव व थोरले माधवराव कर्जाच्या गांजणुकींतच मेले. नानासाहेब पेशव्याच्या शेवटच्या दोन तीन वर्षांत पेशव्यांचा खजिना बराच समृद्ध होता; परंतु पानिपतानें तो सर्व रिकामा करून सोडिला. त्यानंतर राक्षसभुवनपर्यंत ओहोटच चालू होती. माधवरावानें कर्नाटकचा उद्योग फळास आणून खर्चाची टंचाई बरीच भरून काढिली, परंतु त्या उद्योगाचें फल हातीं लागण्यापूर्वींच तो मरून गेला; आणि पुनः नारायणरावाचे खुनानें राज्यास ओहोट लागली. सन १७८३ पासूनच्या १०-१५ वर्षांत नानाफडणिसाच्या कारभारानें पुनरपि बरीच समृद्धि झाली. सन १७८९ सालचा तनखाझाडा छापलेला आहे, त्यांत दक्षिणच्या सहा सुभ्यांचा वसूल १८ कोटि रुपये व हिंदुस्थानच्या १५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुभ्यांचा ३२ कोटि मिळून एकंदर वसूल ५० कोटि दाखविलेला आहे. त्यांतून १७८९ हें साल अत्यंत भरभराटीचें असें मानतां येईल. हा सर्व तनखा म्हणजे मराठशाहींत कमाल वसूल यावयाचा होय. प्रत्यक्ष वसुली निम्याचे वर नसावी. अंदाजच करणें झाल्यास माधवराव पेशव्याचे अखेरीस एकंदर राज्याचा वसूल ५।१० कोटींहून जास्त हातांत येत असेल असें वाटत नाहीं. स्वतः पेशव्याचा खासगी खर्च सन १७७३-७४ सालचा रु. ४२८ हजार दिलेला आढळतो. माधवरावाचा खर्च याहून कांहीं कमीच असला पाहिजे. म्हणजे चुलत्यास त्यानें पांचसहा लाखांची नेमणूक बांधून दिली, ती चांगली सढळ हातानें दिली यांत संशय नाहीं. स्वतः राज्यकर्त्यास अनेक खर्च केवळ इतमामासाठीं करावे लागतात तसे कुटुंबांतील इतर मंडळीस करावे लागत नाहींत. दादा निवळ स्नानसंध्या करून राहता, तर त्यास त्या वेळच्या मानानें पांच लाखांत वाटेल ती चंगळ करतां आली असती; परंतु स्वतः अत्यंत अव्यस्थित असल्यामुळें जवळची मंडळी वाटेल तशी उधळपट्टी करीत, तीस आळा घालण्याचें सामर्थ्य दादास नव्हतें.

मोठमोठे खर्चाचे प्रसंग आले आणि त्यास पुरेशी शिल्लक जवळ नसली म्हणजे हल्लीं सार्वजनिक कर्ज काढण्याची पद्धत आहे, तशी त्यावेळीं नव्हती. सावकारांचीं कर्जें काढीत; पण त्यांच्या फेडीची व्यवस्था अगोदर ठरवून द्यावी लागे. माधवरावानें चौथाई सरंजाम खालसा केले; आणि कांहींनीं ठरीव मुदतीपावेतों फौजा न ठेवितां येणारें सर्व उत्पन्न सरकारांत भरावें, अशी तजवीज केली. त्याशिवाय लग्नकार्यप्रसंगीं सर्व सरसरदारांवर पट्टी बसविण्यांत येत असे. पानिपतपट्टी, इनाम तिजाई, दहकपट्टी वगैरे प्रकारच्या वर्गण्या माधवरावानें लोकांवर बसविल्या. कोणीकडून सरकारास लागणारा पैसा लोकांनाच द्यावा लागे. त्या वेळीं तो प्रत्यक्ष कर किंवा दंड असा लोकांस जड वाटे, परंतु हल्लीं, युरोपीय युद्धांच्या वगैरे वेळीं, हिंदी लोकांकडून वर्गण्या घेण्यांत आल्या त्या पर्यायानें मराठशाहींतल्या पट्याच होत. हल्लींची पद्धत कायद्यानें बंधनें ठरविण्याची आहे, पण त्या वेळीं प्रसंग पडेल तशा युक्त्या योजीत. सावकार, कर्जें, पेढ्या, टांकसाळी, कर, वगैरे बाबतींचे निर्देश पेशव्यांच्या रोजनिशांत भरपूर आहेत. त्यांची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संकलित विवरणा कोणी तरी तज्ज्ञानें अवश्य केली पाहिजे. उदाहरणार्थ, वर उल्लेखिलेल्या दहकपट्टीचें नांव ठिकठिकाणीं येतें. दहक म्हणजे दशक ऊर्फ दहा वर्षांनीं इनामदारांकडून घेण्यांत येणारी रकम. दुष्काळ समृद्धीचे बाईटबरे प्रसंग दहा वर्षांत येऊन गेल्यावर, समस्त इनामदारांनीं राज्याचे खर्च भागविण्यास अमुक एक अंश दहा वर्षांनीं सरकारांत भरावा अशी वहिवाट मराठशाहींत होती, ती दहकपट्टी होय.[1]

राज्यकारभारांत यश येणें हें देवाब्राह्मणांच्या आशीर्वादाचें फल होय, अशी पक्की निष्ठा अंतःकरणांत वागवून माधवराव हरकोणतेंही काम करीत असे. सरदारांचीं व लोकांचीं उत्पन्नें यथान्याय त्यानें चालविलीं. कधींही मनांत अपहारदृष्टि ठेविली नाहीं. विद्वानांचे ठिकाणीं त्याचा अत्यंत पूज्य-भाव होता. बाहेर स्वारींत असतांना महत्त्वाच्या सर्व घडामोडी तो मातुश्री-प्रमाणेंच रामशास्त्री यांसही लिहून कळवीत असे. 'कर्नाटकांत छावणीस न राहण्याविषयीं शास्त्रीबावांची ही आज्ञा, यास्तव राहत नाहीं', असें तो नाना फडणिसास लिहितो. म्हणजे शास्त्रीबावांस आज्ञा करणारा पेशवा उलट त्याची आज्ञा पाळण्याचें ब्रीद ठेवितो, यावरून त्याच्या मनाची निष्पाप व उच्च भावना व्यक्त होते. आरंभीं चुलत्याची सुद्धां तो अशीच मर्यादा ठेवीत होता. 'वडील दीर्घद्रष्टे, आम्हां लेकरांस अशी दूरदृष्टि कोठून येणार ?' असे त्याचे उल्लेख दादाविषयीं आहेत. माधवरावास मनापासून साह्य करण्याची बुद्धि दादास झाली असती तर केवढें राष्ट्रकार्य झालें असतें हें मनांत येऊन हळहळ वाटते. नानासाहेब दिखाऊ गोड स्वभावाचा, पण कोणत्याही प्रकरणाचा कायम निकाल न करितां दिरंगाईनें वेळ मारून नेई. परंतु माधवरावास चोख न्यायापलीकडे स्वतःचा स्वार्थ असा कांहींच नव्हता. म्हणून अल्पा-वधींत त्यास जितकें काम करतां आलें तितकें पन्नास वर्षांत दुसऱ्यास करितां आलें नसतें.

१०. शास्त्रीय ज्ञानाकडे दुर्लक्ष.—तोफा, दारूगोळा, आरमार, ह्या बाबतींत मराठे परावलंबी होतेच, पण त्यांशिवाय शास्त्रीय ज्ञानाच्या दुसऱ्या हरएक बाबतींतही त्यांचें परावलंबन पराकाष्ठेस पोंचलेलें होतें. 'दैवयोगें फिरून

१. आधार.—स. मा. रो. १; भा. व. पु १ सरंजाम झाडा; पे. द. पृष्ठ १३७.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यथा निर्माण होऊन उपचारासाठीं पुनः फिरंगणप्रांतीं जावें लागेल कीं काय न कळे', असें त्रिंबकराव पेठे म्हणतो. म्हणजे आपलें वैद्यशास्त्र सर्वथैव निरुपयोगी झालें होतें; आणि असाध्य रोगांच्या उपचारासाठीं मोठमोठ्या लोकांस पाश्चात्यांचे आश्रयास जावें लागे. प्रत्यक्ष माधवरावाला फिरंगी वैद्य कैक वर्षें औषध देत होता. कांचेचें सामान, घड्याळें, औषधी शास्त्रक्रिया वगैरे अनेक व्यवहारोपयोगी बाबतींत मराठ्यांस सर्वथैव दुसऱ्याचे तोंडाकडे पाहवें लागे. या गोष्टी आपले विद्यार्थी परदेशास पाठवून किंवा निदान इंग्रजांकडे व पोर्तुगिझांकडे पाठवून सहज शिकतां आल्या असत्या. साडेतीन शहाण्यांचीं शहाणपणें स्वतःच्या मतलबांत घुटमळत होतीं. शास्त्रीय ज्ञान मिळविण्याची दक्षता न ठेविल्यानेंच आपलें मोठें नुकसान झालें. माधवरावास कांहीं जाणीव होती, परंतु उद्योग करण्याइतकी फुरसत त्यास आली नाहीं. तोफांच्या बाबतींत इंग्रजांच्या तोंडाकडे पाहून मोहीम बुडाल्याचा अनुभव माधवरावाचे अंतःकरणास झोंबतांच, त्यानें त्या बाबतींत तात्काळ उपाय केले. परंतु स्वतःचे विद्यार्थ्यांकडून पाश्चात्य शास्त्रांचें ज्ञान संपादन केल्याशिवाय एकाच बाबतीनें काम भागण्याजोगें नव्हतें.

छत्रपतींची व्यवस्था, अष्टप्रधानांची सुधारणा, पश्चिम किनाऱ्याचे संरक्षणार्थ आरमाराचा बंदोबस्त, लष्करच्या सरंजामांची व राज्यकारभाराची आटोपशीर रचना इत्यादि बाबतींतील दोष माधवरावाच्या नजरेस पूर्णपणें आले होते. या जुन्या संस्था निरुपयोगी होऊन, बदललेल्या परिस्थितीस अनुरूप अशी त्यांची पुनर्घटना केली पाहिजे होती. सरंजामदारांनीं फौजा कशा बाळगाव्या व सरकारनोकरी कशी करावी याचे थोडे बहुत नियम माधवरावानें घातलेले त्याच्या रोजनिशीच्या पहिल्या भागांत ले. ३४१–३७४ व १८१, १८३, १८५ येथें पाहवयास सांपडतात. परंतु अशा सुधारणेस लागणारें स्वास्थ्य माधवरावास मिळालें नाहीं; आणि त्याचे पश्चात् तर झालेलें कामही लयास गेलें.[1]

माधवरावाच्या वेळच्या नानाप्रकारच्या आख्यायिका अद्यापि प्रचलित आहेत. कदाचित् चांगुलपणासंबंधानें एकंदर ऐतिहासिक गोष्टींत याच पेशव्या-

१. आधार.—खरे ले. ७१९ (ता. १४-५-१७६७).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ची संख्या सर्वांत मोठी भरेल. कागदपत्र वाचल्यानें या सर्व आख्यायिका तात्पर्यार्थानें बिनचूक आहेत असें म्हणावें लागतें. महादजी सिंद्यानें हुकमाप्रमाणें लगोलग प्रयाण केलें नाहीं, हें थेऊरास जातांना पाहून, परत येण्यापूर्वीं गोठ उठला पाहिजे, नाहीं तर लुटण्यांत येईल ही पेशव्याची ताकीद प्रचलित आहे. दिल्लींत सिंदे होळकर बादशहाचे दरबारास जात असतां, रस्त्यांत माधवरावाचे जासुदांनीं त्यांस गाठून पेशव्याचीं निकडीचीं पत्रें दिलीं, आणि जबाब दिल्याशिवाय पुढें पाऊल टाकूं नये असा धन्याचा हुकूम कळविला, त्याबरोबर जागचे जागीं त्यांनीं जाब लिहून दिले. फितुरांचे कागद फाडीत असतां सखारामबापूनें पेशव्यास भेटून कागद फाडूं नयेत म्हणून विनंति केल्यावर, बापूच्याच फितुराचे कागद माधवरावानें त्याचे अंगावर टाकून त्यास पुसलें, 'हे कागद ठेवूं काय?' त्याबरोबर बापू अगदीं गार झाला. सर्व ठिकाणच्या बातम्या बारकाईनें काढण्याचें माधवरावाचें कौशल्य अप्रतिम असून त्याचेंच अनुकरण पुढें नाना फडणिसानें केलें, त्याच्या किती तरी आख्यायिका प्रचलित आहेत. सचिवाचे बायकोस नथ पाठविली, रमाबाईचीं विड्याचीं पानें नानाफडणिसानें बंद केलीं, इत्यादिकांवरून माधवरावाच्या कारभाराची आपणास कल्पना करितां येते. खंड ६, ले. ४३२ यांत अशा कांहीं आख्यायिका त्यावेळीं लिहिलेल्याच आहेत.

या एकंदर विवेचनावरून उघड होईल कीं, सर्व पेशव्यांत माधवराव श्रेष्ठ गणला पाहिजे. त्याच्या अमदानींत मराठशाहीचें भाग्य परमोच्च बिंदूस पोंचलें; आणि त्याचा अकालीं मृत्यु हेंच पुढील अधःपाताचें कारण होय. प्राच्य लोकांचे व्यवहार सर्वथा व्यक्तिप्रधान असून, संस्थाप्रधान नाहींत, हें खरें असलें तरी माधवरावानें इतर थोर व्यक्तींप्रमाणें स्वतःचा बडेजाव तुच्छ मानिला, हें त्याचें वैशिष्ट्य अत्यंत स्मरणीय आहे.

११. तुलना.—समरांगणावर ठांसून उभा राहून लष्करी मोहिमा जोरानें व नेटानें सिद्धीस नेणारा, सर्वांचें ऐकून स्वतःच्या विचारानें तात्काळ निश्चय ठरविणारा, अनेक बिकट कामें व कारभार रोखठोकीनें व तडकाफडकी पार पाडणारा, असा हा माधवराव राज्यकारभारांत इतर सर्व पेशव्यांहून वरचढ म्हणतां येईल. त्वरा व जरब या गुणांत तर त्याची बरोबरी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दुसरा कोणीच करूं शकणार नाहीं. नानासाहेब शांतपणें पड घेऊन हलके हलके आपली छाप बसवी. नानासाहेबाच्या अंतःकरणाचा ठाव कोणास लागत नसे. माधवरावाचे उद्देश रागाच्या भरांत किंवा वादविवादांत सहज व्यक्त होत असत. घोरपड्याच्या लोकांनीं मीररेजाचा गोट लुटला, त्याबद्दल शेंदोनशें लोकांना तात्काळ कडक शिक्षा करून माधवरावानें जरब बसविली; तर नानासाहेबानें भाऊसाहेबास हलकेच सुचविलें कीं, आपण लोकांचे हातपाय तोडण्यास येथें आलों नाहीं. नानासाहेब दमखाऊ, माधवरावास दम खाणें ठाऊक नाहीं. प्रत्यक्ष चुलता व मातुश्री माधवरावास भीत असत. लोक माधवरावास वचकत, नानासाहेबास भजत. माधवरावावर निष्ठा ठेवीत, नानासाहेबावर प्रेम करीत.

नानासाहेब व सदाशिवराव जें उदगीरवर व पानिपतावर करूं शकले नाहींत, तें माधवरावानें राक्षसभुवनावर व दिल्लीस केलें. हैदरावर शह बसविला. भोसले व निजाम मराठ्यांविरुद्ध पुढें पुष्कळ काळ जाऊं शकले नाहींत. माधवरावानें चुलत्यास नरम आणिलें; मुरार घोरपडे व जानोजी भोसले यांस आपल्या भजनीं लाविलें; सखारामबापूचा योग्य उपयोग करून त्याच्या खटपटींस थारा दिला नाहीं. पटवर्धन, फडणीस, लिमये, फडके व खासगीवाले ही मंडळी आत्मिक बनली. गंगाधर यशवंत, चिंतो विठ्ठल, देवाजीपंत चोरघोडे वगैरे अनेक उपद्व्यापी मंडळी वर डोकें काढूं शकली नाहींत. अशा निष्ठुर उद्योगाचा परिणामही लगोलग झाला. नानासाहेबाचा कारभार सर्व लोक पूर्वी अनेक बाबतींत उपमानादाखल वाखाणीत असत. परंतु माधवरावाचे पश्चात् नानासाहेबाचें उपमान मागें पडून माधवरावाचें चालू झालें. त्याचा ध्वनि अद्यापि अंशतः महाराष्ट्रांत कायम आहे. याचें प्रत्यंतर गोष्टी व आख्यायिका यांजवरून मिळतें.

छत्रपतींच्या भोसले घराण्याचा विस्तार ठिकठिकाणीं फार मोठा होता. पेशव्यांचे लष्करांतही त्या घराण्यांतील पुरुष नोकरीस असून पेशवे त्यांचें यथायोग्य चालवीत असत असें उमाजीराजे व माधवराव यांचा पत्रव्यवहार छापला आहे त्यावरून दिसतें. 'घडीचा विलंब करूं नये. पत्रदर्शनीं जमाव घेऊन स्वारींत सामील होणें', असे रोखे माधवरावानें उमाजीस वारंवार पाठविलेले आहेत. असाच पत्रव्यवहार दुसऱ्याही मराठे घराण्यांशीं झालेला

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असला पाहिजे. म्हणजे पूर्वीच्या मराठे घराण्यांचा योग्य परामर्ष घेण्याची आस्था माधवरावानें ठेविली होती; आणि त्यामुळेंच राष्ट्राचा त्याजवर भरंवसा बसलेला होता. इंग्रजांचा वकील टेलर म्हणतो, 'माधवराव प्रौढ होत गेला तसतशी त्याची योग्यता लोकांचे निदर्शनास येऊन ते त्यास अत्यंत सन्मान देऊन वचकूं लागले. त्यानें कारभार थोडींच वर्षें केला; पण तेवढ्या मुदतींत आजूबाजूचे सर्व सत्ताधीश त्याजपुढें नमून वागूं लागले. तो जास्त दिवस जगता तर त्यानें पेशवाईचें नांव चांगलेंच काढिलें असतें. दुर्दैवानें तो अकालीं मरण पावून राज्याचें मोठें नुकसान झालें. (इ. सं. वर्ष ८, मुंगीकर भो० कागद पत्र; Forrest's Maratha series).

ज्या राष्ट्राचा राज्यविस्तार होऊन व्याप वाढला, त्यास तो भार पुढें सतत चालविण्यास लायक माणसें कायमचीं तयार करावीं लागतात. त्यासाठीं जरूर त्या तजविजी पाश्चात्य राष्ट्रांनीं केलेल्या आपण पाहतों. प्रथम पुस्तकी ज्ञानाची परीक्षा देऊन, त्यांत बुद्धीचा कल दिसून येईल त्याप्रमाणें, लष्करी, न्याय, वसूल, परराज्यव्यवहार इत्यादि खात्यांसाठीं पगारदार व नियमबद्ध सेवासंघ (Services) तयार करण्यांत आले आहेत. आय्. सी. एस्. हा असाच एक हल्लींचा संघ होय. या संघसेवकांच्या परीक्षा ठरलेल्या असल्या, तरी त्यांच्या कर्तृत्वाची मुख्य भिस्त प्रत्यक्ष अनुभवावर व एकजुटीच्या भावनेवर (Esprit de corps) असते. तसाच कांहींसा प्रकार मराठशाहींत चालू होता. मात्र त्या वेळीं हल्लींसारख्या परीक्षा नसून त्यांचे ऐवजीं पिढीजाद कौटुंबिक संस्कारांस प्राधान्य होतें. एका विशिष्ट दृष्टीनें मराठशाहीची ही व्यवस्था किती अनुरूप होती हें पटवर्धन घराण्याच्या उदाहरणानें चांगलें व्यक्त होतें. कौटुंबिक प्रेम, निर्व्यसनता, स्वामिकार्यनिष्ठा, आत्मतेज, स्वावलंबन इत्यादि अनेक गुण गृहशिक्षणाच्या तत्कालीन व्यवस्थेंत उत्पन्न होत असत.

कर्तृत्ववान् व विश्वासु माणसांशिवाय राज्यकारभार चांगला चालणें शक्य नाहीं. कमीअधिक बुद्धिमान् माणसें सर्व काळीं व सर्व राष्ट्रांत उपलब्ध असतात, पण त्यांस हाताशीं धरून, त्यांची लायकी वाढवून त्यांजकडून योग्य कामगिरी घेणारा योजकच बहुधा दुर्लभ असतो. असा योजक राज्य-नियंता उत्पन्न झाला म्हणजे राष्ट्राची अभिवृद्धि होते. जगांत बहुधा सर्वथैव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चांगलीं किंवा सर्वथैव टाकाऊ अशीं माणसें असतच नाहींत. बरेचसे लोक सामान्य प्रतीचे, प्रसंग पडेल तसे, किंवा वागविणारा भेटेल तसे, वागणारे, अंतरंग उघड करून न दाखवितां, शक्य तितका स्वतःचा मतलब साधणारे, असे असतात. त्यांच्या गुणांचें चीज करून व अवगुणांवर विरजण घालून ज्याच्या त्याच्या लायकीप्रमाणें त्याजकडून कामगिरी घेण्याची सोय पाहिजे. हें दुर्लभ योजकाचें बिकट काम माधवरावानें केलें. या बाबतींत माधवराव एका टोंकास तर दादा त्याचे उलट टोंकास, अशी द्विधा वृत्ति त्या वेळीं बहुधा कायम असल्यामुळें, त्यांचे दरम्यान अनेक चांगल्या माणसांची सर्वथा त्रेधा उडत असे. म्हणूनच त्या वेळच्या निरनिराळ्या व्यक्तींत स्वभाववैचित्र्य उत्कटतेनें दिसून येतें. हल्लींच्या रासवटींत सर्व लहान थोर व्यक्ती एकाच माळेंत समान गणल्या जात असल्यामुळें, स्वतंत्र संचारणाऱ्या व्यक्तींच्या मनाचा ठाव घेण्यास आपल्याजवळ मापच राहिलेलें नाहीं. मुराररराव घोरपडे, महादजी सिंदे, जानोजी भोसले, अहल्याबाई होळकर, जिजाबाई कोल्हापुरकर, आनंदीबाई, रामशास्त्री प्रभुणे, महादाजीपंत गुरुजी, गोविंद शिवराम, त्रिंबकराव पेठे, गोपाळराव पटवर्धन, सखारामबापू, नाना फडणीस, व प्रत्यक्ष माधवराव व त्याचा चुलता, यांपैकीं एक एक व्यक्ति इतक्या भिन्न स्वरूपाची दिसून येते कीं, त्यांचीं स्वभावचित्रें हुबेहूब रेखाटण्यास मोठा कल्पक कादंबरीकारच निपजला पाहिजे. रघुनाथरावदादा तरी मोठा हिकमती, कशाही संकटांत न डगमगणारा, वाटेल तशा विपन्नावस्थेंत कांहीं तरी मार्ग काढून निसटून जाणारा व मनांतला हट्ट मेल्यानेंही न सोडणारा, असा दिसतो. मनुष्य एकदां सर्व लाज सोडून निःसंग झाला, म्हणजे त्याचे हे गुण उत्कटत्वानें प्रकाशतात. त्याच्या साहसाची व चिकाटीची तारीफ होऊं लागते. वास्तविक गुण ते गुणच, सत्कार्याकडे त्यांचा उपयोग होत नाहीं, म्हणून ते अवगुण वाटतात, इतकाच फरक. या स्वभाव वैचित्र्यामुळें माधवरावाच्या इतिहासास कादंबरीचा मनोवेधकपणा निःसंशय प्राप्त झाला आहे, असें वाटल्याशिवाय राहणार नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण एकेचाळिसावें

माधवरावाचे वेळचीं प्रमुख घराणीं

प्रस्ताव, ब्राह्मण-मराठे घराण्यांची तुलना.

१ रामचंद्र जाधव.
२ त्रिंबकराव दाभाडे व दमाजी गायकवाड.
३ विजयदुर्गचे धुळप.
४ विसाजी कृष्ण बिनीवाले.
५ खासगीवाले गोविंद शिवराम.
६ नारो आपाजी तुळसीबागवाले.
७ चिंतो विठ्ठल रायरीकर.
८ रामशास्त्री प्रभुणे.
९ सखारामबापू बोकील.
१० गंगाधर यशवंत चंद्रचूड.
११ सखाराम हरि गुप्ते.
१२ पटवर्धन गोपाळराव वगैरे.
१३ मुजुमदार नारो नीलकंठ.
१४ बोंधले पाटील.
१५ गणेश व गोपाळ संभाजी खांडेकर.
१६ शिवाजी शंकर ओढेकर.
१७ रामचंद्र गणेश कानडे.
१८ मुधोळकर मालोजी घोरपडे.
१९ गाजीउद्दीन.
२० महंमद मुरादखान.

नागपुरकर भोंसल्यांकडील मंडळी.

२१ शिवभट साठे.
२२ महिपतराव दिनकर गुप्ते.
२३ रखमाजी गणेश चिटणीस.
२४ व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी.
२५ रामाजी केशव तिखे.
२६ भवानी काळो.
२७ तुळजोराम.
२८ बाबूराव विश्वनाथ वैद्य.

प्रस्ताव, ब्राह्मण-मराठे घराण्यांची तुलना.—इतिहासांत व्यक्तींच्या कर्तबगारीचेंच मुख्यतः महत्त्व असतें. एकएका घराण्यांत अनेक व्यक्ती प्रसिद्ध असतात. पुष्कळदां त्यांचीं आडनांवें माहीत नसल्यानें, नांवाचा घोटाळा होतो. त्या वेळीं आडनांवें लावण्याचा प्रचार बहुधा नव्हताच; लक्ष्मण आपाजी, चिंतो विठ्ठल अशींच नांवें प्रचारांत होतीं. प्रत्येक व्यक्तीचे परिपूर्ण तपशील मिळाल्याशिवाय त्यांचें स्वभाववैचित्र्य व कर्तबगारी मनांत ठसत नाहीं. यासाठीं शक्य तितक्या घराण्यांचा व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यक्तींचा छडा लावून त्यांचे वृत्तान्त ठिकठिकाणीं दिले आहेत, त्यामुळें इतिहासाच्या काष्ठमय सांगाड्यास मांसलता प्राप्त होऊन, हुबेहूब स्वरूपांत त्या त्या व्यक्ती आपल्या डोळ्यांसमोर वावरूं लागतील. माधवराव, रघुनाथराव, महादजी सिंदे, नाना फडणीस, आनंदीबाई, गोपिकाबाई वगैरे मुख्य व्यक्तींचा परिचय सामान्यतः आपणांस थोडाबहुत आहे. परंतु मेल्यावर हाडेंसुद्धां दादांच्या सेवेस वाहणारा सखाराम हरि, कारभारी मंडळीस थरकांप उत्पन्न करणारा मानाजी फांकडे, वीस वर्षें कैदेंत कुजणारा चिंतो विठ्ठल, मरणाची पर्वा न करितां राष्ट्रसेवेंत देह झिजविणारा गोपाळराव पटवर्धन, सर्व पक्षांच्या मान्यतेस पात्र असलेला निस्पृह गोविंद शिवराम, शूर परंतु तुसट व अहंभाव वृत्तीनें कार्यभाग बिघडविणारा त्रिंबकराव पेठे, पन्नास वर्षें दक्षिणची बाजू नेकीनें सांभाळणारा मुरारराव घोरपडे वगैरे किती तरी व्यक्ती त्या वेळचा इतिहास बनविणाऱ्या आपल्या फारशा परिचयाच्या नाहींत. निकट परिचयानेंच त्यांचे उद्योग आपल्या मनांत ठसून, त्यांचें स्वभाव-वैचित्र्य हृदयंगम वाटूं लागतें; आणि स्वराष्ट्रेतिहास सिद्ध होतो.

असे तपशील आणखीही एका कारणाकरितां विशेष जरूर आहेत. घोरपडे, निंबाळकर, जाधव, भोसले वगैरे कित्येक कुटुंबांचा, त्यांच्या शाखांचा व उपशाखांचा विस्तार मराठशाहींत एवढा मोठा होता कीं, आणि त्यांतल्याइतक्या व्यक्ती त्या वेळच्या कागदांत उपलब्ध होतात कीं, त्यांच्या वंशावळी बिनचूक जुळविणें दुरापास्त होतें. विशेषतः घोरपडे व निंबाळकर या दोन घराण्यांच्या व त्यांच्या सर्व शाखांच्या सन १६५०–१८०० काळांतील वंशावळी कोणी जुळवून देईल तर त्याचे इतिहासावर मोठे उपकार होतील. तूर्त अपुरी कां होईना जितकी व जशी माहिती मिळाली ती एकत्र करून कांहीं घराण्यांचे वृत्तान्त पुढें दिले आहेत. जुन्या घराण्यांचीं नांवें मागें पडून, सिंदे होळकरादि नवीन घराणीं जरी उत्तर मराठशाहींत विशेष पुढें आलीं, तरी त्या जुन्यांचे पुरुष अखेरपर्यंत राज्याच्या उद्योगांत खपत होते. वास्तविक ब्राह्मण घराण्यांपेक्षांही मराठे घराणींच इतिहासांत जास्त फैलावलेलीं दिसतात. या मराठे घराण्यांच्या तोडीचें एकच पटवर्धन घराणें उद्योगानें व विस्तारानें वृद्धि पावलेलें आढळतें; बाकीच्यांचा पुष्कळसा क्षयच झाला आहे. बहुतेक ब्राह्मण-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घराण्यांत फार तर एखाददुसऱ्या पिढीचेंच नांव झळकतांना दिसतें. नारो शंकर, विठ्ठल शिवदेव, सखारामबापू, पेठे, लिमये, चिंतो विठ्ठल, रामशास्त्री, विनीवाले इत्यादि घराण्यांत एखाददुसराच पुरुष प्रसिद्ध झाला. या दृष्टीनें ब्राह्मणांपेक्षां मराठेच त्या वेळीं उद्योगानें व पराक्रमानें जास्त फैलावलेले व पिढ्यानुपिढ्या वावरणारे उपलब्ध होतात. आजकालच्या इंग्रजशाहींत सरकारी कारभारांत ब्राह्मणांचा भरणा मोठा दिसतो, यावरून तत्कालीन मराठशाहीच्या कारभाराचा अंदाज बांधूं नये. उद्योग व नीतिमत्ता यांचे योगानें घराण्याचा विस्तार होतो हें तत्त्व खरें असेल, तर पूर्वीच्या ब्राह्मणांपेक्षां मराठेच त्या बाबतींत वरचढ ठरतील. फलटणपासून तीन मैलांवर वाठार म्हणून गांव आहे, तेथचें निंबाळकर घराणें फलटणच्या नाईक घराण्याहून भिन्न असून तें केवळ सावकारी करून उत्कर्ष पावलें, हें आज कोणास सांगितल्यास खरें सुद्धां वाटणार नाहीं. फॉरेस्टच्या पुस्तकांत या सावकार निंबाळकरांची हकीकत आहे. वेलिंग्टननें आसईच्या लढाईत दौलतराव सिंद्याचा पराभव केल्यावर, दौलतरावास पैशाची अडचण पडली, तेव्हां वाठारकर आपाजीराव निंबाळकरानें केवळ हाताचा मळ समजून चोवीस लाख रुपये रोख अल्पावधींत त्यास कर्जाऊ दिले. हा आपाजीराव नऊ बंधूंपैकीं एक होय. प्रत्येक बंधूचा व्यवहार स्वतंत्र होता. या नवांचे नऊ प्रचंड वाडे, जणूं काय नऊ विस्तीर्ण किल्लेच, वाठारास होते. त्यांचे पडके अवशेष लोक आज कैक वर्षे लुटून नेत असतांही, अद्यापि शिल्लक आहेत, ते प्रत्यक्ष अवलोकन केल्यावर, त्यांच्या पूर्वीच्या वैभवाची साक्ष पटते. सारांश, स्वराज्यांत राष्ट्राची भरभराट सर्वांगीण होते. आजच्या स्थितीवरून त्या वेळचा अदमास करणें बरोबर नाहीं. अनेक प्रभु कुटुंबांचा विस्तारही वरच्या सारखाच होता. मराठशाहींत वंशक्षयच पाहूं गेल्यास तो विशेषतः ब्राह्मणांचाच झालेला दिसतो. कदाचित् अस्वाभाविक राहणीनें तो उत्पन्न झाला असावा. सामाजिक दृष्ट्या या विषयाचा चौकस तपास होणें जरूर आहे.

१. रामचंद्र जाधव.—हा चंद्रसेन जाधवाचा मुलगा व धनाजीचा नातू. निजामानें उरळीवर स्वारी केली त्या वेळीं यास फोडून पेशव्यांनीं आपल्या पक्षांत आणिलें. पुढें सन १७६२ च्या अखेरीस भास्कररावास प्रतिनिधिपद देते वेळींच दाभाडयाचें सेनापतिपद काढून पेशव्यांनीं तें रामचंद्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जाधवास दिलें. तेव्हां तो दाभाडयाची निम्मी गुजराथ मागूं लागला. ती दाभाडे-गायकवाडांचे हातून काढणें शक्य नसल्यामुळें, जाधवास देतां आली नाहीं. तेव्हां नाराज होऊन तो लगेच निजामाकडे जाऊन मिळाला. तेव्हां पुढें सन १७६५ त सेनापतीचीं वस्त्रें पेशव्यानें मुरारराव घोरपडयास दिलीं. परंतु त्यासही तीं लाभलीं नाहींत. रामचंद्र जाधव अंतःकरणांतून पेशव्याशीं कधींच अनुरक्त नव्हता. चंद्रसेनाची हाव मात्र त्यास असून त्याची चिकाटी किंवा निश्चय हे गुण बिलकूल नव्हते. या धरसोडीमुळें त्याचा नाश झाला. सेनापतिपद आपलें गेल्यामुळें दाभाडे उघडपणें निजामास मिळाला; आणि रामचंद्र जाधवही मनांतून निजामाचेच बाजूस राहिला. मिरज काबीज केल्यावर सन १७६३ च्या आरंभीं पेशवे निजामावर चाल करून जाऊं लागले, तेव्हां जाधवानें त्यांजबरोबर मागें मागें रेंगाळत मराठ्यांचा मुलूख लुटला. 'पंढरपुर लुटलें, अन्याय माफ केला. मिरजेवर रुसले, कोप्पळ किल्ला देवविला. तमाम गांव लुटींत आले. एक दोन खून केले. पुढें औरंगाबादेस त्यानें दादावर मारेकरी घातले. त्यावरून पेशव्यांनीं त्यास पकडून दौलताबादचे किल्ल्यावर दत्तकपुत्र श्रीपतराव यासह कैद करून ठेविलें; आणि त्याची फौज लुटली' (१२-३-१७६३). तथापि राक्षसभुवनानंतर निजाम-मराठयांची गोडी झाल्यावर, जाधवास दोहोंकडील जहागिरी मिळून तो दोघांची नोकरी करण्यास कबूल झाला. पुढें पेशव्यानें कर्नाटकावर स्वाऱ्या केल्या, त्यांत जाधवराव निजामाकडून पेशव्यांचे मदतीस होता. सन १७६८ च्या उन्हाळ्तांत निजामाचें हैदराशीं युद्ध झालें, त्यांत जाधव हजर असून हैदराकडील पैका वसूल करण्यास पाठविलेला होता. त्याच सालीं पेशवे व निजाम यांनीं, भोसल्यानें वऱ्हाड प्रांत जिंकला, तो सोडविण्यासाठीं स्वारी केली, तींत निजामाचे बाजूनें जाधवराव आला होता. त्या वेळीं अंतस्थपणें त्यानें भोसल्यास साह्य केल्याचें कनकापुरच्या तहानंतर निजामाचे निदर्शनास आलें, आणि त्याजबद्दल रुक्नुदौला वगैरेंनीं जोराची कागाळी केली, त्यावरून निजामलीनें जाधवास एकांतांत भेटीस बोलावून ठार मारिलें. एका अंधार कोठडींत त्यास घालून वरून तापलेलें पाणी ओतल्यानें त्याचा प्राण गेला, असें सांगतात. सन १७६९ त रामचंद्र जाधव जिवंत होता, (खरे पृष्ठ १४१७). त्यावरून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या सालानंतर केव्हां तरी त्यास मृत्यु आला हें सिद्ध आहे. श्रीपतराव नांवाचा एक दत्तकमुलगा त्याजबरोबरच स्वारींत उद्योग करीत असल्याचा उल्लेख सांपडतो.[1] पश्चात् निजामलीनें जाधवांची जहागीर खालसा करून आपल्या मुलास दिली. चंद्रसेन मराठशाही सोडून मोगलाईत गेल्याचें हें बक्षीस, (खरे ले. २१३९).

२. **त्रिंबकराव दाभाडे व दमाजी गायकवाड.**—यांची हकीकत पूर्वी मध्यविभाग १ व २ यांत आली आहे. यशवंतरावाचा मुलगा दुसरा त्रिंबकराव दाभाडे पेशव्यांवर व गायकवाडांवर रुष्ट होऊन मोगलाईत औरंगाबाद येथें निजामाच्या आश्रयास जाऊन राहिला. त्यावरून त्याचीं वतनें व इनामगांव पेशव्यांनीं जप्त केले. पुढें राक्षसभुवनावर निजामाचा पाडाव झाला, तेव्हां दाभाड्याचीं वतनें व सेनाखासखेली पेशव्यांनीं दमाजी गायकवाडास दिली, आणि दाभाड्यांचे कुटुंबाचा परामर्षही गायकवाडांनीं करावा असें ठरविलें (ता. २४-९-१७६३). यावरून दाभाडे जास्तच रुष्ट होऊन मुलखांत धामधूम करूं लागला; आणि पुढें वैताग करून औरंगाबादेजवळ घुसृणेश्वराचे मंदिरांत जाऊन राहिला. तेथेंच तो सन १७६६ त मरण पावला. त्या वेळीं त्याची स्त्री लक्ष्मीबाई चार महिन्यांची गरोदर होती, तिला पुढें पुत्र झाला, त्याचें नांव शिवराव दाभाडे. त्यास वतनावर कायम करण्याचा प्रश्न कैक वर्षें पेशव्यांपुढें होता. निकाल होण्यापूर्वींच शिवराव दाभाडे आठ वर्षांचा होऊन मृत्यु पावला. नंतर त्याच्या आईनें गोत्रज मुलगा दत्तक घेऊन यशवंतराव नांव ठेविलें आणि वतनाचा उद्योग चालविला, पण त्यापासून फलनिष्पत्ति झाली नाहीं. दमाजी गायकवाडास दाभाड्यांचीं वतनें मिळाल्यावर, दाभाड्यांचा परामर्ष गायकवाडानें यथायोग्य ठेविला नाहीं, असें दिसतें. कारण ता. ६-४-१७६५ रोजीं माधवरावानें दमाजीस लिहिलें कीं, त्रिंबकराव दाभाड्याची कन्या उपवर झाली तिचें लग्न तुम्हीं करावें हें उचित आहे. त्याची तर्तूद तुम्हीं हा कालपर्यंत केली नाहीं. यंदां लग्न जरूर करावें'. यावरून

---

१. **आधार.**—दळवी कृत जाधवघराण्याची कैफीयत; बा. रामराजे बखर; मा. रो. १.३४५; खरे ले. २०४, २०९, ४१५, ७६५, ८०९, २१३९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तत्कालीन कुटुंबांच्या अंतस्थ भानगडी कळून येतात. दाभाड्याप्रमाणेंच गायकवाडांचा कलही पेशव्यांचे विरुद्धच असे. दादाचे पक्षास मिळून वेळीं अवेळीं आपला मतलब साधण्याची गायकवाडांची प्रवृत्ति होती. बासद्याचे राजाचा प्रांत दमाजीनें पूर्वीं जिंकिला, तेव्हां तेथील राजानें नानासाहेब पेशव्याकडे फिर्याद केली. त्यावरून नानासाहेबानें दमाजीचा शह काढून बासद्याचें अर्धें राज्य स्वतःकडे घेऊन, तें दमाजीस सरंजामांत दिलें; आणि अर्धें त्या राजास परत दिलें. त्याप्रमाणें दोन तीन वर्षें अंमल चालला. परंतु पुढें संधि येतांच पुनः दमाजीनें बासद्याचे राजास हुसकून दिलें आणि नानासाहेबाची व्यवस्था मोडली. त्याचा बोभाटा माधवरावाकडे आल्याबरोबर त्यानें दमाजीस पुनरपि जरब देऊन बासद्याचे राजाचा प्रांत त्यास परत देवविला[1].

३. धुळप विजयदुर्गचे.—आंगऱ्यांचा पाडाव करण्यापूर्वींच नानासाहेब पेशव्यानें 'सुभा आरमार' म्हणून स्वतंत्र अंमलदार बनविला होता. बाजीराव बेकसे नांवाचा इसम सुभा आरमारावर त्यानें नेमलेला मृत्यु पावल्यावर, ता. १७ सेप्टेंबर १७४९ रोजीं म्हणजे शाहूच्या हयातींतच त्रिंबकराव बिन बाजीराव बेकसे याची नेमणूक सुभा आरमारावर केली होती. पुढें त्या जागीं धुळपाची नेमणूक झाली. धुळपांचें उपनांव मोरे. जावळीच्या मोऱ्यांचेच हे वंशज असून सन १७५६ त तुळाजी आंगऱ्यास कैद केल्यावर पेशव्यांनीं विजयदुर्ग येथें आरमार ठेवून, सुभा आरमार म्हणून अधिकारी नेमिला. ती जागा सन १७६३ त किंवा त्या पूर्वींच आनंदराव धुळप यास देण्यांत आली. त्या संबंधानें मध्यंतरीं अनेक भानगडी होऊन, आनंदरावानें आरमाराचा कारभार सन १७९४ पावेतों केला. ता. १५-१-१७६४ रोजीं आरमाराचा खर्च बांधून देण्यांत आला. धुळपांचे भाईबंद फौजेंतही कामगिरीवर असून माधवरावाच्या कर्नाटकच्या स्वाऱ्यांत त्यांचे उल्लेख अनेक आहेत.

---

१. **आधार.**—मा. रो. १. १४३; ऐ. टि. ६. ७; खरे ले. ४८५; पे. द. पृष्ठ २२९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंशावळ–दळवीकृत म. कु. इ., भाग ३. धुळप पृष्ठ ७३.

सिधोजीराव धुळप
|
कृष्णाजी
|
हरजी — रुद्राजी

हरजी
|
कृष्णाजी — १ रुद्राजी — ३ जानराव — ४ भगवंतराव

१ रुद्राजी
|
२ आनंदराव

३ जानराव
|
हरबाजीराव
|
जानराव दुसरा
|
हरबाजीराव.

१-२-३-४ हे थोरल्या माधवरावाचे वेळीं कामावर होते.

सन १७६५ त आनंदरावाकडे नवीन कारभारी नेमून आरमाराचे बेगमीची व्यवस्था माधवरावानें ठरविली; आणि सन १७६७ त चांगल्या कामगारीबद्दल आरमारांतील लोकांस बक्षिसें दिलीं. नोव्हेंबर सन १७६३ त हैदरावरील स्वारींत रुद्राजी व जानोजी धुळप यांनीं मोठें आरमार व फौज नेऊन होनावर बंदरांतून सोंध्यावर चाल केली, त्याचा जमिनीवरील युद्धांत मोठा उपयोग झाला. सन १७६९ त 'जानोजीस आरमाराचा सुभा पुनः सांगणार', असा उल्लेख आहे. त्याच सालच्या ऑक्टोबरांत 'जानोजी-कडील आरमार काढून मोत्याजीराव विचारे यास सुभा केलें, जानोजीचा जामीन मागतात'. ता. २७-१-१७७० रोजीं 'रुद्राजीचा सुभा निघाला'; आणि पुढील मार्चमध्यें जानबा धुळप यास नंदीगडावर ठेविलें; आणि लगेच पुढें बाळापुरास नेमिलें'. नंतर त्याच सालच्या जुलईंत जानरावास आरमार सांगून आनंदरावास चिक्कबाळापुरचा किल्लेदार नेमिलें. त्यावर भगवंतराव धुळप यास बाळापुरास पाठविल्याचा उल्लेख ता. २९-१-१७७० चा आहे. सन १७७१ च्या फेब्रुवारींत जानराव कर्नाटकांत वावरत असलेला दिसतो. याप्रमाणें या धुळप कुटुंबांतील कित्येक व्यक्तींची तुटक माहिती उपलब्ध होते. त्याची संगतवार हकीकत व कौटुंबिक कागद जुळवून प्रसिद्ध होतील तर मराठ्यांच्या उत्तरकालीन आरमाराचा व्यवस्थित इतिहास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

राष्ट्रास मिळेल. जानोजी धुळपावर माधवरावाचा मोठा भरंवसा होता. खरे ले. ९९५ हें जानरावाच्या दक्षतेचें निदर्शक आहे.

४. विसाजी कृष्ण बिनीवाले.—माधवराव पेशव्याच्या कारभारांत निरनिराळ्या पेशाचीं अनेक माणसें तयार होऊन राष्ट्रकाजांत खपत होतीं. त्यांत युद्धकलेंतही अनेक गृहस्थ प्रसिद्धीस आले. गोपाळराव पटवर्धन, तुकोजी होळकर, महादजी सिंदे, रामचंद्र गणेश कानडे व विसाजी कृष्ण बिनीवाले हे पांच गृहस्थ वरिष्ठ दर्ज्याचे सेनापति म्हणून नामांकित झाले, आणि त्यांच्याच कर्तृत्वानें माधवरावाचे उद्दिष्टांपैकीं दक्षिणोत्तर दिशांकडील कार्यभाग सिद्धीस गेले. पैकीं शेवटच्या चार गृहस्थांकडे दिल्लीकडील कार्यक्रम सोंपलेला होता, तो त्यांनीं कसा यशस्वी केला हें त्या त्या प्रकरणांत सांगितलेंच आहे. नारायणरावाच्या वधानंतर ज्या अनेक विपरीत घडामोडी उत्पन्न झाल्या, त्यांच्या योगानें तत्कालीन पराक्रमी व्यक्तींचें तेज लोपून गेलें आहे; आणि आज परिणाम पाहूं गेल्यास रामचंद्र गणेश किंवा विसाजी कृष्ण यांचीं नांवें सुद्धां फारशीं कोणास माहीत नसतील. तुकोजी होळकराचें तेज अहल्याबाईच्या कर्तृत्वाखालीं इतकें लोपून गेलें, कीं तो आपल्या तरुण कालीं एक अद्वितीय सेनापति होऊन गेला असें सांगितल्यास तें खरें सुद्धां वाटणार नाहीं. परंतु हा तुकोजी खरोखर मोठा शूर, कल्पक व हिमतीनें लढाया जिंकणारा सेनानायक होता, याची साक्ष त्या वेळचे कागदच देतात.

विसाजी कृष्ण बिनीवाले याचें मूळ ठिकाण कोंकणांतील राजापुर प्रांतांत तेरवण म्हणून गांव होतें. जातीचा कऱ्हाडा ब्राह्मण, आडनांव चिंचाळकर. विसाजीचा बाप कृष्णाजीपंत पुरंदरास येऊन राहिला. त्याचा वडील मुलगा विठ्ठलपंत पुण्यास सावकारी करी, कनिष्ठ मुलगा विसाजीपंत घोड्यांचा शोकी होता. त्यानें नानासाहेब व भाऊसाहेब यांजकडे प्रवेश

१. आधार.—मा. रो. १.३७५-३८२; ना. रो. १.२९१; इ. व्ह. १८३३.१४; इ. व्ह. १८३४. २९; ऐ. गो. २.२८; स. मा. रो. २.६८७; मा. रो २.५३०; खरे ले. ३९२, ३९४, ८१२-१०८६ चे दरम्यान; दळवीकृत मराठा कु० इ० भाग ३; मरा. आरमार, पृष्ठ ६२.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून हुजरातींत दौलतराव काटे यांच्या पागेंत नोकरी मिळविली. नंतर त्यानें सन १७५७ पासून बळवंतराव मेहेंदळ्याचे हाताखालीं कर्नाटकांत कामें करून प्रसिद्धि मिळविली, तेव्हां काटे याची पागा विसाजीस देण्यांत येऊन बिनीवर त्याची नेमणूक करण्यांत आली. तेव्हांपासून पुढील स्वाऱ्यांत चांगलीं कामें करून विसाजीपंतानें माधवरावाची वाहवा मिळविली. सन १७६९ खालीं रामचंद्र गणेश याजकडे स्वारीचा मुख्य कारभार सांगितला, तेव्हां विसाजीपंताची त्याचे हाताखालीं नेमणूक झाली. तेव्हांपासून पुढें त्या स्वारींतील मोहिमांत विसाजीपंतानें निःपक्षपातानें व धूर्ततेनें वागून, सरदारांच्या भांडणांत न पडतां, केवळ राज्याचे हिताचा विचार ठेविला. या त्याच्या शहाणपणाद्दल त्याजवर माधवरावाचा केवढा इतबार होता हें त्यास लिहिलेल्या पत्रांवरून व्यक्त होतें. रामचंद्र गणेशास परत बोलविल्यावर स्वारीचा मुख्य अधिकार माधवरावानें विसाजीपंतास दिला. असें सांगतात कीं, दिल्लीकडील मराठ्यांच्या पराक्रमांचें वर्णन ऐकून माधवरावास इतका संतोष झाला कीं, विसाजीपंत पुण्यास येतील तेव्हां त्याजवर सोन्यारुप्यांचीं फुलें उधळून त्यास मोठ्या समारंभानें पुण्यांत आणावें, अशी माधवरावाची आज्ञा होती. माधवरावाचे पश्चात्‌ही राज्यांत अनेक कामें करून हा शूर पुरुष वृद्धापकाळीं सन १७८५ त मृत्यु पावला. यांचें घराणें पुढें पुष्कळ दिवस पुण्यास प्रसिद्ध होतें.

वंशावळ—[बिनीवाले कैफियती व यादी अप्रकाशित बखर].*

कृष्णाजीपंत चिंचाळकर

विठ्ठलपंत — [१ हा कर्नाटकांत टिपूवरील स्वारींत होता.]

विसाजीपंत
|
महिपतराव
|
सिद्धेश्वर दादासाहेब (दत्तक)
|
पुरुषोत्तम बापूसाहेब
|
बाळासाहेब.

*रा० कृष्णाजी वासुदेव पुरंदरे यांजकडून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. पेशव्यांचे खासगीवाले, लिमये.—

३ **वंशावळ**—खं. १४ पृष्ठ ५२; कै. या. पृष्ठ १०१; फॉरेस्ट पृष्ठ ६८३.

- भानमाजी लिमये
  - बाळाजी
    - गणेशपंत
      - १ शिवरामपंत आप्पा
        - राघो
          - ६ शिवराम
            - नारोपंत
        - ३ गोविंद
          - ७ नीळकंठ
            - गोविंद
              - नीळकंठ
            - हरि
              - माधवराव.
          - कुसाबाई[3]
        - ४ हरी
        - पांडुरंग
          - रघुनाथ
          - शिवराम
          - विठाबाई
        - काशी
      - २ जिवाजीपंत अण्णा
        - ५ आनंदराव
          - गणपत
          - केशव
          - गोपाळ
        - बळवंत
        - त्रिंबक
      - चिटकाबाई
    - कृष्णाजीपंत
      - रामचंद्र
      - ज्योतिपंत
      - बाळाजी
      - ४ मुली

१ परशुरामभाऊ पटवर्धनाची आई
२ त्रिंबकराव पेठ्याचे मुलाशीं लग्न.
३ लग्न रघुनाथराव गद्रे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ शिवरामपंत व २ जिवाजीपंत प्रथम इचलकरंजीकरांजवळ नोकरीस असून अनुबाईच्या मार्फत बाजीरावाकडे आले. शिवरामास बाजीरावानें साताऱ्याचे वाड्याचें काम सांगितलें. तें चांगलें मर्जीजोगें केलें, सबब पुण्यांतील आपल्या वाड्याचें काम सांगितलें. तेंही संतोषकारक झालेलें पाहून बाजीरावानें ता. ३०-७-१७३२ रोजीं त्याची खासगीच्या कामावर नेमणूक केली. तें काम कांहीं वर्षें केल्यावर जिवाजीपंतास नानासाहेबाचे हातीं सोंपून शिवरामपंत काशीस गेला; आणि तेथें अग्निहोत्र घेऊन परत आल्यावर पंढरपुरास राहिला, (ना. रो. १-३१३). जिवाजीपंत हा नानासाहेब व माधवराव यांच्यापाशीं खासगीचें काम करून सन १७६६ त मरण पावला. नंतर आनंदरावानें तें काम कांहीं वर्षें केलें. जिवाजीपंताचा ओढा दादाकडे होता, तसा आनंदरावाचा माधवरावाकडे होता. नारायणरावाचे मृत्यूनंतर दादानें आनंदरावाचें काम काढून ६ शिवराम रघुनाथ यास दिलें. यानेंच शनिवारवाड्यापुढील चौक बांधिला. हा शिवरामभाऊ मरण पावल्यावर त्याचा मुलगा नारोपंतआपा यास सवाईमाधवरावानें खासगीचें काम दिलें. परंतु बाजीरावाची या घराण्यावर इतराजी होऊन सन १७९७ पासून त्याचें महत्त्व संपलें. खासगीचा कारभार या घराण्याकडे सन १७३२ पासून १७९७ पर्यंत होता.

परंतु या घराण्यांतील चतुर व प्रसिद्ध पुरुष ३ गोविंद शिवराम होय. त्याजकडे खासगीचा कारभार नसतांही, माधवराव सर्व महत्त्वाच्या व्यवहारांत गोविंदपंततात्याच्या सल्ल्यानें वागे. विशेषतः दादाजवळ राहून त्याचें मन सांभाळून माधवरावाचे हेतु पार पाडण्याचें नाजूक काम गोविंदपंताकडे होतें. दादास कैद केल्यावर मग त्याजवरील देखरेखीचें काम माधवरावानें नाना फडणिसास सोंपलें. सर्व पक्षांशीं गोडीनें वागून व सर्वांचीं तंत्रें यथायोग्य संभाळून, राज्याचे व्यवहार योग्य प्रकारें उलगडण्यांत शिवरामपंत प्रमुख होता. चुलतेपुतण्यांच्या कलहांत, स्वार्थी मंडळीचे कावे ओळखून अनेक बिकट प्रसंग, विकोपास जाऊं न देतां, तडजोडीच्या मार्गानें मिटविण्याचें श्रेय या पुरुषास आहे. त्याचें कोणाशीं वैर नसून सर्व लोक विश्वासानें आपल्या तक्रारी त्यास सांगतात, आणि त्याच्या मध्यस्थीची अपेक्षा ठेवितात, हें तत्कालीन विस्तृत पत्रव्यवहारावरून दिसून येतें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोविंदपंततात्यास लिहिलेलीं किती तरी पत्रें उपलब्ध आहेत, त्यांवरून उत्तर पेशवाईंतील चतुर व निःस्वार्थी पुरुषांत त्याची गणना करितां येते. सन १७५९ च्या सेप्टेंबरांत इंग्रज वकील पुण्यास पेशव्याचे भेटीस आले, त्यांची बोली गोविंदपंताचे मार्फत झाली. गोविंदपंततात्या २९-४-१७७२ रोजीं काळपुळीचे विकारानें मरण पावला, त्यावेळीं बायको गोपिकाबाईनें सहगमन केलें. 'उभय श्रीमंतांचे मध्यस्थी बोलण्यांत होते. वकिलाती होत्या. इंग्रज, होळकर, भोसले, नवाबाकडील रुक्नुद्दौला ऐशीं अनेकांचीं कामें होतीं. एक दोन वेळां मुंबईस इंग्रजांकडे कामाकरितां गेले होते. श्रीमंताबरोबर स्वाऱ्या बहुत केल्या. स्वराज्यांत व परराज्यांत सर्वांवर कृतोपकार केले. जातीस तैनाता करून देत होते, परंतु घेतल्या नाहींत'. राजवाडे खं. १३ व १४ हे सर्व खासगीवाल्यांचे संग्रहांतील कागदांचे आहेत.

६. **नारो आपाजी तुळशीबागवाले.**—हा देशस्थ ब्राह्मण साताऱ्याखालील पाडळी गांवचा कुळकर्णी. उपनांव खिरे. लहानपणीं पुण्यास लिमये खासगीवाले यांच्या आश्रयास राहून हा नानासाहेबाचे वेळेस पुणें प्रांताचा सरसुभेदार झाला. नानासाहेबानें त्यास लिहिलेलें एक पत्र ता. २१-३-१७५०चें उपलब्ध आहे, त्यावरून यापूर्वींच पुणें प्रांताच्या कारभारावर नारो आपाजीची नेमणूक झाली असावी हें उघड आहे. हल्लीं तुळशीबागेचें मंदिर आहे त्या जागेवर प्रथम तुळशीचा बाग असून तेथून देवासाठीं तुळशी तोडून आणण्याचें काम खासगीवाल्याचे घरीं असतां नारोपंतानें केलें होतें. मोठा झाल्यावर त्याची हुशारी पाहून पेशव्यांनीं त्याची बढती केली, तेव्हां तो तुळशीचा बाग त्यानें विकत घेऊन त्या जागेवर एक सुंदर श्रीरामचंद्राचें मंदिर बांधिलें; आणि एका सत्पुरुषानें रामजानकींच्या मूर्ति त्यास दिल्या, त्यांची तेथें सन १७६१ त स्थापना केली. पुढें दोन वर्षांनीं ता. २७-३-१७६३ रोजीं त्या मंदिरास माधवराव पेशव्यानें मौजे बहूं हा गांव इनाम दिला. पुण्यांत या मंदिराची प्रतिष्ठा फार वाढली.* नारो आपाजीनें जमाबंदीचे कामांत नवीनच क्रान्ति घडवून आणिली. मलिकंबराचे तोडीचाच पेशवाईत या

* या रामाची प्रतिष्ठा खालील पद्यांत सर्वतोमुखीं झालेली आहे.

श्रीरामाच्या मूर्ती तुलसीबागेमधें कशा रमल्या ।
ज्याला त्याला पावे श्रीमंतांच्या मनामधें भरल्या ॥

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कामांत नारो आपाजीचा लौकिक झाला. निजामानें पुणें जाळल्यानंतर त्याची फिरून रचना माधवरावानें नारोपंताकडून करविली. पंचवीस वर्षें पावेतों पुणें व नारो आपाजी, यांचा अगदीं अभेद्य संबंध होता, हें तत्कालीन कागदां-वरून दिसून येतें. स्वतःचा मतलब बिलकूल नसून केवळ कर्तव्यपरायण अशी जी कांहीं मंडळी माधवरावाचे वेळीं निपजली, त्यांत नारो आपाजीची गणना आहे. नारो आपाजी वारल्याचें वर्तमान ऐकून त्याचा भाऊ जनार्दनपंत यास हरिपंत फडके यानें ता. २६-३-१७७५ रोजीं लिहिलें, कीं 'नानास कैलासवास जाल्याचें ऐकून श्रम जाले ते ईश्वर जाणे. एकाएकींच गोष्ट कशी घडली! आम्हांस तर वडील होते; व राज्यांत ते एकच माणूस. अशा व्यक्ति दृष्टीस पडावयाच्या नाहींत. त्यांचे मागें आपण आहेत. लहान-मोठ्याचा परामर्ष करावा. खेद करूं नये. आम्ही आपल्यास नानाप्रमाणेंच मानितों. त्यांचा लोभ आमचे ठायीं कसा होता, तो तुम्हांस ठाऊक आहे'. (खं. १०-१५९). या हरिपंताच्या लिहिण्यांतच नारो आपाजीची योग्यता व्यक्त होते. नारो आपाजीचा राजकीय व्यवहारांतील संबंध या पुस्तकांत ठिकठिकाणीं दाखविलाच आहे. तो ता. ६-३-१७७५ रोजीं एकाएकीं मरण पावला. मरणापूर्वींचीं तात्कालिक पत्रें उपलब्ध आहेत (खं. १०-१५६). पश्चात् त्याचा भाऊ जनार्दन आपाजी पुण्याचे कारभारावर आला, त्याचें नांव सवाई माधवरावाचे वेळेस येतें. कांहीं काळानें नारोपंताचा मुलगा रामचंद्र कारभारावर आला, त्याजवर दुसऱ्या बाजीरावाची अर्थातूच मोठी इतराजी झाली, त्यामुळें घराण्याची अवनति झाली. (वा. इ. वृत्त १८३७, पृष्ठ २३३ व १८३८ पृष्ठ १६३; पे. शकावली.)

७. **चिंतो विठ्ठल रायरीकर.**—हें देशस्थ ब्राह्मण घराणें मुठे खोऱ्यां-तील रायरीचे जोशी. सखारामबापूचे वशिल्यानें मोरो विठ्ठल व चिंतो विठ्ठल या बंधूंचा प्रवेश दादाकडे होऊन त्याचेच पक्षांत ते सर्वदा राहिले. माधवरावास दादानें कैद केल्यावर चिंतो विठ्ठलास फडणिसी दिली, ती माधवरावानें राक्षसभुवनानंतर काढून पूर्ववत् भानूकडे सोंपिली. तरी पण दादाचा कारभार सर्व चिंतो विठ्ठलच पाहत असे. घोडपच्या लढाईंत मोरो विठ्ठल मारला गेला, व चिंतोपंत पाडाव झाला, तो किल्ले नगर येथें अटकेंत होता, (मा. रो. २ पृष्ठ २४०). नारायणरावाचे वधानंतर त्याची

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सुटका होऊन पुनः त्याचें महात्म्य वाढलें, परंतु त्यास दादाची बाजू सावरतां आली नाहीं. इंग्रजांचा पराभव होऊन दादा ठिकाणीं बसल्यावर ता. १९-४-१७८० रोजीं महादजीनें चिंतोपंतास गुजराथेंत पकडून उज्जनीस रवाना केलें, तेव्हांपासून तो बहुधा मरेपर्यंत बंदींतच होता. त्याची जिंदगीही सर्व जप्त झाली. 'दादांची सेवा एकाग्र केली. फडणिसी व दिवाणगिरी करून मसलती केल्या; लढाया मारिल्या, स्वामींचा नक्ष बजावला. पस्तीस वर्षें बेरोजगार (१७६४-९९); किल्ले कोट, बेड्या, बंदखाने झाले. बायकामुलें विष घेऊन निवर्तलीं. घरें, दारें, सर्व लुटलीं गेलीं'. 'चिंतो विठ्ठल कैदेंत असतां किल्ल्यावर संन्यासी वारले;' असा उल्लेख शकावलींत सन १७८१ चा आहे. त्याच्या कुटुंबाची पुढें ही स्थिति जाणून दुसऱ्या बाजीरावानें त्रिंबक चिंतामण यांस पांच गांव इनाम दिले', (सन १७९९). उज्जनीहून अहल्याबाईस पत्र आलें त्यांत मजकूर कीं, 'चिंतोपंत पळून गेले होते ते उज्जनींत एका ब्राह्मणाच्या घरीं लपून राहिले. शोध करतां सांपडले. त्यांस व आणखी तिघांस अलंकार भूषणें घालून पुण्यास रवाना करितों. त्यांची बायको व लेक विष खाऊन मेलीं. दोघे कारकुनास मार दिला, ते मेले. पाटीलबावांनीं त्यांचे पांच सहा बारगीर व एक कारकून मारिला. चिंतोपंताचे पायीं बेडया आहेत. अन्न खात नाहींत', (१८-१०-१७८०). या घराण्याचे कागद राजवाडे खंड १२-१३ यांत छापलेले असून त्यांत दादाच्या वनवासाचें वर्णन भरपूर आहे. पुण्यास रायरीकरांचें वास्तव्य पुढें पुष्कळ वर्षें होतें.

प्रभाकर जोशी
|
विठ्ठल
|
रघुनाथ — यशवंत — गोविंद — केशव — मोरो — चिंतो

रघुनाथ
|
बाजीराव — त्रिंबकराव

मोरो
|
भिमाजी
|
बाळकृष्ण द०

चिंतो
|
त्रिंबक द०
|
माधवराव द०
|
वामनराव द०

रा. खं. १२-३२३, ३२५, ३२८, ३३९, ३४२, ३४३. महेश्वर दरबारची बातमीपत्रें भा. १ ले. २०, २१.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

८. रामशास्त्री प्रभुणे.—पेशवाईंतील सुप्रसिद्ध व्यक्तींत रामशास्त्री यांचें नांव अग्रगण्य असल्यामुळें, या ठिकाणीं त्यांच्या गुणांची महती सांगण्याचें कारण नाहीं. हा ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, माहुलीचा राहणार, सातारचे सावकार अनगळ यांचें घरीं शागीर्दी करीत असतां, उपरति होऊन काशीस जाऊन प्रौढपणीं संस्कृत विद्या संपादन करून, नानासाहेब पेशव्याचे वेळेस सन १७५१ सालीं सरकारी आश्रितांत शास्त्री म्हणून दाखल झाला. त्या वेळीं दीडमाही रोजमुरा रु. ४०, श्रावण मासची दक्षणा ५०० व कापड ५५१ इतका ऐवज त्यास आरंभीं मिळूं लागला. बाळकृष्ण-शास्त्री मरण पावल्यावर त्यास मुख्य न्यायाधिशीचें काम डफच्या मतें सन १७५९ त नानासाहेब पेशव्यानें दिलें, तें मध्यें थोडा खंड शिवाय करून सन १७८९ त मरेपर्यंत त्यानें केलें. नारायणरावाचे मृत्यूचा तपास करून निकाल देतांना रघुनाथरावास देहान्त शिक्षा त्यानें सांगितली, आणि लगेच नोकरी सोडून तो वाईजवळ पांडववाडीस जाऊन राहिला. पुण्यांतून दादाचा उठावा झाल्यानंतर सन १७७७ त नाना फडणिसानें त्यास पुनः पुण्याचे न्यायाधिशीवर आणिलें. त्या वेळीं त्यास सालाची १ पासून ३ हजारपर्यंत नेमणूक, पालखी, कापड वगैरे मिळून पावत असे. सन १७७८ सालीं त्याची बायको वारली. तेव्हां दुसरे लग्नाचे खर्चास त्यास तीन हजार रुपये सरकारांतून देण्यांत आले; तसेंच सन १७८५ सालीं त्याचें पंधरा हजार कर्ज पेशव्यानें वारलें. साठपासष्ट वर्षें वय झाल्यावर कार्तिक शुद्ध ३ शके १७११ ता. २१-११-१७८९ रोजीं तो मरण पावला, तेव्हां त्याचे उत्तर-कार्यास ३२०० रु. खर्च सरकारनें केला. त्याचा मुलगा गोपाळशास्त्री विशेष विद्वान् नव्हता. बापाचे पश्चात् त्यास एक हजार ते तीन हजारपावेतों तनखा चालू होता. रामशास्त्री याची मुलगी भोरचे सचिव शंकरराव रघुनाथ यास दिलेली होती.

रामशास्त्री याचें गुणवर्णन त्या वेळीं व हल्लीं सुद्धां अनेकांनीं केलेलें मशहूर आहे. स्पष्टवक्तेपणा, निस्पृहता, धार्मिक व्यवहारांत कालमान व परिस्थिति ओळखण्याचें त्याचें मनोधैर्य, व मराठी राज्याविषयीं अनुपम निष्ठा, यांच्या योगानें तो केवळ अद्वितीय न्यायाधीश झाला, एवढेंच नाहीं, तर ती मराठशाहींतील एक प्रचंड शक्तिच होती. सारस्वत ब्राह्मणांस इतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ब्राह्मणांप्रमाणें वागविणें, माधवराव पेशव्यास कर्मनिष्ठेपासून निवृत्त करणें, प्रभूंच्या तक्रारी उदारवृत्तीनें तोडणें, विधवापुनर्विवाहास उत्तेजन देणें, निरक्षर ब्राह्मणांची तरफदारी न करणें, आणि न्याय व राजकारण यांचा योग्य मिलाफ कायम ठेवणें, या त्याच्या गोष्टी ध्यानांत ठेविल्या असतां, त्या अवनतीच्या काळांत रामशास्त्री हा एक अलौकिक व कालदेश जाणणारा सुधारकही होता हें ध्यानांत ठेवणें जरूर आहे. ग्रँट डफनें त्याची स्तुति केलेली सर्वथा योग्य आहे. तथापि अपवादांतून कोणीही मानव सुटलेला नाहीं. पाध्ये जोशी यांचे वादांत रामशास्त्री यानें पक्षपात करून आपणास बुडविलें, असा पाध्यांचा आरोप रा० पांगारकरांनीं मोरोपंत-चरित्रांत दाखविला आहे. दुसरा असाच एक आरोप त्या वेळच्या कागदांत (खरे ले.४२८ त) आढळतो. 'मनसुबी जाली नाहीं. शास्त्री यांनीं लांच दरम्यान खाऊन कागद लिहून दिल्हे'. रामशास्त्री न्याय निवडण्यांत, केवळ शास्त्रास किंवा कागदांतील शाब्दिक मतलबास प्राधान्य न देतां, देशकाल व सारासार विचार पाहून तडजोडीचा न्याय करी, यामुळें त्याजवर पुष्कळदां लोकांचा अपवाद येई, असें दिसतें'. रामशास्त्री याचा वंश जेजुरीजवळ राखी गांवीं कांहीं काळ होता. हल्लीं त्याच्या वंशांत पुढें संतति नाहीं. त्याचा मुलगा गोपाळशास्त्री विद्वान् नव्हता, परंतु गोपाळशास्त्री याचा मुलगा दुसरा रामशास्त्री बाबा हा आजासारखाच सुविद्य होता. परशुरामभाऊ पटवर्धनाची मुलगी बयाबाई बालविधवा असतां, तिच्या पुनर्विवाहास शास्त्रीबोवानें संमति दिली, यास पुरावा नाहीं, असें रा० खरे सांगतात, (अ. यो. पृष्ठ ११६).

९. **सखाराम भगवंत बोकील, (सन १७१६–८१).**—अफझलखान प्रकरणांतील पंताजी गोपीनाथ व सखारामबापू हे दोघेही बोकील घराण्यापैकीं होत. पंताजी गोपीनाथ सन १६७३ चे पूर्वीं बराच वृद्ध होऊन वारला. त्यानंतर त्या घराण्यांतील महादाजी यमाजी राज्याच्या व्यवहारांत

१. **आधार.**—इ. स. ऐ. गो. २.१४; मा. रो. २-६३२; पे. द. पृष्ठ १८६, खड ६.४५९; खरे ले. ४८२, ५२१, ५६४; २४२४ अष्टप्रधान इ० पृष्ठ १९४; भा. व. २ जु. ऐ. गो; तृ. सं. वृत्त. १४५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वावरत असून त्याजवर शाहूचा मोठा लोभ होता. शाहूनें त्यास हिवरें गांव इनाम दिला. तो सन १७२७ च्या सुमारास वारला, तेव्हां त्याची बायको सती गेली. त्यास पुत्र नसल्यानें पुतण्या भगवंत गंगाधर पुढें कारभारांत प्रमुख झाला. तो बाजीरावाचा समकालीन असून त्याचा मुलगा सखाराम-बापू नानासाहेबाहून चार सहा वर्षांनीं मोठा असावा. सखाराम व नाना-साहेब लहानपणीं एकत्रच राहून राज्याचे व्यवहारांत हुशार झाले. सन १७४६ च्या कर्नाटकस्वारींत नानासाहेबानें सखारामपंतास सदाशिवरावा-बरोबर पाठविलें, परंतु तेथें बहुधा त्या दोघांचें पटलें नाहीं, म्हणून पुढें नानासाहेबानें त्यास रघुनाथरावाजवळ ठेविलें. सदाशिवराव स्वतंत्र वृत्तीचा, कारभाऱ्यांचे हुकुमांत वागणारा नव्हता. रघुनाथराव दुसऱ्याचे तंत्रानें वागणारा असल्यामुळें, त्यास बापूनें आपल्या तंत्रानें वागण्यास लाविलें. अशा या स्वभावभेदांचा परिणाम पुढें जातां राजकारणांवर कसा होत जातो, हें पाहणें मोठें मनोरंजक आहे. सन १७३२ त पुण्यास बाजीरावानें वाडा बांधण्यास सुरुवात केली, त्यांत सखारामबापू प्रथम नोकरींत आल्याचा उल्लेख आहे. त्या वेळीं तो वयानें सुमारें पंधरा वर्षांचा असावा. तेव्हां-पासून अखेरपर्यंत तो राज्यांत खपत होता. बुद्धीनें चलाख व मनुष्यस्वभाव ओळखून प्रसंग पडेल तसा वागणारा, आरंभापासून राज्याच्या घडामोडी पाहिलेला असल्यामुळें, उत्तर पेशवाईच्या कारभारांत त्यास प्रमुखत्व आलें. धूर्तता व दूरदृष्टि हे त्याचे गुण विशेष होते. सहसा लेखांत न गुंततां तोंडीच व्यवहार उलगडण्याकडे त्याचा कल असे. नाना फडणीस याचे उलट वृत्तीचा, म्हणजे सर्व व्यवहार नियमितपणें जेव्हांचे तेव्हां लिहून, करारी बाण्यानें वागणारा, बापूप्रमाणें धरसोड करणारा नव्हता. म्हणून या दोघांत मोठी चुरस उत्पन्न होऊन त्यामुळें राज्यकारभार बिघडला. बापू महाकारस्थानी होता, त्याच्या अंतःकरणाचा ठाव सहसा कोणास लागत नसे. अर्थात् बोलण्यांतही तो नेहमीं सावध व आंतल्या गांठीचा असे. सन १७४७ त कर्नाटकची स्वारी बापूनें यशस्वी करून मुबलक पैसा आणून शाहूमहाराजांचें कर्ज फेडिलें. त्यामुळें नानासाहेबाची त्याच्या कर्तृत्वाविषयीं खात्री झाली. पुढें गुजराथेंत व उत्तर हिंदकडे दादाच्या स्वाऱ्यांत तो त्याजबरोबर असे. सर्व हिंदुस्थानांत त्याचा प्रवास होऊन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लहान मोठ्या सरदारांचे स्वभाव व हितसंबंध, तसेंच परराज्यांचे वगैरे व्यवहार सखारामबापू चांगल्या रीतीनें जाणत असे. लष्करी मोहिमांचा बापूचा अनुभव नाना फडणिसास नव्हता. हिशेब, हुकमत, चिटणिसी, वसूल वगैरे बैठ्या कारभारांत नाना फडणीस हुशार, परंतु बापूचीं दीर्घसूत्रें त्यास नव्हतीं. या स्वभावविरोधाचा उपयोग माधवरावानें यथायोग्य करून घेतला. बापूच्या दीर्घसूत्राबद्दल माधवरावही नेहमीं साशंक असे. सन १७६९ च्या अखेरीस माधवराव स्वारींत असतां, 'सखारामपंत धड पुण्यांत नाहींत, व स्वारींतही नाहींत. मध्यें रिकामे बसणारे नव्हत. पुण्यांतल्यापेक्षां स्वारींत निर्वेध राहतील', असा माधवरावाचा ग्रह त्याजविषयीं होता. परंतु मरणापूर्वीं माधवरावानें स्वतःचें प्रकृतिमान लक्षांत आणून, २२-६-१७७२ रोजीं बापूचे हवालीं सर्व कारभार केला; आणि नारायणरावास जवळ घेऊन त्याजकडून मसलाशा करवाव्या असें ठरविलें. माधवरावाचे पश्चात् यामुळें राज्याचें मोठें नुकसान झालें. तशांत या दोघां मुत्सद्यांचा मनांतला ओढा आपापल्या जातीचें हित पाहण्याकडे असल्यामुळें, ही उभयतांतील चुरस वाढत असे. विंचुरकर, नारो शंकर, पुरंदरे, इत्यादि मंडळींचें वजन वाढविण्याची बापूची प्रवृत्ति, तर पटवर्धन, पेठे, फडके वगैरेंचा पक्षपात नाना फडणिसाचे मनांत वागत असे. नारायणरावाचा उच्छृंखल स्वभाव पाहून त्यास पकडून अटकेंत ठेवण्याचे उद्योगांत बापूचें अंग होतें, परंतु त्याचें पर्यवसान खुनांत झाल्यावर बापूचें मन दादाचे विरुद्ध उलटलें. बारभाईचें कारस्थान उभारून दादाचा पाडाव करण्यांत सखारामबापूच प्रमुख होता. ता. २८-२-१७७७ रोजीं झालेला त्याचा करार आहे, त्यांत त्यास इशारा आहे, कीं 'दौलतीचें व आमचें लक्ष धरून चालावें. आमचे बऱ्यांत आपलें बरें, आमच्या वाईटांत आपलें वाईट. याप्रमाणें चालल्यास अंतर होणार नाहीं'. पुढें दादास महादजी सिंद्यानें आपल्या ताब्यांत घेतल्यावर त्याच्या कारस्थानांत सामील असलेल्या खरकसिंग, चिंतो विठ्ठल, सदाशिव रामचंद्र, बजाबा पुरंदरे वगैरेंस शिक्षा करण्यांत आल्या, त्यांत सखारामबापूचीं फितुरी पत्रें सिंद्यास सांपडलीं, तीं त्यानें नाना फडणिसास दिलीं. तेव्हां उभयतांनीं मार्च सन १७७९ त सखाराम बापूस कैद करून सिंहगडावर अटकेंत ठेविलें. तेथून लगेच ता. ८ मे रोजीं त्यास प्रतापगडावर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाठविण्यांत आलें. अटकेंत असतांही फंदफितुरीचे त्याचे खेळ चालूच होते. त्यावरून त्यास पुढें रायगडावर नेण्यांत आलें. तेथेंच तो ता. ७-९-१७८१ रोजीं मरण पावला. सखारामबापूस कैद झाल्याची बातमी ऐकून परशुरामभाऊ पटवर्धन लिहितो, 'गोष्ट वाईट झाली. चांगला कर्ता पुरुष; परंतु खेळ न जात, म्हणून हें प्राप्त झालें. होणार सुटत नाहीं', (स. मा. रो. १. २९०–२९८). सखारामबापू व नाना फडणीस हे दोघेच त्या वेळीं मराठी राज्याचा कारभार हाकीत होते; त्यांत एकानें दुसऱ्यास कैद करण्याची पाळी यावी, ह्यांतच राज्याची अधोगति उघड झाली. नाना फडणिसाकडून राघो विश्वनाथ गोडबोले हा इसम बापूवर देखरेख ठेवण्यास नेमिलेला होता, त्याजबरोबर बापूनें नानास सांगून पाठविलें कीं, 'तुम्हीं आम्हांस सिंद्यांकडून धरविलें, त्याच सिंद्यांचे हातून तुम्ही धरले जाऊन दौलत नाश पावेल'. हाच प्रकार पुढें खरा झाला.

सखाराम भगवंताचीं पत्रें माधवराव किंवा नाना फडणीस यांच्या सारखीं विस्तृत व स्पष्टार्थाचीं नाहींत. तीं संकुचित व संदिग्ध भासतात. बहुधा त्याचा प्रघात शक्य तितका तोंडी कारभार उरकून लेखांत न गुंतण्याचा होता. माधवरावाचें किंवा नानाचें लिहिणें रोख ठोक, निश्चित व मोकळें दिसतें.

सखारामबापूचीं चार लग्नें झाल्याचा उल्लेख सांपडतो. एक लग्न सन १७६५ त कर्नाटकचे स्वारींत झालें. शेवटचें लग्न साठीचे पुढें सन १७७६ त झालें. काशीबाई, जिऊबाई व राजूबाई या तीन बायका त्याचे पश्चात् हयात होत्या. मरणसमयीं बापूची संपत्ति मोजली ती आठ लाख भरली. त्याचें स्वतंत्र पथक असून त्यास रोख नेमणूक सालाची सुमारें पाऊण लाख व जहागीर वगैरे उत्पन्न पांच लाख होतें. त्याचा दानधर्म मोठा असून जवळ परिवारही बेसुमार असे. चहा घेण्याचा प्रचार त्यास असावा असें सामानाच्या यादीवरून दिसतें. बापू स्वतः कर्मनिष्ठ असून सर्व देशभर हिंडून तीर्थयात्रा सर्व त्यानें केल्या होत्या. पानिपतापासून सालबाईपर्यंतच्या मराठशाहीच्या कारभारावर सखारामबापूची छाप आहे. (कै. या. पृष्ठ १६२; तृतीय. सं. वृत्त. पृष्ठ ८१; खरे ले. ५३६, ५३८, ५६९, ८५१, ११७३ व भा. १–७; सप्तम सं. वृत्त पृष्ठ ६४; पे. द. पृष्ठ १६८-१७२).

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वंशावळ **बोकील**, रा० हिवरें, ऋग्वेदी ब्राह्मण, आश्वलायन सूत्र.

सिद्धेश्वर, कोरेगांव कुमठें येथून हिवऱ्यास आला.

रामचंद्र

रंगोपंत

गोपिनाथ ऊ० पंताजी — यमाजी

श्रीनिवास (गोपिनाथ ऊ० पंताजी यांचा पुत्र)

महादजी — गंगाजी ऊ० गंगाधर (यमाजी यांचे पुत्र)

भगवंत — मल्हार (गंगाजी यांचे पुत्र)

खंडो ऊ० निंबाजी, बाजी — सखारामबापू (भगवंत यांचे पुत्र)

आकोपंत=गोदूबाई (सखारामबापू यांचा पुत्र)

हयात २४-७-१८३३=यशवंतराव

१०. गंगाधर यशवंत चंद्रचूड.—यांच्या कागदपत्रांचा स्वतंत्र खंड छापलेला असून त्यांत घराण्याची विस्तृत माहिती आहे. हे ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मण, आश्वलायन सूत्र, उपनांव धनपावडे.

चूडामणपंत देशपांडे, रा० निंब.

गंगाधरपंत

यशवंत — भगवंत — अनाजीपंत

बाजी — **गंगाधर**=गंगोबा तात्या, ल. अन्नपूर्णा, पार्वती (यशवंत यांचे पुत्र)
मृत्यू १७७३

सदाशिव अन्याबा, कृष्णराव बापू, **यशवंतराव** दादाजी, माधवराव रावसा० (गंगाधर यांचे पुत्र)

खंडेराव (कृष्णराव बापू यांचा पुत्र), मृत्यु १८१९

माधवराव (यशवंतराव दादाजी यांचा पुत्र; यशवंतराव मृत्यू १७७९)

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाजी व गंगाधर यशवंत चंद्रचूड निंबगांवचे जोशी व कुळकर्णी होत. त्यांचा उल्लेख सन १७३४ पासून उपलब्ध होतो, आणि बाजीरावाशीं त्यांचा निकट परिचय असावा, असें दिसतें. बहुधा बाजीरावानेंच त्यांस हिशेबी कामांत नोकरीवर घेऊन पेशव्यांचे तर्फेनें होळकराचे फडणीस म्हणून नेमून दिलें. तेव्हांपासून पेशवे व होळकर यांचे मधील सर्व कारभार गंगाधरपंत पाहूं लागला. शाहूमहाराजाचे पश्चात् सन १७५० चे पावसाळ्यांत उत्तरेंतील बादशाही कामगिरी अंगावर घेण्याचें पेशव्यानें ठरविलें, आणि सिंदे-होळकरांची तजवीज सुरळीत करून त्यांस तिकडे रवाना केलें, त्या वेळीं मल्हारराव होळकराकडे गंगाधर यशवंत जबाबदारीनें कारभार करीत होता, (चं. ले. ११-१२). रामाजी अनंत दाभोळकरही ह्याच सुमारास सिंद्यांकडे दाखल झाला. मल्हाररावाचा गंगाधर यशवंतावर पूर्ण विश्वास असून, तहाच्या, हिशेबाच्या व मतलबाच्या वगैरे भानगडींत मल्हारराव गंगाधरपंताचा सल्ला घेतल्याशिवाय वागत नसे. होळकराकडील हरएक बाबतींत त्याचें नांव येतें.[१] त्याचें पत्रलेखन व भाषा चं. ले. ३३ वरून कळून येईल. गंगोबा तात्या मल्हारराव होळकराची दिवाणगिरी करीत असतां प्रसिद्धीस आला, आणि पेशव्यांचे घरांतील कलहांत त्यानें पुष्कळ उलाढाली केल्या, म्हणून त्याजवर माधवरावं पेशव्याची गैरमर्जी झाली; आणि त्यानें केलेल्या आगळिकीची अद्दलही त्यास जबरदस्त घडली. होळकराचा ओढा माधवराबाकडे न होण्यास हाच कारण असावा; आणि अनेक व्यवहारांत गंगाधर यशवंताकडून अडथळे उपस्थित झाल्याचा अनुभव आल्यावर तो माधवरावाचे मनांतून साफ उतरला, त्यामुळें हळूहळू तो सर्वथैव दादाचे पक्षास सामील झाला. याबद्दल माधवरावानें त्यास सडकून शिक्षा केली. बायकामुलंबिणीसुद्धां सर्व कुटुंबास कैदेंत ठेवून तोसीस पोंचविली, (ता. १७-४-१७७० मा. रो. २ पृष्ठ २२२). त्यावर त्यानें माधवरावास करार लिहून दिला, तो पे. द. पृष्ठ १०८ वर आहे. गंगोबा तात्या ता. २०-३-१७७४ रोजीं

१. **आधार.**—चंद्रचूड खंड—ले. ११, १२, ७५, १४९, १५०, १५८, १६२, १६३, १७२, १७७; खंड ६-५७०. पे. द. पृष्ठ१०८; भा. व. श.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मरण पावला. गंगोबाची बायको अन्नपूर्णाबाई व्यवहारदक्ष व हुशार होती; आणि त्याच्या सर्व मुलांत यशवंत गंगाधर हाच विद्वान् व शहाणा निपजला. सरकारी काम करितांना प्रथम स्वतःचा मलतब पाहणारे जे कित्येक लोक माधवरावाचे वेळेस पुढें आले, त्यांतला गंगाधर यशवंत होय. त्याच्या कारभाराचे उल्लेख मागें ठिकठिकाणीं आलेच आहेत. त्याची वडील बायको अन्नपूर्णाबाई इनें अनेक संकटांत घराचा व जिंदगीचा बचाव केल्याचे उल्लेख पुष्कळ आहेत. ता. ३०-११-१७६६ रोजीं ती यशवंतराव दादाजीस लिहिते, 'श्रीमंतांसमागमें स्वारीस जातां म्हणून वर्तमान कळलें, त्यास यंदां स्वारी बहुत कठीण. तुम्हीं प्रवास कधीं केला नाहीं. शरीर अशक्त. घोड्यावर बसावयाचा अभ्यास करीत जावा'.

११. सखाराम हरि गुप्ते, अंबेगांवकर.—बाबूराव हरि व सखाराम हरि हे दोघे बंधू माधवरावाचे वेळेस अनेक मोहिमांत हिंमत व शौर्य वगैरे गुणांनीं प्रसिद्धीस आले होते. त्यांचा उदय प्रथम बाजीरावाच्या वेळेस झाला. सन १७३३-३४ चे जंजिऱ्याचे स्वारींत पराक्रम केल्यावर त्यांस बाजीरावानें स्वतंत्र पथक करून दिलें. तेव्हांपासून चाललेल्या निरनिराळ्या मोहिमांत ते हजर असत. रघुनाथराव स्वाऱ्या करूं लागला, तेव्हां नानासाहेबानें सखाराम हरीस त्याचे दिमतीस दिलें, तेव्हांपासून तो दादाचा कट्टा अभिमानी बनला, आणि अंध श्रद्धेनें वेळीं अवेळीं दादाच्या कारस्थानांत व फितुरांत सामील झाल्यामुळें, प्रथम माधवरावाची व पुढें बारभाईंची त्याजवर अवकृपा झाली. तथापि माधवरावानें त्यास युक्तीनें वागवून त्याचा उपयोग निरनिराळ्या मोहिमांत फार कुशलतेनें करून घेतला. राक्षसभुवनावर त्यानें अद्वितीय शौर्य दाखविलें. हैदराचे भर छावणींत शिरून त्याचा त्यानें विध्वंस उडवून दिला. घोडपच्या लढाईंत दादाचा पाडाव झाला तेव्हां सखाराम हरि त्याजबरोबर नसावा. कारण लढाईंत तो असता तर तोही कैदेंत पडला असता. सन १७६२ त निळकंठराव मुजूमदार मरण पावला, तेव्हां तें पद रघुनाथरावानें बाबूराव हरि यास दिलें, तें परत नारो निळकंठास देण्याबद्दल सखारामबापूनें पुष्कळच खटपट केली. साडेचार वर्षें बाबूरावानें हें काम केल्यावर सखारामबापूच्या आग्रहास्तव माधवरावानें मोठ्या नाखुषीनें मुजुमदारी नारो निळकंठास परत दिली. बाबूराव हरीस एकांड्या म्हणत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बाबूरावावर माधवरावाचा लोभ जास्त दिसतो. कारण त्यास विशेष सवलती देऊन त्याजकडून पुण्याच्या पेठा माधवरावानें जून १७६४ त वसविल्या, (मा. रो. २-७७). सन १७६९-७० च्या कर्नाटक स्वारींत सखाराम हरि हजर असून त्याचा भाऊ बाबूराव त्याच वेळीं दिल्लीचे स्वारींत होता. यावरून युक्तिनें भिन्न प्रकृतींच्या माणसांचा उपयोग माधवराव कसा करी, हें दिसून येतें. नारायणरावाचे खुनांत सखाराम हरीचें प्रत्यक्ष अंग नव्हतें, तरी पुढील युद्धांत त्यानें दादाचा पक्ष कसून उचलून धरिला.

नारायणरावाचे वधांत तो सामील असल्याबद्दल ता. २-२-१७७४ रोजीं त्यास मुलांमाणसांसह कैद करून त्याची जिंदगी सर्व जप्त करण्यांत आली (स. मा. रो. १. ६१), तरी दादासाहेबाचा पक्ष त्यानें जोरांत उचलून धरल्यामुळें कारभारी मंडळाची त्याजवर मोठी वक्र दृष्टि झाली. पुढें दादानें गुजराथेंत जाऊन इंग्रजांची मदत घेतली, त्या वेळीं सखाराम हरि त्याजबरोबर होता. सन १७७६ त पुरंदरचा तह कायम होऊन इंग्रजांनीं दादाचा पक्ष सोडिला, तेव्हां सरदार परत आले त्यांजबरोबर सखाराम हरि व सदाशिव रामचंद्र व मानाजी फांकडे हे परत सवाई माधवरावाकडे आले. फौजेंतील तमाम सरदारांच्या भेटी सवाई माधवरावानें १९ जून १७७६ रोजीं पुरंदर किल्ल्याखालीं डेऱ्यांत घेतल्या. 'लहानमोठ्यांस श्रीमंतांनीं आपल्या हातानें विडे दिले. सर्वांचा मुजरा घेतला. सर्वत्रांस पाहवें अशी आस्था, याकरितां पंढरपुराप्रमाणें मोठी दाटी झाली. मानाजी सिंदे आदिकरून लहानमोठ्यांच्या भेटी झाल्या. सदाशिव रामचंद्र व सखाराम हरि यांच्या भेटी अशा दाटींत घेणें ठीक नाहीं, हें चित्तांत आणोन राहविलें. स्वतंत्रपणें एक दिवस भेट करूं म्हणून त्यांस सांगितलें, तें त्या उभयतांस फार वाईट वाटलें. मानाजी सिंदे पुण्याचे मोठ्या मनसब्याचे वेळेस नव्हते, म्हणून भेटीच्या समयीं त्यांस आणविलें. परंतु हे उभयतां पुण्याचे मनसब्यास अग्रगण्य, याकरितां निराळे टाकिले', (खरे ले. १८५३). पुढें यांच्या भेटी स्वतंत्र झाल्या असाव्या. दोन महिने सखाराम हरि अशा प्रकारें राहिल्यावर, त्याचा व दादाचा पत्रव्यवहार चाललेला पकडण्यांत आला. सखाराम हरीनें दादाचे पत्राचा जबाब पाठविला कीं, 'फौजेंत फितूर केला आहे, नवी फौज ठेवितों', असे कित्येक प्रकार लिहिले, तें पत्र

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सांपडलें. त्यावरून सखारामास किल्ल्यावर बोलावून आणिलें आणि पुसलें, 'श्रीमंतांचें पत्र आलें होतें कीं काय?' त्यांनीं पत्र आलें म्हणून सांगितलें. उत्तर काय लिहिलेंत? 'उत्तर दिलें नाहीं' म्हणून सांगितलें. तेव्हां पत्र त्यांच्या हातचें दाखवून विचारलें, 'हें कोणीं लिहिलें?' तेव्हां जाब काय करितात! तेच समयीं बेडी घातली. खालीं त्याचा गोठ होता, तेथें चौक्या पाठविल्या. पुतण्या खालीं होता तो धरून आणून कैद केला. बाबूराव हरीकडीलही माणसांस मावळांतून धरून आणिलें, (खरे ले. १८९४). सखाराम हरीस नगरचे किल्ल्यावर, बाबूरावास सिंहगडावर, दौलत बाबूरावास चाकण येथें, व महिपत बाबूरावास त्रिंबक येथें, याप्रमाणें अटकेंत ठेविलें. 'सखाराम हरि फितुर करीत होते, सबब बिडी घालून अटकेंत ठेवावयास पाठविले आहेत त्यांस पक्के बंदोबस्तानें ठेवून भोजन घालीत जाणें. परभु कारकून जवळ जाऊं न देणें. पहाऱ्याचीं माणसें वरचेवर बदलणें. एक मराठा खिदमतगारीस ठेवून देणें, तो पंधरा दिवसां बदलीत जाणें. धोत्रें अगर शेलापागोटें लागल्यास देणें. जेवणाची व वस्त्रपात्राची आबाळ न करणें. बेडी नेहमीं असों देणें. सखाराम हरि खेळ्या राजकारणी आहे, कोणे गोष्टीस चुकणार नाहीं. याजकरितां एक कोठडी करून त्यांत ठेवून बाहेरून कुलूप घालीत जाणें. एकास (म्ह० एकव्यास) त्याजवळ जाऊं न देणें. त्याचे गुण तुम्हांस ठाऊकच आहेत. याकरितां फार चांगला बंदोबस्त करणें', अशी ताकीद किल्लेदारास होती. बाबूराव हरि व त्याच्या मुलांच्या ताकिदी अशाच स्वरूपाच्या होत्या, (स. मा. रो. ३-८७२, ता. ४ ऑक्टोबर १७७६). सुमारें तीन वर्षांनीं सखाराम हरि मावळांत घनगड किल्ल्यावर अटकेंत असतां, त्यास मोकळा करण्याचा मनसबा रामचंद्र गोविंद कारखाननीस व इतर लोक यांनीं केला, त्याबद्दल चौघांस तोफेच्या तोंडीं बांधून उडवून दिलें व चौघांचे उजवे हात तोडिले. (१९-९-१७७९ स. मा. रो. ३-८७६). यामुळें सखाराम हरीची कैद महिना दोन महिने फार सक्त झाली, तें महादजी सिंद्यास सहन न होऊन त्यानें खालील पत्र बहुधा १६-११-१७७९ रोजीं नाना फडणिसास लिहिलें. (ऐ.टि.१.१५). 'सखाराम हरि कैदेंत घनगडीं होते, त्यास बेडी मातबर व भोजनाचेंही यथास्थित नव्हतें. याजमुळें प्राणांतिक अवस्था झाली होती.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्याचे स्त्रीनें सरकारांत रदबदली केली कीं, बेडी हलकी करून अन्नपाण्याची, औषधउपाय करावयाची मोकळीक व मजला किल्ल्यावर जाण्याची परवानगी द्यावी. त्याजवर बारा हजार रु. द्यावे, म्हणजे परवानगी दिली जाईल असा तीस जबाब मिळाला. तेव्हां स्त्रीनें मोलभीक मागोन, घरोघर फिरून बारा हजारांचा करार करून किल्ल्यावर पोंचेन अशी सनद द्यावी, म्हणजे एक महिन्यानें ऐवज भरीन, असा जामीन घेतला. परंतु परवानगी हातांत पडण्यापूर्वींच स्त्रीची भेट न होतां सखाराम हरि मृत्यु पावला. हल्लीं जामिनास बारा हजारांचा तगादा मात्र लागला आहे. ज्यापक्षीं अपराधी मरण पावला, त्यापक्षीं ऐवज सरकारांतून माफ व्हावा; आणि मुलामाणसांची मुक्तता करावी. सखाराम हरीचें सर्वच जप्त झालें, आतां त्यांस ऐवज कोठून मिळणार! याकरितां लिहिलें असे'. पुढें हा ऐवज माफ झाला कीं नाहीं तें कळण्यास मार्ग नाहीं. या पत्रापूर्वींच सखाराम हरीचा मृत्यु झाला. सखाराम हरीवर आनंदीबाईचाही लोभ विशेष होता, हें तिनें त्यास लिहिलेल्या पत्रावरून दिसतें, (ऐ. टि. १ पृष्ठ ९०). दादा व गोविंदराव गायकवाड हे एका पक्षांत असल्यामुळें, सखाराम हरीनें गोविंदरावासही अनेक लढायांत मदत केली होती. त्याचे पश्चात् हें गुसे-कुटुंब बडोद्यास येऊन नांदूं लागलें; आणि अद्यापपर्यंत गायकवाडींत या घराण्याचा लौकिक कायम आहे. मुसे खोऱ्यांतील अंबेगांव यांस बादशहा-कडून इनाम असल्यामुळें, यांस अंबेगांवकर म्हणतात.

हरिराव गुसे, रा० उरवडें, मुठे खोरें.



CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१२. पटवर्धन गोपाळराव वगैरे.—उत्तरपेशवाईंत ब्राह्मणघराणीं प्रसिद्धीस आलीं, त्यांत सन १७६०-१८०० पावेतोंच्या चाळीस वर्षांत पटवर्धन घराण्याचा विस्तार व कर्तृत्व विशेष स्मरणीय आहेत. या घराण्यांतील निरनिराळे पुरुषांचा कौटुंबिक संबंध ध्यानांत ठेविल्याशिवाय अनेक ऐतिहासिक प्रसंग स्पष्ट समजणार नाहींत. पटवर्धन घराण्याचा आद्य पुरुष हरभटबाबा कोंकणांत नेवऱ्याजवळ कोतवडें येथें राहत असे. याचा जन्म सन १६६५ त झाला. संकटांत असतां त्यानें गणपति पुळें ऊ० प्रवालक्षेत्र येथें जाऊन तपश्चर्या केली. तेथील देवाचे पुजारी शेंडे शास्त्री यांनीं आपली मुलगी गौरबाई हरभटबाबास दिली. तिच्या पोटीं सात मुलगे व एक कन्या झाली. सातांपैकीं पांचवा महादेवभट अल्पवयांत वारला, बाकीच्या सहांचे वंशज मराठशाहींत उद्योग करून प्रसिद्धीस आले. उत्तर वयांत कोंकणांत निर्वाहाचे साधनाची पंचाईत पडून हरभटबाबा वरघांटीं नारो महादेव जोशी, कापशीकर घोरपड्यांचे आश्रित, यांजकडे कुटुंबसह येऊन राहिला. नारो महादेवाचा मुलगा व्यंकटराव यास बाळाजी विश्वनाथानें आपली मुलगी अनूबाई दिली, तेव्हां तिच्यामार्फत पटवर्धनांचा प्रवेश पेशव्यांकडे व त्यांचे मार्फत शाहूछत्रपतीकडे झाला. नारो महादेव हा इचलकरंजी घराण्याचा पूर्वज असून, त्यानें आपलें उपाध्येपण हरभटबाबास देऊन कापशीनजीक बहिरववाडीस त्यांचें वास्तव्य करून दिलें. व्यंकटराव घोरपडे लहान असतां त्याचा कारभार हरभटबाबा व त्याचे मुलगे पाहत असत. हरभटाचे मुलगे गोविंदपंत नाना, रामचंद्रपंत व भास्करपंत हे बाजीरावाचे वेळेस पुण्यास येऊन कारकुनी, फडणिशी व सवडीप्रमाणें शिलेदारी करून पराक्रम गाजवूं लागले. गोविंदपंत बहुधा बाजीरावाजवळ व रामचंद्रपंत चिमाजीआपाजवळ असत. वसईच्या मोहिमेंत रामचंद्रपंतास गोळीची जखम लागली, त्यामुळें तो २८-९-१७३९तं वारला. (ख. ले.२४२६). नानासाहेब व गोपिकाबाई यांनीं या मंडळीवर लोभ ठेविला. कौटुंबिक किंवा राजकीय प्रकरणांत नाजूक कामगिरी असली, कीं ती बहुधा पटवर्धन मंडळीस सांगण्यांत येई. रा० खरे लिहितात, 'पेशवाईंत युद्धकलेचें व राज्यकारभाराचें ज्ञान अनुभवानें प्राप्त होत असे. दरबार व समरभूमि याच त्या वेळच्या शाळा. सरदाराचा मुलगा पंधरा सोळा वर्षांचा झाला, कीं त्यानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तो घरांतून बाहेर काढून स्वाऱ्या शिकारी करण्यासाठीं आपणाबरोबर घेत-लाच. मुत्सद्याचा मुलगा प्रौढ वयांत येतो न येतो तोंच कारभाराचें ओझें त्याच्या शक्तीप्रमाणें त्याच्या डोक्यावर लादलें जाई. अशा रीतीनें त्या काळचे योद्धे व मुत्सद्दी तयार होत. गोविंद हरि सरदारी करीत होता, तेव्हां त्यानें आपला मुलगा गोपाळराव यास युद्धकलेंत तयार केलें. पुढें म्हातारपणामुळें गोविंद हरि घरीं बसून कारभार पाहूं लागला, तेव्हां सरदारीचें काम गोपाळरावानें अंगावर घेतलें. इकडे गोविंद हरीच्या हाता-खालीं त्याचे पुतणे नारायणराव व मोरोबा हे कारभारांत तरबेज झाले. गोपाळरावाच्या हाताखालीं वामनराव, नीळकंठराव व परशुरामभाऊ हे सरदारींत तयार झाले. मोहिमेवर असतां गोपाळराव मुख्य सरदार व नारायणराव त्याचा कारभारी, या दोघांच्या धोरणानें बाकीच्या भावांनीं चालावें अशी पद्धत पडली. त्या वेळीं पटवर्धनांचें घराणें तेजस्वी होतें. त्यांचा मूळ पुरुष हरभट यास सहा मुलगे व त्या सहांचे सतरा मुलगे व पांचपन्नास नातू असें मोठें कुटुंब सुमारें साठसत्तर वर्षें मराठशाहींत एकत्र नांदत होतें. प्रत्येक स्वारींत सोळा सतरा पुरुष घरचे असत. हे सर्व लहान-मोठ्या योग्यतेचे व इतमामाचे सरदार होते. पण कधीं कोणांत कुरकुर ऐकूं येत नसे; मग तक्रारी, भांडणें व फितुर यांचें नांव कशाला ! वडिलां-विषयीं मर्यादा, आपसांत एक जूट, आणि पुढाऱ्यावर पूर्ण विश्वास, या तीन गोष्टींचें बाळकडूच या सर्वांस मिळालें होतें. त्यांच्या प्रीति व द्वेष, ग्रह व आग्रह, मसलतीचीं धोरणें व वागणुकीच्या तऱ्हा एकच. अशा संघशक्तीच्या जबरदस्त जोरावर कसेंही संकट पडलें तरी ते डगमगत नसत, व पाहिजे ती मसलत पार पाडीत. एक मेला कीं त्याच्याच तालमींत तयार झालेला दुसरा त्याचें काम बजाविण्यास तयार आहेच. इ. सन १७६५ त नारायणराव मेला, त्याची जागा मोरोबानें घेतली. सन १७७१त गोपाळराव मेला, तेव्हां त्याचा धाकटा भाऊ वामनराव यानें सरदारी चालविली. सन १७७४ त मोरोबा वारला, तेव्हां पांडुरंगराव कारभारी झाला. सन १७७६ त वामनराव वारला, तेव्हां परशुरामभाऊ मुख्य सरदार झाला. पांडुरंगराव सन १७७८ त मरण पावला, तेव्हां त्यानें शिकवून तयार केलेला गंगाधरराव कारभार पाहूं लागला. वामनराव व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

परशुरामभाऊ यांच्या शिक्षणानें युद्धकलेंत रघुनाथराव प्रवीण झाला. पुढें परशुरामभाऊ व रघुनाथराव यांनीं पुढील पिढीचे मुलगे रामचंद्रराव, चिंतामणराव, हरिपंत, नारायणराव, त्रिंबकराव वगैरे सरदारींत अर्धे मुर्धे तयार केले; तोंच ते दोघेही सरदार वारले'. दादा व पुढें त्याचा मुलगा बाजीराव यांचा या घराण्यावर रोष झाल्यामुळें त्यांची सरदारी लयास गेली. इंग्रजशाहींत सांगली, मिरज, तासगांव, कुरुंदवाड, जमखिंडी वगैरे ठिकाणीं या घराण्याचे अवशेष राहिले.

या विस्तृत घराण्याचा एकंदर वृत्तान्त मोठा ओजस्वी असून, त्याचें शौर्य, धाडस, स्वार्थत्याग वगैरे गुणांचा राष्ट्रास मोठा उपयोग झालेला आहे. उद्योगास क्षेत्र व प्रोत्साहक मिळाल्यावर देशांतील घराण्यांची व तद्वारां राष्ट्राची भरभराट कशी होत जाते, ह्याचें निदर्शक पटवर्धनांइतकें दुसरें घराणें महाराष्ट्रांत दिसत नाहीं. त्यांतील निरनिराळ्या व्यक्तींची ओळख पटल्याशिवाय त्या वेळचे कागद समजणार नाहींत. वंशावळी दृष्टीपुढें ठेवूनच ते पाहवे लागतात. माधवरावाचे वेळेस गोविंद हरि व त्याचे मुलगे गोपाळराव व वामनराव, नीळकंठ त्रिंबक, मोरोबा बळवंत, मेघश्याम कृष्ण वगैरे नांवें विशेष येतात. कर्नाटकांतील स्वाऱ्यांत माधवरावाचा उद्योग तडकाफडकी यशस्वी होण्यास गोपाळरावाची व इतर पटवर्धन मंडळीची मदत विशेष कारण झाली; पण त्यांत त्या सर्व मंडळीस एवढे कष्ट व ताण पडले कीं, त्या योगानें एका वर्षांत त्यांचे पांचसात पुरुष मृत्युमुखीं पडले. पुष्कळांच्या वडील मातुश्री घरीं शोकाकुल होऊन मरण पावल्या. या संबंधाचीं त्या वेळचीं वर्णनें अत्यंत हृदयद्रावक आहेत. तीं वाचलीं म्हणजे राष्ट्रसेवा गोड दिसते, पण किती खडतर असते, त्याची कल्पना होते. पटवर्धन दप्तरांतील प्रेमळ, खुलासेवार व राष्ट्रीय भावनेनें उद्दीपित झालेलीं शेंकडों पत्रें आहेत तीं वाचलीं म्हणजे, तत्कालीन राज्यकारभाराचें व राष्ट्रीय व्यवहारांचें स्वरूप स्पष्टपणें मनांत उभें राहतें. गोपाळरावाची नानासाहेबानें आत्मिक भावनेनें केलेली निर्भर्त्सना मोठी हृदयंगम आहे. त्यानें दौलताबाद काबीज केल्याची बातमी गोविंद हरीस लिहिलेली वाचण्यालायक आहे. वास्तविक माधवरावाचे कारकीर्दीची हकीकत तयार करण्यांत मुख्य उपयोग या पटवर्धनी पत्रांचाच झाला आहे. गोपाळराव जसा शूर तसाच स्पष्टवक्ता व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व्यवहारांत सणसणित होता. स्वारींत गोपाळरावानें बरोबर काम केलें नाहीं असें पेशव्यास वाटल्यामुळें गोपाळराव लिहितो. 'हालचाल करून फळ नाहीं याजकरितां न केली. करावीच अशी मर्जी असल्यास तसेंच लिहावें, म्हणजे हालचाल करूं. यश अपयश धन्याचें. आम्हां सेवकांस काय? मग शब्द ठेवितील तो कामाचा नाहीं'. हैदरानें छापा घातला असतां गोपाळरावानें जी अद्वितीय मर्दुमकी गाजविली तेणेंकरून 'श्रीमंत फार संतोषी झाले'. पुढें पुढें कर्नाटकांत पटवर्धनांवर इतक्या विपत्ति आल्या कीं, गोपाळराव लिहितो, 'इतःपर आम्ही बिलकूल छावणीस राहणार नाहीं म्हणून श्रीमंतांस बोलून ठेवावें, श्रीमंत व तुम्ही रागें भराल तरी आम्ही कोणाचें ऐकणार नाहीं. आमचे वस्तु सरदारी होत नाहीं. आम्हांसच ठेवणें असल्यास परिच्छिन्न लिहिल्याप्रमाणें फडशा करून देतील, तरच राहूं'. सन १७७० चे अखेरीस गोपाळराव स्वारींत असतांच त्याची प्रकृति फार बिघडली. जलोदराची व्यथा होऊन शरीर क्षीण झालें. तेव्हां वडील मातुश्रींचे पायांचें दर्शन घ्यावें अशी इच्छा होऊन तो कनकगिरीहून तांतडीनें मिरजेस आला आणि लगेच तीन दिवसांनीं ता. १७-१-१७७१ रोजीं मरण पावला.

गोपाळराव शरीरानें उडपातळ, मध्यम उंचीचा मनुष्य होता. स्वभाव आनंदी व उत्साही असे. तो मानी, धाडशी व तलख असून कर्नाटकांतील संस्थानिकांस त्याचा मोठा दरारा वाटे. 'गोपाळरावासारखे पुण्यश्लोक कोणी नाहीं. आमचीं अदृष्टें खोटीं म्हणून ते नाहींसे झाले. डेरा थोरला मुदपाकाचा व संध्येची राहुटी, सारा वेळ मस्कऱ्या, हें नजरेंत येतें, तेव्हां परम दुःख होतें; वहिनीस आकाशाची कुऱ्हाड पडली. सारें क्षणभंगुर'. गोपाळरावानंतर दोन महिन्यांचे आंत ता. ७-३-१७७१ रोजीं दुसरा सरदार नीळकंठ त्रिंबक हैदरखानाचे युद्धांत मरण पावला. 'दादांचे मागें रायाचा आधार होता, हें श्रीचे चित्तास न आलें. आम्हांस परदेशीं केलें आणि वृद्धापकाळीं वडिलांसी दुःख दिलें. तुम्ही विवेक करून वडिलांचे चित्ताचें सांत्वन करावें. अरिसमरीं करून देह नीट सन्मुख होऊन स्वामिसेवेवर जीवित तृणप्राय करून देह विसर्जन केला'. पेशव्यांकडून त्यास गांव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

इनाम बक्षिस देण्यांत आला. त्या काळीं युद्धांत पडलेल्यांचा असा परामर्ष घेण्याचा रिवाज जारी होता. पश्चात् बरोबर एक वर्षानें गोविंद हरि व त्याची बायको आणि त्रिंबक हरि हीं वृद्ध माणसें दिवंगत झालीं. 'मातुश्री महायात्रेस गेली. तिचा वृद्धापकाळ. ती० नाना, ताई, राव उभयतां गेले. माधवराव अण्णाही गेले, या शोकेंकरून फारच शोकार्णवीं पडलीं. तीं उभयतांही गेलीं. भेटीचा योग न घडला. जन्मांतर तसें त्यास इलाज नाहीं. वडिलांमागें सरदारी टाकून उठोन यावें तरी अयोग्य दिसतें'. असें परशुरामभाऊ वैतागून लिहितो. सरते शेवटीं त्रिंबक हरि २-४-१७७२ रोजीं मरण पावला. मरणापूर्वीं थोडे दिवस तो लिहितो, 'ईश्वरें मुलुखगिरींत तिघे चिरंजीव नेले, गोविंदपंत व सत्यभामा गेली. आतां तीन वर्षें लोक रानांत. पुढेंही श्रीमंत रहा म्हणतील तेथें राहिलें पाहिजे. घरांत बायकांचा शोक अतिशय आहे. त्यांतून कळतें कीं परशुरामभाऊस बरें नाहीं. वामनराव तर अशक्तच. इतकेंही होऊन श्रीमंत कृपा न करीत तर ईश्वरक्षोभ'. अशा संकटांत दिवस काढून पटवर्धनांनीं राष्ट्रसेवा केली. गोविंद हरीनें कुटुंबांतील मंडळीस केलेले उपदेश मोठे मार्मिक आहेत. पण ते येथें देण्यास सवड नाहीं. एक मासला 'गंजिफा खेळतां हें अनुचित. लष्करांत गंजिफा बिलकूल खेळूं नये. माफ करणें. सावध राहणें'. या घराण्यांत पुरुषोत्तमराव दाजी हा एक बाणेदार पुरुष होऊन गेला, त्याची हकीकत मनोरंजक आहे ती हरिवंशाचे बखरींत पाहवी. सवाई माधवरावास लहानपणीं संभाळण्याचें काम यानें केलें. मराठशाहींतील बाणेदार पुरुषांचा हा एक मासलाच समजण्यास हरकत नाहीं. पटवर्धनांच्या नेटामुळेंच बारभाईचें कारस्थान सिद्धीस जाऊन दादाचा पाडाव झाला. गोपाळरावाची बायको सरस्वतीबाई इनें सन १७८३ चे आक्टोबरपासून पुढें एक वर्ष मोठी टोलेजंग काशीयात्रा केली, तिचें वर्णन रा० खरे यांनीं हृदयंगम दिलें आहे.

---

१ आधार.—खरे ले. २४, २७, ८३, ८२५, ८७४, ९३४, ९४९, ९८७, १०९२, ११३१, ११३४, ११४१, ११४२, ११६५, ११६६, ११६९, ११७०, ११९०, पृष्ठ ३७५७-३८१०. हरिवंश बखर.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पटवर्धन घराणें. (विस्तार फार मोठा आहे. फक्त १७५०-१८००पावेतोंच्या कालांत येणारीं नांवें येथें घेतलीं आहेत;)

हरिभट, मृत्यु ता. ३-१०-१७५०.

१ कृष्णंभट बापाजी २ बाळंभट ३ रामचंद्रपंत ४ त्रिंबकपंत आपा ५ गोविंदपंत नाना ६ भास्करपंत आपा

मृत्यु ४-३-१७६५ मृत्यु २-४-१७७२ सत्यभामा

मोरोबा मार्च १७७२

परशुरामभाऊ हरिपंत विनायकराव धोंडोपंत

नारायण पुरुषोत्तम मेघश्याम माधवराव तासगांव जमखिंडी नीळकंठ कोन्हेरराव

दाजी बापू आण्णा मृ.७-३-७१ (कुरुं.)गोपाळराव वामनराव पांडुरंग गंगाधरराव

मृ.मार्च १७७२ दादा मृ. बाबा तात्या (मिरज)

जनार्दन रघुनाथराव गणपतराव १७-१-७१

रामचंद्र हरि माधवराव गणपतराव बापू

आप्पा बाबा दाजी बापू हरिराव चिंतामणरा. विठ्ठलरा.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१३. वंशावळ मुजुमदार.—अमात्य व मुजुमदार एकच. बावडेकर अमात्य कोल्हापुरकडे राहिले, तेव्हां साताऱ्यास शाहूनें हें काम मुजुमदारांकडे दिलें. हे पेशव्यांचे मुजुमदार म्हणून पुण्यास सरदार आहेत.

नारो गंगाधर ऊर्फ अयाबा मुजुमदार, उपनांव जोशी, कुळकर्णी मौजे लोणी भापकर.
|
नीळकंठ ऊ० आबा, सन १७५४–१७६२
|
*नारो नीळकंठ ऊ० तात्या सन १७६२-१८३२
|
- नीळकंठ रावसाहेब मृ. १८२८ नंतर
  |
  कृष्णराव ऊ० भाऊसाहेब मृ. १८३२
  |
  नारायणराव मृ. १८८७
  |
  गंगाधर ऊ० आबासाहेब (प्रस्तुत)[१]
- जीवनराव
- अण्णासाहेब
  |
  मोरेश्वर
- गणपतराव
  |
  लक्ष्मण

*बापाच्या मृत्यूनंतर रघुनाथरावदादानें मुजुमदारी बाबूराव हरि गुप्ते यास दिली, ती सखारामबापूच्या आग्रहास्तव माधवरावानें चार वर्षांनीं परत नारो नीलकंठ यास दिली.

१. मुंबई कौन्सिलचे स० व भारत इतिहास सं. मंडळाचे चिटणीस.

१४. वंशावळ बोंधले पाटील.—पंढरपुरनजीक भटउंबऱ्याचे रा० हें ऋग्वेदी देशस्थ ब्राह्मणाचें पाटिलकी करणारें एकच घराणें आढळतें. राजारामापासून पेशवाईअखेर याचे पुरुष मराठशाहींत पराक्रम करीत होते. यांचे अस्सल कागद तृ. सं. वृ. पृष्ठ २८ व ५७ येथें छापलेले पाहवे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जनार्दन पाटील बोंधले

- रायाजी ऊ० रायाराव
- १ शिवराव
  - २ भगवंत शिवदेव
  - ३ गोविंदराव
    - ४ नरसिंह मृ. १७९७
      - ५ लक्ष्मणराव
    - बाजी
    - माधवराव
  - नरसिंह

१ शिवराव जनार्दन शाहूचे मर्जींतला होता. २ भगवंतरावानेंही शाहूची चाकरी केली. ३ गोविंदरावानें बुंदेलखंड, गोहद येथील युद्धांत व नागपुरकर भोसल्यांचे पदरीं काम केलें. ४।५ यांनीं बारभाईविरुद्ध दादाचे पक्षास कसून साह्य केलें. (खरे ले. २१२४-५०).

१५. गणेश व गोपाळ संभाजी खांडेकर.—हे गार्ग्य गोत्री कऱ्हाडे ब्राह्मण मूळचे कोंकणांत संगमेश्वराजवळ बुरंबाड गांवचे राहणारे. गोविंदपंत बुंदेल्यानें आपल्या भरंवशाचीं अनेक कुटुंबें उत्तरेंत नेलीं, त्यांतच हें घराणें तिकडे गेल्याचें दिसतें. यांची वंशावळ:—

संभाजी तुकदेव खांडेकर

- बाजी
- गणेश
  - मल्हारराव
- गोपाळ
  - धोंडदेव
    - नारायण
      - गोपाळराव
        - गणपतराव (विद्यमान सन १९२५).
- अंताजी
- परशुराम
  - संभाजी
    - अनूबाई=भगवंत नायक सरदेसाई.
- वासुदेव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

संभाजीचे चार पुत्र व नातू उत्तरेच्या उद्योगांत मराठशाहीच्या अखेरीपावेतों ठळकपणें वावरत होते. माळव्यांत पंथपिपळोदा नांवाची जहागीर या घराण्यांकडे थोरल्या माधवरावाचे वेळेस सुरू झाली, ती सन १८७० त खालसा होऊन, त्या ऐवजीं यांस रोख नेमणूक सालाची रु. ११७६१ मिळते. गणेश व गोपाळ संभाजी हे प्रथम सन १७५० चे पुढें नानासाहेब पेशव्याचे वेळेस उदयास आले, आणि पानिपतोत्तर काळीं त्यांचा पराक्रम विशेष झळकला. प्रथम त्यांस बुंदेलखंडांत झांशीची मामलत मिळाली. पानिपतचे पराभवानें तिकडील मराठ्यांचा अंमल ढांसळूं लागला, तेव्हां या दोघां बंधूंनीं तिकडे फार चांगला उद्योग केला, त्यांत जानोजी भोसलेही सामील असल्यामुळें, त्यास ह्या खांडेकर बंधूंचें कर्तृत्व चांगलें माहीत झालें. जानोजीचा कारभारी बाबूराव कोन्हेर यानेंच गणेश संभाजीचा जम जानोजीकडे बसवून दिला. भाऊसाहेबाचा तोतया प्रथम हिंदुस्थानांत प्रगट झाला, त्यास गणेश संभाजीनें साह्य केलें, त्यावरून माधवराव पेशव्याची त्याजवर मोठी गैरमर्जी झाली. जानोजी भोसल्यानें ओरिसा प्रांताचा कारभार शिवभट साठ्याकडून काढिला, तेव्हां तेथील जम चांगल्या रीतीनें बसविण्यासाठीं जानोजीनें सन १७६८ चे मार्चांत गणेश संभाजीस त्या सुभ्यावर नेमिलें, तें काम त्यानें सेप्टेंबर १७७० पावेतों केल्याचें दिसतें. या अवधींत गणेश संभाजीचा इंग्रजांशीं पत्रव्यवहार झाला, तो पर्शियन कॅलेंडर्सच्या तीन भागांत ठिकठिकाणीं पाहवयास मिळतो. 'Madhavrav Peshava perfidiously broke the treaty with Bhosle', असें गणेश संभाजीनें आपल्या पत्रांत इंग्रजांस कळविलेलें आढळतें. जानोजीचा गणेश संभाजीबद्दलचा आदर खालील शब्दांत व्यक्त होतो. 'A man of great knowledge and tried courage, and of perfectly polite manners.' स्वतः गणेश संभाजी लिहितो. 'I have been called from a remote country, to take possession of the Government of Orissa, considering the share I have had in many transactions with the English gentlemen in Hindusthan'. यावरून माधवराव पेशव्याचे विरुद्ध इंग्रजांशीं आपलें बस्तान हा चांगलें बसवून देईल अशी जानोजीची अपेक्षा असावी; ती सिद्धीस मात्र गेली

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नाहीं. उलट माधवरावानेंच जानोजीला नरम केलें. तथापि गणेश संभाजीची ओरिसांतील कामगिरी ज्यास्त स्पष्ट होणें अवश्य आहे. सन १७७९-८० त माळव्यांत नरसिंगगडनजीक बाळाजी गोविंद खेरानें गणेश संभाजीवर छापा घातला, त्या प्रसंगांत तो मारला गेला, आणि त्याचा मुलगा मल्हार-राव जखमी झाला. हा मल्हार गणेश पुढें महादजी सिंद्याबरोबर उत्तरहिंदच्या कामगिरीवर होता. गोपाळ संभाजीही भावासारखाच पराक्रमी असून उत्तर हिंदुस्थानांतील उद्योगांत सतत झटणारा होता. कांहीं दिवस त्याजकडे धारची दिवाणगिरी असून माधवराव पेशव्याचा त्याजवर लोभ होता. माधवरावानेंच त्यास पंथपिपळोदची जहागीर वंशपरंपरा करून दिली, त्याची सनद ता. २८-५-१७६४ ची आहे. गोपाळ संभाजी ता. २२-५-१७९३ चे पूर्वी मरण पावला. त्याचे दुसरे दोघे भाऊ वासुदेव व परशुराम हे सुद्धां तिकडच्या उद्योगांत खपत होते. परशुराम संभाजीची नात अनूबाई भगवंत नायक सरदेसाई यास दिलेली असून, तिचा मुलगा श्यामजी नायक याचा वंश हल्लीं झोंबडी येथें नांदतो. सरदेसाई घराण्याशीं या खांडेकर घराण्याचा प्राचीन घरोबा असून संगमेश्वरनजीक बुरंबाड वगैरे पांच गांवचे कुळकर्ण खांडेकरांचे पूर्वज भानजी (भास्कर) रघुनाथ यास सरदेसायांकडून मिळालें. [पर्शियन कॅलेंडर्स—भाग २, ले. १०२७; भा. ३ ले. २९२, ३६०, ११६६ इ०, व लेखी माहिती श्री० गणपतराव गोपाळ यांजकडून].

१६. शिवाजी शंकर ओढेकर.—होळकर व पवार यांजकडे या वंशांतील मंडळींनीं कारभार केलेला आहे. त्यांचा उल्लेख वारंवार कागदपत्रांत येतो म्हणून वंशावळ समोर पाहिजे. यांस नाशकाजवळचा ओरी गांव इनाम आहे. शिवाजी शंकर हा मूळचा चांदवडजवळच्या रोहडा गांवचा राहणारा. [पहा, खरे ऐ. ले. सं. भा. १. पृष्ठ ३२०].

शिवाजी शंकर ओढेकर

संगराव	त्रिंबकराव	माधवराव
मृत्यु गोहदचे लढाईत.	राक्षसभुवनावर पराक्रम.	पवारांचा दिवाण.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१७. रामचंद्र गणेश कानडे.—कोंकणस्थ ब्राह्मण, गोत्र शांडिल्य. याचे वडील शाहू छत्रपतीचे वेळीं उदयास आले, त्यास सोनोरी येथें शाहूनें ता. ७-२-१७२५ रोजीं इनाम जमीन दिली. पुढें रामचंद्र गणेश, नानासाहेब व विशेषतः थोरले माधवराव यांचे वेळेस सेनानायकाचे कामीं नामांकित झाला. कर्नाटक, उत्तर हिंदुस्थान वगैरे हिंदुस्थानच्या सर्व भागांत यानें केलेल्या कामगिरीचा उल्लेख ठिकठिकाणीं आलाच आहे. रामचंद्र गणेश खंडाळ्याच्या घाटाखालीं इंग्रजांशीं लढतांना ता. १२-१२-१७८० रोजीं मारला गेला. त्याचा मुलगा मराठशाहींत पुढें कामावर होता. हल्लीं याचे वंशज निजामशाहींत परभणी व औरंगाबाद जिल्ह्यांत आहेत. (वा. इ. वृ. १८३७ ले. ७१ व शकावल्या व खरे भा. ७).

गणेश केशव
|
रामचंद्र गणेश
|
माधवराव
|
रामचंद्रपंत — त्रिंबकराव

रामचंद्रपंत	त्रिंबकराव
गणपतराव	हरिपंत
माधवराव द०	अंबादास
रामचंद्रराव मृ. १९०१	बळवंत
दत्तात्रय द० (हयात) रा० सातवणें,	अंबादास रा० माळवड.

१८. मुधोळकर घोरपडे.—मराठशाहींतील अत्यंत विस्तृत घराणीं म्हणजे भोसले, निंबाळकर, जाधव व घोरपडे. यांच्या किती तरी शाखा झालेल्या असून, त्यांचे पुरुष दोनशें वर्षे मराठशाहींत वावरत होते. हे सर्वच आपणास श्रेष्ठ समजून दुसऱ्यांचे अंकित होण्यास नाखूष असत. मराठमंडळाशीं फटकून वागण्याचा यांचा प्रघात राज्यास पुष्कळच बाधक झाला. रावरंभा निंबाळकर, चंद्रसेन जाधव व मालोजी घोरपडे वगैरे मंडळी मराठशाहीच्या शत्रुवर्गांत मोडत. त्यांचाच आशय दाभाडे, नागपुरकर भोसले वगैरेंनीं सवडीप्रमाणें चालविला. घोरपड्यांच्या एका शाखेचें वांकडें भोसल्यांशीं फार काळ चाललें. या शाखेचा मूळ पुरुष बाजी घोरपडे यास शिवाजीनें ठार मारिलें हें सुप्रसिद्धच आहे. त्याचा मुलगा मालोजी यास शिवाजीनें ममतेचें पत्र लिहून गौरविलें असतांही तो मोगलांकडेच राहिला. सन

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१८६२ सालीं मुधोळची कन्या प्रथम कोल्हापुर छत्रपतींचे घरांत स्वीकारण्यांत आली.

वंशावळ, घोरपडे, मुधोळ.

१ बाजी घोरपडे मुधोळकर
२ मालोजी
३ आकोजी
४ पिराजी
५ मालोजी २ रा — शंकराजी

(५ मालोजी २ रा यांचे पुत्र:) ६ गोविंदराव, केदारजी, राणोजी, महाराव; (शंकराजी यांचे पुत्र:) रामचंद्र

(गोविंदराव यांचे पुत्र:) सुबराव, ७नारायणराव; (राणोजी यांचे पुत्र:) शंकरोजी, बहिराजी; (रामचंद्र यांचे पुत्र:) शंकराजी

(७ नारायणराव यांचे पुत्र:) ८ व्यंकटराव, गोविंदराव, लक्ष्मणराव (बडोद्यास नोकर).
मृत्यु १८५४

९ बळवंतराव, मृत्यु १८६१
१० व्यंकटराव, मृत्यु १९००
११ मालोजीराव प्रस्तुत.

५ मालोजी सन १७१६-१८०५
७ नारायणराव, मृत्यु १८१६

मालोजी दुसरा हा फार वर्षें मुसलमानांच्या तावेदारींत असून पुढें तो रघुनाथरावाचे पक्षास मिळाला. नारायणरावाचे वधानंतर त्यानें कांहीं वर्षें दादाचे तर्फेनें कसून मेहेनत केली. परंतु पुरंदरचे तहानंतर दादा इंग्रजांचे आश्रयास जाऊन बसल्यावर मालोजी बारभाईंचे पक्षास येऊन मिळाला. सन १७७९ त तळेगांवच्या लढाईत तो इंग्रजांविरुद्ध लढला. त्या लढाईंत त्याचा मुलगा राणोजी मारला जाऊन तो स्वतः जखमी झाला, त्याबद्दल पेशव्यांकडून त्यास इनामें मिळालीं. मालोजी व त्याचा मुलगा गोविंदराव यांचें वांकडें होतें, म्हणून गोविंदराव निजामाचे नोकरीस राहिला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

खड्यांचे लढाईंत बापलेक विरुद्ध बाजूंनीं एकमेकांशीं लढले, त्या वेळीं गोविंदरावास जखमा लागल्या. मालोजी सन १८०५ सालीं मरण पावला. यांच्या घरांत आयुर्मर्यादा विपुल दिसते.[1]

१९. गाजीउद्दीन.—पानिपतप्रकरणीं प्रसिद्ध असलेला निजामुल्मुल्कचा नातू वजीर गाजीउद्दीन यास दिल्लीस वजिरी मिळविण्याची भारी उत्कंठा होती. पण आलमगीर बादशहास मारल्यापासून मुसलमानांपैकीं त्याजवर कोणाचाच विश्वास नव्हता. तो लपून छपून राहिला नसता तर अल्पावधींत बहुधा प्राणांसही मुकला असता. मराठ्यांशीं त्याचें पूर्वींचें सख्य स्मरून माधवरावानें त्याचा चांगला परामर्ष घेतला; आणि मृत्युपूर्वीं थोडे दिवस ता. ३०-१०-१७७२ रोजीं त्याला बुंदेलखंडांत दोन लक्षांची जहागीर नेमून दिली. परंतु तिकडे त्याचा जम न बसल्यामुळें त्याच सालच्या डिसेंबरांत तो पुण्यास पेशव्याचे भेटीस आला. बरोबर २५० राऊत होते. नारायणरावानें त्याची भेट त्याचे मुक्कामावर जाऊन घेतली; (मा. रो. १. ७०; खरे ले. १२४१); आणि दोन महिने त्यास ठेवून घेऊन ता. ६-३-१७७३ रोजीं रजा दिली. सेयरमुताखरीनचा कर्ता लिहितोः—"आलमगीरचा खून केल्यापासून शहाआलम किंवा दुसरा कोणी गाजीउद्दीनचे वाऱ्यास उभा राहत नसे. शेवटीं तो कंटाळून दक्षिणेंत आला. तेथेंही त्यास थारा मिळेना, तेव्हां मक्केस जाण्याचा विचार करून तो सुरतेस गेला असतां सन १७७९ त त्यास इंग्रजांनीं आपल्या आश्रयास ठेविलें". (भाग ३ पृष्ठ ११५).

२०. महंमद मुरादखान.—हा निजामलीचा औरंगाबादचा कारभारी. मराठ्यांशीं अनुसंधान ठेवून उभयतांचा मिलाफ करून देण्यांत बहुधा अग्रगण्य असे. दादास निजामाकडे संधान करावयाचें असेल तेव्हां तें बहुधा मुरादखानाचे मार्फत चाले. राक्षसभुवनच्या युद्धांतील सर्व कारस्थानें व पुढील तह यानें घडवून आणिले. पुढें सन १७६४ च्या ऑगस्टांत निजामलीनें त्यास मराठ्यांस सामील असल्याच्या संशयावरून बंदींत ठेविलें,

१. **आधार.**—ऐ. टि. १-३४; भा. व २.म. मं. बखर; The Ruling Chiefs and Nobles of India by Vadivelu 1915; ख. ऐ. ले. सं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि त्याची जहागीर जप्त केली. हें वर्तमान ऐकून दादास अत्यंत वाईट वाटलें आणि त्यास सोडविण्यासाठीं निजामाशीं युद्ध करण्याचाही उद्योग दादानें माधवरावाचे इच्छेविरुद्ध चालविला. परंतु या बडबडीचा कांहीं एक परिणाम न होतां माधवरावानें चुलत्यास आपल्याकडे कर्नाटकांत बोलवून नेलें. मुरादखानास वर्षभर कैदेंत ठेविल्यावर निजामलीनें जून १७६५ त ठार मारिलें. 'सलाबतजंगाकडे पत्रें फितुराचीं पाठविलीं तीं धरलीं म्हणोन मारिला'. तत्कालीन कागदांत याचें नांव वारंवार येतें. (खरे ले. ५७५; खं. १३. ८५ व १४.४).

२१. नागपुरकर भोसल्यांचे पदरची मंडळी.–विस्तार, वजन, सधनता वगैरे दृष्टींनीं नागपुरचें राज्य, मराठशाहीचा भाग असूनही, सातारकरांच्या तोडीचें होतें. साताऱ्यापासूनचे दूर अंतरावर नागपुरकरांचे चाललेले अनेक व्याप व व्यवहार, बंगालच्या राजकारणाशीं त्यांची अपरिहार्य गुंतागुंत, व सामान्यतः मुख्य मराठशाहीतून अलग वागण्याचा नागपुरकरांचा कल, इत्यादि कारणांनीं त्यांच्या इतिहासास निराळेंच स्वरूप प्राप्त झालें; आणि दक्षिणेकडील मराठशाहीप्रमाणेंच नागपुरचे राज्यांत अनेक मोठमोठीं घराणीं व व्यक्ती प्रसिद्धीस आल्या. नागपुरची बखर वाचतांना अशा अपरिचित नांवाची रेलचेल एवढी दिसते कीं, त्यांचा बिनचूक थांग व संबंध कळल्या-शिवाय त्या इतिहासांतल्या घडामोडी उकलत नाहींत. ना. भो. ब. पृष्ठ ३३-३४ व कागदपत्र ले. ५५ येथें कित्येक घराण्यांचा व व्यक्तींचा उल्लेख आहे. त्यांतील कांहीं थोडीं घराणीं परिचयार्थ पुढें देण्यांत येत आहेत.

देवाजीपंत चोरघोडे याची हकीकत पूर्वी साडेतीन शहाण्यांचे कलमांत दिली आहे. (पृष्ठ १४३). दुसरी प्रसिद्ध व्यक्ति शिवभट साठे.

शिवभट साठे.—हा एक फार चिवट गृहस्थ भोसल्यांचे तर्फेनें रघुजीच्या वेळेपासून ओरिसा प्रांताचा सुभा होता. त्यानें इंग्रजांस पूर्णपणें ओळखून, ते बंगाल प्रांत हस्तगत करीत असतां आपल्या धन्यासाठीं त्यांस कसून विरोध केला. बंगालच्या चौथाईचा भरणा करण्यासाठीं त्यानें इंग्रजांस सतावून सोडिलें. मीरजाफर व मीरकासीम यांशीं संधान ठेवून बंगाल्यांत इंग्रजांचा प्रवेश होऊं देऊं नये असा त्याचा उद्योग होता. त्याच्या संबंधानें नाहीं नाहीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्या कागाळ्या इंग्रजांनीं जानोजीकडे केल्या. जानोजीस गोडगोड पत्रें लिहून व आपल्या हस्तकांच्या मार्फत त्यांनीं एवढी भुरळ पाडिली कीं, शिवभट हरामखोर आहे असें समजून जानोजीनें त्यास सुभेगिरीवरून काढून कैदेंत टाकिलें, (२४-४-१७६४). तरी शिवभटानें आपला उद्योग सोडिला नाहीं. स्वतःची व आजूबाजूची होती नव्हती तेवढी फौज जमवून त्यानें इंग्रजांशीं लढाई देखील केली. लढाईत पराभव झाला(१४-२-१७६७), तरी त्यानें पिच्छा सोडिला नाहीं. त्यानें कलकत्त्याकडे पळून जाऊन बंडखोर जमवून पुष्कळ दंगा उसळून दिला. भोसल्यांनीं त्यास मदत केली नाहीं तेव्हां त्याचा उपाय हरला; आणि स्वराष्ट्राची सेवा करीत असतां सर्वस्वास मुकून त्याचा अंत कसा झाला, त्याचाही पत्ता लागत नाहीं. पंधरा वर्षें इंग्रजांकडे चौथाई मागतां मागतां जानोजी थकून गेला, आणि शेवटीं इंग्रजांनीं आपणांस फशीं पाडिलें याचा त्यास अत्यंत पस्तावा झाला. इंग्रजांनीं चौथाईचा वसूल तर जानोजीस दिला नाहींच; उलट ओरिसा प्रांत मात्र त्याजकडून उपटला. इंग्रज म्हणत चौथाई सुभेदारानें द्यावी. सुभेदारास इंग्रजांनींच काढून सर्व दिवाणी व वसूल आपल्या हातांत घेतला होता. त्यामुळें सुभेदार तर देशोधडीस लागले. सुभेदारांचा खजिना पूर्वी भरपूर होता, तोही इंग्रजांनीं सर्व रिकामा केला. या संबंधांत इंग्रजींत छापलेलीं जानोजीचीं लांबलचक पत्रें वाचण्यासारखीं आहेत. तीं सर्व येथें देण्यास सवड नाहीं, मुळांतच वाचलीं पाहिजेत.[1]

---

१. **आधार.**—पर्शियन कॅलेंडर्स भा. १. २१७८, २२०१; २. ६३, १२०, ७०९, ७१२.

२२. ना. भो. सरदार, विनायकराव प्रभु गुप्ते, ना. भो. ब. पृष्ठ ३४; का. प्र. इ. सा.

१ दिनकर — २ शिवाजी — ३ उमाजी

१ दिनकर: ४ महिपतराव (— बळवंत), राजेश्वर* (— काशीराव×)

३ उमाजी: बाळनाथ

*ना. भो. ब. पृष्ठ ११३

×काशीराव राजेश्वर गुप्ते यानें ना. भो. बखर लिहिली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२३. **ना. भो.चे चिटणीस,** रखमाजी गणेश

चिमाजी | माधवराव

माधवराव — कृष्णराव

२४. ना. भो. व. पृष्ठ ३४

लक्ष्मण | बुवाजी

लक्ष्मण — काशीराव

बुवाजी — नरसिंगराव

व्यंकटराव स. मा. रो. १·२८८ | लक्ष्मणराव | महिपतराव

व्यंकटराव — जगजीवन

लक्ष्मणराव — जीवनराव

महिपतराव — सखाराम, कृष्णराव, शिवराम

२५. **रामाजी केशव** तिखे, दे० ब्राह्मण

गब्राजी | माधवराव नाना

२६. काळो (ऋग्वेदी ब्राह्मण ना. भो. का. ले. ५५)

गणेश | **भवानी काळो**

गणेश — पांडुरंग

भवानी काळो — यशवंतराव

२७. **तुळजोरामा**चा वंश. राम [यमाजी शिवदेवाचे कुटुंबांपैकीं]

तुळजोराव | अमृतराम

तुळजोराव — यमाजी तुळजो

अमृतराम — माणको अमृत

२८. **वैद्य.**—बाबूराव विश्वनाथ व त्याचा मुलगा नारायण बाबूराव; तसेंच नानाजी कृष्ण जोशी, व त्याचा मुलगा कृष्णाजी नारायण, तसेंच भवानी शिवराम मुनसी व श्रीधर लक्ष्मण मुनसी, वगैरे नांवें उत्तरकालीन भोसल्यांचे व्यवहारांत येतात, त्यांची आठवण वाचकांनीं ठेविली पाहिजे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण बेचाळिसावें

शनिवारवाड्यांत पेशव्याचा खून

[भाद्रपद शुद्ध १३ सोमवार, शके १६९५; ता. ३०-८-१७७३]

१ नारायणरावाचें बालपण व पेशवाईचीं वस्त्रें (१३-१२-७२).
२. आठ महिन्यांतील ठळक उलाढाली.
३. भोसले बंधु मुधोजी व साबाजी यांचा बेबनाव (१७७२-७३).
४. दादांच्या कैदेची सक्ति (एप्रिल—ऑगस्ट १७७३).
५. कटाची उभारणी (ऑगस्ट १६—३०, सन १७७३).
६. शनिवारवाड्यांतील खुनांचा प्रळय (३०-८-१७७३).
७. इतिश्री.

१. नारायरावाचें बालपण व पेशवाईचीं वस्त्रें, [१](१३-१२-१७७२).—माधवरावाचे हयातींत चुलतेपुतण्यांचा संबंध उत्तरोत्तर कसा परिणत होत गेला, हें लक्षांत ठेविल्याशिवाय या खुनाचें प्रकरण बरोबर समजणार नाहीं.

---

१. **आधार.**—पत्रें, खरे ले. ९७६, ९७७, १०१३, ११६३, १२३४; १२५०-१२६०, १२६३-६५, १२७२ व पृष्ठ ४२०९; स. मा. रो. १. ६०-१४१, १५०, १५७, १६१, १६६; २२८; मा. रो. १.८८, ९५; १००—१०३; ना. भो. का. १०, ३०-३२, १४-१७, २१, ४८, ६८, ७१; भा. व. प. या. १.८१; इ. वृत्त १८३४ पृष्ठ ९७; का. सं. प. या. १३५, ४४६, ४४७, ४९२; ऐ. टिपणें १.१९, २०, ३३, ३७, ४४, ४७, ४९, ६१, ६२; ५.२०; ६. १५; खं. १०-८५. ऐ. चर्चा, नारायणरावाचा वध. बखरी—पेशवे; धा. रा. च; म. सा. छो. ब.; ना. भो. ब; का. प्र. इ. सा.; हरिवंश बखर. शकावल्या—भारतवर्ष व काव्येतिहास संग्रह. नारायणरावाचे वधाची बखर; नारायणरावाचे वधाचें काव्य, हें पेशव्यांचे बखरीचेंच ओवीमय पद्य होय. डफ Mostyn's dispatches चा उल्लेख करतो तीं मला मिळालीं नाहींत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादास बंदींत ठेवण्यांतच राज्याचें हित आहे अशी माधवराव, रामशास्त्री, समस्त कारभारी वगैरे विचारवंतांची बालंबाल खात्री झालेली होती. शिष्टाचारास व वडीलपणास अनुसरून माधवरावानें दादाचा बंदोबस्त यथायोग्य ठेविला होता. वेळीं अवेळीं फंदफितूर करण्याची दादाची खोड नेहमींचीच होती; आणि अशीं कृत्यें उघडकीस आल्यावरही माधवरावानें न्यायाच्या निष्पक्षपात दृष्टीनें चुलत्यास वागवून, निष्कारण चीड उत्पन्न होण्यास त्यानें अवसर दिला नाहीं. बंदींत असतां धार्मिक, सामाजिक किंवा शारीरिक सुखाची उणीव त्यास पडूं दिली नाहीं. कोणताही राजकीय उपद्व्याप त्यानें करूं नये एवढ्यापुरतीच बंदी होती; आणि ती सक्त होती. या परिस्थितीची पुरेपूर जाणीव माधवरावाचे अंतसमयीं सर्व मुत्सद्यांस व उभय पक्षांतील मंडळीस होती. मरणसमयीं माधवरावानें व रमाबाईनें नारायणरावाचा हात दादाचे हातांत घालून, उभयतांनीं एकविचारें राज्य संभाळण्याविषयीं परोपरी सांगितलें, हा केवळ व्यवहारांतील औपचारिक प्रकार होय. दादानें कारभार करावा आणि नारायणरावानें त्याच्या आज्ञेंत चालावें, असा त्याचा अर्थ नाहीं. कारभाराची पुढील व्यवस्था माधवरावानें अगोदरच लेखी ठरवून दिली होती. मृत्युपत्राच्या स्वरूपाचा हा लेख (पृष्ठ २४१) देवब्राह्मणांच्या साक्षीनें पुरा केला, त्यांत दादाची व्यवस्था पूर्वींचीच ठेवून, नारायणरावाचे नांवानें वस्त्रें आणवून, तो लायक होईपर्यंत सखारामबापू व नाना फडणीस यांनीं राज्याचा कारभार करावा, असें माधवरावानें ठरविलें होतें. हे दोघे कारभारी दोघांचे पक्षपाती असल्यामुळें कौटुंबिक विरोधास जागा राहणार नाहीं, अशी माधवरावाची अपेक्षा होती. नारायणराव लायक होता असें माधवरावास वाटत नव्हतें, किंबहुना, त्याचे हातून कारभार निभावणार नाहीं असे माधवरावाचे उद्गार निघत. तथापि नानासाहेबाचाच वंश पुढें पेशवाईस चालावा, अशी सार्वत्रिक भावना होती, तीच माधवरावानें कायम करून ठेविली.

ता. १८-११-१७७२ रोजीं माधवराव निवर्तला. पुढें तेरा दिवस उत्तरकार्य थेउरासच उरकून ता. २-१२-१७७२ रोजीं दादा सुद्धां सर्व मंडळी पुण्यास आली. ता. ३ रोजीं पेशवाईचीं वस्त्रें आणण्यासाठीं नारायणरावानें प्रस्थान ठेविलें, तेव्हांपासूनच दादाशीं त्याची थोडी बहुत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धुसपूस चालू झाली. नारायणरावाबरोबर साताऱ्यास जाण्यास दादा अनमान करूं लागला. तो नारायणरावास म्हणाला, 'मला पंचवीस लक्षांचा सरंजाम द्या, आम्ही चाकरी करूं'. नारायणरावानें सांगितलें, 'सरंजाम मिळत नाहीं; सर्व तुमचेंच आहे. तुम्हींच सर्व कारभार करावा. आनंदीबाईचेंही मत नारायणरावासारखेंच पडलें. या वेळीं त्यास अडवावें तर तो काय करील याचें भय वाटून, दादानें साताऱ्यास जाण्याचें कबूल केलें. ता. ५ डिसेंबर १७७२ रोजीं दोघेही बरोबर निघाले. समागमें गंगाबाई व आनंदीबाई होत्या. जेजुरीस देवदर्शन करून मंडळी ता. ८ रोजीं साताऱ्याबाहेर कोसभर करंजानजीक डेऱ्यांत उतरली. तेथून बोलणीं होऊन ता. १२ रोजीं महाराज रामराजा छत्रपतीशीं भेटी झाल्या. ता. १३ रोजीं तीन घटिका रात्रीं महाराजांनीं वाड्यांत नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें दिलीं. त्या वेळीं चालीप्रमाणें अष्टप्रधानांसही वस्त्रें देण्यांत आलीं. सखारामबापूस कारभाऱ्याचीं, नाना व मोरोबादादा यांस फडणिशीचीं, त्याचप्रमाणें मुजूमदार, चिटणीस, वाकनीस वगैरेंस पूर्वीचींच पदें कायम ठेवून, वस्त्रें मात्र पुनः या समयीं दिलीं. सरलष्कर खंडेराव दरेकर, सेना खासखेल गोविंदराव गायकवाड याप्रमाणें केले. सन १७६२ त दादानें न्यायाधिशी विठ्ठल शिवदेवास दिली होती ती या वेळीं त्याजकडून काढून, पुनः पूर्वीच्या घराण्यांत खंडेराव काशी यास देण्यांत आली. उभयतां राण्यांचा निरोप घेऊन नऊ घटका रात्रीस डेऱ्यास परत आले, तेव्हां तमाम सरदारांनीं पेशव्यास नजराणा केला. गुरुवार, ता. १७ रोजीं महाराजांस डेऱ्यास आणून मेजवानी केली, उपरांत जडजवाहीर व पांच उंची पोषाख दिले. अर्काटचे महंमदअलीनें पालखी नऊशें होनांची पाठविली होती, ती महाराजांस दिली. महाराज फार संतोषी होऊन शहरांत गेले. नंतर संध्याकाळीं वाड्यांत जाऊन नारायणरावानें उभय राण्यांस वस्त्रें जवाहीर दिलें. छत्रपतींनीं आपले कांहीं बंदोबस्त करून मागितले ते पुण्यास गेल्यावर करून देतों असें पेशव्यानें सांगितलें, त्यावरून महाराजांची मर्जी राहिली नाहीं. मात्र महाराजांस वर किल्ल्यांत राहण्याची आवश्यकता नाहीं, खालीं शाहूनगरांत ठेवावें, असें बोलणें झालें. नित्य महाराजांकडे श्रीमंत जात असत. ता. २० रविवारीं निरोप घेऊन वाईस आले. नंतर दहिगांवावरून महादेवास व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुढें पंढरपुरास दर्शन घेऊन ता. ३१ रोजीं पुण्यांत दाखल झाले. त्या वेळीं दरबार भरून तमाम सरदारांनीं नजरा केल्या. सातार्‍यास उद्दाम वर्तन करून नारायणरावानें छत्रपतींचा उपमर्द केला, हा कायस्थप्रभु बखरींतील मजकूर बराच अवास्तव दिसतो. तसेंच तो स्त्रीलंपट असल्याविषयीं सुद्धां त्या बखरींत मजकूर आहे त्यास यत्किंचित् आधार एवढ्या विस्तृत कागदांत बिलकूल आढळत नाहीं.

नारायणराव हा नानासाहेब पेशव्याचा सर्वांत धाकटा मुलगा ता. १०-८-१७५५ रोजीं गोपिकाबाईचे पोटीं जन्मला. मुंज सातवे वर्षी ता. २८-५-१७६२ रोजीं व लग्न सिंहगडावर १८-४-१७६३ रोजीं झालें. ता. १७-७-१७६९ रोजीं गर्भाधान झाल्याचा उल्लेख आहे, म्हणजे त्या वेळीं त्याचे वयाचें चौदावें वर्ष पुरें होण्यास आलें असून, बायकोचें वय तेरा वर्षांचे आंतबाहेर असावें. मरणसमयीं नारायणराव बरोबर अठरा वर्षांचा होता. सन १७६४ पावेतों त्याचा काळ आईजवळच सर्व गेला. सन १७६१ त बापाबरोबर तो उत्तर हिंदुस्थानांत गेला असून, परत येतांना देवी आल्यामुळें नर्मदेवर त्याचा मुक्काम कांहीं काळ जास्त झाला. पानिपतस्वारींतून पार्वतीबाई दुःखीकष्टी होऊन परत आली, तेव्हां तिच्या समाधानार्थ 'नारायण तुझा असें समजून त्याचें संगोपन तूंच कर', असें गोपिकाबाईनें पार्वतीबाईस सांगितलें, तेव्हांपासून 'हा आपला' असा पार्वतीबाईचा भाव कायम होता. सन १७६४ चे अखेरीस दादा नाशकाहून कर्नाटकांत माधवरावाकडे गेला, त्याजबरोबर नारायणरावही प्रथमच स्वारींत जाऊन, लगेच ता. २१-२-१७६५ रोजीं पुण्यास परत आला. त्यापुढें सन १७६७ व ६९ च्या कर्नाटकांतील स्वार्‍यांत तो माधवरावाबरोबर हजर असून निजगल किल्ल्यावर लावलेल्या मोर्चांत बसला असतां, नारायणरावाचे मनगटास गोळीची जखम लागली, पण त्यापासून विशेष अपाय झाला नाहीं. माधवरावासारखाच त्याचाही विद्याभ्यास लहानपणीं आईचे देखरेखीखालीं मोडी बालबोध लेखन, हिशेब वगैरेचा झाला. संस्कृतही त्यास बरेंच शिकविण्यांत आलें होतें. 'मातुश्रीच्या आज्ञेप्रमाणें षड्‌लिंगें कौमुदी जगन्नाथभट यांजवळ म्हटली. अर्थ पुरता समजून घ्यावयाचा आहे, तोही लवकरच होईल', असें सन १७७२ च्या फेब्रुवारींत त्यानें मातुश्रीस कळविलें. म्हणजे संस्कृत, व्याकरण, काव्य वगैरेंचा त्याचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

अभ्यास इतर व्यवसायांबरोबर चालूच होता. सन १७६९ पासून निर-निराळ्या कारभाऱ्यांजवळ बसून त्यानें कामें समजून घ्यावीं, व थोडे बहुत निकाल करावे, असें माधवरावानें त्यास सांगितलें, आणि कित्येक कारभार व मामलती त्याचे सुप्रत केल्या. सन १७७० च्या ऑगस्टांत माधवरावानें नारायणरावास दिवाणगिरीचीं वस्त्रें दिलीं, आणि सखारामपंतास त्याचे मुतालकीचीं दिलीं; आणि 'सखारामपंतांनीं नारायणरावांजवळ बसोन कारभार करावा, त्यांस समजवावा', असा हुकूम दिला. यांत सखारामबापू आपली दिवाणगिरी गेल्यामुळें थोडासा नाराज झाला. ता. २८-८-१७७१ रोजीं अनेक लहान मोठ्या बाबतींसंबंधानें माधवरावानें नारायणरावास केलेला उपदेश मागें पृष्ठ २३३ वर आहे, त्यावरून त्याचे हातून राज्यकारभार रेटणार नाहीं असें माधवरावाचें मत प्रचलित आहे, तें खरें दिसतें. माधवरावास पेशवाई सोळा वर्षांत मिळाली तशी नारायणरावास सतरा वर्षांत मिळाली. परंतु माधवरावाची लायकी नारायणरावांत नव्हती. 'श्रीमंतांची मर्जी फारच उतावीळ आहे. ईश्वर कसें पार पाडील न कळे. लहान माणसांची चाल पडेलशी दिसते. बाबाजी बर्व्याचे नादानें चालतात. बापूंची मर्जी कोंकणस्थांवर क्रुद्ध आहे. श्रीमंतांचा प्रकार तर बालकृष्णच आहेत, परंतु केवळ कारभाऱ्यांचे स्वाधीन नाहींत. थोरले श्रीमंत गेले. वाघ गेला, आतां सारीं कोल्हीं राहिलीं आहेत. श्रीमंतांस आपपर कळत नाहीं. कारभारी करतील तें प्रमाण. धन्यांत धनीपण नाहीं'. अशा प्रकारचे उल्लेख नारायणरावाबद्दल आढळतात. प्रथम चुलतेपुतण्यांचें सौरस्य बरें होतें. 'उभयतां एकत्र एक जागांच असत. उभयतांची आणभाक झाली कीं स्नानसंध्या, पूजा एक जागीं. निद्रा मात्र निराळी. स्वारींत चालतांना दादा पुढें, राव मागें हा प्रकार थेउरास ठरला, परंतु पुण्यास आल्यावर तो टिकला नाहीं'. नारायणरावाची वृत्ति क्षणभंगुर होती. लोकांवर जरब ठेवणें व कामकाजांत तडफ दाखविणें या दोन बाबतींत तो थोरल्या बंधूचें अनुकरण करूं लागे. परंतु छाप पडण्यास दुसरे गुण पाहिजेत ते त्याचे अंगीं नव्हते. बापू वगैरे कारभाऱ्यांस तो टाकून बोले व घडोघडीं उपमर्द करी. अनुभवानें मनुष्य शिकतो, तसा प्रसंग नारायणरावास आला नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२. आठ महिन्यांतील ठळक उलाढाली.— ता. ३१ डिसेंबरपासून ता. ३० ऑगस्ट सन १७७३ रोजीं खून होईपावेतों बरोबर आठ महिने, नारायणरावानें आपल्या नांवचे नवीन शिक्के करून पेशवाईचा कारभार केला. एवढ्या मुदतींत नागपुरकर भोसले बंधूंत युद्ध चालू होतें तें सोडलें तर, दुसरीं बाहेरचीं राजकारणें, लढाया वगैरे कांहीं झालें नाहीं. चुलते-पुतण्यांचा मुक्काम बहुतेक पुण्यास एकत्रच शनिवारवाड्यांत होता. मध्यें सुमारें एक महिना म्हणजे १४ मार्चपासून १० एप्रिलपावेतों मातुश्रीस भेटण्याकरितां म्हणून नारायणराव नाशकास गेला, तेवढाच काल तो पुण्याचे बाहेर होता. मार्च १८ पासून एप्रिल ६ पावेतों मातुश्रीचा व त्याचा सहवास गंगापुरास झाला. मध्यंतरीं ता. २३ मार्च रोजीं सूर्यग्रहण प्रसंगीं त्यानें नाशकास गंगास्नान केलें. नारायणराव नाशकास जाण्यापूर्वी ता. ७-२-१७७३ रोजीं दादाची मुलगी दुर्गाबाई इचें लग्न पुण्यांत पांडुरंग बापूजी नाईक याच्याशीं झालें. यावरून चुलतेपुतण्यांचे हर्षामर्षाचे जे काय प्रसंग आले असतील ते केवळ घरगुती कारभाराचे म्हणजे असामियास नोकरींत ठेवणें किंवा काढणें एवढ्यापुरतेच झाले. खर्चाची तंगी होती. बाहेर शत्रु नसल्यामुळें फौजेचें प्रयोजन नव्हतें. गाडद्यांचें देणें चढलेलें होतें. त्यांचा अंमलदार महंमद इसफ याजकडे सरकारचें घेणें पुष्कळ चढलेलें असल्यामुळें, वीस हजार रुपये त्यास माफ करून सर्व पथकासह त्यास नोकरींतून कमी केलें; पुन: जरूर लागेल तेव्हां बोलावूं असें सांगितलें. गाडदी म्हणजे गार्ड्स्, कवाईत शिकलेले पायदळ शिपाई. हे लोक बहुतेक उत्तरेंतील रोहिले, पठाण, हबशी, आरब, पुरभय्ये वगैरे जातींचे असून, त्यांत बहुधा मराठे कोणी नव्हते. त्यांस दरमहा पगार लायकीप्रमाणें रु.८-१५ पर्यंत असे. त्यांचें मुख्य हत्यार बंदूक. फ्रेंच सेनापति बुसी यानें एतद्देशीयांची पलटणें कवाईत शिकवून बनविण्याची सुरुवात केली, तेव्हांपासून पंधरावीस वर्षें झालीं; त्या अवधींत गाडद्यांत पुष्कळच ढिलाई व बेबंदशाही उत्पन्न झाली होती. तशांत त्यांचीं घरेंदारें इकडे नसल्यामुळें ते बेपर्वा होऊन पैक्यासाठीं वाटेल तें कृत्य करण्यास तयार असत. महंमद इसफ, सुमेरसिंग व खरकसिंग हे त्यांचे अंमलदार दहा पंधरा वर्षें पेशव्यांचे नोकरींत होते. सन १७७० त शिंद्याचे हल्ल्यांत महंमद इसफाचा मोठा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उपयोग पेशव्यास झाला होता. सुमेरसिंग सन १७६१ त नोकरीस असल्याचा उल्लेख सांपडतो. तो नेहमीं पेशव्यांचे लोभांतला व कुटुंबांत वावरणारा मुख्य पाहऱ्यावर असल्यामुळें, त्यास घरांतील व्यक्तींची व व्यवहारांची व वाड्याच्या रचनेची फार चांगली माहिती होती. नारायणराव गंगापुरास असतां, सुमेरसिंग आपल्या लग्नासाठीं चांदवडास गेला. तेथें लग्नाचें कांहीं साहित्य त्यास पुरविण्याचा पेशव्यानें तेथील कमावीसदारास हुकूम लिहिला होता. या गार्द्यांचे पगार पुष्कळसे तुंबलेले असून, सवडीप्रमाणें मागाहून रकमा देण्यांत येत. खून होण्यापूर्वीं दहा दिवस म्हणजे २०-८-१७७३ रोजीं त्यांस तीस हजार रुपये पगार. पेटे देण्यांत आल्याचा दाखला आहे.

या वेळीं इंग्रजांचा वकील मॉस्टिन पुण्यास येऊन राहिला होता. इंग्लंडांतून कंपनीचा हुकूम ता. १-४-१७७२ चा मुंबईस आला कीं, पेशव्यांचे दरबारीं आपला एक वकील कायमचा ठेवून द्यावा. त्यानें कोणताही नवीन करार किंवा व्यवहार करूं नये. फक्त दरबारांत चाललेल्या घडामोडींची माहिती मुंबई, मद्रास, कलकत्ता वगैरे ठिकाणीं जरुरीप्रमाणें पाठवावी; व्यापारास उपयोगी पडतील अशा सवलती पैदा कराव्या; आणि शक्य ती खटपट करून, साष्टी, वसई, एलिफंटा, करंजा वगैरे बेटें हस्तगत करावीं, कीं जेणेंकरून मुंबईचा विस्तार सलंग होऊन व्यापार व व्यवहार वाढविण्यास मदत होईल. इंग्लंडांहून असा हुकूम येतांच मुंबईकरांनीं मॉस्टिन यास पुण्यास पाठविलें. पूर्वीं तो माधवरावाकडे आलेलाच होता. सन १७७२ च्या ऑक्टोबरांत माधवरावानें त्यास पुण्यास राहण्याची परवानगी दिली, तेव्हांपासून सन १७७४ च्या ऑक्टोबरपावेतों दोन वर्षें तो सारखा पुण्यास होता. नारायणरावाचे खुनाचे दुसरेच दिवशीं तो दादास भेटला. माधवराव मृत्यु पावतांच इंग्रजांनीं ठाणें, वसई, विजयदुर्ग, रत्नागिरी वगैरे किनाऱ्यावरचीं ठिकाणें हस्तगत करण्याची एकदम मोठी उचल घेतली. विजयदुर्गावर त्यांचें आरमार आलें, तेव्हां सन १७७३ च्या जानेवारींत त्रिंबक विनायकास सरसुभा करून पेशव्यानें इंग्रजांवर रवाना केलें. त्याजबरोबर गाडदी फौज व पांच मातबर गलबतें देण्यांत आलीं. त्यांनीं व कृष्णाजी धुळपानें मिळून इंग्रजांशीं सामना करून त्यांस विजयदुर्गांतून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हुसकून दिलें. त्या वेळीं इंग्रजांचा उपद्रव बंद करण्याविषयीं नारायणराव व दादा दोघांनींही सडकून प्रयत्न केले. परंतु खुनानंतर दादाचें बारभाईशीं युद्ध सुरू झालें, त्याचा फायदा घेऊन सन १७७४च्या डिसेंबरांत इंग्रजांनीं एकदम नेट करून ठाणें, वरसोवा व करंजा हीं ठिकाणें काबीज केलीं, तेणें-करून सर्व साष्टी बेट त्यांस मिळालें. चिमाजीआपानें कष्ट करून मिळ-विलेलीं ठिकाणें हातचीं जाऊं देण्यास दादा सुद्धां फार नाखुष होता. मॉस्टिन मोठा गप्पिष्ठ, जें काय कानावर येईल तें सर्व तो ठिकठिकाणीं लिहून पाठवी. त्याचा पत्रव्यवहार (Despatches) डफ यास पाहण्यास मिळाला होता.

साष्टीप्रमाणेंच रायगड किल्ल्याची भानगड नारायणरावाचे वेळेस उपस्थित झाली. हें मूळ राजधानीचें मजबूद ठिकाण आपले कबजांत असावें असें छत्रपतीस वाटे. परंतु जंजिऱ्याचा हबशी तें हस्तगत करण्यास पुष्कळ काळ अगदीं टपून बसला होता; आणि त्याचा प्रतिकार करण्याचें सामर्थ्य छत्रपतीस नव्हतें. हल्लीं हबशानें रायगडचे किल्लेदारास फितवून किल्ला काबीज करण्याचा घाट रचिला; परंतु नारायणरावानें लगोलग फौज पाठवून किल्ल्याचा बंदोबस्त केला, आणि छत्रपतींची लेखी आज्ञा आणवून, किल्ला चैत्र शुद्ध १, ता. २४-३-१७७३ रोजीं आपल्या कबजांत घेतला. छत्रपति नाराज होण्यास हें थोडेंसें कारण झालें.

पुण्यास सर्व कारभार सखारामबापू पाहत असे. माधवरावानें ठरविलें व छत्रपतीनें वस्त्रें दिलीं, त्यास अनुसरून व्यवस्था चालू होती. नाना फडणीस दुय्यमपणें मदत करी. या कारभाऱ्यांत तेढ उत्पन्न होण्यास **विसाजीपंत लेल्याचें** प्रकरण कारण झालें. लेखणी व तरवार दोनही कामांत कर्तबगार असा हा गृहस्थ फार वर्षें वसईच्या सुभ्यावर असून, तिकडील व्यवहारांची त्यास उत्कृष्ट माहिती होती. साष्टी, वसई वगैरे ठाणीं प्राण गेला तरी इंग्रजांस देऊं नयेत, तीं हातचीं गेलीं, कीं मराठशाही इंग्रजांनीं वशांत घातली म्हणून समजावें, असें पुणें दरबारास वारंवार अट्टाहासपूर्वक सांगणारा हा विसाजीपंत होय. वेठबिगारीसंबंधानें सरकारी हुकूम तोडल्या-बद्दल ज्यास माधवरावानें शासन केलें म्हणून डफ लिहितो, तो गृहस्थ हा. मात्र डफनें दिलेल्या हकीकतीचा उल्लेख मराठी कागदांत आढळत नाहीं. जंजिरेकरांशीं लढाई, तुळाजी आंगऱ्याचे मुलांचा बंदोबस्त, दारूगोळा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तयार करणें, वगैरे बाबतींत विसाजीपंतास गेलेले माधवरावाचे हुकूम पाहतां, तो मोठा इभ्रतदार असावा यांत शंका नाहीं. तथापि माधवरावाची त्याजवर इतराजी फार वर्षांपासून होती असेंही आढळतें. विसाजीपंताची वसईची मामलत काढून शंकराजी केशव फडके यास सांगावी, असा माधवरावाचा विचार जुलई सन १७६५ त चालला होता. (खरे ले. ५७६). सन १७७०च्या मार्चांत दीदीशीं आरमारानें लढून पंतानें मर्दनगड किल्ला काबीज केला, पण लगेच पुढें त्याजवर कांहीं किटाळ येऊन त्यास पुण्यास जावें लागलें. एकदां एक गलबत फुटून त्यांतील वीस लाखांचा माल किनाऱ्यास लागलेला विसाजीपंतानें गडप केला, असा त्याजवर आरोप येऊन त्या कामांत माधवरावाची त्याजवर इतराजी झाली; आणि तोच भाव नाना फडणिसाचे मनांत पुढें राहिला. टेलर सांगतो कीं, सखारामबापू लिहिण्यांत वगैरे फारसा कुशल नसल्यामुळें, तो या कामीं विसाजीपंताचा उपयोग करून घेई. माधवरावाचे पश्चात् बापूचे हातीं कारभार आल्यावर विसाजीपंतास पुनरपि वसईचे सुभ्यावर नेमण्याविषयीं बापूनें सडकून प्रयत्न केले, पण नारायणरावानें तें मान्य केलें नाहीं आणि वसईचा सुभा त्रिंबक विनायक यास दिला. 'बापू रदबदल करूं लागले, तेव्हां त्यांजवर पुष्कळच कडाडले'. तेव्हां पुण्यास राहून विसाजीपंतानें बापू व दादा यांच्या तंत्रानें नानाप्रकारची खटपट चालविली. विसाजीपंत कोंकणस्थ असून बापूचे पक्षांतला होता हें येथें ध्यानांत ठेविलें पाहिजे.

या वेळीं दुसरी एक फिर्याद विसाजीपंतावर उपस्थित झाली. 'त्याचे बायकोस पुत्र झाला, आणि तिच्या बहिणीस कन्या झाली. तेव्हां तिनें बारा दिवसांचे आंत बहिणीस पुत्र देऊन तिची कन्या आपण घेतली. हा कारभार बायकांनींच मधल्या मध्यें केला. पुरुषांस ठाऊक नाहीं. पुढें दोन महिन्यांनीं मेहुणीचे भ्रतारास खरी हकीकत कळून त्यानें सरकारांत फिर्याद मांडिली. तेव्हां चौकशी होऊन विसाजीपंताचा पुत्र त्यास परत देण्यांत आला, आणि गुन्ह्याबद्दल दीड पाऊण लाख दंड घेतला. आधींच अवकृपा त्यांत हें आणखी कारण झालें.' जहाजांतील मालाचा व हा मिळून दहावीस लाखांचा दंड विसाजीपंताचे गळीं नारायणरावानें बांधिला, तेणेंकरून बापू व नाना यांचें सडकून वांकडें आलें; आणि नाना बहुतेक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

घरीं बसल्यासारखा झाला; पुढें सवाई माधवरावाचे जन्मानंतर कारभाऱ्यांशीं समेट करण्याकरितां दादानें आपले वकील पाठविले, त्यांत विसाजीपंत होता. दादानें इंग्रजांचा आश्रय करूं नये असा निक्षून आग्रह धरणारा विसाजीपंत होय. ता. १-६-१७७४ रोजीं कारभारीपक्षाकडून वसईच्या सुभ्यावर विसाजीपंताची पुनरपि नेमणूक झाली.

तूर्त नारायणरावाचा जम बसण्यांत कोणकोणतीं प्रकरणें उद्भवलीं तें सांगावयाचें आहे. दादाच्या मुलीचें लग्न करावयाचें तें पार्वतीबाईचा विधि उरकून मग करावें अशी दादाची इच्छा होती. कुटुंबांत हें मोठें पाप घडतें असा समज होऊन, त्यासंबंधानें माधवरावाची लेखी आज्ञा झालेलीच होती. नारायणरावाचा ओढा पार्वतीबाईकडे असल्यामुळें तिच्या इच्छेविरुद्ध हा प्रकार करण्यास तो नाखूष होता. तोतया कैदेंत होता, त्याची शहानशा तिच्या समक्ष झाली नव्हती, ती करण्याबद्दल तिचा आग्रह होता. पण तोतयास बाहेर आणणें कोणासही इष्ट वाटलें नाहीं. नारायणरावानें सांगितलें, तूर्त लग्न उरकून पुढें चैत्रांत क्रिया करावी. त्याप्रमाणें दुर्गाबाईचें लग्न माघांत मोठ्या थाटानें झालें. नारायणरावानें स्वतः पायीं फिरून गांवांत आमंत्रणें दिलीं. ठिकठिकाणीं उभयतां श्रीमंतांस थाटाचे गडगनेर झाले. नाना, हरिपंत, कृष्णराव बल्लाळ, त्रिंबकराव मामा वगैरे सर्वांनीं समारंभांत मनापासून मेहनत केली. माघ शुद्ध १५, ता. ३१-१-१७७३ रोजीं अवशीं दहा घटका रात्रीं लग्न लागलें; आणि यथासांग कार्य उरकलें.

परंतु कारभाराच्या संबंधानें पाहतां फौजेच्या व हिशेबाच्या भानगडींवरून पटवर्धनांचें व बापूचेंही पुष्कळसें बिनसलें होतें. माधवरावाचे वेळेस पटवर्धनांचा उत्कर्ष फार झाला, तो बापूस सहज न होऊन त्यांचा नक्शा उतरविण्याचा बापूचा इरादा होता. त्यामुळें त्याजबरोबर घासाघीस चालू झाली. अशा प्रकारें बापू सर्वथैव दादाचे तंत्रानें चालतो, आपलें किंवा नानाचें त्याजपुढें कांहीं चालत नाहीं, असें पाहून पुढील विचार करण्याकरितां आणि मातुश्रीस भेटून सल्ला विचारण्यासाठीं सखारामबापू, वामनराव पटवर्धन वगैरे मंडळीस बरोबर घेऊन, ता. १४ मार्च रोजीं नारायणराव गंगापुरास गेला, हें वर सांगितलेंच आहे. बापू बरोबर होता, त्या-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

वरून मुद्दाम दादाचे विरुद्ध कारस्थान रचण्याकरितां तो गंगापुरास गेला असें म्हणतां येत नाहीं.

पंधरा वीस दिवस नारायणराव व गोपिकाबाई गंगापुरास एकत्र होतीं. या भेटींत काय घडलें त्याचा उल्लेख सांपडत नाहीं. मात्र मागें दादानें कांहीं उपद्व्याप मांडल्याचें कळल्यावरून नारायणराव त्वरेनेंच पुण्यास परत आला. पुण्यास 'कोणी नाहीं ही संधि पाहून बाहेर निघून जावें असा मनसबा दादांनीं केला. जागांजागां गुप्तरूपें फौज ठेविली. हैदरखानाकडे राजकारणाचीं पत्रें पाठविलीं. बाहेर निघून जाणार, इतक्यांत वर्तमान प्रगट झालें, त्याबरोबर नारो आपाजीनें पुण्यांत तमाम चौकी पहारे बसवून वाड्याभोंवतीं गार्दी उभे केले. दादानें नारो आपाजीस विचारिलें, 'पहारे काय निमित्त उभे केले? आम्हीच जाणार म्हटल्यास नको कोण म्हणणार आहे! हे आम्ही चाललों'. असें म्हणून बाहेर डेरे देवविले. तेव्हां कृष्णराव बल्लाळ वगैरेंनीं चार गोष्टी सांगून नारायणराव येईपर्यंत थांबविलें; आणि गंगापुरास वर्तमान कळविलें. लगेच ते आले. येतांच हैदरखानाचा वकील आपाजीराम यास बोलावून शिवीगाळ केली. दस्तैवज सांपडला, सबब पायांत बेडी घालून पुरंदरावर नेऊन ठेविलें. चौकशी चालू आहे'. लगेच ता. ११-४-१७७३ रोजीं नारायणरावानें दादास पुनः शनिवारवाड्यांत बंदींत ठेविलें (डफ). त्यास मुख्य कारणें दोन, एक हैदराकडील कारस्थान, दुसरें कारस्थान नागपुरकर भोसल्यांकडचें. भोसल्यांच्या कारस्थानाचा संबंध पुढील खुनाशीं असल्यामुळें, येथेंच त्याचा तपशील देणें जरूर आहे.

३. भोसलेबंधु मुधोजी व साबाजी यांचा बेबनाव, (१७७२-७३).— जानोजी भोसले सन १७७२ च्या मे महिन्यांत मरण पावला, हें मागें सांगितलेंच आहे. चार बंधूंत मुधोजीस मात्र संतति होती. आपले पश्चात् बायको दर्याबाईनें मुधोजीचा अल्पवयी मुलगा राघूजी यास दत्तक घेऊन, कारभार मुधोजीनें करावा असें जानोजीनें मृत्युपूर्वी माधवरावाशीं बोलणें केलें. माधवरावानें या व्यवस्थेस मान्यता दिल्याचें दिसत नाहीं. मान्यता न देण्याचें [illegible] मुधोजी वेळीं अवेळीं दादास अनुकूल होऊन फंदफितूर उपस्थित [illegible]. मुधोजीचा दुसरा बंधु साबाजी दादाचे उलट माधवरावाचे बाजूचा होता.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यामुळें मुधोजीबद्दल द्वेष व साबाजीबद्दल आदर माधवराव, नारायणराव, नाना फडणीस वगैरे मंडळीचे मनांत बरेच दिवसांपासून दृढ झाला होता. जानोजीच्या मृत्यूनंतर साबाजीनें दर्याबाईस मिळवून घेतलें; आणि तिनें असें जाहीर केलें कीं, आपण गरोदर आहों, रघूजीस दत्तक घेण्याचें कारण नाहीं. तेव्हां माधवरावानें साबाजीस तूर्त 'सेनासाहेब सुभा'पदाचा अखत्यार देऊन नागपुरास रवाना केलें, आणि तिकडील सर्व व्यवहार लगोलग कळविण्यासाठीं आपला वकील रामाजी बल्लाळ गुणे यास त्याजबरोबर पाठविलें. हा प्रकार मुधोजीस अत्यंत झोंबला. हा मुधोजी मोठा दुर्भागी समजला पाहिजे. हुशारींत तो जानोजीहूनही सरस होता. सातारचें छत्रपतिपद त्यास मिळणार होतें. पण वीस पंचवीस वर्षें गेलीं तरी त्याचा उत्कर्ष झाला नाहीं. शेवटीं सन १७७२ त संधि आली, तेव्हां त्याच्या हातचा डाव साबाजीनें उपटला. त्यास सेनाधुरंधर पद होतें, परंतु मुख्य कारभार हातीं न आल्यामुळें त्याची अत्यंत निराशा झाली' आणि चार दोन महिन्यांत प्रकरण वर्दळीस आलें. मुधोजी व साबाजी आपापले पक्ष व फौजा उभारून लढाईस प्रवृत्त झाले. या संबंधांत नागपुरच्या बखरींत अनेक व्यक्ती, पक्ष, व्यवहार व खटपटी यांचे वृत्तान्त गच्च भरलेले दुर्बोध वाटतात, ते स्पष्टपणें उकलल्यावर त्या वेळचीं कारस्थानें समजतात. भोसलेबंधू हातघाईवर आले. निजामाचे सरदार रुक्नुद्दौला व धौसा यांस साबाजीनें आपल्या बाजूस वळविलें, तर एलिचपुरचा नबाब इस्मायलखान यास मुधोजीनें आपल्या पक्षास आणिलें. या वेळीं पेशव्याकडून बाळाजी पलांडे साबाजीच्या मदतीस आला होता. उभयबंधूंची पहिली जोराची टक्कर १७७३ च्या जानेवारींत बाळापुराजवळ कुंभारगांव येथें झाली. तींत मुधोजीचें सेनासाहेबाचें निशाण हत्तीवर होतें तें तुटून खालीं पडलें, आणि कुटुंबांतील जिजाजी भोसले मारला गेला. त्याच्या सुतकामध्यें लढाई थोडे दिवस तहकूब झाली; आणि उभयपक्षीं तडजोडीचे प्रयत्न सुरू झाले. अशा आपसांतील लढाईंत उगाच जीव देऊन नुकसान करून घेण्यास तयार नाहींत असे पुष्कळ इसम दोनही बाजूस होते. त्यांच्या मध्यस्थीनें पेशव्याचा वकील रामाजी बल्लाळ याचे मार्फत ता. २८ जानेवारी १७७३ रोजीं लेखी तडजोड झाली. त्याचे कागद व उभय बंधूंनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लिहून दिलेली कबुली ना. भो. का. ले. ३०–३२ चे मननीय असून, त्यांवरून तत्कालीन कौटुंबिक कलह व जनतेची भावना व्यक्त होतात. तडजोडींत ठरलें कीं, रघूजीस दर्याबाईनें दत्तक घेऊन तोच सरदारीस मालक समजावा; आणि तो वयांत येईपर्यंत मुधोजी व साबाजी दोघांनीं एकमेकांचे विचारें कारभार करावा. ही व्यवस्था अमलांत आणण्यास दहा असामी मध्यस्थ होऊन जामीन राहिले; आणि त्यांनीं व्यंकटराव काशी व लक्ष्मणराव काशी या दोन प्रभु गृहस्थांस रघूजीचे नांवें वस्त्रें आणण्यासाठीं पुण्यास पेशव्याकडे रवाना केलें. परंतु सलुखाच्या लेखाची शाई वाळते न वाळते, तोंच पुनः खटपटी सुरू होऊन सर्व प्रकरण फिसकटलें. दर्याबाईनें एकदम मुधोजीचा पक्ष स्वीकारिला, तेणेंकरून पुनरपि बिघाड चालू झाला. 'राजश्री मुधोजी भोसले व दर्याबाई एकत्र होऊन चांद्यास गेले. नागपुरीं देवाजीपंतास कैदेंतून काढून दिवाणगिरी देऊन कुटुंब सुद्धां त्यास बरोबर घेतलें. साबाजीची स्त्री नागपुरीं होती, त्यांची संपत्ति काढून घेतली. सावकारापासूनही शक्य तितकें घेतलें. त्यावर साबाजी, निजाम व पेशव्यांचा सरदार खंडेराव दरेकर चालून गेले. फौजा वर्धेवर आहेत. मुधोजी टाळा देऊन पुढें निघोन गेले. आपणच साबाजीस सेनासाहेब सुभ्याचीं वस्त्रें दिलीं, याजकरितां श्रीमंतांस अभिमान पडला आहे. आणखी तीन हजार फौज तिकडे जाण्यास ताकीद झाली आहे'. ही हकीकत ता. ७-५-१७७३रोजीं वामनराव पटवर्धन पुण्याहून मिरजेस लिहितो. एवंच दादाचे फितुरास जोर येऊं नये म्हणून मुधोजीचा पाडाव करणें नारायणरावास अवश्य वाटलें.

एलिचपुरचा नबाब मुधोजीस मिळाला म्हणून साबाजीनें प्रथम एलिचपुरावर चाल केली, (जुलई १७७३–खंड १०.८५). महिना पंधरा दिवस त्या बाजूस लढण्याचा निकर झाला. यापूर्वींच साबाजीनें आपला वकील भवानी शिवराम यास पेशव्याकडे पाठवून फौजेची मागणी केली, त्यावरून पेशव्यानें पंचवीस हजार फौज खंडेराव दरेकर याचे हाताखालीं ताबडतोब साबाजीचे मदतीस पाठविली. हा प्रकार दादास बिलकुल आवडला नाहीं. खंडेराव व साबाजी यांचा मिलाफ होण्यापूर्वींच साबाजीस गांठण्यासाठीं मुधोजीनें त्याजवर चाल केली. त्यांत निजामाचा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सरदार रुक्नुद्दौला एकटाच मुधोजीचे तावडींत सांपडला, तेव्हां त्यास मुधोजीनें अतिशय हैराण केलें. बाळकृष्णभट पटवर्धन म्हणून मुधोजीचा उपाध्या महाखटपटी होता, त्याचे मार्फत रुक्नुद्दौलानें मुधोजीशीं सख्य केलें. 'साबाजी व खंडेराव दरेकर मिळोन एलिचपुरास मोर्चे वसविले. ते मुधोजीनीं उधळून दहा तोफा घेतल्या. तेव्हां मुधोजीचें बळ वाढून बंधुबंधूंचें राजकारण लागलें. मनसब विनसल्यामुळें नारायणरावांस खेद वाटत आहे. उभय बंधु एकत्र होणार, तेव्हां साराच मनसबा विसकळित झाला. मुधोजीच्या उत्कर्षामुळें बापू वगैरे कारभारी संतोषी आहेत. गणेशचतुर्थीच्या (२१-८-१७७३) उत्सवामुळें आठ दिवस दरबार होत नाहीं'. अशा रीतीनें दादा व नारायणराव यांजमध्यें तेढ उत्पन्न होण्यास भोसले बंधूचें हें प्रकरण अप्रत्यक्षपणें कारण झालें. देवाजीपंताचें सुद्धां भोसल्यांच्या तर्फेनें बापूकडे अनुसंधान होतें. या वेळच्या व्यवहारांत बापूचें नांव येतें, नाना फडणिसाचें येत नाहीं, यावरून तो बहुधा कारभारांत नव्हता.

४. दादांच्या कैदेची सक्ति, (एप्रिल—ऑगस्ट १७७३).—मुधोजीचे दोघे सरदार बंधु व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी गुप्ते रघुजीचे नांव वस्त्रें घेण्यासाठीं पुण्यास आले होते हें वर सांगितलेंच आहे. ते मुधोजीच्या तर्फेनें पुण्यांत कसून प्रयत्न करूं लागले. त्या प्रयत्नांत यश न येऊन उलट नारायणरावानें खंडेराव दरेकरास साबाजीचे मदतीस पाठविलें, तेव्हां आतां पुढें काय करावें याचा खुलासा त्या बंधूंनीं मुधोजीकडे विचारला. तेव्हां मुधोजीनें त्यांस साफ लिहून पाठविलें कीं, 'आतां नारायणरावांची उपेक्षा करणें योग्य नाहीं. तुम्हीं कळेल तसें दादांशीं राजकारण करून बनेल त्या तऱ्हेनें आपली गोष्ट सिद्धीस न्यावी'. परंतु दादा अटकेंत असल्यामुळें त्याची भेट होण्यास मुष्कील पडूं लागली. तेव्हां दादाचे पक्षपाती सखाराम हरि वगैरे नारायणरावावर रुष्ट असलेले पाहून त्यांची भेट व्यंकटराव व लक्ष्मणराव यांनीं घेतली; आणि कांहीं तरी युक्ति योजून दादास बंदींतून सोडविण्याचा उपक्रम त्यांनीं सुरू केला. एके दिवशीं लक्ष्मणराव काशीचा हात धरून दादा शनिवारवाड्यांतून रात्रीं अंधेरांत बाहेर पडत असतां पाहरेकऱ्यांनीं ओळखून परत ठिकाणीं नेऊन घातलें. त्या गर्दींत लक्ष्मणराव काशी पळून जेजुरीजवळ कोथळ्यास गेला. हा प्रकार नारायणरावास कळतांच तपास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

केला. परंतु पत्ता लागला नाहीं. पण त्यापुढें दादाचा बंदोबस्त त्यानें फार सक्त केला. अर्घ्यप्रदान, देवपूजा, वगैरेसाठीं दालनाचे बाहेर उघड्यावर येण्याची सुद्धां बंदी करण्यांत आली. दररोज सूर्याकडे नजर लावून अनुष्ठान करण्याचा दादाचा रिवाज होता, त्यास अडचण येऊं लागली. ही तक्रार नारायणरावाकडे येतांच तो दादांस म्हणाला, 'कशाला हवींत हीं अनुष्ठानें तुम्हांला! या अनुष्ठानांनींच तुम्हीं माधवरायांस मारिलें'. असे मर्मी शब्द बोलल्याबरोबर चित्तक्षोभ होऊन दादानें अन्नग्रहण सोडून दिलें. नवऱ्याचें भोजन झाल्याशिवाय आनंदीबाईलाही भोजन करणें शक्य नव्हतें. अशा रीतीनें दोघांसही उपोषणें पडूं लागलीं. पूर्वीं माधवरावाचे वेळेस असे प्रकार वारंवार झालेलेच होते. परंतु चार समजुतीच्या गोष्टींनीं किंवा थोडें नमतें घेऊन माधवराव प्रकरण निकरावर येऊं देत नसे. तशी खुबी नारायणरावांत नव्हती. त्याच्या ताठर स्वभावानें या वेळीं प्रकरण चिडीस गेलें. त्यांतच व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी आपल्या हेतूच्या सिद्धतेसाठीं नारायणरावाच्या विरोधकांस सामील झाले. सखाराम हरि, चिंतो विठ्ठल, गंगाधर यशवंत, विसाजीपंत लेले, आबाजी महादेव सोहोनी यांचीं कारस्थानें पुण्यांत खेळूं लागलीं. त्यांचा वेळेवर तपास किंवा बंदोबस्त करण्यास कारभारांत नारायणरावाचा पक्षपाती कोणी नव्हता. म्हणून लगोलग बंदोबस्त झाला नाहीं. दादाचा त्रागा ही नेहमींच्या सरावांतलीच बाब होती. पुण्यांतील खटपटींवर साबाजीचेंही लक्ष होतेंच. त्यानें मुधोजीस निर्बल करण्यासाठीं भवानी शिवराम मार्फत 'सेनासाहेबसुभा' पदाचीं वस्त्रें आपल्या नांवें मागविलीं, तीं नारायणरावानें ता. १६-८-७३ रोजीं म्हणजे खुनापूर्वीं दोन आठवडे साबाजीकडे रवाना केलीं (भा. व. ३.). या योगानें व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी यांचे उद्योगास निराळें स्वरूप प्राप्त झालें, आणि पुढील भयंकर बनावाचा उद्भव पुढील दोन आठवड्यांत त्वरेनें झाला.

'थेउरापासून राजकारण चाललें', असा तुळ्या पवाराचे जबानींत एक महत्त्वाचा उल्लेख आहे. याचा अर्थ असा कीं, माधवराव थेउरास आजारी असतां दसऱ्याचे दिवशीं दादा कैदेंतून पळून तुळापुर पावेतों गेला, तेव्हां-पासूनच स्वतंत्र होण्याचा त्याचा बेत चालू होता. माधवरावाचे मरणानें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादाचा विरोध थोडा थंडावला; पण तो केवळ क्षणिक व दिखाऊ होता. नारायणरावाबरोबर वस्त्रें आणण्यास जाण्याची दादाची खुषी नव्हती. त्यानंतर दुर्गाबाईचें लग्न आटपून नारायणरावानें नाशकाहून येऊन ता. ११-४-७३ रोजीं दादास अटक करितांच कोणत्याही उपायानें पुतण्याचे जाचांतून कायमची सुटका करून घेण्याचे त्याचे विचार चालू झाले. माधवरावानें हळूहळू कारभाऱ्यांवर आपली छाप बसवून आपणास दडपून टाकिलें, तसा प्रकार नारायणरावाचे हातून होऊं देऊं नये, त्याची स्थिति विस्कळित आहे तोंच त्यास अटक करून आपण प्रधानकी मिळवावी, असें दादाचे मनानें घेतलें, आणि त्या उद्योगास तो लागला.

नारायणराव तापट व उद्दाम वृत्तीचा होता, तरी पहिल्या कारभाराची सर्व घडी एकदम बदलून, स्वतःच नवीन व्यवस्था त्यानें केल्याचें उदाहरण आढळत नाहीं. उलट तो सखारामबापूच्याच सल्ल्यानें सर्वथैव चालत होता. नाना फडणिसावर तरी विशेष भार टाकल्याचें दिसत नाहीं. बोथाट्या खेळतांना नानाचें पागोटें नारायणरावानें पाडल्याची आख्यायिका आहे. ती खरी असल्यास, ती नारायणरावाच्या लहानपणची असली पाहिजे. पेशवाई करूं लागल्यावर असले पोरकट खेळ त्यानें केले असें वाटत नाहीं. कर्नाटकांत वगैरे स्वतंत्र स्वाऱ्या करून माधवरावाप्रमाणें लौकिक मिळवावा अशी हाव त्यास वाटत असून, त्यासाठीं फौजा व पैसा जमविण्याचे उद्योगांत तो होता. उत्तरेंतील फौजा त्यानें परत बोलाविल्या, पण या वेळीं महादजी सिंदे पुण्यास आल्याचें आढळत नाहीं. विसाजी कृष्ण परत फिरला, पण तो नारायणरावाचे मृत्यूनंतर पुण्यास पोंचला; आणि त्यानें आणिलेला पैसा व जवाहीर आयतें दादाच्या उपयोगी पडलें.

म. सा. छो. ब.चा कर्ता म्हणतो, 'नारायणराव मातुश्रीच्या दर्शनास गेले. चार दिवस राहिले. मातुश्री बोलली कीं, वडिलांपाठीमागें कांहीं कीर्त कराल, कीं चुलत्यामागें पोट भरून राहल ? ते शब्द मनांत धरून निरोप घेऊन पुण्यास आले. दादांस सांगितलें कीं, आपण स्नानसंध्या करून स्वस्थ राहवें. आम्ही कारभाऱ्यांचे विचारें राज्य करितों. दादा उत्तम म्हणोन कारभार सोडून राहिले. पुढें कित्येक गैरमाहीत गोष्टी दादांकडे विचारावयास जात. दादा बोलत, तुम्ही व कारभारी कळेल तसें करावें.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

तेव्हां रागें भरून नारायणराव दरबारांत येत. तो राग धरून दादांकडे खर्चाची तंगचाई करूं लागले. त्यामुळें दादांस मोठी विपत्ति झाली. बापूंस बोलावून दादांनीं सांगितलें, आम्हांस विपत्ति होते याचा उपाय काय ? तेव्हां बापू व मोरोबादादा यांनीं रावांस समजावलें कीं, वडिलांस आनंदांत ठेवावें. तें न ऐकतां अधिक उत्तर करूं लागले. तेव्हां बापू व मोरोबादादा यांस आनंदीबाईनीं बोलावून सांगितलें कीं, आमचे हाल होतात, विपत्ति सोसवत नाहींत. आम्ही तिघें प्राण देतों. असा निश्चय पाहून बापू घरीं आले; आणि नाना फडणीस वेगळे करून सर्व मुत्सद्यांनीं विचार केला कीं, नारायणराव ऐकत नाहींत यांस धरावें'. हा उतारा मराठी साम्राज्याच्या छोट्या बखरींत व कित्येक जुन्या बाडांपैकीं आहे. हा मजकूर शब्दशः नसला तरी मतलबानें बराच खरा दिसतो. गंगापुराहून परत येतांच दादास अटक झाली. मात्र ती मातुश्रीचे शिकवणीनें झाली नसून, नारायणरावाचे पश्चात् दादानें फितुर केला म्हणून झाली. परत येतांच अटक झालेली पाहून लोकांस वाटलें ही मातुश्रीची शिकवण. दादाकडे कारभार ठेवूं नये, ते केव्हां दगा करतील नेम नाहीं. फंदफितुर करतील तर त्यांस अटकेंत ठेवावें, आणि माधवरावाप्रमाणें स्वतःचे अकलेनें कारभार करावा, असा सामान्य उपदेश मातुश्रीनें त्यास केला असावा. प्रथम साधी अटक होती. परंतु पुढें भोसले-हैदरांकडील फितुराचीं राजकारणें उघडकीस आल्यावर दादास मोकळेपणानें पूजाअर्चा करण्यास बंदी होतांच त्यानें उपोषणें व त्रागा सुरू केला. त्या वेळीं कांहीं मृदुपणा धारण करण्याबद्दल कारभाऱ्यांनीं नारायणरावास सांगितलें असतां, तें त्यानें मानलें नाहीं, तेव्हां आनंदीबाईच्या आग्रहास्तव कारभाऱ्यांसही कांहीं तरी तोड काढणें जरूर पडलें. सखाराम बापू बरोबर मोरोबाचें नांव आहे, नाना फडणिसाचें नांव कोठेंच नाहीं. तो गंगापुरासही नारायणरावाबरोबर असल्याचा उल्लेख नाहीं. पुढें कारभारांतही फारसा नाहीं. नाना घरीं बसून उदासीन राहिल्यामुळें त्यास वगळणें इतरांस शक्य झालें. डफ म्हणतो, कीं नारायणराव बहुतेक हरिपंत फडके व बजाबा पुरंदरे यांच्या तंत्रानें चालत होता. नानाची वरील उदासीनता खुनानंतरही सुमारें तीन महिने कायम होती. बहुधा सखारामबापूपुढें आपलें तेज पडत नाहीं, आणि

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

धन्याचा पाठिंबा नाहीं असें पाहून नाना अलिप्त राहिला असावा. यामुळेंच पुढील बनाव शक्य झाला. नाना कारभारांत जागृत असता तर खूनच झाला नसता असा माझा तर्क आहे. हे प्रकार श्रावणअखेर चालले.

ता. १६ ऑगस्ट रोजीं साबाजीस वस्त्रें दिल्यापासून पुढें एकंदर प्रकरणाचा बनाव चलच्चित्रपटांतील देखाव्याप्रमाणें त्वरेनें उलगडूं लागला. नारायणरावानें केलेली अटक दुःसह होऊन दादाच्या मनानें घेतलें, कीं आपणच नारायणरावास अटकेंत ठेवून कारभार करावा. उलट पक्षीं दादांच्या सर्व हालचाली बंद पाडून त्यास बाहेर कोणतेंही सूत्र हालवितां येऊं नये, असा बंदोबस्त नारायणरावानें चालविला. पूजा, भोजन, स्नान, निजणें, बसणें वगैरेच्या सर्व सोयी दादास द्यावयाच्या, म्हणजे अर्थात् कारकून, शागिर्द, पाणके, आचारी वगैरे लोकांचा संचार दादाकडे चालू ठेवणें जरूर होतें. हे लोक बंद केलें कीं दादाच्या सुखास व्यत्यय आला. पूर्वीं माधवरावाच्या वेळेस नाना फडणिसानें अशा सर्व नोकरचाकरांवर योग्य देखरेख ठेवून दादास तोसीस न होतां त्याजवर सक्त नजर ठेविली, तसा प्रकार या वेळीं होऊं शकला नाहीं.

चाललेल्या कारस्थानांत प्रभूंच्या ग्रामण्यप्रकरणाची एक नवीन भर पडली. प्रभु ज्ञातीचे लोक क्षत्रिय धर्मानुसार वेदोक्त कर्मे करीत. तीं बंद करण्यासंबंधानें वेळोवेळीं ब्राह्मणांनीं राज्यकर्त्यांपुढें फिर्यादी आणल्याचीं उदाहरणें मराठशाहींत वारंवार घडलीं आहेत. शिवाजीपासून नानासाहेब पेशव्यापावेतों प्रभूंना वेदोक्त कर्म करण्याचा अटकाव झाला नाहीं. हा अटकाव करणें म्हणजे प्रभूंस शूद्र समजणें असा अर्थ होऊन, समाजांत त्यांचा दर्जा हलका ठरल्यानें ते चिडून जात. नारायणराव पेशव्याचे वेळेस ब्राह्मण मंडळींनीं पुन्हा उचल खाऊन प्रभूंस विशेष दुखविलें. ते शूद्र आहेत इतकें ठरवूनच स्वस्थ न बसतां, त्यांच्या पुढाऱ्यांकडून नऊ कलमांची यादी, म्हणजे त्यांत दर्शविलेलीं नऊ कृत्यें आपण करणार नाहीं अशा मतलबाची, लिहून घेतली. याचा अर्थ शूद्रत्वाची कबूली होय. या कबुलीवर रामराव जिवाजी चिटणीस, विठ्ठल यशवंत पोतनीस, सखाराम हरि वगैरे सोळा प्रमुखांच्या सह्या आहेत. या सह्या आपण आपखुशीनें दिल्या नसून, उपाशीं कोंडून ठेवून जबरदस्तीनें घेतल्या, असें प्रभूंचें म्हणणें होतें. कांहीं असलें तरी चाललेल्या वहिवाटींत नवीन फेरफार करून लोक-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

क्षोभ उत्पन्न करण्याचें नारायणरावास कांहीं प्रयोजन नव्हतें. अद्यापि त्याचा जम बसला नसून लोकांत वजन किंवा प्रतिष्ठा त्यास आली नव्हती. म्हणून सखाराम हरीसारखे दादाचे पक्षपाती गृहस्थ नारायणरावाचे विरुद्ध चाललेल्या मसलतींत सामील झाले, आणि कटाचा फैलाव होत असतां, त्याचे बचावाची भावना लोकांत आली नाहीं.

५. कटाची उभारणी, (ऑगस्ट ता. १६–३०, सन १७७३).—चैत्रांत दादास अटक झाली; आणि जसजसे जास्त फितूर उघडकीस आले तसतशी ती अटक सक्त होऊन दोन महिने त्याचे फार हाल होऊं लागले. सालाबादप्रमाणें श्रावण शुद्ध ६ (ता. २५ जुलई) पावेतो श्रावण मासदक्षणा पर्वतीवरील रमण्यांत व वाड्यांत रु. ५०५४४५ वांटण्यांत आली, (ऐ. टि. ४-३०). त्यानंतर श्रावणअखेर कलहाचें स्वरूप भीषण होऊं लागलें. पेशव्यांचे घरांतील मोठा वार्षिक उत्सव गणेशचतुर्थीचा असून दहा दिवस समारंभ चाले, त्या वेळीं सरकारी काम बंद असून, दररोज पूजा, आरत्या, भजन, कीर्तनें, मंत्रजागर, गाणीं, नाच, दरबार, पानसुपाऱ्या, ब्राह्मणभोजनें, पालखीच्या मिरवणुकी वगैरे कार्यक्रम पूर्वपरंपरेनें भरपूर ठरलेला असून, त्यांत सर्व कारभारी व नोकर गुंतलेले असत. सन १७७३ त गणेशचतुर्थी शनिवार २१ ऑगस्ट रोजीं व अनंतचतुर्दशी मंगळवार ३१ ऑगस्ट रोजीं झाली. नारायणरावाचा वध सोमवार ३० ऑगस्ट रोजीं तिसरे प्रहरीं झाला. ह्या कालनिर्देशावरून त्या वेळची परिस्थिति लक्षांत येईल. शनिवारवाड्याची रचना म्हणजे महाद्वार, दालनें, चौक, जिने, भोजनाच्या व गाईच्या जागा ह्यांचा चित्रपट आज आपल्या डोळ्यांसमोर नाहीं. ही सर्व तपशील नीट समजण्यास मोठी उणीव आहे.

व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी या आपल्या वकिलांस मुधोजीनें आपल्या कार्यभागासाठीं निकड लाविली, त्यावरून त्यांनींही जोराची खटपट चालविली; त्यांतच प्रभु मंडळींच्या ग्रामण्यप्रकरणाची भर पडली. सखाराम हरि, आबाजी महादेव, चिंतो विठ्ठल, शिवाजी कान्हो, सदाशिव रामचंद्र, हैदराचा वकील आपाजिराम वगैरे गृहस्थ आपआपल्या मतलबासाठीं पूर्णपणें दादाचे पक्षांत होते. गारद्यांचें मन दादाचा हुजऱ्या तुळ्या पवार यानें अजमावून पाहिलें. पुरेसा पैका पदरांत ओतला म्हणजे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हे गार्दी, सांगावी ती गोष्ट करितील ही कल्पना तुळ्यानें सुचविली. तुळ्या महाखटपटी व हिंमतवान् होता. म्हणूनच नारायणरावाचा त्याजवर मोठा डोळा होता. त्यास नारायणरावानें चाबकानें मारल्याची आख्यायिका आहे. ती खरी असेल तर, त्याचें मन सुडाच्या कल्पनेनें पक्कें पिछाडलें होतें. निरनिराळ्या मंडळींशीं अंतस्थ वाटाघाट करण्याचें व गार्द्यांस फितविण्याचें काम तुळ्या पवारानें केलें. कारण तुळ्याशिवाय दुसरे कोणी आंत जाऊन दादास भेटत असतील हें संभवनीय नाहीं. दादा व आनंदीबाई यांस भेटून आंतले बेत बाहेर व बाहेरचे आंत कळविणें हें काम तुळ्यानें केलेलें दिसतें. अशा रीतीनें प्रथम नारायणरावास पकडून बंदींत घालण्याचा व दादास सोडवून बाहेर आणण्याचा बेत सिद्ध झाला. पुढें दादानें सखाराम-बापूचें मन अजमावून पाहिलें. छातीनें आंत पडून पुढाकार घेण्याची हिंमत बापूस नव्हती. त्याचें अंतःकरण नारायणरावाचे विरुद्ध असून, बाहेर दिसूं न देतां परभारें कार्यभाग उरकत असल्यास तो अटकावण्याचें धाडसही बापूस नव्हतें. त्याच्यासारखीच मुग्ध वृत्ति मोरोबादादाची होती. 'सुमेरसिंग महमद इसफ, बहादुरखान व खरकसिंग यांस कारभाऱ्यांनीं (म्हणजे बापू व मोरोबांनीं) बोलावून सांगितलें कीं, दादांचे प्राणांवर गोष्ट आहे. तुम्ही चौघे चहूं हजारांनिशीं आहांत. तर रावांस धरावें. सुमेरसिंग बोलला. ही निमकहरामी मसलत सिद्धीस गेली तर ठीक, नाहीं तर राव गादीचा धनी, काय करील न कळे. तेव्हां गारदी यांनीं पैक्याची आशा केली. तीन लक्षांचा करार लिहून कारभाऱ्यांनीं दिला कीं नारायणरावास धरावें. ती चिठी गारदी दादांकडे घेऊन आले. दादांनीं स्वदस्तुर पुरी करून दिली. ती चिठी आनंदीबाईनीं पाहिली. त्यांत 'धरावें' होतें, त्या ठिकाणीं 'मारावें' केलें'. हा बखरींतला उल्लेख विशेष महत्त्वाचा आहे. यांत कारभाऱ्यांनीं कटाची उभारणी केल्याचें लिहिलें आहे. पुढें कांहीं वर्षांनीं बापू व मोरोबा यांस नाना फडणिसानें कैद दाखविली, त्याचीं कारणें त्या वेळचे दुसरे फितूर असले तरी त्याच्या मुळाशीं नारायणरावाच्या या कटांत ते सामील असल्याची गोष्ट नाना व हरिपंत फडके यांचे मनांत सारखी डांचत होती. तुळ्या पवाराची जबानी छापलेली आहे, तींत तो कटाची उभारणी महंमद इसफचे अंगावर टाकतो. 'तो म्हणतो, मी महंमद इसफचे घरीं हमेशा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बसण्यास जात होतों. त्यानें मजपासून वचन घेतलें कीं, आम्ही रायांस कैद करून दादांस बाहेर काढावयाची मसलत केली आहे. मी बोललों, मी या कामांत पडत नाहीं. तेव्हां तो गळां पडोन बोलला, दादाही बाजीरावाचाच लेक आहे. या मसलतींत आणखी बहुत जण आहेत. त्यांचीं नांवें त्यानें सांगितलीं. त्यांत वर सांगितल्या नांवाखेरीज भवानराव प्रतिनिधि, गोविंदराव गायकवाड, छट्टू फरास वगैरे आणखी कित्येक आहेत. एकंदर सतरा आसामींचीं नांवें महंमद इसफनें सांगितलीं. पुण्यांतील काम तुळ्या पवारानें अंगावर घेतलें होतें'. नागपुरबखरींत मजकूर आहे कीं, 'लक्ष्मणराव काशीनें गारद्यांचे तिघां अंमलदारांस तीन लक्ष रुपयांची चिठी दादाचे खास दस्तुरची आणून देऊन रायास धरावें असा विचार केला. नारायणरावानें खंडेराव दरेकरास साबाजीचे मदतीस पाठविलें, तेव्हां मुधोजीनें पुण्यास आपल्या वकिलास सूचना पाठविली कीं, तुम्ही दादांची भेट घेऊन खास दस्तुरचीं शिक्क्याचीं पत्रें आमचे नांवचीं आणलीं, कीं सांगावें सर्व प्रकारें तुमचाच अभिमान आहे. अशीं दोन चार पत्रें आलीं. चौक्या पहारे असतां लक्ष्मणराव काशीनीं आंत प्रवेश करून खबर काढून राहिले. नंतर गारद्यांचा दंगा होऊन कार्य झालें'. यावरून मुधोजी व त्याचे वकिलांची खटपट पुढील कृत्यास पोषक झाली. यामुळें या प्रकरणांत प्रभूंचें नांव गोवलें गेलें.

खून करण्याची प्रवृत्ति मराठशाहींत सहसा आढळत नाहीं; आणि नारायणरावास तरी मारावें असा विचार दादाचे किंवा कटवाल्यांचे मनांत आरंभीं मुळींच नव्हता. पहिली खटपट नारायणरावास अटक करून दादास कारभार द्यावा एवढीच होती; आणि तसाच लेखी हुकूम दादानें दिला होता. त्या हुकमांत 'ध' चा 'मा' केला गेला यांत संशय नाहीं. रामशास्त्री यानें तपास केला तेव्हां ही चिठी त्यास सांपडली, तींत 'ध' चा 'मा' केलेला होता. प्रत्यक्ष आनंदीबाईलाही 'ध' चा 'मा' केला गेला हें कबूल असून, ती पुढें आपल्या पत्रांत इतकेंच विचारते, कीं 'ध' चा 'मा' कोणीं केला याचा तपास न करितां तो माझ्या अंगीं उगाच कां लावतां ? गार्द्यांनीं जेव्हां नारायणरावास धरण्याचें काम स्वीकारलें, तेव्हां तें करितांना जर नारायणरावास दगा झाला, तर आपण आम्हांस बोल लावूं नये, असें त्यांनीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

दादापासून सोडवून घेतलें होतें. कारण नारायणराव तरी आपण होऊन थोडाच त्यांचे हातीं लागणार होता! तोही बचावासाठीं शस्त्र घेऊं लागल्यास आयत्या वेळीं काय होईल कोणीं सांगावें! अशासाठीं गारद्यांचे पुढाऱ्यांनीं आपली बाजू आगाऊच सोडवून घेतली होती. गुन्हेगार पकडून पुढें सुमारें पन्नास इसमांस शिक्षा देण्यांत आल्या, त्यांची नांवनिशी उपलब्ध आहे. त्यावरून कट कोणीं कसा उभारला हें स्पष्ट होतें. या बाबतींत डफची हकीकत मुद्देसूद दिसते, ती अशीः—खुनाचे दुसरे दिवशीं कारभारी मंडळींनीं जमून असें ठरविलें कीं, जोंपर्यंत खुनांत दादाचें अंग आहे असें सिद्ध झालें नाहीं, तोंपर्यंत त्याचाच हक्क पेशवाईवर समजावा. या मंडळींत रामशास्त्रीही हजर होता. त्यानें त्या वेळीं वरील ठरावास हरकत घेतली नाहीं. मात्र घडलेल्या बनावाचा तपास त्यानें लगोलग मोठ्या कसोसीनें केला. सुमारें दीड महिन्यानें तपास पुरा झाल्यावर शास्त्रीबुवानें दादास भेटून पुरावा त्याचे पदरांत बांधिला, त्या वेळीं दादा शास्त्रीबुवास म्हणाला, रावास धरण्याचा हुकूम मीं सुमेरसिंग व महंमद इसफ यांस दिला खरा, पण त्यास मारण्याचा हुकूम कांहीं मीं दिला नव्हता. पण चिठ्ठींत 'ध' चा 'मा' केलेला दादास दाखविण्यांत आला; आणि हें कृत्य आनंदीबाईचेंच होय, असा त्या वेळीं सर्व जाणत्या मंडळींचा अभिप्राय होता. नारायणरावास दादानें गारद्यांचे हातीं जाऊं दिलें, यावरून हूकुमांत 'ध' चा 'मा' केला गेला आहे ही गोष्ट दादास चांगली ठाऊक असावी. मात्र पहिला उद्देश मारण्याचा नव्हता असें लोकमत त्या वेळींही होतें. कैदेच्या हालांनीं व आनंदीबाईच्या चिथवणीनें दादा अत्यंत चिडून गेला असतां, आनंदीबाईनें तुळ्या पवारास हाताशीं घेऊन प्रकरण सिद्ध केलें, तेणेंकरून खून घडून आला, अशी शास्त्रीबुवाच्या तपासाची हकीकत डफ देतो. रामशास्त्री यानें तपासांत दिसून आलेली हकीकत दादास कळविल्यावर दादानें यास शिक्षा काय म्हणून विचारिलें, त्या वेळीं 'देहान्तप्रायश्चित्त', असा जबाब दादास देऊन शास्त्री नोकरी सोडून चालता झाला. खुनानंतर दोन महिनेपर्यंत सर्वांनीं दादाची हुकमत पाळून नेहमींप्रमाणें उद्योग चालविले, परंतु तपासांत दादाचें अंग दिसल्यावर मग कारभारी मंडळी स्वतंत्र कारस्थान रचून दादास दूर करण्याच्या उद्योगास लागली. खून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

झाल्याबरोबर लगेच त्यास त्यांनीं विरोध दाखविला नाहीं, हें ध्यानांत ठेविलें असतां कटाची मुख्य जबाबदारी दादावरच येते.

यासंबंधांत दादाची जबानीही उपलब्ध आहे. ता. ११-१२-१७८३ रोजीं दादा मरण पावला, त्यापूर्वी थोडे महिने गोपिकाबाईचें दर्शन घेण्याची त्यास इच्छा झाली. तिनें कळविलें कीं, कृतापराधाचा उच्चार करून प्रायश्चित्त घ्याल तरच मी तुमची भेट घेईन. त्यावरून ता. १३-७-१७८३ रोजीं तो म्हणाला, 'मातुश्री वडील आणि खावंद. त्यांची आज्ञा दुर्लंघ्य. त्यापक्षीं प्रायश्चित्तही करितों, आणि तसा थोडकासा प्रमादही घडला आहे. तो कसा म्हणून विचारल्यावर दादांनीं उत्तर केलें. मी निखालस झालों, त्यापक्षीं लपवीत नाहीं. रायास धरावें असा निश्चय राजकारण करणारांशीं केला. ते समयीं त्यांनीं विचारिलें, न जाणों, धरू जातां कलागत पडली आणि त्यांत मारले गेले तर दोष ठेवूं नये. असें सोडवून घेऊन ते कर्मास प्रवर्तले. ते समयीं त्यांनीं येऊन कमरेस मिठी घातली, तेव्हां गलबल झाली. फुरसत पडूं पावली नाहीं. दोहींकडे हात लावून निवारण करतों, इतक्यांत घात करणारांनीं आपल्या जिवाच्या बचावास्तव हात टाकिला. तो प्रथमच पुरा बसला. तेव्हां धरण्याचे संकल्पांत कलागती पडून मारला गेला, एवढेंच सांप्रत प्रायश्चित्तास कारण वाजवी आहे'. दादाचें बोलणें लिहून पाठविणारा कारकून लिहितो, 'आपले दोष झांकून गुण दाखवावे असा श्रीमंतांचा भाव नाहीं. विस्तारें बोलणें होऊन भवति न भवति झाली. सखारामपंतादि सर्वांचे गुणदोष बोलण्यांत बहुत आले. गुर्मी न दाखवितां सरळ स्वच्छ चित्त दाखवून विश्वासानें बोलतात. मोहोरा क्रूरतेचा नाहीं. मुखावर ग्लान असते. अगदीं गरिबीनें भाषण करितात. पश्चात्ताप पुरता झालासा वाटतो. गुह्य दोष होता तो आपले मुखें उच्चारून मातुश्री सांगतील त्याप्रमाणें प्रायश्चित्त करूं म्हणतात. आनंदीबाईचे बोलण्यांतही असेंच आलें, कीं मातुश्री सांगतील तशी खातरजमा करावी. मात्र बाईचें बोलणें ठास पडतें, तसें यांचें नाहीं'. पुढें हें प्रायश्चित्त ता. ६-८-१७८३ रोजीं दारणेच्या कांठीं सांगवी येथें झालें. 'उच्चार करावयाच्या संकल्पाचा मसुदा पाहून दादांनीं दिक्कत घेतली कीं, दोषाहून उच्चार फार. परंतु दहा पांच सुज्ञ ब्राह्मणांनीं अनुमोदन देऊन असाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उच्चार असावा असें सांगितल्यावर श्रीमंतांनीं मान्य केलें; आणि सर्वांचे संशय दूर करून शुद्ध व्हावें असें मनांत आणून, प्रायश्चित्त घेतलें. प्रसन्न चित्तें गंगातीरीं जाऊन दहा पांच ब्राह्मणांचा समुदाय समीप मिळवून संकल्प केला. मीं जवळ उभें राहून पाहिलें. एक वेळ उच्चार स्वमुखें स्पष्ट केला'. यावरून या एकंदर प्रकरणाचा मुख्य उत्पादक व गुन्हेगार स्वतः दादाच होय. मुद्दाम नारायणरावास मारण्याचीच जरी त्याची इच्छा नव्हती, तरी परभारें निकाल लागेल तर तें त्यास नको होतें असें नाहीं. दादानें एकंदर प्रकरण सिद्ध करून शक्य तितका अंग बचावण्याचा उद्योग केला.

महंमद इसफ आपल्या जबानींत सांगतो, 'प्रथम मनसुबा दादांस काढून न्यावें आणि रावांस कैद करावें. यांत प्रथम शिरोप्रस्थ शिवाजी कान्हो. नानाफडणीस, त्रिंबकराव मामा व हरिपंत फडके या तिघांस मात्र कांहीं ठाऊक नाहीं; बरकडांस ठाऊक होतें. मोरोबादादाच्या घरच्या सतराशें पुतळ्या व सदाशिव रामचंद्राकडील दीडहजार मोहोरा मजला शिवाजी कान्होनें आणून दिल्या. मालोजी घोरपडे माझे घरीं एक वेळ आले होते. त्यांचें बोलणें दादांस काढून न्यावें इतकेंच. याशिवाय शिष्य व कुणबिणी माझे घरीं येत असत. वरील दोघांकडून मजकडे आलेला ऐवज गारद्यांस पावला आहे. बजाबा पुरंदरे यांत होता काय असें विचारतां इसफ म्हणाला, माझी व बजाबाची भेट झालेली नाहीं. शिवाजी कान्हो सर्वांचीं नांवें घेत होता. आबाजी महादेव पुण्यास येऊन मोरोबादादास भेटून रात्रींचा गेला. श्रीमंतांस मारावें हें मत कोणाचें नव्हतें. आयते वेळेस सुमेरसिंगानें केलें'. महंमद इसफ खुनानंतर मुधोजी भोसल्याजवळ नोकरीस राहिला. पुढें मुधोजी व नाना फडणीस यांचें सख्य झाल्यावर ता. ३१-५-१७७५ रोजीं महंमद इसफ यास नानानें पकडून देशीं आणिलें, त्यानंतर लवकरच वरील जबानी घेतली असली पाहिजे.

'ध'चा 'मा' करण्यांत तिघांचा उल्लेख येतो. एक आनंदीबाई, दुसरा तिचा दत्तक मुलगा साडेआठ वर्षांचा अमृतराव, आणि तिसरा आबाजी महादेव. पैकीं आनंदीबाईला प्रकरण ठाऊक असलें तरी स्वतः तिनें हें काम केलें नसावें, आणि अमृतरावासारख्या अल्पवयी मुलाकडूनही तें तिनें केलें नसावें. दोघां मुख्य यजमानांपैकीं कोणाच्या तरी संमतीनें अगर माहितीनें हें

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

काम तुळ्या पवार, शिवाजी कान्हो, किंवा आबाजी महादेव यांपैकीं एकानें अगर सर्वांनीं संगनमतानें केलें असलें पाहिजे. कदाचित् गारद्यांनींही आपल्या बचावाकरितां तें केलें असणें शक्य आहे. खून होऊन दादाचा कारभार सुरू झाल्यावर; आनंदवल्लीस लक्षभोजन आरंभिलेलें पाहून गोपिकाबाईस काय वाटलें असेल याची कल्पनाच करावी. ती म्हणते, 'मी दुःखी झालें. तेव्हांपासून पंचवटीस मठांत वास केला. चार घरची भिक्षा आणून उदर पोषण केलें'. लक्षभोजनाचा प्रकार दादानेंच श्रद्धाळुपणें चालू केला असावा. पंधरा दिवस कट घाटत होता. तुळ्या पवार, दासी वगैरे आंत बाहेर जात येत होत्या. पुण्यांत बहुतेक ठळक व्यक्तींना काय प्रकार चालला आहे याची गुणगुण होती; आणि निकटवर्ती आनंदीबाईस मात्र यांतलें कांहीं एक ठाऊक नाहीं हें संभवत नाहीं. प्रायश्चित्ताचे निमित्तानें दादाची जबानी घेण्यांत आली. तशी नानाफडणिसानें आनंदीबाईचीही जबानी मिळविण्याचा प्रयत्न केला. त्या वेळचे बाईचे शब्द आहेत ते असे, 'माझी ममता विशेष म्हणून नारायणरावाचे गर्दीचा मजकूर यजमान मला सांगत नव्हते. 'ध' चा 'मा' कोणीं केला, याची चौकशी किमर्थ न केली! माझा दस्तऐवज किंवा निरोप कांहीं एक न निवडतां आम्हांस पेंचांत ठेविलें'. म्हणजे या प्रकरणांत आपलें अंग बिलकूल नाहीं असें आनंदीबाई प्रतिपादिते. नानास तिचे विरुद्ध पुरावा सांपडला नाहीं, आणि पकडलेल्या इसमांपैकीं कोणींही तिचें नांव घेतलें नाहीं. आनंदीबाईनें दुष्टावा करून नवऱ्यास व तुळ्या पवारास विशेष चिथविलें असें डफ सांगतो. भर दोनप्रहरीं हजारों माणसें वाड्यांत घुसून दहापांच मुर्दे पाडितात, यावरून तिला हा प्रकार माहीत नव्हता असें म्हणवत नाहीं. हरिवंशाची बखर म्हणजे पुरुषोत्तराव दाजी पटवर्धन यानें आपल्या हयातींत केलेल्या व प्रत्यक्ष पाहिलेल्या गोष्टींची हकीकत आहे. हा गृहस्थ सवाईमाधवरावाच्या निगेस मुद्दाम ठेवलेला असून, लहानमोठे बायका-पुरुष व नोकरचाकर वगैरेंच्या नेहमींच्या बोलण्यांतल्या व प्रत्यक्ष परिचयाच्या त्यानें सांगितलेल्या हकीकती यांत भरपूर आहेत. बखरकार म्हणतो, 'फितुर जाला जे, यांस कैद करावें. त्यास सुमेरसिंग व खरकसिंग यांस सांगितलें, तुम्ही नारायणरावांस धरावें. म्हणजे तुम्हांस बक्षिस व गाम इनाम मिळतील. त्यांनीं उत्तर केलें, दस्तऐवज करून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

द्या. तेव्हां दादांनीं दस्तैवज करून दिला, जे नारायणरावांस धरावें. तों आनंदीबाईनें गाड्यांस बोलावून सांगितलें, 'धरलें असतां कांहीं लोक इकडे कांहीं तिकडे असें राजकारण उभें राहील. त्यास मारून टाकावें हेंच बरें, म्हणजे एकछत्री राज्य जाहलें'. गाडदी म्हणाले, धरावें असें लिहून दिलें असतां, मारावें कसें?' तेव्हां बाईनीं कागद आणवून 'ध' चा 'मा' केला'. असा हा त्या वेळचा आंतबाहेर सार्वत्रिक समज होता.

६. शनिवारवाड्यांतील खुनांचा प्रळय, (सोम. ३०-८-१७७३).—रघूजी आंगरे पुण्यास येऊन पर्वतीचे बाजूस उतरला होता, त्यास सोमवार, ता. ३० ऑगस्ट रोजीं सकाळीं त्याचे मुक्कामावर भेटण्यासाठीं नारायराव गेला असतां, कटाची गुणगूण त्यास रघूजीनें कळवून सावध राहण्याविषयीं बजाविलें. तेथून नारायणराव भोजनास पर्वतीवर गेला. तेथें गणपतिउत्सवानिमित्तानें चिंचवडचे देव व तिमय्याबावाचे लेक हरिभक्तबावा यांच्या पंक्तीस दोन प्रहरीं केशरीभाताचें भोजन करून लगेच तो परत वाड्यांत आला. हरिपंत फडके बरोबर होता. परत येतांना गारद्यांनीं गडबड चालविली आहे; सबब वाड्यांत न जातां बाहेरूनच बंदोबस्त करावा. तसें न करितां हरिपंतास बंदोबस्त करण्यास सांगून नारायणराव वामकुक्षीसाठीं वाड्यांत गेला. हरिपंतास त्या दिवशीं रंगो कोन्हेरच्या घरीं भोजनास जावयाचें असल्यामुळें भोजनोत्तर गारद्यांचा बंदोबस्त करण्याचें ठरवून हरिपंत निघून गेला. आजपावेतों असे कट अनेक उघडकीस आले असल्यामुळें लगोलग बंदोबस्ताची जरूर हरिपंतास वाटली नाहीं; आणि कट झाला असला तरी खुनापर्यंत मजल येईल अशी कोणाचीही अटकळ नव्हती. इकडे नारायणरावाच्या हालचालींवर तुळ्या पवाराची नजर होती. हरिपंत व राव यांचें रस्त्यांत बोलणें झालेलें त्यास कळलें. बातमी बाहेर फुटली आहे, आतां विलंब झाल्यास हरिपंत येऊन सर्वांचें सडकून पारिपत्य करील, असें समजून तुळ्यानें गारद्यांस त्वरा करण्याची सूचना दिली. गारदी तयारींतच होते. नारायणराव निजावयास जाऊन घटका अर्धी घटका झाली नाहीं, तोंच सुमेरसिंग व महंमद इसफ सातआठशें गारदी घेऊन दरवाज्यावर आला. तेथें बुधसिंग जमादारानें त्यास अडविलें, तेव्हां त्यास ठार मारून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कज्या करून चोपाचोप करीत आंत शिरले. आबाजीपंत दरवाजा लावण्यास पुढें गेला तेव्हां त्यासही त्यांनीं ठार मारिलें. आंत जाऊन चौकांत त्यांनीं पगाराची वगैरे गर्दी केली. खाजगीकडील कारकून इच्छारामपंत ढेरे पुढें होऊन गारद्यांस दबकावून बोलूं लागला, 'कचेरीच्या वेळेस पगार मागा, आतां यजमान निजले असतां गलगा करण्याचें कारण नाहीं'. हें ऐकतांच ते इच्छारामपंताचे अंगावर धावले. तो पळून जवळच गाय होती तिचे आड लपला, तेव्हां गाईसकट त्यांनीं इच्छारामपंतास ठार केलें; आणि कोटाचे दरवाजे बंद करून आरडाओरड करीत वाड्यांत शिरले. देवघर आदिकरून भरून गेलें. कांहीं नारायणरावाचे महालाकडे चालले. नारायणरावाजवळ कोणी माणूस नव्हतें. एक दोन पुर्भय्ये होते ते पळून गेले. शागीर्दांनीं रायांस गडबडीची वर्दी देतांच तो धांदलीनें उठून आंतल्या कोठीच्या जिन्यानें खालीं पार्वतीबाईकडे आला. ती म्हणाली, माझ्या हातून तुझा बचाव कसा होईल, सर्व कृत्य चुलत्याचें आहे, त्यांजकडे जा, ते वाचवितील. त्यावरून दादा दिवाणखान्यांत होते त्याजकडे गेले. 'मला वांचवा' म्हणून दादाचे गळ्यांत मिठी घातली. त्याचे मागोमागच सुमेरसिंग त्यास शोधीत आडवीं आलेलीं माणसें तोडीत दादाकडे आला, आणि रावांस सोडा, नाहीं तर दोघांचेही जीव जातील' असें बोलला. नारायणरावानें चुलत्याची पुष्कळ काकळूत चालविली. तुम्हीच सर्व राज्य करा, मला पाहिजे तेथें बंदींत ठेवा, असें परोपरी विनविलें. परंतु विचार करण्यास किंवा बोलण्यास अवकाश राहिला नाहीं. दादानें सुमेरसिंगास दूर होण्यास सांगितलें. त्यावर सुमेरसिंग म्हणाला, सापास दुखवून सोडिलें तर तो आमचाच प्राण घेण्यास सोडणार नाहीं, रावांस सोडून द्या. तेव्हां दादानें लोटून दिला. तुळ्या पवार भेदलेला गारद्यांबरोबर होताच, त्यानें नारायणरावाचा पाय धरून ओढिलें, त्याबरोबर दादांची मिठी सुटली, आणि सुमेरसिंगानें वार टाकिला. इतक्यांत पूर्वीं माधवरावाजवळ वागलेला हुजऱ्या चापाजी टिळेकर हल्लीं नारायणरावाकडे होता तो व गवई नारोबा फाटक रावास बचावण्यासाठीं धावले. त्यांसकट त्यांनीं नारायणरावास जागच्या जागीं तोडून टाकिलें. दादांनीं हात पुढें केला असतां, त्यांचे हातास व पागोट्याचे पेंच तुटून डोईस हलक्या जखमा लागल्या. यानंतर

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जासुदांचा जमादार नारोजी नाईक दादाची निर्भर्त्सना करून विधीबद्दल बोलूं लागला, तेव्हां त्यासही गारद्यांनीं ठार केलें. एकंदर ब्राह्मण असामी सात, एक हुजऱ्या, एक नाईक, दोन कुणबिणी व एक गाय इतकीं ठार झालीं. या संबंधानें खुनी इसमास शिक्षा व मदतगारांस बक्षिसें देण्याचा क्रम पुढें दहा पांच वर्षें चालला, त्यांच्या उल्लेखांतून या बनावाचे कांहीं तपशील सांपडतात.

त्या वेळच्या एका पत्रांत थोडा भिन्न मजकूर विचारार्ह आहे तो असा. 'गाडदी वर येऊं लागले हें वर्तमान शागीर्द चार पांच जवळ होते त्यांनीं रावसाहेबांस कळविलें. त्याबरोबर हातचा निमचा घेऊन दादांकडे नाटकशाळेंत जाऊन त्यांस गांठलें आणि बोलिले जे, तुमचे गाडदी वाड्यांत शिरले. तुम्हीं आपला जीव सांभाळणें, म्हणून तरवार उपसली. दादांनीं मिठी घालून हात धरतांच काकुळतीस आले. बोलले जीव वांचवणें. इतक्यांत गाड्यांनीं पाठलाग करून वार केला, ते समयीं दादांनीं पोटाशीं घेतलें. परंतु गाडदी कह्यांत न राहतां पाय धरून ओढून कचाकच वार केले. तेथेंच मुडदा पडला. गडबडींत दादांस कपाळावर व डावे हातावर दोन जखमा लागल्या. शव तीन प्रहर रात्रीस दहा पांच ब्राह्मण व मशाल बरोबर देऊन दहन करविलें. दिवस उगवे तों तमाम मुत्सद्दी वाड्यांतच होते. पहाटेचे वेळेस चोपदार पाठवून सरदारांस बोलावून समजूत व बंदोबस्त करीतच आहेत. वाड्याचे दरवाजे अद्याप (म्ह० बुधवारपावेतों) खुले नाहींत. मारावयाच्या मतांत बहुत होते, परंतु मोठे अग्रेसर सुमेरसिंग व तुळाजी पवार, या दोघांनीं थोरल्यांचे अंगास मिठी घातली असतां ओढून अंगावर वार टाकिले. पांच सात वारांनीं पुरा केला. वांचवावें म्हणून त्यांनीं फारच ग्लान केली, परंतु यांनीं न ऐकिलें. सुमेरसिंगाच्या हातची कराचलीची थोडीशी पुतळी (म्हणजे मुठीचा भाग) दादांस लागली आहे. ज्यांस संतोष ते संतोषेंकरून दरबारास जातात. ज्यांस असंतोष त्यांस बलावूं पाठविल्यास इलाज नाहीं, घरीं चौकी बसवितील, म्हणून जातात'. हें पत्र खुनाचे तिसरे दिवशीं लिहिलें आहे. यांत तरवार उपसून नारायणराव दादास मारण्यास गेला असा उल्लेख आहे, तो इतरत्र कोठेंच प्रचलित नाहीं. तो खरा असता [illegible] ता;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आणि हातांत शस्त्र असतें तर एका दोघांस तरी अपाय केल्याशिवाय नारायणराव मारला गेला नसता, असें वाटतें.

या प्रकरणासंबंधानें का. सं. प. या. पृष्ठ ५११ वर जो संक्षिप्त गोषवारा आहे, तो कारोनरच्या अभिप्रायासारखा, किंवा दादाच्या प्रायश्चित्त संकल्पांतून घेतल्याप्रमाणें, दिसतो. 'दादा व आनंदीबाई यांचे मनांत विकल्प येऊन सखारामपंत वगैरे मुत्सद्यांचे सल्ल्यानें रावसाहेबांस कैद करून आपण राज्य करावेंसें झालें, ती मसलत बाईंनीं मोडून, शस्त्राघात करून रावांचा फडशा करावा असें योजिलें; आणि वाड्यांत हजिरी आहे, असें वर्तमान शहरांत फोडून, चौकी पहाऱ्यास जुने लोक होते ते काढून, परदेशी ठेविले; त्यावर दादांनीं भाद्रपद शुद्ध १३ स दोन प्रहरीं रावसाहेबांस आपले समक्ष बोलावून सुमेरसिंग, खरकसिंग व तुळ्या पवार यांजकरवीं रायांवर जखमा करून मारविलें. ते समयीं गर्दींत गोहत्या, स्त्रीहत्या, ब्रह्महत्या वगैरे फार झाल्या. हें वर्तमान तिसरे प्रहरीं बापू, नाना, हरिपंत व मुत्सद्दी व सरदार यांस कळल्यावर, रात्रीं त्रिंबकराव मामांनीं दहन केलें'. याशिवाय बारीक तपशील पुष्कळ आहेत. 'पांच सातशें गाडदी वाड्यांत शिरले, पण बाहेर पांच हजार पावेतों त्यांचा जमाव झाला. कोटास पूर्वेच्या बाजूनें लहान दरवाजा होता, तो हत्ती जाण्याजोगा मोठा करण्यासाठीं खिंडार पाडून काम चाललें होतें, त्यांतून गाडदी आंत शिरून छपरावरून गच्चीपावेतों गेले, आणि हरिपंतानें बाहेर फौजा आणिल्या, तेव्हां हे त्यांजवर बंदुकीच्या गोळ्या झाडूं लागले. गारद्यांस पकडण्यासाठीं बाहेर तोफखाना आणिला, तेव्हां बाहेर जमलेले गाडदी खिंडारांतून आंत शिरून स्वसंरक्षण करूं लागले, असें दिसतें. परंतु आंत तीन खासे पुरुष (नारायणराव, दादा व अमृतराव) आणि चार खाशा बायका (पार्वतीबाई, आनंदीबाई, गंगाबाई व सगुणाबाई) इतकी मंडळी असल्यामुळें, वाड्यावर तोफा टाकण्याचा विचार रहित करावा लागला. नारायणरावाचा खून झाल्याबरोबर गार्द्यांनीं दादास खालीं चौसोपींत किंवा चांपेखणांत आणून बसविलें, आणि त्यास धनीपणाचा मान देऊन जयजयकार केला; वाड्यांत त्यांची द्वाही फिरविली; सुमेरसिंगानें दादाचे डोईस पागोटें घातलें, आणि बोलला, 'दुष्मन मारला, खुषी करावी, आम्ही सर्व आपले आहोंत'. शंभर गाड्दी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नागव्या तलवारींनिशीं दादा भोंवते राहिले. बाकीच्यांनीं त्या गर्दींत वाड्यांत लूट फार केली. स्वयंपाकाचीं भांडीं, देवतार्चनाचें सामान, जडिताचें सोन्या-रुप्याचें बहुतच होतें, तें सर्व लुटलें. पीतांबर सुद्धां फाडून घेतले. वाड्यांत मोठी रडारोय चालली, ती ऐकून शहरांत सर्वत्र गडबड उडाली. हरिपंतानें वाड्याबाहेर येऊन टेहळणी केली. दरवाजे बंद पाहून बुधवार चावडीवर आला. तेथें सखारामबापू व कारभारी जमा झाले. आंत कोण मेले व कोण जिवंत आहेत याचा पत्ता बाहेर लागेना. फौजा व तोफा सिद्ध केल्या, तों आंतून दादाचे जासूद चिठ्ठी घेऊन आले कीं, 'गुंता उरकला, आतां बाहेर खटपट कां करितां! आंत यावें'. तेव्हां बजाबा पुरंदरे, मालोजी घोरपडे, सखारामबापू, भवानराव प्रतिनिधि वगैरे वाड्यांत गेले. त्यांनीं आपापल्या परी दादाचा निषेध केला. बापू म्हणाला, 'गोष्ट वाईट झाली. आम्हांस समाधान नाहीं. लेखणीचे धनी फडणीस आहेत, त्यांस बोलावून काय तें करावें'. असें सांगून बापू घरीं गेला; आणि दुसरे दिवशीं बायका मुलें घरींच ठेवून, आपण स्वतः शहरांतून पळून चार कोस गेला; परंतु पुनः कांहीं विचार मनांत येऊन रात्रौ घरास आला. 'माधवरावानीं आपले हातीं दिलें असतां आम्हीं वांचलों, आम्हांस मरण येईल तर बरें, असें मन त्यास फार खाऊं लागलें. अशी गत होऊन आपल्यावर निमित्त आलें; हरिपंतावर रोष फार, याजकरितां ते निघून मोरेश्वर बारामतीकडे गेले; पुढें बाबूजी नायकांबरोबर येऊन भेटले. खुनाच्या दिवशीं नाना-फडणीस पुण्यांत नव्हता असा एक उल्लेख आहे. दुसरे दिवशीं त्यास व मोरोबास दादांनीं बोलावून कारभार करण्यास सांगितलें; ते दादाच्या हुकुमानें गारद्यांच्या समजुती वगैरे करूं लागले. 'चिंतो विठ्ठल, हरि भिडे, भवान-राव प्रतिनिधि, सखाराम हरि, सदाशिव रामचंद्र, बाजीराव गोविंद बर्वे वगैरे सारा दिवस श्रीमंतांजवळ असतात. श्रीमंतांनीं तमाम शागीर्द लहान मोठे सवाशें जमा केले. बाबू नायकास तीन चार पत्रें पाठवून आणिलें. लवकरच कां आलां नाहीं असें विचारतांच बोलले, 'चूक झाली, मोठाच समारंभ होता. अवधि लागला. दादासाहेब, काय केलेंत हें !' राजकारण फार दिवस घाटत होतें, त्यांत मोठमोठे होते, त्यांचें मानस कैद करावें असें होतें. करावयास गेले एक आणि झालें भलतेंच. मर्जी माफक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

बोलल्यास दादांचे कृपेस उशीर नाहीं. गंगाधर यशवंत आले आहेत त्यांस दिवाणगिरी सांगावी असा विचार आहे. 'आम्हामुळें बुडालास, विचारें करून बंदोबस्त करूं', असें त्यांस सांगितलें. दगा झाला त्या दिवशीं गंगाबाईस अस्पर्श होऊन महिना झाला होता. पहिले पाऊण महिन्यावर दिवस जात नव्हते. सारे लोक येऊन दादास पहिल्या रात्रींच भेटले. शहरांत दादांनीं आपली द्वाही फिरवली. शहाजणें वाजलीं. दोन प्रहर रात्रीपर्यंत आंतील वर्तमान बाहेर कळलें नाहीं. दहनास नेल्यावर ठीक कळलें. गंगाबाईनें सती जाण्याचा अट्टाहास केला. मस्तक फोडून घेतलें. तेव्हां खोलींत घालून बाहेरून कडी लावली. गाड्यांकडील कारकून बाळाजीपंत दामले व ठोसर यांस पकडून चौकीस बसविलें, पुढें जामीन घेऊन बिड्या तोडल्या. तमाम लोक भेटून नजराणे करितात. वाड्यांत चौक्या गारद्यांच्या आहेत. प्रस्तुत त्यांची जबरदस्ती फार आहे. शहरांत राऊतांची नाकेबंदी नारोआपाजीनें केली, म्हणून बचाव झाला. गाड्यांस व त्यांचे जमादारांस वस्त्रें, कंठ्या, शिरपेंच व लाख रुपये बक्षीस दिले. सखारामबापूस नित्य वाड्यांत बोलावतात, पण कारभार करीत नाहींत. 'चिंतो विठ्ठल शहाणे आहेत ते कारभार करतील, आमचे जिवास समाधान नाहीं', असें बापू म्हणाले. शिष्य जमा झाले. मामलती विल्हेस लावतात. नानाफडणीस बोलावूं पाठवितील तेव्हां जातात. अबरू राहिली पाहिजे म्हणून जातात, व सांगतात तें मान्य करितात. सर्व मातबर मंडळींच्या घरीं जासूद बसवून बातम्या वरचेवर आणवितात. रास्ते यांजवर कटाक्ष आहे'.

७. **इतिश्री.**—अशी ही खुनाच्या प्रसंगाची हकीकत निरनिराळे उतारे गोळवून बनविली आहे. आणखी किरकोळ तपशील पुष्कळ सांपडेल. नारायणरावाचें प्रेत पाहून गारद्यांचे समक्ष भवानराव प्रतिनिधीनें दादास तोंडावर सांगितलें, 'आपण समक्ष असतां हा प्रकार! फार चांगला लौकिक कमावलात' ! अशा प्रकारचीं उत्तरें व प्रत्युत्तरें, एतद्विषयक आख्यायिका, पोवाडे, नाटकें, कादंबऱ्या वगैरेंतून उठलेले कल्पनातरंग, यांच्या योगानें आज दीडशें वर्षांवरही नारायणराव पेशव्याचा हा खून महाराष्ट्राच्या स्मरणांत अगदीं ताजा आहे. खुनाचा तपास होण्यास दोन महिने लागले. त्यानंतर गंगाबाईचे नांवानें पुरंदरास कारभार सुरू होतांच, गुन्हेगारांस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पकडून शिक्षा करण्याचें काम चालू झालें. तें जरी कैक वर्षें चाललें तरी मुख्यतः सन १७७४ चा फेब्रुवारी ते मार्च या दोन महिन्यांत जारी होतें. सर्व गुन्हेगारांचे उल्लेख एकत्र करून विविध-ज्ञान-विस्तारांत रा० वाकस्करांनीं प्रथम 'आनंदीबाईची फिर्याद' व मागाहून 'सुमेरसिंगाचे साथीदार' असे विवेचक लेख प्रसिद्ध केले आहेत, त्यांत पन्नास गुन्हेगारांचीं नांवें आहेत तीं अशीं:–

१३ गारदी (८ हिंदु व ५ मुसलमान).

१ मणीराम परदेशी.	१ परशराम परदेशी.
१ बाळाराम सुमेरसिंग.	१ नाथूराम वा॥ संभूराम.
१ सुमेरसिंग.	१ खरगसिंग.
१ बहादरसिंग.	१ गंगाराम परदेशी.
१ अबदुल कादर.	१ फाजल.
१ नूरमहंमद.	१ महंमद इसफ.
१ हुसेन बेग.	

७ मराठे.

१ शिवराम गिरमाजी.	१ तुळाजी पवार.
१ जयसिंगराव निकम.	(गोविंदराव गायकवाड)
१ नरसिंगराव देशमुख.	(मुधोजी भोसले)
१ कुशी बटीक.	

१ फरास मुसलमान, नांव छट्टू. (खं. १२-३०७-०९).

२६ ब्राह्मण व ३ प्रभु (२६ ब्राह्मण पैकीं २ सारस्वत.)

१ केशवराव बल्लाळ (काळे ?)	१ रामचंद्र विठ्ठल.
१ अंताजीराम सावकार.	१ राजाराम गोविंद.
१ मल्हार कृष्ण सुमंत.	१ आपा लिमये.
१ गोपाळ लिमये.	१ रामचंद्र बाबाजी जोगळेकर.
१ केसो बल्हाळ गोगटे.	१ अंतोबा घाणेकर.
१ बाबूराव बल्हाळ काणे.	१ अच्युत गणेश.
१ भास्कर नारायण (नारगुंदकर भावे)	१ विसाजी महादेव दाते.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

१ आबाजी महादेव सोवनी.	१ हरि रघुनाथ भिडे.
१ शिवाजी कान्हो.	१ त्र्यंबकजी भालेराव.
१ बाजीराव गोविंद बरवे.	१ निळकंठ रामचंद्र
१ सखाराम भगवंत (बोकील).	१ विठ्ठल विश्राम (सबनीस).
१ भवानराव प्रतिनिधि.	१ सदाशिव रामचंद्र (सुखटणकर).
१ गोविंद गणेश.	१ व्यंकटराव काशी (प्रभु).
१ चिंतो विठ्ठल (रायरीकर).	१ लक्ष्मणराव काशी (प्रभु).
	१ सखाराम हरि (गुप्ते).

कांहींचीं आडनांवें मिळालीं नाहींत, ते बहुधा ब्राह्मण असावेत असें समजून त्यांचा अंतर्भाव ब्राह्मणांत केला आहे. गुन्हेगार सर्व पुरुष असून, फक्त एकच बटीक स्त्री आहे. तीन प्रभूंपैकीं दोन मुधोजी भोसल्यांकडील वकील आहेत. यावरून कटवाल्यांत सर्वांत मोठी संख्या ब्राह्मणांची दिसते. या पन्नास गुन्हेगारांपैकीं महंमद इसफास नोव्हेंबर १७७५ त आणि खरगसिंग व तुळ्या पवार यांस सन १७७९ त देहान्त शिक्षा देण्यांत आली. बाकीच्या सर्वांस निरनिराळ्या किल्ल्यांवर कमीजास्त सक्तीच्या व मुदतीच्या बंदींत ठेवण्यांत आलें. सुमेरसिंग हातीं येण्यापूर्वींच जुलै १७७४ त इंदुरास मरण पावला. त्याचे मुलगे व दुसरे कित्येक गुन्हेगार आजन्म अटकेंत राहिले, बाकीच्यांची थोड्या बहुत काळानें सुटका झाली. सर्वांचीं घरें व मालमत्ता सरकारांत जप्त करण्यांत आली. गर्दीच्या वेळीं मारले गेलेल्या इसमांस म्हणजे चाफाजी टिळेकर व नारो गणेश फाटक यांस इनाम जमिनी देण्यांत आल्या. दादाच्या कंबरेची समशेर मानलेला महंमद इसफ यास ३१-१०-१७७५ रोजीं खूब शर्तीनें पकडणारा ताजखान यासही इनाम जमीन देण्यांत आली. तुळ्या पवार व खरगसिंग हैदराचे फौजेंत जाऊन नोकर राहिले होते, ते हातीं येण्यास पुष्कळ वेळ लागला. सर्व हातीं आल्यावर त्यांच्या जबान्या घेऊन व इन्साफ करून मग त्यांस शिक्षा देण्यांत आल्या. गार्दी जहाजांतून पळून मुंबईस इंग्रजांचे आश्रयास गेले होते त्यांस पुढें इंग्रजांनीं धरून पुण्यास पाठविलें, तेव्हां त्यांचे फार हाल करण्यांत आले. पायांस सुया टोंचून, हत्तीचे

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पायीं बांधून, तापलेल्या सळ्या कानांत घालून, सहासहा महिने हाल केल्या-वर त्यांस मारिलें. सांडसानें शरीर तोडून चुन्याचें व मिठाचें पाणी शिंपडून जेरबंद मारीत होते. त्यांच्या बायकापोरांचे गळे त्यांचे देखत कापून निर्वंश करून मग मारीत. अशा रीतीनें नाना फडणिसानें बंडें मोडिलीं असें दप्तर-कार लिहितो. व्यंकटराव काशीस पकडून वर्ष सहामहिने सुवर्णदुर्ग येथें अटकेंत ठेवून पुढें सोडून दिलें.

या हकीकती सामग्र्यानें लक्षांत आणिल्या असतां, या प्रकरणांत आज पावेतों प्रसिद्ध झालेले संशय, वाद व भ्रम निरास पावून, एकंदर प्रकार कसा बनला त्याची संगति जुळून येईल. हा खून अगोदरपासून विचार-पूर्वक तयारी करून शांत वृत्तींत झालेला आहे. सुमेरसिंगाच्या किंवा गार्द्यांच्या अंगांत खून चढून केवळ संतापवृत्तींत झालेला नाहीं. दारावरचा निपराधी बुधसिंग, किंवा इच्छारामपंत कारकून व गाय, किंवा नारोजी नाईक जासूद, यांजवर तलवारीचे वार चालविण्यास शांत विचार लागतो. हजारों गार्द्यांचे अंगीं एकदम संताप चढण्याचें कांहीं कारण नाहीं. नारायण-रावाच्या लोभांतले किंवा कटाचे सर्व धागे व कारस्थानें पूर्णपणें माहीत असलेले जेवढे इसम त्यांच्या तावडींत जाग्यावर सांपडले, तेवढे त्यांनीं नाहींसे केले. दादा व नारायणराव यांजमधील व्यवहार उभय पक्षीं हलक्या नोकरांच्या मार्फत अंतस्थपणें घाटत होते; दरबारांत कारभाऱ्यांमार्फत सर्व चर्चा होत नव्हती, हा अनिष्ट प्रकार ओळखूनच धूर्त नाना फडणीस कारभारांतून अलिप्त राहिला असावा. तो यांत जास्त लक्ष ठेवून वाड्यांत हजर असता तर कदाचित् मारलाही गेला असता. दादाची वृत्ति नेहमींची धर-सोडीची, मनांतून नारायणराव नको, पण उघडपणें दूर सारण्याची छाती नाहीं. घोडनदीचे युद्धांत दादा व माधवराव यांचें असेंच अत्यंत वैर आलें होतें. पण माधवराव छाती करून आपण एकटा जाऊन चुलत्यास भेटला. दादासारखीच सखारामबापूची भावना, धरवत नाहीं, सोडवत नाहीं, अशी होती. दोघांच्या या धरसोडीचा फायदा सूत्रचालक आनंदीबाईनें घेऊन, तुळ्या पवार, सुमेरसिंग इत्यादिकां करवीं हें कृत्य करविलें, आणि अखेरपर्यंत आपण नामा-निराळी राहिली, असा त्या वेळचा कयास होता. गारदी बोलून चालून परकी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

भाडोत्री, ते पैशाकारितां वाटेल तें कृत्य करण्यास तयार झाले. सखाराम हरि, सदाशिव रामचंद्र, आबाजी महादेव वगैरे मंडळी मूळपासून दादाचे पक्षाची; मनांत नसलें तरी येईल ती कामगिरी त्यांस करावी लागली; पण प्रत्यक्ष खुनाच्या प्रकरणापेक्षां या गृहस्थांचा उपयोग पुढील युद्धांत दादास विशेष झाला. भोसल्यांचे वकील व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी केवळ आपल्या मतलबापुरते कामांत होते, खुनाशीं प्रत्यक्ष त्यांचा संबंध नव्हता त्यांची सुटकाही पुढें लवकरच झाली. मानाजी फांकडे व बजाबा पुरंदरे दादाचे पक्षपाती असूनही कटांत सामील झाले नाहींत. भवानराव प्रतिनिधि केवळ तोंडपाटिलकी करून दिखाऊ आढ्यता आणणारा मनुष्य, कटाच्या खोल व्यापारांत शिरण्यास लायकच नव्हता. सखारामबापूचा संबंध खुनाशीं बिलकूल नाहीं. खून झालेला ऐकून त्यास कांहीं वेळ चित्तभ्रमच झाला; आणि रामशास्त्र्याचे तपासानंतर दादाचे अंगीं दोष लागू होतांच, त्यानें विरुद्ध कारस्थान रचण्याचें प्रमुखपण स्वीकारिलें. गुन्ह्याचा तपास करून राजरोसपणें गुन्हेगार उघडकीस आणण्याचें मुख्य काम एकट्या रामशास्त्र्यानें केवळ आपल्या न्यायाधिशीच्या जोरावर केलें. शस्त्रास्त्रादि बाह्य उपकरणांपेक्षां न्यायशक्ति केवढी प्रभावशाली व निष्ठुर आहे, याचा प्रत्यय ह्या शास्त्रीबोवाच्या कृतींत दिसतो. कटाची बातमी समजतांच नारायणरावाचे बचावाचा उद्योग लगोलग न करितां हरिपंत भोजनास गेला, यावरून नारायणरावाविषयीं तो थोडासा बेफिकीर दिसतो, तथापि खुनास मदत करण्यासाठीं तो दूर राहिला असें होत नाहीं. पुढील कारस्थानांत उद्योगाची मुख्य भिस्त हरिपंतावरच होती. खुनानंतर दोन तीन महिने दादाचा कारभार सुरळित चालला. उलट पक्षास न छेडतां सरळपणें तो चालता तर कुटुंबांत दुसरा कोणी पुरुष नाहीं, या भावनेनें तरी लोक त्यास अनुकूल झाले असते. निदान दशपिंडाचे दिवशीं नदीच्या वाळवंटांत बारभाईंनीं शपथा घेऊन कारस्थान उभारलें हा समज खरा नाहीं. गंगाबाई गरोदर असल्याची खात्री झाल्यावर, आणि आनंदीबाईकडून तिला मारण्याचे प्रयत्न उघडकीस आले तेव्हां, आणि रामशास्त्र्यानें दादाचे अंगीं गुन्हा लागू केल्यावर मग, म्हणजे खुनानंतर तीन चार महिन्यांनीं बारभाईचें कारस्थान सिद्ध झालें; आणि जानेवारी सन १७७४चे अखेरीस

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गंगाबाई पुरंदरीं पोंचल्यावर तेथून नवीन कारभार सुरू झाला. आनंदीबाईचें अंग या प्रकरणांत सिद्ध करण्यास कांहींएक पुरावा उपलब्ध नाहीं, तिच्या मागच्या पुढच्या कृत्यांवरून अनुमानानेंच तिचा या कामांत संबंध मानला जातो. बहुधा स्त्रियांचें अंग अशा कृत्यांतून गाळण्याकडे अद्यापि प्रवृत्ति आहे, तशीच त्या वेळींही असून, सरकारी कागदांत कोठेंही तिचें अंग न दिसावें अशी खबरदारी घेण्यांत आली असेल. आनंदीबाई मोठी धूर्त व सावध दिसते. माधवरावाचे हयातींत ती बरीच लहान असल्यामुळें तिला कुटुंबांत वजन नव्हतें. माधवरावानें तिला कधीं अटक केल्याचा अगर दुसरा कोणताही त्याचा बरा वाईट उल्लेख तिच्याबद्दल सांपडत नाहीं. नारायणरावाचे खुनांत ती कांहीं अंशीं सूत्रचालक होती; परंतु पुढें तिनें गंगाबाईस मारण्याचे प्रयत्न केले, गंगाबाई पुरंदरावर असतां तेथेंही फितूर करविले. बारभाईशीं युद्ध चालू असतां तिनें शक्य तितक्या रीतीनें नवऱ्यास साह्य केलें. 'बाई तुम्हांस माहीतच आहेत. शंभर राजकारणें करतील', असे तिच्याबद्दल ठिकठिकाणच्या पत्रांत उल्लेख आहेत. इकडे सखाराम हरि वगैरे स्वपक्षांतील मंडळींस ती उत्तेजन देते, तर त्याच वेळीं सवाई माधवरावाच्या प्रकृतीची खबर काढून, त्यास जपा म्हणून लिहिते; आणि नवऱ्याचा डाव साफ फसल्यावर पुनः या सर्व अपकर्षाचें दूषण ती सखारामबापू, नाना फडणीस वगैरे कारभाऱ्यांना देते. यावरून, करून सवरून नामानिराळी, अशी तिची वागणूक तिच्या एकंदर चरित्रांत दिसते. अंतःकरणाच्या वृत्ति दाबांत ठेवण्याची कला तिला चांगली असावी. तिच्या उलट गोपिकाबाई, संतापी व हट्टी. नारायणरावाचे खुनानंतर आनंदवल्लीजवळ राहणें नकोसें होऊन ती पंचवटीस जाऊन पर्णकुटिकेंत राहिली. आपल्या मुलास मारणाऱ्या मंडळीचें नुसतें दर्शन सुद्धां तिला दुःसह झालें. मुलास मारणाऱ्या मंडळीचें म्हणजे दादा व आनंदीबाईचें दर्शन, बारा वर्षें लोटल्यावरही घेण्याची तिची इच्छा नव्हती. यावरून या दोघांनींच कट करून आपला मुलगा मारिला, अशी गोपिकाबाईची व तत्पक्षीय नाना फडणीस, हरिपंत वगैरेंची बालंबाल खात्री होती. परमेश्वरानें आपणास कसकशा भयंकर संकटांतून वाचाविलें, त्याची यादी नाना

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

फडणिसानें लिहून ठेविलेली आहे, तींत 'नारायणरावाचे वेळेस गाड्यां-कडून, पुरंदरचे समयीं, थोरले माधवरावास पकडलें तेव्हां, व इतर अनेक दग्यांपासून परमेश्वरानें माझा बचाव केला', असा मजकूर आहे. उलट पक्षीं कशाही बंदोबस्तांत ठेविला तरी जिवंत आहे तों दादा हा गृहस्थ कधीं स्वस्थ बसणार नाहीं, अशी खात्री असतां, त्यास किंवा आनंदीबाईस ठार मारण्याचा प्रयत्न करण्यांत आला, असा त्या दोघांचा किंवा तत्पक्षीयांचा एक सुद्धां उल्लेख सांपडत नाहीं. दादा सिंद्याचे हस्तगत झाला तेव्हां मला मारून टाका असें त्यानें बारभाईंस कळविलें असतां, 'असें केल्यानें कोणाचें बरें झालें आहे! याचा उच्चार सुद्धां करूं नये', असा जबाब त्यास देण्यांत आला. यावरून दादा व आनंदीबाई यांजविषयीं महाराष्ट्रांत जो तिरस्कार अद्यापपावेतों वसत आहे, तो त्यांनीं स्वतः आपल्या वागणुकीनें संपादन केला आहे, असें म्हणावें लागतें.

तथापि आनंदीबाईच्या कृष्णकारस्थानाचा किंवा दुष्ट स्वभावाचा प्रत्यक्ष पुरावा मला यत्किंचित् आढळत नाहीं. ती सुस्वरूप असून नवऱ्यास भुरळ पाडून त्याजकडून वाटेल तें कृत्य करवी, असा सामान्य समज त्या वेळीं होता, त्याचाच अनुवाद पूर्वीं डफनें व अलीकडे इतिहाससंग्रहाचे संपादक रा० ब० पारसनीस व त्यांच्या साहाय्यानें इतिहास लिहिणारे ना० किंकेड यांनीं ठिकठिकाणीं केलेला आढळतो, पण त्याचा पुरावा मात्र कोणत्याही प्रकारचा एवढ्या मोठ्या वाङ्मयांत ते देत नाहींत. थोरल्या माधवरावाचे वेळीं सुद्धां तिचीच भर नवऱ्याचे दुष्ट कृत्यांस होती, असें हे लेखक लिहितात; परंतु बारातेरा वर्षांची पोर, दीड दोन वर्षांचा पाळणा सारखा पाठीस लागलेला, नवऱ्यापासून बहुतेक दूर राहणारी, अशा स्थितींत माधवरावाचे वेळीं तिचें वजन नवऱ्यावर बिलकुल नव्हतें. माधवरावाचें किंवा गोपिकाबाईचें तिच्याविरुद्ध एकही अवाक्षर उपलब्ध नाहीं. नवरा मरेपर्यंत व्यसनी व बाहेरख्याली होता. खंबायतहून जीव घेऊन भावनगरास पळतांना, फौज किंवा नोकरचाकर सर्व त्यानें टाकून दिले, परंतु आठ रक्षांचा परिवार मात्र त्यानें सोडला नाहीं. बारभाईंशीं गोडी करण्यासंबंधानें "बायको सारा वेळ आम्हांस गांजीत असते, तिला लेक झाला तोही तसाच खोटा निघाला,"

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

असें आपल्या बापास वाटूं नये, असा बाजीरावाचा उल्लेख त्याच्या एका पत्रांत ता. १-१-१७७८ चा आहे [पारसनीस संग्रह]. यांत बायको आपल्या मर्जीप्रमाणें वागत नाहीं अशी नवऱ्याची भावना व्यक्त होते. नानासाहेबाच्या वंशाशीं वांकडे असूं नये असेंच आनंदीबाई नवऱ्यास अहर्निश सांगत असावी असें दिसतें. 'आठदाहां दिवसां सौ० आनंदीबाईचें दर्शन. अर्धघटका येऊन जवळ बसली तर त्यांशीं भाषण करीत नाहींत. बाजीरावास बाईकडे फारसें जाऊं देत नाहींत. सुरतेस नवीन स्त्री केली ती देवी निघून गत झाली', (म. द. बा. १ पृ. २३) असा आणखी उल्लेख आहे. सन १७७९ चे जानेवारींत तळेगांवच्या लढाईत पराभव पावून दादा महादजीचे स्वाधीन झाला, तेव्हां 'अमृतरावाचें दुसरें लग्न झालें; आपलेंही पुनः लग्न करणार' (ख. ले. २४८५), असा विचार होता. अमृतरावाची पहिली बायको मेली, म्हणून त्याचें लग्न झालें हें ठीकच, पण अशा वेळीं स्वतःचाही आणखी लग्न करण्याचा, किंबहुना, मुलासाठीं पाहिलेली नवरी आपणच पटकाविण्याचा दादाचा विचार होता. आणि हें सर्व औरस व दत्तक संतति हयात असतां, व प्राणावर बेतली असतां. अशा नवऱ्यावर आनंदीबाईचें वजन किती असेल, याची कल्पनाच केली पाहिजे. नारायणरावास पेशवाईचीं वस्त्रें घेतांना दादानें विरोध केला, त्या वेळीं आनंदीबाईनें नवऱ्याचें मन वळवून नारायणरावालाच वस्त्रें देवविलीं. जर तिच्या मनांत नारायणरावास दूर सारण्याचें असतें, तर विरोधास तोच प्रसंग चांगला होता; मुद्दाम पुढें त्याचा खून करविण्यापर्यंत मजल आणण्याचें कारणच नव्हतें. पुतण्याचे खुनाबद्दल दादानें प्रायश्चित्त घेऊन गोपिकाबाईचें दर्शन घ्यावें, आणि मातुश्रीसमान त्या वडील व पुण्यशील बाईचा शुभाशीर्वाद मरणापूर्वी संपादावा, अशी भर आनंदीबाईनें आपल्या नवऱ्यास आसन्नमरण स्थितींत दिली, यावरून नवऱ्याचे हातून घडलेल्या पापाचें क्षालन धार्मिक दृष्ट्या तरी व्हावें, अशीच तिची भावना दिसते. त्या पापांत तिचा स्वतःचा हात असावा असें दिसत नाहीं. धार्मिक दृष्ट्या गोपिकाबाईइतकीच ती श्रद्धाळू होती. पेशव्यांच्या घराण्याच्या लौकिकाबद्दल तिला कळकळ वाटे, तशीच मराठी राज्यास उतरती कळा लागलेली पाहून तिला हळहळ वाटत असे. तिचीं या संबंधाचीं पत्रें व उल्लेख मोठ्या शहाणपणाचे व मार्मिक आहेत. 'ज्या

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गोष्टी भावी असतात त्या घडतात, त्यापक्षीं आम्ही दूर आहों हा भ्रमच बरा. विशेष कर्मफलाच्या गोष्टी काय लिहाव्या! (खं. १२·१९०, ता. ११-१-१७७७). पुतण्याच्या खुनाशीं आपला संबंध जोडून लोक आपणांस पाण्यांत पाहतात, याबद्दल तिचा जीव तिळतीळ तुटे, आणि 'पुराव्याचें माप माझे पदरांत घाला, उगाच साप साप म्हणून भुई बडवूं नका', असें कंठशोष करून ती कारभाऱ्यांस विचारी. यावरून वाटतें, कीं नवऱ्याच्या अविचारीपणामुळेंच तिच्या शहाणपणाचें मातेरें झालें; आणि 'घरांत बायको वाईट', ही जी सामान्य सामाजिक समजूत तिला अनुसरून नवऱ्याचा दोष उगाच आनंदीबाईचे माथीं आला. शिवाय वेळीं अवेळीं शक्य तितकें नवऱ्याचें साह्य करणें व त्याच्या उद्योगांत सामील होणें, हा हिंदु स्त्रीचा पतिव्रताधर्म तिलाही पाळावा लागल्यामुळें, त्या दोषास दुजोरा आला. याचे उलट नवऱ्याशीं उघड विरोध करणें तिला शक्यच नव्हतें. नारायणरावाच्या मृत्यूनंतरच्या दहा वर्षांत महाराष्ट्राचें वातावरण इतकें कांहीं दूषित झालें होतें कीं, आपल्या बाजूचा कोण व आपल्या विरुद्ध कोण, ह्याचीच प्रत्येकास भ्रांत पडे. प्रत्यक्ष सखारामबापू, मोरोबादादा, नरसिंगराव धायगुडे, विसाजी कृष्ण विनीवाले, जे बारभाईचे केवळ आधारस्तंभ, त्यांस सुद्धां जर दादास सामील असल्याबद्दल कडक शिक्षा झाल्या, तर आनंदीबाई, जी प्रत्यक्ष नवऱ्याची बायको, तिच्याबद्दल विचारावयासच नको. जर ती नवऱ्यास सोडून बारभाईकडे उठून आली असती, अशी कल्पना केली, तर तिची अवस्था काय झाली असती, याचा विचार करावा! अत्यंत विपरीत व बिकट परिस्थिति उपभोगावी लागल्याचें आनंदीबाईइतकें दुसरें उदाहरण इतिहासांत बहुधा दुर्मिळ आहे. या सर्व गोष्टी लक्षांत घेतां, बिनतोड पुरावा हातीं आल्याशिवाय, पुतण्याचे खुनाचा गुन्हा आनंदीबाईचे माथीं मारणें अन्यायाचें होईल. निदान संशयाचा फायदा तरी तिला देणें न्याय्य आहे.[1]

१. कागदपत्र वाचून माझा असा तर्क होत आहे, कीं सवाई माधवरावाचा अकल्पित मृत्यु झाल्यावर बाजीरावास पेशवाई मिळून मराठशाहीची समाप्ति झाली, त्या भरांत ह्या सर्व मागील बनावास लोकप्रवादानें रघुनाथ-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

एकंदरींत नारायणरावाच्या खुनानें मराठशाहीचें भाग्य संपलें; आणि मराठ्यांचे नांवास कायमचा काळिमा लागला. तयमूर, औरंगजेब, नादीरशहा वगैरे मुसलमान राज्यकर्त्यांची खुनाचे कामांतील प्रवीणता मराठ्यांनीं कधींही प्रशंसनीय मानिली नाहीं. मराठ्यांच्या राज्यांत असे प्रसंग फारच विरळा घडले. परंतु पेशवे ब्राह्मण, शिवछत्रपतींचें गो-ब्राह्मणप्रतिपालनाचें ब्रीद चालविणारे राज्यकर्ते, लोकांचे व धर्माचे पुढारी, तेव्हां त्यांच्याच घरांत असा बनाव झाला, त्याचा परिणाम एकंदर लोकसमूहाला कसा झोंबला व अद्यापि किती ताजा आहे, हें आपण जाणतों. राज्यकारभारासारखीं मोठीं कामें चालकांच्या तपोबलावर सिद्धीस जातात. माधवराव पेशव्याचें तपोबल दांडगें, म्हणून सर्व प्रजा त्याचें अभीष्ट चिंतून जिवास जीव देण्यास तत्पर असत. नारायणराव किंवा रघुनाथराव यांनीं हें तपोबल जोडलें नाहीं, म्हणून या खुनापासून राज्याची अधोगतिच झाली. बापू व नाना पुढें शिकस्त करून राज्य राखीत होते, पण त्यांच्या अंतःकरणांत मराठशाहीचा अंत जवळ येत चालला, ही भावना घोळत असलेली त्या वेळच्या लेखांत व्यक्त झालेली दिसते. मिळून नारायणरावाचा खून हा अस्तारंभ (beginning of the end) समजून, तेथेंच उत्तर मराठशाहीची सुरुवात मीं धरिली आहे.

राव, आनंदीबाई व बाजीराव यांस जबाबदार धरिलें. या बनावाची सुरवात नारायणरावाचे वधापासून झाली. त्यांतही पटवर्धन सरदारांचें व दादाच्या कुटुंबाचें अत्यंत वांकडें, पटवर्धनांची वाट बाजीरावानें लाविली, त्या रागांत हरिवंशाची गप्पिष्ठ बखर व पेशव्यांची काल्पनिक बखर या निर्माण झाल्या. हरिवंशाच्या बखरींत तर आनंदीबाईविषयीं पटवर्धनांचा जळजळित राग दिसून येतो. पटवर्धनांच्या दप्तराबाहेर या बाईविरुद्ध फारसा उल्लेख आढळत नाहीं. नाना फडणीस मात्र आपल्या जिवावरच्या संकटांत आनंदीबाईचे प्रयत्न नमूद करतो. पण केवळ दूषित दृष्टीनें पाहणारास नानासारख्या कारभाऱ्याचे कानावर पाहिजे तो बनावट मजकूर येणें शक्य आहे. निदान या बाबतींत नानाची साक्ष जमेस धरणें रास्त नाहीं.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

प्रकरण त्रेचाळिसावें

बारभाईंचें कारस्थान

[३०-८-१७७३—१८-४-१७७४]

१. वधोत्तर हालचालींचें दिग्दर्शन, (सेप्टें.—नोव्हें. १७७३).
२. निजाम हैदरांवर दादांची स्वारी, (नोव्हें.७३—फेब्रु. ७४).
३. गंगाबाईचा पुरंदरावर कारभार, (१७-१-१७७४).
४. उभय फौजांचें बलाबल, (मार्च १७७४).
५. कासेगांवची लढाई, (२६-३-१७७४).
६. गंगाबाईची प्रसूति व पुत्रोत्सव, (१८-४-१७७४).

१. वधोत्तर हालचालींचें दिग्दर्शन.—नारायणराव पेशव्याचा वध ही मराठशाहींतील एक दारुण राज्यक्रान्ति होय. तिजपासून पुढें ज्या आपत्ति राष्ट्रावर कोसळल्या, त्यांची कष्टप्रद कहाणी आतां सांगावयाची आहे. दादाच्या मृत्युपर्यंत म्हणजे ता. ११-१२-१७८३ पावेतों हें प्रकरण पुरलें. लोकांच्या मनांत या खुनामुळें तीव्र संताप उत्पन्न होऊन लगेच दादाच्या विरुद्ध कारस्थान सुरू झालें, असा सामान्य समज आहे, तो खरा नाहीं. तीन महिनेपावेतों अशी भावना कोणाचेच मनांत उत्पन्न झाली नव्हती; आणि दादानें दुसरे अतिप्रसंग करून माधवरावाची व्यवस्था बिघडवून शत्रुमित्रांकडून राज्याचा अपकर्ष सुरू केला, तेव्हां खुनानंतरच्या चौथ्या म्हणजे डिसेंबर महिन्यांत, उलट दिशेचे स्पष्ट विचार कित्येक पुढाऱ्यांचे मनांत येऊं लागले. पेशव्याचे खुनाची वार्ता देशांत पसरून शत्रूंनीं उचल घेतली, त्याचे प्रतिकारासाठीं स्वारीस बाहेर जाणें दादास भाग पडलें. ता. २५-९-१७७३ रोजीं दसऱ्याचे मुहूर्तानें त्यानें बाहेर डेरे दिले; आणि ८ ऑक्टोबरास तो निजामावर रोख धरून बेदरकडे निघाला. ता. ३० नोव्हेंबर रोजीं म्हणजे खुनानंतर बरोबर तीन महिन्यांनीं सखारामबापू अत्यंत उद्विग्न होऊन दादास सोडून स्वारींतून अलग झाला, तेव्हांपासून उलट कारस्थानास सुरुवात झाली.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

यापूर्वी असें कारस्थान उभारणारांस इच्छा असली तरी त्या कामीं प्रचंड अडचणी होत्या. पहिली मोठी अडचण म्हणजे पेशव्यांचे घरांत दादाच तेवढा एक पुरुष शिल्लक होता; त्यासही काढून टाकिल्यास पेशवाईच संपली असती. यासाठीं त्यास दूर करण्याचा विचार सुद्धां मनांत आणणें धोक्याचें होतें. गंगाबाई गरोदर आहे कीं नाहीं याची निश्चिति होण्यास तीन महिने लागले. नोव्हेंबरांत तशी खात्री झाली, तेव्हां विरुद्ध कारस्थानास पहिला आधार मिळाला. बाकी प्रत्यक्ष प्रसूति होऊन मुलगा जन्मास येईपर्यंत हा आधार पुष्कळ अंशीं लंगडाच होता. उलट पक्षीं गर्भारपणाची निश्चिति होतांच, दादाचे पक्षाकडून गंगाबाईस मारण्याचे प्रयत्न सुरू झाले, तें पाहून कारभाऱ्यांचे कारस्थानास जोर आला. नारायणरावास माधवरावानें आपले हातीं सोंपिलें असतां, त्याचा बचाव आपल्याकडून झाला नाहीं, याबद्दल सखारामबापूस अगोदरच फार दुःख होत होतें, त्यांत जेव्हां गंगाबाईस मारण्याचे प्रयत्न सुरू झाले, तेव्हां आपण इतकी मंडळी पेशव्यांचें अन्न खाल्लेली जवळ असतां, गंगाबाईच्या असहाय स्थितींत तिचा आपल्या हातून नुसता बचाव सुद्धां होऊं नये, याबद्दल कारभारी व सरदार यांचे मनांत लाज, खेद व त्वेष या भावना उत्पन्न झाल्या. अर्थात् त्यामुळें चाललेल्या कारस्थानास जोर येत चालला. शनिवारवाड्यांत गंगाबाईची अवस्था अत्यंत बिकट होती. तिची सुटका कशी करावी, तिला कोठें ठेवावी, हा कारभाऱ्यांस मोठा विचार पडला. साताऱ्यास छत्रपतीजवळ ठेवावी, असा बूट निघाला; पण छत्रपतीजवळ तरी दादाचें वजन नव्हतें असें नाहीं. साताऱ्यास ती सुरक्षित राहणार नाहीं असें वाटून, पटवर्धनांकडे मिरजेस ठेवावी असा विचार चालला. पण हें नवीन जोखीम अंगावर घेऊन दादाचे रोषास मात्र होण्याची तयारी पटवर्धनांची नव्हती. अशा प्रकारच्या अनेक वाटाघाटी सुमारें दीड महिना म्हणजे डिसेंबर जानेवारींत अंतस्थ रीतीनें चालून, आंत बाहेर अनेक कारस्थानें खेळलीं; आणि बराचसा जम बसल्यावर सखारामबापूनें नारो आपाजीचे साह्यानें गंगाबाईस शनिवारवाड्यांतून माहेरीं साठ्यांचे घरीं जाण्याचे निमित्तानें बाहेर काढून तेथें लगोलग पालखींत बसवून, बंदोबस्तानें पुरंदर किल्ल्यावर पोंचविलें. तेथें माघ शुद्ध ५

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

म्हणजे ता. १७-१-१७७४ रोजीं गंगाबाईचे नांवानें उघडपणें बारभाईचा कारभार सुरू झाला. त्यानंतर ता. १८ एप्रिल रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन पुत्र झाला, त्याचे नांवानें पेशवाईचीं वस्त्रें आणवून तीं ता. २९ मे १७७४ रोजीं म्हणजे जन्मानंतर ४० वे दिवशीं पुरंदरावर स्वीकारण्यांत आलीं, तेव्हांपासून सवाई माधवरावाची कारकीर्द समजतात.

ता. १७-१-१७७४ रोजीं पुरंदरावर गंगाबाईचे नांवानें पेशवाईचा कारभार चालू होतांच, दादा व कारभारी यांचा उघड सामना सुरू झाला. त्यांत प्रथम ता. २६ मार्च रोजीं पंढरपुराजवळ कासेगांवच्या मैदानावर लढाई होऊन कारभाऱ्यांचा पुढारी जखमी होऊन मरण पावला, त्यामुळें दादास जोर येऊन त्यास पळून जाणें शक्य झालें. मे महिन्याचे आरंभीं तो इंदुरास सिंदेहोळकरांकडे गेला. तेथें कांहीं तडजोड ठरून त्या सरदारांनीं त्यास सेप्टेंबरांत परत तापीपावेतों आणिलें. त्या ठिकाणीं बापू व नाना पुरंदराहून बोलणें करण्याकरितां गेले. परंतु भेटी होऊन निकाल लागण्यापूर्वींच सन १७७४ डिसेंबरचे आरंभीं दादा पुन: पळून माळव्यांत धारेस गेला; आणि तेथें थारा न मिळाल्यामुळें तो धारेहून परभारें पश्चिमेस पंचमहालांत उतरून डिसेंबरअखेर बडोद्यास पोंचला. तेव्हांपासून पुढील कारस्थानास निराळे फांटे फुटले. तात्पर्य, ता. ३०-८-१७७३ रोजीं खून झाल्यापासून पुढील सोळा महिन्यांची वरील वासलात दृष्टीपुढें ठेविली असतां, त्यांतील अनेक घडामोडी समजण्यास सुलभता येईल.

नारायणरावाचे वधानंतर थोडी बहुत स्थिरस्थावर झाल्यावर दसऱ्याचे दिवशीं दादा डेरेदाखल झाला. त्या अवधींत भवानराव प्रतिनिधीनें गारद्यांची समजूत काढिली. कराराप्रमाणें पांच लाख रुपये, आणि ठाणें, पुरंदर, नगर हे तीन किल्ले मिळाल्याशिवाय ते वाडा सोडीनात. किल्ले देण्याचें दादानें नाकारिलें. तेव्हां मस्तानीचा नातू अलीबहादर यास आपण पेशवाईवर आणणार, असें गार्दी बोलूं लागले. तेव्हां तीन किल्ल्यांबद्दल तीन लाख व कराराचे पांच लाख मिळून आठ लाख रुपये रोख, व आपल्या जिवास दगा होणार नाहीं अशी हमी दादापासून घेऊन, गारदी वाड्यांतून बाहेर पडले. वास्तविक हा एक प्रकारचा देखावाच होता. गारद्यांवर दादाची मर्जी सुप्रसन्न असून पुढें पुष्कळ दिवसपर्यंत सुमेरसिंग, खरकसिंग,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महंमद इसफ व तुळ्या पवार हे मुख्य मारेकरी दादाजवळ विश्वासु सेवक म्हणून कारभार करीत. तसेंच पूर्वींच्या कारभारांतील रुष्ट मंडळी आतां लगोलग आपापले मतलब साधण्यासाठीं दादाचे पक्षास सामील झाली. सदाशिव रामचंद्र, सखाराम हरि, आबाजी महादेव, हरि भिडे, विठ्ठल विश्राम, तुळ्या पवार आणि गारदी सरदार हे सदैव दादाचे पक्षास चिकटून राहिले; आणि दादाची, भिस्तही सर्वथैव त्यांजवरच होती. मोरोबा दादा, मालोजी घोरपडे, मुधोजी भोसले, गोविंदराव गायकवाड, बाजीपंत अण्णा जोशी, मानाजी फांकडे वगैरे कित्येक मंडळी केवळ मतलबापुरते दादास मिळत, परंतु दादा ठिकाणीं बसल्यावर ते बारभाईच्या उद्योगांत परत आले. भवानराव प्रतिनिधि व बाबूजी नाईक या दोन व्यक्ती नेहमींच लहरी व ओढून चंद्रबळ आणणाऱ्या होत्या. भगवंतरावाशीं भवानरावाचें वांकडें, आणि भगवंतरावावर बारभाईची कृपा, एवढ्याच कारणानें भवानराव कांहीं काळ दादास मिळाला. बाबूजी नाईक दादाचा व्याही म्हणून त्याजकडे ओढला जात असे, परंतु अंतःकरणांतून त्यास दादाचा व्यवहार पसंत नव्हता. उलट पक्षीं सखारामबापू, नाना, मोरोबा फडणीस, पटवर्धन मंडळी, रास्ते, घायगुडे, हरिपंत फडके हे सर्व अंग बचावून प्रसंगावर नजर देऊन वागत होते. सखारामबापूचा कारभार दादानें चिंतो विठ्ठलास दिला, तेव्हां बापू उदासीन झाला. पण तूर्तातूर्त ही मंडळी दादाचे हुकूम उठवून, होस हो म्हणून दिवस कंठूं लागली. सर्वांकडून दादानें राजनिष्ठेच्या शपथा घेवविल्या. अशी शपथ न घेई तो राजद्रोही समजून दादा त्याचें पारिपत्य करी. मोरोबा फडणीस प्रथम दादाचे विरुद्ध होता, परंतु पुढें गंगाबाई पुरंदरास पोंचल्यावर बापू व नाना मुखत्यारीनें सर्व कारभार पाहूं लागले, त्यामुळें वैषम्य वाटून मोरोबा रुष्ट झाला आणि पुढें हलके हलके दादाचे तर्फेनें फितुर वगैरे करूं लागला. वास्तविक माधवरावाचे वेळेस मुख्य कारभार कांहीं काळ मोरोबानेंच केला, त्यामुळें आपण प्रमुख असावें अशी त्यास हाव होती. उत्तरोत्तर त्याचीं विरुद्ध कारस्थानें विकोपास गेल्यावर नानानें सन १७७८त मोरोबास कैदेंत घातलें, तेथेंच त्यास नानाचे मृत्युपर्यंत बावीस वर्षे दुःखमय स्थितींत कंठावीं लागलीं. गंगाधर यशवंत हा दुसरा एक दादाचा साथीदार

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

ता. २०-२-१७७४ रोजीं मरण पावल्यानें, तितकें कारभाऱ्यांचें जोखीम कमी झालें.

हैदराचा वकील आपाजी राम पुण्यास दादाचे मसलतींत राहून केवळ आपल्या धन्याचें हित साधीत होता. त्यानें पुण्यांतून हैदरास लिहिलें, 'संधि फार चांगली आली आहे. आपण क्षण विलंब न करितां, फौजा पाठवून, शिरें, मदगिरी, चेनरायदुर्ग, होसकोटें, बाळापुर, वगैरे तालुके लगोलग हस्तगत करावे'. हैदरानें या सूचनेचा फायदा घेऊन वरील ठिकाणें तावडतोब कावीज केलीं. ही बातमी ऐकिल्यावर कर्नाटकाकडे स्वारी करणें दादास अपरिहार्य झालें.

खुनाचा प्रकार पार पडल्याबरोबर दादा आपला पक्ष मजबूद करण्याचे उद्योगास लागला. स्वतःचें ठाम मत बनवून त्याचा अंमल करण्याचें धैर्य त्यास असतें, तर या बिकट प्रसंगांतून त्याची निभावणूक झाली असती. खुनाचे चौथे दिवशीं त्यानें मुधोजी भोसल्यास पत्र लिहिलें, कीं 'आपला आमचा स्नेह पहिल्यापासून. आपलें चित्त आमच्या ठायीं अति स्वच्छ. हा अर्थ व्यंकटराव व लक्ष्मणराव काशी सांगत आले. तो चित्तांत आणून, आपले सरदारीचा बंदोबस्त, ज्यांत आपलें कल्याण व सरकारउपयोग, तोच प्रकार निश्चयांत आणून, कराराची याद लक्ष्मणराव काशीबरोबर पाठविली आहे. तो सांगतील तो प्रकार चित्तांत आणून येथील लक्ष राखून दोन हजार खडी फौज घेऊन, रघूजी भोसले यासह अतिशीघ्र निघून यावें. बाकीची सारी फौज दर्याबाई व इस्मायलखान यांजपाशीं ठेवावी'. याच तारखेस चिंतो विठ्ठलानेंही मुधोजीस लिहिलें, कीं 'इकडील वर्तमान पेशव्याचे खुनाचें वगैरे व्यंकटराव काशी यांनीं लिहिलें आहे, त्यावरून कळलेंच असल. दादांनीं सर्व प्रकारें कृपा करून करारमदाराच्या यादी व पत्रें देऊन लक्ष्मणराव काशी यांस आपणास आणावयास पाठविले आहेत, त्यास आपण अविलंबें येण्याचें करावें'. वरील यादी व करार पाहण्यालायक आहेत. खुनाच्या पहिल्या तारांबळींत दादानें मुधोजीस बोलाविलें खरें, परंतु तो थोड्या फौजेनिशीं न येतां सर्वच फौज घेऊन येऊं लागला, तेव्हां दादानें घाबरून जाऊन त्यास लिहिलें, 'एवढी मोठी फौज घेऊन येण्याचें कारण नाहीं. तुम्हीं सडेच यावें'. मुधोजी व दादा यांच्या ह्या हालचालीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पाहून साबाजीस जास्तच जोर चढला. नारायणरावानें त्यास सेनासाहेब सुभा पद दिलेलें टिकतें कसें, याची चिंता लागून, त्यानें धौंशा व रुक्नुद्दौला यांचे साह्यानें निजामास मिळवून घेतलें. हें वर्तमान ऐकून साबाजीचा बंदोबस्त करण्यासाठीं निजामावर स्वारी करणें दादास भाग पडलें. इकडे हैदरानें कर्नाटकांतला सर्व मुलूख जिंकल्याची बातमी आली, तें समजतांच प्रथम निजामाचा बंदोबस्त केल्यावर लगेच पुढें हैदरावर चालून जाण्याचा निश्चय दादानें केला. त्रिंबकराव पेठे, पटवर्धन, प्रतिनिधि वगैरे सरदार त्यानें आपल्याबरोबर घेतले. मनांतला विचार कीं, साधल्यास निजाम हैदरांचा पाडाव करून आपलें बळ वाढवावें; आणि कदाचित् अंगावर बाजू आली तर त्या दोघांचे साह्य मिळवून त्यांचे जोरावर आपल्या विरोधकांस ठिकाणीं बसवावें. अशा दुहेरी उद्देशानें दादा बाहेर पडला. मद्रासकर इंग्रजांसही दादानें पत्र लिहून आपण पेशवाईच्या गादीवर बसलों, ही वार्ता आनंदानें कळविली. दादा दूर गेल्यामुळें विरुद्ध पक्षास कट करण्यास सवड मिळाली'.

२. **निजामहैदरांवर दादाची स्वारी,** (नोव्हेंबर–फेब्रुवारी).—परंतु पेशवाईचीं वस्त्रें घेणें दादास जरूर होतें. प्रथम कांहीं दिवस लोकांचीं मनें शांत होईपर्यंत त्यानें वस्त्रें आणविण्याची घाई केली नाहीं. रामराजा अपेशी, त्याजकडून वस्त्रें घेणारास धार्जिणें लागत नाहीं. अशी दादाची समजूत असून, वस्त्रें स्वतः आपण न घेतां दत्तक मुलगा अमृतराव याजला तीं द्यावीं, असा त्याचा बेत झाला. ऑक्टोबरांत त्यानें बजाबा पुरंदरे व भवानराव प्रतिनिधि यांजबरोबर अमृतरावास त्यानें साताऱ्यास पाठविलें. रविवार, ता. १० ऑक्टोबर रोजीं वस्त्रें घ्यावयाचीं होतीं. मध्यंतरीं आनंदीबाई पुण्याहून स्वारींत दादाकडे गेली; तिनें नवऱ्याचें मन वळविलें, कीं तुम्हीच वस्त्रें घ्या. तें मान्य करून दादानें लगोलग साताऱ्यास अमृतरावास लिहून कळविलें कीं, 'वस्त्रें इकडे आम्हांसाठीं घेऊन यावीं, तुम्हीं स्वतः-स्वीकारूं नयेत. आम्ही स्वारी फत्ते करून मग छत्रपतींचे दर्शनास येऊं'. पुढें वस्त्रें घेऊन अमृतराव आला. दादाचा मुक्काम भीमातीरीं होता. तेथें त्यानें आपल्या नांवचा पेशव्याचा नवीन शिक्का केला तो असा : शाहूनरपति हर्षनिधान । रघुनाथ बाजीराव मुख्य प्रधान ॥ यांत रामराजाचें नांव

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

न घालतां त्यानें मुद्दाम गतकालीन शाहूचें नांव घातलें; आणि कार्तिक शुद्धांत म्हणजे ऑक्टोबर अखेरीस आळेगांव येथें वस्त्रांचा स्वीकार केला.

उत्तर हिंदुस्थानांतील फौजा नारायणरावानें परत बोलाविल्या होत्या हें मागें सांगितलेंच आहे. तदनुसार विसाजी कृष्ण बिनीवाले लोकांचे फडशे करून जामदारखाना व हत्ती सुद्धां येऊन दादास भेटला. त्यानें पुष्कळसें जवाहीर व द्रव्य तिकडून आणिलें तें पुण्यांतच त्यानें दादास अर्पण केलें. त्यामुळें तूर्त दादाची पैशाची अडचण दूर झाली. 'बावीस लक्ष रुपये, जवाहीर व जामदारखाना वाड्यांत ठेवून विसाजीपंतास बरोबर घेऊन स्वारीस गेले', (का. सं. श.). त्या वेळीं दादाचे विरुद्ध कोणतीही चळवळ नसल्यानें विसाजी कृष्णासही द्रव्य दादाचे स्वाधीन केल्यावांचून उपाय नव्हता. नाना फडणीस या वेळीं दादाचे पोटांत शिरून जवळ राहून विश्वासानें कारभार करीत होता. 'सर्वांच्या लबाड्या व दोष दादा नानांकडे सांगतात'. याप्रमाणें दादाचे जवळ राहून त्याचे चित्ताचा ठाव नानानें कांहीं दिवस बरोबर घेतला, म्हणूनच त्यास पुढील कारस्थान रचण्याचें सामर्थ्य आलें. 'कोण विश्वासू व कोणावर इतराजी हें समजत नाहीं. कोणाच्या पायपोस कोणाचे पायांत नाहीं. सारेच बुडवे असा पाया दिसतो'. पटवर्धनांच्या राजनिष्ठेबद्दल दादाची खात्री नानानें करून दिली. परशुरामभाऊ व वामनराव यांस नाना जामीन राहिला, तेव्हां दादानें त्यांची भेट घेतली. कांहीं काळ त्यांजवर दादाची बहाल मर्जी होती. आळेगांव येथें ता. ३०-१०-१७७३ रोजीं मुधोजी, रघूजी व दर्याबाई भोसले येऊन दादास भेटले. त्या प्रसंगीं दादानें सेनासाहेबाचीं वस्त्रें रघूजीस दिलीं. यावरून साबाजीस राग येऊन त्यानें पेशव्यांचे मुलखांत दंगा सुरू केला. साबाजी व निजाम यांचें संगनमत होतें. सबब त्यांचें पारिपत्य करण्यासाठीं दादानें भीमातीर सोडून ता. ५-११-१७७३ रोजीं नळदुर्गास मुक्काम केला. बरोबर फौजेचा जथ चाळीस हजार पावेतों होता. तेथें निजामाचे वकील येऊन बोलणीं चालू झालीं. साबाजीचा मिलाफ सोडून द्या, अशी मागणी दादानें केली, ती निजामानें मान्य केली नाहीं. तेव्हां निजामाचा किल्ला औसा हस्तगत करून दादानें बेदरकडे चाल केली. इकडे साबाजी भोसल्यानें नगरचे बाजूस गडबड उडवून

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पुण्यावर चालून येण्याची आवई उठविली. त्यामुळें नोव्हेंबरांत पुण्यास पळ व गडबड सुरू झाली.· म्हणून दादानें तावडतोब त्रिंबकराव पेठे व रास्ते यांस साबाजीवर रवाना केलें; आणि मुधोजी, धायगुडे, बाबूजी नाईक, वामनराव पटवर्धन वगैरेंस बरोबर घेऊन आपण निजामाचे मुकाबल्यास गेला. ता. १८ नोव्हेंबरपासून बेदरजवळ दोघांचा सामना चालू झाला. 'सर्व कारभार मोगलांचा, दुसरा उद्योग नाहीं. अरुणोदयीं स्नानसंध्या उरकून सभोंवता फेर करीत असावें'. प्रथम चार दोन दिवस थोडीबहुत गोळा-गोळी व लढणें झालें. नंतर उभय पक्षीं सुमारें एक महिना अरसपरस बोलणीं होऊन निजामानें दादास भाळवून आपला मतलब सिद्धीस नेला. आरंभीं वीस लक्षांचा प्रदेश व औरंगाबाद शहर दादास देण्याचें त्यानें कबूल केलें; आणि करार ठरल्यावर तो स्वतः दादाचे भेटीस आला. 'दादांनीं वाड्याचे बाहेर जाऊन हातीं धरून डेऱ्यांत आणिलें. मसलत झाली. उपरांत उभयतांचें भोजन एकत्र झालें. दोघे खासे व रुक्नुद्दौला व कृष्ण-राव काळे चौघे खलबतांत होते. श्रीमंतांनीं निजामावर कृपा करून जहागीर माफ केली. एकमेकांनीं समयास येऊन कुमक करावी, माधवरावाचे वेळचा भाऊपणा चालवावा, असा करार झाला. दादांनीं हत्ती, घोडे, शिरपेंच मोत्यांची कंठी, माळा वगैरे बहुमान दिला. रात्रीचेच बेदरास निघून गेले'. ता. २३ डिसेंबरपावेतों बेदरास मुक्काम होऊन वरप्रमाणें निजामाशीं समेट करून दादानें पंचमहालांतून सुरापुरची खंडणी घेऊन अर्काटचे रोखें कूच केलें. ता. १७-९-१७७३ रोजीं तंजावरचा किल्ला व शहर महंमद अलीचे तर्फे इंग्रजांनीं फौज पाठवून काबीज केलें, ही बातमी दादास बेदर येथें कळली; आणि शिवछत्रपतीपासून चालत आलेलें राज्य हातचें गेल्याबद्दल वैषम्य वाटून तें परत मिळविण्याचा आवेश दादास उत्पन्न झाला. परंतु अर्काट-वर चालून जाण्यापूर्वींच दुसरीं प्रकरणें उपस्थित होऊन, तंजावरचा कार्य-भाग मागें पडला. मद्रासकर इंग्रजांचें कृत्य इंग्लंडांतून नामंजूर होऊन, पुढें पुरंदरचा तह झाला त्याच सुमारास ता. ११-४-१७७६ रोजीं तंजावरचें राज्य तुळाजीराजे भोसले यास परत मिळालें.

दादा स्वारींत गेल्यावर मागें ता. १५ नोव्हेंबरपासून विरुद्ध कारस्थान सूरू झालें, तेणेंकरून त्याच्या उद्योगांत विलक्षण फरक पडत गेला.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निजामाकडून वीस लक्षांचा मुलूख येत असतां तो त्यास माफ करून दादानें सलूख केला, याचा अर्थ इतकाच कीं, प्रसंग पडल्यास निजामानें आपणास मनापासून साह्य करावें. परंतु तो कावेबाज केवळ आपलें हित पाहत होता. नम्र भावानें त्यानें दादाचा गौरव करून त्यास साफ चकविलें. परत गेल्यावर लगेच त्याचा साबाजी भोसल्याशीं दृढभाव झाला. सुरापुरचा पेमनाईक मृत्यु पावला, म्हणून तेथील खंडणीची व्यवस्था ठरवून दादानें ता. ९-१-१७७४ रोजीं तुंगभद्रातीरावर बसालतजंगाची भेट घेतली. तेथून दक्षिणेस बल्लारीच्यापुढें पन्नास मैलांवर रायदुर्ग व कल्याणदुर्ग हीं ठिकाणें आहेत, तेथपावेतों हैदराचे रोखानें व तंजावरच्या तजविजीसाठीं दादा चालून गेला. बल्लारीच्या पूर्वेस गुत्ती येथें मुरारराव घोरपडे होता, त्यास दादानें आपणाजवळ बोलावून घेतलें. या टापूंत दादाचा मुक्काम फेब्रुवारीअखेरपावेतों झाला. तेवढ्या अवधींत इकडे पुण्यांत विरुद्ध कारस्थान सिद्धीस जाऊन त्याची पूर्ण उमज त्यास पडला. ता. १८ जानेवारीस गंगाबाई पुरंदरास पोंचून तिच्या नांवानें तेथें पेशवाईचा कारभार सुरू झाल्याचें दादास कळलें. कृष्णराव काळे हा हुशार व प्रसंग पाहून वागणारा गृहस्थ कारभाऱ्यांचें बाजूचा दादाजवळ होता, त्यानें बिनीवाले, रास्ते, पटवर्धन, घायगुडे, प्रतिनिधि वगैरे मंडळींत फितूर करून दादाच्या नाड्या चहूंकडून आंखडीत आणिल्या. या परिस्थितीची खरी जाणीव दादास प्रथम हैदरानें आपल्या वकिलामार्फत करून दिली. स्वतः दादास त्याची दाद नसावी याबद्दल आश्चर्य वाटतें. रायदुर्गनजीक हयग्रीवा नदीचे तीरीं कनकेळ येथें भवानराव प्रतिनिधि व दादा यांची चकमक फेब्रुवारीचे आरंभीं उडाली, त्या योगानें दादाचे डोळे उघडले. दादाच्याच आग्रहावरून भवानरावानें तीन हजार फौज चाकरीस ठेविली होती. तिला आतांचे आतां निरोप द्या असा हुकूम दादानें भवानरावास कळविला, तो भवानरावानें मान्य केला नाहीं. तेव्हां दादानें मुरारराव घोरपड्यास हुकूम केला कीं, प्रतिनिधीवर हल्ला करून त्याचा गोठ लुटा. मुराररावानें सांगितलें, हे आमचेच भाईबंद, यांजवर मी हात टाकणार नाहीं. पटवर्धन वगैरे दुसऱ्या सरदारांस दादानें तें काम सांगितलें असतां, त्यांनींही तें अमान्य केलें. ते जाणत होते कीं,

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

आज जी भवानरावाची गत, तीच उद्यां आपली. दुसरे कोणी हुकूम ऐकेनात, तेव्हां स्वतःच दादानें आपली हुजरात व गारदी घेऊन प्रतिनिधी-च्या गोठास गराडा घातला; आणि आंतून समजुतीच्या गोष्टी चालू केल्या. परंतु प्रतिनिधि कांहीं केल्या ऐकेना. तो लढाईस सज्ज होऊन मरण्यास तयार झाला. असा हा गोंधळ सारखा एक आठवडा चालू होता. प्रतिनिधि वठणीस येईना, तेव्हां त्यास पकडण्याचा हुकूम दादानें हुजरातीस केला. त्या प्रसंगीं प्रतिनिधीचे लोक 'आपण प्राण देऊं पण यजमानाचा बचाव करूं', अशी शपथ घेऊन लढाईस सज्ज झाले. भवानरावानें आपल्या बायकोस पुढें आपल्या घोड्यावर बांधून घेतली. प्रसंग आल्यास तिला मारून आपणही मरून जावें, असा त्यानें निश्चय केला. तो त्याचा निश्चय पाहून त्याजवर हात टाकण्यास हुजरात किंवा गारदी यांची छाती झाली नाहीं. ता १ फेब्रुवारी १७७४ च्या रात्रीं हा शेवटचा निकर झाला. 'गोळागोळी झाली. श्रीमंतांनीं तोफा तयार केल्या. सोडल्या मात्र नाहींत. शेवटीं नामोहरम होऊन दादानें आपले लोक परत नेले, आणि मध्यस्थाचे मार्फत भवानरावास अभय देऊन भेटीस बोलाविलें आणि सांगितलें, फौज कमी करण्याबद्दल आमची तुम्हांवर सक्ति नाहीं, तुम्हीं खुशाल आपल्या गोठांत राहवें'. येणेंप्रमाणें प्रकरण मिटलें, परंतु उभयपक्षीं दंश राहून भावी स्थितीची ओळख दादास पटली. पटवर्धनांशींही अशाच प्रकारची कटकट झाली. पुढें लवकरच पुरंदरावर गंगाबाईचा कारभार चालू झाल्याची बातमी येऊन पटवर्धन वगैरे सरदार दादास सोडून चालते झाले. अशा अडचणींत दादानें हैदराशीं तह करून त्याचें मित्रत्व संपादन केलें. माधवरावानें अत्यंत कष्ट करून कृष्णा व तुंगभद्रा यांच्या दक्षिणेकडील जितका मुलूख जिंकला होता, तितका सर्व हैदरास परत देऊन त्याचे बदल्यांत दादास सहा लक्ष खंडणी त्यानें द्यावी आणि पेशवाईवर दुसऱ्या कोणाचा हक्क न समजतां दादाचाच समजावा, असा ठराव झाला. यास कल्याणदुर्गचा तह म्हणतात, (फेब्रुवारी १७७४). इतकें करून फेब्रुवारीअखेर दादा परत फिरला. ता. ८ मार्च रोजीं त्याचा मुक्काम भीमाकृष्णांचे कपाटसंगमावर झाला. मुरारराव घोरपड्याची इच्छा या घरगुती भानगडींत पडण्याची नसल्यामुळें, त्यानें दादाचा निरोप घेऊन गुत्तीस प्रयाण केलें. एवंच मार्च सन १७७४ पासून पुढें गृहयुद्धास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

उघड सुरुवात झाली. वास्तविक दादानें या स्वारींत कांहीं एक पैदास केली नाहीं. निजाम व हैदर यांस सर्वस्व देऊन खूष केलें; आणि फेब्रुवारी महिना दूर प्रांतीं उगाच फुकट घालविला. त्यापेक्षां स्वारीच केली नसती तर विरुद्ध कारस्थान त्यास दडपून टाकतां आलें असतें. निदान फेब्रुवारींत लगोलग त्यानें पुण्यावर चाल केली असती तर, बारभाईंची तयारी पूर्ण झालेली नसल्यामुळें, त्यांचा पाडाव झाला असता. उलट पक्षीं, एकदम पुण्यावर आल्यानें सर्वच लोक फितूर होऊन आपणास सोडून जातील या भीतीनें दादा हळूहळू आपला जम बसवीत व प्रतिपक्षावर नजर ठेवीत, साशंकतेनें वागूं लागला. या वेळीं कारभारी जर एकदम निकरानें वागते, तर हयग्रीवेच्या कांठीं प्रतिनिधीचा दंगा झाला त्याच वेळीं पटवर्धन, विसाजीपंत बिनीवाले, धायगुडे वगैरेंनीं एकदम दादास पकडलें असतें, म्हणजे तंटा मिटला असता. पण त्यांची अपेक्षा अशी असेल कीं, सर्व लोक फितूर होऊन दादास सोडून जातील, म्हणजे तो सहज उघडा पडेल, आणि आपोआप शरण येईल. लढाई केल्याशिवाय दादास कबजांत घेणें शक्य नव्हतें. लढाईत एकदां शस्त्र चालूं लागल्यावर कदाचित् दादाचे जिवावर बेतेल या भीतीनें, प्रत्यक्ष दादाशीं समोरासमोर लढण्याचा मार्ग कारभारी मंडळानें मुद्दामच अखेरपर्यंत स्वीकारिला नाहीं, म्हणूनच पुढें अनेक भानगडी उपस्थित होऊन सात वर्षें युद्ध लांबलें.[१]

३. **गंगाबाईचा पुरंदरावर कारभार.**—नोव्हेंबरांत दादानें पुण्याकडून प्रयाण केलें, तो चार महिन्यांनीं १५ मार्चचे सुमारास पंढरपुरचे रोखें येत असतां, इकडे या अवधींत मागें पुण्यास कारस्थानाची उभारणी कशी झाली तें प्रथम सांगितलें पाहिजे. नारायणरावास कैदेंत ठेवून दादानें स्वतः पेशवाई चालविली असती, तर त्यास बहुधा विशेष कोणाचा विरोध झाला नसता. परंतु ब्रह्महत्त्या, स्त्रीहत्त्या, गोहत्त्या, इत्यादि अनन्वित कृत्यें स्वतः सर्व कराविलीं नसलीं तरी स्वतःचे डोळ्यांसमोर होऊं दिलीं, त्यांचा यत्-

---

१ **आधार.**—ना. भो. का. १४-१७; भा. इ. मं. फारसी प. २८.१७; खरे ले. १२७२, १२८४, १२८७, १२८८, १२९१, १२९२, १२९४, १३०६, १३१०, १३२६, १३२७. धा. रा. च; भा. व. श.; का. सं. श.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

किंचित् प्रतिकार केला नाहीं, प्रकरण उरकून गेल्यावरही गुन्हेगारांना जवळ बाळगून त्यांस डोक्यावर चढवून ठेविलें, आणि कर्त्या मंडळीवर वक्रदृष्टि धरिली, यामुळें त्याजबद्दलचा पूज्यभाव कांहीं थोड्या स्वार्थी व्यक्ती खेरीज-करून सर्व जनतेच्या अंतःकरणांतून पार मावळला. पुढें महिना दोन महिन्यांत रामशास्त्र्यानें तपास करून न्यायदेवतेनें हीं पापें दादाचे माथीं मारिलीं. त्याबरोबर लोकांत अनिवार क्षोभ उत्पन्न झाला. वास्तविक दादास जगांतून नाहींसें करावें, अशी आसुरी भावना सुदैवानें समाजांत वावरत नव्हती. नाहीं तर त्यास स्वर्ग दाखविण्यास उशीर लागला नसता. युद्धांत अनेकवार समोरासमोर आला असतांही, त्याजवर गोळी न टाकतां समस्त लोकांनीं त्यास परीत्वा करूं दिलें, म्हणून तो इतक्या वर्षे वांचला. गंगाबाई गरोदर आहे अशी खात्री होतांच, लोकक्षोभास जीवन प्राप्त झालें. परंतु त्याबरोबर तिला मारून टाकण्याचे दादाच्या पक्षाचे प्रयत्न सारखे चालू झाले. 'आनंदीबाई गर्भपात व्हावयाचीं साधनें फारच करितात, तीं पत्रीं लिहितां पुरवत नाहींत. गर्भपात न झाल्यास मारावी. तसें न घडून पुत्र झाल्यास, त्यास अपाय करावा, या साधनांत आहेत. इतके श्रीमंतांच्या अन्नानें वाढलेले, आणि हा प्रकार देखत देखत होणार, त्याचा बचाव कोणाच्यानें होईना. बचावाची गोष्ट बोलेल तो अवकृपेंत. आम्ही असून व्यर्थ. अमृतराव सातान्यास वस्त्रें आणण्यास गेला, त्यास मार्गानें जवाहिराचा डबा हरवला. अमृतराव प्रथम शनिवारवाड्यांत आला, ते दिवशीं दादाचे पूजेचें लिंग भग्न झालें. चिरंजिवांचें पागोटें वडिलांचें दर्शन घेत असतां पडलें. तेच समयीं देवाजवळची समई पडली. अशीं अनेक दुश्चिन्हें झालीं. बनेल त्या युक्तीनें गंगाबाईच्या गर्भाच्या बचावांत आहों. यांत काय घडेल तें पहावें'. असें परशुरामभाऊ पटवर्धन ता. ११-१०-१७७३रोजीं लिहितो. वरील दुश्चिन्हांत लोकांची भावना व्यक्त होते. ऑक्टोबर अखेरपर्यंत हे विचार मनोमय होते, त्यांस वाचा फुटली नव्हती. ऑक्टोबरअखेरीस ती वाचा न्यायदेवतेनें फोडिली. या समयांत गंगापुरास गोपिकाबाईची अत्यंत केवीलवाणी स्थिति झाली. खुनाचा प्रतिकार करणें बाजूस राहून, उलट दादाचाच उत्कर्ष होऊन त्याचा कारभार चालू झाला, हें पाहून तिचें हृदय करपून गेलें. सर्वस्वाचा त्याग करून ती गंगापुर सोडून पंचवटींत येऊन मठांत राहिली;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

चार घरची भिक्षा आणून उदरपोषण करूं लागली. 'या थोरांच्या गती मग इतरांची कथा काय!' पुढें सवाई माधवरावाचा जन्म होऊन त्याचे नांवानें कारभार सुरू झाल्यावर ती परत गंगापुरास गेली. गोपिकाबाई सर्व राष्ट्रास पूज्य. तिचा वैताग पुण्याचे लोकांस कळल्यावर त्यांस परम द्वेष उत्पन्न झाला. आपणास कांहींच करतां येत नाहीं काय? अशी प्रत्येकाची भावना झाली.

इकडे सखारामबापू फार दिवस कुंठित होऊन ऑक्टोबरअखेर अक्कलगुंग स्थितींत होता. तेवढ्या अवधींत त्यानें हळूहळू कित्येक प्रमुख मंडळींच्या अंतःकरणाचा ठाव घेतला, विचारानें मग मनाचा निश्चय करून विरुद्ध कारस्थान उभारण्याचें ठरविलें; आणि त्याचें पुढारपणही त्यानेंच स्वीकारिलें, हें त्यास भूषणावह आहे. त्यास कितीही स्वार्थ असला तरी राज्याचें हिताहित चांगलें कळत होतें. नोव्हेंबर १५ चे सुमारास दादा साबाजीवर चालून गेला, तेव्हां बापू सिद्धटेकावरून प्रकृति बिघडली म्हणून यात्रा करीत फिरत फिरत सासवडास आला. पटवर्धनांचा कारभारी शिवाजी बाबाजी म्हैसकर हाच या कारस्थानांत आपल्या यजमानांस जागृत ठेवून बापूचा हस्तक म्हणून वावरत होता. त्यानें निरनिराळ्या इसमांच्या अंतस्थ रीतिनें भेटी घेऊन, बापूच्या सल्ल्यानें पुढील बेत नक्की केला. 'रास्ते, दोघे फडणीस, पुरंदरे, कृष्णराव काळे वगैरे देशस्थ मंडळी आपल्या लगामींच आहेत. मनसबा केल्यास गर्भाचें संरक्षण होईल. ऐसें करतां पुत्र झाल्यास उत्तमच, न झाल्यास कोणी भाईबंद दत्तक द्यावा'. असें राजकारण बापूनें गुप्तरूपानें निरनिराळ्या प्रसंगीं निरनिराळ्या सरदारांशीं वाटाघाट करून नक्की केलें. नानास बापूचा विश्वास येईना. तेव्हां आपल्या तर्फेचे हरिपंतास पुढें करून स्वतः नाना मागें राहिला. अर्थात् सर्व कारस्थान बापूनेंच पुढाकार घेऊन सिद्ध केलें. पटवर्धनांनीं विशेष आग्रह करून नानास कटांत घेतलें. गंगाबाई मालक, बापू मुख्य व नाना दुय्यम कारभारी, आणि त्रिंबकराव पेठे फौजेचा अधिकारी, असा निश्चय ठरून तदनुसार पुढील उद्योग सुरू झाला. या सर्व मंडळींनीं आणक्रिया केली. त्यांनीं गंगाबाईस शनिवारवाड्यांतून माहेरीं जाण्याचा सन्नता घातला. दादा लांब गेले म्हणजे तिला सातार्‍यास आणावी आणि सार्‍यांनीं एक

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

मंडळ करून बंदोबस्त करावा. निजाम, भोसले यांस मिळवून घ्यावें. सातारा किल्ला नानाचा हस्तक बाबूराव कृष्ण आपटे याच्या ताब्यांत होता. 'बापूंनीं बाईला साताऱ्यापर्यंत आणावी, मग वर घेण्याचें काम आपलें, असें नानानें कळविलें'. डिसेंबरचे आरंभीं नाना फडणीस आजाराचें निमित्त करून दादाची रजा घेऊन पुण्यास आला. त्यानंतर परशुरामभाऊ, बाबूजी नाईक, गणपतराव रास्ते, हेही कांहीं ना कांहीं सबबीनें निघून आले. बाबूजी नाईक पुढें पुरंदरावर येऊन कारभाऱ्यांस भेटला. 'मेजवानी झाली. शपथ बेलभंडार झाला. येथें ठेवण्याजोगे नव्हते, यास्तव निरोप दिला'. अशी कित्येक मंडळी दुटप्पी होती. आनंदराव खासगीवाले व हरिपंत फडके घरीं पुण्यासच होते, ते या कारस्थानाच्या तर्तुदींत तत्परतेनें वागले. त्रिंबकराव पेठे दादाच्या हुकमानें साबाजीवर चालून गेला होता, तिकडे त्यानें साबाजीस भेटून आपले पक्षांत मिळवून घेतलें, आणि सर्व सिद्धता होतांच दादावर उलटून त्यांनीं चढाई करण्याचें ठरविलें. राहतां राहिला वामनराव पटवर्धन, त्यास सर्व कारस्थानाची माहिती असून दादाचे बरोबर लष्करांत राहून तो तेथचा कार्यभाग पुरा करीत होता. त्यानें दादाशीं गोड भाषणें करून त्यास इतकें भारून ठेविलें होतें कीं, 'एवढे पटवर्धन मात्र आमचे चाकरींत कसूर करीत नाहींत', असें तो वारंवार म्हणे. 'श्रीमंत कृपा फारच करितात, चाकरीविषयीं वामनराव व परशुरामभाऊ फारच जपतात', असे त्या वेळचे उल्लेख आहेत.

पुढें गंगाबाईस साताऱ्यास नेण्याचा बेत रहित झाला. त्यांत विशेष धोका व निष्कारण छत्रपतींच्या भानगडी उपस्थित झाल्या असत्या. डिसेंबरांत पुण्यांत नाना तऱ्हेच्या बातम्या उठूं लागल्या. कारभाऱ्यांच्या बेताची चर्चा घरोघर चालू झाली. पुण्याचा कारभार या वेळीं नारो आपाजीकडे नसून, दादानें आपल्या पक्षांतला केशवराव केतकर यास कोतवालीचे कामावर नेमिलें होतें. पुण्यास गंगाबाईची अवस्था दिवसेंदिवस कठिण होऊं लागली. 'पार्वतीबाई व गंगाबाई यांस मारून टाकावें असे मारेकरी सांपडले. त्यांनीं नांवें आनंदीबाईचीं घेतलीं, (ख. ले. १३३१ व इ. १०७). मागें झाल्या कार्याचा सूड घ्यावा, हें कारभाऱ्यांच्या अंतर्यामीं होतेंच, इतक्यांत हें निमित्त अनुकूल झालें. बापू, नाना व हरिपंत यांनीं उभारणी

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

करून दोनअडीच हजार राउतांनिशीं गंगाबाईस किल्ल्यास नेलें. बंदोबस्त केला. तेथें अवघ्या सावकारांस बोलावून नेऊन धीर दिला. त्यांनीं लागेल तो पैसा पुरविण्याचें कबूल केलें. पुरतें पारिपत्य करावें असेंच सर्वांनीं चित्तावर धरिलें आहे'. माघ शुद्ध ५ ता. १७-१-१७७४ रोजीं पुण्यांतून गंगाबाईस काढून कारभाऱ्यांनीं पुरंदरावर नेली. तेथें सर्व कारखाने नेऊन बंदोबस्त करून बाईचा हुकूम चालू केला. जवळ कारभारी बापू व नाना. कोतवाल केशवराव केतकर बाईचे हुकुमानें पकडून कैदेंत ठेविले; आणि गंगाबाईचे नांवाची द्वाही नारो आपाजीकडून पुण्यांत फिरविली. तसेंच साताऱ्यास व इतर ठिकाणीं बंदोबस्त करून सर्वांस इशाऱ्याची खबर अंतस्थ रीतीनें पाठविली. दादाचे पक्षास जे लोक होते, त्यांच्या घरीं चौक्या बसविल्या, आणि सर्व बाजूंनीं त्यांचा उच्छेद आरंभिला. त्यांचीं बायकामुलें कैदेंत टाकून मालमत्ता जप्त केली. तसेंच कारभाऱ्यांनीं लगोलग नवीन फौज तयार करून ती हरिपंताचे हाताखालीं त्रिंबकरावाचे मदतीस रवाना केली. कृष्णराव काळे दादाजवळ लष्करांत होता, त्यास कारभाऱ्यांच्या कृत्यांची पूर्ण माहिती असून, त्या धोरणानें त्यानें लष्करांतील मंडळींत फितूर केला. वास्तविक आपल्याकडच्या अनिर्बंध विस्कळित स्थितींत भिन्न प्रकृतींची एक मोट बांधून एकमुखी कारभार चालविणें सहसा शक्य नसतें. म्हणूनच हें कारस्थान व्हावें तितकें यशस्वी झालें नाहीं. मात्र दादास पेशवाईचा कारभार करूं न देण्याचा मुख्य हेतु सिद्धीस गेला, हें काम थोडें नव्हे. कारण दादा विलक्षण चपळ व हिकमती होता, योषिता व शिशु यांचे मार्फत त्याचीं अनुसंधानें चालत. कशाही अडचणींतून निसटून जाणारा असल्यामुळें, त्यानें आठ वर्षेंपावेतों सर्व विरोधकांस पुरेपुरे करून सोडिलें. अशा पुरुषानें आत्मचरित्र लिहून ठेविलें असतें तर त्या ग्रंथानें पाश्चात्य गुन्हेगारांच्या अलीकडील अजब कसबांच्या गोष्टींस मागें टाकिलें असतें. कोणाही एका इसमाच्या साह्यानें दादा चालला नाहीं. शागीर्दापासून तों चिंतो विठ्ठल किंवा सखारामबापू पर्यंत त्याचीं खलबतें चालत. 'तुजवर मात्र माझें प्रेम व विश्वास, तुझ्याच मतानें मी चालणार, बाकीचे सारे लबाड', असें तो प्रत्येकास सांगे, व तेवढ्या घटकेपुरतें त्याचें ऐकेही. यामुळें प्रत्येक बाबतींत दिवसांतून दहा रंग पालटत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

'तोंडावर तेज नाहीं. काळीमा आली आहे. खर्चास पैसा नाहीं. सावकारांचे गुमास्ते पकडून पैसा मागतात', असा त्याचा प्रकार या वेळीं झाला होता, (ख. ले. १३३२). मुधोजी भोसल्याची समजूत करून दादानें त्यास परत नागपुरास रवाना केलें; आणि गोविंदराव गायकवाडास मेजवानी करून व सेनाखासखेली देऊन कडलूर संगमावरून ता. १५-१२-१७७३ रोजीं गुजराथेंत पाठविलें. अर्थात् प्रसंग पडल्यास बाह्य प्रदेशांत आपल्या तर्फेचे असले साहाय्यक त्यानें सर्व ठिकाणीं उत्पन्न करून ठेवले होते. इंग्रजांशीं तर त्याचें अनुसंधान जुनेंच होतें.

फेब्रुवारीचे आरंभीं कारभाऱ्यांचा जम चांगला बसला. त्या वेळीं दादा कृष्णेच्या दक्षिणेस बल्लारीजवळ, त्रिंबकराव पेठे व साबाजी भोसले गोदावरीच्या बाजूस, आणि निजाम नांदेडकडे, अशी स्थिति होती. दादास पुण्याकडील प्रकार कळल्यावर मार्चांत तो महाराष्ट्रांत परत येऊं लागला. पटवर्धन, रास्ते, धायगुडे, बिनीवाले वगैरे त्यास सोडून गेले. पंचमहालांतून परत येतांना पटवर्धन व रास्ते यांच्या मुलखाची नासाडी करीत, दादा साताऱ्याच्या रोखानें मिरजेच्या बाजूस येऊं लागला. त्याबरोबरच फितुरी लोकांचें पारिपत्य त्यानें चालविलें. भवानराव प्रतिनिधि व रामचंद्र गणेश यांस जबरदस्तीनें पकडून त्यानें नजरकैदेंत ठेविलें; आणि प्रतिनिधीची फौज उधळून दिली. विसाजीपंताचे मुलास पकडून हाल करून त्याजपासून दीड लाख दंड घेतला, आणि त्यास जवळ कैदेंत ठेविलें. रास्त्यांचा तालिकोट व बागलकोट या तालुक्यांतला उघडा मुलूख जाळून लुटून ओस पाडिला. इतक्यांत त्रिंबकराव व साबाजी परिंच्याकडून, निजाम कलबुर्ग्याकडून व हरिपंत पुण्याकडून असे पन्नास हजार फौजेनिशीं आपणावर चालून येतात अशी दादास बातमी आली. दोघांच्या आघाडीचा थोडथोडा मुकाबला चालू झाला, तेव्हां गलगलें, तेरदाळ, जमखिंडी वगैरे पटवर्धनांचा मुलूख उद्ध्वस्त करून दादा मिरजेवर चालून येऊं लागला. इतक्यांत वामनराव पटवर्धनही लांब मजलांनीं येऊन त्रिंबकरावास मिळाला. या पूर्वींच साताऱ्याचा बंदोबस्त करण्यासाठीं हरिपंत फडके गेला होता, तोही लगोलग जाऊन त्रिंबकरावास सामील झाला. भोसले व निजाम त्वरेनें कूच करीनात. तेव्हां त्यांस सोडून त्रिंबकराव वगैरे दादाचे मुकाबल्यास

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

 Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

त्वरेनें चालून आले. तें पाहून दादानें मिरजेचा रोख सोडून दिला, आणि विजापुरास जाऊन तेथून सांगोल्यावरून पंढरपुरचे बाजूस आला.

मार्चचे दुसरे दोन आठवडे उभयपक्षांस मोठे धामधुमीचे गेले. छत्रपतींपासून तों राज्यांतील तमाम, लोकांकडे उभयपक्षांच्या शिफारसी, वशिले व बंदोबस्त चालू झाले. हरिपंतानें साताऱ्यास जाऊन छत्रपतीकडून दादास पदच्युत करविलें, आणि पेशवाईचीं वस्त्रें गंगाबाईच्या, व कारभाऱ्यांचीं बापूनानांच्या, नांवें घेतलीं. फेब्रुवारी ता. २८ रोजीं छत्रपतीचें आज्ञापत्र निघालें तें असें. 'रघुनाथ बाजीराव यांनीं नारायणराव पंडित प्रधान यांजवर कसाला केला ही गोष्ट धर्मराज्यांत अयोग्य झाली. पुढें त्यांनीं पेशवाईचीं वस्त्रें मागितलीं ती संकट जाणोन पाठविलीं. परंतु पेशवाईची मर्यादा अगदींच राहिली नाहीं. हल्लीं भवानराव, त्रिंबकराव, साबाजी व वामनराव गोविंद हे स्वामींच्या लक्षांत आहेत, तरी तुम्हीं त्यांचे लक्षांत वागून स्वामिसेवा करून दाखविणें'. हें आज्ञापत्र तमाम राज्यांतील मुख्य अडतीस इसमांस काढण्यांत आलें, त्यामुळें कारभाऱ्यांचे उपक्रमास चांगलाच जोर आला, (का. सं. प. या. ४४७). दादास पदच्युत करविल्यावर छत्रपतीकडून गंगाबाईच्या नांवानें वस्त्रें आणण्याचीही तजवीज झाली, परंतु प्रत्यक्ष वस्त्रें आणिलीं नाहींत असें खालील पत्रांवरून दिसतें. हीं पत्रें परशुरामभाऊनें साताऱ्यास बाबूराव आपटे यास लिहिलेलीं असावींत.

श्रीगणपति. पो १४ जिल्काद.

राजश्रिया विराजित रा० रा० बाबूराव स्वामींचे सेवेशीं. पो परशुराम रामचंद्र सा. न. वि. उपरी, येथील कुशल जाणून स्वकीय लिहीत जावें. विशेष. श्रीमंतांनीं पदाचीं वस्त्रें साताऱ्याहून आणावयाकरितां रा० त्रिंबकराव पेठे यांस पाठविलें आहेत. तर पेशजीचे सांप्रदाय तुम्हांस ठाऊकच आहेत. त्याप्रमाणें श्री० महाराजांसी विनंति करून मारनिल्हे यांजबरोबर वस्त्रांची रवानगी व्हावी. बहुमान जातां व येतां पेशजीच्या शिरस्त्या बमोजीब व्हावा. छ १२ जिल्काद (२३-१-१७७४). ब. का. लि. लो. अ. द्यावा हे वि.

राजश्री बाबूराव सुभेदार स्वामीचे सेवेशीं. विनंति उपरी. तुम्हीं चिठी पाठविली ती पावली. महाराजांस विनंति करून मुहूर्तानें वस्त्रें व

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

समय टळूं न देतां, दुरंदेशावर नजर देऊन सुमुहूर्तानें वस्त्रें व शिक्केकटार व निशाण, स्वामींची कृपा संपादून घेऊन ठेविलीं हें मोठें काम केलें. सिंद्याकडील गृहस्थ यावयाचा गुंता आहे, यास्तव रा० त्रिंबकराव आपा वगैरे यावयास अवकाश आहे. ते आल्यानंतर ते व आम्ही सर्व मंडळी-सुद्धां निघोन येतों. सांप्रदायानुरूप समारंभ करून आज्ञेप्रमाणें वस्त्रें घेऊन येऊं. रावजी! तुम्हीं समय साधून वस्त्रें घेऊन ठेविलीं हें फार चांगलें केलें. ही कारस्थानी लिहून कळवावीशी नाहीं. सर्व मंडळी वरती यावयाची जाल्यानंतर अगोधर आपणास इशारा करितों. छ १५ जिल्काद (२८ १-१७७४). ब. का. लि. हे वि.[1]

पुण्याहून सर्व मंडळी पुरंदरास पोंचण्यास अवकाश होता. दादा सातान्यास जाणार अशी आवई होती. ती खटपट बंद पाडण्याकरितां उभयतां कारभारी त्रिंबकराव पेठे, पटवर्धन, वगैरे सर्व प्रथम सातान्यास जाऊन तेथील बंदोबस्त करून गंगाबाईच्या नांवें वस्त्रें आणणार होते. परंतु पेठे, पटवर्धन वगैरे दादाच्या मुकाबल्यास गुंतून सातान्यास जाऊं शकले नाहींत, म्हणून वस्त्रें आणण्याचें हें काम तसेंच अर्धवट राहिलें असावें. पुढें गंगाबाई प्रसूत झाल्यावर सवाई माधवरावाचे नांवें पेशवाईचीं वस्त्रें घेण्यांत आलीं.

कारभाऱ्यांनीं पुरंदरावरून दुसरें मोठें काम आरंभिलें तें खुनांत सामील असलेल्या इसमांस शिक्षा करण्याचें होय. हें सत्र फार वर्षें चालू होतें, आणि त्याजबद्दलचा आवेश नाना फडणिसाचे ठिकाणीं विशेष चढलेला होता. फेब्रुवारी व मार्च हे दोन महिने हें सत्र फारच जोरांत चालून शें-पन्नास लोकांस व त्यांचे कुटुंबीयांस कैदेंत अडकवून ठेवण्यांत आलें. मुख्य आरोपी दादाच ठरल्यामुळें त्याच्याशीं त्यांनीं युद्ध चालविलें. आनंदी-बाई पेशव्यांच्या घरांतली बायको, तेव्हां तिच्यावर सामान्य नजर ठेवण्या-पलीकडे कागदोपत्रीं तिचा उल्लेख मुद्दामच कोठें ठेवण्यांत आला नाहीं असें दिसतें. त्या वेळच्या प्रचंड वाङ्मयांत आनंदीबाईसंबंधाचे प्रत्यक्ष उल्लेख अगदीं विरळा आहेत. त्यांचे खालोखाल तिघे गारदी जमादार व तुळ्या

१. हीं पत्रें रा० वा. वि. जोशी, सातारा यांजकडून मिळालीं. दुसरी-कडे प्रसिद्ध झालीं नसल्यामुळें येथें पूर्णच घेतलीं आहेत.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पवार, हे ह्या वेळीं सरदार बनून दादाचा पक्ष सांभाळीत होते. त्यांस पकडून मृत्युमुखीं पोंचविण्यास कित्येक वर्षे लागलीं. दुसऱ्या कोणासही मृत्यूच्या शिक्षा झाल्या नाहींत. एकंदर सुमारें पन्नास इसम खुनांत सामील असलेले शिक्षा पावले. त्यांची जातवारी व नांवनिशी वर पृष्ठ ३४१ येथें देण्यांत आली आहे. हे सर्व व यांचीं कुटुंबें आप्तसोयरेसुद्धां पकडून निरनिराळ्या छत्तीस किल्ल्यांवर पोटास देऊन बंदोबस्तांत ठेवण्यांत आले. या सर्वांचीं घरेंदारें व मालमत्ता सरकारजमा करण्यांत आली. दादाचे फौजेंत लढणारे सरदार किंवा लोक यांचाही तपास लावून त्यांची जप्ती करण्यांत कसूर झाली नाहीं.

ह्याचाच दुसरा भाग स्वपक्षीयांस उत्तेजन देणें. पुरंदरावरून गंगाबाईचे नांवानें हुकूम व पत्रें पाठवून त्यांचा दीलदिलासा करण्यांत आला. ता. २३-२-१७७४ रोजीं नरसिंगराव धायगुडे यास बापू लिहितोः 'तुमचें लक्ष इकडे पुरतें आहे, तें कळलें. त्यास भवानराव व वामनराव सांगतील त्याप्रमाणें ते व तुम्ही मिळोन एकदील होऊन कर्तव्य तें करावें. सर्व गोष्टी तुम्हांस समजल्याच आहेत. मेहेनतीचे कारस्थानीचे दिवस हेच आहेत'. पुढील निकाल बराचसा साबाजी भोसल्याच्या वर्तनावर अवलंबून होता. तो पराक्रमी व फौजबंद असून, निजामाचे दोन सरदार रुक्नुद्दौला व धौशा हे सर्वस्वी साबाजीस अनुकूल होते. यामुळें ज्या पक्षास साबाजीची मदत, त्याची फत्ते होणार, हें उघड होतें. सबब त्रिंबकरावाचें बोलणें होऊन, त्याचे खर्चास दरमहा एक लाख देण्याचें त्रिंबकरावानें ठरविलें. ही रक्कम खरें म्हटलें तर त्याच्या मोठ्या फौजेस पुरेशी नव्हती; आणि तीही वेळेवर रोख त्यास पोंचविण्याचें सामर्थ्य त्रिंबकरावास नव्हतें. मुलूख सर्व बेचिराख होऊन, दादा तर वाटेल त्या युक्तीनें लोकांस हैराण करूं लागला. तो निकरावर आल्यानें कशाचीही खिजगणती करणारा नव्हता. यामुळें पुरंदरास पैशाची मोठीच अडचण पडूं लागली. कोणतेंही काम पैशाशिवाय चालेना. वर्षसहामहिने स्वस्थपणा मिळाल्याशिवाय पैशाची उपज होणें संभवनीय नव्हतें. अशा स्थितींत कारभारी स्वतःच्या जबाबदारीवर सावकारांस जातरोखे लिहून देऊन कर्जें काढून कसाबसा

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

निभाव करीत होते. त्यांतून मराठे लोक म्हणजे केवळ मतलबास चिकटून राहणारे, अगोदर हातांत पैसा पडल्याशिवाय त्यांचें पाऊल हालायचें नाहीं. दादाची अनन्वित रीत कारभाऱ्यांस स्वीकारतां येत नव्हती. अशा अनेक अडचणींचा जाच पुरंदरावरील कारभारांत उपस्थित झालेला लक्षांत ठेवणें जरूर आहे.[1]

४. **उभय फौजांचें बलाबल,** (मार्च १७७४).—लढण्याची मुख्य भिस्त त्रिंबकराव व हरिपंत यांजवर होती. दोघेही गंगाबाईच्या पक्षाचे कट्टे अभिमानी होते. परंतु हरिपंताचा मृदु व गोड स्वभाव त्रिंबकरावांत नव्हता. जवळ पैसा नसल्यामुळें लोकांपुढें पदर पसरून व नाकें घासून ते कसेबसे त्यांस थांबवून धरीत होते. कित्येक प्रसंगीं लष्करांतील लोकांनीं हरिपंतास अडवून उपास पाडिले. अशा स्थितींत हरिपंतानें वर्षानुवर्षें कंठिलीं. अंगच्या अनुपमेय सौजन्यानें व चिकाटीनें हरिपंतानें आलेल्या प्रसंगास तोंड दिलें, म्हणूनच दादाच्या विरुद्ध कारभाऱ्यांचा निभाव लागला. हरिपंताच्या अडचणींचें खरें चित्र साबाजीच्या पत्रांत पाहवयास मिळतें. या वेळचीं साबाजीचीं मुबलक पत्रें दहाव्या खंडांत छापलेलीं आहेत. पैकीं कांहीं खुद्द साबाजीचीं असून, कांहीं त्याचा कारकून कृष्णाजी नारायण जोशी यानें स्वारींतून पुरंदरास आपल्या बापास लिहिलेलीं आहेत. त्याचा बाप नारायण कृष्ण पुरंदरास कारभाऱ्यांजवळ होता. इकडे साबाजीजवळ दादाचेही वकील सारखें धरणें धरून बसलेले होते. साबाजीवर दादाची यापूर्वी अत्यंत वक्रदृष्टि होती. परंतु या वेळीं त्यास दादानें पाहिजे तसे करार लिहून दिले. उघडच आहे, देणें नाहीं घेणें नाहीं, मग वचने किं दरिद्रता! उदाहरणार्थ, ता. १८-३-१७७४ रोजीं दादानें साबाजीस लिहून दिलेला करार, (ना. भो. का. ले. ४ चा) पाहण्यालायक आहे. त्यांत साबाजीस सेनासाहेबसुभा

१. **आधार.**—खरे ले. १२७२, १२७३, १२९३, १२९९, १३०२, १३०९, १३२२, १३२८, १३२९, १३३१, १३३२, १३६४; इ. १०७; खं. १०-८७, ८८, ९५; का. सं. प. या. ले. ४४७; स. मा. रो. १-६०—७८, १२४, १२५, १२६, १२९—१३२, १३७, १३८, १४१, १५०, १५८ व २५६.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

पद व बत्तीस लक्षांची जहागीर देऊं केली आहे. याच वेळीं मुधोजीसही दादानें असेच करार लिहून दिलेले होते. परंतु साबाजी दादास चांगला ओळखीत होता. त्यानें 'साफच जबाब दिला कीं प्राणही जाऊ, विपरीत गोष्ट घडणार नाहीं. आमचे वृत्तीस क्षणोक्षण पालट करूं नका'. हैदराकडे-ही दादानें फौजेची मदत मागितली. पण त्यानें साफ कळविलें, कीं 'मी कृष्णेपलीकडे येणार नाहीं'.

भोसल्यांच्या भानगडीसंबंधाचीं पन्नासांवर पत्रें मार्च महिन्यांतलीं आहेत. त्या सर्वांचा उल्लेख येथें करितां येत नाहीं. पण तीं समग्र वाचल्यानें परिस्थितीचा बोध स्पष्ट होतो. सखारामबापूच्या आग्रहावरून दिवाकरपंत चोरघोडेही साबाजीस येऊन मिळाला, आणि कारभाऱ्यांचे कारस्थानास हातभार लावूं लागला. कृष्णराव काळ्यानें दादाचे फौजेंत फितूर पसरून मार्चचे आरंभींच नांदेडास जाऊन साबाजीची भेट घेतली. तेथून मग दिवाकरपंत निजामाकडे गेला. निजामानें कळविलें, 'आम्ही कलबुर्ग्याचे बाजूनें दादावर चालून जातों'. त्यानंतर पुनः भवानी शिवराम यास साबाजीनें निजामाकडे त्वरा करण्यासाठीं पाठविलें. ता. ३ मार्च रोजीं साबाजी, त्रिंबकराव व निजाम यांच्या भेटी कलबुर्ग्यानजीक गुंजोटी येथें झाल्या. सर्वत्र त्वरेचीं पत्रें खेळत होतीं. या पत्रांवरून दिसतें कीं, मनुष्य आकळून घेण्याचें कसब त्रिंबकरावास नव्हतें. 'मामांचें भाषण रुक्ष, विकोपास कारण होतें. त्यांचे सल्लागार देवाजीपंत मामास आप्त वाटतात. पण ते हितशत्रु. निजामही फार आर्जवांत आहेत. पण मामा पदोपदीं भाषणांत नाशितात. समयीं मानभंग करितात. येथें नानांनीं किंवा बापूंनींच यावें. मामांशीं संबंध असल्यास ठीक नाहीं. त्यांस प्रसंगोपात्त विचारणा दिसत नाहीं. हे दिवस जरबेचे नाहींत. समाधानानेंच सर्व गोष्टी निभावल्या पाहिजेत'. त्रिंबकरावाचा हा स्वभाव सर्वत्र मशहूर होता. स्वतः शूर व हिंमती खरा; परंतु स्वभावानें खटका पाडणारा असल्यामुळें त्याजकडे व्यवहार करण्यास लोक संकोच करीत. हा त्याचा स्वभाव ओळखून साबाजीनें बापू व नाना यांस पुनः पुन्हा विनवून लिहिलें कीं, तुम्ही पुरंदर सोडून फौजेंत या म्हणजे, ताबडतोब कामें उठतील. परंतु कारभाऱ्यांस अनेक कारणांमुळें पुरंदर सोडून जाणें शक्य नव्हतें. तेथचा बंदोबस्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

लंगडा होता. कोणे वेळेस धाड येऊन गंगाबाईचा नाश होईल याचा नेम नव्हता. शिवाय बापू व नाना फौजबंद नव्हते. त्यांसच रस्त्यांत कोणी सखाराम हरि अगर महंमद इसफ सारख्यानें पकडून किंवा मारून टाकिलें, म्हणजे सर्व कारभार आटोपला असता. म्हणून त्यांस जागेवरून हालतां येईना. त्रिंबकरावास दूर करून हरिपंतास काम सांगावें, तर तो नाराज होणार, म्हणून आलेल्या अडचणी ते जशा तशा निभावीत होते. साबाजीनें तर आपणांस पैसा किंवा कर्ज देण्याविषयीं अट्टाहास करून सोडिला. परंतु ही अडचण सर्वांसच मोठी होती. महिना लाख कबूल केलेले सुद्धां त्यास वेळेवर पोंचेनात. त्यामुळें तो जवळजवळ निरुपयोगी झाला. त्याचीं दोन पत्रें खं. १०-१०२, १०३ चीं वाचण्यालायक आहेत. पहिलें तर त्याचें स्वतःच्या हातचें व स्वतःच्या गांवठी भाषेचा मासलाच आहे असें दिसतें. 'आमचे पदरीं रुपया नाहीं. दुसरी गोष्ट, हे मसलत जहालियावर आम्ही अलंकारयुक्त निर्वेधपणें लौकिक बरा करून सौख्यानें भाकर खावी. जेथें जीवच समर्पिला, तेथें दौलत काय चीज. आमचा साह्यकारी राव. मसलतींत अनुसरून मारिलें. घात केला'. अशीं साबाजींचीं पत्रें मोकळेपणीं लिहिलेलीं आहेत. या वेळीं मुधोजी भोसले दादाकडे दुरून सौरस्य दाखवून अंतस्थपणें वामनराव पटवर्धन वगैरे मंडळींस भेटून साबाजीस हाणून पाडण्याचे मसलतींत होता. दादाचा डाव फसणार अशी त्याचीही खात्री झालेली दिसत होती. दर्याबाई तर साबाजीसच मिळाली. अशा परस्पर अनेक भानगडी साबाजी-मुधोजीच्या या वेळीं चालत असून, खर्चास नसल्यामुळें त्यांनींही सर्व प्रदेश बेलाशक लुटून फस्त केला.

ता. ११-३-१७७४ रोजीं हरिपंत फडके साबाजीस जाऊन मिळाला. 'त्यासही खर्चाची निकड. रोज धरणींपारणीं. कुचास अडथळा. समयीं कूच होऊं न द्यावें. तिडण म्हणावयास भक्षावयाची. वरकड कायावाङ्मनसा आपले लक्षीं आहों'. असें साबाजीनें कळविलें. 'दादाचे लष्करांत अवसान नाहीं. मामांचें बळ भारी दिसतें'. सर्वांनीं मिळून त्यांस विश्वरूप दाखवावें असें आहे. त्यांस धरतील अथवा लुटतील असें दिसतें'. अशा प्रकारचे बेत होत असतां फेब्रुवारीअखेर दादा सर्वांच्या हातावर तुरी देऊन निसटला. पुरंदरावरून मुख्य सूत्रें हालत असून [illegible] सखाराम;

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

रायचूर, नगर एवढ्या टापूंत वावरणाऱ्या निरनिराळ्या सरदारांस पोंचण्यास अवकाश लागे, आणि बातम्या लगोलग बाहेर फुटत, त्याचा फायदा दादास मिळाला. ता. ८ मार्च रोजीं दादा कपाटसंगमावर येतांच इकडे त्रिंबकराव, हरिपंत, रास्ते, पटवर्धन, निजाम, साबाजी वगैरेंनीं पुढील आठचार दिवसांत कलबुर्ग्यापासून साताऱ्यापावेतों एक रांगच रांग आपल्या फौजांनीं बांधून, दादास अलीकडे येऊं न देतां सांपडेल तेथें पकडण्याचा बेत ठरविला. या वेळीं त्रिंबकराव व हरिपंत विजेसारखे धावपळ करीत होते. साबाजी व निजाम यांजकडे दादाचें संधान असल्यामुळें, त्यांस हातचे न सोडतां, आपला कार्यभाग यांस साधावयाचा होता. 'दोन फौजांचा सामना एकदां व्हावा म्हणजे दादाकडे कोणी राहत नाहींत, त्यांचें अवसान परिच्छिन्न गेलें आहे', इतक्या दादाच्या नाड्या यांनीं आंखडीत आणिल्या. त्यामुळें दादा भांबावून गेला; कारभाऱ्यांशीं समेट करण्याकरितां त्यानें वकीलही पाठविले. पण ती केवळ हूल होती. तसेंच साताऱ्यास जाऊन छत्रपतीस कबजांत घेण्याचा त्याचा प्रथम विचार असून त्या धोरणानें तो कुडची पावेतों आला. त्यास अडविण्यासाठीं साबाजी, मुधोजी, रुक्नुद्दौला, विठ्ठल शिवदेव व नारोशंकर यांच्या सड्या फौजा लगोलग कऱ्हाडचे जवळ जयरामस्वामीचे वडगांवावर आल्या. तेथून दक्षिणेस ५० मैलांवर दादाचा मुक्काम होता. लवकरच उभयतांचा सामना होण्याचा योग होता. मालोजी घोरपडे दादाचे पक्षांत असलेला हा सर्व रंग पाहून दादास सोडून आपले जागीं मुधोळास जाऊन स्वस्थ बसला. ता. १५-२० मार्चचे दरम्यान अशी परिस्थिति असतां, सामनेवाल्यांस चुकवून निघून जाण्याच्या इराद्यानें दादानें मिरजेचा रोख सोडून पंढरपुरचा रस्ता धरला. तेव्हां हरिपंतास साताऱ्याचे बंदोबस्तास पाठवून त्रिंबकराव दादास गांठण्यासाठीं लगोलग सांगोल्यावरून कासेगांवचे मैदानावर जाऊन उतरतो, तोंच ता. २६ मार्च रोजीं त्याजवर दादानें चढाई केली. ता. २०-२१ मार्च रोजीं हरिपंत साताऱ्यास होता. तेथील बंदोबस्त करून तोही त्रिंबकरावास मिळण्यासाठीं ताबडतोब पंढरपुराकडे गेला, पण तो पोंचण्यापूर्वींच कासेगांवचा संग्राम उरकला होता.[१]

---

१. **आधार.**—खरे ले. १३३२, १३३३, १३३५; ना. भो. का. ४; खं. १०, ८९-९२, ९५, ९८, १०२, १०३, १०६, १०७, ११०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

५. कासेगांवची लढाई, (चैत्र शु. १५ रवि०, ता. २६-३-१७७४).—दादानें मिरजेचा रोंख सोडून पंढरपुराकडे प्रयाण केल्याची बातमी कळतांच, त्रिंबकराव तसाच निकरानें दादाचे पाठीवर लांब मजला करून सांगोल्यावरून कासेगांवास गेला. दुसऱ्या बाजूनें रास्ते, पटवर्धन वगैरे मंडळी त्याच रोखानें मागोमाग त्रिंबकरावाजवळ आली. पळून जाणें, सल्लख करणें, किंवा साधल्यास एखादा सामना करणें, असे दादाचे डाव सारखे चालले होते. उलट पक्षीं कोणत्याही उपायानें दादास पकडून हस्तगत करणें हा उद्योग त्रिंबकरावाचा होता. त्रिंबकराव कासेगांवास येतांच त्यास बातमी लागली कीं, 'कूच झालें असतां दादांनीं मागती मुक्काम क्षेत्रावर केला, आणि फौजा जमा करितात'. त्यावर परशुरामभाऊनें मामास कळविलें कीं, 'वेणूनाद गोपाळपुरावर श्रीमंत तयार झाले आहेत, तर गांठ घालावी'. इतकें होत आहे तोंच दादाची फौज त्रिंबकरावावर चालून आली. प्रथम त्यांनीं चिठी पाठविली, कीं 'संधान केल्यास उभय पक्षीं बरें'. परंतु ही केवळ हूल होती. जबाबाची वाट न पाहतां एकदम चालून आले. त्रिंबकराव व पटवर्धन यांच्या फौजा तीनचार दिवस लांब मजला करून थकलेल्या होत्या, हें समजूनच दादानें पुढें गाडदी व मागें तोफा घालून एकाएकीं चाल केली. डावे बाजूस पटवर्धन, उजवे बाजूस रास्ते, नारोशंकर, व विठ्ठल शिवदेव यांच्या फौजा, व मध्यें त्रिंबकराव, असे फरा धरून दादाचे हल्ल्यास तोंड देऊन गेले. परंतु दादानें डावे उजवे बाजूस विशेष मारा न करितां, त्यानें मामावरच एकदम घसरा केला. तेव्हां मारामारी होऊन माणूस फार जायां झालें. मामाचा निशाणाचा हत्ती दादानें पकडून नेतांच सर्व भीड त्याजवरच पडली. त्यामुळें मामाच्या फौजा उधळून गेल्या. मामास तोंडावर, खांद्यांवर व कुशीस असे तीन वार तरवारीचे लागले. अर्ध कोस पावेतों अलीकडे आले. तेथें घोड्यावरून खालीं येतांच दादाचे मंडळींनीं पकडून नेलें. जखमा असाध्य होऊन आठवे दिवशीं मार्गांत खडकतचे मुक्कामीं देवाज्ञा पावले. पटवर्धनांनीं महंमद इसफाशीं गांठ घातली, पण त्याचे अंगांत चिलखत असल्यामुळें टाकलेले वार त्यास लागले नाहींत. लढाई सहा घटका रात्रपर्यंत चालली. नंतर पटवर्धन व इतर लोक, भोसले व निजाम यांची फौज मागें होती, त्यांस येऊन मिळाले. हरिपंत लढाईत

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

हजर नव्हता. लढाई आटोपल्यावर येऊन पोंचला. म्हणूनच त्यानें पराभूत फौजांचें समाधान करून जम राखिला. 'मामांनीं उतावळी करून गांठ घातली. आमचे येण्याची वाट पाहवयाची होती. बाकी एकदां कार्यास प्रवर्तलों ते मामा गेल्यामुळें चुकतों असा प्रकार नाहीं'. असें साबाजी लिहितो. हरिपंतानें सर्वांस धीर देऊन पुढील उद्योगाची तयारी केली, आणि पुरंदरास व इतरत्र लढाईचें वर्तमान पाठवून, मामा गेल्यानें कांहीं एक नुकसान झालें नाहीं, कोणीं धीर सोडूं नये, अशी सिद्धता केली.

कासेगांवच्या लढाईनें परिस्थितींत कांहींच फरक झाला नाहीं. त्रिंबकराव जखमी होऊन शत्रूचे हातीं जिवंत सांपडल्यानें दादास पलायनाची सवड मिळून कारभाऱ्यांचे उद्योगांत प्रथमच मोठा व्याघात झाला. त्रिंबकराव शूर, अनुभवी व गंगाबाईचा कट्टा अभिमानी होता. तरी विरोधी मंडळींवर त्याची छाप पडत नसे. तो मरण पावल्यानें आरंभीं कांहीं वेळ लोकांस असेंही वाटलें कीं, दादा आतां लगोलग पुण्यावर चालून येऊन विरोधकांचा पाडाव करील. परंतु तशी त्यास छाती झाली नाहीं. दादाची फौज फितुरलेली आहे, ती लढणार नाहीं असें समजून, त्रिंबकरावानें घाईघाईनें दादावर चाल केली, भोसले वगैरे साहाय्यकांची अपेक्षा ठेविली नाहीं, म्हणून त्याचा पराभव झाला, असा या लढाईवर साबाजीचे पक्षाचा आरोप आहे तो खरा दिसत नाहीं. वास्तविक भोसलेनिजामांचें हें लोढणें गळ्यांत अडकवून घेतल्यानेंच प्रकरण लांबलें. अखेरपर्यंत हें लोढणें कारभाऱ्यांस धरवेना व सोडवेना. ता. १५मार्च-पासून दादा व सामनेवाले गांठ घालण्याच्या मर्यादेंत होते. वडगांवावरूनच सर्वांनीं त्वरा करून दादास गांठलें पाहिजे होतें. परंतु दादा आपल्या हातांतून निसटून पुढें गेलेला पाहून मामानें त्याचे मागोमाग लगट केली. तथापि त्यानें होऊन उतावळेपणानें दादावर चाल केली नाहीं. तो व पटवर्धन लांब मजला करून आलेले पाहतांच त्यांजवर दादानें एकदम तोफखान्या-निशीं चाल केली. त्या वेळीं मामानें मागें सरून साबाजी व निजाम पुष्कळ मागें होते त्यांजकडे पळून यावें तें मात्र त्यानें केलें नाहीं. उलट ज्या सामन्याची आपण इतके दिवस वाट पाहत होतों, तो आयता प्राप्त झाला, बरें झालें, असें वाटून मामानें हिंमतीनें दादाशीं सामना केला; आणि भोसले व निजाम मागें होते त्यांसही निकडीनें पुढें येण्याविषयीं

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कळविलें. पण ते कुचराई करून मागेंच राहिले. ते जर लगोलग पुढें चालून आले असते, तर मामा पडल्यावरही दादाचा पाडाव झाला असता. पटवर्धन व रास्ते एकजुटीनें व निकरानें लढले. हरिपंत प्रसंगास येऊन पोंचला नाहीं हें वाईट झालें. दादाचा धीर मात्र पूर्वी अगदींच खचला होता, तो या विजयानें क्षणमात्र वर आला. त्यानें लगोलग पंढरपुरांतून कर्जपट्टीनें, व दिल्लीहून विसाजी कृष्णानें आणलेलें जवाहीर गहाण ठेवून, बरीच मोठी रक्कम जमा केली; आणि चाळीस हजार फौजेचा जथ करून पुरंदरावर चालून येण्याचा विचार तो करूं लागला. या बातम्यांनीं कारभारीही घाबरून गेले. दादाचा राग त्यांस माहीत होता, तेव्हां त्यांनीं सातान्यास जाऊन छत्रपतीला बाहेर काढण्याचा विचार ठरविला. स्वतः छत्रपति लढूं लागल्यावर त्याजबरोबर लढण्यास सरदार व लोक यांची छाती होणार नाहीं, असा हा सरदारांचा डाव होता. परंतु दादासच पुढें येण्याची छाती झाली नाहीं. हरिपंतानें त्याचे साथीदार फितूर केले आणि निजामास व साबाजीस मिळवून दादास पकडण्याचा जोर चालविला. तेव्हां त्याची खात्री झाली कीं, आतां पुनः लढाई करून आपला निभाव लागणार नाहीं, म्हणून समेटाची उगाच हूल दाखवून, पलायनाचा एकच उपाय राहिला, तो त्यानें स्वीकारिला. पुढील पांच सहा वर्षांत पलायनावांचून बचावाचें दुसरें साधन त्यास राहिलें नाहीं. महंमद इसफ, सखाराम हरि, सदाशिव रामचंद्र वगैरे कित्येक जिवास जीव देणारे साथीदार त्यास होते, तोंपर्यंत त्याचा निभाव लागला. त्यांतील एक एक साथीदार हरिपंतानें ठिकाणीं बसविला, तेव्हांच दादा उघडा होऊन त्याचा पाडाव झाला. मात्र यास सात वर्षें लागलीं.

त्रिंबकरावाच्या पराभवानें पुरंदरावर कारभाऱ्यांचा धीर खचल्याचें दिसत नाहीं. बातमी घेऊन हलकारे येत असतां बापूनें किल्ल्याच्या खिडकींतून त्यांस दुरून पाहूनच विपरीत वर्तमान कसें ताडलें, इत्यादि व पुरंदरावरील एकंदर व्यवस्थेच्या मोठ्या गमतीदार अनेक आख्यायिका, हरिवंशाच्या बखरींत भरपूर दिलेल्या आहेत. ता. १-४-१७७४ रोजीं नाना व बापू पटवर्धनांस लिहितात, 'लढाई होऊन मामा पाडाव झाले त्यास उपाय नाहीं. पुढें योजिला मनसुबा शेवटास न्यावा हाच

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विचार येथील आहे. तुम्हीं सर्वांनीं आळस न करितां मसलत शेवटास न्यावी. आम्ही उभयतां साताऱ्यास जाऊन राजमंडळाचे सरदारांस पत्रें लिहून तुमचा उपराळा करितों. हरिपंतास घेऊन सर्वांनीं एकचित्तें शेवटास न्यावें. दादांकडील सरंजामीयांच्या घरीं निकडच केली आहे. मानअपमान मनांत न आणून बातमी फार राखीत जावी. छाप्याचे वगैरे अनेक दगे करतील तर मजबुदीनें असावें'. दादा कदाचित् पुण्यावर चालून येईल, म्हणून बापूनानांनीं साताऱ्यास जाऊन रामराजाचे नांवें तेथेंच कारभार चालवावा, असा विचार थोडा वेळ केला. परंतु लढाईनंतर दादानें नगराकडे पलायन केल्याची बातमी आल्यानें कारभारी निश्चिंत झाले. दादाचे पाठीवर पन्नास हजार फौजेचा जथ होता. त्यांपुढें आपला निभाव लागणार नाहीं असें ताडून, दादा लगोलग सीनेच्या पाण्यानें लांब मजला करून नगरावरून टोक्यास गोदातीरावर गेला. त्याचे पाठीवर हरिपंत, भोसले, निजाम वगैरे चालून गेले. उभयतांमध्यें प्रथम वीस कोसांची तफावत होती. परंतु गळ्यांत लोढणें असल्यामुळें हरिपंताचे पाय आंखडून गेले. 'आम्ही मोगलांकरितां गुंतलों. याउपरी सडे होऊन पाठलाग करितों. दादांनीं पळावयाची शक्कल काढिली आहे. पण आम्ही पाठीस लागलों असतां कोठें जातात! अटकून पाडावे. तोफा टाकून झुंजास आले तर झुंजावें, ऐसा निश्चय आहे'. निजामापेक्षांही भोसल्यांच्या भानगडी हरिपंतास जास्त जाचक झाल्या. दर्याबाई, मुधोजी व साबाजी यांचें तिरपगडें उजू करणें मोठें कठिण काम होतें, (खं. १०-१२४). हरिपंत पाठीवर येतांना पाहून दादानें धूम ठोकली. गोदातीर मागें टाकून तो वऱ्हाडांतून बऱ्हाणपुराकडे चालला. एप्रिल २० पर्यंत उभयतांत चाळीस कोसांची तफावत पडली. दादाचे पक्षांतील ब्राह्मण मंडळी त्यास सोडून परत आली. 'भोसल्यांचें कूच होण्यास कठिण पडतें. खर्चास मागतात. देण्यास सवड नाहीं. रस्त्यानें दादाचे फौजेनें दंगा फारच केला. आसपासचे गांव जाळले, माणसें मारिलीं. त्याउपर मोगलाई फौज, भोसले व स्वसैन्य त्याच प्रांतांतून जाणार, हा आकांत. पेस्तर सालीं लावणी होणें संकट आहे. या दंग्यांत कोणी कर्जवामही देत नाहीं. जीव रक्षणें कठिण पडलें आहे. राजक्रान्त बहुत कठिण आहे. मोगल अद्यापि शहरींच आहे.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

साबाजी भोसले व हरिपंत फुलमरीवर गेले'. असें आपाजीराव पाटणकर ता. २१-४-१७७४ रोजीं बापूस लिहितो. हा आपाजीराव व वणगोजी नाईक निंबाळकर दादाचे पक्षांत असून, त्याजकडून सलुखाचें बोलणें करण्यासाठीं म्हणून हरिपंताकडे परत आले, ते फिरून दादाकडे गेले नाहींत. बाजीपंत अण्णाही तसाच निघून आला. चिंतो विठ्ठल व विसाजी केशव लेले हे दादाकडून बोलणें करण्यासाठीं पुरंदरास आले होते. दादाचें म्हणणें कीं, 'आमचा धनीपणा राखावा, आम्ही कारभार करावा, नाहीं तर पूर्वीं जहागीर व किल्ले माधवराव पेशव्यानें दिले होते त्याप्रमाणें बंदोबस्त करून द्यावा'. अशीं हीं सलुखाचीं बोलणीं सारखीं सात वर्षें चालू होतीं. वास्तविक त्यांत कांहीं एक अर्थ नव्हता. उगाच वेळ मारून नेण्याकरितां दादा सलुखाचें सोंग वाटेल तेव्हां आणी. अशा सोंगाच्या बतावणीवर व कित्येक दुटप्पी सरदारांच्या धरसोडीवर दादानें आपला धंदा कैक वर्षें चालवून, एकूण एक मंडळीस अखेरपर्यंत फसविलें. एक नाना फडणीस मात्र त्यास पूर्णपणें ओळखून होता. दादास पेशवाई पाहिजे होती, त्याविरुद्ध कोणतीही तडजोड ऐकण्याची त्याच्या मनाची तयारी नव्हती. मरेपर्यंत त्यानें हा नाद सोडिला नाहीं. 'त्यांचा दम आहे तों फिरतील, जातात कोठें?' अशी भावना ठेवून कारभाऱ्यांनीं त्याचा पिच्छा पुरविला. 'दोन लाख रुपये दानधर्मास घेऊन आनंदवल्लीस राहवें. हें मान्य केल्यास त्यांजवळ विश्वासु लोक ठेवून बंदोबस्तांत ठेवावें; मान्य केल्यास त्यांची फौज उधळून आपली जवळ ठेवून बंदोबस्त करावा. मनसब्यास वेळ लागेल तर लागो. आजपावेतों ईश्वरें चांगलेंच घडविलें. पुढें मनसबा निर्वेध शेवटास न्यावा, असा कारभाऱ्यांचा निश्चय आहे'. आरंभीं अशी अत्यंत अनुकूळ परिस्थिति असतां हरिपंतास चुकवून दादा नर्मदा उतरूं शकला. त्याबरोबर सिंदे, होळकर, गायकवाड, बाबूजी नाईक वगैरे अनेक सरदार या तडजोडीचे नादीं लागले, त्यामुळें सात वर्षांचा काळ फुकट जाऊन राज्याचें मोठें नुकसान झालें. हीं सात वर्षें भाईबंदकीच्या कलहांत खर्च न होतां राज्यव्यवस्थेकडे कारणीं लागलीं असतीं तर, माधवरावाचे पश्चात्‌ही मराठ्यांचा इतिहास कांहीं अंशीं बदलला असता. दादानें केवळ स्वतःचेंच नुकसान करून घेतलें असें नाहीं, तर राज्याचेंही

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कायमचें नुकसान केलें. राज्य करणाराचें आहे, भोगणाराचें नव्हे, हें तत्त्व दादा व त्याची प्रजा यांस कळलें नाहीं.

पुरंदरावर सर्व कारभार बापू व नाना दोघेच मुखत्यारीनें करीत होते. त्यांत मोरोबा दादा अंशभागी नव्हता. त्यामुळें तो रुसून जुन्नरास जाऊन बसला. त्याची समजूत करण्याचे अनेक प्रयत्न झाले; पण ते सिद्धीस गेले नाहींत. वेळीं अवेळीं तो कारभाऱ्यांचे बेत हाणून पाडी; दादाचे तर्फेनें खटपट करी आणि सरदारांस बदसल्ला देई. शेवटीं त्याचा विकोप झाला, तो पुढें दिसून येईल.[1]

६. गंगाबाईची प्रसूति व पुत्रोत्सव, (१८-४-१७७४).—दादाचा पळ ब्र्हाणपुरपावेतों जाऊन मागें चाळीस कोसांवर हरिपंत वगैरे त्याचे पाठीवर येत असतां, इकडे पुरंदरावर अधिक वैशाख शुद्ध ७, सोमवार शके १६९६ जयसंवत्सर, ता. १८ एप्रिल सन १७७४ रोजीं गंगाबाई प्रसूत होऊन मुलगा झाला, तेणेंकरून कारभाऱ्यांचा हा वेळपावेतोंचा प्रचंड खटाटोप यशस्वी होऊन, दादाचे प्रयत्न लंगडे झाले. 'जन्मवेळा अ. वै. शु. ७ इंदुवासरे २६।४२ अदितिथे ३२।२० धृतौ योगे ५५।५८ वणिज करणे मेषार्क गतांशाः ७ भोग्यांशाः २३ तत्र श्री सूर्योदयादिष्टकालः १७।३०तत्रसमये कुलीरलग्नोदये ॥ (खं १०. १३७). या पुत्रजन्मामुळें कारभाऱ्यांस, सरदारांस व सर्व महाराष्ट्रास अवर्णनीय आनंद झाला. फौजेंत वर्तमान पावतांच निजाम, साबाजी, हरिपंत व सर्व सरदार आबालवृद्ध यांस संतोष झाला. सरबत्ती व नौबतखाना सुरू करून, शर्करा पृथक् पृथक् वांटल्या. नृत्यादि समारंभ, गजर, उत्सव झाले. देवानें कुलदीपक लाविला. देव त्यांस आयुष्य यथेष्ट करील. सर्वांचें जीवन आहे. आम्हांस आधार बळकट झाला. ईश्वरें अमृतवृष्टि करून वंशावळी प्रफुल्लित केली. भगवंतास प्रजेचें पालन आणि धर्मसंस्थापना कर्तव्य आहेच आहे, हा निःसंदेह जाला. पुढें सर्वांचे मनोरथ सिद्धीस जातील, हे उमेद कुलबाद जाहली. आपण चित्तावर घेतल्यासारखें आजपावेतों उत्तमच सूर्योदय जाहला. पुत्र झाला हा मोठा लाभ

---

१. **आधार.**—खं. १०-१३४, १२७, १३०, १३३, १३६; खरे ले. १३५०–१३५२, १३५५, १३५९, १३६०.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

श्रीपंढरीनाथानें राज्यास धणी केला. साक्षात् विष्णूनें राज्यरक्षणार्थ अवतार घेतला. या एवढा हर्ष कोणता आहे ! देव सत्याकडे आहे, असें पुरतें समजलें. जे द्वामुष्यायणी होते त्यांची सुद्धां खातरजमा झाली. सर्व लहान-थोरांस, तमाम सरदारांस व राजेरजवाड्यांस वर्तमान कळविलें. इंदुवार सुदिन. आम्ही आपला नौबतखाना इंदुवारीं सुरू करितों, विद्यानगरीं एक वेळ सुवर्णवृष्टि जाली, तीच हल्लीं आम्हांवर वारंवार देव करितो हाच उल्हास आहे. जगदात्मा कृपावंत होऊन कुलदीपउदय केला. त्यास आयुष्य-वृद्धि करो. जगन्निवास पुढें उत्तमोत्तम करील. जगन्निवासें प्रजेचें पालन करणार उभे केले'. अशा प्रकारचे विजयानंदोद्गार निरनिराळ्या व्यक्तींचे नमूद असून त्यांत महाराष्ट्रांतील समुचितानंदोर्मि सांठलेली आहे. थोरले माधवराव पेशव्याचा आत्मा बंधूचे खुनानें उद्विग्न होऊन, गंगाबाईचे पोटीं जन्मास आला, अशी लोकांची भावना होऊन त्यास सवाई माधवराव हें नांव देण्यांत आलें. दादाची बाजू कायमची खचली. बारभाईस जोर आला. पेशवाईचें भाग्य अस्तास जात होतें, तें सांवरलें अशी लोकांची समजूत झाली. नारायणरावाचे पश्चात् साडेसात महिने किती कष्टमय गेले, किती धांदल, किती खलबतें, किती संकटें, किती उपाय व तजविजी झाल्या! कोणाही जाणत्या मनुष्यास या सात महिन्यांत विश्रांति, झोंप, स्वास्थ्य बिलकुल लाभलें नाहीं. गेला दिवस आपला, उद्यां काय होईल कोणास ठाऊक, अशा चिंतेंत प्रत्यक्ष गंगाबाईचे, तिच्या कारभाऱ्यांचे व समस्त कामगारांचे हे साडेसात महिने गेले. गंगाबाईस जगवायची कशी ही अहर्निश सर्व राष्ट्रास विवंचना. सर्व संकटांतून पार पाडून अखेरीस राष्ट्रास परमेश्वरानें आनंदाचा दिवस दाखविला, हा आशय वरील उद्गारांत आहे. संसाराचीं परिवर्तनें कशीं होत असतात, सुखामागून दुःख व दुःखामागून सुख यांची परंपरा कशी असते, हें या पेशवाईच्या संक्रमणांत पानिपतापासून फार चांगलें दिसून येतें; आणि एक महिन्याच्या गर्भवासा-पासून ह्या नूतन अर्भकाची सर्व राष्ट्रानें वाहिलेली काळजी, त्याच्या जन्म-काळीं झालेला आनंद व इतउत्तरचा त्याचा एकंदर आयुःक्रम व अकालीं शेवट, यांवरूनही या परिवर्तनाचा प्रत्यय आणखी पुढें यावयाचा आहे. असो.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

या पेशव्याच्या जन्मकाळीं बापूनानांची कोण धांदल ! त्यांनीं किती बक्षिसें वांटलीं, किती नवस फेडिले, किती संस्कार व सोहळे केले, सुइणी-सवाष्णींनीं औक्षणें करून केवढी पैदास केली, तें सांगण्यास अवकाश नाहीं. त्यासाठीं स. मा. रो. १ ले. ८०–१२३ वाचावे. एक मासला पहा. 'सरकारांत कुही शेळीचें प्रयोजन आहे. तरी एक शेळी काळी अगर तांबडी चांगली दुधाची खरेदी करून पाठविणें. या रंगांची न मिळेल तर चांगली पांढरी खिजमतगार पाठविला आहे याजबरोबर पाठवावी', (वरील ले. १-९४). जन्मोत्सवासाठीं रु. ७७९४८≡ खर्च झाल्याचा दाखला आहे, (स. मा. रो. १-८५).

हा मुलगा गंगाबाईचा नसून, दुसरा बदलून घेण्यांत आला, असा प्रवाद आहे तो बिलकूल खरा नाहीं. प्रसूतीच्या समयीं दुसऱ्या कित्येक बायका बाळंतपणासाठीं पुरंदरास आणून, गंगाबाईस मुलगा न झाल्यास, दुसरा बदलून घेण्याची योजना कारभाऱ्यांनीं अगोदरपासून केली होती, आणि तदनुसार, गंगाबाईस मुलगी झालेली पाहून, दुसरा त्याच सुमारास जन्मलेला मुलगा गंगाबाईला दिला, तो हा सवाई माधवराव होय, हा प्रवाद आख्यायिकांतून रूढ झालेला आहे, ही बाजारगप्प प्रथम इंग्रजांचा वकील मॉस्टिन पुण्यास होता, त्यानें बाहेर लिहून कळविली, आणि दादानें पुढें आपल्या हक्काच्या समर्थनासाठीं तिचा फायदा घेतला. दीडदोन वर्षांनीं कलकत्त्याहून इंग्रज वकील अप्टन पुरंदरास आला, त्याची यासंबंधानें कारभाऱ्यांनीं खात्री करून दिली, तेव्हांच त्यानें पुरंदर-चे तहास संमति देऊन या नूतन पेशव्याचा हक्क कबूल केला. जातीचीं वंशशुद्धीचीं बंधनें त्या वेळीं विशेष जोरांत असून, अशी अदलाबदल प्रत्यक्ष गंगाबाईस किंवा बाहेरच्या शेंपन्नास इसमांस कळल्याशिवाय शक्य नव्हती. एवढ्या जनतेपुढें आपली अब्रू गमावण्याचें धैर्य कोणासही होणार नाहीं. प्रत्यक्ष गंगाबाईस ही गोष्ट मुळींच रुचली नसती. सवाई माधवरावाचा चेहरा व बांधा तसेंच त्याचे पुढें दिसून आलेले बरेचसे गुण पुष्कळ अंशीं नारायण-रावासारखेच व व्रात्यपणाचे होते, हे पुढें दिसून येईल. रघुनाथरावाची मुलगी प्रसूतिसमयीं पुरंदरावर होती, परंतु ती अगदींच अप्रबुद्ध म्हणजे नऊ वर्षांची होती, तिला या गोष्टी कळणें शक्य नव्हतें. ता. ३०

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जुलई १७७६ रोजीं दादा इंग्रजांकडील आपल्या वकिलास लिहितो. इंग्रज सवाईमाधवरावाचा हक्क पेशवाईवर आहे असें म्हणतील तर 'तुम्ही जनरल व कौन्सिलाशीं बोलणें कीं तो मूल खोटा, त्याचा मुद्दा सांप्रत आम्हांजवळ आहे', (खं. १२-१७१, १८०). त्यानंतर दादाच्या अनेक भानगडी झाल्या, त्यांत त्या कर्मनिष्ठानें या वंशाशीं आपला संबंध तोडिला नाहीं. आणि मुलाच्या खरेपणाविषयीं खात्री झाली म्हणूनच तो शरण आला. ग्रँट डफनें या प्रकरणाचा शोध करून, 'सवाई माधवराव हा गंगाबाईचाच पुत्र होय यांत संशय नाहीं', असा आपला अभिप्राय दिला असून अलीकडे किंकेडनेंही हा आरोप सप्रमाण खोडून काढिला आहे. मुलगा झाला नसता तर कोणी गोत्रज दत्तक घेण्याचा विचार कारभाऱ्यांनीं ठरविला होता.

आनंदीबाई स्वारींत नवऱ्याबरोबरच होती. गंगाबाईस मुलगा झाल्याची बातमी कारभाऱ्यांनीं तिला म्हणून स्वतंत्र कळविली नाहीं. ती समजल्यावर तिनें ता. २९-४-१७७४ रोजीं बऱ्हाणपुराहून खालील पत्र सखाराम-बापूस लिहिलें. 'चि० नारायणरावांस पुत्र झाला म्हणून तिकडे हुजूर पत्र लिहावें आणि आम्हांस न लिहावें ऐसा तुमचा आमचा ऋणानुबंध चालत आला कीं काय ! आतां या पत्राचें उत्तर जलद पाठवावें. आम्हांस नातू झाला म्हणून पत्रें घेऊन खिजमतगार आले, त्यांस देण्यास सोन्याचीं कडीं तयार नाहींत. तरी तुम्हीं तेथें दोघांस दोन कडीं सोन्याचीं आमचेवरचीं द्यावीं. बाळाचा समाचार नित्य पाठवीत जावा. तुमच्या नांवास व वयास योग्य दिसेल तें याउपरी तरी करावें. तुम्ही आमचें थोडें बहुत ऐकत असतां म्हणून लिहिलें आहे. तुम्हांकडेस वडीलपण आहे. दुर्लौकिक न होतां काय करणें तें समजून करावें'. अशाच मजकुराचें पत्र याच तारखेचें तिनें नाना फडणिसासही लिहिलेलें आहे, त्यांत वरच्याहून जास्त मजकूर इतकाच कीं, 'किल्ल्याची हवा बहुत सर्द आहे. लेकरूं लहान, यास्तव ज्या जाग्यास लेकरास सुख पडे तेथें न्यावें. थोरपणाची रीत हीच कीं, कोणी कोणास बहुत छेडूं नये. चुणूक दाखविण्यांत मौज आहे. परंपरा पाहोन योग्य असेल तो अर्थ समजून घ्यावा'. या पत्रांवरून आनंदीबाईचा खोल, धूर्त

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

व विचारी स्वभाव व्यक्त होतो. दादाचे अंगीं अशी धूर्तता असती तर त्याचे हातून राज्याची कामगिरी चांगलीच झाली असती.

चाळिसावे दिवशीं सवाई माधवरावास पेशवाईचीं वस्त्रें झालीं. बापूनानांनीं सातार्‍यास जाऊन वस्त्रें आणिलीं. 'माधवराव नीलकंठ पुरंदरे यांनीं सतर्षीस जाऊन राजश्रींपासून पेशवाईचीं वस्त्रें व शिकेकटार आणिलीं तीं वैशाखमासीं ता. २८-५-१७७४ रोजीं किल्ल्यावर बाळंतिणीजवळ श्रीमंत असतां चौरंगावर वस्त्रें, जवाहीर व ढालतरवार जाबत्यामाफक आलीं तीं ठेवून, सभा कचेरी नाच चालून लोकांनीं नजरा करून राजाराम नरपति हर्षनिधान, माधवराव नारायण, प्रधान, असा शिक्का जाहला, (स. मा. रो. १-८२ व का. सं. प. या. पृष्ठ ४३४). हीं वस्त्रें म्हणजेच प्रस्तुतचें कायदेशीर राज्यबंधन (Constitution) बनलें होतें.

येणेंप्रमाणें नारायणराव पेशव्याचे खुनाचें पर्यवसान होऊन आतां नवीन मनु सुरू झाला. गोपिकाबाई पंचवटींत भिक्षा मागून राहत होती, ती २९ एप्रिल रोजीं परत गंगापुरास वाड्यांत येऊन राहूं लागली. या वेळीं नाना फडणिसास कित्येक जिवावरचीं संकटें आलीं. त्याबद्दल त्यानें धन्यवाद गाइले ते असे: 'दीनदयाळ ईश्वरानें नारायणरावाचे वेळेस गाड्यांपासून वांचविलें. दादासाहेबांस बुद्धि चांगली देऊन रक्षिलें. (म्हणजे खुनानंतर दादाचे जवळ राहून नाना कारभार करीत असतां त्यास दादानें अपाय केला नाहीं). पुरंदराचे समयीं रक्षिलें. गंगाबाई गरोदर असतां त्यांस काढून न्यावयाची बुद्ध देऊन कीर्ति करून दाखविली. दादासा० जवळ पन्नास हजार फौज असतां अशी (बाईस एकटी न्यावयाची) बुद्धि दिली. पुढें पुत्र कीं कन्या याचा निश्चय नाहीं, मारलेच जावे, परंतु कृपा करून रावसाहेबांचा जन्म होऊन अतर्क्य कर्म केलें असें म्हणविलें', (ऐ. टि. १. ३७). नाना फडणीस अत्यंत धूर्ततेनें वागला यांत संशय नाहीं. एकदम बारभाईचें कारस्थान उभारण्याची घाई त्यानें केली नाहीं. स्वतः नामानिराळा राहून बापूस त्यानें पुढारपण दिलें, आणि पुढील एक एक गोष्टीचा जम बसविला. वास्तविक खरा सूत्रचालक नानाच होता. बारभाईचें कारस्थान हें नांव सुद्धां असेंच भ्रामक कैक वर्षें मागाहून प्रचारांत आलेलें आहे. त्यांत बाराच इसम

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

होतें असें नाहीं. पहिले मुख्य इसम चार बापू, नाना, त्रिंबकराव व हरिपंत. मोरोबादादा, भवानराव, बाबूजी नाईक वगैरे मंडळी मागाहून विरोध बंद पाडण्यासाठींच आंत घेतलेली होती. पटवर्धन मंडळींचाच मोठा आधार या कटास होता. यापुढील राजकारणांत महादजी सिंदे नानास अनुकूळ झाला, म्हणूनच तें सिद्धीस गेलें. हा प्रकार पुढें सांगण्यांत येईल.[1]

वास्तविक मध्यविभागाची मर्यादा थोरल्या माधवरावाच्या मृत्युसमयींच संपली. परंतु त्यापुढील दीड वर्षांतील घडामोडी पूर्वींच्याच कौटुंबिक कलहाचें उत्तर स्वरूप असल्यामुळें विषयपूर्ततेसाठीं सवाई माधवरावाच्या जन्मापर्यंतचा भाग याच पुस्तकांत घेतला आहे. या पेशव्याच्या जन्मानें जरी तो कलह संपला नाहीं, तरी एकंदर राजकारणास पुढें निराळेंच परकीय युद्धाचें स्वरूप प्राप्त झालें. शिवाय माधवरावाचा मृत्यु हा एक हृदयद्रावक प्रसंग असून, त्यापुढें त्याच्या भावाचा वध होऊन राष्ट्राचा शोक दुणावला, त्याचें शमन नवीन पेशव्याच्या जन्मानें झालें, म्हणून आनंदपर्यवसाय गांठण्यासाठींही येथपर्यंत मजल आणून प्रस्तुत खंडाला विराम दिला आहे.

---

१. आधार.—खं. १० ले. १३७; स. मा रो. १. ८२; का. सं. प. या. पृष्ठ ४३३-४३४; इ. सं. ऐ. टि. १. ३३, ३७; हरिवंश बखर. खं. १३६४, १३७५.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

सूची.

महत्त्वाचे विषय त्यांतील व्यक्तींच्या नांवाखालीं पाहवे; व्यक्तीच्या नांवांत संबद्ध बाबतींचा भरपूर उल्लेख केला आहे.

अनूबाई घोरपडे–१३३, १७४.
अन्नपूर्णाबाई—गंगाधर यशवंताची बायको ८.
अमृतराव–११० ३३३.
अहल्याबाई होळकर–१८३, १९९, २०१, मृ. २१२; दादाचा राग व स्वारी २०१.
अहंमदखान बंगश–१९७, २१४; मराठ्यांचा हल्ला २१६, मृ. २१८.
अहंमदशहा अब्दाली–स्वाऱ्या व मृ. १९०.
आनंदराव गोपाळ–७१, १५७.
आनंदराव धुळप–जीवन वृत्त व वंश २७४.
आनंदीबाई पेशवे–२२, ४१, १०५, ११०, ११५, मुलें १२०, २४६, ३०३, ३३३, खुनाशीं संबंध ३४३–३४८, ३८१.
आपाजीराम ३५४.
आपा पुरंदरे–धोंडो मल्हार पहा.
आबाजी महादेव सोवनी–दादाचा कट्टाअभिमानी ९९, ११८, १३३.
आबा पुरंदरे–नीळकंठ महादेव पहा.
इच्छारामपंतढेरे–२३६, २३७, ३३६.
इंग्रज–१७७–१८३, मालवणचा किल्ला काबीज १७७; मराठमंडळ फोडण्याचा प्रयत्न १७८, माधवरावाचा अभिप्राय १७९, नागपुरकर भोसल्यांशीं संबंध १८२, शिवभट साठ्याचा द्वेष १८२-१८३; वागण्याचें धोरण १९१-१९२; बंगालबहार काबीज १९५, २१०; मराठ्यांविरुद्ध कारस्थान २२५.
कृष्णराव बल्लाळ काळे–१५३, २३६.
कृष्णाजी धुळप–३१६.
केदारजी सिंदे–४८, १११, १८३, १८४ मृ. १८६.
क्लाइव्ह–दिवाणी संपादन १७७ व १९८; १९७.
खंडेराव होळकर–अहल्याबाईचा नवरा २०१.
गणेश संभाजी–१७२, ३०१.
गमाजी यमाजी–प्रतिनिधीचा मुतालिक २४, ३१, ३६, ४०, ४५, ४८, १२२, मृ. १२२, १२९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

गाजीउद्दीन—१८९, १९६, २०३, २१२, २१८, ३०६.

गोपाळराव गणेश बर्वे—९७, २१०.

गोपाळराव गोविंद पटवर्धन—४, ६, ९, २५, ३३, ३५, ४६, ४८, ५२, ५३, ५७, ६०, ७२, ७७, ८५, ८६, ८७, दुखणें व मृ. ८८; माधवरावाचा इतबार १०९, १११, १२२, १५६, १५९, जीवनवृत्त व वंश २९७, पटवर्धनघराण्याची शिकवण २९५, २९६.

गोपाळ संभाजी खांडेकर—३०१.

गोपिकाबाई—२, ७, १३, स्वभाव १५; नाशकास प्रयाण १५, ९५ व ३५, ४७; प्रकृतीस बिघाड २३४; माधवरावाची आज्ञाधारकता २४३, ३६१.

गोविंदराव गायकवाड ३३, ११०, १५४, सरदारी व दंड १५४.

गोविंद शिवराम खासगीवाले—३१, ९४, ९९, १०८, १६०, १६५, १८१, २०७, २५८; जीवनवृत्त व वंश २७८.

गोविंद हरि पटवर्धन—२२, ३२, ३४, ४०, ५२, १००; माधवराव पेशव्यास सल्ला १०७.

गंगाधर यशवंत चंद्रचूड—३८, ६०, १११, ११२, जीवनवृत्त १४३ व वंश २८८; मृ. ३५३.

गंगाबाई—पेशवे ३५१ ३६०, ३६३, प्रसूति ३७८.

गंगाविष्णु महीधर—वैद्य २३३, २३४, २३८, २४५.

चिंतोअनंतदेवस्थळे-७४, ९९, १०६.

चिंतो विठ्ठल रायरीकर—२६, ६८, ९५, ९८, १०८, १११, १८५, १९१; जीवनवृत्त व वंश २८१.

जनकोजी सिंदे—तोतया १७१, १७३, १७४.

जवाहीरमल्ल जाठ—१९३, मृ. १९३, २०३, २०८.

जानोजी धुळप—जीवनवृत्त व वंश २७४.

जानोजी निंबाळकर—मृ. ५६.

जानोजी भोसले—६, ८, २७; पेशव्यावर चढाई ३६, साठचाळिशीचा तह ३९ व १४८; भवानराव प्र. शीं करार ४५, ५५, ६०, १२२, १४६; पेशव्याशीं लढाई १५०—१५२; दुसरी लढाई व कनकापुर तह १५४-१६०; पे.शीं भेट १६१, २३१ व २३५; मृ. १६३; इंग्रजांशीं संबंध १८२—१८३.

जिजाबाई--कोल्हापुरची राणी ६९, १३१, १३८; शिवाजी दत्तक १३५; मृ० १३७; कोल्हापुर राज्याची दुर्बलता १३८—१४२; मालवण किल्ला गमावला १७८.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

जिवाजी विश्राम—१३६, १३७.
झबेताखान—नजीबखानाचा मुलगा, २१७, २२३.
तुकोजी होळकर—१०७, १११, २०२, २०६, २०८, २१२; पराक्रम २७६.
तुळजोराम—३०९.
तुळ्या पवार—३२४, ३२९, ३३५.
तोतये—ज्या त्या नांवाखालीं पहा.
त्रिंबकराव दाभाडे—दुसरा २७३.
त्रिंबक विनायक—९९, ३१६.
त्रिंबकराव मामा पेठे—१२, १४, १७, १९, २५, ८६, ८७, ९१; हैदराशीं तह ९२, ९४ २३४, २३६, २५५, ३६५, मृ. ३७३.
त्रिंबक सदाशिव ओढेकर—२०८; वंश ३०३.
त्रिंबक सदाशिव—नाना पुरंदरे, २, १६७.
दमाजी गायकवाड—६, ९, ३३, ५८, मृ. १५४, २७३.
दादा—रघुनाथराव पहा.
दिवाकर बाळकृष्ण—देवाजीपंत पहा.
दुर्गाबाई—दादाची मुलगी, लग्न पांडुरंग नाईक १६६.
दुंदेखान रोहिला—मृ. २२१.
देवराव महादेव हिंगणे—२१०.
देवाजीपंत चोरघोडे—३९, ५४, १५५—१६०; मृ. १६३.
धोंडो मल्हार आपा पुरंदरे, २, १६७.
नजीबखान रोहिला—१९२, १९३-१९६, २०९, २१०, २१२; महादजीचा राग २१३, मृ. २१७.
नरसिंगराव धायगुडे—७१, १५७, १६५.
नरसो गोविंद बोंधले ३०१.
नाना पुरंदरे—त्रिंबक सदाशिव पहा,
नाना फडणीस—४८, ६८, ९६. ९७; अर्धा शहाणा १४५, १५८, २३७, २५२, ३२६.
नारायणराव पेशवा—१४, लग्न ४५ व ४७; गोळीची जखम ८४, ८५; दिवाणगिरी २३० व २३५, बालपण ३१० व ३१३; वस्त्रं ३११; छत्रपतीशीं वर्तन ३१२; शिक्षण ३१३; स्वभाव ३१४ व ३२५; गाड्यांशीं वर्तन ३१५; रायगड काबीज ३१७; मातुश्रीची भेट ३१५ व ३१९; दादांची सक्त कैद ३२३-२४ व ३२६; कट ३२७-२८; प्रभूंचें ग्रामण्य ३२७; खुनाचा दिवस ३३५; एकंदर हत्या ३३७; गुन्हेगार ३४१ व शिक्षा ३६८.
नारो आपाजी—तुळसीबागवाले ४४, ४७, २३४, २५९, जीवनवृत्त व वंश २८०, ३२०.
नारो कृष्ण—९७.
नारो गणेश—होळकराचा कारभारी २०५, २०६.
नारो नीळकंठ मुजूमदार—३००,
CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

नारो शंकर–२, ६, ५६; सिंद्याची दिवाणगिरी १०३, १०५; प्रतिनिधि १२२, १८४.
निजामली–मेदकची स्वारी ३; पुण्यावर स्वारी ५, ९; दादाशीं भेट व तह २७, ३६; साठचाळिशीचा तह ३९, ४० व १४८; ४६, ५०, राक्षसभुवन ५४, पळ ५८, पेशव्याशीं तह पैठणचा ६०–६१.
नीलकंठ त्रिंबक पटवर्धन–४, ५; लढाईंत मृ. ९०.
नीलकंठ महादेव–आबा पुरंदरे २, १४, २९, ३४, ५८, ९६, ९९, १६६–१७०.
पार्वतीबाई पेशवे–सदाशिवरावाची बायको, तोतयाचा विषय १७१–१७७; वपनविधि ३१९.
पुरुषोत्तम महादेव हिंगणे–११३.
बजाबा पुरंदरे–महिपत त्रिंबक पहा.
बहिरो अनंत–अंताजी माणकेश्वराचा पुत्र २३, २०४.
बाबूजी नाईक–बारामतीकर ३, ६, १०८, १६४–१६६; १७६.
बाबूराव फडणीस–९, १३, १८, मृ. २३४.
बाबूराव विश्वनाथ वैद्य–३०९.
बाबूरावहरि–४८, ५८, ७६, २५७.
बाळाजी गोविंद खेर–१८९, १९३, २०८, २११.
बाळाराव गोविंद महादजीचा १७४.
भगवंतराव प्रतिनिधि–१२३; भवानरावाशीं लढाई १२४, मृ. १२७.
भवानराव प्रतिनिधि–६, ३३, ३६; जानोजी भो. शीं करार ४५, १२१; वस्त्रें १२३; भगवंतरावाशीं लढाई १२४; पेशव्यास शरण १२५–१२७; मृ. १२७, ३५८.
भवानी काळो–३०९.
भवानी शिवराम–३२४.
मल्हारराव होळकर–१८, २०, २४, ३८, ३९, ६१, १०४, १९३, १९४; इंग्रजांकडून पराभव १९५–१९७; मृ. परिवार, योग्यता १९९–२०१.
महंमद इसफ गाडदी–८४, ३१५, ३३०, ३३३, मृ. ३४२, ३७३.
महादजी सिंदे–२, ४९, ५६, ६१, ९९, १०४, १११, १८१ १८३; दादाचा राग १८५; गोहदचे वेढ्यांत मदत १८६; कुटुंबांतील बायांचीं नांवें १८६; सरदारीचीं वस्त्रें १८६; बायको मृ. १८७; दादाची इतराजी १९४, १९८, २०८, २०९; दिल्ली काबीज २१९; बादशहाची दिल्लीस स्थापना २२१; रोहिल्यांचा सूड २२३; दिल्लीच्या स्वारीचा निष्कर्ष २२७.
महादाजी गोविंद काकडे, महादजीचा कारभारी–१७३; मृ. १८५ व १९४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

महादाजी निंबाळकर-मृत्यु राक्षसभुवनावर ५८.
महादाजी बल्लाळ भट गुरुजी माधवराव पेशव्याचा गुरु २४०, २५०, २५१, २५९.
महिपत त्रिंबक-बजावा पुरंदरे ३३, १०८.
महिपतराव चिटणीस–२१, २६, २८, १०३.
महिपतराव दिनकर–१५७.
माधवराव–थोरला, जन्म १; वस्त्रें १; राष्ट्रीय भावना २, ११, १२, १३, १५; घोडनदीची लढाई २२, २६; राक्षसभुवनची स्वारी ४३; पुण्यांत प्रलय ४८; राजकारणाचा अनुभव ५१; राक्षसभुवनची लढाई ५७; कर्तबगारी, शिक्षण व अनुभव ६१–६४; पैठणचा तह ६०-६१; उत्तर हिंदकडे दुर्लक्ष ६५; कर्नाटकच्या स्वाऱ्या ६६; अनंतपूरचा तह ७५; पंचयात्रा ७७; मराठमंडळाची एकी ८१; प्रभाव ८३; पुरंदरचे कोळ्यांचा दंगा ९६, १६७-१६९, बंडखोरांस शासन ९७; राज्याची वांटणी १०१; दादाशीं कोप १०५; चुलत्याशीं आनंदवल्लीस भेट १०७; राजवाड्यांचा अभिप्राय १०८ व ११२; सर्व जंजिरे-किल्ले तपासणें १०८; घोडपची लढाई ११०; कोल्हापूर खालसा करण्याचा प्रयत्न १३२–१३४; कोल्हापुरचा बिकट प्रश्न १३८–१४२; राज्याची घटना व हिंदुपदपातशाही १४२; साडेतीन शहाणे १४३–१४५; भोसल्यावर चढाई व कनकापुरचा तह १५०-५२ व १५४–१६०, त्याची भेट १६१ व २३५; स्वभाव ३०, १५२, १५४, १६५; पुण्याची नवीन रचना १५४, २४५ व २५७; इंग्रजांशीं संबंध १७७; तोफांचे कारखाने १७८; इंग्रजांबद्दल अभिप्राय १७९; सिंद्यांचे बायकांच्या तक्रारी १८६; पानिपतोत्तर परिस्थिति १८९ व १९१; मृत्यूची खोटी बातमी २२०; दिल्लीमोहिमेवर अभिप्राय २२२; सरदारांचीं भांडणें २२५; व्याधि व प्रकृतीला ताण २२८; शरीरयष्टि व कामाचा बोजा २२९; अनुष्ठान २३०, कटोऱ्यास हवाफेर २३२; आजारांतील लहर २३४; श्रावणमास दक्षणा २३४; अखेरचे दिवस २३६; नवस २३७; राजव्यवस्थेचा लेख २४०–४३; मुलूखगिरीची वांटणी २४१; मातुश्रीशीं वर्तन २४३; बालबोध पत्र २४६, ज्योतिषाचा उपयोग २४८, कामाचा उरक २४९; करड शिस्त २५०; न्याय निकाल

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

२५२; कारभारी २५२; कडक शिस्त २५३; मुराररावास जरब २५३; गोठगणत्या २५५; मर्जींतील मंडळी २५६; समदृष्टि २५६; निरंकुशता २५७; प्रमुखव्यक्ति २५८ व २६८; ब्राह्मणांस उत्तेजन २५९; निर्भयता २६०; राज्याचा वसूल २६१, पट्टया २६२; दहकपट्टी २६२; शास्त्रीय ज्ञानाकडे दुर्लक्ष २६३; राज्यकारभाराची रचना २६४; योग्यता व तुलना २६५-६६; सेवकसंघ २६७; प्रमुख घराणीं २७१-३०९; घराण्यांची तुलना २७१.

माधवराव सवाई पेशवे--जन्म ३७८; वस्त्रें पेशवाईच्चीं ३८२.

माधवसिंग-जयपुरचा २०८.

मानाजी सिंदे फाकडे २४, ११८-१८४; जीवनवृत्त व स्वभाव १८७.

मालेराव होळकर—अहल्याबाईचा मुलगा १९९, २०१, २०२; वस्त्रें व मृत्यु २०५.

मालोजी घोरपडे-३०५.

मॉस्टिन-इंग्रज वकील पेशव्याजवळ १८०; भेटी १८१, ३१६.

मीरकासीम-१४९, १९५, २१०, २१९.

मीर्झा नजफखान-दिल्लीचा वजीर-२१०, [illegible]

मीर फैजुल्ला-हैदराचा सरदार-६८, ७०, ७९.

मीरमोगल-निजामाचा धाकटा भाऊ ९, १६६.

मीररेजा-हैदराचा सरदार ८९, ८२, ८७; गोठ लुटला २५३.

मुक्ताबाई फणसे-अहल्याबाईची मुलगी २०१ मृ. २०२.

मुधोजीभोसले-साबाजीशींतंटा ३२०.

मुरादखान-निजामाचा सरदार, ८, २२, २६, २०६.

मुरारराव घोरपडे-६७, ७४, ७८-८०, ८२, ८३, ८९, ३५९.

मोरोबा दादा फडणीस-६८, ९७; रुसवा २३५.

मोरोबा पटवर्धन-३१, ७७, ११३.

यशवंतराव पवार-तोतया १७१.

रखमाजी गणेश-चिटणीस नागपुरचे-३०९.

रघुनाथराव-पेशवे-१, २; स्वभाव २, ३, ८, १३, १९, २९; मेदकची स्वारी ३, ४; निजामाशीं लढाई ७ व तह ८; माधवरावाशीं बेबनाव १५-३०; वडगांवास पलायन २१; घोडनदीची लढाई २२ व २६; पैठणची लूट २४; मीरज काबीज ३२; मुलगा भास्करराव प्रतिनिधि ३३ व त्याचा मृ. ४१; निजामाचा त्वेष ४४, ५० [illegible] ६४; नाश-

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

कास उच्छेद ७३; कर्नाटकांत प्रयाण ७४; आनंदवल्लीची स्थापना ९५; पुरंदरकोळ्यांचा दंगा ९६ व १६७-१६९; भरकटलेले विचार ९८, ९९; स्वार्थमूलक पदांच्या घालमेली १००; राज्याची वांटणी मागणें १०१; प्रकृति १०३ व ११३; पुतण्याशीं विकोप १०५; त्याची आनंदवल्लीस भेट १०७; इंग्रजांकडे साह्याची याचना १०९; अमृतरावाचें दत्तविधान ११०; घोडपची लढाई ११०, वाड्यांत कैद ११३; त्रागा ११४; करार व कैदेंतून मुक्तता ११५, २३३ व २४०; नेमणूक, परिवार, योग्यतेचा अंदाज ११६-१२०; राज्याची हानि ११८; इंग्रज वकील ब्रोम १८०; उत्तर हिंदची स्वारी १९९; गोहदचा वेढा २०३; इंदुरवर स्वारी २०५; अनुष्ठान २३५; फितूर २३६; स्वभावभेद २६८; पुण्यास फितुर ३२०; नारायणरावाकडून कैदेची सक्ति ३२३; ३२४-३२६; नारायणरावास मारण्याचा कट ३२७-३२८; प्रायश्चित्त ३३२, ३४६.

रघूजी आंगरे-१७५

रघूजी भोसले दुसरा-१६३.

रमाबाई-माधवरावाची बायको-स्वारींत ८१, ८५, २३६; सती २३१.

जीवनवृत्त २४७, २५६.

रामचंद्र गणेश कानडे-४, ७१, १५६, १६२, २०८, २०९, २१२, २१५; अहंमदखानावर हल्ला २१६, रुसवा व मृ. २२५; वंश ३०४.

रामचंद्र जाधव-५, ९, ३२, सेनापति ३३; कैद ४२, १५६, १६६; जीवनवृत्त व वंश २७१.

रामचंद्र नाईक परांजपे-१७४-१७६.

रामचंद्र नारायण गोरे-गोपिकाबाईचा कारकून-४५, २४५.

रामराजा छत्रपति-३३, ९९, १२८; साताऱ्याची भानगड १२९-१३०; लग्नें व संतति १३१; राजा खोटा १३२.

रामशास्त्री प्रभुणे-२३, ७५, ८०, १७४, १७६, २४०; जीवनवृत्त व वंश २८३; ३४४.

रामाजी केशव-३०९.

रामाजी बल्लाळ गुणे--पेशव्याचा वकील नागपुरकरांकडे ५३, ५६, ८२, ३२१.

रामाजी महादेव बिवलकर-मृ. २३४

रुद्राजी धुळप-६९; जीवनवृत्त व वंश २७४. [३२८.

लक्ष्मणराव काशी-३०९, ३२२,

विठ्ठल विश्राम-१३६-१३७.

विठ्ठल शिवदेव-६, न्यायाधीश ३३, २४; क्रौर्य ... मृ. ..., २०४.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

विठ्ठल सुंदर—२७, ३९; पुण्यावर चाल ४५, ४६, ४८; मृ. ५८; जीवनवृत्त १४४.

विनायकदास—विठ्ठल सुंदरचा पुतण्या ४७; मृ. ५८.

विसाजी कृष्ण बिनीवाले—७, ७१, १६२, १६५, २११; उत्तरेंतून परत २२६; जीवनवृत्त व वंश २७६.

विसाजी केशव सान्ये—१६७, १७०.

विसाजी गोविंद चांदोरकर—१९३.

विसाजीपंत लेले—३१७—३१९.

व्यंकटराव काशी—३०९, ३२२, ३२८.

व्यंकटराव घोरपडे दुसरा—१७५.

व्यंकाजीपंत पोतनीस—१२४, १२९.

शहा आलम बादशहा—१९५, १९८, २०९; इंग्रजांचा सल्ला २१४, २१५ व २१९; मराठ्यांशीं करार २२०; दिल्लींत प्रवेश २२१; धरसोड २२६.

शहाजी भोसले—अक्कलकोटकर ३.

शिवभट साठे—१८३, ३०७.

शिवाजी-छत्रपतिकोल्हापुरचा, १३५.

शिवाजी विठ्ठल जोशी—माधवरावाचा सासरा—६, १८.

सखारामबापू—बोकील २, ९, १०, १४; पूर्ववृत्त १६, २२, २६, ४४, ५२, ७७, ९४, ९७, १०३, १११; जीवनवृत्त व वंश २८४, ३४३, ३५०.

सखाराम हरि—५८ ८३, ८५, ८७, अजब पराक्रम ८९, ११८, १५७; जीवनवृत्त व वंश २९०.

सदाशिव रामचंद्र—४३, ५६, ५८, ११३, ११८, २०७.

सदाशिवरावभाऊ—चा तोतया १७१-१७७.

संभाजी—छत्रपति कोल्हापुरचा १३२, १३७, १३९, १४०.

सलाबतजंग—५ कैद व मृ. १०

साबाजी भोसले—८३; मुधोजीशीं तंटा ३२०, ३७१.

सुजाउद्दौला—१८३, १८९, १९०, १९४—९६; २१०, २१८, २२५.

सुमेरसिंग गाडदी—३१५—३१६, ३३१, ३३५, ३४२.

सुरजमल्ल जाठ—मृ. १९२; बायकामुलें १९३.

हरिपंडित—पेशव्याचा कलकत्त्यास वकील—२१६.

हरिपंत फडके—२३४, २३६, २३८, ३७४.

हरिपंत भिडे—५८, २०४.

हैदरअली—६६, ६७, ७२; पाडाव व तह ७४ व ७५; इंग्रजांवर चाल ८१; पराभव ९०; पेशव्याशीं तह ९२; कल्याणदुर्गाचा तह ३५९.

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar

Digitized by Arya Samaj Foundation Chennai and eGangotri

CC-0. In Public Domain. Gurukul Kangri Collection, Haridwar